NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026
YEAR : 50 ) 1st December 2025 ( No. of Pages 96 ) ( No : 18

# नागरी पाणीपुरवठ्याचा महत्तम अनुशेष असलेल्या प्रदेशातील महत्तम अनुशेष असलेल्या शहराच्या अनुशेष निर्मूलनार्थ संघर्ष

*लेखन*
**प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

## अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांक

# अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांक

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचा तपशील | परिच्छेद क्रमांक |
|---|---|---|
| | ( लेखकाचे प्रास्ताविक : पृष्ठ २४३ वर ) | |
| (१) | नागरी पाणीपुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेल्या प्रदेशातील सर्वात जास्त अनुशेष असलेले शहर | १ - ११ |
| (२) | आश्वासन समितीत पाठपुरावा | १२ - २० |
| (३) | सचिवांची आश्वासन समितीसमोर फजिती | २१ - ३४ |
| (४) | सभागृहात धुमश्चक्री | ३५ - ४२ |
| (५) | ''अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण'' या आयुधाचा वापर | ४३ - ४९ |
| (६) | ''अर्धा तास चर्चा'' या आयुधाचा वापर | ५० - ६६ |
| (७) | पुन्हा आश्वासन समिती | ६७ - ७३ |
| (८) | दहा टक्के लोकवर्गणीचा नियम १३ दिवसात शासनाने बदलला | ७४ - ८६ |
| (९) | नियमबाह्य वर्तनाची तक्रार केली तर शासनाने मूळ नियमच बदलला | ८७ - ९९ |
| (१०) | सभागृहात रणकंदन | १०० - १११ |
| (११) | जनआंदोलनाचा टप्पा | ११२ - १२८ |
| (१२) | आंदोलनाच्या प्रभावाने शासन चर्चेसाठी तयार | १२९ - १३७ |
| (१३) | ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी बाळासाहेब मराठे यांचा घणाघात | १३८ - १४४ |
| (१४) | बी. टीं. ची सभागृहात अनुपस्थिती | १४५ - १५२ |
| (१५) | मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजनासाठी तारीख दिली | १५३ - १६३ |
| (१६) | रुसलेल्या नगरविकासमंत्र्यावर सभागृहात चौफेर हल्ला | १६४ - १७५ |
| (१७) | मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन | १७६ - १९२ |
| (१८) | आश्वासन समितीमधील रणकंदनानंतर योग्य तो शासननिर्णय निघाला एकदाचा | १९३ - २०२ |
| (१९) | निधी उपलब्धीसाठी सभागृहात पाठपुरावा | २०३ - २१८ |
| (२०) | एका लक्षवेधीने ३२ हजार रुपयांची तरतूद १३ कोटी रुपयांवर नेली | २१९ - २३० |
| (२१) | प्रकल्पपूर्तीच्या कालखंडाबाबतच्या आश्वासनांचा पाठपुरावा | २३१ - २४१ |
| (२२) | प्रकल्पपूर्तीसाठी आश्वासन समितीत पाठपुरावा | २४२ - २५१ |
| (२३) | वनविभागाच्या अधिकाऱ्यांचा कमालीचा खोडसाळपणा | २५२ - २७१ |
| (२४) | बंद पडलेले काम सुरू ठेवण्याचे आदेश | २७२ - २८० |
| (२५) | निधी उपलब्ध होण्यात अडचणी | २८१ - २९५ |
| (२६) | पुन्हा आश्वासन समितीमध्ये भरभक्कम खटपट | २९६ - ३१० |
| (२७) | मुख्यसचिवांच्या हीन कारवाईमुळे प्रकल्प अडचणीत | ३११ - ३२२ |
| (२८) | मा. उच्च न्यायालयातील संघर्ष | ३२३ - ३३४ |
| (२९) | मुख्यसचिवांचा सभागृहात पराभव | ३३५ - ३३८ |
| (३०) | आश्वासन समिती प्रकल्पस्थळी | ३३९ - ३५० |
| (३१) | सुधारित प्रशासकीय मान्यता | ३५१ - ३५४ |
| (३२) | पाटबंधारे अधिकाऱ्यांच्या अंगात येणे | ३५५ - ३७० |
| (३३) | प्रकल्प राष्ट्राला अर्पण करा | ३७१ - ३७५ |
| (३४) | संपूर्ण संघर्षाचा आनंददायक शेवट | ३७६ - ३८१ |
| (३५) | अनुशेष निर्मूलन कार्याबाबत अमरावतीने मार्गदर्शन केले | ३८२ - ३९१ |

# अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांक

## लेखकाचे प्रास्ताविक

**१.** महाराष्ट्राचा भाग असलेल्या वेगवेगळ्या प्रदेशात निरनिराळ्या विकासक्षेत्रात होत असलेला विकास हा असंतुलित असून काही विभागांमध्ये अनुशेष मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. अशा प्रकारच्या वारंवार होणाऱ्या टिकेला तोंड देण्यासाठी शासनाने नेमलेल्या सत्यशोधन समितीचा (दांडेकर समिती) अहवाल प्रकाशित झाल्यानंतर या प्रश्नाचे खरे स्वरूप उघड झाले. या सत्यशोधन समितीवर ‘नुटा’चे संस्थापक अध्यक्ष प्रा.एस.ए.देशपांडे यांची एक सदस्य म्हणून नेमणूक झाली होती.

**२.** या समितीच्या अहवालामध्ये निरनिराळ्या विकासक्षेत्रात असलेल्या अनुशेषाच्या मोजमापाचे मापदंड ठरवून दिले असून त्या मापदंडानुसार त्या त्या विकासक्षेत्रातील अनुशेष निर्धारित केलेला आहे. सिंचन या क्षेत्रामध्ये एकूण वाहितीखाली असलेल्या जमीनीपैकी किती (प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये) हेक्टर जमीन शासकीय योजनांच्याद्वारे सिंचनाखाली आलेली आहे याची जिल्हावार आकडेवारी या समितीने गोळा केली. तेव्हा असे लक्षात आले की, राज्याची सरासरी ही २२.५५ टक्के असून **जो जिल्हा या राज्यसरासरीच्या खाली असेल तो अनुशेष जिल्हा म्हणून निश्चित झाला. या सरासरीच्या वर असलेला जिल्हा हा या मापदंडाप्रमाणे बिगर अनुशेष जिल्हा ठरला.** या मोजमापात असे दिसून आले की, अमरावती हा सिंचनाच्या बाबतीत महाराष्ट्रातील महत्तम अनुशेष असलेला जिल्हा होता. राज्यसरासरी २२.५५ टक्के असतांना या जिल्ह्यामध्ये केवळ ३.९७ टक्के इतकी सिंचनक्षमता शासकीय प्रकल्पामार्फत निर्माण झालेली आहे असे या समितीच्या अहवालातील तक्ता ७.५ मध्ये नमूद आहे.

**३.** नागरी पाणीपुरवठ्याच्या अनुशेषाबाबत सत्यशोधन समितीने जो मापदंड ठरविला तो असा की, केंद्रशासनाने निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार सार्वजनिक पुरवठ्याच्या माध्यमातून एखाद्या शहराला दररोज उपलब्ध व्हावयाचा पाणीपुरवठा व प्रत्यक्ष होत असलेला पाणीपुरवठा याची आकडेवारी प्रथम गोळा करायची व **अपेक्षित पाणीपुरवठ्यापेक्षा प्रत्यक्ष पाणीपुरवठा कमी असेल तर हा फरक त्या शहराचा अनुशेष होय,** असा हा मापदंड होता. प्रादेशिक असमतोलाच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास सर्वात जास्त म्हणजे २७३ दशलक्ष लिटर्स दरदिवशी (273 MLD) एवढा नागरी पाणीपुरवठ्याचा अनुशेष असलेला प्रदेश म्हणजे विदर्भ होय. या प्रदेशामध्ये सर्वात जास्त अनुशेष असलेला क्रमांक एकचा जिल्हा अमरावती (61 MLD) व क्रमांक दोनचा जिल्हा अकोला (56 MLD) असे या अहवालाने निश्चित केले. नागरी पाणीपुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेले शहर म्हणजे अमरावती (32 MLD) व दुसऱ्या क्रमांकावर अकोला (30 MLD) असे या अहवालामध्ये निश्चित झाले.

**४.** अनेक विकास क्षेत्रांबरोबर सिंचन व नागरी पाणीपुरवठा या दोन क्षेत्रांमध्ये असलेला हा अनुशेष डोळ्यात भरण्यासारखा होता. हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की, तो अनुशेष नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या भौगोलिक कार्यक्षेत्रातच मुख्यत्वे होता आणि त्यामुळेच या अनुशेष निर्मूलनासाठी संघटना म्हणून आपण काहीतरी मेहनत केली पाहिजे अशी भावना संघटनेच्या सदस्यांमध्ये दिसून आली. योगायोगाचा भाग असा की, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने त्यावेळच्या विदर्भ पदवीधर मतदार संघातून आपला प्रतिनिधी विधानपरिषदेवर पाठविण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे सन १९८० मध्ये माझी विधानपरिषद सदस्य म्हणून निवड झाली. विधानपरिषदेतील माझ्या पहिल्याच कार्यकाळातील सुरुवातीच्या दोन-तीन वर्षातच सत्यशोधन समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला. त्यामुळे या अनुशेष निर्मूलनासाठी करावयाच्या उपाययोजनांचा संघटनेच्या पातळीवर शोध सुरू झाला. सभागृहामध्ये आपले प्रतिनिधी याकामी धडपड करीत असतांना संघटना म्हणून आमच्या संघटनेने याबाबतीत सभागृहाच्या बाहेर बरीच कामगिरी केली असे दिसून येते. ही कामगिरी म्हणजे मुख्यत्वे लोकांमध्ये या प्रश्नाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सभांचे आयोजन व विशेषांकाचे प्रकाशन करण्याचे काम संघटनेने मोठ्या प्रमाणावर हाती घेतले. या कामाचा भाग म्हणून संघटनेने त्या त्या वेळी प्रकाशित केलेल्या विशेषांकाचे तपशील पुढीलप्रमाणे :-

(१) अमरावती महानगरपालिकेच्या अनुदान सूत्र विशेषांक : १९९१ चे पृष्ठ क्रमांक १ ते २०

(२) जलसिंचन अनुशेष विशेषांक : १९९२ चे पृष्ठ क्रमांक १ ते ३६

(३) घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना : १९९६ चे पृष्ठ क्रमांक २९ ते ४०

(४) अनुशेष विशेषांक : १९९६ चे पृष्ठ क्रमांक ४१ ते ११२

(५) वणी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना : १९९७ चे पृष्ठ क्रमांक ४९ ते ६०

(६) पांढरकवडा शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना : १९९७ चे पृष्ठ क्रमांक ६१ ते ७४

(७) अकोला पूर नियंत्रण योजना विशेषांक : १९९८ चे पृष्ठ क्रमांक ९३ ते १०८

(८) अकोला पूर नियंत्रण योजना विशेषांक : २००२ चे पृष्ठ क्रमांक ६९ ते ८०

(९) असामान्य गुणवत्तेचा निम्न पेढी प्रकल्प : २००७ चे पृष्ठ क्रमांक ९३ ते १४०

(१०) केळकरी कारस्थान विशेषांक : २०१५ चे पृष्ठ क्रमांक १५७ ते २०८

**५.** लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यावसायिक संघटनेला आपल्या सदस्यांचे प्रश्न आपले आपणच मांडावे व सोडवावे लागतात. त्या त्या संघटनेलाच त्यासाठी संघर्ष करावा लागतो, हे खरे असले तरी ज्या समाजामध्ये आपण राहतो त्या समाजामध्ये तीव्रतेने जाणवणाऱ्या प्रश्नांकडे सुशिक्षितांच्या संघटनांनी किमान लक्ष दिल्यास त्या त्या व्यावसायिक संघटनांना त्यांचे प्रश्न सोडवितांना मिळणारी सामाजिक सहानुभूती ही लक्षात घेण्यासारखी असते. विशेषतः विकासक्षेत्रातील राज्यसरासरीच्या बऱ्याच खाली किंबहूना तळातच असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी व्यावसायिक संघटनांनी हातभार लावला तर त्यामुळे व्यावसायिक संघटनांकडे पाहण्याचा समाजाचा एक दृष्टिकोन तयार होतो व या दृष्टिकोनाचा व्यावसायिक संघटनांना त्यांच्या कामामध्ये अप्रत्यक्षपणे लाभ होतो असा याबाबतचा अनुभव आहे.

**६.** एका चार ते पाच लाख लोकसंख्येच्या शहराला वर्षातून अनेक महिने पिण्याच्या पाण्यासाठी भुपृष्ठावरील जलाशयातून पुरवठा उपलब्ध नसेल व संपूर्णपणे कुपनलिकांच्यामार्फत होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून रहावे लागत असेल तर ते त्या शहरावरील एक मोठे संकटच असते. अशा संकटाकडे व्यावसायिक संघटनांनी तो आपल्या व्यवसायाशी संबंधित प्रश्न नाही अशी भूमिका घेऊन त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी सहभाग देण्यापासून दूर राहणे हे उचित ठरत नाही अशी भूमिका आमच्या संघटनेने सुरुवातीपासून घेतली.

**७.** सिंचनाचा महत्तम अनुशेष असल्यामुळे शेतकऱ्यांच्या महत्तम आत्महत्त्या एखाद्या व्यावसायिक संघटनेच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये होत असतील तर त्या प्रश्नाच्या सोडवणुकीकडे कानाडोळा करण्याची भूमिका एखाद्या व्यावसायिक संघटनेने घेणे खचितच योग्य ठरत नाही. विशेषतः सिंचन अनुशेषाचे निर्मूलन हे नागरी पाणीपुरवठा व ग्रामीण पाणीपुरवठ्याशी संबंधित आहे याची जाणीव निरक्षर माणसांपेक्षा साक्षर माणसांना लवकर होते. तेव्हा अशा प्रश्नाच्या बाबतीत तो सोडविण्याच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होणे हे व्यावसायिक संघटनांसाठी अग्रक्रमाचे कर्तव्य बनते.

**८.** विकासाच्या अनेक क्षेत्रांमध्ये विशेषतः सिंचन, पाणीपुरवठा, उद्योग या क्षेत्रांमध्ये महत्तम अनुशेष असलेले भौगोलिक क्षेत्र (विदर्भ) हेच आपले कार्यक्षेत्र आहे याची आमच्या संघटनेने सतत जाणीव ठेवली व याबाबतचे अभ्यास व त्या अभ्यासावर आधारित निष्कर्ष व ते निष्कर्ष लोकांपर्यंत पोहचवून प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबतीत संघटनेने सुरुवातीपासूनच मजबूत पुढाकार घेतला असे दिसून येईल. संघटनेच्या या धोरण निर्धारणामुळे विधानपरिषदेच्या माझ्या ३० वर्षांच्या कार्यकाळामध्ये अनुशेष निर्मूलनाचे कार्यक्षेत्र हे माझ्या सांसदीय कामाचे एक महत्त्वाचे कार्यक्षेत्र झाले. शिक्षण आणि सर्व स्तरावरच्या शिक्षकांचे, पदवीधरांचे प्रश्न व अनुशेष निर्मूलनाचे प्रश्न हा माझ्या संसदीय कामकाजाचा मध्यवर्ती गाभाच बनला असे म्हणता येईल. महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती शहरासारख्या महापालिका क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सभागृहात व सभागृहाच्या बाहेर करण्यात आलेल्या प्रयत्नांचे तपशील (सुरूवातीपासून तर २०१० पर्यंत) या विशेषांकामध्ये नमूद करण्यात आलेले आहेत.

**०१.१२.२०२५** **प्रा.बी.टी.देशमुख**

# अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांक

**प्रा. बी. टी. देशमुख**
**माजी विधानपरिषद सदस्य**

****************************************************

*१*

## *नागरी पाणीपुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेल्या प्रदेशातील सर्वात जास्त अनुशेष असलेले शहर*

****************************************************

**१.** महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीच्या (दांडेकर समिती) अहवालातील पृष्ठ २४१ वर तक्ता क्र. १२.७ मध्ये नागरी पाणी पुरवठ्याचा महाराष्ट्राचा अनुशेष दरदिवशी ७१६ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन एवढा दाखविलेला आहे. नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषाचे मोजमाप कसे करावे? तो अनुशेष किती आहे हे कसे ठरवावे? याचे मापदंड सत्यशोधन समितीने ठरवून दिलेले आहेत. राष्ट्रीय पातळीवर निश्चित झालेल्या प्रमाणकानुसार सार्वजनिक यंत्रणेच्या माध्यमातून एखाद्या शहराला दररोजी उपलब्ध व्हावयाचा **अपेक्षित पाणी पुरवठा व प्रत्यक्ष पाणीपुरवठा यातील फरक म्हणजे त्या शहराचा अनुशेष होय.** प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा अपेक्षित पाणीपुरवठ्यापेक्षा जास्त असेल अशा शहराला या विकास क्षेत्रामध्ये बिगर अनुशेष शहर असे म्हणता येईल. **प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा अपेक्षित पुरवठ्यापेक्षा कमी असेल तर ते शहर नागरी पाणी पुरवठ्याच्या विकास क्षेत्रामधील अनुशेष शहर होय.** प्रादेशिक असमतोलाच्या भाषेतच बोलावयाचे झाल्यास याच तक्त्यामध्ये सर्वात जास्त अनुशेष २७३ दशलक्ष लिटर्स दरदिवशी असलेला प्रदेश म्हणजे "विदर्भ" होय. या प्रदेशामध्ये नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेला क्रमांक एकचा जिल्हा अमरावती असून क्रमांक दोनवर अकोला जिल्हा आहे. या दोन जिल्ह्यांचा अनुशेष अनुक्रमे ६१ व ५६ दशलक्ष लिटर्स दरदिवशी इतका या अहवालात दाखविलेला आहे. नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेल्या या प्रदेशात सर्वात जास्त अनुशेष असलेले शहर अमरावती व दुसऱ्या क्रमांकावर अकोला असून अमरावती शहराचा अनुशेष ३२ दशलक्ष लिटर्स दरदिवशी व अकोला शहराचा ३० दशलक्ष लिटर्स दरदिवशी असा आहे. सभागृहात जागरूक प्रतिनिधी व सभागृहाबाहेर जाणत्या लोकमताचा तडाखेबंद रेटा अनुशेष निपटून काढण्याच्या या कार्यामागे असेल तर त्यात यश मिळाल्याशिवाय रहात नाही. विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये अनुशेषाचे प्रचंड डोंगर उभे असलेल्या विभागातील लोकांनी व लोकप्रतिनिधींनी विकासाच्या "नागरी पाणी पुरवठा" या एका लहानशा क्षेत्रातील अनुशेष निपटून काढण्याचा केलेला हा अत्यंत अल्प असा प्रयत्न आहे.

**२.** जनतेच्या जिव्हाळ्याच्या मागणीबाबत लोकमानसामध्ये असलेली प्रखर व अनावर इच्छा ही खरी त्या मागणी मागची शक्ती असते. त्या मागणीच्या पूर्ततेसाठी सभागृहात जसे प्रयत्न होत असतात तसे सभागृहाबाहेर सुद्धा कितीतरी प्रयत्न होत असतात. त्या प्रयत्नांचे प्रतिबिंब सभागृहाच्या चर्चेमध्ये ऊमटले पाहिजे व त्याबाबतच्या शासकीय भूमिकांची नोंद सभागृहाच्या कामकाजामध्ये झाली पाहिजे याची तळमळ सातत्याने त्या लोकभावनाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विधानमंडळ सदस्यांना लागलेली असते, नव्हे तेच त्यांचे प्रमुख कार्य असते. एखादी न्याय्य मागणी अंतिम स्वरूपामध्ये मान्य होण्यास काही वर्षाचा कालावधी लागतो आहे, लागणार आहे, याची जाणीव असून सुद्धा अनेक वर्षे अनेक सदस्य विविध सांसदीय आयुधांचा वापर करून त्या मागणीचा सभागृहामध्ये सतत पाठपुरावा करीत असतात व तसे करीत असतांना अंतिम निर्णय पदरात पाडून घेण्यापूर्वी शासनाला एक एक पाऊल पुढे टाकायला लावण्यात त्यांनी मिळविलेल्या यशाचा प्रवास निश्चितच विलोभनीय असतो. मागे फिरता येणार नाही अशा धोरण विषयक पुढच्या पुढच्या रेषेवर शासनाला आणून उभे करतांना सदस्यांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घेणाराला शब्दांच्या या चढाईला सांसदीय लढाई असे का म्हटले जाते हे लक्षात येण्यास वेळ लागत नाही.

**३.** अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरासाठी ५५ कोटीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेला शासनाची प्रशासकीय मान्यता मिळविणे, मान्यता मिळाली खरी पण १९८३ च्या शासनाच्या स्थायी आदेशामध्ये नमूद असल्याप्रमाणे व सभागृहात वारंवार कबूल केल्याप्रमाणे "**योजना पाणी पुरवठा मंडळाची असेल तर लोकवर्गणीची दहा टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल.**" हा नियम शासनाने बाजूला सारला व त्या ऐवजी "**योजना पाणी पुरवठा मंडळाची असली तरी लोकवर्गणीची १० टक्के रक्कम अमरावती महानगरपालिकेने भरली पाहिजे**" असा बदल या एका शहरापुरता केला. ही तरतूद बदलवून घेऊन पुन्हा मुळातल्या १९८३ च्या नियमाप्रमाणे "लोकवर्गणीची १० टक्के रक्कम ही या नगरपालिकेवर बसविली जाणार नाही" अशा तरतुदीचे सुधारित आदेश निघणे, या योजनेला तशी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविणे व त्या योजनेच्या प्रत्यक्ष कामासाठी आर्थिक तरतूद होऊन ते काम सुरू होणे व ते पूर्णत्वाला जाणे या संदर्भात १९८३ ते १९९३ या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये झालेल्या प्रयत्नांचे तपशीलवार विवेचन पुढील परिच्छेदातून केलेले आहे.

**४.** एक, दोन, तीन किंवा चार पाण्याचे उद्भव धरून एखाद्या शहराला पाणी पुरवठा केला जातो अशी अनेक उदाहरणे महाराष्ट्रामध्ये असतील परंतु **२०० पेक्षा जास्त उद्भव स्थानावरून उन्हाळ्यामध्ये पाणी गोळा करून आणावयाचे व ते ४ लाख लोकसंख्येच्या शहराला पुरवावयाचे अशी स्थिती असलेले महाराष्ट्रामध्ये अमरावती हे एकमेव शहर होते,** हे कोणाला सांगितले तर खरे वाटणार नाही. त्यातही हे २०० उद्भव सुद्धा भरवशाचे नव्हे, दृष्टीला दिसणारी भूपृष्ठावरील जलाशये नव्हेत तर शहर व शहराच्या सभोवतालच्या जवळ जवळ १५० चौरस किलोमीटरच्या क्षेत्रामध्ये २०० च्या वर ठिकाणी भूगर्भाला भोके (बोअर) पाडून तेथून हे पाणी काढायचे व शहराची तहान भागवावयाची, महानगरपालिका क्षेत्रासाठी मान्य झालेल्या दरमाणशी पाण्याच्या प्रमाणापेक्षा निम्मेसुद्धा पाणी मिळत नसतांना काही बोअर कोरडे गेले की पुन्हा नव्याने बोअर करण्याचा कार्यक्रम सुरू ठेवावयाचा अशा या दुष्ट चक्रातून बाहेर पडण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा हा आढावा आहे. सभागृहामध्ये झालेल्या चर्चेचा आढावा घेत असतांना त्या ठिकाणी होत असलेल्या चर्चेचे बरे वाईट परिणाम लोकमानसावर होत असतात हे जसे खरे आहे तसेच सभागृहाच्या बाहेर त्या मागणीच्या संदर्भात झालेल्या उठाठेवी व उपक्रमांचे प्रतिबिंब सभागृहातील चर्चेमध्ये सुद्धा पडलेले दिसून येते. त्याचाही आवश्यक तेवढा परामर्श घेतलेला आहे.

**५.** खरे म्हणजे विधान परिषदेमध्ये या प्रश्नाच्या चर्चेला सुरुवात झाली त्यावेळेला पाणी पुरवठ्याचा प्रश्न या शहरामध्ये तेवढा तीव्र झालेला नव्हता. १९८२ मध्ये अमरावती शहरभर महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाने पाठविलेली सर्वेक्षणाची एक चमू शहराचे सर्वेक्षण करीत होती. ठिकठिकाणी समुद्र सपाटी पासून उंची काढण्याचे काम कशासाठी केले जात आहे? म्हणून त्यांना विचारणा केली तर या शहरासाठी अंडरग्राउंड ड्रेनेजच्या योजनेचे सर्वेक्षण करण्यात येत आहे असे उत्तर मिळत होते.

**६.** निश्चित काय चालू आहे हे जाणून घ्यावे या उत्सुकतेपोटी प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेला ता. प्र. क्र. १९५३२ दिनांक २२ एप्रिल १९८३ रोजी सभागृहामध्ये उत्तरासाठी होता. "**अमरावती शहरासाठी भुयारी जलनिःसारण (अंडरग्राऊंड ड्रेनेज) योजना लागू करण्याचे दृष्टीने राज्य पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळातर्फे अमरावती शहराचे सर्वेक्षण करण्यात येत आहे वा आले होते हे खरे आहे काय?**" असा प्रश्न विचारला असता त्याला त्यावेळचे नगरविकास मंत्री श्री.रामराव आदिक यांनी "**होय, अमरावती शहरासाठी भुयारी जलनिःसारण योजनेसंबंधी प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाकडून करण्यात येत आहे.**" असे उत्तर दिले होते. या उत्तरामध्ये पुढे असेही नमूद करण्यात आले होते की, "अमरावती व बडनेरा ही दोन शहरे तसेच या भागातील नांदगाव पेठ व नेरपिंगळाई ही दोन खेडी याकरिता पाणीपुरवठा व फक्त अमरावती शहराकरिता भुयारी जलनिःसारण योजना अशी संयुक्त योजना महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाने आखली आहे. सदर योजनेसाठी जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्याकरिता केंद्र शासनाकडे दिनांक २७ ऑगस्ट १९८२ रोजी शिफारस करण्यात आली आहे. त्यावर केंद्र शासनाने सुचविलेल्या मुद्यानुसार सुधारित अहवाल महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाकडे तयार करण्यात येत आहे. हा प्रकल्प सध्या प्राथमिक स्वरूपाचा असल्यामुळे प्रत्यक्ष कामास केव्हा सुरुवात होईल याबद्दलचा अंदाज

आताच कळविणे शक्य नाही. परंतु जागतिक बँकेचे कर्ज मंजूर होताच प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २२ एप्रिल १९८३ : खंड ६७, क्रमांक २६, पृष्ठ ३६)*

**७.** ज्या १९८३ च्या एप्रिल महिन्यामध्ये हा प्रश्न सभागृहात आला होता त्याच एप्रिल १९८३ च्या उन्हाळ्यात अमरावती शहरामध्ये पाण्याची तीव्र टंचाई भासू लागली होती. पेढी व पुर्णेचे प्रवाह आटायला लागले होते व याच उन्हाळ्यात जवळ जवळ ३६ लाख रुपयाचा खर्च इमर्जन्सी योजनेवर पाणी पुरवठा मंडळाला करावा लागला व स्वाभाविकपणे या पाणीपुरवठा योजनेचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता वाटायला लागली. १९८४ च्या उन्हाळ्यात तर ही तीव्रता जास्तच जाणवायला लागली. १९८४ च्या उन्हाळ्यामध्ये शासनाची मान्यता नसतांना पाणीपुरवठा मंडळाला तातडीच्या योजनेवर जवळ जवळ २८-२९ लाख रुपये खर्च करणे भाग पडले.

**८.** या पार्श्वभूमीवर प्रा. बी. टी. देशमुख यांनी २८ ऑगस्ट १९८४ रोजी झालेल्या अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीमध्ये पुढील प्रस्ताव मांडला :- "अमरावती शहर (बडनेरा धरून) तसेच नांदगाव पेठ व नेरपिंगळाई या दोन खेड्यांकरिता पाणीपुरवठा व अमरावती शहराकरिता अंडरग्राउंड ड्रेनेजची व्यवस्था करणाऱ्या योजनेची महाराष्ट्र शासनाने २७ ऑगस्ट १९८२ रोजी जागतिक बँकेकडे कर्ज मिळण्याकरिता केंद्र शासनाकडे शिफारस केली असली तरी त्याबाबत आता पावेतो काम हाती घेण्याच्या दृष्टीने कोणतीही प्रगती झालेली नाही. हे काम तत्परतेने सुरू होण्याच्या दृष्टीने पाठपुराव्याची तत्परतेने कारवाई करण्यात यावी अशी विनंती ही सभा महाराष्ट्र शासनास करीत आहे."

**९.** जिल्हानियोजन व विकास परिषदेने प्रा. बी. टी. देशमुख यांचा ठराव एकमताने मंजूर केला व तो शासनाकडे पाठविला. आता पुन्हा विधानमंडळाच्या पातळीवर त्याचा पाठपुरावा करणे अपरिहार्य झाले. सर्वश्री बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, प्र. य. दातार यांनी ४.१२.१९८४ रोजी विचारलेला अतारांकित प्रश्न क्रमांक २९१५६ हा मंगळवार दिनांक **२ एप्रिल १९८५** रोजी सभागृहासमोर आला. या प्रश्नामध्ये "**अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेने २८ ऑगस्ट १९८४ रोजी उपरोक्त विनंती करणारा ठराव मंजूर केला काय?**" या प्रश्नाला "**होय**" असे उत्तर देण्यात आले होते. "या योजनेचे काम सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने काय प्रयत्न वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे?" या प्रश्नाला शासनाच्या वतीने उत्तर देतांना मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी असे सांगितले की, "ऑगस्ट १९८२ मध्ये रु. ५६ कोटीची ही योजना राज्य शासनाने शिफारस करून केंद्र शासनाकडे पाठविल्यानंतर रु. २० कोटीमध्ये ही योजना सीमित करण्याचे मार्च १९८४ मध्ये केंद्र शासनाने सूचित केले. तथापि ही सूचना ग्राह्य नसल्याचे केंद्र शासनाला कळविण्यात आले. दरम्यान अमरावती शहराचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर लोकसंख्या व इतर बाबी विचारात घेऊन मूळ योजनेत बदल करून रु. ११५.०६ कोटीची सुधारित योजना तयार करण्यात आली असून केंद्र शासनाकडे शिफारस करण्याचे राज्य शासनाच्या विचाराधीन आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक २ एप्रिल १९८५ : खंड ७३, क्रमांक ९, पृष्ठ वि.प.२(९))* या योजनेच्या प्रगतीच्या संदर्भात थोडी जास्त माहिती आपणास मिळाली यापलिकडे फारसा फायदा या उत्तरातून मिळत नव्हता.

**१०.** प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, प्र. य. दातार यांनी जुलै १९८५ च्या अधिवेशनामध्ये या प्रश्नांचा पुन्हा पाठपुरावा केला. त्यांचा ता. प्र. क्र. ५०८ हा बुधवार दिनांक **१० जुलै १९८५** रोजी सभागृहामध्ये चर्चेसाठी आला. मुख्य मंत्र्यांच्या वतीने उत्तर देतांना नगरविकास राज्यमंत्री डॉ. राममनोहर त्रिपाठी यांनी लेखी उत्तरात असे सांगितले की "या योजनेसाठी ऊर्ध्व वर्धा प्रकल्पातून पाणी घेतले जाणार असून ते जलशुद्धी केंद्रामध्ये प्रक्रिया केल्यावर अमरावती महानगरपालिका आणि नेरपिंगळाई व नांदगाव पेठ ही गावे, याना देण्यात येईल. **त्याकरिता २००१ सालच्या ९० दशलक्ष लिटर व २०११ सालच्या १२५ दशलक्ष लिटर एवढ्या रोजच्या पाण्याची गरज विचारात घेतली आहे.** पाणीपुरवठ्याची ही योजना रु. ८१.५० कोटीची असून जलनिस्सारणाची योजना रु. ३३.५६ कोटीची आहे या एकूण योजनेकरिता रु. ३९.९० कोटी जागतिक बँकेकडून उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस केली आहे. याबाबतचा प्राथमिक अहवाल राज्य शासनाच्या शिफारसीसह दिनांक १८ मार्च १९८५ रोजी केंद्र शासनाकडे पाठविला आहे." ७ **एप्रिल १९८५ रोजी उत्तर देतांना "सुधारित योजना तयार केली असून त्याबाबत केंद्राकडे शिफारस करण्याचा प्रश्न विचाराधीन आहे.**" असे उत्तर आपण दिले होते आणि आज उत्तर देतांना "**१८ मार्चला प्रस्ताव केंद्रसरकारकडे पाठविला**" असे आपण म्हणता. जुने उत्तर न पाहताच नवीन उत्तर दिले जाते ही गोष्ट बरोबर नाही अशा प्रकारची तक्रार उपप्रश्नाच्या निमित्ताने प्रा. बी. टी. देशमुख यांनी केली आणि त्यामुळे या प्रश्नावर राज्यमंत्र्यांचा बराच गोंधळ झाला. हा गोंधळ का झाला? याचे कारण काय होते? हे प्रस्तुत लेखकाला कळू शकले नाही. परंतु खुद्द मा. सभापतींनी राज्यमंत्र्यांना असे विचारले की, "उत्तरात असे सांगितले आहे की, १८ मार्चला केंद्राकडे प्रस्ताव पाठविला पण जर तसे असेल तर यापूर्वीच्या उत्तरात तसे यावयाला पाहिजे होते. पण त्या उत्तरात तसे आलेले नाही. त्यात असे सांगितले आहे की, केंद्र सरकारकडे शिफारस करण्याचे विचाराधीन आहे. आता जी आपण सुधारित योजना तयार केली आहे ती ११५.०६ कोटी रुपयाची आहे तेव्हा या योजनेचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे १८ तारखेनंतर गेला का?" अशा रीतीने चुकीच्या जागी सापडल्यामुळे सभापतींच्या या हस्तक्षेपानंतर मा. राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले ते पुढील प्रमाणे, "**जी योजना परत पाठविली ती पाणी पुरवठ्याच्या संदर्भातली होती, सॅनीटेशनचा विचार न करता अगोदर पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे म्हणून ती योजना पाठविली**". *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक १० जुलै १९८५ : खंड ७४, क्रमांक १३, पृष्ठ २)*

**११.** त्यानंतर या प्रश्नावर चांगलीच खडाजंगी चर्चा झाली. प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी व विरोधी पक्ष नेते श्री. दे. मा. कराळे यांनी उपप्रश्नांची जोरदार सरबत्ती केली. "**मार्च महिन्यापासून आतापर्यंत शासनाने काय पाठपुरावा केला आहे**" असा प्रश्न प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारला असता त्यावर नगरविकास राज्यमंत्री डॉ. राममनोहर त्रिपाठी यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. "मार्च महिन्यानंतर वित्त विभाग आणि नियोजन विभाग या दोघांची मंजुरी घेण्याकरिता कागदपत्र पाठविली आहेत. **त्यांची मंजुरी मिळाल्यानंतर शासन लगेच काम सुरु करील. जागतिक बँकेच्या पैशाची वाट न पहाता**" पुन्हा एकदा त्यावर "याचे काम केव्हा सुरू होईल?" असा प्रश्न प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारला असता ते म्हणाले की "मी सुरुवातीलाच सांगितले की **जागतिक बँकेच्या पैशाची वाट न पाहता लवकरात लवकर काम सुरू करण्यात येईल.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक १० जुलै १९८५ : खंड ७४, क्रमांक १३, पृष्ठ ३)* राज्यमंत्र्यांनी दोन वेळेला हे जे उद्‌गार काढले ते सभाशास्त्राप्रमाणे आश्वासन ठरतात.

**************************************************

## २
## आश्वासन समितीत पाठपुरावा

**************************************************

**१२.** सन १९८५ च्या याच दुसऱ्या अधिवेशनात १० जुलै १९८५ रोजी अमरावती शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रश्न सभागृहात चर्चेला येण्याच्या पूर्वी शुक्रवार, दिनांक २८ जून १९८५ रोजी या पाणी पुरवठा योजनेचा उद्‌भव असलेल्या "**अप्पर वर्धा धरणाच्या कामाची प्रगती**" या विषयावरील तारांकीत प्रश्न क्रमांक ५६५ हा सभागृहामध्ये उत्तरासाठी व अनुपुरक चर्चेसाठी येऊन गेलेला होता. सर्वश्री प्र. य. दातार, बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, दे. मा. कराळे, दत्ता मेघे, रा. सु. गवई, वामनराव महाडिक, प्रमोद नवलकर यांनी विचारलेल्या "**अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा धरणाचे काम नियोजित वेळेमध्ये पूर्ण होणार नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे, हे खरे आहे काय?**" या प्रश्न भाग एकला पाटबंधारे मंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिले होते. "हे धरण मुळात केव्हा पूर्ण होणार होते व आता शासनाच्या अंदाजाप्रमाणे केव्हा पूर्ण होणार आहे." या प्रश्न भाग २ ला पाटबंधारे मंत्र्यांनी "**मूळ अंदाजानुसार जून १९८५ पर्यंत धरण पूर्ण होणार होते व शासनाच्या अंदाजाप्रमाणे धरणाचे काम १९८८ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.**" असे उत्तर दिले होते.

अनुपुरक चर्चेमध्ये प्रा. बी. टी. देशमुख यांनी जेव्हा "म्हणजे हे काम पूर्ण होण्यासाठी आणखी १० ते १२ वर्षाचा कालावधी लागणार आहे. तुम्ही केवळ धरण बांधून त्याचा उपयोग लोकांना होणार का? त्या दृष्टीने आपण ॲप्रोप्रिएशनची रक्कम वाढवून देणार आहात का?" असा प्रश्न विचारला तेव्हा मा. मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर हे स्वतः उठून उभे राहीले व त्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले, "या प्रकल्पाला जागतिक बँकेने सहाय्य दिलेले आहे. जागतिक बँकेच्या करारानुसार या प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाकडून देखील अर्थसहाय्य दिले जात आहे. सुरवातीला हा प्रकल्प सुरू करीत असताना जागा उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे या कामाला उशीर झाला ही वस्तुस्थिती आहे. आता सन्माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते बरोबर आहे, डॅमचे काम पूर्ण करण्यासाठी कोणत्याही प्रकारची निधीची अडचण पडणार नाही. डावा - उजवा कालवा, चाऱ्या आणि लँड डेव्हलपमेंटचे काम याला निश्चित थोडा उशीर लागलेला आहे. त्यामुळे राहिलेली रक्कम महाराष्ट्र शासन उपलब्ध करून देऊ

शकणार नाही. अशा तऱ्हेची शंका घेण्याचे कारण नाही. या डॅमचे काम पूर्ण होईल व त्याला जरूर निधी दिला जाईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २८ जून १९८५ : खंड ७४, क्रमांक ५, पृष्ठ ६)*

पुढे अनुपूरक चर्चेत श्री. दत्ता मेघे यांनी विचारलेल्या "१८ कोटी रुपयांऐवजी या कामासाठी ३०-४० कोटी रुपयांची रक्कम शासन देणार आहे का? असे केले तरच हे काम १९८८ सालापर्यंत पूर्ण होणार आहे." या प्रश्नाला पाटबंधारे मंत्री शिवाजीराव देशमुख यांनी "आता मा. मुख्यमंत्र्यांनी व मी देखील सभागृहात सांगितले की, या धरणाचे काम १९८८ सालापर्यंत म्हणजे नियोजित वेळेमध्ये पूर्ण होण्यासाठी पैसे देण्याची व्यवस्था शासनाकडून करण्यात येईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २८ जून १९८५ : खंड ७४, क्रमांक ५, पृष्ठ ६)* असे उत्तर दिले. या प्रश्नावर बराच वेळ व बरीच खडाजंगी चर्चा झाली. शासनातर्फे अनेक आश्वासने देण्यात आलीत. त्यातील आश्वासन क्रमांक ८५ व ८६ ही अत्यंत महत्त्वाची आश्वासने होत.

**१३.** विधान परिषदेच्या कामकाजाच्या नियमानुसार वेगवेगळ्या समित्या नेमलेल्या असतात. मंत्र्यांनी वेळोवेळी विधानपरिषदेत दिलेली आश्वासने, वचने व दिलेली हमी याबाबत करण्यात आलेल्या कारवाई विवरणपत्रांची छाननी करणे, अशा आश्वासनांची कितपत अंमलबजावणी करण्यात आली व ती किमान वेळेच्या आत करण्यात आली किंवा नाही याबाबत शिफारसीसह सभागृहाला अहवाल सादर करणे हे सभागृहाच्या आश्वासन समितीचे प्रमुख कार्य असते. सभागृहामध्ये देण्यात आलेल्या प्रत्येक आश्वासनाला क्रमांक दिले जातात.

**१४. सन १९८५ च्या दुसऱ्या अधिवेशनात** "अमरावती शहरातील पाणीपुरवठा व जल निःसारण योजनेची अंमलबजावणी" या विषयावर तारांकीत प्रश्न क्र. ५०८ वर बुधवार, दिनांक १० जुलै १९८५ रोजी **देण्यात आलेले आश्वासन क्रमांक २७८ व २७९**, तसेच "अप्पर वर्धा धरणाच्या कामाची प्रगती" या विषयावरील ता. प्र. क्र. ५६५ वर दिनांक २८ जून १९८५ रोजी देण्यात आलेले **आश्वासन क्रमांक ८५ व ८६** यांचे तपशील पुढील प्रमाणे :-

***"आश्वासन क्रमांक ८५ : श्री. शिवाजीराव पाटील (निलंगेकर) :*** ..... डॅमचे काम पूर्ण करण्यासाठी कोणत्याही प्रकारची निधीची अडचण पडणार नाही. डावा उजवा कालवा, चाऱ्या आणि लँड डेव्हलपमेंटचे काम याला निश्चित थोडा उशीर लागलेला आहे. त्यामुळे राहिलेली रक्कम महाराष्ट्र शासन उपलब्ध करून देऊ शकणार नाही. अशा तऱ्हेची शंका घेण्याचे कारण नाही. या डॅमचे काम पूर्ण होईल व त्याला जरूर निधी दिला जाईल."

***"आश्वासन क्रमांक ८६ : श्री. शिवाजीराव देशमुख :*** आता मा. मुख्यमंत्र्यांनी व मी देखील सभागृहात सांगितले की, या धरणाचे काम १९८८ सालापर्यंत म्हणजे नियोजित वेळेमध्ये पूर्ण होण्यासाठी पैसे देण्याची व्यवस्था शासनाकडून करण्यात येईल."

***"आश्वासन क्रमांक २७८ : डॉ.राम मनोहर त्रिपाठी :*** मार्च महिन्यानंतर वित्त विभाग आणि नियोजन विभाग या दोघांची मंजुरी घेण्याकरिता कागदपत्र पाठविले आहेत. **त्यांची मंजुरी मिळाल्यानंतर शासन लगेच काम सुरू करील. जागतिक बँकेच्या पैशाची वाट न पाहता."**

***"आश्वासन क्रमांक २७९ : डॉ.राम मनोहर त्रिपाठी*** : काम सुरू करावयाला थोडा वेळ लागेल. कारण नियोजन विभाग आणि वित्त विभाग याची संमती घेतल्यानंतरच कामाला सुरुवात करावी लागेल."

**१५.** स्पष्ट शब्दात देण्यात आलेल्या उपरोक्त चार आश्वासनांच्या पार्श्वभूमीवर प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, प्र. य. दातार यांनी पुढच्याच म्हणजे जानेवारी १९८६ च्या नागपूर अधिवेशनामध्ये पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने हा प्रश्न पुन्हा लावला. त्यांचा हा ता. प्र. क्र.२५८६ बुधवार, दिनांक १५ जानेवारी १९८६ रोजी सभागृहामध्ये चर्चेसाठी आला. **"जागतिक बँकेच्या सहाय्याशिवाय व साहाय्याची वाट न पाहता पाणी पुरवठा योजनेच्या कामाला सुरूवात केली जाईल"** अशा प्रकारचे आश्वासन राज्यमंत्र्यांनी दिले होते, त्याला मंत्रिमंडळाची मान्यता नव्हती व मुख्यमंत्र्यांची सुद्धा संमती नव्हती असे प्रस्तुत लेखकाच्या कालांतराने लक्षात आले. त्यावेळचे राज्यमंत्री डॉ. राममनोहर त्रिपाठी यांचे त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांशी असलेले संबध लक्षात घेता व या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेता मुख्यमंत्र्यांची संमती आपण यथाकाल घेऊ शकू असे कदाचित डॉ. त्रिपाठींच्या मनामध्ये असेल हेही संभवते. दरम्यानच्या काळात परिस्थिती बदलत गेली. श्री. वसंतदादाच्या जागी श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर हे मुख्यमंत्री झालेत आणि त्रिपाठी हेच नगरविकास खात्याचे राज्यमंत्री होते.

**१६.** बुधवार, दिनांक १५ जानेवारी १९८६ रोजी प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, प्र. य. दातार यांचा ता. प्र. क्र. २५८६ चर्चेसाठी आला. त्याच्या एक दिवस अगोदर म्हणजे १४ जानेवारी १९८६ रोजी राज्यमंत्री डॉ. त्रिपाठी यांच्या सहीने एक टिप्पणी मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आली "प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न चर्चेला येत आहे आणि दरवेळी जागतिक बँकेच्या मदतीने ही योजना घेण्याचे आपण सांगतो. जागतिक बँकेच्या सहाय्याची वाट पाहणे हे उचित होणार नाही असे मला वाटते." असे राज्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना या टिप्पणीमध्ये लिहिले होते व त्यासाठी दोन प्रमुख कारणे दिली होती एक म्हणजे जागतिक बँकेचे कर्ज मिळविण्यासाठीची प्रक्रिया बरीच लांबलचक असून त्यामुळे खूप वेळ लागतो आणि दुसरे असे की, अमरावती शहराची लोकसंख्या २ लाखाहून १०-१२ वर्षात ४ लाखावर गेली आहे व आपण दर दिवशी दर माणशी ५० लिटर पाणी सुद्धा धड पुरवू शकत नाही. ही कारणे देऊन या टिप्पणीमध्ये राज्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना अशी विनंती केली होती की, "उद्या दिनांक १५ जानेवारी १९८६ रोजी विधान परिषदेमध्ये ता. प्र. क्र. २५८६ ला उत्तर देतांना जागतिक बँकेच्या सहाय्याची वाट न पाहता अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरासाठी पाणी आणण्याच्या कामाला शासन सुरूवात करील अशा प्रकारचे आश्वासन देण्याबाबत आपले मार्गदर्शन व्हावे" **"या कामाला आपण सुरूवात केली नाही व ते ४-५ वर्षात पूर्ण केले नाही तर पाण्याअभावी या गावची लोकसंख्या हलविण्याची पाळी येईल."** असा इशारेवजा मजकूर सुद्धा राज्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या टिप्पणीमध्ये नमूद असलेला दिसून येतो. १५ तारखेला विधानपरिषदेमध्ये द्यावयाच्या उत्तराची अशी ही तयारी चालू असतांना १४ जानेवारी १९८६ च्या नागपूर अधिवेशनातील दिवसभराचे आपले कार्यक्रम आटोपून मुख्यमंत्री उशिरा 'रामगिरी'वर परत आले व त्यांनी त्या टिप्पणीवर **"योजनेसाठी फार मोठ्या रक्कमेची आवश्यकता आहे. मदत मिळाल्याशिवाय कठीण दिसते. व्यक्तिशः चर्चा करा"** असा शेरा मारला.

**१७.** अशा परिस्थितीमध्ये १५ जानेवारी १९८६ रोजी हा प्रश्न सभागृहामध्ये जेव्हा चर्चेसाठी आला त्यावेळेला मुख्यमंत्र्यांच्या वतीने सभागृहामध्ये उत्तर देणारे राज्यमंत्री डॉ. राममनोहर त्रिपाठी यांच्यावर मोठीच अडचणीची परिस्थिती आली. **एका बाजुला जुलै १९८५ मध्ये "जागतिक बँकेच्या मदतीशिवाय पाणीपुरवठ्याच्या कामाला सुरूवात केली जाईल" असे आश्वासन ते देऊन बसले होते व आता ती फाईल त्या पद्धतीने मुख्यमंत्र्यांकडून "क्लिअर" झालेली नव्हती.** नागपूर येथील त्यावेळचे विधानपरिषद भवन छोटेसे होते. सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या ५-१० मिनीटे अगोदर डॉ. त्रिपाठी हे श्री. रा. सु. गवई यांच्या आसनाजवळ आले व तेथेच त्यांनी प्रा. बी. टी. देशमुख यांना बोलावून घेतले. व आपण कोणत्या अडचणीत आहोत याची कल्पना दिली. "शहराची अडचण ही खरी आहे, प्रश्नाची तीव्रता जबर आहे या निकडीतून गेल्या वेळेला आपण आश्वासन दिले होते. काल उशिरापर्यंत मुख्यमंत्र्यांकडे थांबलो होतो पण ही फाईल क्लिअर होऊ शकली नाही" असे श्री. रा. सु. गवई व बी. टी. देशमुख यांना ते सांगत होते. सभागृह सुरू होण्याची घंटा वाजायला सुरूवात झाली होती. दुपारी बरोबर १२ वाजता सभागृहाची बैठक सुरू झाली. प्रश्नोत्तरे ही पहिलीच बाब व त्यामध्ये दुसऱ्यांच क्रमांकावर हा प्रश्न लागलेला होता. चर्चा सुरू झाली.

**१८.** "अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा प्रकल्पातून पाणी घेऊन पाणीपुरवठा करण्याच्या योजनेच्या कामाला सुरूवात झाली आहे हे खरे आहे काय?" या प्रश्नाला "प्रस्ताव विचाराधीन आहे. अद्याप कामाला सुरूवात व्हावयाची आहे" असे उत्तर शासनाने दिले होते. "विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्नाला उत्तर देतांना "अमरावती शहरासाठी रु. ११५.०६ कोटी खर्चाची योजना जागतिक बँकेकडे अर्थसाहाय्यासाठी शिफारस करून पाठविण्यास भारत सरकारने तत्त्वतः तांत्रिक मान्यता दिली असून या योजनेचा विस्तृत शक्याशक्यतेचा अहवाल तयार करण्यास कळविले आहे. **त्याप्रमाणे शक्याशक्यतेचा अहवाल तयार करण्यासाठी मान्यताप्राप्त तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्यात येत आहे** या योजनेच्या विस्तृत शक्याशक्यतेचा अहवालास जागतिक बँकेकडून स्वीकृती मिळाल्यानंतर तांत्रिक सल्लागार नेमण्यात येतील व **त्यानंतर जागतिक बँकेकडून या प्रकल्पास मंजूरी मिळाल्यानंतर कामास सुरवात करण्याचा विचार करण्यात येईल."** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक १५ जानेवारी १९८६ : खंड ७५, क्रमांक ८, पृष्ठ ७)* असे उत्तर दिले होते.

**१९.** प्रा. बी. टी. देशमुख यांनी उपप्रश्न विचारतांना पूर्वीचे उत्तर स्वागतार्ह होते आज आपण पुन्हा जागतिक बँकेच्या पैशाची वाट पाहणार आहोत असे उत्तर कां दिले आहे? अशा प्रकारचा प्रश्न विचारायला सुरूवात केली तर डॉ. राममनोहर त्रिपाठी यांनी "१९८६ च्या उन्हाळ्यासाठी गावची गरज लक्षात घेऊन १.२६ कोटीची तात्पुरती तातडीची योजना नुकतीच मान्य केली आहे." असे उत्तर दिले. आपण अप्पर वर्धाच्या पाणीपुरवठ्याच्या योजनेचे कन्फ्युजन

१.२६ कोटीच्या तात्पुरत्या योजनेशी का करता आहात असे आम्ही सभासदांनी विचारून पाहिले. मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक यांनी स्वतः चर्चेत हस्तक्षेप करून सरळ सरळ नगरविकास राज्यमंत्र्यांना असा सवाल विचारला की :- "लोकांना पिण्याची पाण्याची अडचण भासू नये म्हणून ही योजना घेतली आहे. याबाबत **मी माननीय मंत्रीमहोदयांना असे विचारू इच्छितो की, आपण सुरुवातीला असे सांगितले आहे की जागतिक बँकेच्या पैशाची वाट न पाहता लवकरात लवकर या कामाला सुरुवात करण्यात येईल आणि आता आपण या उत्तरामध्ये असे म्हणत आहात की, जागतिक बँकेकडून या प्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर कामास सुरुवात करण्याचा विचार करण्यात येईल. यातील खरे उत्तर कोणते आहे?**"

**२०.** त्यावर डॉ. त्रिपाठी यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले "**यह फर्क निश्चित रूप से है. आज भी शासन इस बात से अलग नही है. लेकीन कुछ इंतजार करना पड रहा है.** इसलीये की वह रक्कम है और वह मिलने की संभावनाओ के लिए इंतजार करना पड रहा है." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक १५ जानेवारी १९८६ : खंड ७५, क्रमांक ८, पृष्ठ ७)* असे उत्तर दिले होते.

डॉ. त्रिपाठी यांनी सद्हेतूने जुलै १९८५ मधील आश्वासन दिले होते व त्यांची अडचण आम्हाला ठाऊक झालेली होती. त्यांना अडचणीत आणून त्यांची फजिती करावी असे कोणालाच वाटत नव्हते. अमरावतीचे ज्येष्ठ सदस्य श्री. रा. सु. गवई यांनी विचारलेल्या उपप्रश्नातून ही भावना स्पष्ट झालेली आपणास दिसेल. श्री. रा. सु. गवई यांचा प्रश्न असा "**जागतिक बँकेच्या पैशाची वाट न पहाता आपण या कामाला सुरुवात करणार आहात काय? कारण आपण एकदा हो म्हटले आहे. त्यामुळे आता मागे जाऊ नका. पुढेच गेले पाहिजे. पुढे जावयाचे नसेल तर आपण तेथेच रहा. असे आमचे मत आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक १५ जानेवारी १९८६ : खंड ७५, क्रमांक ८, पृष्ठ ८)* प्रा.बी.टी.देशमुख, पु.ब.सोमवंशी, रा.सु.गवई, मनोहर जोशी, सुधीर जोशी, वामनराव महाडीक या सदस्यांनी खूप प्रयत्न करून पाहिल्यानंतर सुध्दा या प्रश्नाचे उत्तर पुढे जाऊ शकले नाही.

****************************************************

## ३
## सचिवांची आश्वासन समितीसमोर फजिती

****************************************************

**२१.** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आश्वासन समितीने अमरावती शहर पाणी पुरवठा याबाबतचे आश्वासन क्रमांक २७८ व २७९ व अप्पर वर्धा धरणाच्या कामाची प्रगती याबाबत आश्वासन क्रमांक ८५ व ८६ च्या संदर्भात तपशीलवार कामगिरी केलेली दिसून येते. या आश्वासनाच्या संदर्भात विभागाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे निश्चित करणे, मागविलेल्या माहितीची छाननी करून संबधित विभागाच्या सचिवांच्या साक्षी नोंदविणे, प्रत्यक्ष प्रकल्प स्थळाला भेट देऊन क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या साक्षी नोंदविणे इत्यादी खटाटोपानंतर खूपच तपशीलवार अहवाल या समितीने याविषयावर दिनांक ८ ऑगष्ट १९८६ रोजी विधानपरिषदेस सादर केला. महाराष्ट्र विधानपरिषद १९८६-८७ च्या आश्वासन समितीचा हा एक्याण्णववा अहवाल (भाग दुसरा) होय.

### आश्वासन समितीने विभागाकडून माहिती मागितली

**२२.** उपरोक्त चार आश्वासनांशी संबंधित असलेल्या विविध मुद्यांच्या बाबतीत समितीने ३ जून १९८६ रोजी झालेल्या बैठकीत खात्याकडून माहिती मागविण्याचा निर्णय घेतला होता. ता. प्र. क्र. ५०८ वरील चर्चेत दिनांक १० जुलै १९८५ रोजी सभागृहामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनाच्या संदर्भात (क्रमांक २७८ व २७९) आश्वासन समितीने नगरविकास विभाग व पाटबंधारे विभाग यांच्याकडून ज्या मुद्यांवर माहिती मागविली होती ते मुद्दे पुढील प्रमाणे :-

१. अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी उपयोगात आणले जाणारे तलाव दर्शक नकाशे व त्यातून मिळणाऱ्या पाणीपुरवठ्याची आजची स्थिती याबाबत सविस्तर टिप्पणी.

२. महानगरपालिका क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी महानगरपालिकेतर्फे व पाणी पुरवठा मंडळातर्फे करण्यात आलेले एकूण "बोअर" दाखविणारा नकाशा त्यातील किती बोअर पाणी देत आहेत व किती बोअर निकामी आहेत व पाणी देणाऱ्या बोअरमधून किती पाणीपुरवठा होतो याबाबत सविस्तर टिप्पणी.

३. महानगरपालिका क्षेत्रामध्ये सार्वजनिक पाणीपुरवठ्यासाठी वापरात असलेल्या विहिरी दाखविणारा नकाशा व त्यातून मिळणाऱ्या पाणीपुरवठ्याची सद्यःस्थिती. याच क्षेत्रातील खाजगी पाणीपुरठ्यासाठी वापरात असलेल्या विहिरी व त्यातून होणारा पाणीपुरवठा, नकाशा व टिप्पणी.

४. महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठ्यासाठी महानगरपालिका क्षेत्राबाहेरील केला जाणारा नद्याचा वापर (मुख्यत्वे पेढी व पूर्णा, असल्यास इतर काही) त्यावरून होणाऱ्या पाणीपुरवठ्याची सद्यःस्थिती दर्शविणारा नकाशा व सविस्तर टिप्पणी.

५. महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेर करण्यात आलेले एकूण बोअर (पाणी पुरवठा करणारे व निकामी) दर्शविणारा नकाशा व त्या बोअरमधून होत असलेला पाणीपुरवठा याबाबतची सद्यःस्थिती.

६. महानगरपालिका क्षेत्राला होत असलेल्या पाणीपुरवठ्याच्या बाबत पाणीपुरवठ्याची मूळ व्यवस्था काय होती व त्यामध्ये क्रमशः झालेले बदल याबाबतची सविस्तर टिप्पणी.

७. तुलनात्मक माहितीसाठी महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांना पाणीपुरवठ्याच्या उपलब्ध असलेल्या व्यवस्थांची माहिती देणारी संक्षिप्त टिप्पणी.

८. अप्पर वर्धा धरणाच्या मुख्य भिंतीचे काम होत असतांना किंवा तेथे अन्य बांधकाम होत असतांना त्यात अमरावती, बडनेरा शहरासाठी पाणीपुरवठा करावा लागेल असे गृहीत धरून त्यासाठी आवश्यक असे काही बांधकाम योजित केले होते काय? असल्यास त्याचे स्वरूप काय, त्याचे नकाशे, सविस्तर टिप्पणी व त्या बांधकामाची सद्यःस्थिती.

**२३.** तारांकित प्रश्न क्रमांक ५६५ वरील चर्चेत दिनांक २८ जून १९८५ रोजी सभागृहामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनाच्या संदर्भात (क्रमांक ८५ व ८६) आश्वासन समितीने पाटबंधारे विभागाकडून ज्या पाच मुद्यांवर माहिती मागविली होती ते मुद्दे पुढील प्रमाणे :-

१. अप्पर वर्धा धरणाचे काम १९८८ पर्यंत पूर्ण होण्याच्या दृष्टीने आतापावेतो काय उपाययोजना करण्यात आलेली आहे.? व्हावयाचे राहिलेले काम त्याचा तपशील व त्यावर होणारा अंदाजित खर्च किती? यावर सविस्तर टिप्पणी.

२. १९८६, ८७, ८८ या वर्षामध्ये वर्षवार पूर्ण होवू घातलेल्या कामाचा तपशील व त्यावरील अंदाजित वर्षवार खर्च याबाबत सविस्तर टिप्पणी.

३. "नॉर्मली करण्यात आलेली तरतूद शिवाय बॅकलॉगसाठी मिळणारी रक्कम" या दृष्टीने अप्पर वर्धा धरणाच्या बांधकामासाठी काही विशेष तरतूद केलेली आहे काय व करण्यात आलेली असल्यास, त्याबाबतचा तपशील.

४. अप्पर वर्धा धरणाच्या डाव्या कालव्याच्या व उजव्या कालव्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे.

५. संबधित टिप्पणी व नकाशे.

### "मंत्री आश्वासन देऊन बसले त्याची पूर्तता कशी करावी हेच आम्हाला कळत नाही"
### - सचिव नगरविकास

**२४.** ४ लाख लोकसंख्येच्या एका शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न अंतर्भूत असल्यामुळे व आश्वासनाच्या पुर्तीसाठी अनेक विभागांचा संबंध येत असल्यामुळे जबाबदारी एकमेकावर ढकलून मोकळे होण्याची संधी कोणत्याही विभागाला मिळू नये या हेतूने आश्वासन समितीने या सर्व विभागांच्या सचिवांना ११ जून १९८६ रोजी एकाच वेळी समोरा-समोर साक्षीसाठी बोलाविले. सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आश्वासन समितीच्या कार्यवृत्ताच्या नोंदी काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येते की खुद्द नगरविकास विभागाचे सचिव श्री. डी. के. जैन हे स्वतः "**मंत्री आश्वासन देवून बसले त्याची पूर्तता कशी करावी हेच आम्हाला कळत नाही**" असे समितीला सांगत होते. नगरविकास विभागाचे सचिव श्री. जैन व समितीचे एक सदस्य श्री. परशनसिंग कलसी यांच्यामधील पुढील संवाद पुरेसा बोलका आहे :-

*"**Shri. Kalsi :** The assurance is given by Mr. Tripathi as urban Development Minister in the House. So it is moral duty, responsibility of that Department for co-ordination. Urban Development Department is connected with this particular assurance. It is their responsibility. Who is responsible for this delay?*

***Shri. D. K. Jain :** I agree with you ? Assurance is given*

*by the Minister but the department does not know how to carry it out.*

***Shri. Kalsi :** The assurance is given by Mr. Tripathi as Urban Development Minister in the House on behalf of Government, so, this particular department is responsible for the fulfilment of this assurance.*

***Shri. D. K. Jain :** Sir, the question is not only of coordination. We will coordinate. But.....*

***Shri. Kalsi** : How it will be implemented? we are only interested in the fulfilment of this assurance. There are so many agencies coming in the picture. But who should be held responsible?*

***Shri. D. K. Jain :** Naturally, we are to ask." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ५९)*

### विविध सचिवांची विविध मते

**२५.** खुद्द नगरविकास विभागाच्या सचिवांची ही स्थिती तर इतर विभागांच्या सचिवांचे तर विचारायलाच नको. **नियोजन विभागाचे सचिव श्री. शरद काळे** यांनी समितीला असे सांगितले की "या प्रोजेक्टसाठी आपल्याला फायनान्स पुष्कळ लागणार आहे. अमरावतीच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. याबद्दल दुमत नाही. पण यासाठी जो पैसा लागणार आहे तो कोणत्या टप्प्याने, कोणत्या अवस्थेमध्ये, कुठून आणि कसा उभा करावयाचा हे स्पष्ट झाल्याशिवाय त्याला प्रशासकीय मान्यता देऊन त्याचा प्लॅनमध्ये समावेश करणे शक्य होत नाही." **नियोजन खात्यातील वित्तीय संस्थामार्फत अर्थपुरवठा या विभागाचे सचिव श्री. श. गो. दैठणकर** यांनी समितीला पुढील प्रमाणे माहिती दिली. "आता नगरविकास खात्याच्या सचिवांनी सांगितले की जागतिक बँकेकडे हा प्रोजेक्ट जाणार आहे. यामध्ये जागतिक बँकेला हा प्रोजेक्ट पोज करण्यामध्ये काही अडचणी आहेत, कारण प्रोजेक्टच्या संबंधात अंतिम अहवाल तयार झालेला नाही. तो झाल्यानंतर त्याला प्रशासकीय मान्यता मिळेल आणि मग तो जागतिक बँकेकडे पाठवता येईल. तसेच सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये यासाठी तरतूद करायला पाहिजे. त्याप्रमाणे जागतिक बँकेच्या नॉर्म्सप्रमाणे त्यांना इंटीग्रेटेड प्रोजेक्ट हवा असतो. त्यांच्या २-३ मिशनच्या बैठका झाल्याशिवाय ते पार्ट ॲप्रुव्हल करणार नाहीत. तेव्हा याबाबतीत नगरविकास खात्यानेच निर्णय घेण्याची गरज आहे." **वित्त विभागाचे सचिव श्री. माधव गोडबोले** यांनी समितीसमोर असे मत व्यक्त केले की, "योजना करतांना योजनेस लागणाऱ्या अर्थसहाय्याचा विचार करावा लागतो. प्लॅनमध्ये योजना बसविता येते की नाही याचा विचार करावा लागतो.... या केसमध्ये नियोजन विभागाने सांगितले की योजना प्लॅनमध्ये बसविण्यास अडचण आहे"

### परिस्थितीचे गांभीर्य कामकाजात नोंदविले गेले

**२६.** सभागृहामध्ये मंत्रिमहोदय आश्वासन देऊन बसले होते व सर्व संबधित विभागाच्या सचिवांना या आश्वासनाची अंमलबजावणी कशी करावी हे कळत नव्हते, सांगता येत नव्हते. बराच वेळ या साक्षी चालल्या पण त्यातून काहीही निष्पन्न होत नव्हते असे पाहून निदान शहरातील गंभीर परिस्थितीची नोंद ही आश्वासन समितीच्या कार्यवृत्तामध्ये केली जावी या हेतूने समिती सदस्यांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. समिती सदस्य प्रा. बी. टी. देशमुख व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. रोटकर यांच्यातील पुढील संवाद नोंद घेण्यासारखा आहे. :-

*"**श्री.बी.टी.देशमुख :** पूर्णा नदीत खोल खणले तरी पाणी लागत नाही हे खरे आहे काय? आणि ज्या ठिकाणाहून योजना घेतली आहे त्या ठिकाणी स्टॅंड पोस्टने पाणी पुरवठा केला जातो. आश्वासन पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामास सुरुवात केली तर काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल?*

***श्री. बी. व्ही. रोटकर** (सदस्य सचिव, म. पा. पु. ज. नि. मंडळ) : चार वर्षे लागतील. पैसे मिळाले तर.*

***श्री. बी. टी. देशमुख** : सन १९८३ सालापासून दोन्ही नद्यांचे पाणी आटलेले आहे. प्रत्येक वर्षी जमिनीखालील पाण्याची पातळी कमी कमी होत आहे हे खरे आहे काय?*

***श्री. बी. व्ही. रोटकर** (सदस्य सचिव, म. पा. पु. ज. नि. मंडळ) : होय, हे खरे आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : रेवसा, आसेगाव या शहरात पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी आहेत पण पाण्यासाठी बोअर केल्यामुळे या विहिरी आटल्या आहेत हे खरे आहे काय?*

***श्री. बी. व्ही. रोटकर** (सदस्य सचिव, म. पा. पु. ज. नि. मंडळ) : या भागात सध्या ट्यूबवेलने पाणी पुरवठा केला जात आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : या भागातील जमिनीच्या खालील पाण्याची पातळी वर्षानुवर्षे खाली खाली जात आहे हे खरे आहे काय? आणि पाण्याची पातळी दरवर्षी किती खाली जात आहे?*

***श्री. बी. व्ही. रोटकर** (सदस्य सचिव, म. पा. पु. ज. नि. मंडळ) : होय, प्रत्येकवर्षी पाण्याची पातळी खाली जात आहे. दरवर्षी सव्वा मीटर पाण्याची पातळी खाली जात असते.*

***श्री. बी. टी. देशमुख** : चांदूर बाजार, रेवसा, नवा अकोला या रस्त्यावरील विंधन विहिरी संपुष्टात आल्या आहेत ही गोष्ट खरी आहे काय?*

***श्री. बी. व्ही. रोटकर** (सदस्य सचिव, म. पा. पु. ज. नि. मंडळ) : जमिनी खालील पाण्याचा आम्ही अभ्यास केला आहे, सध्या पाणीपुरवठा केला जात आहे पण नंतर पाऊस पडला नाहीतर पाणीपुरवठा करणे नंतर शक्य होणार नाही. पावसाअभावी पाण्याची पातळी खाली जात आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : २२ द. ल. लिटर्स पाणी पुरवठा प्रत्येक दिवसाकाठी करावा अशी योजना आहे. सन १९७०-७२ सालचे हे टार्गेट आहे. म्हणजे योजना घेण्याच्या वेळी असे लक्ष ठरविलेले होते. आज जास्तीत जास्त बोअर करून पाणी घेतले जात आहे. पण या पद्धतीने जमिनी खालील पाणी संपून जाऊन नंतर गावे उठवावी लागतील याची खात्यास जाणीव आहे काय?*

***श्री. बी. व्ही. रोटकर** (सदस्य सचिव, म. पा. पु. ज. नि. मंडळ) : परिस्थितीचे गांभीर्य विभागाच्या लक्षात आलेले आहे." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ६७)*

### आश्वासन समितीची अमरावतीला भेट

**२७.** सभागृहामध्ये देण्यात आलेल्या उपरोक्त आश्वासनांच्या संदर्भात शासनातर्फे काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, याची छाननी करण्यासाठी समितीने दिनांक ११ जून १९८६ रोजी सचिव, नगरविकास विभाग, सचिव, पाटबंधारे विभाग, सचिव, वित्त व नियोजन विभाग यांची वर नमूद केलेली साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली. समितीने दुसऱ्याच दिवशी दिनांक १२ जून १९८६ रोजी अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्याच्या विद्यमान उद्‌भव स्थलांना भेट दिली. विशेषतः पेढी नदीवरील रेवसा पाणीपुरवठा योजना, पूर्णा नदीवरील आसेगाव पाणीपुरवठा योजना, छत्री तलाव आणि वडाळी तलाव या अमरावती येथील ठिकाणांना समितीने प्रत्यक्ष भेट दिली व त्याच दिवशी दुपारी पाणीपुरवठ्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या यासंदर्भात साक्षी नोंदविल्या. पाणीपुरवठा परिषदेचे निवेदन स्वीकारले व अमरावती विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ. देविसिंग शेखावत यांचे निवेदन नोंदविले. सन १९८५ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ८५ व ८६ यांच्याशी संबंध असल्यामुळे व त्याच अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २७८-२७९ शी सुद्धा संबंध असल्यामुळे समितीने दुसऱ्या दिवशी दिनांक १३ जून १९८६ रोजी अप्पर वर्धा धरणाच्या बांधकामास व कालव्याच्या बांधकामास भेट दिली आणि या बांधकामाशी संबंध असलेल्या अधिकाऱ्यांच्या साक्षी नोंदविल्या.

### नगरविकास सचिवांची साक्ष

**२८.** समितीने संदर्भीय विषयाबाबत मुद्दे निश्चित करून विभागाकडून यापूर्वीच माहिती मागितल्यामुळे माहिती पुरविणारी मुद्देसूद कागदपत्रे समितीकडे आलेली होती. पाटबंधारे विभाग, नगरविकास विभाग व महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळ यांच्याकडून आलेली ही कागदपत्रे पाटबंधारे व नगरविकास विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीनिशी समितीला सादर करण्यात आली होती. या कागदपत्रानंतर विविध विभागांच्या सचिवांची जी साक्ष ११ जून १९८६ रोजी समिती समोर झाली त्यातूनही समितीला बरीच माहिती मिळाली होती. त्याशिवाय १२ व १३ जून १९८६ रोजी या समितीने अमरावती येथे प्रत्यक्ष प्रकल्प स्थळांना भेट देऊन अधिकाऱ्यांच्या साक्षी घेऊन माहिती मिळविली होती, असे अधिकृत कागदपत्रावरून दिसून येते. विधान परिषदेच्या आश्वासन समितीने कष्टपूर्वक आपल्या कामाची जय्यत तयारी केली होती. उपलब्ध कागदपत्रांच्या अभ्यासावरून विभाग विनाकारण अडचणी आणीत आहे, असे समितीच्या अनेक सदस्यांचे मत झाले होते. ऑगस्ट १९८६ च्या अधिवेशनांत या विषयावर अहवाल सादर करण्याचा निर्णय समितीने घेतला होता व अहवालाचे प्रारूपही समितीजवळ तयार झालेले होते परंतु असा अहवाल सादर करण्यापूर्वी पुन्हा एकदा नगरविकास विभागाच्या सचिवांना साक्षीला बोलाविण्याचा समितीने निर्णय घेतला. **३० जुलै १९८६ रोजी ही साक्ष झाली. नगरविकास विभागाच्या सचिवांच्या**

**सहीने जी कागदपत्रे समितीला पुरविण्यात आली त्यामध्ये स्पष्टपणे असे नमूद करण्यात आलेले होते की,**

*"महानगरपालिका क्षेत्राच्या पाणीपुरवठा योजनांकरीता शासनाने विहित केलेल्या आर्थिक तरतुदीच्या आकृतिबंधाचा विचार केला असता ५५ कोटी रूपयांची ही योजना अंमलात आणली तर लोकवर्गणीची रक्कम १० टक्के म्हणजे ५.५० कोटी रूपये होते. लोकवर्गणीची रक्कम योजना महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाची असल्याने त्या मंडळामार्फत उभारण्यात येणार आहे"*

## सचिवांची समितीसमोर फजिती

**२९. स्वतः सादर केलेली कागदपत्रे स्वतःच वाचून न आल्यामुळे नगरविकास सचिवांची समितीसमोर खूपच फजिती झाली असे समितीच्या कार्यवृत्तावरून स्पष्टपणे दिसून येते.** तुमची नक्की अडचण काय आहे? अशी विचारणा करणारा पुढील संवाद वाचण्यासारखा आहे :-

*"**श्री.बी.टी.देशमुख :** मागच्या साक्षीच्या वेळी आपण सांगितलेले होते की, "I agree with you. The assurance is given by the Minister but the Department does not know how to carry it out." So the Committee would like to know exact difficulties in carrying it out.*

*__श्री. डी. के. जैन__ (सचिव, नगरविकास विभाग) : मुख्य अडचण फायनान्सची आहे. कंम्प्लीट स्कीम आखली होती. त्याची ११२ कोटी रूपये किंमत होते, त्यामध्ये ६ वर्षे गेले, आणि आता ११५ कोटी साधारणपणे आणि १५०- १६० कोटी टोटल कॉस्ट होते. तेव्हा ही पार्श्वभूमी आपल्या समोर ठेवतांना जोपर्यंत पैशाचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आपण स्कीम मंजूर करू शकत नाही. कालच मा. मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली. पैशाची अडचण आहे. काही तरी केले पाहिजे, लवकर केले पाहिजे, पण...." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १५१)*

**३०. १० टक्के लोकवर्गणी पाणी पुरवठा मंडळाने भरण्याचा नियम तुम्ही आमच्या समोर सादर केला आहे याबाबत विचारणा केली असता** प्रथम "माझ्याशी चर्चा झाली नाही" असे नगरविकास सचिव म्हणाले हे सारे रेकॉर्डवर आहे, असे सांगताच मी ते वाचले नाही असे सांगण्याची नामुष्की सचिवांना पत्करावी लागली, ती पुढील शब्दात :-

*"**समिती प्रमुख :** आमच्या कार्यालयाकडून माहिती मागविली ती आपल्या खात्याकडून आलेली आहे. त्यामध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे, तेव्हा जी माहिती पाठविलेली आहे त्याच्या बाबतीमध्ये आपणास माहिती नाही असे म्हणावयाचे काय?*

*__श्री. डी. के. जैन__ (सचिव, नगरविकास विभाग) : माझ्याशी चर्चा झालेली नाही.*

*__श्री. बी. टी. देशमुख :__ हाऊसचे आश्वासन रेकॉर्डवर आहे व पाठविलेली माहिती सुद्धा.*

***Shri. D. K. Jain :** I am sorry. I have not read it." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १५३)*

**३१.** पुन्हा पुन्हा ११५ कोटीच्या योजनेची गोष्ट जेव्हा नगरविकास विभागाचे सचिव बोलत होते, तेव्हा **सभागृहात ५५ कोटीच्या पाणीपुरवठ्याबाबतचे आश्वासन दिले आहे, तुम्ही ११५ कोटीचे कां बोलत आहात? म्हणून विचारले तर "माझी चूक झाली" असे सचिवांनी सांगितले.** ५५ कोटीच्या अर्थबळात नक्की काय अडचण आहे? असे विचारले तर त्यांना निश्चित काहीही उत्तर देता येईना. टिप्पणी सादर करू असे ते म्हणाले, पुढील शब्दात :-

*"**श्री.बी.टी.देशमुख :** ५५ कोटी रूपयामध्ये कमीत कमी पाणी पुरवठा स्कीम होऊ शकते. हे आपल्याला माहिती असेल तर फायनान्सची अडचण काय आहे? हे समितीस जाणून घ्यावयाचे आहे. आपल्याला त्याची कल्पना नसेल तर मग चर्चा उपयुक्त होणार नाही. उदाहरणार्थ आपण ११५ कोटी रूपयाच्या स्कीमवर बोलता परंतु आश्वासन हे कमीत कमी पाणी पुरवठ्यासंबंधीचे आहे, सिवरेजचा भाग सोडून.*

***Shri. D. K. Jain :** Sir, that is mistake on my part, I have submitted to you.*

*__श्री. बी. टी. देशमुख :__ आता प्रश्न काय आहे? ५५ कोटीमध्ये होते तर त्याच्या फायनान्सकरिता अडचण काय आहे हे समितीस जाणून घ्यावयाचे आहे.*

*__श्री. डी. के. जैन__ (सचिव, नगरविकास विभाग) : आम्ही त्यासंबंधीची नोट समितीस सादर करू." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १५५)*

## पाणी पुरवठा योजनेचा स्थायी आकृतीबंध समितीप्रमुख सचिवांना समजावून सांगतात

**३२.** सभागृहात आश्वासन दिल्यानंतर ५५ कोटीची योजना विहित आर्थिक आकृतीबंधानुसार पूर्ण करण्यात काय अडचण आहे? हे सचिव सांगू शकत नाहीत तेव्हा **समितीप्रमुख श्री जगन्नाथराव ढांगे यांनी त्यांच्याच कागदपत्राच्या आधारे पाणीपुरवठा योजनेचा आर्थिक आकृतीबंध सचिवांना समजावून सांगितला. "१० टक्के लोकवर्गणीबाबत तुम्ही जी माहिती पाठविली ती तुम्हाला माहीत नाही काय?" अशा अर्थाचा प्रश्न विचारला तर "मला पहावे लागेल. लेखी पाठविले आहे तर ते बरोबर असेल"** असे उत्तर सचिवांनी दिले. "तुमच्या विभागाकडून माहिती आली ती तुमच्या परवानगी शिवाय आली काय?" असे विचारले असता "मी ४८ तास जरी काम केले तरी मी सर्व कागदपत्रे पाहू शकत नाही" असे केविलवाणे उत्तर सचिवांनी दिले. हा संवाद मुळातून वाचण्यासारखा आहे :-

*"**समिती प्रमुख :** ५५ कोटी रूपयामध्ये कोणाचे किती पैसे असले पाहिजेत, याबद्दल काय कल्पना आहे? आमच्याजवळ कागदपत्रे आहेत, महाराष्ट्र पाणी पुरवठा जलनिःस्सारण मंडळ यांची जी माहिती आहे, त्या पान क्रमांक ५ वर म्हटले आहे की, आकृतीबंध तयार केलेला आहे. लोकवर्गणी १० टक्के असावी, कर्ज ६७ टक्के असावे, २३ टक्के अनुदान असले पाहिजे. असे म्हटले आहे, तेव्हा ५५ कोटी रूपयांतील लोकवर्गणी कशी उभी करणार? सध्या आपल्याकडे साडे पांच कोटी रूपये लोकवर्गणी जमा झाल्यासारखी आहे. लोक वर्गणी जमा करण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे. ते पैसे देण्यास तयार आहेत. असे कागदोपत्री आलेले आहे, तेव्हा लोक वर्गणी जमा करण्यामध्ये अडचण नाही.*

*__श्री. बी. टी. देशमुख :__ स्कीम म्युनिसिपालटीची असेल तर लोक वर्गणी म्युनिसिपालटी देईल. बोर्डाची असेल तर बोर्ड देईल. पण त्याबाबतीतील तुमची आयडीया क्लिअर असली पाहिजे.*

*__समिती प्रमुख :__ ही माहिती तुम्ही दिलेली आहे, ती माहिती चुकीची असेल तर ती चूक आहे, असे म्हटले पाहिजे.*

*__श्री. डी. के. जैन__ (सचिव, नगरविकास विभाग) : We will have to check up. What is written in the statement must be correct. काल चर्चा झाली होती. ते सर्व म्युनिसिपल कॉर्पोरेशनने करावयाचे आहे.*

*__श्री. बी. टी. देशमुख :__ या समितीकडे आपल्या विभागाकडून माहिती आली आहे ती आपल्याला सांगितल्याशिवाय इथे आली काय?*

*__श्री. डी. के. जैन__ (सचिव, नगरविकास विभाग) : I seek the permission of the Chairman to answer honestly. Even if I work 48 hours, I am not able to do it. काही महत्त्वाची माहिती असते, त्याबाबत अशी माहिती पाठविण्यात येत आहे, असे सांगितले जाते. काही प्रश्न असे असतात की डिटेलमध्ये जावे लागते. There we spent lot of time, We found that one answer designed by D. S. was wrong. If you ask honestly, it is impossible to look into each and every thing.*

*__समिती प्रमुख :__ असे म्हणून कसे चालेल सगळी पूर्तता करण्यासाठी सरकारी पुस्तकामध्ये आकडे दिलेले आहेत, आकृतीबंध दिलेला आहे, पैशाची योजना दिलेली आहे. परंतु आपल्या हाताखालील लोक काम करीत नसतील तर काय होणार आहे?" (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १५७-१५९)*

## दीड तास चाललेली सचिवांची साक्ष

**३३.** आश्वासनाची अंमलबजावणी कशी करता येऊ शकते हे समितीने त्यांच्याच कागदपत्राच्या आधारे त्यांना दाखवून दिले. तेव्हा आश्वासन समितीच्या समोर नगरविकास विभागाच्या सचिवांची फारच दयनीय अशी फजिती झाली. **"मंत्र्यांनी आश्वासन तर देऊन टाकले पण त्याची अंमलबजावणी कशी करावी हे आम्हाला कळत नाही" असे एक महिन्यापूर्वी उध्दटपणे समितीला सांगणारे सचिव "मी नक्की काय सांगितले होते ते मला आठवत नाही. आश्वासन पूर्ण करणे ही आमची नैतिक जबाबदारी आहे" वगैरे, वगैरे समितीस सांगत होते ते पुढील शब्दात :-**

*"**Prof. B. T. Deshmukh :** You stated that the Hon. Minister had made the commitment, and the Department did not know how to implement it...*

***Shri. D. K. Jain :** I do not recollect today what exactly*

*I had said a month before, but all that I would say to you is that I agree with you that* ***once an Hon. Minister has made an assurance, it is the moral duty of the department to fulfil that assurance.*** *And I agree with you that it is the Department responsibility to fulfil that assurance, and to day right now I do not remember what further words I said and I would say that the Department is finding out its way of how the best it will be fulfilled, we are still at it and I would submit today before you that if you want information on further points you kindly give us some time and I will submit." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १६७)*

**३४.** सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीच्या १९८६ च्या कार्यवृत्तपुस्तिकेतील ३० जुलै १९८६ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त काळजीपूर्वक पाहिले तर असे लक्षात येते की त्या दिवशी सकाळी १० वाजता समितीची बैठक सुरू झाली आणि **जवळ जवळ दीड तास एकट्या नगरविकास विभागाच्या सचिवांची समितीसमोर साक्ष सुरू होती.** त्यावर्षीच्या समितीच्या कार्यवृत्त पुस्तिकेच्या पृष्ठ १४९ ते १८७ पानावर ही साक्ष शब्दशः नोंदलेली आहे. नगरविकास विभागाची केविलवाणी व दयनीय अवस्था सचिवांच्या साक्षीमुळे उघड झाली होती. समितीने कागदपत्रांची छाननी संपविली होती. समितीचा अभ्यास पूर्ण झालेला होता. समितीच्या अहवालाचे प्रारूप तयार होते. काही किरकोळ दुरूस्त्यांसह समितीने हा ९१ वा अहवाल त्याच दिवशी (३०.७.१९८६) सचिवांची साक्ष संपल्याबरोबर मंजुरीसाठी घेतला व मंजूर केला व ११.३० वाजता समितीची बैठक संपली.

***************************************************

# ४
# सभागृहात धुमश्चक्री

***************************************************

## सदस्य व मंत्री यांच्या कामकाजातील फरक

**३५.** ज्या प्रश्नाचा आपण पाठपुरावा करीत आहोत त्या प्रश्नाची तपशीलवार व बिनचूक माहिती विधानमंडळ सदस्याला असेल तरच तो सभागृहामध्ये त्या प्रश्नाचा उत्तम रीतीने पाठपुरावा करू शकतो. शासनाकडे, म्हणजेच मंत्र्यांकडे व सचिवांकडे येणारी माहिती ही फक्त एकाच म्हणजे शासकीय मार्गाने आलेली असते. तळमळीने प्रयत्न करणाऱ्या विधानमंडळ सदस्यांकडे याशिवाय सुद्धा अनेक मार्गाने माहिती येत असते. शासकीय माहिती हा विधानमंडळ सदस्यांच्या माहिती संग्रहाचा एक उद्‌भव असतो. त्याशिवाय वृत्तपत्रातून येणारे लेख, अग्रलेख, निवेदने, बातम्या, शासकीय व निमशासकीय समित्यांच्या बैठकीची कामकाज पत्रिका, कार्यवृत्ते, त्याठिकाणी प्रसृत करण्यात आलेली कागदपत्रे, राजकीय पक्षांनी, स्वयंसेवी संघटनांनी, नागरिकांनी दिलेली निवेदने, प्रत्यक्ष विषयोक्त स्थळाला दिलेल्या भेटीतून मिळालेली माहिती व उपलब्ध झालेली कागदपत्रे हे माहितीचे अतिशय महत्त्वाचे उद्‌भव असतात. प्रकल्पावर काम करणाऱ्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कामामध्ये वरिष्ठ शासकीय यंत्रणेकडून आणल्या जात असलेले अडथळे समजून घेऊन सांसदीय आयुधांच्या वापरातून या अडथळ्यांचा बंदोबस्त करण्याची भरपूर क्षमता आपल्यामध्ये आहे व सद्‌हेतुपूर्वक या माहितीचा फक्त सार्वजनिक हितबुद्धीनेच आपण वापर करतो असा आत्मविश्वास विधान मंडळ सदस्याने जर त्यांच्यात निर्माण केला तर प्रकल्प विषयाशी संबधित बिनचुक माहितीचा प्रचंड धबधबा क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून अशा विधानमंडळ सदस्याच्या कार्यालयावर येऊन पडतो. शिवाय आणखी एक महत्त्वाचा फरक असा असतो की सभागृहामध्ये येणाऱ्या व आपल्या खात्याचे नेतृत्त्व करणाऱ्या मंत्र्याकडे त्याच्या खात्याचे अनेक/सर्वच प्रश्न असतात. प्रत्येक प्रश्नावर जीव ओतून काम करणे व त्या प्रत्येक प्रश्नाचा सखोल अभ्यास करणे त्याला शक्य नसते. याउलट परिस्थिती विधानमंडळ सदस्यांची असते आपल्या विभागाशी/क्षेत्राशी संबंधित अनेक प्रश्न त्याच्याही समोर असतात हे खरे असले तरी परस्पर प्राथम्य ठरवून त्यातील सर्वात जास्त महत्त्वाचे काही निवडक प्रश्न त्याला विशेष जिद्दीचे व आटोकाट पाठपुराव्यासाठीचे म्हणून घेता येतात.

**३६.** अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजना व अप्पर वर्धा धरणाच्या कामाची प्रगती याबाबतची खूपच तपशीलवार माहिती आम्ही मिळविलेली होती. या सर्व सामग्रीच्या आधारावर पुढील अधिवेशनांत जोरदार लढाई देण्यासाठी आम्ही तयार होतो. त्याचदरम्यान जानेवारी १९८६ च्या अधिवेशनानंतर पुन्हा शासनामध्ये बदल झाला. श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या ऐवजी श्री. शंकररावजी चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. नगरविकास खाते मंत्री म्हणून श्री. सुब्रमण्यम् यांच्याकडे व राज्यमंत्री म्हणून श्री. विलास सावंत यांचेकडे आले. मार्च १९८६ मध्ये झालेले अधिवेशन हे अतिशय अल्पकाळाचे झाले व त्यामुळे या अधिवेशनात हा प्रश्न आला नाही. पण **जून, जुलै, ऑगस्ट १९८६ मध्ये झालेल्या विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये आम्ही लोकप्रतिनिधींनी या प्रश्नावर चांगलाच जोर धरला व शासनाकडून निश्चित स्वरूपाचे आश्वासन मिळविण्यात यश मिळविले.**

## १९ जून १९८६ ला सभागृहात प्रश्नोत्तरे

**३७.** प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, प्र. य. दातार यांचा ता. प्र. क्र. ५३२६ हा गुरूवार दिनांक १९ जून १९८६ रोजी सभागृहामध्ये चर्चेसाठी होता. **"या योजनेच्या विस्तृत शक्याशक्यतेच्या अहवालास जागतिक बँकेकडून स्वीकृती मिळाली आहे काय" या प्रश्नाला नगरविकास मंत्र्यांनी "अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांची अद्याप नेमणूक करण्यात आलेली नाही."** असे उत्तर दिले होते. १५ जानेवारी १९८६ रोजी शासनातर्फे देण्यात आलेल्या उत्तराचा संदर्भ देऊन प्रा. बी. टी. देशमुख यांनी पहिलाच उपप्रश्न असा विचारला की "त्यावेळी असे उत्तर देण्यात आले होते की, **"केंद्र सरकारने तांत्रिक मान्यता दिलेली आहे त्याबाबतचा आवश्यक तो अहवाल मिळवून तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्यात येत आहे."** याचा अर्थ काय आहे? **"नेमणूक करण्यात येत आहे"** म्हणजे आठ दिवसात, पंधरा दिवसात हे काम होईल. आता त्याबाबत प्रश्न विचारला असता असे उत्तर देण्यात आले आहे की, "अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांची अद्याप नेमणूक करण्यात आलेली नाही" "नेमणूक करण्यात येत आहे" असे त्यावेळी उत्तर देत असतांना सभागृहाला सांगावयाचे आणि आता प्रश्न विचारला तर "अद्याप नेमणूक करण्यात आली नाही" असे आता उत्तर द्यावयाचे यावरून असे दिसून येते की जुना प्रश्न व त्याचे उत्तर कोणी वाचत नाही. या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की **या प्रश्नाचे गांभीर्य माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आले आहे किंवा नाही?"** त्यावर नगरविकास राज्यमंत्री श्री. विलास सावंत यांनी "गांभीर्य शासनाच्या लक्षात आले आहे." असे उत्तर दिले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १९ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ४, पृष्ठ १४)*

श्री.बी.टी.देशमुख यांनी त्यावर पुन्हा जेव्हा "अध्यक्ष महाराज, त्या गांभीर्याचे स्वरूप काय आहे ते सांगण्यात यावे. पूर्णा व पेढी या दोन्ही नद्या उन्हाळ्यात आटून जातात पात्रात पाच दहा फूट कितीही खोल खणले तरी पाणी लागत नाही वडाळी व छत्री हे दोन्हीही तलाव आटलेले आहेत. गेल्या दोन तीन वर्षापासून कोणत्याही शहरात पाणीपुरवठ्याच्या आकस्मिक योजनांवर जेवढा खर्च केलेला नाही तेवढा खर्च या शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी केला जात आहे. पेढी व पूर्णा नद्यांच्या पट्ट्यात अनेक बोअर्स केलेले आहे. **माननीय राज्यमंत्र्यांनी त्यावेळी मुख्यमंत्र्यांना असे लिहिलेले आहे की हे शहर उठवावे लागेल इतकी गंभीर परिस्थिती त्या ठिकाणी असतांना तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्याच्या कामी इतकी दिरंगाई का झाली असा माझा प्रश्न आहे.**" असा प्रश्न विचारला तेव्हा राज्यमंत्र्यांकडून "अध्यक्ष महाराज, शासनाच्या ही योजना विचाराधीन आहे आणि शासन त्यावर कारवाई करीत आहे." असे कोरडे व शुष्क उत्तर आले.

## गंभीर परिस्थितीची नगरविकास मंत्री कबुली देतात

**३८. "गांभीर्य शासनाच्या लक्षात आले आहे" "ही योजना शासनाच्या विचाराधीन आहे" "शासन त्यावर कारवाई करीत आहे "** अशी मोघम, त्रोटक व कोणत्याही अभ्यासाशिवाय देता येणारी उत्तरे राज्यमंत्री देत आहेत हे पाहून ज्येष्ठ सदस्य श्री. रा. सु. गवई यांनी असा प्रश्न विचारला की "अध्यक्ष महाराज, हा प्रश्न इतका महत्त्वाचा प्रश्न असता इतक्या लाईटली घेऊन चालणार नाही. आज अमरावती शहरामध्ये दुसरा कोठलाही पाण्याचा सोर्स उपलब्ध नाही. या बाबतीत टेक्निकल अहवालसुद्धा आलेला आहे आणि त्या ठिकाणी आता बोअर्स मारून घेण्याचे काम चालले आहे परंतु बोअर्सनासुद्धा पाणी कमी झालेले आहे ही अवस्था आहे. तेव्हा या अमरावती शहराला पाणी मिळणार आहे की नाही? आज या शहराची अवस्था अशी झाली आहे की, जर या शहराला पाणी मिळाले नाही तर हे पाच लाख लोकवस्तीचे शहर उठवावे लागणार आहे. इतका हा प्रश्न गंभीर आहे. तेव्हा आताच सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे या संबंधात यापूर्वी समिती नेमण्यात येत आहे म्हणून शासनाने उत्तर दिले होते याचा अर्थ ८-१० दिवसात समिती नेमली जाईल परंतु तसे न होता आज या प्रश्नाला उत्तर देतांना म्हटले आहे की, अद्याप ही समिती नेमलेली नाही म्हणूनच ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला तसाच मीही विचारतो की, माननीय मंत्री महोदयांना या अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाच्या गांभीर्याची जाणीव आहे काय? असेल तर ही

समिती नेमण्याबाबतीत विशिष्ट कालबद्ध असे उत्तर द्यावे." त्यावर नगरविकास राज्यमंत्र्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. "अध्यक्ष महाराज, ही योजना फार मोठी असल्याने त्याची त्याच्या सर्व तांत्रिक बाबी लक्षात घेऊन ही योजना कार्यान्वित करण्यासाठी काय करता येईल याची छाननी शासनातर्फे चालू आहे. तोपर्यंत या शहराला पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. साधारणतः या संबंधीची कार्यवाही पूर्ण झाल्यावर त्याबाबत जागतिक बँकेला रिपोर्ट सादर केल्यावर, त्याला मंजुरी मिळाल्यानंतर ४-५-७ वर्षात ही योजना पूर्ण होईल."

**३९.** राज्यमंत्री महोदयांची उत्तरे अत्यंत असमाधानकारक व त्रोटक होती. अशा स्थितीत स्वतः मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक यांनी चर्चेत हस्तक्षेप करून असे मत व्यक्त केले की "यामध्ये सध्या तरी असे दिसून येत आहे की, अमरावती शहराला बोअर वेल्सनी पाणीपुरवठा होतो आहे आणि पूर्णा व पेढी या दोन नद्यामध्ये बोअर घेतल्यानंतरही आता पाणी लागत नाही अशी अवस्था आहे. याचा अर्थ असा होतो की, त्या ठिकाणी दुसरा कोठला तरी पाण्याचा सोर्स शोधला पाहिजे व तातडीने त्याच्या मागे लागले पाहिजे. तेव्हा मंत्रिमहोदय म्हणतात की, ही अप्पर वर्धाची योजना मोठी आहे. **परंतु त्याचबरोबर आपण हेही पाहिले पाहिजे की, पाच लाख वस्तीचे हे शहर हलविणेसुध्दा अशक्य आहे.** तेव्हा याबाबतीत या ना त्या निमित्ताने तेथे दुसरा कोठला तरी पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने सोर्स उपलब्ध करून दिला पाहिजे. त्यासाठी तातडीने काही योजना होण्याची आवश्यकता आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १९ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ४, पृष्ठ १५)*

खुद्द मा. सभापतींनीच हस्तक्षेप केल्यामुळे विभागाचे कॅबिनेट मंत्री डॉ. व्ही. सुब्रमण्यन हे स्वतः उभे राहिले. त्यांनी जे उत्तर दिले, त्या उत्तरामुळे बाकी काही फायदा होवो न होवो पण शहरातील पिण्याच्या पाण्याची परिस्थिती किती गंभीर आहे ही गोष्ट अधिकृतपणे त्यांच्या उत्तरातून सभागृहाच्या कामकाजात नोंदविली गेली. नगरविकासमंत्री श्री. सुब्रमण्यन यांनी स्पष्ट कबुलीच दिली की, "याकडे खात्याचे दुर्लक्ष झाले हे खरे आहे. परिस्थितीकडे लक्ष दिले नाही तर शहर हलविण्याची पाळी येईल." संबंधित सर्व आमदारांशी आपण चर्चा करू व त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू असेही श्री. सुब्रमण्यन यांनी सांगितले. त्यांच्या उत्तरातील मूळ इंग्रजी भाग जसाच्या तसा वाचण्यासारखा आहे. आपल्या उत्तरात ते म्हणाले. :-

"I can quite realise how the position is. I can understand the gravity of the matter, till today we have not been able to go forward with it. I would like to give an assurance that this will require our immediate attention and **if we are not able to do this a situation might come that the city might have to be evacuated;** "*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १९ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ४, पृष्ठ १५)* उपरोक्त वाक्याने आपल्या उत्तराची सुरुवात करून मला आतापावेतो समाधान कारक उत्तर देता आले नाही, जेवढ्या गांभीर्याने ही बाब घ्यायला पाहिजे होती तेवढ्या गांभीर्याने आम्ही ती घेतली नाही, असे कबूल करणाऱ्या पुढील वाक्याने डॉ. सुब्रमण्यन यांनी आपल्या लांबलचक उत्तराचा शेवट केला :-
"**I have not been able to give a satisfactory answer because it is a fact that it has not been taken up in the manner in which it ought to have been taken up and I, will certainly look in to this question in consultation with the Hon Members.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १९ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ४, पृष्ठ १५)*

### विरोधी पक्षाचा सभात्याग

**४०.** "अध्यक्ष महाराज, म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या संबधात तांत्रिक सल्ला म्हणून अप्पर वर्धामध्ये १९८७ च्या मेपर्यंत पाणी स्टोअर होऊ शकेल आणि त्यायोगे अमरावती शहराला पाणी मिळू शकेल अशी योजना असल्याचा रिपोर्ट आपल्या विभागाने दिला आहे हे खरे आहे का?" असा प्रश्न श्री. रा. सु. गवई यांनी जेव्हा विचारला तेव्हा राज्यमंत्री श्री. विलास सावंत यांनी "अध्यक्ष महाराज, हे तपासून पहावे लागेल." असे ठोकळेबाज उत्तर दिले व त्यांच्या उत्तराने सभागृहात चांगलाच तणाव वाढला "**अध्यक्ष महाराज एवढ्या मोठ्या प्रश्नाच्या बाबतीतसुद्धा माननीय मंत्रिमहोदय नीट अभ्यास करून येत नाहीत हे बरोबर नाही.**" असे उद्‌गार रा. सु. गवई यांनी काढले. श्री. बी. टी. देशमुख यांनी काढलेल्या "अध्यक्ष महाराज, ही दुर्दैवाची गोष्ट आहे सन्माननीय मंत्रिमहोदयांनी याचा अभ्यासच केलेला दिसत नाही कारण या पाणीपुरवठ्याच्या बाबतीत जे फायनान्शियल इम्प्लिकेशन्स सांगितली ती बरोबर नाहीत" या उद्‌गारानंतर व शासनाकडून समाधानकारक उत्तर येत नाही असे पाहिल्यानंतर मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक यांनी चर्चेत हस्तक्षेप करून सांगितले की, "**मंत्रिमहोदयांकडे याबाबतची सगळी माहिती आहे असे दिसत नाही तेव्हा आपण या प्रश्नावर अर्धातास चर्चा उपस्थित केल्यास बरे होईल**". सभापतींच्या या हस्तक्षेपानंतरही सभागृहातील तणाव कमी होऊ शकला नाही. "अध्यक्ष महाराज, इतक्या गंभीर प्रश्नावर अशाप्रकारे माहिती देण्यात येत आहे हे बरोबर नाही आणि ही माहितीदेखील सभागृहाला व्यवस्थित सांगता येत नसेल तर याचा अर्थ असा होतो की शासनाला या प्रश्नामागील गांभीर्यच कळलेले नाही. अध्यक्ष महाराज मी स्वतः या वर्धा प्रकल्पावर गेलो होतो तेथील मुख्य अभियंता यांच्याशी मी या बाबतीत बोललो देखील आहे. त्यांनी सांगितले की आम्ही अमरावतीसाठी एक नवीन योजना तयार केलेली आहे, असे असतांनाही **ज्या पद्धतीने या ठिकाणी उत्तरे दिली जात आहेत ती पाहता हा या सभागृहाचा आणि आमचाही अवमान आहे. तेव्हा आम्ही याचा निषेध म्हणून सभात्याग करीत आहोत?**" असे विरोधी पक्ष नेते श्री. दे. मा. कराळे यांनी जाहीर केले व सर्व विरोधी सदस्यांनी सभात्याग केला. हा सभात्याग होत असतांना राज्यमंत्री श्री. विलास सावंत सभागृहाला सांगत होते की, "**अध्यक्ष महाराज, हा प्रकल्प मोठा असल्यामुळे त्यासाठी पुरेशी तरतूद केल्याशिवाय काही करता येणार नाही**"

### नापसंती व्यक्त करण्याचे प्रभावी शस्त्र - सभात्याग

**४१.** सभात्याग हे नापसंती व्यक्त करण्याचे अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. मुळात **कोणताही अभ्यास किंवा तयारी करून न येता तीच तीच ठोकळेबाज उत्तरे ज्यावेळी शासनाकडून दिली जातात तेव्हा मंत्र्यांचा हा भोंगळेपणा उघडा पाडण्यासाठी व त्यावर प्रकाशझोत टाकण्यासाठी सभात्यागासारखे प्रभावी शस्त्र नाही.** झालेल्या सभात्यागातून मंत्र्यामध्ये निर्माण होणाऱ्या बेचैनीमुळे ताबडतोब त्या दिवशी प्रश्न सुटण्यास फारसा लाभ झाल्यासारखे दिसत नसले तरी कालांतराने त्याचा प्रभाव निश्चितपणे दिसून येतो. आपल्या असमाधानकारक कर्तृत्वामुळे पुन्हा पुन्हा सभात्यागाची पाळी सभागृहात यावी असे कोणत्याही मंत्र्याला वाटत नसते. सदस्याने चिकाटीने तो प्रश्न लाऊन धरल्यास पुढच्या वेळी मंत्री बरीच विचारपूस करून व अभ्यास करून आलेला दिसतो. हे या प्रकरणातसुद्धा पुढे दिसून आले.

### "अर्धा तास चर्चे"ची खात्री

**४२.** १९ जून १९८६ रोजीच्या या चर्चेचा दुसरा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे "परिस्थिती गंभीर आहे आम्ही जर काही हालचाल केली नाही तर या शहरातील लोकसंख्या हलवावी लागेल" हे खुद्द खात्याच्या मंत्र्याला सभागृहात कबूल करावे लागले. तिसरा एक महत्त्वाचा फायदा या चर्चेचा असा झाला की खुद्द मा. सभापतींनीच "या बाबतीत मी आपणांला असे सुचवतो की, **मंत्रिमहोदयांकडे या बाबतची सगळी माहिती आहे असे दिसत नाही.** तेव्हा आपण यावर अर्धा तास चर्चा उपस्थित केल्यास जास्त बरे होईल." असे उद्‌गार काढल्यामुळे याच प्रश्नावर ताबडतोब दुसऱ्या एका प्रभावी सांसदीय आयुधाचा वापर या अधिवेशनातच करण्याची खात्रीची संधी आम्हाला उपलब्ध झाली. सामान्यपणे "अर्धातास चर्चा" या संसदीय आयुधाची नोटीस दिल्यावर ती नोटीस मान्य किंवा अमान्य होऊ शकते. मान्य झाल्यास अशा अनेक मान्य झालेल्या नोटीसमधून बॅलेटमध्ये आली तरच ती चर्चेला येऊ शकते. या प्रकरणात मा. सभापतींनी खुद्द सभागृहात काढलेल्या वरील उद्‌गारामुळे नोटीस दिल्याबरोबर ती मान्य होईल व चर्चेला येईल याची शाश्वती मिळाली. **प्रा. बी. टी. देशमुख यांनी ताबडतोब दिलेली अर्धातास चर्चेची सूचना मान्यही झाली व पुढे ती चर्चेसाठीही आली ती या शाश्वतीमुळेच होय.**

*****************************************************

## ५

## *"अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण"*
## *या आयुधाचा वापर*

*****************************************************

### "अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण" व "प्रश्नोत्तरे" या संसदीय आयुधांच्या वापरातील फरक

**४३.** १९८६ च्या पावसाळी अधिवेशनात अतिरिक्त "**अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण**" या सांसदीय आयुधाचा वापर करून २६ जून १९८६ रोजी अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न प्रा. बी. टी. देशमुख यांनी सभागृहात मांडला. "प्रश्नोत्तराचा तास" या एकाच सांसदीय आयुधाचा वापर आतापर्यंत या बाबतीत झालेला होता. तो करीत असतांना फक्त प्रश्न किंवा उपप्रश्न विचारता येतात. भाषण करता येत नाही. शासनाकडून माहिती मिळविणे अथवा शासनाच्या भूमिकेतील पोकळपणा किंवा फोलपणा उघडा पाडणे एवढा मर्यादित

हेतू त्यातून साध्य होतो. "अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण" या सांसदीय आयुधाच्या वापरात सदस्याला आपले म्हणणे, तपशीलवारपणे मांडता येते. प्रत्येक मुद्दा नोंदविता येतो. उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची नोंद शासनाला घ्यावी लागते. सर्व सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची उत्तरे अर्थमंत्र्यांपर्यंत किंवा अर्थराज्यमंत्र्यांपर्यंत पोचविली जातात. त्या त्या खात्याचे अधिकारी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यासाठी व त्यांची उत्तरे तयार करून देण्यासाठी तैनात केलेले असतात. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देतांना उत्तर देणारा अर्थमंत्री किंवा अर्थराज्यमंत्री सर्व मुद्यांची उत्तरे देईलच असे नसते पण उत्तरात उल्लेख करण्यात आला नसेल तर, एकतर तो मुद्दा पुरेसा सार्वजनिक महत्त्वाचा नाही किंवा शासनाजवळ देण्यासारखे उत्तर नाही असा त्याचा अर्थ घेतल्या जातो.

विधान परिषदेत गुरूवार, दिनांक २६ जून १९८६ रोजी अंदाज पत्रकावरील चर्चेत भाग घेतांना प्रा. बी. टी. देशमुख यांनी जवळ जवळ ३५ मिनिटे या विषयावर प्रतिपादन करून या योजनेची गरज का म्हणून आहे व तरतूद कशी उपलब्ध आहे या विषयीचे निवेदन केले. आपल्या भाषणाची सुरूवात करतांनाच प्रा. बी. टी. देशमुख यांनी असे प्रतिपादन केले की, "विदर्भातील एका मोठ्या कॉर्पोरेशनच्या संदर्भातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मला येथे मांडावयाचा आहे. अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील एक तरी कॉर्पोरेशन आपण आम्हाला दाखवून द्या की, त्या कॉर्पोरेशनमध्ये १०० टक्के पाणीपुरवठा हा बोअरवर अवलंबून आहे. असे एकच कॉर्पोरेशन आहे आणि ते म्हणजे अमरावती कॉर्पोरेशन. केवळ त्याच ठिकाणी उन्हाळ्यामध्ये १०० टक्के पाणीपुरवठा हा बोअरवर अवलंबून आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ९, पृष्ठ ३८)*

### तातडीच्या योजनांचा सुकाळ

**४४.** उद्भवाच्या अभावी शहराची नियमित पाणीपुरवठा योजना मोठ्याच संकटात सापडली असल्यामुळे शासनाला तातडीच्या तात्कालिक पाणीपुरवठा योजना दरवर्षी कशा घ्याव्या लागत आहेत हे सांगतांना ८३ ते ८६ या चार वर्षाची आकडेवारीच प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहाला सादर केली ती पुढील शब्दात :-

"अध्यक्ष महाराज, आपल्याला अचंबा वाटेल. सबंध महाराष्ट्रामध्ये कोठे नव्हे एवढा पैसा आपण आज त्या शहराला तात्कालिक योजनेसाठी देत आहोत. ८३ साली २० बोअर करण्यासाठी ३६ लाख रुपये देण्यात आले. ८४ साली ५ बोअर करण्यासाठी २८ लाख रुपये देण्यात आले. ८५ साली दहा-बारा बोअरना ५० लाख रुपये देण्यात आले आणि ८६ मध्ये तात्कालिक उपाययोजनेसाठी सव्वाकोटी रुपये देण्यात आले. अध्यक्ष महाराज, **पेशंट ऑक्सीजनवर आहे. ही व्यवस्था केली नाहीतर गाव उठवावे लागेल याची शासनाला जाणीव आहे. असे असल्यामुळेच किती रुपयापैकी सव्वाकोटी रुपये या शहराला देण्यात आले?** इमर्जन्सी वॉटर सप्लायसाठी जी शहरे महाराष्ट्रामध्ये आयडेंटीफाय केली त्या सर्वांना मिळून ८ कोटी ५१ लाख रुपये एवढे पैसे **८६ च्या इमर्जन्सी वॉटर सप्लाय स्कीममध्ये १० डिसेंबर १९८५ चा जी.आर काढून मंजूर केले. ७० गावांना ८ कोटी ५१ लाख रुपये दिले त्यातले एकट्या अमरावती शहराला १ कोटी २५ लाख रुपये दिले.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ९, पृष्ठ ३९)*

### बोअरच्या नाड्या सुटायला लागल्या

**४५.** महाराष्ट्रातील कोणत्याही शहरापेक्षा अमरावती शहरामध्ये जास्त किंमतीच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजना घेण्यात येत आहे याचा काय अर्थ आहे? तो सभागृहाला सांगतांना प्रा. बी. टी. देशमुख म्हणाले :- "कां तात्कालिक योजनेवर एवढा पैसा देत आहात? अध्यक्ष महाराज, यांना माहिती आहे की, पेशंट सिरिअस आहे. दगावण्याचा धोका आहे. आवश्यक ती व्यवस्था केली नाही तर तो दगावण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्य श्री परसनसिंग कलसी काल म्हणाले की शासनाने बोअरची व्यवस्था केली आणि वॉटर सप्लाय या शहराला त्यामुळे चालू आहे. **शहर जिवंत आहे ही गोष्ट खरी आहे. नाकातोंडात ऑक्सीजनच्या नळ्या खुपसून रूग्णशय्येवर असलेल्या पेशंटला जिवंत मनुष्य जरूर म्हणतात परंतु त्याच्या जगण्यात दीर्घ आशा अशा अवस्थेमध्ये रहात नाही. त्याचप्रमाणे हा जो वॉटर सप्लाय या शहराला करण्यात येत आहे तो १०० टक्के ग्राउंड वॉटरचा आहे. १०० टक्के बोअरवर या शहराचा पाणीपुरवठा उन्हाळ्यामध्ये अवलंबून आहे. पेशंटच्या नाड्या सुटतात तशा बोअरच्या नाड्या सुटायला लागल्या आहेत.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ९, पृष्ठ ३९)*

**४६.** निरनिराळ्या विंधन विहिरीतून मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कसे कमी होत आहे यांचे विवरण प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात केले ते पुढील शब्दात :-

"सध्या अस्तित्वात असलेल्या या ४२ बोअरपैकी काही बोअरचे आकडे मला मिळालेले आहेत. बाकीचे आकडे मा. मंत्रिमहोदय या ठिकाणी देतील अशी मला अपेक्षा आहे. रेवसाचे नंबर एकचे जे बोअर आहे त्यामधून दर तासाला ६० हजार लिटर्स पाणी १९८५ च्या उन्हाळ्यात मिळत होते. १९८६ च्या उन्हाळ्यात दर तासाला त्यामधून ५० हजार लिटर्स पाणी मिळत होते. नंबर २ च्या बोअरमधून २० हजार लिटर पाणी दर तासाला ८५ मध्ये मिळत होते आज त्याची पातळी शून्यावर आलेली आहे. हा बोअर निकामी झाला. नंबर ३, ४, ७ चे बोअर आपण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, याही बोअरच्या पाण्याची पर अवर कॅपसीटी मोठ्या प्रमाणात कमी होत चाललेली आहे. ग्राउंड वॉटरची लेव्हल कमी झालेली आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ९, पृष्ठ ३९-४०)*

### शहर हलविण्याचा भयावह प्रसंग?

**४७.** पिण्याच्या पाण्याच्या दुर्भिक्षामुळे अमरावती शहरातील लोकसंख्या हलविण्याचा दुर्दैवी प्रसंग या शहरावर येण्याची शक्यता आहे याबाबतचे शासकीय दप्तरातील दोन अधिकृत पुरावे प्रा. बी. टी. देशमुख यांनी सभागृहाला सादर केले ते पुढील शब्दात :-

"गाव उठविण्याचा दुर्दैवी प्रसंग येण्याची भीती निर्माण झाली आहे. परवा मा. अर्बन डेव्हलपमेंट मिनीस्टर श्री सुब्रमणियन यांनी या ठिकाणी कबुली दिली. १९ जून १९८६ रोजी माझ्या याबाबतच्या प्रश्नावरील चर्चेत त्यांनी सभागृहाला सत्य परिस्थिती सांगितली मी त्याचे कोटेशनच वाचून दाखवितो. ते म्हणतात :-

"I can quite realise how the position is I can understand the gravity of the matter, till today we have not been able to go forward with it. I would like to give an assurance that this will require our immediate attention and if we are not able to do this a situation might come that the city might have to be evacuated."

अध्यक्ष महाराज अर्बन डेव्हलपमेंट मिनीस्टर १९ जून १९८६ ला सभागृहात असे म्हणतात. तर हे काही तुम्हाला आजच ठाऊक झाले नाही? मी ६ महिन्यापूर्वीचा पुरावा आपल्याला देतो. मा. अर्बन डेव्हलमेंट राज्यमंत्री यांनी मा. मुख्यमंत्र्यांना १४ जानेवारी १९८६ ला पत्र लिहून असे कळविले की, :-

"It may not be out of place to mention here that if a beginning of this scheme is not made now and the work completed within 4/5 years the population might have to be evacuated."

या दोन तीन वर्षामध्ये आपण हे अप्पर वर्धा धरणातून पाणीपुरवठा देण्याचे काम व्यवस्थितरीत्या पूर्ण करू शकलो नाही, तर शहराची लोकसंख्या हलवावी लागणार आहे. तिला पुरेसा पाणी पुरवठा होणार नाही."

### "साठवण जलाशया"ची व्याख्या

**४८.** आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या पाणीपुरवठा तज्ज्ञांचे दाखले देत प्रा. बी. टी. देशमुख यांनी पाणीपुरवठ्याचा सर्वोत्तम उद्भव कोणता? साठवण जलाशय म्हणजे काय व त्याची आवश्यकता केव्हा भासते याचे शास्त्रीय विवेचन आपल्या भाषणात केले ते पुढील शब्दात :-

"अध्यक्ष महाराज **आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पाणीपुरवठा तज्ञ श्री. हार्डेन्बर्ग व रोडी** आहेत. त्यानी "**वॉटर सप्लाय ॲन्ड वेस्टडिस्पोझल**" नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे. त्या ग्रंथाचे भाषांतर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने केले असून त्या पुस्तकाला "**पाणी पुरवठा आणि टाकाऊ द्रव्याची विल्हेवाट**" असे नाव दिलेले आहे. त्या ग्रंथातील चार ओळी मी या ठिकाणी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की,"**सामाजिक गरजांकरिता लागणाऱ्या पाण्याचे सर्वोत्कृष्ट उगमस्थान, मग तो नवीन पुरवठा असो अगर विद्यमान पुरवठ्याची मर्यादा संपल्याने तो वाढविण्यासाठी असो, नदी अगर झरा असते. जर सरासरी गरजेपेक्षा प्रवाह कमी असेल तर त्यातून (पुरवठ्यात) वाढ करणे निष्फळ ठरते. जर नाल्यातून घेण्यात येणाऱ्या (पाण्याच्या) कमाल राशीपेक्षा त्यातील किमान प्रवाह जास्त असेल तर जलाशयाची जरूर लागणार नाही. ...जर सरासरी मागणीपेक्षा नाल्यातील सरासरी प्रवाह जास्त असेल पण किमान प्रवाह सरासरी मागणीपेक्षा कमी असेल तर जलाशयाची गरज पडते. अशा जलाशयाला "साठवण जलाशय" असे संबोधले जाते.**" हे शास्त्र आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रासाठी साठवण जलाशय कोठे आहे? कोठे आहे हे साठवण जलाशय? अप्पर वर्ध्याला आहे व १९८७ मध्ये त्यात साठवण होणार हे नक्की आहे." *(महाराष्ट्र*

*विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ जून १९८६ : खंड ७७, क्रमांक ९, पृष्ठ ४०-४१)*

शेवटी "**एक महान संकट या शहरापुढे वाढून ठेवले आहे. त्याची गंभीर दखल शासनाने घ्यावी एवढाच इशारा या निमित्ताने पुरेसा आहे.**" असे नमूद करून प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपले भाषण संपविले.

### अर्थराज्यमंत्र्यांचे चर्चेला उत्तर

**४९.** या चर्चेला दिनांक २ जुलै १९८६ रोजी अर्थ राज्यमंत्री डॉ. श्रीकांत जिचकार यांनी उत्तर दिले. ते म्हणाले "**त्यासंबधीचा प्रोजेक्ट रिपोर्ट वगैरे सर्व करण्यासाठी ३५ लाख रूपये खर्च होणार आहेत. जागतिक बँकेची मदत घेऊन ही ५५ कोटी रूपयाची योजना घेतली आहे. हे काम लवकरात लवकर होईल.**" अर्थमंत्र्यांचे उत्तर चालू असतांना बोलणे बरोबर नाही याची जाणीव असतांना सुध्दा "ह्या ५५ कोटीच्या योजनेचे काम प्रत्यक्षात केव्हा सुरू होणार आहे?" असे बी. टी. देशमुख यांनी विचारले तर डॉ. जिचकार यांनी "ते आताच निश्चित सांगता येणार नाही कारण अजून प्रोजेक्ट रिपोर्ट वगैरे तयार झालेला नाही" असे उत्तर दिले. श्री. रा. सु. गवई यांच्याकडून राहवले नाही. ते उठून उभे राहिले व म्हणाले "अमरावती शहर तेथून उठण्याआधी हे काम होईल ना?" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक २ जुलै १९८६ : खंड ७७, क्रमांक १३, पृष्ठ ६९)* अनेकांनी उपस्थित केलेल्या अनेक मुद्यांना उत्तरे देण्याच्या घाईत असलेल्या डॉ. जिचकारांनी गवई यांनी विचारलेल्या या सरळ प्रश्नाला "ते निश्चित होईल" असे सरळ उत्तर दिले व आपले पुढील भाषण सुरू केले.

**************************************************

## ६
## "अर्धा तास चर्चा" या आयुधाचा वापर

**************************************************

**५०.** १९८६ च्या याच पावसाळी अधिवेशनात "**प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवणारी अर्धा तास चर्चा**" या सांसदीय आयुधाचा वापर प्रा. बी. टी. देशमुख यांनी दिनांक ५ ऑगस्ट १९८६ रोजी केला. अर्थसंकल्पावरील भाषण कोणत्याही विषयावर करता येते व सर्व खात्यावरील मुद्यांना अर्थमंत्री/राज्यमंत्री उत्तर देतात. "**अर्धा तास चर्चा**" या आयुधाच्या वापरामध्ये सुद्धा भाषण करता येते, मात्र येथे विषय कोण्यातरी एका विशिष्ट खात्याचा असतो. मांडावयाच्या मुद्यांची नियमाप्रमाणे पूर्वसूचना द्यावी लागते. व उत्तर त्या विशिष्ट खात्याचाच मंत्री किंवा राज्यमंत्री देतो. जुलै महिन्याच्या १४ तारखेला प्रा. बी. टी. देशमुख यांनी विधानपरिषद नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेची नोटीस दिली. अशी नोटीस देणाराला नियमाप्रमाणे आपण कोणते मुद्दे उपस्थित करणार आहोत याची पूर्वसूचना विधानमंडळ सचिवालयामार्फत मंत्र्यांना द्यावी लागते. आपल्या नोटीसबरोबर प्रा. बी. टी. देशमुख यांनी पुढील ६ मुद्दे नमूद केलेले होते.

१. सध्या अमरावती शहराला उन्हाळ्यात होणारा १०० टक्के पाणीपुरवठा बोअर वॉटरवर अवलंबून असणे,

२. छत्री व वडाळी या तलावांना तसेच पेढी व पूर्णा या नद्यांना उन्हाळ्यात अजिबात पाणी नसणे,

३. गेल्या १९८२ ते ८६ या चार वर्षात ग्राऊंड वॉटर लेव्हल कमीकमी होत जाणे,

४. अप्पर वर्धा येथील उद्‌भवाशिवाय दुसरा उद्‌भव उपलब्ध नसणे,

५. शहरी पाणी पुरवठ्याचा अमरावती जिल्ह्याचा व अमरावती शहराचा अनुपेश, तो अनुशेष भरून काढण्यासाठी करावयाची तरतूद,

६. सातव्या पंचवार्षिक योजनेत हा अनुशेष भरून काढला जाईल ही शासनाची घोषणा व त्याबाबत कारवाई न होणे.

### चर्चा पुढे ढकलली

**५१.** प्रा. बी. टी. देशमुख यांनी १४ जुलै १९८६ रोजी जी अर्धा तास चर्चेची नोटीस दिली ती स्वीकृत झालेली होती व ही अर्धा तास चर्चा विधान परिषदेच्या कामकाज पत्रिकेवर मंगळवार, दिनांक २९ जुलै १९८६ रोजी ठेवण्यात आली होती. पण या दिवशी नगरविकासमंत्री श्री. सुब्रमण्यन यांनी प्रा. बी. टी. देशमुख यांना लॉबीमध्ये भेटून अशी विनंती केली की, त्यांनी "ही अर्धा तास चर्चा एक आठवडा पुढे ढकलण्यासाठी राजी व्हावे. आज आपल्याला निश्चित काही उत्तर देता येणार नाही, अजून मुख्यमंत्र्याची संमती झालेली नाही. आपण याबाबत प्रयत्न करीत आहो, काही तरी निर्णय व्हावा अशी आपली इच्छा आहे" असे त्यांनी श्री. देशमुख यांना सांगितले, तशीच विनंती मा. सभापतींना सुध्दा त्यांनी केली होती. श्री. बी. टी. देशमुख यांनी "काही चांगला निर्णय होण्याची शक्यता असेल तर चर्चा पुढे ढकलण्याला आपली काहीच हरकत नाही" असे त्यांना सांगितले. त्यादिवशी ही बाब जेव्हा सभागृहासमोर आली त्यावेळेला प्रा. बी. टी. देशमुख यांनी "अध्यक्ष महाराज माझी जी अर्धा तास चर्चेची सूचना आहे ती चर्चा पुढील मंगळवारी ठेवावी" अशी विनंती केली. "ठीक आहे, आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील अर्धा तास चर्चेच्या सूचना पुढच्या मंगळवारी घेण्यात येतील" असे मा. सभापतींनी सांगितले.

### लोकप्रतिनिधींची बैठक

**५२.** सभागृहात कबूल केल्याप्रमाणे नगरविकास मंत्र्यांनी जिल्ह्यातील आमदारांची बैठक २८ जुलै १९८८ रोजी बोलाविली होती पण गाड्या उशिरा गेल्यामुळे ती बैठक होऊ शकली नाही. त्यानंतर पुन्हा सोमवार, दिनांक ४ ऑगस्ट १९८६ रोजी अशी बैठक त्यांनी बोलाविली. सर्वश्री. प्रा. राम मेघे, रा. सु. गवई, बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, डॉ. देविसिंह शेखावत, यशवंतराव शेरेकर, अनील वऱ्हाडे, रावसाहेब हाडोळे हे सदस्य त्यावेळी हजर होते. नगरविकास मंत्री यांनी अमरावती जिल्ह्याच्या इतर विकासाच्या क्षेत्रातून या योजनेवर पैसा वळविण्याचा विचार या सभेत मांडून पाहिला असता एकमुखाने सर्वानी त्याला विरोध दर्शविला व पाणी पुरवठ्याच्या योजनेला जो आर्थिक तरतुदींचा आकृतीबंध लागू आहे त्याप्रमाणे अमरावती पाणीपुरवठ्याच्या योजनेची अंमलबजावणी झाली पाहिजे असा आग्रह धरला.

### ५ ऑगस्ट १९८६ रोजी झालेली अर्धा तास चर्चा

**५३.** त्यानंतर मंगळवार दि. ५ ऑगस्ट, १९८६ रोजीच्या कामकाज पत्रिकेवर अर्धा तास चर्चेचा विषय ठेवण्यात आला, व कितीही उशीर झाला तरी चर्चा आजच संपवायची असे ठरले. वस्तुतः या सांसदीय आयुधामध्ये अर्धा तासाच्या काळात दोन चर्चा असतात. प्रत्येक चर्चेसाठी साधारणपणे १५ मिनिटांचा वेळ दिला जातो. त्या दिवशीच्या दोन चर्चेमध्ये पहिली चर्चा "मुंबईतील गारोडिया नगर, घाटकोपर (पूर्व) येथील झोपडपट्टी तोडणे" या विषयावरील श्री. रा. सु. गवई यांनी उपस्थित करावयाची होती. ती चर्चा उपस्थित करीत असतांना त्यानंतर होणाऱ्या चर्चेचे सुतोवाच श्री. गवई यांनी अगोदरच करून ठेवले होते. ते म्हणाले, "माझ्या या चर्चेपेक्षा सुद्धा अत्यंत महत्त्वाची अशी अर्धा तास चर्चा यानंतर या ठिकाणी व्हावयाची आहे त्यामुळे मी जास्त वेळ घेणार नाही". *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ ११८)* १५ मिनिटामध्ये ही पहिली चर्चा आटोपली आणि रात्री ९ वाजता "अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा प्रकल्पातून पाणीपुरवठ्याची योजना" याबाबत तारांकित प्रश्न क्रमांक ५३१५ ला दिनांक १९ जून १९८६ रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात विधान परिषद सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी उपस्थित करावयाची अर्धा तास चर्चा सुरू झाली. ९ वाजता सुरू झालेली ही चर्चा जवळजवळ रात्री ९.३५ वाजेपर्यंत सुरू होती.

### पेढी पूर्णेचे प्रवाह कसे आटत गेले?

**५४.** सुरुवातीला प्रा. बी. टी. देशमुख यांनी चर्चा उपस्थित करणारे आपले भाषण केले व चर्चेसाठी नमूद केलेल्या ६ मुद्यावरील विचार तपशिलाने मांडले. अमरावती शहराच्या विद्यमान पाणीपुरवठ्याचा उद्‌भव असलेल्या पेढी व पुर्णा नद्यांचे "फ्लो चार्ट" तारखा सह सभागृहात त्यांनी सादर केले ते पुढील शब्दातः-

"ह्या दोन नद्या गेल्या चार वर्षामध्ये कसकशा आटत गेल्या, त्याच्या तारखा मी आपणास सांगतो. पेढी नदी १९८३ च्या उन्हाळ्यामध्ये केंव्हा आटली? तिने १९८३ साल पाहिलेच नाही. ही नदी १२ डिसेंबर १९८२ रोजी शून्य प्रवाहावर आली. त्यानंतर ती २७ मार्च १९८४, नंतर २१ फेब्रुवारी १९८५ आणि आता या वर्षी ७ जानेवारी १९८६ रोजी शून्य प्रवाहावर आली. पूर्णा नदी १६ मे १९८३, १६ मे १९८४, २३ मे १९८५ आणि २ मे १९८६ ला शून्य प्रवाहावर आली. मे महिन्यात व उन्हाळ्यात तर त्या नद्यामध्ये पाणीच रहात नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२१-१२२)*

### तात्कालिक उपाययोजनांचा सुकाळ

**५५.** १९८३ ते १९८६ या चार वर्षामध्ये केवढ्या मोठ्या प्रमाणावर तातडीच्या पाणीपुरवठ्याच्या योजना घ्याव्या लागल्या व तरीही परिस्थिती किंती गंभीर आहे याबाबतचे वर्णन प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात केले ते पुढील प्रमाणे :-

"**या सर्व तात्कालिक उपाययोजना आहेत.** त्या १९८३ ते १९८६ या काळामध्ये केल्या गेल्या. पेढी आणि पूर्णा परिसरामध्ये १९८३ मध्ये २०,

१९८४ मध्ये १२, १९८५ मध्ये ५ आणि १९८६ मध्ये १० बोअर्स घेण्यात आले. पहिले २० बोअर्स कमी पडले म्हणून दरवर्षी नवीन बोअर्स घ्यावे लागले. अशा प्रकारे ३ वर्षामध्ये २ कोटी ४० लाख रुपये तात्कालिक योजनेसाठी खर्च करण्यात आले. १९८३ मध्ये ३५ लाख, १९८४ मध्ये २८ लाख, १९८५ मध्ये ५० लाख, १९८६ मध्ये १२६ लाख अशा प्रकारे हा खर्च करण्यात आला. **त्या ठिकाणी नॉर्मसपेक्षा अर्धे पाणी द्यावयाचे म्हटले तरी जेथे २२ मिलीयन लीटर्स पर-डे पाणी पुरवावे लागते. त्या ठिकाणी एकेवेळी १० मिलीयन लीटर्स पर-डे अशावर प्रमाण आले होते.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२२)*

## अप्पर वर्धाच्या बांधकामात पाणी पुरवठ्याचे बांधकाम

**५६.** अप्पर वर्धा धरणाशिवाय अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी दुसरा कोणताही उद्भव नाही व त्यावर आधारित ५५ कोटी रुपयाच्या योजनेचे प्राथमिक तपशील प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले ते पुढील शब्दात :-

"**या धरणाच्या स्ट्रक्चरमध्ये पाणी पुरवठ्याची जी योजना तयार केली त्यासाठी काय केले होते?** १९८१- ८२ मध्ये जे धरणाचे संकल्प चित्र तयार करण्यात आले त्यामध्ये उजव्या विभाजक भिंतीमध्ये २४-२५ मीटर्स उंचीची क्रॉंकीटची जलसंचय विहीर प्रस्तावित आहे. त्यासाठी लागणाऱ्या पाईप्ससाठी फायनान्सियल ॲलोकेशन झालेले आहे. पाटबंधारे विभागातर्फे काम चालू आहे. वर्षभरात ते स्ट्रक्चर तयार होणार आहे आणि या योजनेसाठी लागणारे १२५० मि.मी. आकाराचे पाईप पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाने आणून तेथे ठेवले आहेत. पाटबंधारे विभागातर्फे ते काम होत आहे.आतापर्यंत लक्षावधी रुपये या कामावर खर्च झाले आहेत. आणि होऊन राहिले आहेत. त्या ठिकाणी जे धरण तयार होणार आहे ते १९८८ मध्ये पूर्ण होणार असून १९८७ सालापासून पाणी भरण्यास सुरुवात होणार आहे. अधिकारी मंडळी सांगतात की, १९८७ पासून पाणी भरण्याचे कामाला सुरुवात होईल. धरणापासून अमरावती शहराला पाणीपुरवठा करावयाचे ठरविले तर १९८७ मध्ये पाणी देता येईल असे अधिकारी सांगतात. ही पूर्ण योजना ११५ कोटी रूपयाची होणार असून त्यामध्ये ड्रेनेज वगैरेसकट खर्च होणार आहे. याच्यावर आम्ही प्रश्न विचारला होता त्यावेळी सभागृहामध्ये असे सांगण्यात आले होते की किमान पाणीपुरवठ्याची योजना करण्यात येईल. ड्रेनेजसाठी या योजनेतून सध्या खर्च करू नये. पंपिग मशिन्स खरेदी करण्यासाठी व पाईप लाईन टाकण्यासाठी व वॉटर शुद्धीकरणासाठी म्हणून किमान ५५ कोटी रुपये लागतील असे सांगितले होते." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२२-१२३)*

## ५५ कोटीच्या योजनेचा आर्थिक आकृतीबंध

**५७.** ५५ कोटी रुपयाच्या या योजनेचे बांधकाम करावयाचे झाल्यास त्याचा आर्थिक आकृतीबंध कसा राहील यांचे शासकीय कागदपत्राच्या आधारे विवेचन करतांना प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की,

"अध्यक्ष महाराज या ५५ कोटी रूपयाची कशी व्यवस्था असावी ही गोष्ट शासनाने अनेक आदेश काढून सांगितली आहे. "**१९८५-८६ ची वार्षिक योजना**" नावाचे जे पुस्तक आहे, नियोजन विभागाने प्रसिद्ध केलेले, त्याच्या पान २३८ वर नगरपालिका आणि महानगरपालिकासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांचा आर्थिक आकृतीबंध कसा राहील हे दिले आहे, त्यामध्ये या अशा प्रकारच्या ज्या योजना आहेत त्याचे वर्णन जे दिले आहे ते असे की,योजना म्युनिसिपालीटीची असेल तर दहा टक्के म्युनिसिपालीटीची रक्कम किंवा ही योजना पाणीपुरवठा मंडळाची असेल तर मंडळाचे दहा टक्के आणि २३ १/३ टक्के रक्कम राज्य सरकारचे अनुदान आणि कर्जाचे कॉम्पोनंट ६६ २/३ असा आकृतीबंध पाणीपुरवठा योजनेचा संबंध महाराष्ट्रामध्ये मान्य केला आहे. तेव्हा अध्यक्ष महाराज, हे जे ५५ कोटी रुपये आहेत ते या अप्पर वर्धा पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी सहज उपलब्ध होऊ शकतात. लोकवर्गणीचे साडेपाच कोटी रुपये होतात.**पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाने वारंवार व स्पष्टपणे त्यांची योजना असल्यामुळे ही रक्कम देण्यास मान्यता दिलेली आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२३)*

## चर्चा आटोपती घेण्याचा मा. उपसभापतींचा प्रयत्न

**५८.** आर्थिक आकृतीबंधाच्या तीन घटकापैकी लोकवर्गणीबाबतची माहिती सांगून झाल्यानंतर शासकीय अनुदान व कर्ज या दोन घटकांची तपशीलवार माहिती प्रा. बी. टी. देशमुख हे सभागृहाला द्यायला लागले तेव्हा चर्चा थोडीशी लांबत आहे असे पाहून मा. उपसभापती यांनी आपण मागणी करा की, "आम्हाला लवकरात लवकर अप्पर वर्धा मधून पाणी मिळाले पाहिजे" असे सुचविले. त्यावर प्रा. बी. टी. देशमुख यांनी "अध्यक्ष महाराज, पैशाची अडचण आहे असे शासनाने सभागृहात सांगितले होते, म्हणून मी माहिती देत आहे. आता पैशाची अडचण नाही असे सरकारने म्हटले तर मी खाली बसतो." असे सांगितले, उपसभापतींनी त्यावर जे उद्गार काढले ते असे की, "पाणी दिले तरच अमरावती शहर वाचेल नाहीतर भयानक परिस्थिति आहे तेव्हा आपण मागणी करा." चर्चेला आटोपते घेण्याच्या दृष्टीने मा. उपसभापतींनी एक दोन वेळा प्रयत्न करून पाहिला. मा. उपसभापतींनी केलेला हा प्रयत्न व त्यापासून प्रा. बी. टी. देशमुख यांनी केलेला आपला बचाव मुळातून वाचण्यासारखा आहे. विधानपरिषदेच्या अधिकृत प्रतिवेदनातील आवश्यक तेवढा मजकूर पुढील प्रमाणे:-

*"**प्रा. बी. टी. देशमुख :** ...... रोड आणि सिंचन या गोष्टी सोडल्या तर राहिलेल्या सात सेक्टरचा बॅकलॉग सातव्या योजनेच्या काळात भरून काढण्याचे वचन दिलेले आहे. याबाबत सरकारचा निर्णयसुद्धा झालेला आहे. "**गव्हर्नमेंट टुक ए डिसीजन**" असे म्हटले आहे.*

***उपसभापती :** आपण मागणी करा की, आम्हांला लवकरात लवकर अप्पर वर्धामधून पाणी मिळाले पाहिजे.*

***श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, पैशाची अडचण आहे असे शासनाने सभागृहात सांगितले होते, म्हणून मी माहिती देत आहे. **आता पैशाची अडचण नाही असे सरकारने म्हटले तर मी खाली बसतो.***

***उपसभापती :** पाणी दिले तरच अमरावती शहर वाचेल नाहीतर भयानक परिस्थिति आहे तेव्हा आपण मागणी करा.*

***श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, मागच्यावेळी जर पैशाचे कारण दिले नसते तर ही आकडेवारी मी या ठिकाणी सांगितली नसती. पैसा कसा उपलब्ध आहे हे मी सांगतो. **लोकवर्गणीच्या बाबतीत सांगितले आहे.** पाणीपुरवठा मंडळाची ही योजना आहे आणि त्यामुळे ते साडेपाच कोटी रूपये देण्यास तयार आहेत. आता राहिलेला जो भाग आहे १२.८० कोटीचा सरकारची **ग्रॅन्ट-इन-एड देण्याचा आहे.** अध्यक्ष महाराज, आमच्याकडे पैसा नाही असे उत्तर ऐकण्यास आम्ही आता तयार नाही. शासनाने निर्णय घेतलेला आहे. अध्यक्ष महाराज, याच पुस्तकात पान ६३ वर जो बॅकलॉग दाखविला आहे तो किती आहे?*

***उपसभापती :** डॉ. सुब्रमण्यन यांनी आपल्याला लक्ष घालीन असे कॅटॅगोरिकल उत्तर दिलेले आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख : परवापासून स्कीमच्या कामाला सुरू करतो असे ते म्हणणार असतील तर मी खाली बसतो.** अध्यक्ष महाराज. या पुस्तकाच्या पान ६३ वरील टेबल २१ वर या जिल्ह्याचा नागरी पाणीपुरवठ्याचा बॅकलॉग दाखविला आहे. तो फॅक्ट फायडिंग्ज कमिटीने काढला आहे. **त्यामध्ये ६१ मिलीयन लीटर्स ए डे असून यामध्ये ३२ मिलीयन लीटर्स ए डे हा एकट्या अमरावती शहराचा अनुशेष आहे.** महाराष्ट्रामध्ये १९८२ मध्ये जिल्ह्याचा बॅकलॉग ६१ एमएलडी होता तो १९८५ मध्ये ४३ एमएलडी वर आला परंतू अमरावती शहराचा ३२ एमएलडीचा अनुशेष कायम आहे. जिल्ह्याचा अनुशेष भरून काढण्यासाठीची तरतूद म्हणून १७.५१ कोटी रुपये या पुस्तकात दाखविले आहेत. त्यामध्ये १२.८० कोटी या शहरासाठीच्या बॅकलॉग करिता नमूद केलेले आहेत. आणि मग आता अनुदान देण्यामध्ये काय अडचण आहे? आपण निर्णय घेतला आहे ना? सातव्या योजनेच्या काळात नागरी पाणी पुरवठ्याचा अनुशेष दूर करण्याचा, मग? अध्यक्ष महाराज या ठिकाणी मी मघाशी सांगितले त्याप्रमाणे लोकवर्गणीचा प्रश्न राहिलेला नाही. त्यात काही अडचण नाही. **शासनाने द्यावयाचे आहे ते अनुदान अनुशेष दूर करण्यासाठीची ही रक्कम या शहराच्या हक्काची आहे म्हणून दिली तर त्यातही अडचण नाही.** आता राहिलेली जी गोष्ट आहे ती कर्जाची आहे. ३६.६७ कोटी रुपयाचे कर्ज पाहिजे. अध्यक्ष महाराज कर्ज घेण्यासाठी चार-पाच ठिकाणे आहेत ती मी आपल्याला दाखवू शकतो. आयुर्विमा कार्पोरेशन आहे. ओपन मार्केटमधून कर्ज घेणे आहे. अध्यक्ष महाराज, शासनाला कर्ज कुठून घ्यावे हे मी काही सांगितले पाहिजे असे नाही. मला याबाबत जी माहिती आहे ती मी या ठिकाणी सांगून आपला वेळ घेणार नाही. मी विश्वास ठेवतो की, शासन ही गोष्ट करील.*

***उपसभापती :** आपल्याकडे जर या बाबतची काही माहिती असेल तर ती आपण सांगा."* *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२३-१२४)*

## मा. उपसभापतींनी चर्चा आटोपती घेण्याचा प्रयत्न सोडून दिला

**५९.** अर्धा तास चर्चेच्या नियमांच्या मर्यादेमध्ये मला पुरेसा वेळ मिळालेला होता व त्यामुळे मी भाषण आटोपते घ्यावे असा प्रयत्न मा. उपसभापती करीत होते व मी मात्र चिकाटीने या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन मला माझी पूर्ण बाजू मांडू द्यावी असा आग्रही प्रयत्न सुरू ठेवत होतो. अशी ही झटापट सुरू असतांना एकाएकी मा. उपसभापतींनी चर्चा संपुष्टात आणण्याचा प्रयत्न पूर्णपणे सोडून दिला.

मा. उपसभापतींनी एकाएकी मला ही मोकळीक कशी दिली याचे निश्चित कारण मला आजही सांगता येणार नाही पण याबाबतचा माझा अंदाज नमूद करणे मात्र मला आवश्यक वाटते. सभागृहाची बैठक जवळ जवळ संपत आलेली होती. कामकाज पत्रिकेवरील हा शेवटचा विषय होता. रात्रौ नऊ, साडेनऊ वाजताची वेळ होती. विरोधी पक्ष नेते श्री. दे. मा. कराळे व सभागृहातील ज्येष्ठ सदस्य श्री. रा. सु. गवई हे विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन शेवटपर्यंत सभागृहात उपस्थित होते. प्रत्यक्ष कामकाज संपेपर्यंत मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक हे आपल्या कार्यालयात बसून चर्चा ऐकत असतात. या तीन ज्येष्ठ नेत्यांपैकी कोणीतरी मा. उपसभापतींना चिठ्ठी लिहून "बी. टी. महत्त्वाचा विषय मांडत आहेत. प्रतिपाद्य विषयाचा अभ्यास त्यांनी मजबुतीने केलेला आहे. त्यांना अडवू नका. थोडा वेळ जास्त लागला तरी चालेल" अशी विनंती मा. उपसभापतींना केली असावी. अशा प्रकारचे अनौपचारिक दळणवळण पीठासीन अधिकारी व ज्येष्ठ सदस्य यांच्यामध्ये नेहमीच चालू असते. हे या ठिकाणी नमूद केले पाहिजे.

मा. उपसभापती श्री. दाजीबा पाटील हे कामगार चळवळीतून कष्टाने व मेहनतीने वर आलेले. मी ज्या जिद्दीने ही सर्व बाजू सभागृहामध्ये मांडत होतो व जो विषय मांडत होतो त्याचे महत्त्व लक्षात घेऊन "नियमांचा तांत्रिकपणा बाजूला ठेवून बी. टीं. ना त्यांची बाजू मोकळेपणाने मांडू दिली पाहिजे" असा विचार खुद्द त्यांच्याच मनामध्ये आला असेल ही शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. ही चर्चा चालू असतांना त्यांनी काढलेले "आपण मागणी करा की, आम्हांला लवकरात लवकर अप्पर वर्धामधून पाणी मिळाले पाहिजे." हे उद्गार काय? किंवा "पाणी दिले तरच अमरावती शहर वाचेल नाहीतर भयानक परिस्थिती आहे तेव्हा आपण मागणी करा." हे उद्गार काय? या प्रश्नाविषयी त्यांच्याही मनामध्ये सहानुभूती होती असेच दर्शवितात. या सहानुभूतीच्या पोटीच त्यांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याची भावना बाजूला ठेवून मला विषय मांडण्याची पूर्ण मोकळीक दिली असावी या अंदाजाला बळकटी येते.

## ११ महानगरपालिकांची तुलनात्मक स्थिती

**६०.** शासकीय अनुदानाची रक्कम व लोकवर्गणीची रक्कम कशी सहज उपलब्ध आहे याचे सर्व तपशील मी आपल्या भाषणात सांगितल्यानंतर कर्जाच्या बाबत "अध्यक्ष महाराज, शासनाला कर्ज कुठून घ्यावे हे मी काही सांगितले पाहिजे असे नाही. मला याबाबत जी माहिती आहे ती मी या ठिकाणी सांगून आपला वेळ घेणार नाही." असे म्हटले तेव्हा आतापर्यंत चर्चा आटोपती घेण्याच्या हेतूने खटपटीत असलेल्या मा. उपसभापतीनी "आपल्याकडे जर या बाबतची काही माहिती असेल तर ती आपण सांगा." असे उद्गार काढलेत. मा. उपसभापतींना धन्यवाद देऊन मी ही माहिती तपशिलाने सभागृहामध्ये सांगितली. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकांची तुलनात्मक परिस्थिती सभागृहाला निवेदन केली ती पुढील शब्दात :

"**शेवटी हे करावयाचे की नाही हे कशावर अवलंबून आहे तर शासनाच्या निर्णयावरती अवलंबून आहे. शासनाचा निर्णय परिस्थितीचे गांभीर्य शासनाला कितपत समजले यावर अवलंबून आहे. आणि परिस्थितीचे गांभीर्य हे या प्रश्नाच्या उपलब्ध असलेल्या तुलनात्मक स्थितीवर अवलंबून आहे.** माझा या ठिकाणी दावा आहे की, संबंध महाराष्ट्रात कोणत्याही महानगरपालिकेत जी परिस्थिती नाही ती या अमरावती शहरात पाणीपुरवठ्याच्या बाबतीत आहे. १०० टक्के बोअरवर पाणीपुरवठा अवलंबून असलेली देशात एकही महानगरपालिका नाही आणि महाराष्ट्रामध्ये तर नाहीच नाही परंतु देशात अमरावती शहर ही एकच अशी महानगरपालिका आहे की, ज्या ठिकाणी उन्हाळ्यात १०० टक्के बोअरने पाणी दिले जाते. महाराष्ट्रामध्ये ११ महानगरपालिका आहेत यामधील **चार महानगरपालिकांमध्ये पाणीपुरवठा हा दरडोई दर दिवशी २३० लीटरच्यावर आहे. इतर ४ महानगरपालिकांमध्ये हे प्रमाण १३० लिटरच्या वर आहे. ठाणे व कल्याण या दोन महानगरपालिकेमध्ये हे प्रमाण १०० च्या खाली आहे** पण त्या ठिकाणी पाणीपुरवठ्याच्या नवीन योजना सुरू आहेत. परंतु अमरावती ही अशी एकच महानगरपालिका आहे की ज्या ठिकाणी ५० लिटर दरदिवशी दरडोई पाणीपुरवठा धड होत नाही. उन्हाळ्यामध्ये तर तोसुद्धा १०० टक्के ग्राउंड वॉटरवर अवलंबून असतो." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२५)*

## लोक व लोकप्रतिनिधींची ओढाताण

**६१.** लोकांना होणारा त्रास, त्याचा लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्यावर पडणारा ताण याचे प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात वर्णन केले ते पुढील प्रमाणे :

"अलीकडे या बाबतीत लोक अतिशय प्रक्षुब्ध झालेले आहेत. मा. सदस्य श्री. रा. सु. गवई, श्री. सोमवंशी आणि खालच्या सभागृहातील या शहरात राहणाऱ्या अनेक सदस्यांना माहिती आहे की येथून आपण गावी गेलो की, लोक आपल्याला गराडा घालतात. पाण्याचे कमालीचे दुर्भिक्ष जाणवते. ५-५० लोक बसलेलेच असतात. अधिकाऱ्यांना हे सांगितले तर ते म्हणतात की, आम्ही पाणी कोठून आणायचे? अधिकाऱ्यांचे म्हणणे असे की जगाचा उन्हाळा संपला पण आम्हाला अजून उन्हाळा सुरूच आहे. एक तारखेला पेढीलाही पाणी नाही. दोनही तलाव कोरडे आहेत. अशी अवस्था आहे. सन्माननीय सदस्य श्री. ढांगे हे आश्वासन समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांनी आमच्या शहराला भेट दिली **त्यावेळी लोकांचे थवेच्या थवे अनपेक्षितपणे भेटून तक्रारी सांगायचे, आटे फिरविणारा जो माणूस आहे त्याला ठोका असे लोक म्हणतात. कारण त्यांचा समज असा आहे की तो आटे कमी सोडतो त्यामुळे पाणी कमी प्रमाणात येते.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२५-१२६)*

**६२.** चर्चेचा शेवट करतांना आपल्या भाषणात मी असे सांगितले की "अशा परिस्थितीमध्ये शासनाने लोकांचा फार अंत पाहू नये असा माझा इशारा आहे. निदान एक दोन महिन्यामध्ये तरी शासन कामाला सुरूवात करील अशी मला आशा आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये दसऱ्यापेक्षा जास्त विलंब या कामाला होता कामा नये. लोकक्षोभाचा अंत पाहू नये. यापेक्षा चांगला मुहूर्त आपल्याला दुसरा मिळणार नाही." अधिक वेळ दिल्याबद्दल मा. उपसभापतींने आभार मानून मी आपले भाषण संपविले.

## चर्चेला राज्यमंत्र्यांचे उत्तर

**६३.** चर्चेला उत्तर नगरविकास राज्यमंत्री श्री. विलास सावंत यांनी दिले, "बी. टी. देशमुख यांनी या विषयावर बोलतांना या शहरासाठी पाणी पुरवठा योजना कशा बांधल्या याची इतकी सविस्तर माहिती दिली की, मला स्वतःला याबाबत आणखी काही सांगण्याची आवश्यकता नाही." असे त्यांनी सांगितले. "१९८२ सालानंतर एका एका नदीतील पाणी आटू लागले आणि १० दशलक्ष लिटर पाणी कमी पडायला लागले. त्यामुळे शहराचा पाण्याचा प्रश्न मोठा गहन बनायला लागला." ही गोष्ट त्यांनी कबूल केली. शेवटी तर त्यांनी असे सांगितले की, "**महाराष्ट्र नव्हे तर आपल्या देशामध्ये असलेल्या अनेक गावामध्ये एक सोर्स दोन सोर्स किंवा चार - पाच सोर्समधून पाण्याचा पुरवठा होतो. पण जवळ जवळ २०० सोर्समधून पाणी पुरवठा देणारे हे एकमेव गाव आहे. माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याची शासनाला कल्पना आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२६)*

"अनेक शासकीय पुस्तकांमध्ये या संदर्भात जे छापलेले आहे ते सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी वाचून दाखविले. त्यावरून शासन प्रयत्नशील आहे हे मा. सदस्यांनी मान्य केलेले आहे. हे काम ताबडतोब सुरू व्हावे याबद्दल वाद नाही. यासाठी कशादृष्टीने पैसा उभा करता येईल, हे मा. सदस्यांनी या ठिकाणी सांगितले. परंतु यासाठी जी प्रोसीजर आहे त्या प्रोसिजरप्रमाणे करायला पाहिजे." हे वाक्य मा. राज्यमंत्र्यांच्या तोंडून निघताच उत्तर संपत आलेले आहे याची सर्वांना जाणीव झाली.

## चर्चा संपवितांना आश्वासन मिळविण्यासाठीची झटापट

**६४.** उत्तर संपवित असतांना आपण निश्चित शब्दात कोठेही अडकल्या जावू नये, शक्यतोवर मोघम शब्दात उत्तर द्यावे हा राज्यमंत्री श्री. विलास सावंत यांनी केलेला प्रयत्न व त्यांच्या कडून निश्चित शब्दात आश्वासन मिळविण्यासाठी सर्वश्री रा. सु. गवई व प्रा. बी. टी. देशमुख यांनी केलेली झटापट ही मुळातून वाचण्यासारखी आहे. विधानपरिषदेच्या अधिकृत प्रतिवेदनातून ती म्हणूनच पुढे शब्दशः नमूद केली आहे :

*"**विलास सावंत ...... "अनेक शासकीय पुस्तकामध्ये या संदर्भात जे छापलेले आहे ते सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी वाचून दाखविले आहे.** त्यावरून शासन प्रयत्नशील आहे हे सन्माननीय सदस्यांनीही मान्य केले आहे. हे काम ताबडतोब सुरू व्हावे याबद्दल वाद नाही. यासाठी कशा तऱ्हेने पैसे उभे*

*करता येतील हे माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले. परंतु यासाठी जे प्रोसिजर आहे त्या प्रोसिजरप्रमाणे करावयाला पाहिजे.*

***श्री. रा. सु. गवई :*** *म्हणजे मान्यता दिलेली आहे.*

***श्री. विलास सावंत :*** *परंतु प्रोसिजर म्हणून ज्या गोष्टी आहेत त्या पूर्ण व्हावयाच्या आहेत* ***तातडीने करण्याचे माननीय मुख्य मंत्र्यांनी म्हणजेच शासनाने तत्त्वतः मान्य केले आहे.***

***श्री. रा. सु. गवई :*** *५.५ कोटी रुपये आज आपल्याजवळ आहेत. बॅकलॉगमधील १२.८० कोटी म्हणजे जवळ जवळ १३ कोटी आहेत आणि कर्ज कसे मिळावे हे लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशनला सांगितले आहे. म्हणजे दोन गोष्टी शासनाला मान्य आहेत आणि तिसरी गोष्ट मान्य होण्यासारखी आहे. त्यामुळे प्रक्रियेला वेळ लागेल असे मला वाटत नाही.*

***श्री. विलास सावंत :*** *मी अडचणीचा भाग या ठिकाणी सांगत नाही. अनेक वेळा या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या लेव्हलवर मिटिंग झाल्या आहेत. या प्रश्नाची तातडीने गरज लक्षात घेऊन या बाबतीत त्या भागातील दोन्ही सभागृहाचे माननीय सदस्य आणि अधिकारी यांनी एकत्र बसून चर्चा केलेली आहे. तावडतोबीने हे कसे करता येईल या बाबतीत चर्चा केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. देशमुख यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, एक किंवा दोन महिन्यात कामाला सुरुवात व्हावी पण मी त्यांना सांगू इच्छितो की,* ***दसऱ्यापर्यंत कामाला सुरुवात व्हावी या दृष्टीने मार्ग काढण्याचे काम जरूर सुरू करू अशी खात्री देतो.*** *लवकरात लवकर काम सुरू करावे अशी शासनाची इच्छा आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख :*** *हा प्रश्न अतिशय सेन्सेटीव्ह आणि महत्त्वाचा आहे.*

***उपसभापती :*** *अमरावती जिल्ह्यातील आमदारांनी पाठपुरावा करावा.*

***श्री. बी. टी. देशमुख :*** *शक्य झाले तर दसऱ्याच्या अगोदर पण निदान दसऱ्यापर्यंत निश्चित या योजनेच्या कामाला सुरुवात केली जाईल असेच माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगितलेले आहे ना?*

***श्री. विलास सावंत :*** *माझ्या बोलण्याचा आशय तसाच आहे. शब्दावर खल करू नये. पण शासनाला याची जाणीव आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी शासनाच्या हेतूबद्दल शंका बाळगू नये.*

***श्री. रा. सु. गवई :*** *आम्ही शासनाचे आभार मानतो. माननीय मंत्रिमहोदयांचेही आभार मानतो. दसऱ्याला भूमिपूजन करा." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २६, पृष्ठ १२६-१२७)*

### सुस्पष्ट आश्वासनांनी चर्चेचा शेवट

**६५.** मा. राज्यमंत्र्यांचे भाषण संपल्यावर "**हा प्रश्न अतिशय सेन्सिटिव्ह व महत्त्वाचा आहे**" असे श्री. बी. टी. देशमुख यांनी म्हणताच अमरावती शहर व जिल्ह्यातील जे आमदार ही चर्चा ऐकण्यासाठी विधानसभा सदस्यांकरिता राखून ठेवलेल्या गॅलरीमध्ये बसलेले होते. त्यांच्याकडे पाहून उपसभापती म्हणाले "**अमरावती जिल्ह्यातील आमदारांनी पाठपुरावा करावा**" राज्यमंत्री श्री. विलास सावंत यांनी हे जे आश्वासन दिले होते ते थोडेसे गुंतागुंतीचे, बरेच अस्पष्ट व खूपच मोघम वाटल्यामुळे श्री. बी. टी. देशमुख यांनी पुन्हा विचारले, "**शक्य झाले तर दसऱ्याच्या अगोदर पण निदान दसऱ्यापर्यंत निश्चित या योजनेच्या कामाला सुरुवात केली जाईल. असेच मा. मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले आहे ना?" त्यावर राज्यमंत्री म्हणाले, "माझ्या बोलण्याचा आशय तसाच आहे. शब्दावर खल करू नये.** पण शासनाला याची जाणीव आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी शासनाच्या हेतूबद्दल शंका बाळगू नये." आता हे आश्वासन जवळ जवळ पक्के झाले होते. ते आणखी पक्के करण्याच्या दृष्टीने श्री. रा. सु. गवई यांनी "आम्ही शासनाचे आभार मानतो. मंत्रीमहोदयांचे आभार मानतो. दसऱ्याला भूमिपूजन करा" असे उद्गार काढले व त्यानंतर मा. उपसभापतींनी "सभागृहापुढील कामकाज आता संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन ती ६ ऑगस्ट १९८६ रोजी दुपारी १.०० वाजता पुन्हा भरेल" असे घोषित केले व त्या दिवशीचे कामकाज रात्रौ ९ वाजून ३५ मिनिटांनी संपले. या अर्धा तास चर्चेमुळे सभागृहामार्फत जगाला दोन गोष्टी कळल्या. **एक म्हणजे मा. मुख्यमंत्र्यांनी योजनेला तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. व दुसरे म्हणजे दसऱ्यापर्यंत या योजनेचे काम सुरू होऊ घातलेले आहे.**

### सदस्याला प्राप्त होणाऱ्या बलवत्तेचे आधार

**६६.** दिनांक ५ ऑगस्ट १९८६ रोजी झालेल्या या अर्धा तास चर्चेचे विश्लेषण केले तर असे लक्षात येईल की, काटेकोर नियमांच्या चाकोरीमध्ये राहूनच काम करतो म्हटले असते तर नियमाप्रमाणे अर्धा तासात अशा दोन चर्चा असतात. या हिशोबाने विचार करू जाता ५ मिनिटे चर्चा उपस्थित करणाऱ्या सदस्यांचे भाषण, ५ मिनिटात मंत्र्यांचे उत्तर व ५ मिनिटे पूरक प्रश्नोत्तरे अशा १५ मिनिटात ही चर्चा संपली असती. पण प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. उपसभापतींनी या चर्चेला पुरेसा वेळ मिळावा म्हणून संधी दिली. त्यामुळेच ही तपशीलवार चर्चा होऊ शकली. विधानमंडळाचा सदस्य या नात्याने गेली अनेक वर्षे काम करित असतांनाचे माझे एक निरीक्षण मला स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक वाटते. **संघर्ष विषय असलेला प्रश्न किती सार्वजनिक महत्त्वाचा आहे, यावरून तो प्रश्न मांडणाऱ्या सदस्याचे बळ वाढत असते किंवा कमी होत असते.** विधानमंडळाचा सदस्य खरोखरीच एखाद्या सार्वजनिक महत्त्वाच्या, लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सभागृहात संघर्ष करीत असेल तर असा संघर्ष करीत असतांना तो सभासद "तसा लहान" असला तरी चारही बाजूनी त्याच्या बाहुंमध्ये अतिरिक्त बळाचा प्रवाह प्रवेश करीत असतो. अनेकदा तर "आपण एवढे बलवान केंव्हा पासून झालो?" असे खुद्द त्या सभासदाला वाटावे इतकी ही बलवत्तता प्रबळ असते.

कधी हे बळ पिठासीन अधिकाऱ्यांच्या उद्‌गारातून मिळते, तर कधी त्यांच्या निर्णयातून, कधी हे बळ विरोधी पक्षनेत्यांच्या वा सदस्यांच्या तसेच सत्तारूढ पक्ष सदस्यांच्या त्या प्रश्नावरील चर्चेतील सहभागातून मिळते. चर्चेच्या स्वाभाविक वळणावर आधारित, ठरवून नसलेला पण घडून येणारा सभागृहातील अनेक सदस्यांचा सभात्याग जसे प्रश्न सुटण्याला बळ देऊन जातो तसेच सत्तारूढ पक्षाचे सभासद असल्यामुळे सभात्यागात सहभागी होता येत नसले तरी जागेवर बसल्याबसल्या असे सदस्य "मंत्र्यांच्या उत्तरातील पोकळपणा" व प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेऊन जे नापसंतीदर्शक हातवारे करतात, नेत्रकटाक्ष टाकतात किंवा बसल्याबसल्या "अरे ये क्या बरोबर है क्या?" अशा व या सारख्या अर्थाचे मंत्र्याच्या उत्तराबद्दल नाराजी दर्शक असे जे उद्‌गार काढतात ते सभात्यागापेक्षा प्रसंगविशेषी प्रभावी ठरतात. **योजना करून नव्हे, तर प्रश्नाच्या गुणवत्तेवर आधारित सभागृहातील या घटनांविषयी वृत्तपत्रामध्ये येणाऱ्या बातम्या, लेख, अग्रलेख यातून सुद्धा या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी केवढे मोठे बळ उभे केले जाते. याचे शास्त्रीय मोजमाप करण्याच्या कोणत्याही पद्धती निदान आजतरी उपलब्ध नाहीत.**

प्रसंगविशेषी प्राप्त होणाऱ्या या बळाने "फुगून" न जाता त्या प्रश्नाचे सामाजिक महत्त्व जबरदस्त असल्यामुळेच आपल्याला ही शक्ती प्राप्त होत आहे याची नम्र जाणीव ठेवून सतत पाठपुरावा केल्यास असा लहान सदस्य सुद्धा या मोठ्या प्रश्नाची सोडवणूक करवून घेण्यात देखणेपणाने यशस्वी होतांना दिसतो. या उलट एखाद्या ठाणेदाराच्या बदलीसाठी, एखादी नझुलची जागा मिळविण्यासाठी किंवा अशाच किरकोळ कामासाठी सांसदीय आयुधांचा वापर करीत असेल तर मुळात खूप मोठा असलेला सदस्य सुद्धा सभागृहात "न देखवे इतका बलहीन व ठेंगू" झाल्यासारखा दिसतो. **अर्थात उभयप्रकारचे हे 'देखणेपण' सर्वांच्या दृष्टीला चटकन दिसणारे "दर्शन" अशा स्वरूपाचे असतेच असे नाही. पण सभागृहाच्या अधिकृत प्रतिवेदनाच्या दालनातून फेरी मारण्याची तयारी असलेल्या दर्शनाभिलाषींना हे दालन म्हणजे "अशा दर्शनांचे सहजपणे उपलब्ध असलेले प्रदर्शन" होय असे वाटल्यावाचून रहात नाही.**

***************************************************

## ७

## पुन्हा आश्वासन समिती

***************************************************

### आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर

**६७.** १९८५ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २७८ व २७९ बाबत शासनाने केलेल्या कारवाईची छाननी विधानपरिषद आश्वासन समितीने यापूर्वीच सुरू केलेली होती. ३ जून १९८६ रोजी काही मुद्याबाबत खात्याकडून माहिती मागविण्याचा निर्णय या समितीने घेतला होता. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी (दि. ८ ऑगस्ट १९८६) आश्वासन समितीचा ९१ वा अहवाल सभागृहाला सादर झाला. या अहवालाचा भाग दुसरा "अमरावती शहर पाणी पुरवठा" याबाबतचे १९८५ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २७८ व २७९ व "अप्पर वर्धा धरणाच्या कामाची प्रगती" याबाबतचे आश्वासन क्र. ८५ व८६ यावर स्वतंत्रपणे सादर करण्यात आला. आश्वासन समितीचा हा अहवाल सादर करतांना समितीप्रमुख श्री. जगन्नाथराव ढांगे म्हणाले :

"अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद आश्वासन समितीचा एक्याण्णवा अहवाल सभागृहाला सादर करतो. अध्यक्ष महोदय, हा अहवाल

सादर करीत असतांना मला सभागृहाच्या काही गोष्टी लक्षात आणून द्यावयाच्या आहेत. या सभागृहामध्ये कोणताही प्रश्न विचारल्यानंतर व त्या संदर्भात आश्वासन मिळविल्यानंतर त्याकडे खाते आणि शासन कशा पद्धतीने लक्ष देते ते या ठिकाणी मला नमूद करावयाचे आहे. अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत माननीय सदस्यांनी आश्वासन मिळविल्यानंतर त्या आश्वासनाची पूर्ती होण्याच्या दृष्टिकोनातून पुन्हा प्रश्न समोर येतात तेव्हा खात्याकडून संबंधित मंत्र्यांना पुरेशी माहिती देण्यात आलेली नाही असे साक्षीवरून आमच्या लक्षात आलेले आहे. त्यामुळे हे काम करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन मंत्रिमहोदयांनी पुन्हा दिले. **त्यानंतर परवाच या सभागृहामध्ये हे काम दसऱ्यापर्यंत करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन देण्यात आले.** अध्यक्ष महाराज, १९ तारखेला नगरविकास मंत्र्यांनी असे सांगितले की, या प्रश्नाचे महत्त्व फार आहे त्यामुळे याकडे गांभीर्याने पाहू. आजपर्यंत मला या संदर्भात माहितच नव्हते. **मूळ आश्वासन १९८५ सालचे आणि दसऱ्यापर्यंत काम सुरू करण्याची पाळी आली. त्यामुळे अशा प्रकारे आश्वासनांच्या संदर्भात कार्यवाही झाली तर लोकप्रतिनिधींचे प्रश्न घसास लावण्याचे काम कसे काय लवकर व्हावयाचे हा खरा प्रश्न आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक ८ ऑगस्ट १९८६ : खंड ७७, क्रमांक २९, पृष्ठ ३३)*

## मंत्र्यांच्या कार्यक्रमांवर बहिष्कार टाकण्याचा लोकप्रतिनिधींचा निर्णय

**६८.** ८ ऑगस्ट १९८६ रोजी विधानपरिषदेचे पावसाळी अधिवेशन संपले. "**अप्पर वर्धा धरणातून अमरावतीसाठीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम दसऱ्यापूर्वी म्हणजे दिनांक १२ ऑक्टोबर १९८६ पूर्वी सुरू करू**" असे आश्वासन देण्यात आले होते. दोन महिन्याचा कालखंड उलटून गेला तरी कामाला कोणतीही सुरुवात होत नव्हती. सुरुवात होईल अशी चिन्हेसुद्धा दिसत नव्हती. या पार्श्वभूमीवर दिनांक ६ ऑक्टोबर १९८६ रोजी सर्वश्री. रा. सु. गवई, सुदाम देशमुख, प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी या विधानमंडळ सदस्यांनी दसऱ्यानंतर मंत्र्यांच्या अमरावती शहरामध्ये होणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रमावर बहिष्कार टाकला जाईल असे घोषित केले. २६ ऑक्टोबर १९८६ रोजी त्यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकामध्ये म्हटले होते :

"या आश्वासनाची पूर्तता करणे हे शासनाचे नैतिक कर्तव्य आहे, दसऱ्याच्या दिवसापर्यंत शासनाने जर हे काम सुरू केले नाही तर दसऱ्याच्या दिवसानंतर **अमरावती शहरामध्ये होणाऱ्या मंत्र्यांच्या कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमाला आम्ही उपस्थित राहणार नाही** त्या कार्यक्रमांवर हा एकप्रकारे टाकण्यात आलेला बहिष्कार असेल अशी स्पष्ट सूचना या निवेदनाव्दारे आम्ही देत आहोत." "४ लाख लोकसंख्येच्या या शहरावर पाण्यावाचून तडफडण्याची परिस्थिती येणार असेल तर त्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने आम्हाला स्वस्थ बसता येणार नाही व सर्व सनदशीर मार्गानी याबाबतचा लढा चालू ठेवला जाईल". असेही या पत्रकामध्ये नमूद करण्यात आले होते.

## नगरविकास सचिवांना साक्षीसाठी बोलाविण्याचा आश्वासन समितीचा निर्णय

**६९.** तिकडे महाराष्ट्र राज्य विधानपरिषद आश्वासन समितीच्या समिती प्रमुखांना व सदस्यांना ५ ऑगस्ट १९८६ रोजी सभागृहात झालेल्या अर्धा तास चर्चेमुळे व ८ ऑगस्ट १९८६ रोजी याबाबत खुद्द समितीने या विषयावर तपशीलवार अहवाल सादर केल्यामुळे दसऱ्यापर्यंत कामाला सुरुवात होते किंवा नाही याची उत्सुकता होती. "अमरावती पाणी पुरवठा योजनेची सुरुवात येत्या दसऱ्याच्या आधी करू असे जे आश्वासन मा. राज्यमंत्र्यांनी दिले होते याबाबत काय प्रगती आहे **याविषयीची अद्यावत माहिती घेऊन सचिव नगरविकास विभाग यांना दिनांक ८.१०.८६ रोजी साक्षीसाठी बोलावण्यात यावे**" असे समितीने आपल्या ३ ऑक्टोबर १९८६ च्या बैठकीत ठरविले. समितीचा हा निर्णय सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांना कळविणारे अवर सचिव महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय यांचे पत्र त्याच तारखेला (३ ऑक्टोबर १९८६) रवाना करण्यात आले. सोबत ५ ऑगस्ट १९८६ च्या विधानपरिषद कार्यवाहीच्या प्रतिवेदनाची लागूपुरती प्रत पाठविण्यात आली होती.

## "मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्याचे रेकॉर्डवरून दिसत नाही"– इति नगरविकास सचिव

**७०.** दिनांक ८.१०.१९८६ रोजी विधान परिषद आश्वासन समितीची बैठक दुपारी १ वाजता समितीप्रमुख श्री. जगन्नाथराव ढांगे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. नगरविकास विभागाच्या वतीने सचिव श्री. ए. एस. राव व पाणीपुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. रोटकर यांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. मुख्य म्हणजे दिनांक ५ ऑगस्ट १९८६ रोजीच्या अर्धा तास चर्चेला उत्तर देतांना नगरविकास राज्यमंत्री श्री. विलास सावंत यांनी दिलेल्या "**परंतु प्रोसिजर म्हणून ज्या गोष्टी आहेत त्या पूर्ण व्हावयाच्या आहेत तातडीने करण्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी व शासनाने मान्य केले आहे.**" तसेच "**योजनेच्या कामाला दसऱ्यापूर्वी सुरुवात करू**" या दोन आश्वासनाबाबत सचिवांची साक्ष नोंदविणे हे त्या दिवशी समितीचे मुख्य काम होते. "**मा. मुख्यमंत्र्यांनी या योजनेला मान्यता दिलेली आहे असे रेकॉर्डवरून दिसत नाही**" असे सचिवांनी समितीला सांगितले. ५ ऑगस्ट १९८६ रोजी राज्यमंत्री "**मा. मुख्यमंत्र्यांनी व शासनाने तत्वतः मान्य केले आहे**" असे सांगतात व तेथून २ महिन्यांनी दिनांक ८.१०.८६ रोजी खात्याचे सचिव पुन्हा पुन्हा विचारल्यावरसुद्धा "मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्याचे रेकॉर्डवरून दिसत नाही" असे सांगत होते, याचे समितीला आश्चर्य वाटले. आश्वासन समितीच्या १९८६ च्या कार्यवृत्तातील पृष्ठ ३२९ ते ३३१ वर नोंदविलेली ही प्रश्नोत्तरे पुढील प्रमाणे :

*"**समिती प्रमुख** : याठिकाणी अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्याच्या बाबतीत शासनाने आश्वासन दिले आहे. या आश्वासनाची पूर्ती झाली नाही म्हणून अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यात आली. त्यावेळी शासनाने असे सांगितले की आम्ही हे काम १२ ऑक्टोबरपर्यंत सुरू करू. विधानमंडळाच्या कामकाजाच्या दृष्टिकोनातून सांगावयाचे तर येथे माननीय मंत्र्यांनी वारंवार आश्वासन द्यायचे आणि सचिवांच्या लेव्हलवर त्याची जशी अंमलबजावणी व्हायला पाहिजे तशी ती होत नाही. याचे लोकशाहीमध्ये रिफ्लेक्शन होणार नाही असे नाही. तेव्हा हे काम १२ ऑक्टोबरपर्यंत सुरू करू असे माननीय मंत्री महोदयांनी कशाच्या आधारावर आश्वासन दिले? नाहीतर एकदा मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर त्याची पूर्ती झाली पाहिजे.*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : पूर्वी काय झाले यावर चर्चा न करता आता काम सुरू करण्याच्या दृष्टीने काय करता येईल आणि काय करणे शक्य आहे याचा आम्ही विचार करीत आहोत. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ५५ कोटी रुपयाच्या योजनेला ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल घेता येणार नाही. जर ते चुकीच्या पद्धतीने घेतले तर मला नंतर लोकलेखा समितीपुढे जाऊन साक्ष द्यावी लागेल.*

***श्री. बी. टी. देशमुख** : आपल्याकडून हे प्रपोजल फायनान्स डिपार्टमेंटकडे कधी गेले?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : आम्ही प्रपोजल फायनान्स डिपार्टमेंटकडे २१.८.८६ रोजी पाठवले. नंतर ही फाईल ३.१०.८६ रोजी वित्त मंत्र्यांकडे गेली आणि त्यांनी ती लगेच मार्क करून डिपार्टमेंटकडे पाठवली.*

***श्री. बी. टी. देशमुख** : ५ ऑगस्टला सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्याचे डिबेट आपण पाहिले आहे का? जर आपण डिबेट वाचले नसेल तर आजचे आपले इथे येणे निरर्थक आहे.*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : **कमिटीच्या किंवा सदस्यांच्या भावना माझ्या निदर्शनास आल्या आहेत.***

***श्री. बी. टी. देशमुख** : **आपण इथे भावनेचा विचार करण्यासाठी बसलो नाही.** ज्यावेळी सभागृहामध्ये एखाद्या विषयावर चर्चा होते तेव्हा विभागाचे अधिकारी तेथे बसलेले असतात. या चर्चेच्या वेळी माननीय राज्यमंत्र्यांनी स्पष्ट सांगितले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी, शासनाने याला तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. याची आपल्याला जाणीव आहे का?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : **माननीय मुख्यमंत्र्यांनी याला मान्यता दिली आहे असे काही रेकॉर्डवरून दिसत नाही.***

***श्री. बी. टी. देशमुख** : सभागृहामध्ये झालेले डिबेट हे हायेस्ट रेकॉर्ड आहे.*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : माननीय मुख्यमंत्र्यांनी याला मान्यता दिल्याचे रेकॉर्डवर दिसत नाही. **मात्र विधानपरिषदेमध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की आम्ही हे काम लवकरात लवकर सुरू करू** तसेच माननीय मुख्यमंत्र्याकडे जाऊन याला ॲप्रुव्हल मिळवू.*

***श्री. बी. टी. देशमुख** : **सभागृहामध्ये जे शब्द वापरले आहेत ते बदलण्यासाठी आपण येथे बसलो नाही.** मी आपल्याला पुन्हा प्रश्न विचारतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी, शासनाने या योजनेला तत्वतः मान्यता दिली असल्याचे माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये सांगितले याची आपल्याला जाणीव आहे का?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : **माननीय मुख्यमंत्र्यांनी, शासनाने याला तत्त्वतः मान्यता दिल्याचे आमच्या रेकॉर्डवर नाही.** आता तसे जर आश्वासन दिले असेल तर ते आपल्याला इन राईटींग फाईलवर घ्यावे लागेल. पण आता हे प्रपोजल फायनान्स डिपार्टमेंटकडे पाठविले आहे. मला सांगायला आनंद वाटतो की ते डिपार्टमेंट या विषयाच्याबाबतीत सिंपथेटिकली विचार करण्यास तयार आहे. तेव्हा योजना राबविण्यासाठी ज्या पॉझिटीव्ह ॲक्शन घ्यायला पाहिजेत त्या घेतल्या जात आहेत पण जोपर्यंत याला ॲडमिनिस्ट्रेटीव्ह*

*ॲप्रुव्हल मिळत नाही तोपर्यंत कामाला सुरुवात करता येणार नाही.*

***श्री. चव्हाण** : सिंपथेटीक म्हणजे काय?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : पब्लिक वर्क्स मॅन्युअलप्रमाणे जोपर्यंत फंडसची स्थिती टाय अप होत नाही तोपर्यंत प्रशासकीय मान्यता देता येत नाही. तेव्हा या बाबतीत ते फेवरेबली विचार करण्यास तयार आहेत." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ३२९-३३१)*

## सचिवांनी दिलेली मोघम व उडवाउडवीची उत्तरे

**७१.** सभागृहामध्ये नगरविकास मंत्र्यांनी दिलेल्या निश्चित आश्वासनाचा शब्दशः मजकूर नोटीस सोबत पाठवून साक्षीला बोलाविण्यात आलेले नगरविकास विभागाचे सचिव "मला सांगण्यात आले आहे" "मंत्रिमहोदय सांगतात तेव्हा ते खरे असले पाहिजे" अशी उडवा उडवीची व मोघम उत्तरे देत होते. त्यामुळे साक्षीच्या वेळी चांगलाच तणाव वाढला. शेवटी "आम्हाला हे आश्वासन पूर्ण करावयाचे आहे. त्यासाठी थोडा वेळ जावा लागेल. आम्ही जास्तीत जास्त लौकर ते करण्याचा प्रयत्न करू" अशी भूमिका सचिवांनी घेतली ती पुढील शब्दात :

*"**श्री. बी. टी. देशमुख** : ज्या अर्धा तास चर्चेवर हे आश्वासन देण्यात आलेले आहे तिच्या कंटेन्टशी आपण अवगत आहात काय?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : मला सांगण्यात आले आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : तसे असेल तर मी आपल्याला वाचून दाखवितो. "प्रोसिजर म्हणून ज्या गोष्टी आहेत त्या पूर्ण व्हावयाच्या आहेत. तातडीने करण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी, शासनाने तत्वतः मान्य केले आहे." याची आपल्याला जाणीव आहे काय?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : सर, मला सांगण्यात आले आहे.*

***Shri. B. T. Deshmukh :** You are appearing before the Committee, and you are saying that you are told.*

***Shri. Rao :** Sir, I am giving double emphasis.*

***Shri. Chavan :** Wherever you find difficult to express in marathi, you can express yourself in Englgh.*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : मंत्रिमहोदय, सांगतात तेव्हा ते खरे असले पाहिजे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : सभागृहामध्ये मंत्रिमहोदय जे सांगतात ते खरे असले पाहिजे असे आपण म्हणणे बरोबर होणार नाही.*

***समिती प्रमुख** : इंग्रजीमध्ये आपण आपले हे म्हणणे कशा प्रकारे मांडाल?*

***Shri. Rao :** It must be true. वित्तमंत्र्यांच्या पातळीवर यासाठी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अप्रुव्हल मिळणार असेल तर त्याकरिता मुख्यमंत्र्यांपर्यंत जाण्याची गरज नसते. फंडच्या टाय-अपमध्ये काही प्रॉब्लेम झाला तर मुख्यमंत्र्यांपर्यंत जावे लागते. आम्हाला हे आश्वासन पूर्ण करावयाचे आहे. त्यासाठी थोडा वेळ जावा लागेल. आम्ही जास्तीत जास्त लौकर ते करण्याचा प्रयत्न करू." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ३३४)*

## नगरविकास सचिवांचा पारा खूपच खाली उतरला

**७२.** पुढे तर नगरविकास विभागाच्या सचिवांचा पारा खूपच खाली उतरला. "आमच्या रेकॉर्डवर काहीच नाही" ची भाषा सोडून नगरविकास सचिवांनी "शासनाच्या कमिटमेंटची आम्हाला जाणीव आहे. त्या विभागांना याबाबत कल्पना आहे" अशी भाषा सुरू केली, ती पुढील शब्दात :

*"**समिती प्रमुख** : १२ तारीख किंवा त्याच्या आतच हे काम सुरू करतो असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. हे काम मुख्यमंत्र्यांना व शासनाला तत्वतः मंजूर आहे, असेही त्यांनी सांगितले आहे. याचा अर्थ शासनाच्या संबंधित विभागांची याला मान्यता आहे असा होतो. याचा आधार घेऊन आपण तातडीने मंजुरी घेतली पाहिजे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : याला मुख्यमंत्र्यांची व शासनाची तत्वतः मान्यता आहे हे आपण नियोजन आणि वित्त विभागांच्या लक्षात आणून दिले आहे का?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : शासनाच्या कमिटमेंटची आम्हाला जाणीव आहे. त्या विभागांना याबाबत कल्पना आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : त्यांना याची कल्पना असतांना सुद्धा याला मंजुरी देण्यात आलेली नाही काय ?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : २१ ऑगस्ट रोजी वित्तमंत्री महोदयांकडे यासंबंधीचे कागदपत्र पाठविले होते. ते १/१० रोजी नियोजन विभागाकडून गेले व ३/१० रोजी वित्त विभागाकडे पोहोचले. ही मिटिंग झाल्याबरोबर मी वित्त विभागामध्ये जाऊन लौकर हे प्रकरण पूर्ण करून घेण्याचा प्रयत्न करणार आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : दसऱ्याला किंवा त्याच्या अगोदर सुद्धा या कामाला सुरुवात करू असे जे उत्तर मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये दिले आहे, त्या आश्वासनाची पूर्तता शासन करणार आहे काय? खात्याचे सचिव या नात्याने आपण या आश्वासनाची पूर्तता करणार काय व करणार असला तर त्यासाठी काय योजना आपण आखलेली आहे?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता अद्याप न मिळाल्यामुळे १२ तारखेपर्यंत कामाला सुरुवात करता येईल असे म्हणणे अवघड होईल." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ३३४-३३५)*

## दोन जलकुंभ बांधून आश्वासनाची थातुरमातुर पूर्तता करण्याचा प्रस्ताव समोर आला

**७३.** छाननीसाठी घेतलेल्या आश्वासनाची एक आठवड्यापूर्वी नोटीस देऊनसुद्धा सचिवांनी समितीला पुन्हा पुन्हा **"मा. मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्याचे रेकॉर्डवरून दिसत नाही."** असे सांगितले. तथापि समितीसमोर झालेल्या सचिवांच्या या साक्षीमुळे समितीला एक नवीन बाब समजून आली. ५५ कोटी रुपयाच्या योजनेचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव बाजूला ठेवून एक कोटी रुपये किमतीचे दोन जलकुंभ उभे करण्याचा निर्णय शासनाच्या पातळीवर जवळ जवळ घेण्यात आला होता. याची माहिती देणारी प्रश्नोत्तरे पुढील प्रमाणे झाली :

*"**श्री. बी. व्ही. रोटकर** (सदस्य सचिव, म. पा. पु. ज. नि. मंडळ) : अमरावती शहराचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेक प्रयत्न होत आहेत. शहरातील ट्युबवेल्स १५-१६ तास चालविण्यात येतात व रात्रीच्या वेळी लोक झोपलेले असतात त्या कालावधीमध्ये त्या बंद ठेवाव्या लागतात. या पार्श्वभूमीवर तेथे रिझर्व्हायर्स बांधण्याचा निर्णय झाला आहे. रिझर्व्हायर्स बांधले तर अमरावती शहराच्या पर्मनंट वॉटर सप्लाय स्कीममध्ये ते फीट बसतील. पाण्याची मागणी नसलेल्या काळात ट्युबवेल्स चालवून ते पाणी रिझर्व्हायर्समध्ये भरता येईल व त्यामुळे गावाची पाण्याची गरज भागू शकेल. मागणी व पुरवठा यांच्यामधील बॅलन्स साधण्यासाठी रिझर्व्हायर्सची आवश्यकता भासते.*

***Shri. Chavan** : Is it a part of the scheme?*

***Shri. Rotkar** : Yes! it is a part of the permanent Scheme. They are not permanent. They can be used.*

***श्री. बी. टी. देशमुख** : रिझर्व्हायर्सच्या योजनेला प्रशासकीय मान्यता मिळाली नसेल तरी तिचे काम आपण सुरू करू शकता काय?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : ती योजना एक कोटी रुपयांची असल्यामुळे पाच-दहा दिवसात तिला प्रशासकीय मान्यता मिळण्याची शक्यता आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : ५५ कोटी रुपयांच्या योजनेमध्ये ही योजना घेण्यात येत आहे की स्वतंत्ररित्या हाती घेण्यात येत आहे?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : ५५ कोटी रुपयांच्या योजनेचे फंडस् टायअप झालेले नसल्यामुळे तिचा भाग म्हणून ही योजना दाखविली तर तिला प्रशासकीय मान्यता मिळणे कठीण आहे. म्हणून ही १ कोटी रुपयांची स्वतंत्र योजना म्हणून दाखविण्याचा विचार आहे.*

***श्री. बी. टी. देशमुख** : ५५ कोटी रुपयांच्या योजनेला प्रशासकीय मान्यता न देता ती बाजूला ठेवून या एक कोटी रुपयांच्या योजनेला मान्यता देण्याचा आपला विचार आहे काय?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : तसे नाही.*

***श्री. बी. टी. देशमुख** : १ कोटी रुपयांच्या योजनेचे काम हाती घेतल्यामुळे मूळ योजनेच्या कामाची वाटचाल होते असे शासनाचे मत आहे काय?*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : तसे मी म्हटले नाही.*

***श्री. व. छो. चव्हाण** : अध्यक्ष महाराज, १ कोटी रुपयांच्या योजनेला प्रशासकीय मान्यता लौकर मिळेल व त्यामुळे तिचे काम लौकर सुरू होऊ*

*शकेल. ती योजना हा ५५ कोटी रुपयांच्या योजनेचाच एक भाग असल्यामुळे आश्वासनपूर्ती करण्याचाच तो एक भाग आहे असे माझे मत आहे.*

***श्री. ए. एस. राव** (सचिव नगरविकास विभाग) : १ कोटी रुपयांची योजना ही पुढे ५५ कोटी रुपयांची योजना जी होणार आहे त्याचाच भाग होणार आहे. ५५ कोटी रुपयांच्या योजनेला प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे ती ५५ कोटी रुपयांच्या योजनेचा एक भाग आहे असे आम्हाला म्हणता येणार नाही.*

***श्री. बी. टी. देशमुख** : ५५ कोटी रुपयांच्या योजनेला प्रशासकीय मान्यता न घेता स्वतंत्रपणे ५०-६० लाख रुपयांची टाकी बांधण्यात येईल असे सांगण्यात येत आहे. ५५ कोटीच्या योजनेचा तो नंतर एक भाग होईल असे सांगण्यात येत आहे. तातडीच्या स्वरूपामध्ये अशा आणखीही योजना विभागाकडून घेण्यात आल्या होत्या. अनेक ठिकाणी पाईप लाईन टाकण्यात आली आहे.*

***Shri. Rotkar** : Sir, they will not be a part of the permanent scheme. For example, we have put up pumps and pipes.*

***श्री. बी. टी. देशमुख** : पाईप लाईन टाकलेली वाया जाणार की नाही?*

***Shri. Rotkar** : Sir, as material we may use it. The reservoirs as installed can be used. We are taking steps towards the fulfilment of the assurance.*

***श्री. ए. एस. राव** (सचिव, न.वि. विभाग) : ईन ईफेक्ट होणार आहे. रेकॉर्डवर तसे म्हणता येणार नाही." (आश्वासन समिती (वि.प.) १९८६ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ३३५-३३६)*

**************************************************

# ८

# दहा टक्के लोकवर्गणीचा नियम १३ दिवसात शासनाने बदलला

**************************************************

## सचिवांचा पहिला प्रकार

**७४.** हे खरे की सभागृहामध्ये येणारा मंत्री बहुधा एक निश्चित भूमिका घेऊन सभागृहात आलेला असतो. शासनाचे स्थायी निर्णय, शासनाचे धोरणात्मक ठराव, मंत्रिमंडळाचे निर्णय, मुख्यमंत्र्यांची मिळालेली किंवा न मिळालेली मान्यता, शासकीय कामकाजाचे नियम यांनी त्याची भूमिका बांधलेली असते. सभागृहात उत्तर देणाऱ्या प्रत्येक मंत्र्याजवळ त्याने प्रत्येक प्रश्नावर घ्यावयाची भूमिका विशद करणारी टिप्पणी दिलेली असते. ही टिप्पणी त्या विभागाच्या सचिवाने तयार केलेली असते. बहूधा मंत्री या बांधून दिलेल्या भूमिकेच्या मर्यादेतच उत्तरे देतात पण अनेकदा सभागृहात होणाऱ्या तर्कशुद्ध युक्तिवादाच्या आधारावर मंत्री या भूमिकेच्या पुढे जाऊन सुद्धा उत्तरे देतो, आश्वासने देतो. एखाद्यावेळी आपण आपल्या हिंमतीवर मंत्रिमंडळाची किंवा मा. मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळवू शकू अशी खात्री त्या मंत्र्याला असते किंवा अनेकदा औपचारीकरित्या फाईलवर नसले तरी मुख्यमंत्र्यांशी झालेल्या अनौपचारिक बोलण्याच्या आधारावर मंत्री "ठरीव भूमिके"च्या पुढची आश्वासने देतात. **अशा वेळी ठरीव भूमिकेत नसले तरी आता आपल्या मंत्र्यांने आश्वासन दिले आहे, तेव्हा त्याला अनुकूल असा निर्णय घेण्याचा आटोकाट प्रयत्न काही सचिव करतात नव्हे ते त्यांचे कर्तव्यच असते.** अशा सचिवांचे एक उत्तम उदाहरण म्हणून श्री. द. म. सुकथनकर यांचे मला सांगता येईल. महसूल सचिव या नात्याने अमरावती शहराच्या वळण रस्त्याबाबत त्यांनी घेतलेली भूमिका ही त्या रस्त्याविषयीच्या स्वतंत्र लेखमालेमध्ये वर्णन करण्याचा विषय असल्यामुळे येथे मी नमूद करीत नाही.

## सचिवांचा दुसरा प्रकार

**७५. दुसरा एक सचिवांचा वर्ग म्हणजे त्यांच्या मनामध्ये ठाम अशी भावना असते की, "निर्णय आमच्याशिवाय मंत्र्यांने सांगितलाच कसा?"** या प्रकारच्या सचिवांचा सुंदर प्रातिनिधिक नमुना म्हणून सेवानिवृत्त मुख्यसचिव श्री. श्रीनिवासन यांचे उदाहरण सांगता येईल. अप्पर वर्धा धरणाचे काम तलांक ३२५ वर बंद पडले होते. ३० जुलै १९९१ रोजी सभागृहात चर्चा झाल्यानंतर "अधिवेशन संपण्यापूर्वी काम सुरू करण्याचे आदेश दिले जातील" असे मंत्री महोदयांनी आम्हाला आश्वासन दिले. त्याप्रमाणे आदेश निघाले. तर श्रीनिवासन साहेबांनी सेवानिवृत्त होण्याच्या दोन तास अगोदर हे काम बंद पाडणारे आदेश तर काढलेच, पण सोबतच "**पुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये" असा फतवाही काढला.** मी २ एप्रिल १९९२ रोजी ही गोष्ट सभागृहात मांडली तेव्हा सभागृह अवाक झाले. खुद्द मा. सभापतींनी "मुख्य सचिव असा आदेश देऊ शकतात काय?" असा प्रश्न पाटबंधारे मंत्र्यांना विचारला आणि शेवटी सभागृहात "**मी आता असा आदेश देतो की, सचिवांच्या पातळीवर अशा तऱ्हेने विधिमंडळाबाबत निवेदन करणे योग्य नाही**" असा आदेश दिला.

## सचिवांचे वेड घेऊन पेडगावला जाणे

**७६.** आपणच काय ते सर्वेसर्वा या अहंकारातून "मंत्री आश्वासन देऊन बसले त्याची पूर्तता कशी करावी हेच आम्हाला कळत नाही" असे किंवा यासारखे उद्‌गार काढणारे सचिव या दुसऱ्या वर्गात मोडतात. **अशा अहंकारी सचिवांचा अहंकार मोडून काढण्याचे काम अत्यंत प्रभावीपणे विधानमंडळाच्या समित्या करू शकतात.** नगरविकास विभागाचे पूर्वीचे सचिव श्री. डी. के. जैन यांच्यावर सुद्धा या गुणात ताण करणारे श्री. ए. एस. राव या नावाचे नवे नगरविकास सचिव ऑगस्ट १९८६ च्या अधिवेशनानंतर आश्वासन समितीसमोर ८ ऑक्टोबर १९८६ रोजी साक्षीसाठी आले. समितीप्रमुखांनी त्यांना "**हे काम १२ ऑक्टोबरपर्यंत सुरू करू असे माननीय मंत्री महोदयांनी कशाच्या आधारावर आश्वासन दिले? नाहीतर एकदा मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर त्याची पूर्ती झाली पाहिजे.**" असे विचारले तर त्यावर खूपच आढ्यतेने सचिवांनी "पूर्वी काय झाले यावर चर्चा न करता आता काम सुरू करण्याच्या दृष्टीने काय करता येईल आणि काय करणे शक्य आहे याचा आम्ही विचार करीत आहोत." असे उत्तर दिले. "परंतु प्रोसिजर म्हणून ज्या गोष्टी आहेत त्या पूर्ण व्हावयाच्या आहेत तातडीने करण्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी व शासनाने मान्य केले आहे." असे स्पष्ट आश्वासन मा. राज्यमंत्र्यांनी सभागृहात दिले होते. साक्षीला येण्यापूर्वी याची नोटीस सचिवांना देण्यात आली होती, तरीही जेव्हा त्यांना "५ ऑगस्टला सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्याचे डिबेट आपण पाहिले आहे का? जर आपण डिबेट वाचले नसेल तर आजचे आपले इथे येणे निरर्थक आहे." असा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा "**कमिटीच्या किंवा सदस्यांच्या भावना माझ्या निदर्शनास आल्या आहेत.**" असे मोठे घमेंडखोर उत्तर सचिवांनी दिले. तेव्हा त्यांना "आपण इथे भावनेचा विचार करण्यासाठी बसलो नाही." असे सुनावून जेव्हा "या चर्चेच्या वेळी माननीय राज्यमंत्र्यांनी स्पष्ट सांगितले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी, शासनाने याला तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. याची आपल्याला जाणीव आहे का?" असे विचारले तेव्हा निगरगट्ट पणे सचिवांनी "**माननीय मुख्यमंत्र्यांनी याला मान्यता दिली आहे असे काही रेकॉर्डवरून दिसत नाही.**" असे सांगितले तेंव्हा त्यांना "सभागृहामध्ये झालेले डिबेट हे हायेस्ट रेकॉर्ड आहे." असे सांगावे लागले.

## समितीने सचिवांना चांगलेच "दुरुस्त" केले

**७७.** सचिवासारख्या श्रेष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांनी काटेकोरपणाला तिलांजली देऊन समितीसमोर जेव्हा "माननीय मुख्यमंत्र्यांनी याला मान्यता दिल्याचे रेकॉर्डवर दिसत नाही. मात्र विधानपरिषदेमध्ये माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की आम्ही हे काम लवकरात लवकर सुरू करू तसेच माननीय मुख्यमंत्र्याकडे जाऊन याला ॲप्रुव्हल मिळवू." असे सांगितले तेव्हा समिती सदस्याकडून "**सभागृहामध्ये जे शब्द वापरले आहेत ते बदलण्यासाठी आपण येथे बसलो नाही.** मी आपल्याला पुन्हा प्रश्न विचारतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी, शासनाने या योजनेला तत्वतः मान्यता दिली असल्याचे माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये सांगितले याची आपल्याला जाणीव आहे का?" अशी निर्भर्त्सना ऐकावी लागली. **जवळ जवळ एक ते दीड तास चाललेल्या या साक्षीचे विश्लेषण केले तर असे दिसून येईल की, आश्वासन समिती समोर झालेल्या या साक्षीमुळे त्यांचे काय कर्तव्य आहे यांची जाणीव त्यांना करून देण्यात समितीला बरेच यश आले.** त्यातूनच पुढे "आता हे प्रपोजल फायनान्स डिपार्टमेंटकडे पाठविले आहे. मला सांगायला आनंद वाटतो की ते डिपार्टमेंट या विषयाच्याबाबतीत सिंपथेटिकली विचार करण्यास तयार आहे." असे सचिवांना समितीसमोर सांगावे लागले. **साक्षीनंतर ४ दिवसांनी १४ ऑक्टोबर १९८६ ला दोन जलकुंभ बांधण्याचा १ कोटी रूपयांचा शासननिर्णय व १७ दिवसांनी २७ ऑक्टोबर १९८६ ला ५५ कोटीचा शासननिर्णय शासनाने निर्गमित केला हा समितीने सचिवांना बरेच "दुरूस्त" केल्याचा पुरावा म्हणून मानल्यास त्यात कोणतीही अतिशयोक्ती होणार नाही.**

## "दहा टक्के लोकवर्गणी पाणीपुरवठा मंडळ भरेल" पहिला शासननिर्णय निर्गमित

**७८.** दसऱ्यापर्यंत ५५ कोटीच्या योजनेला ना प्रशासकीय मान्यता मिळाली, ना या योजनेच्या कामाला सुरुवात झाली. १४ ऑक्टोबर १९८६ या तारखेला "**अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना दोन जलकुंभ बांधणे प्रशासकीय मान्यता व शासकीय अनुदानास मंजुरी**" या मथळ्याचा शासन निर्णय (पापुयो २०८६/सीआर २९३/८६/नवि/१६) प्रसृत करण्यात आला. त्याच्या पहिल्याच परिच्छेदात

असे म्हटले आहे की:-

"अमरावती महानगरपालिका क्षेत्रासाठी वाढीव पाणी पुरवठा व जलनिःस्सारणाची एकत्रित योजना शासनाच्या विचाराधीन आहे. गेल्या तीन वर्षामध्ये अपुरा पाऊस पडल्या कारणाने या शहराचा पाणी पुरवठा विंधन विहिरीवर अवलंबून आहे. या विहिरीमधून उपलब्ध होणारे पाणी जास्तीत जास्त नागरिकांना समप्रमाणात उपलब्ध व्हावे या दृष्टीने जमिनीवरील दोन जलकुंभ (ई.एस.आर.) बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे."

१० टक्के लोकवर्गणी कोणी भरावी? या विषयी शंका किंवा वाद या क्षणापर्यंत निर्माण झालेला नव्हता कारण या १४ ऑक्टोबर १९८६ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये असे स्पष्टपणे म्हटले होते की,

**"वरील योजना ही महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःस्सारण मंडळाच्या सध्याच्या मालकीची असल्याकारणाने लोक वर्गणीची रक्कम मंडळाने सर्व प्रथम उभारावयाची आहे."**

### "दहा टक्के लोकवर्गणी महानगर पालिकेने भरावी" १३ दिवसाच्या फरकाने दुसरा शासन निर्णय निर्गमित

**७९.** १४ ऑक्टोबर १९८६ चा शासन निर्णय प्रसृत झाल्यानंतर १३ दिवसांनी ज्यावरून खरे महाभारत सुरू झाले तो **"उर्ध्व वर्धा उद्भव धरून ५५ कोटीच्या अमरावती शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेला मान्यता देणारा"** शासन निर्णय २७ ऑक्टोबर १९८६ रोजी प्रसृत करण्यात आला. २७ ऑक्टोबर १९८६ च्या या आदेशामध्ये **"१४ ऑक्टोबर १९८६ चा आदेश रद्द करण्यात येत आहे"** असे स्पष्टपणे म्हटले होते. त्याशिवाय या आदेशाच्या परिच्छेद ४ मध्ये ज्या अनेक अटी घालण्यात आल्या त्यातील एक म्हणजे "अमरावती महानगरपालिकेने लोकवर्गणीची १० टक्के रक्कम भरली पाहिजे" आणि दुसरी म्हणजे "अमरावती महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीतील पाणी पुरवठा वितरण व्यवस्था मंडळाकडून स्वतःकडे घ्यावी व तिची देखभाल करावी. महाराष्ट्र राज्य जलनिस्सारण मंडळ महानगरपालिकेला फक्त ठोक दराने पाणी पुरवठा करेल व बाकी जबाबदारी महानगरपालिकेची राहील."

### ऑक्टोबर ८६ ते ऑक्टोबर १९८७ : दगदगीचे एक वर्ष

**८०.** २७ ऑक्टोबर १९८६ ते २६ ऑक्टोबर १९८७ हे एक वर्ष अमरावती शहरातील लोक व लोकप्रतिनिधी यांना वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात मोठेच दगदगीचे वर्ष ठरले. नगरपालिका व महानगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजनांच्या बांधणीचा आर्थिक आकृतीबंध नमूद असलेल्या ६ मे १९८३ च्या स्थायी आदेशामध्ये **"लोकवर्गणीची १० टक्के रक्कम योजना पाणी पुरवठा मंडळाची असेल तर पाणी पुरवठा मंडळ भरेल"**. अशी स्पष्ट तरतूद होती. तसे मंत्र्यांनी अनेकदा सभागृहात व सचिवांनी आश्वासन समितीसमोर कबूल केले होते. १०-१५ दिवसापूर्वी दोन जलकुंभ बांधण्याच्या एक कोटी रुपये किंमतीच्या कामाला मान्यता देणारा प्रशासकीय मान्यतेचा दिनांक १४ ऑक्टोबर १९८६ रोजीचा जो शासननिर्णय निर्गमित करण्यात आला होता त्यामध्ये सुद्धा **"वरील योजना ही महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःस्सारण मंडळाच्या सध्याच्या मालकीची असल्याकारणाने लोक वर्गणीची रक्कम मंडळाने सर्व प्रथम उभारावयाची आहे."** असा स्पष्ट उल्लेख होता. असे असतांना एकाएकी २७ ऑक्टोबर १९८६ च्या रुपये ५५ कोटीच्या शासन निर्णयामध्ये **"अमरावती महापालिकेने लोकवर्गणीची दहा टक्के रक्कम भरली पाहिजे."** असे बंधन टाकण्यात आले. संपूर्णपणे बेकायदेशीररित्या टाकण्यात आलेल्या या बंधनामुळे आम्ही सारेच लोकप्रतिनिधी हवक्रून गेलो. जलसिंचन व उद्योगाचा फार मोठा अनुशेष असल्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न जेमतेम होते. **सेवकांचे पगार सुद्धा करता येणार नाही अशा अवस्थेत असलेली ही महानगरपालिका ५ ते ८ कोटी रुपयाचा भरणा कोठून करणार? आणि परिणामी ही पाणी पुरवठ्याची योजना कागदावर धूळ खात पडणार व प्रत्यक्षात काहीही होणार नाही हे स्पष्ट दिसू लागले.**

### जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीपुढे प्रस्ताव मांडण्यात आला

**८१.** २७ ऑक्टोबर १९८६ च्या शासन निर्णयाने शहरावर लोकवर्गणी बसविण्याचा हा जो निर्णय घेतला त्यावर अत्यंत संतप्त प्रतिक्रिया अमरावती शहरामध्ये उमटली. अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीत या लोकभावनांचे पडसाद उमटले नसते तरच आश्चर्य झाले असते. प्रा. बी. टी. देशमुख (सूचक) व डॉ. देविसिंह शेखावत (अनुमोदक) या दोन विधानमंडळ सदस्यांनी दिनांक १२ डिसेंबर १९८६ रोजी पुढील प्रस्तावाची नोटीस दिली :-

"अप्पर वर्धा धरणाचा उद्भव योजून अमरावती शहरासाठी पाणी पुरवठा करण्याच्या ५५ कोटी रुपयाच्या योजनेस महाराष्ट्र शासनाने २७ ऑक्टोबर, १९८६ रोजी एक शासकीय आदेश काढून प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. याबद्दल ही सभा महाराष्ट्र शासनाचे आभार मानीत आहे. तथापि सदरहू शासन आदेशाच्या परिच्छेद ४ मध्ये ही योजना महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याची व लोकवर्गणीची १० टक्के रक्कम महापालिकेने भरण्याची जी अट टाकण्यात आली आहे ती अट ताबडतोबीने या शासकीय आदेशातून वगळण्यात यावी अशी विनंती ही सभा महाराष्ट्र शासनास करीत आहे. १५ दिवसापूर्वी काढलेल्या पाणी पुरवठ्याच्या संदर्भातील दिनांक १४ ऑक्टोबर, १९८६ च्या एका वेगळ्या प्रशासकीय आदेशामध्ये "वरील योजना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाच्या मालकीची असल्याकारणाने लोकवर्गणीची रक्कम मंडळाने सर्वप्रथम उभारावी" अशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख असतांना २७ ऑक्टोबर, १९८६ रोजी काढलेल्या आदेशामध्ये या योजनेचे महापालिकेकडे हस्तांतरण करण्याविषयीच्या अटी घुसडणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी विनंती ही सभा करीत आहे."

### आम्ही ठराव मांडू नये म्हणून शासनातर्फे दबाव

**८२.** आम्ही उक्त प्रस्ताव बैठकीत मांडू नये यासाठी त्या मधल्या १०-१२ दिवसात सत्तारूढ पक्षातून बरेच प्रयत्न झालेत. डॉ. शेखावत हे स्वतः सत्तारूढ पक्षाचे सदस्य असल्यामुळे अशा ठरावात त्यांनी सहभागी होऊ नये असा सल्ला त्यांना देण्यात आला. "बी. टी. देशमुख हे त्यांचा ठराव बहुधा मांडणार नाहीत आणि त्यांनी मांडला तरी तुम्ही त्याला अनुमोदन करू नये." अशी उच्चस्तरीय गळ त्यांना घालण्यात आली, तेव्हा "बी. टी. देशमुख हे ठरावाचे सूचक आहेत. मी अनुमोदक म्हणून विचारपूर्वक सही केलेली आहे. बी. टीं. चा मतदार संघ आठ जिल्ह्यांचा आहे. माझा मतदार संघ या एका शहराचा आहे. बी. टीं. नी ठराव मांडला नाही किंवा मागे घेतला तर प्रश्न तेथे संपुष्टात येतो. पण त्यांनी ठराव मांडला तर मी त्या ठरावाला निश्चितपणे अनुमोदन देणारे भाषण करीन." असा उलट निरोप डॉ. शेखावतांनी तिकडे उच्चस्तरावर पाठविला आणि सोबतच "२३ तारखेच्या बैठकीत तुम्ही तुमचा ठराव मागे घेणार आहात अशी माझी बातमी आहे" असा निरोप त्यांनी इकडे मलाही दिला.

### पालकमंत्र्यांची भूमिका

**८३.** आम्ही उपरोक्त प्रस्तावाची नोटीस १२ डिसेंबर १९८६ रोजी दिली होती. जिल्हा नियोजन व विकास परिषदेची बैठक २३ डिसेंबर १९८६ रोजी होणार होती. पालकमंत्री प्रा. राम मेघे हे जिल्हा नियोजन व विकास परिषदेचे अध्यक्ष. त्यांना जिल्हाधिकारी यांनी आलेल्या ठरावाची कल्पना दिली व ठराव प्रसृत करायची परवानगी मागितली. प्रा. राम मेघे यांनी "सध्याच थांबा, मी बी.टी. शी बोलतो" असे त्यांना सांगितले. **सभेच्या दिवशी सकाळी पालकमंत्र्यांच्या निवासस्थानीच आमचे बोलणे झाले. पालकमंत्र्यांचे म्हणणे असे की** "५०-६० किलोमीटर वरून पाणी आणण्याच्या एवढ्या महाग योजनांना मुख्यमंत्री अनुकूल नसतांना आपण पालकमंत्री या नात्याने मेहनत करून प्रशासकीय मान्यतेचा हा शासन निर्णय निर्गमित करवून घेतला आहे. त्याबद्दल धन्यवाद देण्याचे सोडून तुम्ही १० टक्के लोकवर्गणीचा हा वाद कशासाठी उपस्थित करीत आहात? शासन काय? पाणी पुरवठा मंडळ काय? किंवा महापालिका काय? या सार्वजनिक संस्था आहेत त्यापैकी कोणी १० टक्के भरायचे याचा वाद या क्षणी तुम्ही उपस्थित केल्यास योजनेचे काम सुरू होण्याला विनाकारण विलंब लागेल."

### आमची भूमिका

**८४.** जिल्हा नियोजन व विकास परिषदेची एकंदर रचना अशी होती की त्याठिकाणी नामनियुक्त सदस्यांमुळे सत्तारूढ पक्षाचे बहुमत असायचे. त्यावेळी ते निश्चितच होते. आपला ठराव मंजूर होणार नाही पण निदान आपल्याला आपले मत मांडता येईल. मताची नोंद करता येईल. एवढ्या माफक अपेक्षेने तो ठराव आम्ही मांडला होता. **ठरावाच्या बाजूच्या मुद्यांचा माझा अभ्यास व तयारी नीट झाली होती. सर्व कागदपत्रे माझ्या सोबत होती. मी पूर्ण शक्तीनिशी या अनौपचारिक बोलण्यात माझी बाजू पालकमंत्र्यांसमोर मांडली.** मी म्हणालो "मेघेसाहेब! शासन निर्णय निर्गमित केल्याबद्दल आमच्या ठरावाच्या पहिल्याच वाक्यात आम्ही शासनाचे आभार मानले आहेत **हे एक. दुसरे असे की** महापालिका, शासन व पाणीपुरवठा मंडळ या तीनही सार्वजनिक संस्था असल्यातरी ६ मे १९८३ च्या स्थायी शासननिर्णयाप्रमाणे पाणीपुरवठा मंडळाने ही दहा टक्के रक्कम भरावी असे असतांना महापालिकेने ती कां म्हणून भरावी? **तिसरे असे की** १९८५-८६ चा या महापालिकेचा खर्च ८ कोटी ६८ लाख रुपये आहे व उत्पन्न मात्र ७ कोटी ७५ लाख रुपये आहे, घाट्यात चाललेल्या या व्यवहारातून ही महापालिका दहा टक्के लोकवर्गणी कशी भरेल? व नियमात नसतांना तिने कां भरावी? **चौथे असे की** आता नगरविकास खात्याने १४ ऑक्टोबर १९८६ चा दोन जलकुंभाचा १ कोटी रुपये किमतीचा शासन निर्णय काढला, त्यामध्ये "दहा टक्के लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळाने प्रथम उभी करावी". असे नमूद असतांना पुढच्या

१५ दिवसात या गावच्या लोकांनी असा काय गुन्हा केला की २७ ऑक्टोबर १९८६ च्या ५५ कोटीच्या शासननिर्णयामध्ये "दहा टक्के लोकवर्गणी महापालिकेने भरावी" असा बदल शासनाने केला? **पाचवे असे की** स्थायी शासन निर्णयाप्रमाणे दहा टक्के लोकवर्गणी पाणीपुरवठा मंडळ भरेल अशी आश्वासने अनेकदा नगरविकास मंत्र्यांनी सभागृहात व नगरविकास सचिवांनी आश्वासन समिती समोरच्या साक्षीत दिलेली आहेत. **सहावे असे की** एकदा ही गोष्ट पचून गेली तर सभागृहात या योजनेचा पाठपुरावा करण्याला पुढे काही अर्थच राहणार नाही. सभागृहात प्रश्न विचारला की "महानगरपालिकेने एक रुपया भरला नाही म्हणून आमचे नऊ रुपये आम्ही दिले नाही" असे शासनाचे ठोकळेबाज उत्तर तयार राहील व **त्यामुळे ही योजना पूर्ण होणारच नाही. झालीतर त्यास अप्पर वर्धाप्रमाणे अनेक वर्षे लागतील."**

**८५.** माझे मुद्दे मी सांगून संपविले. अनौपचारिक बोलणे आटोपून आम्हाला जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीसाठी निघायचे होते. बैठकीची वेळ होत आलेली. माझ्या इतर मुद्यांचा पालकमंत्र्यांच्या मनावर काय परिणाम झाला? झाला किंवा झाला नाही? ते मला सांगता येणार नाही पण ६ मे १९८३ चा स्थायी शासन निर्णय व १४ ऑक्टोबर १९८६ चा एक कोटीचा शासन निर्णय यामुळे त्यांच्या मनाला नक्कीच चटका लागला, असे मला वाटले. कारण माझे बोलणे आटोपल्याबरोबर ते मला म्हणाले "या दोनही शासननिर्णयाच्या प्रति तुमच्याजवळ आहेत का?" मी "होय" म्हणालो व त्यांना त्या प्रति दाखविल्या. १४ ऑक्टोबरच्या शासननिर्णयाचा तर आमच्या ठरावामध्ये स्पष्टपणे उल्लेखच होता. त्या प्रति त्यांनी काळजीपूर्वक पाहिल्या. "नगरविकास विभागाने शासननिर्णय निर्गमित करतांना ही काळजी घ्यायला पाहिजे होती." असे उद्गार काढत "**आणाहो यांचा ठराव काय आहे तो**" असे पालकमंत्र्यांनी आपल्या स्वीय सहाय्यकांना सांगितले. त्यांनी नस्ती तयारच ठेवली होती. आमच्या ठरावाचे वाचन झाले. वाचत असतांना "ठराव एकमताने मंजूर होणार असेल तर त्यातील एखादा खारट तुरट शब्द काढून टाकायला माझी तयारी आहे" असे मी पालकमंत्र्यांना सांगितले. त्यावर पालकमंत्री काही बोलले नाहीत. अनौपचारिक बोलणे संपले होते. "गाड्या लावा" झाले आणि गाड्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या दिशेने निघाल्या. जिल्हा नियोजन व विकास परिषदेची बैठक ठरलेल्या वेळी सुरू झाली.

### जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये ठराव मंजूर

**८६.** कामकाजाच्या क्रमामध्ये विषय येताच मी माझा ठराव मांडला व पालकमंत्र्यांशी झालेल्या अनौपचारिक बोलण्यात मांडलेले मुद्दे विस्ताराने मांडणारे भाषण केले. डॉ. देविसिंग शेखावत यांनी अनुमोदन देणारे भाषण केले. इतर थोडी साधक बाधक चर्चा झाली. "मला शेवटी सूचक म्हणून उत्तराचे भाषण करावयाचे आहे" असे मी अध्यक्षांना म्हणालो, तर अध्यक्षस्थानी असलेल्या पालकमंत्र्यांनी "तुमचा ठराव आम्ही एकमताने मंजूर करणार आहोत, तरी उत्तराचे भाषण करावयाचे आहे काय?" असे विचारले. "अध्यक्ष महाराज ठराव मंजूर होणार असेल तर मग कोणत्याही भाषणाची आवश्यकता नाही" असे मी म्हणालो. **चर्चेनंतर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**************************************************

## ९

## *नियमबाह्य वर्तनाची तक्रार केली तर शासनाने मूळ नियमच बदलला*

**************************************************

**८७.** पालकमंत्र्यांनी पक्षीय दृष्टिकोनातून या ठरावाकडे पहातो म्हटले असते तर ठराव नामंजूर झाला असता. आम्ही ५-६ लोकांनी ठरावाच्या बाजूने मते नोंदविली असती. "नगरविकास विभागाने दहा टक्के लोकवर्गणी बाबत चुकीची भूमिका घेतली आहे. त्या भूमिकेच्या विरोधात झालेल्या व होत असलेल्या कोणत्याही प्रयत्नाला किंवा चळवळीला विरोध करणे योग्य नाही. शक्य असेल ती मदत करण्यातच योजनेचे हित आहे." अशी पालकमंत्री प्रा. राम मेघे यांची मानसिकता बनलेली होती. त्यांच्या या मानसिकतेमुळेच ठराव जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये एकमताने मंजूर झाला असे मला त्यावेळी वाटले. **या प्रश्नाचा सभागृहामध्ये पुढे पाठपुरावा करण्यात एकमताने मंजूर झालेल्या या ठरावाचा खूपच फायदा झाला हे नमूद करणे आवश्यक वाटते.**

### नियमबाह्य वर्तनाची तक्रार केली तर शासनाने मूळ नियमच बदलला

**८८.** १९८३ च्या नगरपालिकांच्या पाणी पुरवठ्याचा आर्थिक आकृतिबंध सांगणाऱ्या शासन निर्णयामध्ये "लोकवर्गणीची १० टक्के रक्कम योजना नगरपालिकेची असेल तर नगरपालिकेने व योजना पाणी पुरवठा मंडळाची असेल तर पाणी पुरवठा मंडळाने भरावयाची असेल" हे नमूद असलेले धोरण बदलवून अमरावती या एका शहरापुरते "योजना पाणी पुरवठा मंडळाची असली तरीही लोकवर्गणीची १० टक्के रक्कम महानगरपालिकेने भरली पाहिजे." असा निर्णय शासनाने घेतला होता. एका गावला अपवाद कसे काय केल्या गेले? अशा प्रकारची विचारणा करणारा ठराव डिसेंबर महिन्यात अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेने केला, तेव्हा २३ जानेवारी १९८७ रोजी आणखी एक शासन निर्णय काढून ६ मे, १९८३ च्या आकृतिबंधाच्या स्थायी शासन निर्णयामध्ये बदल करण्यात आला. २३ जानेवारी १९८७ च्या या शासन निर्णयात असे म्हटले होते की, **"पाणी पुरवठा मंडळाची योजना असेल तर लोकवर्गणीची १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल अशी यापूर्वी तरतूद होती परंतु आता शासन आदेश देत आहे की, पाणी पुरवठा मंडळाची योजना असली तरीही लोकवर्गणीची १० टक्के रक्कम ही संबंधित नगरपालिकेला भरावी लागेल."**

### राज्यपालांच्या अभिभाषणात दहा टक्क्यांचा उल्लेख

**८९.** नियम काहीही असले तरी लोकवर्गणीची १० टक्के रक्कम नगरपालिकेकडून वसूल करावयाची असा शासनाचा पक्का निर्णय झालेला होता. त्यानंतरच्या काळात उपलब्ध झालेल्या कागदपत्रांची काळजीपूर्वक छाननी केली असता मुख्यमंत्री किंवा मंत्रिमंडळाच्या पातळीवरच हा निर्णय झाला होता असे स्पष्टपणे दिसून येते. या पार्श्वभूमीवर १९८७ च्या मार्च महिन्यातील विधानमंडळाचे अंदाजपत्रकी अधिवेशन सुरू झाले. **पहिल्याच दिवशी झालेल्या राज्यपालाच्या अभिभाषणात या निर्णयाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते.** दिनांक २४ मार्च १९८७ रोजी मा. राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणामधील परिच्छेद २५ मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख होता. :-

"१० टक्के लोकवर्गणी भरण्याच्या शर्तीअधीन या वर्षी अमरावती (रुपये ५५ कोटी), धुळे (रुपये ४० कोटी), अहमदनगर (रुपये २५ कोटी) आणि औरंगाबाद (रुपये १८ कोटी) या ठिकाणच्या मोठ्या योजनांना मंजुरी देण्यात आली आहे."

### २६ मार्च १९८७ ला विधानपरिषदेत चर्चा

**९०.** प्रा. बी. टी. देशमुख व श्री. पु. ब. सोमवंशी यांचा या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ८०३० हा गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ रोजी विधान परिषदेत चर्चेसाठी होता. त्यावर खूपच खडाजंगी चर्चा झाली. एखादा तर्काला न पटणारा निर्णय मुख्यमंत्र्यांच्या किंवा मंत्रिमंडळाच्या पातळीवर अनवधानाने किंवा जाणीवपूर्वक होऊन गेला असेल तर चर्चेला उत्तर देतांना खात्याच्या मंत्र्यांला व राज्यमंत्र्याला किती चमत्कारिक परिस्थितीला व फजितीला तोंड द्यावे लागते हे या प्रश्नावरील चर्चेत जून-जुलै-ऑगस्ट १९८६ च्या अधिवेशनात अनेकदा पहावयाला मिळाले. "प्रशासकीय मान्यता देणाऱ्या दि. २७ ऑक्टोबर १९८६ च्या आदेशामधून काही तरतुदी वगळून टाकाव्या अशी विनंती अमरावती जिल्हा नियोजन व विकास मंडळाने शासनास केली आहे हे खरे आहे काय," या प्रश्नाला नगरविकास मंत्र्यांनी "होय" असे लेखी उत्तर दिले होते. एक म्हणजे दहा टक्के लोकवर्गणी महानगरपालिकेवर बसविणे व दुसरे म्हणजे पाणी वितरणाची व्यवस्था महापालिकेकडे सोपविणे "या दोन अटी वगळण्याच्या विनंतीबाबत शासनाने काय निर्णय घेतलेला आहे?" या प्रश्नाला "सर्व नागरी पुरवठा योजना या दोन अटींवरच मान्य करण्यात येत असल्यामुळे या अटी वगळण्याची जिल्हा नियोजन व विकास मंडळाची विनंती मान्य करण्यात आली नाही." असे लेखी उत्तर देण्यात आले होते.

### १४ ऑक्टोबर व २७ ऑक्टोबर च्या शासननिर्णयात तफावत कां म्हणून?

**९१.** या प्रश्नावर मग तोंडी प्रश्नोत्तरे सुरू झाली. प्रश्न विचारण्यापूर्वी प्रा. बी. टी. देशमुख यांनी सभागृहाला पुढील प्रमाणे माहिती दिली :-

"अध्यक्ष महाराज, **एखाद्या प्रश्नाबाबत शासनाने एवढी कोलांटउडी घेतली असल्याचे दुसरे उदाहरण सापडणार नाही.** अध्यक्ष महाराज, पहिली अट जी दहा टक्के रकमेची आहे त्याबाबत मी माहिती देतो आणि मग प्रश्न विचारतो की, १९८३ चा पॅटर्न ऑफ फायनान्सिअल असिस्टंन्स टू वॉटर सप्लाय स्कीम ऑफ कॉर्पोरेशन काय होता? याचा विचार केला तर कॉर्पोरेशनची स्कीम असेल तर दहा टक्के लोकवर्गणी कॉर्पोरेशनने भरावयाची आणि **स्कीम कॉर्पोरेशनची नसेल व महाराष्ट्र पाणी पुरवठा मंडळाची असेल तर पाणी पुरवठा मंडळाने ही दहा टक्के रक्कम भरावयाची.** त्याप्रमाणे शासनाने या सभागृहात सांगितले आणि आश्वासन समितीसमोर सचिवांनी साक्ष देतांना तेथे पण तसेच सांगण्यात आले

होते आणि त्याप्रमाणे समितीने आपला अहवालही सभागृहाला दिला आहे. आता प्रश्न असा आला आहे की, ही पाणी पुरवठा स्कीम पंचावन्न कोटी रूपयाची आहे. दसऱ्यापर्यंत या योजनेचे काम सुरू होणार होते पण ते तसे झाले नाही. बारा तारखेला दसरा होता पण १४ तारखेला शासनाने एक जी.आर काढला आणि त्यामध्ये असे म्हटले आहे की, “दहा टक्के रक्कम बोर्डाने भरावयाची आहे” हे वाक्य त्यामध्ये ठेवल्याबद्दल, शासनाचे मी आभार मानतो. पण शासनाने २७ ऑक्टोबर १९८६ रोजी जो दुसरा जी. आर. काढला त्यातून ते वाक्य निघून गेले. त्याठिकाणी नवीन वाक्य आले. ते वाक्य असे की, “ही दहा टक्के रक्कम कॉर्पोरेशनने भरावी” तेव्हा अध्यक्ष महाराज, या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली. कमिटीसमोर सरकारच्या अधिकाऱ्यांनी साक्ष दिली आणि कमिटीसमोर सांगितले की, दहा टक्के रक्कम बोर्डाने भरावी.” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ३, पृष्ठ २)*

व त्यानंतर प्रा. बी. टी. देशमुख यांनी असे विचारले की, “माझा प्रश्न असा आहे की, १४ ऑक्टोबरला दहा टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळाने भरण्याची जी अट होती ती २७ ऑक्टोबरला का बदलली? याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.”

**९२.** यावर नगरविकास राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर व त्यानंतर झालेली प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे :-

*“**श्री. विलास सावंत** : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील सर्व अ, ब, क वर्गाच्या ज्या नगरपालिका आहेत व त्यांनी पाणी पुरवठ्याच्या योजना घेतल्या आहेत त्या प्रत्येक ठिकाणी दहा टक्के लोकवर्गणी त्या त्या लोकल बॉडीजना भरावी लागते असा जी. आर. निघाला.*

***श्री. मनोहर जोशी** : ही माहिती अगोदर नव्हती काय?*

***श्री. विलास सावंत** : मा. सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे मला प्रथम उत्तर देऊ द्या. तेव्हा दहा टक्के लोकवर्गणी भरावी असा शासनाचा जो जी. आर. आहे, त्याप्रमाणे ५५ कोटी रूपयाची ही पाणी पुरवठ्याची जी योजना आहे त्या ठिकाणी ही दहा टक्के रक्कम या महापालिकेने भरावी. आणि तो जी. आर. याही महापालिकेला लागू आहे. तेव्हा अशा प्रकारे दहा टक्के रक्कम भरून तसा ठराव महापालिकेने केल्यानंतर तशी कबुली दिल्यानंतर या योजनेचे काम होऊ शकेल.*

***श्री. मनोहर जोशी** : अध्यक्ष महाराज, प्रश्न काय विचारला होता आणि उत्तर काय?*

***श्री. बी. टी. देशमुख** : अध्यक्ष महाराज, १४ ऑक्टोबरला काढलेल्या जी. आर. मधील अट तुम्ही २७ ऑक्टोबरला बदलली तर या १३ दिवसात काय घडले. आणि १४ ऑक्टोबरच्या जी. आर मध्ये २७ ऑक्टोबरला हा बदल का म्हणून करण्यात आला ते सांगा?*

***सभापती** : मा. मंत्रिमहोदय, तुम्ही पूर्वी दहा टक्के रक्कम जलनिःस्सारण मंडळ भरील असा ठराव केला होता. पण आता असे म्हणता की, ही दहा टक्के रक्कम अमरावती कॉर्पोरेशनने भरावी. तेव्हा हा जो बदल झाला तो कसा काय झाला?*

***श्री. विलास सावंत** : अध्यक्ष महाराज, हा जो बदल झाला तो एकट्या अमरावती नगरपालिकेकरिता झालेला नाही.*

***श्री. मनोहर जोशी** : अध्यक्ष महोदय, मा. मंत्रिमहोदय पुन्हा पुन्हा उत्तराला बगल देत आहेत तुम्हाला मुख्य प्रश्न काय आहे हे समजले असेल तर उत्तर द्या. माहीत नसेल तर तसे सांगा.*

***श्री. विलास सावंत** : अध्यक्ष महोदय, पाणी पुरवठा योजनेकरिता दहा टक्के रक्कम भरण्याची अट ही फक्त अमरावती नगरपालिकेकरिता नाही तर सर्वच नगरपालिकेकरिता आहे.” (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ३, पृष्ठ २)*

पुन्हा पुन्हा प्रश्न विचारून सुद्धा बदल का म्हणून करण्यात आला याचे उत्तर येत नव्हते, तेव्हा मा. सभापतींनी पुन्हा चर्चेत हस्तक्षेप करून असे विचारले की :- “सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांचे म्हणणे असे आहे की, या योजनेतून जे पाणी देणार आहात ते केवळ नगरपालिकेलाच देणार आहात असे नाही. या योजनेची नगरपालीका ही मोठी कंझुमर आहे. तेव्हा प्रश्न असा येतो की, **जलनिस्सारण मंडळाने दहा टक्के रक्कम या योजनेकरिता भरावी असे सुरुवातीला ठरले असतांना त्यात बदल करून ही दहा टक्के रक्कम अमरावती नगरपालिकेने भरावी असा जो निर्णय झाला तो कां झाला?** कारण ही योजना सगळ्यांनाच लागू आहे तेव्हा मूळ निर्णयात बदल का झाला याचे उत्तर द्यावे.” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ३, पृष्ठ ३)*

### “मा. मंत्रिमहोदय आपण उभे रहा व उत्तर द्या” असे सभापतींना सांगावे लागले

**९३.** मा. सभापतींनी स्वतः हस्तक्षेप करून मर्मावर बोट ठेवल्यामुळे नगरविकास मंत्री व राज्यमंत्री यांची उत्तरे देतांना मोठीच पंचाईत झाली. राज्यमंत्री, मंत्र्याकडे व मंत्री, राज्यमंत्र्यांकडे बसल्याबसल्या तुम्ही उत्तर द्या या भावनेने पाहत होते. श्री. रा. सु. गवई व श्री. मनोहर जोशी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत होते. खुद्द सभापतींना पुन्हा चर्चेत हस्तक्षेप करून “**मा. सदस्य श्री. जोशी आपण खाली बसा. मा. मंत्रीमहोदय आपण उभे राहा व उत्तर द्या**” असे म्हणावे लागले.

जवळ जवळ अर्धा तासाच्या वर या प्रश्नावर चर्चा झाली. चर्चेच्या नोंदी काळजीपूर्वक पाहिल्या तर असे आढळून येते की, पहिल्या ४-५ मिनिटानंतर राज्यमंत्री उत्तर द्यायला पुढे आले नाहीत व नगरविकासमंत्री डॉ. सुब्रम्हण्यन यांनाच सर्व प्रश्नांच्या माऱ्याला तोंड द्यावे लागले. एका क्षणी श्री. रा. सु. गवई हरकतीचा मुद्दा उपस्थित करीत होते. सभापती “The Hon'ble Minister for Urban Development is on his legs.” असे म्हणाले असतांनाच डॉ. सुब्रम्हण्यन हे त्यावर पटकन खाली बसले तेव्हा सभापती म्हणाले "Now he has yielded" सभापतींच्या या उद्गारानंतर श्री. रा.सु.गवई यांनी आपले पाच प्रश्न विचारले ते पुढील शब्दात. :-

“अध्यक्ष महाराज. मी प्रश्न काय आहे तो सांगतो. तर अध्यक्ष महाराज, या पवित्र सभागृहात आणि सभागृहाची संसदीय समिती जी अॅशुरन्स कमिटी आहे त्या कमिटीसमोर शासनाने काय म्हटले होते? त्या ठिकाणी जे अभिवचन दिले होते **त्याला शासन चिकटून का राहत नाही?** वुई आर नॉट बेगर, येथे आमच्या हक्काचा प्रश्न आहे. तेव्हा माझा **पहिला प्रश्न** असा की, दहा टक्के वर्गणी भरण्याची कबुली वॉटर बोर्डाने १९८५ साली **दिली होती की नाही? नंबर दोन,** या बोर्डाने आश्वासन समितीसमोर ही वर्गणी नगरपालिका न भरता वॉटर सप्लाय बोर्ड भरेल असे सांगितले होते **ही गोष्ट खरी आहे काय?** तसेच शासनाने याबाबत जी भूमिका घेतली होती त्यादृष्टीने अॅशुरन्स कमिटीचा रिपोर्ट पण माझ्या जवळ आहे. तेव्हा अध्यक्ष महाराज, १४ ऑक्टोबरच्या जी. आर प्रमाणे ही दहा टक्के रक्कम वॉटर सप्लाय बोर्ड भरेल असे अभिवचन दिले **ही गोष्ट खरी आहे काय?** याचे उत्तर द्यावे आणि त्याच बरोबर ५ ऑगस्टला विधानपरिषदेत हा प्रश्न चर्चेला आला होता तेव्हा पण या प्रश्नास उत्तर देतांना मा. मंत्रीमहोदयांनी ही वर्गणी वॉटर सप्लाय बोर्ड भरेल. असे सांगितले व पुन्हा आठ ऑगस्टला याच प्रश्नावर अहवाल सादर झाला असता तेव्हाही दहा टक्के रक्कम बोर्ड भरेल असे अभिवचन शासनाने दिले होते **ही गोष्ट खरी आहे की नाही?**” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ३, पृष्ठ ३-४)*

### गोल गोल व मोघम उत्तरे

**९४.** जवळ जवळ ३०-३५ मिनिटे या प्रश्नावर चर्चा चालू होती. मूळ प्रश्नाला उत्तर देण्याचे जाणीवपूर्वक टाळून मंत्रीमहोदय गोल गोल व मोघम उत्तरे देत होते. अशा उत्तरांचे काही नमुने पुढील प्रमाणे :-

“हा निर्णय सर्वासाठी आहे. एकट्या अमरावती साठी नाही.” “शासनाला एक नियम करता येतो तर तो बदलविताही येतो.” “**ही दहा टक्के रक्कम वॉटर सप्लाय बोर्ड भरेल असे म्हटले होते.** पण आता २७ ऑक्टोबरला जो जी. आर काढला आहे त्याप्रमाणे बोर्डाची कॉन्ट्रीब्युशन न राहता नगरपालिकेची राहणार आहे.” “The "Swaroop" of the G.R. has slightly changed.” “We will sit with the hon, member Shri Deshmukh and Shri. Gavai and arrive at some decision.” “All the facts which I have mentioned here are apparently correct. But I have not got all the facts here.”

### मंत्र्यांकडून प्रश्नांची उत्तरे येईनात

**९५.** श्री. रा. सु. गवई यांनी विचारलेल्या पाच प्रश्नांना मुद्देसूद उत्तरे देण्याचे सोडून नगरविकास मंत्री नुसते गोल गोल बोलत होते. त्यांच्या या अशा उत्तरांमुळे सभागृहातील चीड वाढत होती. त्यावर श्री. गवई यांनी "मी जे पाच उपप्रश्न विचारले आहेत त्यांची “होय किंवा नाही” असे उत्तर मला हवे आहे. त्यानंतर मग काय करावयाचे हे आपण पाहू. यामध्ये मी असे म्हटलेलेच नाही असे आपण म्हणा. पण माझा हक्क आहे की सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करून त्यांची माहिती घेणे.” असे उद्गार काढले. श्री. मनोहर जोशी यांनी असा प्रश्न

विचारला की "सन्माननीय सदस्य श्री. गवई यांचे जे पांच उपप्रश्न आहेत त्यांची उत्तरे तर पाहिजेतच त्याचबरोबर त्यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे तो म्हणजे या सदनामध्ये एकदा आश्वासन दिल्यानंतर ते आश्वासन सदनाच्या बाहेर बदलता येते काय?" ज्येष्ठ सदस्य श्री. रा. सु. गवई यांनी विचारलेल्या टोकदार पाच प्रश्नांना उत्तरे देण्याची मंत्र्यांची टाळाटाळ इतकी टोकाची होती की एकदा तर श्री. मनोहर जोशी यांनी सरळसरळ "अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. गवई यांनी जे प्रश्न विचारले आहेत त्यांची उत्तरे मंत्रीमहोदयांनी द्यावीतच...." असे उद्‌गार काढले. तरी मंत्री जेंव्हा मुद्देसूद उत्तरे देईनात तेव्हा श्री. विठ्ठलराव हांडे यांनी संतापून असा प्रश्न विचारला की **"अध्यक्ष महाराज, कॅटॉगरीकल प्रश्न विचारले आहेत, तेव्हा त्यांची उत्तरे सुद्धा कॅटॉगरीकल पाहिजेत. हे काय चालले आहे?" श्री. गवई यांना "अध्यक्ष महाराज, माझ्या मूळ प्रश्नांना शह दिला जात आहे. प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरे आपण द्यावीत."** असे विचारावे लागले. व तरीही मंत्री उभे रहात नाहीत व उत्तर देत नाहीत हे पाहिल्यावर बी. टी. देशमुख यांनी "अध्यक्ष महाराज. आम्हीच प्रश्न विचारावयाचे आणि त्याची उत्तरे आम्हीच द्यावयाची असे आहे काय?" अशी विचारणा केली. तेंव्हा मोठ्या कष्टाने नगरविकास मंत्री उठून उभे राहिले व त्यांनी पुढील प्रमाणे गुळमुळीत उत्तर दिले :-

"Mr. Chairman sir, I have not said "No." Later on, I was saying that this is the reason and all that, That is why I have said that we will sit together and find out the remedy." **त्यांच्या उत्तरातील हा गुळमुळीतपणा इतका झोंबणारा होता की ते बसल्याबरोबर मा. सभापतींच्या तोंडून पुढील फटका बाहेर पडला :-** "I would request the Hon. Minister to answer the question of Hon, members, catagorically. You may please say Yes or No" त्यानंतर सुद्धा नगरविकास मंत्र्यांनी दिलेले "Mr. Chairman, sir Mr. Gavai has said that all this was done earlier and according to him they are all facts, Therefore, they are there As I said...." हे उत्तर त्यांच्या मनातील अपराधीपणाची भावना स्पष्ट करणारे होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ३, पृष्ठ ५)*

## "दोघापैकी एकही मंत्री उत्तर देण्यास उभे राहीले नाही" - श्री. मनोहर जोशी

**९६.** ज्या प्रकारची उत्तरे नगरविकास मंत्री देत होते. त्यामुळे सभागृहातील वातावरण आणखी क्षुब्ध होत होते. शेवटी ते म्हणाले **"या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन आम्ही योजना मंजूर केली. आता १० टक्क्याबाबतच प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत आपण चर्चा करू"** त्यावर श्री मनोहर जोशी म्हणाले :- "सन्माननीय मंत्र्यांनी या प्रश्नावर चर्चा करू आणि नंतर सभागृहासमोर येऊ असे सांगितले आहे. अध्यक्ष महाराज, आम्ही हा प्रश्न ४५ दिवस अगोदर दिलेला होता. त्यानंतर तो सभागृहासमोर आला. मला वाटते या प्रश्नासंबंधीची तयारी करून मंत्री महोदय आलेले नाही. या प्रश्नाची माहिती मंत्री वाचून आले की नाही अशी शंका सुद्धा येते. **प्रथम राज्यमंत्री उत्तर देत होते त्यांना काही याची उत्तरे देता आली नाहीत. मंत्री महोदय सुद्धा उत्तर देऊ शकले नाहीत. एकदा तर दोन्ही मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उभे राहीले नाहीत.** तेव्हा प्रश्न विचारल्या नंतर त्याचे उत्तर देणे हा सभागृहाचा मान ठेवण्याचा प्रश्न आहे. उत्तरे तयार करून येणे हे अत्यंत आवश्यक आहे. या प्रश्नांच्या बाबतीत अनेक वेळा सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. हा पाणी पुरवठ्याचा महत्त्वाचा प्रश्न आहे. चर्चा होऊन याबाबत आश्वासन दिलेले होते आणि ते सदनाच्या बाहेर बदलण्यात आले आणि म्हणून कोणत्याही प्रकारे यासाठी आता अधिक थांबण्याची आवश्यकता नाही. मंत्रीमहोदयांची पूर्वीची कमिटमेंट कायम रहाण्याची आवश्यकता आहे आणि त्यादृष्टीने मंत्री महोदय तयार आहेत काय?" त्यावर राज्यमंत्री श्री. सावंत उठून उभे राहिले व विचारलेल्या प्रश्नाला उत्तर न देता "अध्यक्ष महाराज, दोन्ही मंत्री महोदय या प्रश्नाची तयारी करून आलेले आहेत आणि ही जॉईंट रिस्पॉन्सिबिलीटी आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. जोशी यांनी जे काय म्हटले आहे ते बरोबर नाही." असे म्हणून खाली बसले. श्री. मनोहर जोशी यांच्या प्रश्नाला उत्तर मिळालेच नाही. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ३, पृष्ठ ६)*

या वादामध्ये श्री. मनोहर जोशी यांनी त्यावेळच्या विधानपरिषदेतील एक विरोधी पक्ष सदस्य या नात्याने अमरावती शहर पाणीपुरवठा योजनेच्या प्रश्नाला अतिशय उत्तम साथ दिली. **विरोधी पक्ष सदस्य म्हणून टोकाची भूमिका घेऊन सभागृहामध्ये संघर्ष केलेले किंवा करणारे सदस्य एकदा सत्तारूढ झाले की आपल्या मूळ भूमिका पार विसरून जातात असे अनेकदा आढळून येते. याला अत्यंत नामवंत अपवाद म्हणून श्री. मनोहर जोशी यांच्या या संदर्भातील भूमिकेचा उल्लेख करावा लागेल.** दहा टक्के लोकवर्गणीच्या संदर्भात विधानपरिषदेत या शहरासाठी झालेल्या संघर्षातील त्यांच्या सहभागाने महाराष्ट्रातील पाणीपुरवठा योजनेच्या आर्थिक आकृतिबंधाचा इतिहासच बदलून टाकला. पुढे मुख्यमंत्री झाल्यावर अमरावती शहराच्या वेळी आलेला अनुभव लक्षात घेऊन "१० टक्के लोकवर्गणी न भरल्यामुळे अनेक योजना पूर्ण होत नाहीत. **म्हणून माझ्या शासनाने अशा प्रकारचा विचार केलेला आहे की १० टक्के लोकवर्गणीची अट ही पूर्णपणे काढून टाकण्यात यावी.**" असे त्यांनी विधानसभेत जाहीर केले व त्याप्रमाणे शासननिर्णयही निर्गमित झाला. मा. मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी २० जुलै १९९५ रोजी नगरविकास विभागाच्या मागण्यावरील चर्चेला उत्तर देतांना विधानसभेत वरील निर्णय घोषित करतांना अमरावती शहराचा पुढील शब्दात उल्लेख केला "अनेक ठिकाणी ही लोकवर्गणी भरली जात नसल्यामुळे ही लोकवर्गणी भरण्याची नगरपालिकांची क्षमता, ताकद नसल्यामुळे या योजना सुरू झाल्या नाहीत. या योजना फक्त कागदावर दिसून येत आहेत...... अमरावती महापालिकेचा त्याला अपवाद आहे. विधानपरिषद सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी याबाबत अतिशय तर्कशुद्ध माहिती दिली आणि त्यांचे आरग्युमेंट शासनाला मान्य झाले. मी त्यावेळी सभागृहामध्ये उपस्थित होतो. तेव्हा फक्त अमरावती नगरपालिकेला अपवाद करण्यात आला आहे. गेल्या ४/५ महिन्यामध्ये अनेक नगरपालिकांनी मला विनंती केली." दहा टक्के लोकवर्गणीची अट महाराष्ट्रामध्ये आता इतिहासजमा झालेली आहे. यामध्ये फार मोठा वाटा अमरावती शहराने दिलेल्या लढ्याचा आहे हे जेवढे खरे तेवढेच जनहिताच्या प्रश्नावर विरोधी पक्ष सदस्य म्हणून घेतलेल्या एखाद्या योग्य भूमिकेला चिकटून राहून पुढे मुख्यमंत्री झाल्यावर मिळालेल्या अधिकाराचा वापर करून ती भूमिका प्रत्यक्षात आणण्याच्या श्री. मनोहर जोशी यांच्या तळमळीच्या प्रयत्नाला सुद्धा आहे हेही तेवढेच खरे.

## विचारात गोंधळ असेल तर भाषाप्रभुत्व निरुपयोगी ठरते

**९७.** राज्यमंत्री श्री. विलास सावंत यांच्या उपरोक्त उत्तरानंतर सुद्धा ही चर्चा बराच वेळ चालली. पुढच्या साऱ्या हल्ल्याला मा. मंत्री श्री. सुब्रम्हण्यन तोंड देत होते. मुळात शासनाच्या नियमांचा भंग शासनानेच केला. नियमाविरुद्ध आम्हाला वागणूक का देता? म्हणून अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेने तक्रार केली तर मूळ नियमच बदलला. आपली चूक झाली आहे हे स्पष्ट दिसत असतांना, मनाला पटत नसतांना, **मुख्यमंत्री वा मंत्रीमंडळाने निर्णय घेऊन टाकलेला असल्याने उत्तर बदलता येत नाही व तीच तीच मोघम, भंपक व बोटचेपी उत्तरे द्यावी लागत असल्याने सभागृहात मंत्र्याची प्रचंड फजिती होत असल्याचे एवढे जबरदस्त उदाहरण यापूर्वी माझ्या पहाण्यात आले नव्हते.** मुळात उत्तम इंग्रजी जाणणाऱ्या व बोलणाऱ्या श्री. व्ही. सुब्रम्यण्यन यांच्यासारख्या माजी सनदी अधिकारी असलेल्या ज्येष्ठ मंत्र्यांनी दिलेली इंग्रजीतील या उत्तरांची अधिकृत प्रतिवेदने आज मुळातून पाहिली म्हणजे दुसऱ्याने घेतलेला निर्णय मनाला पटला नसतांना कळसूत्री बाहुल्याप्रमाणे केवळ कथन करण्यासाठी किंवा मूळ विचारात गोंधळ किंवा तर्कदोष असेल तर तो झाकण्यासाठी इंग्रजीतले "भाषाप्रभुत्व" सुद्धा मदतीला येत नाही हे स्पष्टपणे दिसून येते. गोंधळलेल्या सुब्रम्हण्यन यांनी पुढील चर्चेमध्ये "धैर्याने" दिलेल्या उत्तरातील काही वाक्ये मी मुद्दाम नमुना म्हणून पुढे देत आहे :-

*"Mr. Chairman, sir, I do not think there is nothing to be worried about,"*

*"we have taken a decision that Board has to implement the scheme and by the Corporation 10 per cent is payable, this decision is taken in January 1987."*

*"But in view of the special circumstances mentioned by the Hon, members, particularly the Hon. the leader of Opposition...."*

*"Govertment has taken the decision and this is to be corelated and it says here the Government has decided. So this question is discussed and the Government has decided that in respect of the water supply and sewerge schemes owned by the Maharashtra water supply and severage Board also it will be obligatory that the contribution of the local bodies concerned is made to meet the 10 percent of the total cost of the scheme."*

*"But as the Hon. Chairman himself suggested so far as*

*this particular case is concerned we will take it with the chief Minister; as the Hon, the leader of the Opposition Shri. Gavai and the Hon. Member Shri. Deshmukh and all those who are anxious. We are anxious to find out a solution soon."*

**योजनेचे काम सुरू होणार की बंद रहाणार?**

**९८.** या साऱ्या उलटसुलट उत्तरातून योजनेचे काम सुरू होणार की बंद रहाणार हे स्पष्ट होत नव्हते. खुद्द मा. सभापतींनाच ही गोष्ट स्पष्ट करून घ्यावीशी वाटली त्यातून सभागृहामध्ये घडलेला संवाद पुढील प्रमाणे :-

*"**The Chairman :** Even if you do not come to any decision as to whether the 10 per cent is to be paid by the Amravati Corporation or not, the present scheme as it is will keep on proceeding further or will it stop?*

***Shri. V. G. Hande :** It will stop because the municipality has not paid the money.*

***Dr. V. Subramanian :** I do not know whether I can say it, however, as the suggestion has come from the Hon. chairman himself certainly we will consider it, sir.*

***Shri. Madhu Deolekar :** The Hon, Minister may take it as a directive of the chair and say he accepts it, he should have the courage to accept it.*

***सभापती :** पैसे कोणी भरावयाचे हा वादाचा प्रश्न आहे. शासनाने जानेवारीमध्ये एक जी. आर. काढलेला आहे. त्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. परंतु पाणी पुरवठा होणे हे लोकांच्या हिताचे आहे. अमरावती शहर ज्यांनी पाहिलेले आहे त्यांना त्याचे किती महत्त्व आहे हे समजू शकते. तेव्हा इतर काही करावयाच्या आधी ही स्कीम कन्टीन्यू करा.*

***Dr. V. Subramanian :** No. Mr. Chairman, sir, there is only one point. The scheme has been sanctioned. The scheme has to start and we have asked the Amravati Municipal Corporation about it. It had not been stopped. In view of the direction given by the chairman we will certainly consider it and we will do it. मी आपल्याला असे म्हटले आहे की, ही स्कीम सँक्शन झालेली आहे. काम सुरू व्हावयाचे आहे. सुरू झालेले काम थांबविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.*

***श्री. बी. टी. देशमुख** : अटीमध्ये तसे आहे.*

***डॉ. व्ही. सुब्रमण्यम :** सन्माननीय सदस्य अटीबद्दल सांगतात. तेव्हा त्यांच्या बरोबर बसू आणि चर्चा करू. This scheme is now sanctioned and work is to start.*

***सभापती :** माननीय सदस्यांना अशी भीती आहे की, साडेपाच कोटी रुपये पाच वर्षात हप्त्याने भरावयाचे आहेत. त्यांच्यासंबंधी तुमची चर्चा होणार आहे. त्यामध्ये महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, हे साडेपाच कोटी रुपये पाच वर्षात भरता आले नाहीत तर तुमची स्कीम थांबेल का? ती थांबता कामा नये ती कन्टीन्यू झाली पाहिजे. मग काय ठरावयाचे असेल ते ठरेल.*

***Dr. V. Subramanian** : Mr. Chairman, Sir, that they should agree to give the ten per cent contribution is the condition. Now it is the condition precedent of this. But now in the light of this discussion whether this should be considered further is a matter which we have to consider with them and then a decision to be given.*

***श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे आणि या संदर्भात जी माहिती दिलेली आहे ती अतिशय लाजिरवाणी आहे. या ठिकाणी एकदा नव्हे अनेकदा ही गोष्ट कबूल केलेली आहे. आणि मग २७ आक्टोबरला जी. आर. काढला या जी. आर. नुसार डी. पी. डी. सी. ने कळविले की, ही चूक आहे. फायनान्सीयल पॅटर्नमध्ये हे बसत नाही. यासंबंधीच्या कमिटीचा रिपोर्ट सुद्धा वर्तमानपत्रामध्ये आला. त्यानंतर तुम्ही २३ जानेवारीला एक शहर समोर ठेवून जी. आर. बदलला. तेव्हा २३ जानेवारी १९८७ च्या जी. आर. मध्ये ज्या गोष्टी आणि अटी आल्या त्या अटी कोणी घातल्या?*

***Dr. V. Subramanian** : If the Government takes a certain decision, the government has taken a later decision on the 23rd January, 1987 which I have read out specifically, this is in relation to other schemes also." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २६ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ३, पृष्ठ ७-८)*

**असमाधानकारक उत्तरामुळे शेवटी प्रश्न राखून ठेवला**

**९९.** सर्वश्री रा. सु. गवई, सदानंद वर्दे, श्री. दे. मा. कराळे, प्रा. बी. टी. देशमुख, मनोहर जोशी, वि. ग. हांडे या सदस्यांनी एका मागून एक प्रश्नाची सुरू केलेली सरबत्ती जोरात होत असली तरी मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाच्या निर्णयाने मा. नगरविकास मंत्री हे पक्के बांधलेले असल्यामुळे त्यांना काही पुढे सरकता येत नव्हते. प्रश्न पुढे सरकत नाही असे पाहून सभापती म्हणाले, "आपण या सभागृहामध्ये गेला अर्धा तास या एकाच प्रश्नावर चर्चा करीत आहोत. याचा अर्थ असा आहे की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मिळालेल्या माहितीमुळे मा. सदस्यांचे समाधान झालेले नाही. म्हणून त्यांनी या प्रश्नावर अर्धा तास चर्चा उपस्थित करावी मी त्याला अनुमती देईन." **"मा. मंत्री महोदयांना त्यांचे मॉरल कॉन्शस टोचणी देत आहे व म्हणून ते चर्चेसाठी पुन्हा तयार आहेत. अध्यक्ष महाराज, आमची अशी विनंती आहे की, हा प्रश्न राखून ठेवावा" अशी विनंती श्री. रा. सु. गवई यांनी केली व मा. सभापतींनी ही विनंती मान्य केली व प्रश्न राखून ठेवण्यात आला.**

************************************************

## १०
## सभागृहात रणकंदन

************************************************

**राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाषण**

**१००.** राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये मंगळवार, दिनांक ३१ मार्च १९८७ रोजी भाषण करतांना श्री. बी. टी. देशमुख यांनी याबाबतचे दुःख पुढील शब्दात मांडले :-

"अध्यक्ष महाराज, माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केलेले आहे त्या अभिभाषणामधील पंचविसाव्या परिच्छेदामधील एका मुद्याबाबत मी माझे विचार मांडणार आहे. अर्बन वॉटर सप्लाय संबंधी एक वाक्य त्यामध्ये आहे. त्यामध्ये सुरुवातीला असे म्हटले आहे की, **"१० टक्के लोकवर्गणी भरण्याच्या शर्तीअधीन यावर्षी चार शहरांच्या मोठ्या योजनांना मंजुरी देण्यात आलेली आहे."** यामध्ये अमरावती शहराचा उल्लेख प्रथम करण्यात आलेला आहे. याबाबतीत ज्यावेळेस हे वाक्य ऐकले त्यावेळेस खरे म्हणजे या शहराला याचा आनंद व्हावयास पाहिजे होता. परंतु हे भाषण ऐकल्यानंतर सुतक पडावे अशी परिस्थिती त्या शहरात निर्माण झाली आहे. मध्यवर्ती सभागृहामध्ये राज्यपालांचे हे वाक्य ऐकतांना आपल्या कानामध्ये तापलेले तेल कोणी ओतत आहेत की काय? अशी भावना माझ्या मनामध्ये निर्माण झाली होती. मागच्या वेळ्या मा. राज्यपालांच्या भाषणामध्ये सुद्धा शहरांच्या पाणी पुरवठ्याच्या योजनांचा उल्लेख होता. परंतु १० टक्के हा शब्द त्या ठिकाणी नाही. याचे कारण अशी अट माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये टाकण्याचे कारण नाही. कारण या योजना कशा चालवाव्यात यासंबंधी फायनान्सीयल पॅटर्नचे रिझोलेशन होते. पॅटर्न ऑफ फायनान्सीयल असिस्टन्स या नावाचा ६ मे १९८३ चा स्टॅंडींग पॅटर्न जी. आर. आहे. अमरावती महानगरपालिकेचा जन्मही झाला नव्हता त्या अगोदरचा हा जी. आर. आहे. या जी. आर. मध्ये असे म्हटलेले आहे की, कोणत्याही कार्पोरेशनसाठी पाणी पुरवठ्याची योजना करावयाची असेल तर त्यासाठी २३ १/३ इतकी रक्कम शासन अनुदान देईल. तसेच एल. आय. सी. लोन ६६ २/३ राहील व लोकवर्गणी १० टक्के राहील. **ही लोक वर्गणीची रक्कम योजना महानगरपालिकेची असेल तर महानगरपालिकेने द्यावयाची व योजना पाणी पुरवठा मंडळाची असेल तर ती पाणी पुरवठा मंडळाने द्यावयाची,** अशा तऱ्हेची स्पष्ट तरतूद त्यामध्ये आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ३१ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ६, पृष्ठ ५५-५६)*

**तीनही शासन निर्णयांचा समाचार**

**१०१.** सभागृहात देण्यात आलेली आश्वासने त्यानंतर निघालेला पहिला योग्य (१४ ऑक्टोबर १९८६) व दुसरा अयोग्य (२७ ऑक्टोबर १९८६) शासननिर्णय व त्यानंतर स्थायी शासननिर्णयातच बदल करणारा २३ जानेवारी ८७ चा तिसरा शासननिर्णय यांचा समाचार राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेतांना केलेल्या आपल्या या भाषणात बी. टी. देशमुख यांनी पुढील शब्दात घेतला :

"दसरा त्या वर्षी १२ ऑक्टोबरला होता. शासनाने १४ ऑक्टोबर ८६ ला

आदेश काढले. या जी. आर. च्या पॅरिग्राफ नं. २ मध्ये असे म्हटलेले आहे की, **"वरील योजना ही महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या मालकीची असल्याकारणाने लोकवर्गणीची रक्कम सर्वप्रथम मंडळाने भरावयाची आहे. १४ ऑक्टोबर ८६ च्या आदेशामध्ये ही गोष्ट स्पष्टपणे नमूद केली.** त्यानंतर २७ ऑक्टोबर ८६ ला पुन्हा एक जी. आर. काढला. त्यामध्ये अशी अट नमूद केलेली आहे की, **"१० टक्के रक्कम म्हणजे साडेपाच कोटी रूपयाची रक्कम कॉर्पोरेशनला भरावी लागेल."** मा. मुख्यमंत्र्यांनी या अगोदर सभागृहामध्ये मान्यता दिलेली असताना, सभागृहामध्ये स्पष्ट आश्वासन दिलेले असतांनाही हा बदल २७ ऑक्टोबरच्या शासकीय आदेशान्वये करण्यात आला. त्यावेळी अमरावती जिल्ह्याच्या डी. पी. डी. सी. ने या बाबतीत असा ठराव केला की, ही गोष्ट बरोबर नाही. मला सांगावयास वाईट वाटते की. त्या ठरावानंतर शासनाने २३ जानेवारी ८७ ला पुन्हा एक नवीन जी. आर. काढला आणि त्यामध्ये असे लिहिले की, **"योजना कोणाचीही असो, पाणी पुरवठा मंडळाची योजना असली तरी १० टक्के रक्कम ही कॉर्पोरेशनने भरली पाहिजे." मी या ठिकाणी स्पष्ट आरोप करतो की, एक शहर डोळ्यासमोर ठेवून हे सर्व काम करण्यात आलेले आहे.** आपल्या मनामध्ये जर असे काही नसते तर आपण २७ ऑक्टोबरच्या जी. आर मध्ये १४ ऑक्टोबरच्या जी. आर. प्रमाणे लिहिले असते की, ही योजना पाणी पुरवठा मंडळाची आहे त्यामुळे १० टक्क्यांची रक्कम ही पाणी पुरवठा मंडळ भरणार आहे. ते आपण २७ ऑक्टोबरच्या जी.आर मध्ये तसे न लिहिता १० टक्के रक्कम कॉर्पोरेशनने भरावी असे लिहिले आणि २३ जानेवारीला फायनान्सियल स्टॅंडींग रिझोल्यूशन जो आहे तो अमेंड केला." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ३१ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ६, पृष्ठ ५६-५७)*

### नियम कशाला म्हणणार ? अपवाद कशाला म्हणणार ?

**१०२.** नियम कशाला म्हणतात आणि अपवाद कशाला म्हणतात याचे विवेचन करून पाणीपुरवठा व्यवस्था ताब्यात घेतल्यावर आता पाणीपुरवठा मंडळाला १० टक्के भरण्यापासून पळता येणार नाही हे विचार बी. टी. देशमुख यांनी पुढील शब्दात मांडले :

"अध्यक्ष महाराज, आज असे बोलले जाते की, या शहराला अपवाद केलेला आहे. एकट्या शहराला अपवाद करता येणार नाही. मी या ठिकाणी या पवित्र सभागृहामध्ये असे ठामपणाने सांगू इच्छितो की, तुम्ही या शहराला अपवाद केलेला आहे. अपवाद याचा अर्थ नियमांच्या विपरित वर्तणूक देणे. **नियम असा होता की "पाणी पुरवठा मंडळाची स्कीम असेल तर १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळाने भरली पाहिजे."** हा नियम अस्तित्वात असतांना व तुम्ही जी आश्वासने दिली ती लाथाडून तुम्ही अपवाद केला, १० टक्के रक्कम कॉर्पोरेशन भरणार आणि स्कीमची मालकी मात्र पाणी पुरवठा मंडळाकडे रहाणार आहे. असे यामध्ये होणार आहे. आजच्या या स्कीममध्ये ५२ कि. मि. ची लाईन आहे. मधल्या दोन गावांना पाणी देण्याची व्यवस्था आहे. पाण्याची परिस्थिती कठीण झाली तर आणखी ४ गावांना पाणी द्यावे लागेल. म्हणजे या गावांना पाणी देण्याची व्यवस्था व योजनेची पूर्ण मालकी पाणी पुरवठा मंडळाची रहाणार आहे आणि तरीही १० टक्क्यांची रक्कम कॉर्पोरेशनने भरावी अशा तऱ्हेचा नियम आपण सांगणार. १० टक्के रक्कम जे सिड कॅपिटल आहे ते त्याठिकाणी कॉर्पोरेशन भरणार. पाणी पुरवठा मंडळाची भूमिका योजना कार्यान्वित करणे, एवढी रहाणार, इतर कॉर्पोरेशनच्या बाबतीत, पण या कॉर्पोरशनच्या बाबतीत आपण विचार न करता जो बदल केलेला आहे. त्यामुळे ही १० टक्के रक्कम भरून सुद्धा या ५५ कोटी रुपयाच्या योजनेवर त्या कॉर्पोरेशनचा कोणताही हक्क राहाणार नाही. परवा उत्तरामध्ये स्पष्ट असे सांगितलेले आहे. **ठोक दराने पाणी विकत देऊन गावातील डिस्ट्रिब्युशन तुम्ही फक्त पहात जा.** अध्यक्ष महोदय माझे म्हणणे असे आहे की, आपण १९८३ मध्ये ही योजना ताब्यात घेतली. नगरपालिकेवर जे प्रशासक होते त्या प्रशासकांना येथे बोलाविले आणि १५-१६ कोटी रुपयांची ही मालमत्ता आपण ताब्यात घेतली. एक रुपयाचेही कॉम्पेन्सेशन न देता सारे वॉटर वर्कस् ताब्यात घेतले. सारे बागबगीचे ताब्यात घेतले. साऱ्या लाईन्स आपण ताब्यात घेतल्या. सारे क्वॉर्टर्स आपण ताब्यात घेतले." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ३१ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ६, पृष्ठ ५७)*

### महापालिकेची आर्थिक स्थिती व देण्यात आलेली आश्वासने

**१०३.** नगरपरिषदेची आर्थिक स्थिती व देण्यात आलेली आश्वासने याबाबत त्यांनी याच भाषणात पुढील विचार मांडले :

"१९८५-८६ या वर्षामध्ये ८ कोटी ६८ लाख रुपये खर्च आणि ७ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न. ७ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्नातून सुद्धा विथड्राव्हल फ्रॉम प्राव्हीडंट फंड, लोन ऑन फिक्स डिपॉझिटस असे १ कोटी २७ लाख रुपये आहेत. अशी या कॉर्पोरेशनची परिस्थिती आहे. कॉर्पोरेशनची ही परिस्थिती आहे म्हणून मी हा मुद्दा या ठिकाणी मांडणार नाही. आपले **जे नियम होते, या सभागृहामध्ये जी चर्चा झाली आणि जी आश्वासने देण्यात आली ती आश्वासने पाळली पाहिजेत हा खरा प्रश्न तर आहेच पण या सभागृहामध्ये होणाऱ्या चर्चा निष्फळ आहेत अशा प्रकारची भावना लोकांच्या मनात निर्माण होऊ नये हे सुद्धा त्यामध्ये अंतर्भूत आहे. कोण्या एखाद्या अधिकाऱ्याच्या मनामध्ये आलेला राग-लोभ हा ४ लाख लोकसंख्येच्या शहराचे पाणी तोडू शकत नाही, किंवा त्यांच्या पाण्यामध्ये विष कालवू शकत नाही.** अध्यक्ष महोदय, या चर्चेच्या निमित्ताने या प्रश्नांची उत्तरे आली पाहिजेत." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ३१ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ६, पृष्ठ ५७-५८)*

**१०४.** याबाबतचा प्रश्न राखून ठेवला असला तरी त्याची वाट न पहाता या चर्चेच्या उत्तरामध्ये याबाबतचा खुलासा झाला पाहिजे अशी विनंती करून प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपले भाषण पुढील शब्दात संपविले :-

"अध्यक्ष महोदय मी आपला आभारी आहे. कारण हा प्रश्न परवा आपण राखून ठेवलेला आहे. दोन तारखेला चर्चा होणार आहे. त्यावर फक्त प्रश्न विचारता येतात. हे मुद्दे मांडता येत नाहीत. म्हणून मी हे मुद्दे मांडलेले आहेत. माननीय मुख्यमंत्री त्यांचे उत्तर देणार आहेत. माननीय राज्यमंत्री त्यांच्या नोटस् घेत आहेत. या जिल्ह्याचे पालकमंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. कोणी तरी आमच्या जिल्ह्याचे बोलले पाहिजे. या शहराला, या जिल्ह्याला कोणी बोलणारे नाही अशा प्रकारची भावना या शहराच्या लोकांच्या मनात निर्माण होणे बरोबर नाही. तरी मी अशी अपेक्षा करतो की, २ तारखेची वाट पहावी लागणार नाही आणि या उत्तराच्या निमित्ताने या ठिकाणी हा जो अपवाद झालेला आहे तो दुरुस्त झाला पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवतो. धन्यवाद." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ३१ मार्च १९८७ : खंड ७९, क्रमांक ६, पृष्ठ ५८)*

### २६ मार्चला स्थगित झालेला प्रश्न २ एप्रिल १९८७ ला पुन्हा पुढे ढकलला

**१०५.** गुरुवार, दिनांक २६ मार्च १९८७ रोजी स्थगित ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक ८०३० हा गुरुवार दिनांक २ एप्रिल १९८७ रोजीच्या विधानपरिषदेच्या कामकाजाच्या क्रमामध्ये पहिल्याच क्रमांकावर दाखविण्यात आला होता. सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या पूर्वी नगरविकास मंत्री डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन यांनी "आपले अजून मुख्यमंत्र्यांशी बोलणे झालेले नाही तेव्हा हा प्रश्न आज न घेता पुढे ढकलण्यास संमती द्यावी." अशी मला अनौपचारिकरीत्या विनंती केली. खरे म्हणजे पुन्हा हा प्रश्न पुढे ढकलण्याचा आम्हाला कंटाळा आलेला होता. पण भांडून आजच प्रश्न चर्चेला घेतला तर पुन्हा तीच तीच उत्तरे ऐकावी लागली असती. "अशुभस्य कालहरणम्" या न्यायाने अशुभ ऐकण्यापेक्षा पुढे ढकलणे केंव्हाही सोईचे होते. सभागृहाची बैठक बरोबर एक वाजता सुरू होताच मा. सभापतींनी "स्थगित ठेवलेला प्रश्न क्रमांक ८०३० प्रथम घेतला जाईल." असे उद्‌गार काढले. चटकन नगरविकासमंत्री उभे राहीले व त्यांनी "अध्यक्ष महाराज, हा प्रश्न या अगोदर विचारण्यात आला होता, त्यावेळी असा निर्णय घेण्यात आला होता की आम्ही त्यांच्याशी चर्चा करणार आहोत परंतु अजूनही याबाबतची चर्चा पूर्ण झालेली नाही तेव्हा माझी आपल्याला अशी विनंती आहे की, It may be postponed with the consent of the Hon, member." अशी विनंती केली. त्यावर मी "ठीक आहे" म्हणालो व मा. सभापतींनी "माझी हरकत नाही" असे उद्‌गार काढले व प्रश्न पुन्हा पुढे ढकलल्या गेला.

### राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर

**१०६.** त्याच दिवशी म्हणजे गुरुवार, दिनांक २ एप्रिल १९८७ रोजी दुपारी ५ वाजल्यानंतर डॉ. श्रीकांत जिचकार यांनी प्रभारी राज्यमंत्री या नात्याने राज्यपालांच्या अभिभाषणावरील सभागृहात झालेल्या चर्चेवरील आपले उत्तराचे भाषण सुरू केले. त्यांचे भाषण संपल्यानंतर झालेल्या पूरक प्रश्नोत्तरामध्ये मी असा प्रश्न विचारला की :-

"अध्यक्ष महाराज, अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्यासंबंधी मा. राज्यपालांच्या भाषणामध्ये उल्लेख आहे त्यासंदर्भात मी एक मुद्दा उपस्थित केला होता. सभागृहामध्ये त्या बाबतीत अनेक वेळेस आश्वासने दिलेली आहेत. अनेक कागदपत्रे सचिवांनी समितीसमोर सादर केलेली आहेत **या संदर्भातील अट नंतर बदलण्यात आली ही गोष्ट बरोबर नाही.** त्यामुळे ही स्कीम होणार आहे की, नाही यासंबंधी भीती आमच्या मनामध्ये आहे. "

त्यावर डॉ. जिचकारांनी उत्तर देतांना स्थगित प्रश्न आजच सकाळी पुन्हा राखून ठेवण्यात आल्याचा आमचा बाण आमच्यावरच उलट फेकला तो पुढील

शब्दात :

"या संदर्भात एक प्रश्न ॲडमिट झाला होता. त्या प्रश्नावर चर्चा झाल्यानंतर तो राखून ठेवण्यात आला त्यानंतर आजच्या प्रश्नोत्तरामध्ये तो प्रश्न होता परंतु माननीय नगरविकास मंत्र्यांबरोबरची आपली चर्चा पूर्ण झालेली नाही त्यामुळे आजचा प्रश्नही पोस्टपोन केलेला आहे. त्यामुळे ती चर्चा झाल्यानंतर त्यामधून काही तरी निष्पन्न होईल अशी आशा आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरुवार, दिनांक २ एप्रिल १९८७ : खंड ७९, क्रमांक ८, पृष्ठ ६०)*

**"त्यांच्या"शी चर्चा होत नव्हती व निमित्त मात्र "आमच्या"शी चर्चा नाही झाली असे**

**१०७.** खरे म्हणजे नगरविकास मंत्र्यांची गाडी मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाजवळ अडली होती. तसे ते खाजगीत कबूल सुद्धा करीत होते. मुख्यमंत्र्यांचा वेळ चर्चेसाठी त्यांना मिळत नव्हता किंवा त्यांच्यासमोर विषय काढण्याचे धैर्य त्यांना होत नव्हते. तसे सभागृहात सांगणे त्यांना सोईचे नव्हते म्हणून ते आमच्याशी चर्चेचे निमित्त सांगत होते. "आमच्याशी चर्चा करतो" असे तेच सभागृहात म्हणाले होते. आम्हाला या कामासाठी भरपूर वेळ असूनही त्यांनी आमच्याशी चर्चा केली नव्हती व तेच सभागृहात प्रश्न पुढे ढकलण्यासाठी निमित्त म्हणून सांगत होते की "आम्ही त्यांच्याशी चर्चा करणार आहोत परंतु अजूनही आमची चर्चा झाली नाही." सकाळी त्यांनी जे निमित्त सांगितले तेच निमित्त दुपारी राज्यमंत्र्यांनी "माननीय नगरविकास मंत्र्यांबरोबरची आपली चर्चा पूर्ण झालेली नाही ती चर्चा झाल्यानंतर त्यामधून काहीतरी निष्पन्न होईल अशी आशा आहे" या शब्दात सांगितले. आमच्या मनातले दुःख मनात गिळून आम्ही हे सर्व ऐकत होतो. खरे म्हणजे आमच्याशी काय कपाळाची चर्चा करावयाची होती? चर्चा करावयाची होती नगरविकासमंत्र्यांना मुख्यमंत्र्यांबरोबर पण वाघाच्या दाढेत हात कोण घालणार? पुढे हे काम जनचळवळीलाच करावे लागले. आपले काहीतरी चुकले आहे, ते दुरूस्त करण्याची आवश्यकता आहे असे नगरविकास मंत्र्यांच्या वागण्यातून स्पष्टपणे दिसून येत होते. **आहे या प्रश्नाचे आहे ते उत्तर देण्याचे धैर्य नगरविकासमंत्र्यांजवळ राहिले नव्हते असा स्पष्ट अर्थ प्रश्न पुढे ढकलण्याच्या त्यांनी स्वतःच केलेल्या विनंतीमधून निघत होता व ही आमच्यासाठी मोठीच आशेची घटना होती.**

**नगरविकास मंत्र्यांचे प्रामाणिक उत्तर**

**१०८.** गुरुवार, दिनांक २६ मार्च १९८७ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील मा. सभापतींनी स्थगित ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक ८०३० हा पुन्हा १० एप्रिल १९८७ रोजी विधानपरिषदेच्या कामकाज पत्रिकेमध्ये पहिल्याच क्रमांकावर समाविष्ट करण्यात आला होता. २६ मार्च १९८७ ला देण्यात आलेले लेखी उत्तर जसेच्या तसे देण्यात आलेले होते. याचा अर्थ स्पष्ट होता तो असा की नगरविकासमंत्र्यांचे मुख्यमंत्र्यांशी बोलणे झाले नव्हते किंवा झाले असल्यास आपले चुकले आहे हे सांगण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते. अनुपुरक चर्चेमध्ये अगदी पहिलाच उपप्रश्न प्रा. बी. टी. देशमुख यांनी पुढील प्रमाणे विचारला.

"अध्यक्ष महाराज, या प्रश्नाला जुनेच उत्तर देण्यात आलेले आहे परंतु मग माहिती विचारण्याच्या हेतूने मी सन्माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारू इच्छितो की, १९८७ च्या जानेवारी महिन्यामध्ये जी. आर. बदलविण्यात आला ही नंतरची गोष्ट झाली. **पण १९८३ च्या जी. आर मध्ये अशी व्यवस्था होती की नाही? की १० टक्के रक्कम ही पाणी पुरवठा मंडळाची योजना असेल तर ती रक्कम पाणी पुरवठा मंडळाने भरावयाची असेल.** कॉर्पोरेशनची योजना असेल तर ती रक्कम कॉर्पोरेशन भरेल. तशी आपण आश्वासनसमिती समोर लेखी कागदपत्रे दिली. नगरविकास सचिवांनी त्याबाबत साक्ष सुद्धा दिलेली आहे, तसेच वित्त सचिवांचेही निवेदन तेथे रेकॉर्ड झालेले आहे. ४ ऑगस्टला मा. नगरविकास मंत्र्यांच्या चेंबरमध्ये आपण स्वतः अध्यक्ष असतांना त्यावेळी जिल्ह्यातील सर्व आमदारांची एक बैठक झाली होती. पालकमंत्रीही होते. त्याही वेळी आपण असे सांगितले की १० टक्के रक्कम ही पाणी पुरवठा मंडळ भरणार आहे हे खरे आहे किंवा नाही?"

आज लपवाछपवी करण्याचा प्रयत्न झाला तर सभागृहात गदारोळ व आपली फजिती झाल्याशिवाय रहाणार नाही याची खात्री असलेल्या नगरविकास मंत्र्यांनी ताडकन उभे राहून "**अध्यक्ष महोदय, हे खरे आहे**" असे प्रामाणिक उत्तर दिले पण ते तेवढ्यावर थांबले नाहीत तर ताबडतोबच त्यांनी आणखी पुढीलप्रमाणे खुलासा केला :-

"पण जानेवारी १९८७ मध्ये या प्रश्नाचा फेरविचार केल्यानंतर शासनाने एक जी. आर. काढलेला आहे तो जी. आर. मी या ठिकाणी वाचून दाखवितो त्या जी. आर मध्ये असे म्हटलेले आहे की, "The Government has decided that in respect to the water supply and sewerage Scheme owned by the Maharashtra Sewerage & Water Supply Board, it will be obligatory for the Urban Local bodies concerned to meet 10% of the total cost of the scheme. This decision comes into being with immediate effect." पूर्वीच्या जी. आर. संबंधी सन्माननीय सभासद श्री. बी. टी. देशमुख म्हणाले तसेच जे काही आश्वासन दिले होते त्या सगळ्यांना कन्सीडर करून जानेवारी १९८७ चा जी. आर. आपण काढला आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १० एप्रिल १९८७ : खंड ७९, क्रमांक १५, पृष्ठ ११)*

**जानेवारी ८७ मध्ये उभे केलेले भूत ऑक्टोबर ८६ मध्ये अंगात आले कसे?**

**१०९.** राज्यभरासाठी १९८३ चा शासन निर्णय आपण २३ जानेवारी १९८७ ला दुरुस्त केला मग एकट्या अमरावतीसाठी ऑक्टोबर १९८६ मध्ये हे भूत (पाणीपुरवठा मंडळाची योजना असली तरी १० टक्के नगरपालिकेने भरले पाहिजे) आपल्या अंगात कसे आले? असा प्रश्न झाला तर "मी भुतावर भरवसा ठेवीत नाही" असे उत्तर आले. या तणावाच्या वातावरणातही गमतीदार प्रश्नोत्तरे झाली ती पुढील प्रमाणे :-

*"**श्री. बी. टी. देशमुख** : अध्यक्ष महाराज, २३ जानेवारी १९८७ ला आपण जी. आर. काढलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, २३ जानेवारी १९८७ ला आपण जी. आर काढला आहे तो मागच्याना सुद्धा लागू होईल. माझा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, १४ ऑक्टोबर रोजी आपण जी. आर. काढला त्यामध्ये असे लिहिलेले आहे की, "**१० टक्के रक्कम वॉटर सप्लाय बोर्ड भरील.**" २७ ऑक्टोबरला पाणी पुरवठ्याचा जो जी.आर. आहे त्यामध्ये हे बदलण्यात आले. माझे असे म्हणणे आहे की १९८७ च्या जानेवारी महिन्यामध्ये आपण जे भूत उभे केले ते २७ ऑक्टोबर १९८६ ला तुमच्या अंगामध्ये कसे आले?*

***Shri. Madu Deolekar :*** *I think the Hon, Minister has not understood the question.*

***Dr. V. Subramanian :*** *If, as a result of my reply to the question, the Hon.member Shri Deolekar feels that I have not understood the question, I may be open to futher enlightenment by him.*

***श्री. मधू देवळेकर :*** *आपल्या अंगात भूत कसे आले हे त्यांना सांगता येणार नाही.*

***श्री. सदानंद वर्दे :*** *मग श्री. मधू देवळेकर, भूत अंगात आणून इनलाईटनमेंन्ट करतील काय?*

***Dr. V. Subramaian :*** *I do not believe in ghost." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १० एप्रिल १९८७ : खंड ७९, क्रमांक १५, पृष्ठ ११)*

**त्याच त्या उत्तरांनी आलेला थकवा**

**११०.** मंत्रीमंडळाने व मा. मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाने नगरविकास मंत्री व राज्यमंत्री हे पूर्णपणे बांधलेले होते. २७ ऑक्टोबरच्या शासन निर्णयाने १४ ऑक्टोबरचा आदेश रद्द केला आहे. एक निर्णय शासनाने घेतला तर दुसरा निर्णय सुद्धा शासनाचा आहे. असे नगरविकासमंत्री तेच तेच पुन्हा पुन्हा सांगत होते. "१० टक्के अमरावती कार्पोरेशनला जर त्यात काही अडचण असेल तर त्याचा विचार करता येईल हा भाग वेगळा आहे. परंतु जेथे जेथे पाणीपुरवठा योजना आपण मंजूर करतो तेथे तेथे १० टक्के कार्पोरेशनकडून घेण्यात येते." असे नगरविकास मंत्र्यांनी म्हणताच रा. सु. गवई यांच्या सारख्या ज्येष्ठ सदस्यालासुद्धा "**आतापर्यंत मा. मंत्र्यांना सांगून मी थकलो**" असे म्हणावे लागले. यावरून उत्तराचा तोच तो पणा किती होता हे सहज लक्षात येईल.

**शेवटी पुन्हा प्रश्न राखून ठेवावा लागला**

**१११.** सर्वश्री. रा. सु. गवई, मधू देवळेकर, सदानंद वर्दे, रामराव आदिक, बी. टी. देशमुख, मनोहर जोशी यांनी बरेच ओढून पाहिले पण मंत्रीमंडळाच्या पातळीवर झालेल्या निर्णयाने बांधल्या गेल्यामुळे मंत्री पुढे सरकत नव्हते. ही गोष्ट पुरतेपणी स्पष्ट झाली तेव्हा मा. सभापती म्हणाले, "त्याचा सगळा काही विचार होऊ शकला असता. तरी सुद्धा प्रश्न स्थगित होता तो लगेच घ्यावा असे होते म्हणून तो आपण घेतला. त्याची आताची जी लिगल पोझीशन आहे ती त्यांनी सांगितली परंतु प्रोसेसमध्ये सभागृहाला दिलेले आश्वासन

नंतर बदललेला भाग या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन पुन्हा काही मार्ग निघतो का हे पाहिले पाहिजे. मला वाटते हा प्रश्न येथे थांबवावा. मधल्या काळात याबाबत आपण चर्चा करा" **"आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. हा प्रश्न पुढच्या सेशनला येईल. दरम्यानच्या काळात यामधून काही मार्ग निघतो का ते पहा म्हणून हा प्रश्न मी आता थांबवून ठेवतो आहे." असे मा. सभापतींनी सांगितले.** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १० एप्रिल १९८७ : खंड ७९, क्रमांक १५, पृष्ठ १५)*

*************************************************

## ११
## जनआंदोलनाचा टप्पा

*************************************************

### "२९ एप्रिल १९८७ - अमरावती बंद" चा कार्यक्रम घोषित झाला

**११२.** दिनांक १० एप्रिल १९८७ रोजी सभागृहामध्ये झालेल्या चर्चेतील प्रश्नोत्तरातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, १० टक्के लोकवर्गणी अमरावती महानगरपालिकेवर बसविण्याचा निर्णय हा मा. मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाच्या पातळीवर निश्चित झाला असून केवळ तर्कशुद्ध चर्चेच्या आधारावर नगरविकासमंत्री सभागृहामध्ये त्यात बदल करतील ही गोष्ट अशक्य आहे. सभागृहातील ही तर्कदुष्ट वागणूक जनमानसापर्यंत पोहोचविल्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग शिल्लक उरलेला नव्हता. अधिवेशन संपण्याच्या दिवशी दि. १० एप्रिल १९८७ रोजी मुंबई येथे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. रा. सु. गवई यांच्या विधानभवनातील कार्यालयात विधानमंडळ सदस्य सर्वश्री रा. सु. गवई, सुदाम देशमुख, प्रा. बी. टी. देशमुख व पु. ब. सोमवंशी यांची बैठक झाली व त्यांनी **"शासनाने दिलेला शब्द पाळला नाही याबद्दल संताप व्यक्त करण्यासाठी दि. २९ एप्रिल १९८७ रोजी सर्व पक्ष व संघटनांच्या वतीने अमरावती बंदचा कार्यक्रम घोषित करण्यात येत आहे. त्या दिवशी १०.०० वाजता शासनाच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी काळ्या फिती लावून मुकमोर्चा अमरावती येथे काढला जाईल"** असा कार्यक्रम एका प्रसिद्धी पत्रकान्वये मुंबईहून घोषित केला. मुंबईहून वरील आमदारांच्या सहीचे पत्रक प्रसिद्ध करण्यात आले व ते पत्रक फोनद्वारे दैनिक "हिंदुस्थान"चे संपादक डॉ. अरुण मराठे व दैनिक "नागपूर टाईम्स"चे जिल्हा वार्ताहर श्री. श्याम देशपांडे यांना देण्यात आले. हे पत्रक श्री. श्याम देशपांडे यांनी अमरावतीतील सर्व वृत्तपत्रांना प्रसिद्धीसाठी दिले. या पत्रकानुसार "दि. २९ एप्रिल १९८७ रोजी अमरावती बंद आणि काळ्या फिती लावून मूक मोर्चा" या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दि.१७ एप्रिल, १९८७ रोजी नागरिकांची सभा आणि तत्पूर्वी १४ एप्रिल १९८७ रोजी एक पत्रपरिषद आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. या पत्रपरिषदेची जबाबदारी श्री. प्रभूदयाल जयस्वाल यांचेकडे सोपविण्यात आली. तर शहरातील विविध संस्था, पक्ष, व्यावसायिक स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी संस्था तसेच सामाजिक कार्यकर्ते व प्रतिष्ठित व्यक्ती यांची सभा आयोजित करण्याचे काम सर्वश्री डॉ. अरुण मराठे, श्याम देशपांडे, प्रभूदयाल जयस्वाल व श्री. किसनसेठ लोहिया यांचेकडे सोपविण्यात आले.

### १४ एप्रिलची पत्रकार परिषद

**११३.** १० एप्रिल १९८७ रोजी संपलेले उन्हाळी अधिवेशन आटोपून आम्ही सर्व आमदार अमरावतीला परत आलो. ठरल्याप्रमाणे १४ एप्रिल १९८७ रोजी अमरावती येथे नगरवाचनालयामध्ये एका पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेला आमदार सुदाम देशमुख, प्रा. बी. टी. देशमुख व डॉ. देविसिंह शेखावत हे तीन विधानमंडळ सदस्य उपस्थित होते. "लोकशाहीत प्रश्न सोडविण्याचे दोन मार्ग असतात. एक सभागृहाच्या पटलावर शासन दरबारात आणि दुसरा लोकांसमोर जाऊन जन-दरबारात. पाणीपुरवठ्यासंबंधीचा प्रश्न आता शासन दरबारात जवळ जवळ संपला आहे. तेव्हा लोकांनी या प्रश्नाबाबत आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करणे आवश्यक झाले आहे व त्यासाठी हा प्रश्न जन-दरबारात येत आहे. जनतेच्या प्रतिक्रिया समोर याव्यात म्हणूनच २९ तारखेला अमरावती बंदचे आवाहन करण्यात आले आहे. तेव्हा नागरीकांनी उत्स्फूर्तपणे या बंदमध्ये सहभागी व्हावे व जिल्हा कचेरीवर जाणाऱ्या मूक मोर्चात सामील व्हावे. हा बंद पूर्णतया शांतपणे पार पडेल व त्या दिवशी शहरातील वाहतुकीसह सर्व व्यवहार बंद राहील." असे या तीनही विधानमंडळ सदस्यांनी पत्रकारांना सांगितले.

**११४. भाई सुदाम देशमुख** यांनी असे सांगितले की, "अमरावती महापालिका अगोदरच आर्थिक अडचणीत आहे. तिला स्वतःचा कारभारच पेलणे अशक्य आहे. याची पूर्ण जाणीव असूनही हा बोजा टाकण्यात येत आहे याचा परिणाम एकच होईल की, महापालिका लोकवर्गणीचे ५ कोटी रूपये भरू शकणार नाही व अमरावतीला अप्पर वर्धाचे पाणी कधीच मिळू शकणार नाही. हे शहर अक्षरशः तहानेने तडफडेल. आजच या शहराचा पाणी पुरवठा कूपनलिकांवर अवलंबून आहे आणि या कूपनलिकांची पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे. भूगर्भातील पाण्याच्या उपलब्धतेला काही मर्यादा आहे तो पाणी साठा संपला तर.... आणि या तरची जाणीव आज आपण करून घेतली पाहिजे व या जाणीवेचे प्रकटीकरण २९ च्या बंदने करावयाचे आहे." **आमदार श्री. बी. टी. देशमुख** यांनी "सरकारने गेल्या अधिवेशनात विधानपरिषदेत आपली भूमिका कशी बदलविली याची उदाहरणे म्हणून सभागृहातील कामकाजाची उद्धरणेच दिलीत आणि सरकारला त्यांच्या अडेल धोरणापासून हटविण्याचा एकमेव अधिकार आता जनतेच्या हाती आला आहे" असे सांगून २९ तारखेचा बंद अभूतपूर्व असा करण्याचे आवाहन केले. आमदार देशमुख यांनी विधानपरिषदेमधील चर्चेतील सरकारने भूमिका बदलल्याचे निरनिराळे ५ पुरावे पत्रकारांना सादर केलेत.

**११५. डॉ. देविसिंह शेखावत** यांनी पत्रकारांना असे सांगितले की "अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न नागरिकांच्या जीवनाशी आणि शहराच्या विकासाशी निगडित आहे. तो सोडवितांना कोणताही वाद, राजकीय आकस अगर राजकारण आड येऊ शकत नाही. अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्याच्या प्रश्नासंबंधाने आम्हा आमदारांना मुळीच विश्वासात घेण्यात आलेले नाही. आमचे म्हणणेही ऐकून घेतलेले नाही. जनतेच्या हितापेक्षा वेगळे हित लोकप्रतिनिधीचे असू शकत नाही. २९ एप्रिल १९८७ रोजी होणाऱ्या अमरावती बंद आंदोलनामध्ये मी जनतेसोबत आहे." अमरावती शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष **श्री. देवराज बोथरा** यांनी या पत्रकार परिषदेमध्ये असे सांगितले की "शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न हा पूर्णतया राजकारणातीत व पक्षातीत आहे याची पूर्ण जाणीव ठेवून आम्हीही या आंदोलनापासून अलिप्त राहणार नाही व सर्वस्वाने त्यात सामील होऊ. कोणीही यात राजकारण आणू नये व "नागरिक तेवढा एक" म्हणून या बंदमध्ये सामील व्हावे."

**११६.** या बंदची पूर्व तयारी म्हणून येत्या १७ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता नगर वाचनालयाच्या गच्चीवर सर्व नागरिकांची एक सभा बोलावली आहे. या सभेला सर्व नागरिक, व्यापारी मंडळे, स्वयंसेवी संघटना यांना निमंत्रित केले जात आहे. या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहनही या आमदारांनी नागरिकांना केले.

### कृतिसमितीची स्थापना १७ एप्रिल १९८७

**११७.** घोषित केल्याप्रमाणे "दिनांक २९ एप्रिल, १९८७ रोजी अमरावती बंद आणि मूक निषेध मोर्चा" कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दि. १७ एप्रिल, १९८७ रोजी अमरावती येथील सर्व राजकीय पक्ष, व्यावसायिक संघटना, स्वयंसेवी संघटना, नोकर संघटना आणि शहरातील विविध सामाजिक कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक यांची एक सभा अमरावती नगर वाचनालयाच्या गच्चीवर दि. १७ एप्रिल, १९८७ रोजी झाली. **सभेच्या अध्यक्षस्थानी आमदार भाई सुदाम देशमुख होते.** सभेला शहरातील विविध संस्था, राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते मिळून सुमारे ३५० ते ४०० अमरावतीकर नागरिक उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला अमरावतीचे आमदार डॉ.देविसिंह शेखावत यांनी अमरावतीच्या पाणी पुरवठा योजनेच्या संबंधी भूमिका स्पष्ट केली व पाणी पुरवठ्याचा प्रश्न हा पक्षातीत असून या प्रश्नासाठी होणाऱ्या कुठल्याही जनआंदोलनाला आपला सक्रीय पाठींबा असल्याचे जाहीर केले. विधान सभा आणि विधान परिषदेत वेळोवेळी आश्वासने देऊनही सरकारने आपला शब्द बदलला, व १० टक्के लोकवर्गणीची रक्कम महानगरपालिकेवर लादली. यामुळे हा प्रश्न जनतेसमोर मांडण्याची आवश्यकता यावेळी आमदार डॉ. शेखावत यांनी स्पष्ट केली.

**११८.** त्यानंतर आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांनी अमरावती पाणीपुरवठा योजनेच्या बाबतीत विधान परिषदेत झालेल्या चर्चा, सरकारने वेळोवेळी दिलेली आश्वासने, आश्वासन समितीसमोर झालेली चर्चा आणि लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाबाबत केलेले प्रयत्न विषद केले. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने विधान परिषदेत अमरावती पाणीपुरवठ्याचा प्रश्न एका टोकाला पोहोचला असल्यामुळे अंतिम सत्ता जनतेच्या हाती असणे या सूत्रानुसार या प्रश्नासाठी दि.२९ एप्रिल, १९८७ रोजी अमरावती बंद आणि काळ्या फिती लाऊन मूक निषेध मोर्चा हे कार्यक्रम जाहीर करण्यात आल्याची माहिती दिली. त्यानंतर माजी राज्यमंत्री श्री. सुरेंद्र भुयार, कॉम्रेड मधुकर इंगळे, ॲड. देवराज बोथरा, बाबासाहेब मोहोड, प्रभाकरराव वैद्य आदि वक्त्यांनी या सभेत आपले विचार व्यक्त करुन बंद व मूक मोर्चा या कार्यक्रमाला पाठिंबा दिला.

**११९.** पाणी पुरवठा प्रश्नासाठी आयोजित करण्यात आलेले अमरावती बंद व मूक मोर्चा हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमरावतीकर नागरिकांची एक नागरिक कृती स्थापन करण्याचे ठरले. या कृती समितीचे अध्यक्ष म्हणून आमदार भाई सुदाम देशमुख तर सचिव म्हणून श्री. श्याम देशपांडे यांची

सर्वानुमते निवड करण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील सर्व खासदार, सर्व आमदार आणि अमरावती शहरातील सर्व पत्रकार या कृतीसमितीचे सदस्य राहतील. कृती समितीमध्ये प्रत्येक राजकीय पक्षाचे दोन प्रतिनिधी राहतील. शहरातील सर्व व्यावसायिक तसेच व्यापारी संघटना व नोकर संघटना यांचा एक प्रतिनिधी कृती समितीमध्ये राहील असेही यावेळी सर्वानुमते ठरविण्यात आले.

**१२०.** यानंतर या सभेने अमरावती पाणी पुरवठ्याच्या प्रश्न व २९ एप्रिलचा बंद व मुक मोर्चा यासंबंधी खालील ठराव चर्चा करुन मंजूर केले. :

"१. अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरविण्याच्या योजनेच्या बाबत शासनाने अतिशय उदासिनतेचे, निष्क्रियतेचे व या शहराच्या द्वेषाचे धोरण स्वीकारले आहे. "१० टक्के लोकवर्गणीची रक्कम ही योजना पाणीपुरवठा मंडळाची असल्यामुळे मंडळाने भरावयाची" असे शासन आदेश असतांना, तसे पाणीपुरवठा मंडळाने कबूल केले असतांना, शासनाने तसे आश्वासन समिती समोर कबूल केले असतांना, समितीच्या अहवालामध्ये तसे स्पष्ट नमूद असतांना, सभागृहामध्येही तसे कबूल केलेले असतांना, मुख्यमंत्र्यांनी सुद्धा तत्वतः या योजनेला मान्यता दिली आहे, असे ५ ऑगस्ट १९८६ रोजी सभागृहामध्ये शासनाने सांगूनसुद्धा कबूल केल्याप्रमाणे शासनाने दसऱ्याच्या अगोदर या योजनेच्या कामाला सुरुवात तर केली नाहीच पण "२३ जानेवारी १९८७ ला १० टक्के रक्कम महानगरपालिकेने भरावी" अशी दुरुस्ती मूळ आदेशात करणारे शासन आदेश काढले. **याबद्दल ही सभा तीव्र संताप व्यक्त करीत आहे.**

२. शासनाने दिलेला शब्द पाळला नाही याबद्दल संताप व्यक्त करण्यासाठी दिनांक २९ एप्रिल १९८७ रोजी सर्व राजकीय पक्ष, सर्व व्यावसायिक संघटना सर्व स्वयंसेवी संघटना, सर्व नोकर व कर्मचारी संघटना तसेच अमरावतीकर नागरिकांच्या वतीने "अमरावती बंद" चा कार्यक्रम घोषित करण्यात येत आहे. १० वाजता **शासनाच्या या धोरणाचा निषेध करण्यासाठी काळ्या फिती लावून मूक मोर्चा काढला जाईल.**

३. पाणी टंचाईच्या संदर्भात महाराष्ट्रातील कोणत्याही महानगरपालिकेत अस्तित्वात नाही इतकी बिकट परिस्थिती अमरावती महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात आहे व प्रसंगी गाव उठविण्याची पाळी येऊ शकेल अशी स्थिती आहे हे शासनाने सभागृहामध्ये कबूल केले असतांना सुद्धा महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्याच्या आर्थिक आकृतीबंधाच्या शासन आदेशामध्ये या शहराची पाणी पुरवठा योजना अस्तित्वातच येऊ शकणार नाही अशा प्रकारचा बदल जानेवारी १९८७ मध्ये करण्याचा जो प्रयत्न शासनाने केला आहे **त्याबद्दल ही सभा तीव्र विरोध नोंदवित आहे.**

४. सभागृहामध्ये शासनाने आश्वासन दिले, मुख्य मंत्र्यांनी तत्वतः मान्य केले, असे ज्या दिवशी सांगण्यात आले (५ ऑगस्ट १९८६) त्या दिवशी जे शासन आदेश अस्तित्वात होते त्या शासन आदेशाप्रमाणेच या शहराची पाणी पुरवठा योजना अस्तित्वात आली पाहिजे व योजनेचे काम पूर्ण होईपर्यंत पाणी पुरवठा महानगरपालिकेकडे सुपूर्त करण्याचा कोणताही प्रयत्न शासनाने करू नये, लोकनियुक्त महानगरपालिका येईस्तोवर विद्यमान स्थितीमध्ये बदल करण्याचा कोणताही प्रयत्न शासनाने करू नये. तसे झाल्यास या शहरातील सर्व नागरीक **सर्व शक्तीनिशी शासनाचा हा प्रयत्न हाणून पाडतील असा निर्धार ही सभा व्यक्त करीत आहे."**

श्री. श्याम देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. नंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

## कृतिसमितीने थोड्या दिवसात वेगाने केलेली कामगीरी

**१२१.** १० एप्रिल १९८७ ला आंदोलनाचा कार्यक्रम घोषित झाला, त्यानुसार २९ एप्रिल ८७ रोजी अमरावती बंद चे आवाहन यशस्वी करावयाचे म्हणजे अवघ्या १९ दिवसात ही सारी जुळवाजळव कृती समितीला करावयाची होती. वर वर्णन केलेली कृतीसमितीची बैठक १७ एप्रिलला पार पडल्यानंतर समितीने अतिशय वेगाने आपल्या कामाला सुरुवात केली. दर दुसऱ्या दिवशी सायंकाळी कृती समितीची बैठक महापालिकेच्या सभागृहात होत असे. सभेची वेळ ठरलेली होती. स्थळ ठरलेले होते व २२, २४, २६ व २८ एप्रिल या तारखांना बैठकी घ्यावयाच्या हेही समितीने २० एप्रिल १९८७ च्या बैठकीत ठरवून टाकले होते. या बैठकीमधुन कृती समितीने केलेले काम, घेतलेले निर्णय यांचा तपशील पुढील परिच्छेदातून दिलेला आहे. हा तपशील मुख्यत्वेकरून समितीचे सचिव श्री. श्याम देशपांडे यांनी तयार केलेल्या समितीच्या सभांच्या कार्यवृत्ताची जी प्रत माझ्या दप्तरी आहे त्यावर आधारित आहे.

## २० एप्रिल १९८७ : कृती समितीची बैठक

**१२२.** अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्याच्या संबंधात सर्व पक्ष व सर्व व्यावसायीक संघटना सर्व स्वयंसेवी संघटना आणि अमरावतीकर नागरिकांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृती समितीची बैठक २० एप्रिल १९८७ रोजी सायंकाळी महानगर पालिकेच्या सभागृहात **समितीचे अध्यक्ष आमदार सुदाम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाली** व त्यात पुढील निर्णय घेण्यात आले.:-

(१) दिनांक २९ मार्च रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आलेला मूक मोर्चा नेहरु मैदानातील शहीद स्मारकाजवळून निघून तो राजकमल चौक, श्याम चौक, सरोज चौक, जयस्तंभ चौक, नेताजी सुभाषचंद्र चौक, सामान्य रुग्णालय चौक या मार्गे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करेल. (२) मोर्चात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी ६ इंच लांब व सुमारे दिड/दोन इंच रुंद काळी फित प्रत्येकाच्या उजव्या दंडावर उलट्या व्ही च्या आकाराने लावावी. (३) मोर्चामध्ये फक्त "लोकवर्गणी भरणार नाही, पाणी घेतल्याशिवाय राहणार नाही" हे घोषवाक्य असणारे फलक राहतील. (४) कृती समितीचे संपर्क कार्यालय दैनिक हिंदुस्थान, खापर्डे बगिचा येथे राहील. दि. २९ ला अमरावती बंद असल्यामुळे तसेच विविध संस्था आणि संघटनांनी या बंदला पाठिंबा दिला असल्यामुळे दि. २९ रोजी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपआपला शेतमाल त्या दिवशी बाजारात विक्री करीता आणू नये. परीक्षार्थी, रुग्णालये, पाणीपुरवठा यांना बंदमधून वगळण्यात यावे. (५) कृती समितीच्या अध्यक्ष व सचिवांची नेमणूक कृती समितीने १७ एप्रिलच्या बैठकीतच केली होती. इतर पदाधिकाऱ्यांची निश्चिती आजच्या बैठकीत करण्यात आली. समितीचे पदाधिकारी पुढील प्रमाणे :- ***अध्यक्ष :-*** कॉ. सुदाम देशमुख, ***उपाध्यक्ष :-*** श्री. रा. सु. गवई, श्री. रावसाहेब कुंडकर, मौलाना सफदर, आमदार डॉ. देविसिंग शेखावत व आमदार श्री. पु. ब. सोमवंशी, ***प्रमुख निमंत्रक :-*** प्रा. बी. टी. देशमुख, ***सचिव :-*** श्री. श्याम देशपांडे, ***सहसचिव :-*** डॉ. अरुण मराठे, किसनलाल लोहीया, ***कोषाध्यक्ष :-*** श्री. चंद्रकांत कलोती (६) अमरावती बंद, मूक मोर्चा आणि पाणी पुरवठ्याचा प्रश्न या संदर्भात व्यापक प्रसिद्धी व वातावरण निर्मिती यासाठी अमरावतीकर पत्रकार व वृत्तपत्रे यांचा सहयोग मिळवावा म्हणून प्रसिद्धी समिती नेमण्याचे ठरविण्यात येवून या समितीचे निमंत्रक म्हणून श्री. प्रभुदयाल जयस्वाल व श्री. नानक आहूजा यांची नियुक्ती करण्यात आली. (७) कृती समितीच्या पुढील बैठकी दिनांक २२,२४,२६ व २८ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता महानगरपालिकेच्या सभागृहात व्हाव्यात असे ठरविण्यात आले. (८) समितीच्या कामकाजासंबंधीची आवश्यक निवेदने, लेख, पोस्टर्स, पत्रके तयार करुन ती प्रसिद्ध करण्याची जबाबदारी आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांचेवर सोपविण्यात आली.

झालेल्या सविस्तर चर्चेत सर्वश्री श्रीकृष्ण आडकीने, मोतीलालाजी ककरानीया, जनक कड्डू, रामदास पाटील, ॲड. देवराज बोथरा, देवदत्त शर्मा, राजेंद्र लुणावत, प्रमोद वानखडे, अरुण वरणगावकर, बी. डी. भुसे, किसनलाल लोहिया, डॉ. अरुण मराठे, नामदेवराव मोहोड आदींनी भाग घेऊन विविध सूचना मांडल्या.

## २२ एप्रिल १९८७ : कृती समितीची बैठक

**१२३.** दिनांक २० एप्रिल १९८७ रोजी ठरल्याप्रमाणे नागरिक कृती समितीच्या सदस्यांची बैठक दिनांक २२ एप्रिल, १९८७ रोजी महानगर पालिकेच्या सभागृहात संपन्न झाली. **सभेच्या अध्यक्षस्थानी कृती समितीचे सदस्य ॲड. देवराज बोथरा हे होते.** सभेच्या सुरुवातीला श्याम देशपांडे यांनी दिनांक २० एप्रिलच्या सभेनंतर पार पाडलेल्या कामांचा अहवाल सादर केला, त्यात श्री. श्याम देशपांडे यांनी खालील गोष्टी नमूद केल्यात. :-

(१) दिनांक २० एप्रील १९८७ च्या सभेत ठरल्याप्रमाणे दिनांक २९ एप्रिल १९८७ रोजी शेतकऱ्यांनी आपला शेतमाल आणि भाजीपाला विक्रीस अमरावती बाजारात आणू नये अशा सूचना शेतकऱ्यांना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे जाहीर विनंती वृत्तपत्रातून प्रसिद्ध केल्या गेली. (२) दिनांक २९ एप्रिल, १९८७ च्या बंदच्या संदर्भात काळ्या फितीसाठी आवश्यक ती जबाबदारी बँक कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. बाबासाहेब खेडकर यांनी घेतली. याशिवाय पान पेटारे असोसिएशन, हमाल कामगार संघटना, सराफा असोशिएशन, धान्य बाजार संघटना आदि संघटनांशी बंदच्या संदर्भात संपर्क साधण्याची जबाबदारी श्री.बाबासाहेब खेडकर यांनी घेतली. (३) समितीचे सहसचिव डॉ. अरुण मराठे यांचेशी झालेल्या बोलण्यानुसार दिनांक २९ च्या बंदसाठी संपूर्ण शहरात लाउडस्पिकरद्वारे प्रचार सुरु करण्याचे श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने मान्य केले. त्यानुसार बंदचा प्रचार सुरू झाला आहे. अनेक उपस्थित सदस्यांनी यावेळी आपण स्वतः हा प्रचार ऐकल्याचे व ठरल्याप्रमाणे तो योग्य असल्याचे सांगितले (४) दिनांक २९ एप्रिल ८७ रोजी सकाळी लाउडस्पिकरवरुन मोर्चा व बंदचा प्रचार करण्याची जबाबदारी येथील सामाजिक

कार्यकर्ते श्री. वसंतराव साउरकर आणि दिपक हुंडीकर यांनी स्वीकारली आहे.

(५) दिनांक २९ एप्रिलचा बंद आणि काळ्या फिती लावून मूक मोर्चा, येणारे पाठिंबे आणि मोहल्ल्या मोहल्ल्यातून होणाऱ्या सभा यांची प्रसिद्धी देण्याची जबाबदारी श्री. नानक आहूजा व प्रभुदयाल जयस्वाल पार पाडत असून पाणी प्रश्नाबाबत प्रसिद्धी माध्यमांचे सहकार्य मिळविण्यासाठी श्री. आहूजा व प्रभुदयाल जयस्वाल यांचेशी संपर्क साधण्यात यावा. (६) निवेदन व पोस्टरचा मजकूर तयार झाला असून निवेदन व पोस्टर छपाईसाठी दिले आहेत.

कृतिसमितीच्या सदस्यांनी दि. २८ एप्रिल रोजीपासून आपापल्या विभागात संपर्क साधून वातावरणनिर्मिती करावी आणि दि. २९ एप्रिलची त्या त्या विभागाची जबाबदारी घेऊन बंद व मोर्चा यशस्वी करावा. या सभेत मुख्य ठिकाणांचा प्रामुख्याने विचार होऊन जबाबदाऱ्या, सांगोपांग चर्चेनंतर निश्चित करण्यात आल्या. त्या पुढील प्रमाणे :- (१) गाडगे नगर : श्री. सुरेंद्र भुयार, राजेंद्र इंगोले (२) राजापेठ : श्री. हरिहर दातेराव, श्री. बल्लुसिंह झवेरी, श्री. उमाळे, श्री. गोपाल भेरडे (३) मोतीनगर : श्री. विनोद देशमुख, डॉ. शर्मा, श्री. जावरकर (४) रुक्मिणीनगर : श्री. दिवाकर अंबुलकर, श्री. चिठोरे, श्री. जनक कडू, श्री. सुरज राजपूत (५) बडनेरा : श्री. हरिश्चंद्र कनोजिया, श्री. पुरुषोत्तम येते, श्री. पी. ए. सावरकर (६) दस्तुरनगर-कंवरनगर : श्री. अनिल तरडेजा (७) जेवड : श्री. मुकुंद विंचुरकर, श्री. सुभाष शिंगरू (८) नवाथे प्लॉट्स : श्री. डी. बी. भुसे, श्री. प्रभाकर शेळके (९) अंबागेट व आतील भाग : श्री. वसंतराव साउरकर, श्री. दिपक हुंडीकर

विविध संस्था आणि व्यापारी संघटनांचा बंद मध्ये सहभाग मागण्यासाठी त्यांचेशी संपर्क साधण्याचे ठरविण्यात येऊन ती जबाबदारी सर्वश्री ॲड. देवराज बोथरा, डॉ. अरूण मराठे, राजेंद्र लुणावत, देवदत्तजी शर्मा, शंकरराव हिंगासपुरे, वसंतराव साउरकर यांचेवर टाकण्यात आली. अमरावती नगर परिषदेचे माजी नगरसेवक आणि त्या त्या विभागातले सामाजिक कार्यकर्ते यांना या जनआंदोलनात सहभागी करून घेण्यासाठी त्यांना दि. २४ च्या सभेसाठी निमंत्रित करण्यात यावे असे यावेळी ठरविण्यात आले. सभेमध्ये झालेल्या चर्चेत सर्वश्री रामदास पाटील, सुरेश शुक्ला, किसनलाल लोहिया, डॉ. अरुण मराठे, नानक आहुजा यांनी भाग घेतला.

## २४ एप्रिल १९८७ : कृती समितीची बैठक

**१२४.** अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या प्रश्नासाठी स्थापन झालेल्या नागरिक कृति समितीची बैठक दिनांक २४ एप्रिल १९८७ रोजी सायंकाळी ७ वाजता महानगरपालिकेच्या सभागृहात संपन्न झाली. **सभेच्या अध्यक्षस्थानी कृतिसमितीचे अध्यक्ष आमदार भाई सुदाम देशमुख होते.** सभेच्या सुरुवातीला सचिव श्री श्याम देशपांडे यांनी दि २२.४.१९८७ च्या सभेनंतर झालेल्या कामांची माहीती दिली.

यानंतर सभेला उपस्थित असलेल्या माजी नगरसेवकांपैकी प्रा. बी. जी. कडू, डॉ. बजाज, श्री पुरूषोत्तम येते, यांनी सभेपुढे आपले विचार व्यक्त करून अमरावती पाणी पुरवठा योजनेबाबत जाहीर करण्यात आलेल्या अमरावती बंद आणि काळ्या फिती लावून मूक निषेध मोर्चा या कार्यक्रमाला समर्थन दिले.

सभेसमोर तातडीने विचार करण्यासाठी खालील बाबी यावेळी अध्यक्षांतर्फे मांडण्यात आल्या. (१) दि. २५ एप्रिल रोजी होणारी जिल्हा टंचाई व पाणी पुरवठा समितीची सभा, आणि (२) अमरावती जिल्ह्यातील काही खासदार व आमदारांना मा. मुख्यमंत्र्यांचे अमरावती पाणी पुरवठा प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी आलेले निमंत्रण.

वरील दोन्ही विषयांचे महत्व समजावून सांगतांना समितीचे अध्यक्ष आम. सुदाम देशमुख यांनी दि. २५ एप्रिल रोजी होणाऱ्या पाणी टंचाई समितीच्या बैठकीत, अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेचा प्रश्न चर्चेला येण्याची शक्यता असून दहा टक्के लोकवर्गणीच्या प्रश्नात काहीतरी तोडगा या समितीत सुचविला जाणार असल्याने लोकवर्गणीच्या प्रश्नाबाबत समितीने कृतिसमितीच्या सभासदांना मार्गदर्शन देण्याचे ठरवावे, कारण कृति समितीतील अनेक माननीय सदस्य टंचाई समितीचे सभासद आहेत तसेच मा. मुख्यमंत्र्यांनी जिल्ह्यातील खासदार आणि आमदार यांना चर्चेसाठी बोलाविल्यामुळे या निमंत्रणावर विचार होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

यानंतर दिनांक २५ एप्रिल १९८७ रोजी होणारी पाणी टंचाई समितीची बैठक यासंबंधी खालील निर्णय घेण्यात आला. :-

"दहा टक्के लोकवर्गणीच्या संदर्भात कोणताही तोडगा मांडण्याचा प्रयत्न झाल्यास, तसेच **लोकवर्गणीची रक्कम उघड किंवा छुप्या मार्गाने लादण्यात येत असल्यास असा कोणताही प्रयत्न मान्य करू नये.** तसेच उद्याच्या पाणी टंचाई समितीच्या सभेत अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेबाबत काम तहकुबीची सूचना देण्याचा टंचाई समितीचे जे सदस्य कृतिसमितीचेही सदस्य आहेत त्यांनी प्रयत्न करावा."

## मुख्यमंत्र्यांचे निमंत्रण

अमरावती पाणी पुरवठा योजनेबाबत चर्चा करण्यासाठी, अमरावती महानगर पालिकेचे प्रशासक श्री. म. ल. पेंडसे यांच्यामार्फत अमरावती जिल्ह्यातील काही खासदार आणि आमदारांना मा. मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी निमंत्रित केले असून निमंत्रितात शिक्षण मंत्री प्रा. राम मेघे, विरोधी पक्ष नेता व समितीचे उपाध्यक्ष श्री रा. सु. गवई, आम. डॉ. देविसिंग शेखावत, आम. डॉ. अनिल वऱ्हाडे, आम. ॲड. यशवंत शेरेकर, आम. प्रा. बी. टी. देशमुख आणि खासदार सौ. उषाताई चौधरी यांचा समावेश असल्याचे सभेला सांगण्यात आले. मा. मुख्यमंत्र्यांनी अमरावती महानगर पालिकेच्या प्रशासकामार्फत पाठविलेले निमंत्रण कृति समितीचे सदस्य आम. प्रा. बी. टी. देशमुख यांनी त्यानंतर सभागृहाला वाचून दाखविले. प्रा. बी. टी. देशमुख यांनी त्यानंतर सभेत अशी माहिती दिली की "मा. मुख्यमंत्र्यांनी अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेच्या प्रश्नात लक्ष घातले परंतु - (१) मा. मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी दिलेली तारीख २८ एप्रिल १९८७ म्हणजे अतिशय उशीर करून ही चर्चा आयोजित केली तसेच (२)नागरिक कृतिसमितीचे अध्यक्ष, स्वतः आमदार असूनही त्यांना निमंत्रित केलेले नाही. पर्यायाने कृतिसमितीलाच निमंत्रण नाही असा याचा अर्थ होतो"

त्या अनुषंगाने कृतिसमितीने मा. मुख्यमंत्र्यांनी दि. २८ एप्रिल रोजी आमदार व खासदार यांचेशी चर्चा करण्याबाबत पाठविलेल्या निमंत्रणासंबंधी खालील ठराव मंजूर केला :

"**ठराव :** काही आमदार व खासदारांची सभा मा. मुख्यमंत्र्यांनी दि. २८.४.८७ रोजी बोलावली आहे असे समितीला समजले. मा. मुख्यमंत्र्यांनी याबाबत लक्ष घातले याबद्दल समिती समाधान व्यक्त करीत आहे. तथापि ही बैठक २८ एप्रिल सारख्या अतिशय उशीराच्या तारखेला बोलाविली जावी ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. याबाबतची उपयुक्त चर्चा ही कृतिसमितीशीच होऊ शकते याची स्पष्ट जाणीव असतांना **व कृतिसमितीचे अध्यक्ष आमदार असतांनाही त्यांना बोलावण्यात आले नाही याबद्दल ही कृतिसमिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. उपरोक्त परिस्थितीत कृतिसमितीच्या अध्यक्षांना यथोचित निमंत्रणाशिवाय झालेली चर्चा व त्या चर्चेत झालेले निर्णय कृति समितीवर बंधनकारक राहणार नाही. असे स्पष्ट करण्यात येत आहे.**"

त्यानंतर राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे सचिव श्री. राजाभाऊ जोशी यांनी राज्य सरकारी-निमसरकारी कर्मचारी संघटनेची भूमिका विषद करून अमरावती शहरातील सर्व **राज्य सरकारी कर्मचारी दि. २९ च्या मूक मोर्चात सामिल होतील आणि दि. २९ रोजी काळ्या फिती लाऊन काम करतील असा निर्णय संघटनेतर्फे घेण्यात आला असल्याची माहिती दिली.**

## मा. मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीस हजर राहण्यास बी. टी. देशमुख यांचा नकार

**१२५.** "मा. मुख्यमंत्र्यांनी आमरावती शहराच्या पाणीपुरवठ्यासंबधी एक बैठक मुंबई येथील त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक २८ एप्रिल १९८७ रोजी दुपारी २.१५ वाजता बोलाविलेली आहे आपण या बैठकीला अवश्य उपस्थित रहावे" अशी विनंती करणारे एक पत्र (क्रमांक अमनपा/प्रशा/९८/८७, दिनांकित २३.४.१९८७) प्रा. बी. टी. देशमुख यांना प्रशासक अमरावती महापालिका यांच्या सहीने २३ तारखेला देण्यात आले होते. २४ तारखेच्या कृतिसमितीच्या बैठकीत या प्रत्रावर विचार होऊन निर्णय झाल्यानंतर प्रा. बी. टी. देशमुख यांनी दिनांक २५ एप्रिल १९८७ रोजी प्रशासक महापालिका अमरावती यांना एक पत्र (क्रमांक एलसीएफ/एफ/२०३ दिनांक २५.४.१९८७) पाठवून आपली भूमिका कळविली. प्रशासकांनी २३ तारखेला दिलेल्या पत्राचा संदर्भ देऊन प्रा. बी. टी. देशमुख यांनी प्रशासकांना असे कळविले होते की :-

"आपले संदर्भाधिन पत्र मिळाले. आभारी आहे. अमरावती पाणी पुरवठ्याच्या संदर्भात मा. मुख्यमंत्र्यांनी २८ एप्रिल १९८७ रोजी दुपारी २.१५ वाजता या जिल्ह्यातील काही आमदार व खासदार यांची सभा बोलाविली आहे हे या पत्रावरुन कळले. अमरावतीकर जनतेच्या अतिशय महत्वाच्या प्रश्नामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घातले याबद्दल मला मनापासून आनंद वाटला. तथापि याबाबत काल सायंकाळी अमरावती येथे कृती समितीच्या बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी २८ एप्रिल सारख्या उशिराच्या तारखेला ही सभा बोलवावी याबद्दल खेद व्यक्त करण्यात आला. काही आमदार व खासदार यांना या सभेकरीता बोलाविले असले तरी **कृतिसमितीचे अध्यक्ष भाई सुदाम देशमुख हे आमदार असूनही त्यांना बोलाविले नाही याबद्दल काल झालेल्या कृतिसमितीच्या बैठकीत तीव्र नापसंती व्यक्त करण्यात आली आहे** व त्यामुळेच कृती समितीच्या सदस्यांनी या चर्चेत सहभागी होऊ नये असेही कृती समितीने ठरविले आहे. **कृतिसमितीने**

**या संदर्भात जे निर्णय घेतले आहेत, त्यामुळे मला या सभेला उपस्थित राहता येणार नाही याबद्दल मनापासून खेद वाटतो.** सर्व आमदारांची उपस्थिती या सभेला आवश्यक आहे हे जेवढे खरे, तेवढेच या प्रश्नाबाबत उपयुक्त चर्चा व्हावी असे वाटत असल्यास यातून कृती समितीला बाजूला ठेवण्याचा निर्णय योग्य आहे असे मला वाटत नाही. मा. मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या सभेचे निमंत्रण ज्या यंत्रणेतून आपल्या संदर्भीय पत्रानुसार आपण माझेकडे पोचविले, त्याच यंत्रणेतून माझ्या भावना आपण मा. मुख्यमंत्र्यांना कळवाव्या अशी विनंती आहे. तसदी बद्दल क्षमस्व."

## पाणी टंचाईबाबतच्या सभेतून बहिर्गमन

**१२६.** दिनांक २५ एप्रिल १९८७ रोजी बचत भवन अमरावती येथे पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील पाणी टंचाई स्थितीबाबत झालेल्या बैठकीमध्ये अमरावती पाणीपुरवठ्यावरून प्रा. बी. टी. देशमुख यांनी पुढील काम तहकुबी सुचना मांडली :

"ज्याअर्थी अमरावती पाणी पुरवठा उन्हाळ्यात संपूर्णपणे भूगर्भात करण्यात आलेल्या बोअरवर विसंबून असतो, त्यामुळे अमरावतीच्या आजुबाजूच्या विशेषतः पेढी, पूर्णा व चंद्रभागेच्या पट्ट्यात नद्या पूर्णपणे आटून जातात व भूगर्भातील जलाशयाची पातळी झपाट्याने खाली जात आहे व अमरावती शहराबरोबरच ग्रामीण भागातील पाण्याचे उद्‌भव सुद्धा पुन्हा उद्‌ध्वस्त होत आहेत. आणि;

ज्याअर्थी अमरावती शहराची योजना ही पाणी पुरवठा मंडळाची असल्यामुळे शासन आदेशानुसार लोकवर्गणीची १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळाने भरावी असे निश्चित झाले असताना शासनाने नवीन जी. आर. काढून मूळ नियम बदलविला आणि लोक वर्गणी महानगर पालिकेवर लादली आणि;

ज्याअर्थी २९ एप्रिल १९८७ रोजी शासनाच्या या निर्णयाच्या संदर्भात अमरावती बंदचा निर्णय घेण्यात आला आहे.

**त्याअर्थी या सभेचे कामकाज तहकूब करून लोकवर्गणीची १० टक्के रक्कम या शहरावर लादण्याचा निर्णय शासनाने परत घ्यावा यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावा असे ही सभा ठरवित आहे.**"

प्रा. बी. टी. देशमुख यांनी ठराव मांडला व भाषण केले. भाई सुदाम देशमुख, डॉ. शेखावत व कृतिसमितीच्या इतर सभासदांनी ठरावाला पाठींबा देणारी भाषणे केली.

आ. प्रा. बी. टी. देशमुख यांनी मांडलेल्या या सभा तहकूबीच्या प्रस्तावावर बोलतांना पालकमंत्री प्रा.राम मेघे म्हणाले की, "अमरावतीच्या पाण्याचा प्रश्न आपणा सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. प्रस्तावाला सर्वांची सहानुभूती आहे. तथापि, तहकूबीने प्रश्न सुटणार नाही. **जनभावना आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य लक्षात घेऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांशी आपण सर्व येत्या २८ एप्रिल रोजी चर्चा करणार आहोत. चर्चेतून व विचारविनिमयातून निश्चित मार्ग निघेल.**"

काम तहकुबीच्या प्रस्तावावरील चर्चेनंतर सभेचे कामकाज तहकूब न झाल्यामुळे कृतिसमितीच्या सदस्यांनी सभेतून बहिर्गमन केले हे खरे असले तरी पालकमंत्री प्रा. राम मेघे यांनी सभेतच केलेल्या "**भाई सुदाम देशमुख यांनाही चर्चेला बोलाविण्यात आले आहे.** त्यांच्याविषयी आम्हा सर्वांच्या मनामध्ये आदर आहे. त्यांना न बोलाविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पत्रोपत्री उशीर झाला असल्यास मी स्वतः त्यांना मा. मुख्यमंत्र्यांच्या वतीने निमंत्रण देत आहे." या प्रांजळ खुलाशामुळे संशयाचे वातावरण दूर होण्यास फार मदत झाली. कृतिसमितीचे अध्यक्ष भाई सुदाम देशमुख यांना चर्चेसाठी न बोलाविण्यामागे शासनाचा काही डावपेच आहे किंवा कसे? ही जी भावना जनमानसात निर्माण झाली होती ती सभा संपेपावेतो भाईना लेखी निमंत्रण देण्यात आल्यामुळे दूर झाली. महाराष्ट्र शासनाच्या अमरावती येथील जिल्हा माहिती कार्यालयाने २५.४.८७ रोजी वृत्त क्रमांक ५३ या क्रमांकाचे एक प्रसिद्धी पत्रक काढले. या प्रसिद्धी पत्रकात असे म्हटले होते की, "अमरावतीच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आमदार व कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना शासनाच्या वतीने मुंबईला चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण हे त्यांचेशी येत्या २८ एप्रिल रोजी चर्चा करतील. चर्चेला सर्व निमंत्रितांनी अवश्य हजर रहावे अशी विनंती महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. राम मेघे यांनी आज येथे केली."

## २६ एप्रिल १९८७ : कृतिसमितीची बैठक

**१२७.** ठरल्याप्रमाणे नागरिक कृतिसमितीची सभा दि. २६.४.८७ रोजी सायंकाळी ७.०० वाजता महानगर पालिकेच्या सभागृहात संपन्न झाली. **सभेच्या अध्यक्षस्थानी कृतिसमितीचे अध्यक्ष आमदार भाई सुदाम देशमुख हे होते.**

(१) सभेच्या सुरूवातीला सचिव श्री श्याम देशपांडे यांनी – १) गावात पोस्टर्स लावण्याचे काम सुरू असल्याचे, २) निवेदने वाटप सुरू असल्याचे, ३) दि. २९ एप्रिल ८७ च्या मोर्चासाठी काही कापडी फलक बनविण्याचे काम सर्वश्री नानक आहूजा, अनिल तरडेजा व डॉ. अरूण मराठे यांनी स्वीकारल्याचे, तसेच ४) दिनांक २४ एप्रिलच्या सभेत ठरल्याप्रमाणे दि. २५ एप्रिल रोजी झालेल्या पाणी टंचाईच्या सभेत कृतिसमितीच्या सदस्यांनी दिलेली तहकुबीची सूचना मान्य न झाल्याने सर्वश्री आम. प्रा. बी. टी. देशमुख, आम. सुदाम देशमुख, आम. बाबासाहेब सोमवंशी, श्री. मोतीलालजी ककरानिया, बापूसाहेब कारंजकर, प्रा. मदन भट, आदि सदस्यांनी टंचाई समितीच्या सभेतून बहिर्गमन केल्याचे सांगितले.

(२) या सभेला अमरावती शहरातील विविध स्त्री संघटनांच्या वतीने श्रीमती नलिनीताई लढके उपस्थित होत्या. स्त्रियांच्या विविध संघटनांनी अमरावती बंद आणि मूक मोर्चाला दिलेला पाठिंबा यावेळी वाचून दाखविण्यात आला.

(३) सभाध्यक्ष आम. सुदाम देशमुख यांनी त्यानंतर दि. २५ एप्रिलच्या जिल्हा दुष्काळ आणि पाणी टंचाईच्या सभेत आम. प्रा. बी. टी. देशमुख यांनी मांडलेली काम तहकुबीची सूचना, त्यावर पालकमंत्री प्रा.राम मेघे यांनी दिलेले उत्तर, काम तहकुबीची सूचना मान्य न झाल्यामुळे समितीच्या सदस्यांनी केलेले बहिर्गमन याविषयी सविस्तर माहिती दिली.

(४) तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेसंबंधी चर्चा करण्यासाठी बोलाविलेल्या बैठकीचे निमंत्रण कृतिसमितीला आणि कृतिसमितीचे अध्यक्ष म्हणून आम. श्री सुदाम देशमुख यांना मिळाले असल्याची माहिती सभाध्यक्ष आम. सुदाम देशमुख यांनी यावेळी सभागृहाला दिली.

(५) पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात शासनाशी संवाद साधणे आवश्यक असल्याने कृतिसमितीने आपले शिष्टमंडळ पाठवून मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला.

(६) कृतिसमितीच्या शिष्टमंडळात सर्वश्री आमदार सुदाम देशमुख, विरोधी पक्ष नेता रा. सु. गवई, आम. देविसिंग शेखावत, ॲड. देवराज बोथरा, श्री किसनसेठ लोहिया, चंद्रकांत कलोती, ॲड. अनगळ, श्री. दिनेश गवळी, ॲड. कासट, श्री. नानक आहुजा यांचा समावेश राहील असे ठरले.

(७) कृतिसमितीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यासोबत होणाऱ्या चर्चेत सहभागी होत असले तरीही, दि. २९ एप्रिलचा अमरावती बंद आणि मूक मोर्चा हे कार्यक्रम राबविल्या जातील आणि ते यशस्वीपणे राबवावेत असेही कृतिसमितीने एकमताने ठरविले.

(८) वाढता उन्हाळा, नागरिकांकडून येणाऱ्या विविध सूचना आणि मोर्चाचा प्रभाव या गोष्टीचा विचार करून मोर्चाच्या मार्गाचा पुन्हा विचार केल्या जावा अशी आग्रही सूचना, सर्वश्री रामदास पाटील, डॉ. अरूण मराठे आदी सदस्यांनी केली. या सूचनांचा विचार केल्यानंतर दि. २० एप्रिलच्या सभेत निश्चित केलेला मोर्चाचा मार्ग बदलून खालील मार्गाने मोर्चा नेण्याचे निश्चित करण्यात आले.

***मोर्चाचा नवा मार्ग :*** नेहरू मैदान, राजकमल चौक, गांधी चौक, अंबागेट, बुधवारा निळकंठ चौक, भाजीबाजार, सराफा, सक्करसाथ ते वलगाव रोड, इतवारा चौक, चित्रा चौक, सरोज चौक, जयस्तंभ चौक, शाम चौक ते तहसिल कार्यालय.

(९) दि २८ रोजी कृतिसमितीच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांशी भेट होणार असल्याने व बैठकीत होणारा निर्णय महत्त्वपूर्ण असल्याने दि २८ एप्रिल १९८७ रोजी कृतिसमितीची सभा सायंकाळी ५.३० वाजता घेण्याचे ठरविण्यात आले.

(१०) दिनांक २९ एप्रिल १९८७ च्या मोर्चा यशस्वीतेसाठी सर्वश्री रामदास पाटील, अरूण वरणगावकर, श्री. वसंतराव साउरकर, बाबुरावजी हिवसे, प्रभुदयाल जयस्वाल, अनिल तरडेजा, बाबासाहेब खेडकर, सुरेश बोबडे, मधुसूदन उमेकर, हरिहर दातेराव, प्रा. भागवतकर आदि सदस्यांनी ठरवून दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या असेही या सभेत ठरले.

## कृतिसमितीची मुख्यमंत्र्याशी चर्चा

**१२८.** दिनांक २८ एप्रिल १९८७ रोजी अमरावती शहरासाठीच्या पाणी पुरवठा योजनेसंबंधी मुख्यमंत्र्याच्या निमंत्रणावरुन कृती समितीच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. शिष्टमंडळात कृति समितीचे अध्यक्ष आमदार सुदाम देशमुख, विरोधी पक्षनेते मा. रा. सु. गवई, आमदार प्रा. बी. टी. देशमुख आ. पु. ब. सोमवंशी, आ. डॉ. देविसिंह शेखावत, आ. डॉ. अनिल वऱ्हाडे, आ. यशवंत शेरेकर, आ. रावसाहेब हाडोळे, ॲड. देवराज बोथरा, श्री. चंद्रकांत कलोती आणि श्री. किसनलाल लोहिया यांचा समावेश होता. सदरहू बैठकीला नगर विकास खात्याचे मंत्री डॉ. व्ही. सुब्रमण्यन, अमरावती जिल्ह्याचे पालक

मंत्री प्रा. राम मेघे, नगर विकास खात्याचे राज्यमंत्री श्री. विलास सावंत, ग्रामविकास मंत्री भाई सावंत आणि सचिव नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. बी. व्ही. रोटकर तसेच अमरावती महानगरपालिकेचे प्रशासक उपस्थित होते. २८ एप्रिल १९८७ रोजी झालेल्या या चर्चेच्यावेळीचे एक निरीक्षण मला नमूद करणे आवश्यक वाटते. "१० टक्के लोकवर्गणी पाणीपुरवठा मंडळानेच भरावयाची आहे असा नियम होता. तशीच आश्वासने देण्यात आली होती. तसे कागदोपत्री अनेक पुरावे आहेत" हे ज्यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने मी मा. मुख्यमंत्र्यांना सांगत होतो, **त्यावेळी ही कागदपत्रे व पुरावे मुख्यमंत्र्यांना माहीत नव्हते असे आम्हाला वाटत होते, निदान मुख्यमंत्री आम्हाला तसे भासवित तरी होते.** हे पुरावे सांगतांना मी ज्यावेळी "६ मे १९८३ च्या स्थायी शासननिर्णयाप्रमाणे पाणीपुरवठा मंडळाने ही दहा टक्के रक्कम भरावी असे असतांना महापालिकेने ती कां म्हणून भरावी? नगरविकास खात्याने १५ दिवसापूर्वी चा दोन जलकुंभाचा १ कोटी रुपये किमतीचा शासन निर्णय काढला, त्यामध्ये "दहा टक्के लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळाने प्रथम उभी करावी." असे नमूद असतांना पुढच्या १५ दिवसात या गावच्या लोकांनी असा काय गुन्हा केला की २७ ऑक्टोबर १९८६ च्या ५५ कोटीच्या शासननिर्णयामध्ये "दहा टक्के लोकवर्गणी महापालिकेने भरावी" असा बदल शासनाने केला?" असे सांगून मी शासनाच्याच अधिकृत दस्तऐवजातील "**वरील योजना ही महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःस्सारण मंडळाच्या सध्याच्या मालकीची असल्याकारणाने लोक वर्गणीची रक्कम मंडळाने सर्व प्रथम उभारावयाची आहे.**" हे वाक्य वाचून दाखविले, तेव्हा मा. मुख्यमंत्री मला म्हणाले "तुम्ही आता जे वाचले ते काय आहे? काय वाचले तुम्ही ते?" त्यावर मी म्हणालो :-

"मा. मुख्यमंत्री महोदय "**अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना दोन जलकुंभ बांधणे प्रशासकीय मान्यता व शासकीय अनुदानास मंजुरी**" या मथळ्याचा महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १४ ऑक्टोबर १९८६ या तारखेला जो शासननिर्णय क्रमांक पापूयो २०८६/सीआर २९३/८६/नवि/१६ निर्गमित केलेला आहे त्याच्या दुसऱ्या परिच्छेदात काय म्हटले आहे ते मी आता आपल्याला वाचून दाखविले"

**त्यावर आश्चर्याने मा. मुख्यमंत्र्यांनी आम्हा सर्वासमक्ष "काहो रोटकर हे काय वाचताहेत? असा शासननिर्णय आपण यापूर्वी काढलेला आहे? हे खरे आहे?"** असे महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. बी. व्ही. रोटकर यांना विचारले. शिष्टमंडळातील सर्वांच्या नजरा श्री. रोटकर यांच्याकडे वळल्या, सर्वजण त्यांच्याकडे श्वास रोखून बघायला लागले. मा. मुख्यमंत्र्यांनी करड्या आवाजात व भेदक नजरेने विचारलेल्या या प्रश्नांना श्री. रोटकर यांनी अजिबात विचलीत न होता शांतपणे आपल्या जागी उभे राहून नम्रपणे पण ठामपणे एका वाक्यात उत्तर दिले ते असे की "**बी. टी. देशमुख यांनी जे वाचून दाखविले ते बरोबर असून तो १४ ऑक्टोबर १९८६ चा १ कोटीचा शासन निर्णय त्यावेळी अस्तित्वात असलेल्या शासन धोरणाप्रमाणे आपण काढला त्यानंतर शासनाने आपले धोरण बदलले व बदललेल्या धोरणाप्रमाणे २७ ऑक्टोबर १९८६ चा ५५ कोटीचा शासन निर्णय काढला.**" श्री. रोटकर आपले वाक्य संपवून खाली बसले पण मा. मुख्यमंत्र्यांना मात्र आपली खूपच फजिती झाली आहे असे वाटले असावे असे निदान त्यांच्या चेहऱ्यावरून आम्हाला त्यावेळी वाटले.

**************************************************

# १२
# आंदोलनाच्या प्रभावाने शासन चर्चेसाठी तयार

**************************************************

### आंदोलन मागे न घेण्याचा निर्णय

**१२९.** चर्चेनंतर कृतिसमितीचे अध्यक्ष भाई सुदाम देशमुख व उपाध्यक्ष श्री. रा. सु. गवई यांच्या सहीने मुंबई येथे प्रसिद्ध करण्यात आलेले पत्रक त्याचवेळी सचिव श्री. श्याम देशपांडे यांनी अमरावती येथे प्रसृत केले. कृतिसमितीच्या या अधिकृत पत्रकात असे नमूद करण्यात आले होते की,

"महाराष्ट्राला लागू असलेल्या नियमांना सोडून काही वेगळी वागणूक आम्हाला द्या अशी मागणी जणू काही अमरावतीचे नागरीक करीत आहेत, अशा प्रकारची जी भावना निर्माण केली जात आहे, ती बरोबर नसून "पाणी पुरवठा मंडळाच्या मालकीची योजना असेल तेथे लोक वर्गणीची १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल." असा नियम अस्तित्वात असतांना व त्याप्रमाणे १४ ऑक्टोबरचे शासन आदेश निघाले असतांना, **एकाएकी २७ ऑक्टोबर, ८६ ला ही अट बदलवून लोक वर्गणीची रक्कम अमरावती महानगरपालिकेवर लादण्यात आली,** ही बाब प्रकर्षाने शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली.

१९८३ चे शासन आदेश, त्यानंतर वेळोवेळी देण्यात आलेली आश्वासने व त्यात एकाएकी एकाच शहराकरीता २७ ऑक्टोबरला करण्यात आलेला बदल व या बदलाला नियमाचे स्वरुप देण्याचा २३ जानेवारी, १९८७ च्या शासननिर्णयाने करण्यात आलेला प्रयत्न, **याबद्दल अमरावती महानगर पालिका क्षेत्रात तीव्र संतापाची भावना निर्माण झालेली आहे** ही गोष्ट शिष्टमंडळाने माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

शिष्टमंडळाचे म्हणणे सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतल्यानंतर "**चर्चेत जे मुद्दे समोर आले आहेत ते लक्षात घेऊन शासन या प्रश्नावर फेरविचार करील**" असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

लोकवर्गणीची १० टक्के रक्कम महानगरपालिकेने भरावी ही अट शासनाने मागे घेतलेली नसल्याने दि. २९ एप्रील, १९८७ रोजीचा घोषित केलेला अमरावती बंदचा कार्यक्रम व मूक मोर्चाचा कार्यक्रम सर्व शक्तिनिशी अंमलात आणल्या जाईल"

### २८ एप्रिल १९८७ : कृतिसमितीची बैठक

**१३०.** २६.४.१९८७ च्या सभेत ठरल्याप्रमाणे कृतिसमितीची तातडीची सभा दिनांक २८.४.१९८७ रोजी सायंकाळी ५.३० वाजता महानगर पालिकेच्या सभागृहात संपन्न झाली. **सभेच्या अध्यक्षस्थानी कृतिसमितीचे सदस्य श्री. रामदास पाटील हे होते.**

(१) सुरुवातीला सचिव श्री. श्याम देशपांडे यांनी आम. प्रा. बी. टी. देशमुख यांनी, कृतिसमितीच्या शिष्टमंडळाची ना. मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाल्यानंतर कृति समितिच्या वतीने मुंबई येथून जाहीर करण्यात आलेले पत्रक, जे दूरध्वनीद्वारे वाचून दाखविले त्याची सभेला माहिती दिली.

(२) कृतिसमितीच्या अध्यक्षांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे या पत्रकाच्या प्रति चक्रमुद्रित करून अमरावती आणि विदर्भातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांना रवाना करण्यात आल्या, अशी माहिती यावेळी सभेला देण्यात आली.

(३) दिनांक २९ एप्रिलच्या बंद आणि मूक मोर्चाच्या कार्यक्रमांच्या संदर्भात उपस्थित सदस्यांनी पुढील बाबींवर त्यानंतर विचार विनिमय केला. (१) मोर्चासाठी पाण्याची व्यवस्था (२) दि. २९ एप्रिल रोजी ध्वनिक्षेपकांवरून मोर्चा आणि बंदचा प्रचार (३) मोर्चाच्या यशस्वीतेसाठी यापूर्वी ठरविल्याप्रमाणे कार्यक्रमांची अंमलबजावणी. वरील तीन बाबींच्या संदर्भात झालेल्या व्यवस्थेची माहिती यावेळी सर्वश्री अरूण मराठे, वसंतराव साउरकर, प्रभुदयाल जयस्वाल यांनी सभेला सांगितली.

(४) त्यानुसार मोर्चासाठी अमरावती महानगर पालिकेने स्वतंत्र टँकर पुरविला आहे. तसेच निळकंठ चौक, सराफा चौक, चित्रा चौक, जयस्तंभ आणि तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली आहे. दि. २९ रोजी पहाटे पाच पासून सकाळी ९ पर्यंत बंद आणि मोर्चाच्या प्रचाराची सोय झाली आहे. एक ध्वनीक्षेपक असलेली गाडी मोर्चा सोबत राहील. तसेच प्रसिद्धी माध्यमांशी बंद आणि मोर्चासंबंधी संपर्क साधण्यात आला आहे. या व्यवस्था सभेत स्पष्ट झाल्या.

(५) दिनांक २९ चा बंद आणि मूक मोर्चाची समाधानकारक तयारी झाल्याचे यावेळी सभेचे मत झाले.

### २९ एप्रिल १९८७ : अमरावती बंद आणि मूक मोर्चा

**१३१.** घोषित कार्यक्रमानुसार दिनांक २९.४.१९८७ रोजी अमरावती शहरामध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. काळ्या फिती लावून मूक मोर्चा नागरिक कृतिसमितीच्या वतीने काढण्यात आला. अमरावती बंद कार्यक्रमाला शहरात सर्वत्र व्यापक प्रतिसाद मिळाला. सकाळी बाजारपेठा उघडल्या नाहीत. सकाळी ८ ते ५ दुकाने, प्रतिष्ठाने बंद होती. बंदचा परिणाम बँका आणि सरकारी कार्यालयातील कामांवर झाला होता. शहरातील चित्रपटगृहांनी आपले १२ वाजताचे खेळ बंद ठेऊन बंदला पाठिंबा दिला, तर सरकारी कार्यालयातील कर्मचारी काळ्या फिती लावून काम करीत होते. बंद काळात कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. बंद स्वेच्छेने आणि स्वयंस्फूर्त होता. तुरळक उघडलेली दुकानेही आपसूक बंद झाली. काही ठिकाणी ऑटो रिक्शा मात्र चालू होत्या. शहर बस वाहतुक बंद होती. बंदच्या प्रभाव काळात बाहेरगावी जाणाऱ्या बसेस बंद होत्या. शहरातील रसवंती चालकांनीही बंदला पाठिंबा दिला. अमरावती बंदला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता.

ठरल्याप्रमाणे सकाळी १० चे सुमारास नेहरू मैदानाजवळून मूक निषेध मोर्चा निघाला. मोर्चाचे नेतृत्व कृतिसमितीचे अध्यक्ष आम. सुदाम देशमुख, विरोधी पक्षनेता रा. सु. गवई, आम. प्रा. बी. टी. देशमुख, आम. डॉ. देविसिंग शेखावत, आम. बाबासाहेब सोमवंशी यांनी केले. मोर्चामध्ये सर्वश्री. डॉ. के. जी. देशमुख, सुरेंद्र भुयार, रामदयाल गुप्ता, देवराज बोथरा, प्रभाकरराव वैद्य, वसंतराव साऊरकर, ॲड. विजयराव देशपांडे, प्रमोद वानखडे, चंद्रकांत कलोती इत्यादींनी नेतृत्व सहभाग दिला. ठरावीक मार्गाने शहरातून फिरल्यानंतर तहसिल कार्यालयावर मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले. या सभेत सर्वश्री आम. डॉ. देविसिंग शेखावत, विरोधी पक्षनेता आम. रा. सु. गवई, आम. प्रा. बी. टी. देशमुख, आणि आम. भाई सुदाम देशमुख यांनी मोर्चाला संबोधित करून मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेची माहिती दिली. ही चर्चा तसेच अमरावती बंद व मोर्चाला मिळालेले यश यावरून अंतिम विजय जनतेचाच होईल अशी ग्वाही दिली. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेच्या अनुरोधाने अमरावती पाणी पुरवठा योजनेबाबत उपाय शोधून काढण्यास मुख्यमंत्र्यांना पुरेसा वेळ द्यावा आणि त्यानंतर पुढील कार्यक्रम कृतिसमितीने निश्चित करावा असेही प्रमुख वक्त्यांनी यावेळी सुचविले.

### कृतिसमितीच्या वतीने शासनाला निवेदन

**१३२.** कृतिसमितीच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख यांची भेट घेतली व त्यांना पाणी पुरवठा योजनेच्या प्रश्नावर अमरावतीकरांच्या भावना शासनाला कळविण्यासाठी कृतिसमितीतर्फे तयार केलेले निवेदन प्रा. बी. टी. देशमुख यांनी वाचून दाखविले व सादर केले. हे निवेदन शासनाला त्वरित पाठवावे अशी विनंती अध्यक्ष आम. सुदाम देशमुख यांनी केली. "लोक वर्गणीची १० टक्के रक्कम महानगरपालिकेने भरावी ही अट मागाहून टाकलेली असल्यामुळे ती ताबडतोब मागे घेतली जावी व वेळोवेळी आश्वासने दिल्याप्रमाणे १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल हा शासनाने दिलेला शब्द पाळण्यात यावा" **अशी आग्रहाची मागणी या निवेदनामध्ये करण्यात आली होती. निवेदनामध्ये आणखी असेही म्हटले होते की,** "१९८३ चे जे स्थायी शासन आदेश होते, त्यानंतर वेळोवेळी शासनाने आश्वासने दिली होती. त्यात एकाच शहराकरिता २७ ऑक्टोबरला करण्यात आलेला बदल व या बदलाला नियमांचे स्वरूप देण्याचा २३ जानेवारी ८७ च्या शासन निर्णयाचा प्रयत्न, याबद्दल अमरावती महानगरपालिका क्षेत्रात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे ही गोष्ट आम्ही आज मूक मोर्चाने आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे." अमरावती बंद आणि काळ्या फिती लावून मूक मोर्चा या कार्यक्रमांचा यशस्वी प्रभाव जनतेवर दिसून आला.

### रा.सु.गवई- डॉ. शेखावत यांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा

**१३३.** विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते श्री. रा. सु. गवई व अमरावतीचे आमदार डॉ. देविसिंग शेखावत यांनी २१ मे ८७ रोजी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. "**लोकवर्गणीची १० टक्के रक्कम अमरावती महानगरपालिकेवर न बसविण्याच्या अटीबाबत शासनाने घेतलेला निर्णय मी योजनेच्या उद्घाटन समारंभामध्येच जाहीर करील** व हा समारंभ बहुधा जूनच्या पहिल्या आठवड्यात घ्यावा. यासाठी सोयीची तारीख पाहण्यास मी सांगत आहे" असे मुख्यमंत्र्यांनी चर्चेच्या वेळी या दोघांना सांगितले. या दोघांच्या वतीने व सूचनेवरून कृतिसमितीचे सचिव श्री. श्याम देशपांडे यांनी दिनांक २४ मे, रोजी अमरावती येथे प्रसिद्ध केलेल्या अधिकृत पत्रकामध्ये "मुंबई येथे मा. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या या चर्चेच्या वेळी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. राम मेघे हे हजर होते" असेही स्पष्टपणे नमूद केलेले आहे, पण योजनेच्या शुभारंभासाठीची तारीख मुख्यमंत्र्यांना जून १९८७ पावेतो निश्चित करता आली नाही. निरनिराळ्या कारणांमुळे ती टळत गेली.

### २१ मे १९८७ : कृतिसमितीची बैठक

**१३४.** अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी गठीत झालेल्या नागरीक कृतिसमितीची सभा गुरूवार दि. २१ मे १९८७ रोजी सायंकाळी ६.३० वाजता अमरावती महानगर पालिकेच्या सभागृहात संपन्न झाली. सभेच्या **अध्यक्षस्थानी कृतिसमितीचे अध्यक्ष आमदार भाई सुदाम देशमुख होते.** या सभेत, दिनांक २९ एप्रिल १९८७ रोजी झालेल्या अमरावती बंद आणि मूक निषेध मोर्चा या कार्यक्रमानंतर पाणी पुरवठा योजनेच्या प्रश्नासंबंधीच्या सद्यःस्थितीचा आढावा घेण्यात येऊन पुढील कार्यक्रमाच्या संदर्भात खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. :-

"अप्पर वर्धा धरणाचा उद्‌भव योजून पाणी पुरवठा करण्याच्या योजनेबाबत नागरिक कृतिसमितीच्या शिष्टमंडळाशी मा. मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी दि. २८ एप्रिल १९८७ रोजी चर्चा केली. सदरहू चर्चेमध्ये लोकवर्गणीची १० टक्के रक्कम अमरावती महानगरपालिकेवर लादण्याच्या अटीचा पुनर्विचार करण्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी मान्य केले. **याबद्दल ही सभा समाधान व्यक्त करीत आहे.**

दि. २८ एप्रिल, १९८७ रोजी झालेल्या चर्चेनंतर आजपावेतो याबाबतचा शासनाचा निर्णय समितीला कळविण्यात आलेला नाही. शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रश्नाबाबत निर्णय घेण्यास हा जो विलंब लागत आहे **त्याबद्दल ही सभा तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

दि. ७ जून १९८७ या तारखेपर्यंत शासनाने याबाबत आपला निर्णय समितीला कळवावा अशी विनंती ही समिती मा. मुख्यमंत्र्यांना करीत आहे. दुर्दैवाने तसे होऊ न शकल्यास याबाबत काय उपाययोजना करण्यात यावी याविषयीचा **निर्णय समितीच्या दि. १४ जून १९८७ रोजी होणाऱ्या सभेमध्ये घेतल्या जाईल.**"

"कृतिसमितीचे सदस्य आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांनी अमरावती शहराला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्याच्या योजनेच्या रकमेतील १० टक्के लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळामार्फत भरण्यात येईल याची स्पष्ट ग्वाही देणारे शासकीय कागदपत्र मा. मुख्यमंत्र्यांना दि. १२ मे १९८७ रोजी मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयामार्फत सादर केले आहे. याची या सभेत नोंद घेण्यात आली व वरील कागदपत्रांच्या प्रती आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांच्या पत्रासह लोकांच्या माहिती करिता प्रसिद्ध करावयात म्हणून वृत्तपत्रांना देण्याचा निर्णय घेण्यात आला."

### प्रा. बी. टी. देशमुख यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**१३५.** अमरावती शहराची कैफियत ज्या कागदपत्रांवर व पुराव्यांवर आधारित होती ती कागदपत्रे व ते पुरावे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना माहीत नव्हते म्हणा किंवा ते तसे दाखवित होते म्हणा. आपल्या कर्तव्याचा भाग म्हणून ही सारी त्यांचीच कागदपत्रे आपण त्यांनाच अधिकृतपणे सादर केली पाहिजेत, असे मला सतत २८ एप्रिल १९८७ रोजी झालेल्या चर्चेच्या दिवसापासून वाटत होते. दिनांक १२ मे १९८७ या तारखेला एक पत्र (क्र.एल.सी.एफ. २०६) मी महाराष्ट्राच्या मा. मुख्यमंत्र्यांना लिहिले. या पत्राचा विषय मी *"अमरावती शहराला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्याच्या रु. ५५ कोटीच्या योजनेच्या रकमेतील १० टक्के लोकवर्गणीची रक्कम पाणीपुरवठा मंडळामार्फत भरण्यात येईल याची स्पष्ट ग्वाही देणारे शासकीय कागदपत्र"* असा ठेवला होता. या पत्रात मी मुख्यमंत्र्यांना असे लिहिले होते की :-

"दि. २८ एप्रिल १९८७ रोजी मंत्रालयामध्ये आपण बोलाविलेल्या बैठकीत अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्या संबंधी जी चर्चा झाली त्यावेळी अप्पर वर्धा धरणातून अमरावती शहराला पाणी पुरवठा करावयाच्या ५५ कोटी रूपयाच्या योजनेतील १० टक्के "लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळाने भरावयाची आहे" अशी तरतूद मे १९८३ च्या शासनादेशात होती व त्यानंतर त्याप्रमाणे विधानपरिषदेमध्ये व विधानपरिषदेच्या आश्वासन समितीसमोर वेळोवेळी या संदर्भात देण्यात आलेल्या आश्वासनांचा व तशी नोंद असलेल्या शासकीय कागदपत्रांचा तपशीलवार उल्लेख या चर्चेमध्ये आम्ही केलेला होता. *"योजना पाणी पुरवठा मंडळाची असल्यामुळे लोकवर्गणीची १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल"* अशी नोंद असलेले अनेक शासकीय कागदपत्र उपलब्ध आहेत. **त्यातील ज्या निरनिराळ्या सात ठिकाणी मला हे उल्लेख स्पष्टपणे आढळून आले व ज्यांचा मी चर्चेमध्ये उल्लेख केला होता, त्यांची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या पृष्ठ १ ते ७ वर देण्यात आलेली असून ही पृष्ठे मी या पत्रासोबत जोडलेली आहेत.** ही सर्व माहिती ऐकल्यानंतर याबाबींचा पून्हा विचार करू असे आपण सांगितले होते. *"योजना पाणी पुरवठा मंडळाची असेल तर लोकवर्गणीची १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल"* असे १९८३ चे आदेश राज्याला लागू असतांना २७ ऑक्टोबर १९८६ च्या आदेशाने एकट्या अमरावती शहरासाठी शासकीय आदेश काढून *"पाणी पुरवठा मंडळाची योजना असली तरी लोकवर्गणीची १० टक्के रक्कम महानगर पालिकेने भरावी"* अशी तरतूद करण्यात आली व पुढे "एकट्या शहराला अपवाद कां म्हणून करण्यात आले ? तसे करू नये." अशी मागणी अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेने केली असता २३ जानेवारी १९८७ रोजी आदेश काढून मूळ नियम बदलविल्या गेला ही वस्तुस्थिती सुद्धा आम्ही आपल्या लक्षात आणून दिलेली होती. आपल्या पातळीवर या बाबत सविस्तर चर्चा झालेली असल्यामुळे हा अन्याय दूर करणारा यथोचित आदेश लवकरात लवकर काढण्यात यावा अशी माझी आपणास विनंती आहे."

### मुख्यमंत्र्यांना प्रा. बी. टी. देशमुख यांनी सादर केलेले पुरावे

**१३६.** माझ्या या पत्रासोबत निरनिराळी ७ सहपत्रे जोडली होती. मी स्वतः

मुख्यमंत्र्यांच्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये हे पत्र सहपत्रासह दाखल केले व त्याची अधिकृतपणे पोच माझ्या प्रतीवर घेतली. अधिकृत पुरावे म्हणून मी जी सात सहपत्रे सोबत जोडली होती त्यात **पहिल्या सहपत्रामध्ये,** ६ मे १९८३ च्या महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा योजनाबाबतचा अर्थबळ उभारण्याविषयीचा शासननिर्णय सोबत जोडला होता. त्यात "लोकवर्गणीची १० टक्के रक्कम योजना महानगरपालिकेची असेल तर महानगरपालीकेने व योजना पाणीपुरवठा मंडळाची असेल तर पाणीपुरवठा मंडळाने भरावयाची असेल." असे नमूद होते. **दुसऱ्या सहपत्रामध्ये** विधानपरिषद आश्वासन समितीतर्फे करण्यात आलेल्या विचारणेला नगर विकास विभागाने दिलेले उत्तर समाविष्ट होते, ज्यात "लोकवर्गणीची रक्कम योजना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची असल्याने त्या मंडळामार्फत उभारण्यात येणार आहे" असे नमूद होते. **तिसऱ्या सहपत्रामध्ये** १४ ऑक्टोबर १९८६ चा "दोन जलकुंभ उभारणे" हा शासननिर्णय जोडला होता. ज्याच्या परिच्छेद २ मध्ये "वरील योजना ही महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या सध्याच्या मालकीची असल्यामुळे लोकवर्गणीची रक्कम मंडळाने सर्वप्रथम उभारावयाची आहे." असे नमूद होते. **चौथ्या सहपत्रामध्ये** विधानपरिषद आश्वासन समितीच्या १९८६-८७ च्या ९१ व्या अहवालाच्या भाग दोन मधील परिच्छेद २५ नमूद केला होता. त्यात "लोकवर्गणीची रक्कम योजना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची असल्याने त्या मंडळामार्फत उभारण्यात येणार आहे व तसे त्यांनी समितीला कळविले आहे." असे नमूद होते. **पाचव्या सहपत्रामध्ये** नगरविकास सचिव श्री. ए. एस. राव यांची साक्ष झाली, त्यावेळी त्यांनी समितीला स्पष्टपणे नियोजन व वित्त विभागाचे मत म्हणून असे सांगितले होते की "सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये नागरी पाणी पुरवठ्याचा अनुशेष दूर करण्यासाठी २८६ कोटी रूपयांची तरतूद आहे. त्यातून अमरावती शहरासाठी १२.३८ कोटी रूपये देणे शक्य आहे. तसेच साडेपाच कोटी रूपये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ देणार आहे....." हे साक्षीचे अंश उद्धृत केले होते. **सहाव्या सहपत्रामध्ये** १० एप्रिल १९८७ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ८०३० वरील अनुपूरक चर्चेमध्ये "४ ऑगस्टला मा. नगरविकासमंत्र्यांच्या चेंबरमध्ये स्वतः ते अध्यक्ष असतांना त्यावेळी जिल्ह्यातील सर्व आमदारांची एक बैठक झाली होती. पालक मंत्रीही होते. त्याही वेळी आपण असे सांगितले की, १० टक्के रक्कम ही पाणी पुरवठा मंडळ भरणार आहे हे खरे आहे किंवा नाही?" या प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारलेल्या उपप्रश्नाला नगरविकास मंत्र्यांनी "अध्यक्ष महोदय, हे खरे आहे" असे उत्तर दिले होते ते नमूद करण्यात आले होते. **सातव्या सहपत्रामध्ये** ५ ऑगस्ट १९८६ रोजी झालेल्या चर्चेमध्ये राज्यमंत्र्यांनी या संदर्भात दिलेली आश्वासने नमूद केली होती.

### मुख्यमंत्र्यांनी पत्राची पोच दिली

**१३७.** माझ्या दिनांक १२ मे १९८७ च्या पत्राला दिनांक २६ मे १९८७ रोजी स्वतःच्या सहीने मा. मुख्यमंत्र्यांनी उत्तर देणारे औपचारिक पत्र पाठविले, त्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की "अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा मंडळातर्फे भरण्यात यावयाच्या रकमेबाबतचे आपले १२ मे चे पत्र मिळाले. याबाबत मी लक्ष घालीत आहे." ही कागदपत्रे अधिकृतपणे मिळाल्याची पोच स्वतः मुख्यमंत्र्यांनी स्वदस्तुरात दिल्यामुळे **"ही गोष्ट आम्हाला माहीत नव्हती, हे कोणी आमच्या लक्षातच आणून दिले नाही"** असे म्हणण्याचा शासनाचा दरवाजा पूर्णपणे बंद झाला होता.

*************************************************

## *१३*
## *ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी बाळासाहेब मराठे यांचा घणाघात*

*************************************************

### बाळासाहेब मराठे यांचा प्रायोपवेशनाचा निर्णय

**१३८.** दि. १९.६.८७ रोजी अमरावती जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार व दैनिक 'हिंदुस्थान'चे संस्थापक संपादक **श्री. बाळासाहेब मराठे यांनी मुख्यमंत्र्यांना एक पत्र पाठवून "१५ जुलै पावेतो लोकवर्गणीबाबतचा निर्णय जाहीर झाला नाही तर आपण प्रायोपवेशनाला सुरुवात करू"** असे कळविले. बाळासाहेबांचा हा निर्णय एकाएकी जाहीर झालेला नव्हता. त्यांच्या नजरेसमोर गेले अनेक महिने घडत असलेल्या या घटना ते प्रत्यक्ष अनुभवत होते. दैनिक 'हिंदुस्थान'चे संस्थापक संपादक म्हणूनच केवळ नव्हे, तर अनेक नात्यांनी त्यांचा अमरावतीच्या सार्वजनिक जीवनाशी व शहराच्या विकासविषयक प्रश्नांशी जवळून संबंध होता. आपल्या जीवनाच्या उमेदीच्या वर्षामध्ये ते त्यावेळच्या अमरावती जनपदाचे सदस्य होते. अनेक वर्षे अमरावती नगरपालिकेचे सदस्य होते. अमरावती जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी अनेक वर्षे काम केले. वयोमानपरत्वे शरीराची धावपळ कमी झाली असली तरी मनाची उभारी कमी झालेली नव्हती. दैनिक 'हिंदुस्थान'च्या कार्यालयातील समोरच्या बैठकीवर बसून आपले दैनंदिन कामकाज आटोपत असतांना या सर्व घटनांची तपशीलवार माहिती औपचारिक व अनौपचारिक माध्यमातून ते घेत असत. दैनिक 'हिंदुस्थान'चे संपादक डॉ. अरूण मराठे हे स्वतः या कृतिसमितीचे क्रियाशील सदस्य होते. बाळासाहेबांच्या सक्रीय पाठिंब्यामुळेच कृतिसमितीचे संपर्क कार्यालय दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये ठेवण्याचा निर्णय कृतिसमितीच्या बैठकीतच झालेला होता. भाई सुदाम देशमुख कृति समितीचे अध्यक्ष, त्यामुळे ही कृतिसमिती कणखरपणे निश्चितच योग्य कार्य करील ही बाळासाहेबांची श्रद्धा. माझ्या विद्यार्थी जीवनामध्ये दैनिक 'हिंदुस्थान'मधील सर्व 'पदां'वर मी काम केलेले होते. आपल्या मार्गदर्शनाखाली "कंपोझिटर कम प्रिंटर कम प्रुफरिडर कम रिपोर्टर कम सबएडीटर कम (वेळीप्रसंगी) एडीटर म्हणून काम केलेला हा मुलगा" लेजिस्लेटर म्हणून आज जे काम करतो आहे त्यामुळे होणारा आनंद बाळासाहेबांना कधीही लपविता आला नाही व त्यातूनच व्यक्तिशः माझा या प्रश्नातील सहभाग हा बाळासाहेबांच्या सततच्या प्रेमादराचा व कौतुकाचा विषय राहीला. अधिकृत कागदपत्रावर आधारित औपचारिक वृत्त वाचत असतांना अनौपचारिक चर्चेतून सभागृहातील आमचे "पराक्रम" (त्यांचाच शब्द) ऐकण्यात त्यांना आनंद वाटत असे व सांगण्यात आम्हाला धन्यता वाटत असे.

**१३९.** मे (१९८७) महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातच बाळासाहेबांच्या मनामध्ये याबाबतचा विचार तीव्रतेने घोळत होता. पाणीपुरवठ्याच्या एका महत्त्वाच्या प्रश्नाबावत या शहरावर घोर अन्याय झालेला आहे. सभागृहात दिलेली आश्वासने शासन पाळायला तयार नाही. कृतिसमितीला या कामात अपयश येता कामा नये. आपले नैतिक बळ सर्व शक्ती पणाला लावून कृतिसमितीच्या प्रयत्नामागे उभे केले पाहिजे अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली होती. त्यांचा हा विचार आम्हाला कळताच मे १९८७ च्या शेवटच्या आठवड्यात भाई सुदाम देशमुख व मी स्वतः बाळासाहेबांशी बोलून त्यांनी हा विचार अमलात आणू नये, अशी त्यांना विनंती केली होती. मे महिन्याच्या २१ तारखेला डॉ. देविसिंग शेखावत व श्री. रा. सु. गवई यांची मुख्यमंत्र्यांशी भेट झालेली आहे. मुख्यमंत्री जुनच्या पहिल्या आठवड्यात तारीख देणार आहेत, असे आम्ही बाळासाहेबांना सांगितले. बाळासाहेबांनी पुढे मा. मुख्यमंत्र्यांना जे पत्र १९ जुन १९८७ रोजी लिहिले त्यात स्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की "खरे म्हणजे मी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रायोपवेशन करणार होतो पण काही लोकप्रतिनिधींनी व मित्रांनी जूनच्या पहिल्या आठवड्यामध्ये आपण अमरावतीला या पाणी योजनेच्या उद्घाटनासाठी येणार आहात असे सांगितल्यावरुन व त्यामुळे अशा प्रायोपवेशनाची आवश्यकता राहणार नाही असे वाटल्यावरुन मी माझा निर्णय स्थगित ठेवला पण अपेक्षेप्रमाणे आपला दौरा अन्य महत्त्वाच्या कामामुळे रहीत झाल्यामुळे व अनिर्णयाची स्थिती संपत नसल्यामुळे मला नाईलाजाने उपोषणाचा निर्णय अंमलात आणावा लागत आहे."

### एका स्वातंत्र्य सैनिकाने दुसऱ्या स्वातंत्र्य सैनिकावर सोडलेला अग्निबाण

**१४०.** १२ मे च्या मुख्यमंत्र्यांना मी लिहिलेल्या पत्राला व त्यासोबतच्या सात पुराव्यांना सर्वच वृत्तपत्रांनी व्यापक प्रसिद्धी दिलेली होती.१९८७ च्या मे महिन्यामध्ये या साऱ्या घटना घडत असतांनाच या पाणीपुरवठा योजनेच्या भूमिपुजनासाठी मा. मुख्यमंत्र्यांना मे महिन्याच्या शेवटपर्यंत किंवा जून १९८७ च्या सुरूवातीला सुद्धा वेळ देता आला नाही. दरम्यान जून, जुलै ८७ चे विधानमंडळाचे अधिवेशन सुरू होणार असल्यामुळे उद्घाटनाचा हा मुहूर्त जवळ जवळ टळल्यासारखाच झाला होता. शहरातील वातावरण तापत होते. या शहरावर फार मोठा अन्याय झालेला आहे. मुळात नियमाप्रमाणे वागणूक दिली नाही. तक्रार केली तर राज्यकर्त्यांनी मूळातला नियमच बदलून टाकला हे वाचून व ऐकून खिन्न झालेल्या बाळासाहेबांच्या थकलेल्या शरीरावर अन्यायाचा त्वेषाने प्रतिकार करणाऱ्या त्यांच्यातील स्वातंत्र्य सैनिकाच्या मनाने मात केली व अग्रलेख लिहिण्यासाठी समोर ठेवलेल्या कागदांवर बाळासाहेबांनी स्वतः आपला प्रायोपवेशनाचा हा निर्णय महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना कळविणारे पत्र भराभरा लिहून काढले. त्याच्या प्रती तयार करवून घेतल्या. मुख्यमंत्र्यांना पत्र रवाना केले व वृत्तपत्रांना ते प्रसिद्धीसाठी दिले. हे पत्र म्हणजे एका स्वातंत्र्य सैनिकाने - मुख्यमंत्रीपदी असलेल्या व विद्यमान अन्यायाचा उद्भव असलेल्या- दुसऱ्या स्वातंत्र्य सैनिकावर सोडलेला अग्निबाणच होता. **महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, यतिंद्रनाथ दास इत्यादी थोर नेत्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात परकीयांनी केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचे जे तंत्र आम्हाला शिकविले त्याचा वापर आपल्यासारख्या स्वकीयावर करणे हे आज माझ्या सारख्या मतिमंदाला स्वकर्तव्य वाटते हा जो उल्लेख बाळासाहेबांनी आपल्या पत्रात केला होता त्यामुळे राज्यकर्त्यांची झोपच**

उडून गेली.

## बाळासाहेब मराठे यांचे मा. मुख्यमंत्र्यांना पत्र

**१४१.** मा. मुख्यमंत्री श्री. शंकररावजी चव्हाण यांना नावानिशी लिहिलेल्या लहान लहान सात परिच्छेदाच्या या पत्रामध्ये बाळासाहेबांनी या शहराची बाजू अत्यंत त्वेषाने पण बिनचूकपणे मांडली होती. बाळासाहेबांच्या १९ जून १९८७ च्या या पत्रातील सातही परिच्छेद मी पुढे जसेच्या तसे नमूद करीत आहे. :-

"१. भारतात सध्या लोकशाही स्वराज्य म्हणजेच लोकांचे त्यांच्या प्रतिनिधीमार्फत चाललेले राज्य आहे. ज्यात जनतेने सनदशीर मार्गाने व्यक्त केलेल्या भावनांना सर्वोच्च महत्त्व आहे. अशा स्थितीत अमरावती शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न येथील जनतेने गेल्या १० वर्षापासून सातत्याने सरकारपुढे मांडला. सर्व राजकीय पक्ष व पंथ इतर सर्व बंधने ओलांडून येथील जनप्रतिनिधींनी जिल्हा विकास मंडळापासून कायदेमंडळापर्यंत तो हिरीरीने मांडला व सत्तारूढ नेत्यांनीही त्याला मान्यता दिली. अशा प्रकारे या प्रश्नाला 'सर्वेषाम् अविरोधेन' असे स्वरूप प्राप्त झाले.

२. अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा अमरावतीला आणण्यासाठीच्या ५५ कोटीच्या योजनेतील 'लोकवर्गणीची १० टक्के रक्कम योजना पाणी पुरवठा मंडळाची असल्याने या मंडळाने भरावयाची आहे' असे शासन आदेश अस्तित्वात असतांना या शहराला वेगळा न्याय देणे अन्यायाचे आहे.

३. 'लोकवर्गणीची १० टक्के रक्कम पाणी पुरवठा मंडळच भरणार आहे' ही शासनाच्या मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी दिलेली कबूली विधानपरिषदेमध्ये व त्या सभागृहाच्या समितीसमोर गेल्या दिड-दोन वर्षामध्ये निरनिराळ्या सात वेळा नोंदविल्याचे नमूद झाले असून त्या सातही वेळेचे शासकीय दस्तऐवज आपल्याला सादर करण्यात आले आहेत व वृत्तपत्रातूनही प्रसिद्ध झाले आहेत.

४. शासनाने १० टक्के लोकवर्गणीच्या अटीबाबत आपला शब्द बदलविताच अमरावतीकर नागरीकांनी अभूतपूर्व ऐक्य दाखवून २९ एप्रिल रोजी अमरावती बंद यशस्वी करून दाखविले. सर्वच राजकीय पक्षांनी (सरकारी पक्षासहीत) एकमुखाने अमरावतीचा पाणी प्रश्न सोडविण्याची तातडीची मागणी सरकारकडे केली. पण दुर्दैवाने सरकारने त्याकडे दुर्लक्ष करून लोकशाही मुल्यांना दुर्दैवी धक्का दिला व या शहरातील नागरिकांच्या जीवन प्रश्नाची क्रुर थट्टा चालविली आहे.

५. स्वातंत्र्यपूर्व काळात जनतेवर अशा तऱ्हेने अन्याय झाला तर त्याला शांततापूर्ण न्यायोचित पद्धतीने प्रतिकार करण्याचे तंत्र पूज्य महात्माजींनी आम्हाला शिकविले, नेताजी सुभाषचंद्र बोस, यतिंद्रनाथ दास व अन्य शहिदांनी आत्मार्पण करुन अन्यायाला वाचा फोडली. आज तर आपले राज्य व स्वकीय सत्तारुढ आहेत. तेव्हा अशा स्थितीत अन्याय होत असला तर कोणाबद्दलही दुस्वास, असूया अगर विरोधाची भावना न ठेवता अन्याया विरुद्ध आवाज उठविणे हे माझ्या सारख्या मंतीमंदाला स्वकर्तव्य वाटते.

६. विधान मंडळामध्ये व सभागृहाच्या समितीसमोर गेल्या दिड-दोन वर्षात निरनिराळ्या सात वेळी 'लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल' असे स्पष्टपणे नमूद केले असतांना या व्यवस्थेत एकाएकी बदल करण्यामुळे सभागृहाची व तेथे होणाऱ्या चर्चेची अप्रतिष्ठा होते व अशी अप्रतिष्ठा होता कामा नये ही माझी तळमळीची भावना आहे. विशेषतः हे कृत्य ४ लाख लोकसंख्येच्या पाणी पुरवठ्याशी संबंधीत असते त्यावेळी तर ही बाब जास्त गंभीर बनते. लोकवर्गणीच्या रकमेबाबत शासनाने दिलेला शब्द पाळला पाहीजे हा माझा नम्र आग्रह आहे व त्यासाठी दि. १५ जुलै ८७ पासून प्रायोपवेशन करणे मला स्वकर्तव्य वाटते.

७. खरे म्हणजे मी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रायोपवेशन करणार होतो पण काही लोकप्रतिनिधींनी व मित्रांनी जून च्या पहिल्या आठवड्यामध्ये आपण अमरावतीला या पाणी योजनेच्या उद्घाटनासाठी येणार आहात असे सांगितल्यावरुन व त्यामुळे अशा प्रायोपवशनाची आवश्यकता राहणार नाही असे वाटल्यावरुन मी माझा निर्णय स्थगित ठेवला पण अपेक्षेप्रमाणे आपला दौरा अन्य महत्त्वाच्या कामामुळे रहीत झाल्यामुळे व अनिर्णयाची स्थिती संपत नसल्यामुळे मला नाईलाजाने उपोषणाचा निर्णय अंमलात आणावा लागत आहे. यात कोणालाही विरोध नाही अगर संघर्षाची तिळमात्र भावना नाही हे पुनश्च स्पष्ट करुन "सत्ताधाऱ्यांना परमेश्वर व शहीद सद्‌बुद्धी देवोत" अशी हे ब्रम्हकर्म सुरु करण्यापूर्वी ईश चरणी प्रार्थना करतो. तसे न झाल्यास दि. १५ जुलै ८७ रोजी येथील शहीद स्मारक मंदिरात सकाळी १० वाजता उपोषणास (ब्रम्हकर्मास) सुरुवात होईल असे नम्रतेने जाहीर करतो."

## "जेल भरो" आंदोलनाचा निर्णय

**१४२.** श्री. बाळासाहेब मराठे यांच्या प्रायोपवेशनाच्या या निर्णयामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या परिस्थितीत कृतिसमितीची बैठक २७ जून १९८७ रोजी झाली. या बैठकीमध्ये शासनाच्या संतापजनक धोरणाचा विचार होऊन पुढील ठराव एकमताने मंजूर झाला :-

"अप्पर वर्धा धरणातून अमरावती शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेच्या रकमेतील १० टक्के लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळामार्फत भरण्यात यावी आणि शासनाने दिलेला शब्द पाळावा, यासाठी दि. २८ एप्रिल १९८७ रोजी शासनाशी सविस्तर चर्चा होऊन "याबाबत त्वरीत निर्णय कळवितो" असे आश्वासन शासनाने दिले असतांनाही त्या आश्वासनांची कुठलीही परिपूर्ती अद्याप पर्यंत न झाल्यामुळे अमरावतीकर जनतेच्या मनात संशयाचे, असंतुष्टतेचे आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या लोकभावनेची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने दि. ७ जुलै १९८७ च्या आत "अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेच्या रकमेतील दहा टक्के लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळ भरेल आणि अमरावती महानगरपालिकेवर या योजनेचा कुठलाही आर्थिक बोजा पडणार नाही" अशी निःसंदिग्ध घोषणा करावी. ही घोषणा न झाल्यास बुधवार दि. ८ जुलै १९८७ रोजी हजारो अमरावतीकर नागरीक स्वतःला अटक करुन शासकीय दिरंगाईचा निषेध करतील."

कृतिसमितीच्या या बैठकीत बोलतांना आमदार **डॉ. देविसिंह शेखावत** यांनी असे जाहीर केले की "मी आमदार आहे. हा मतदार संघातील जनजीवनाशी निगडीत प्रबळ व प्रखर असा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याच्या सोडवणूकीच्या प्रयत्नात सहभागी होणे हे माझे कर्तव्य आहे. पक्षाची बंधने अशा कर्तव्य पालनाला रोखू शकत नाहीत. श्री. बाळासाहेब मराठे यांनी पाणीप्रश्नावरून प्रायोपवेशन सुरू केले तर या शहराचा जनप्रतिनिधी या नात्याने मी त्यांच्या सोबत आमरण उपोषणात सहभागी होईन"

## जेलभरो आंदोलनाचा निर्णय मुख्यमंत्र्यांना कळविला

**१४३.** महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना कृतिसमितीचे सचिव श्री. श्याम देशपांडे यांनी २९ जुन १९८७ रोजी एक पत्र लिहून समितीचा हा निर्णय कळविला. त्यांनी आपल्या पत्रात मुख्यमंत्र्यांना असे लिहिले की :

"मान्यवर महोदय, अमरावती शहराला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्याच्या योजनेच्या रकमेतील दहा टक्के लोकवर्गणीची रक्कम पाणी पुरवठा मंडळामार्फत भरण्यात यावी आणि अमरावती शहरातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाची निकड लक्षात घेऊन या योजनेचे कामकाज तातडीने सुरू करावे या मागणीसाठी अमरावती शहरातील सर्व राजकीय पक्ष, सर्व सेवाभावी संस्था स्वयंसेवी संघटना नोकर आणि कामगार संघटना यांनी नागरिक कृतिसमितीची स्थापना केली आहे. नागरिक कृतिसमितीच्या शिष्ट मंडळाने आपली दि. २८ एप्रिल १९८७ रोजी भेट घेऊन याबाबत शासनाने दिलेली आश्वासने व अमरावतीकर जनतेची न्याय्य बाजू आपणापुढे मांडली आहे. दि. २८ एप्रिल १९८७ ते आजपावेतो अमरावतीकर जनतेच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत शासनाने कुठलाही निर्णय घेतलेला दिसत नाही. वरील संदर्भात नागरिक कृतिसमितीच्या **दि. २७ जून १९८७ रोजी झालेल्या सभेत, नागरिक कृतिसमितीने दि. ७ जुलै १९८७ पर्यंत वाट पाहून दि. ८ जुलै ८७ रोजी जेलभरो आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.** दि. २७ जून १९८७ च्या सभेत नागरिक कृतिसमितीने पारित केलेला ठराव कृतिसमितीचे अध्यक्ष आमदार भाई सुदाम देशमुख यांच्या निदेशावरुन आपल्या माहितीकरीता पाठवित आहे. आपल्या पातळीवर याबाबत सविस्तर चर्चा झालेली असल्यामुळे अमरावती शहरावरील अन्याय दूर करणारा यथोचित आदेश लवकरात लवकर काढण्यात यावा अशी अमरावतीकर नागरिकांची आपणांस विनंती असून आपण या लोकभावनेचा आदर कराल ही आशा आहे."

## दोन नागरिकांचा आमरण उपोषणाचा निर्णय

**१४४.** १९ जून १९८७ रोजी बाळासाहेबांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. त्या पत्रानुसार १५ जुलै १९८७ पासून प्रायोपवेशनाला सुरूवात होणार. २७ जूनच्या बैठकीमध्ये कृतिसमितीने जेलभरो आंदोलनाचा निर्णय घेतला व हे जेलभरो आंदोलन ८ जुलै रोजी सुरू होणार या तणावाच्या परिस्थितीत कृतिसमितीचे सदस्य **श्री. उमेश श्रीकिसन सेवक व त्यांचे एक सहकारी श्री. जयकुमार नारायणदास मंत्री या दोन नागरिकांनी सुद्धा आमरण उपोषणाचा आपला निर्णय घोषित केला.** २ जुलै १९८७ रोजी कृतिसमितीच्या अध्यक्षांना या दोघांच्या स्वाक्षरीने दिलेल्या संयुक्त पत्रात त्यांनी असे नमुद केले होते की :

"आम्ही उमेश श्रीकिसन सेवक, रा. अमरावती. जयकुमार नारायणदास मंत्री, रा. अमरावती. या पत्रकाद्वारे आपणास कळवितो की, अमरावतीतील थोर समाजसुधारक व स्वातंत्र्य संग्राम सैनिक श्रीयुत बाळासाहेब मराठे हे अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी सरकारचे लक्ष या योजनेच्या शुभारंभाकडे वेधण्याकरीता दि. १५ जुलै १९८७ पासून प्रायोपवेशन करीत

आहे. ह्या कठोर निर्णयाचे आम्ही स्वागत करीत असून त्यांना पाठींबा म्हणून व अमरावतीच्या युवकात या प्रश्नासंबंधी जागृती निर्माण व्हावी याकरीता आम्ही दोघांनी दि. १५ जुलै १९८७ पासून शहीद स्मारक, राजकमल चौक येथे श्रीयुत बाळासाहेब मराठे यांचे सोबत आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला असून आपण आम्हाला सहकार्य द्याल, ही अपेक्षा व विनंती."

*************************************************

## १४
## बी. टीं. ची सभागृहात अनुपस्थिती

*************************************************

### जून ८७ च्या अधिवेशनांत बी. टीं. ची अनुपस्थिती

**१४५.** असे हे वातावरण असतांना सोमवार, दिनांक २२ जून १९८७ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन सुरू होणार. या अधिवेशनामध्ये या प्रश्नावर सभागृहात जबरदस्त वाग्युद्ध होणार व एकदा काय तो सोक्षमोक्ष लागणार, या मनस्थितीमध्ये अगोदरच्या दिवशी म्हणजे रविवार, दिनांक २१ जून रोजी अधिवेशनाला जाण्यासाठीची मी तयारी करीत असतांना प्रकृतीचा कधीही काही त्रास नसलेल्या मला एकाएकी पोट दुखणे उमळले. कागदपत्रांची अधिवेशनासाठी मी बांधाबांध करीत असतांना जेव्हा खूपच त्रास व्हायला लागला तेव्हा सिव्हील सर्जन डॉ. पाठक यांना मी फोन केला. १०-१५ मिनीटातच ते येऊन पोचले. "उद्यापासून अधिवेशन सुरू होत आहे. याच आठवड्यात बहुधा पाणी पुरवठ्याचा अतिशय महत्वाचा प्रश्न चर्चेसाठी येईल. काही गोळ्या किंवा औषधी देऊन मला गाडीमध्ये त्रास होणार नाही असे झाल्यास उद्या मुंबईला प्रश्न नियोजनही समजून जाईल व त्याप्रमाणे मग मला तेथे उपचारही घेता येईल." असे मी डॉक्टरांना म्हणालो. पाच-दहा मिनिटाच्या तपासणीनंतर "तुम्हाला गाडीवर जाता येणार नाही. ताबडतोब भरती व्हा. 'ॲपेन्डीक्स'चे हे ऑपरेशन आजच करावे लागेल" असे डॉक्टरांनी सांगितले.

अधिवेशनाला सोबत जाण्यासाठी वाट पहात असलेले बाबासाहेब सोमवंशी हे कळताच घरी येऊन गेले. सर्व कागदपत्रे त्यांच्या सुपूर्त केली. सकारण अनुपस्थितीचा अर्ज व मा. सभापतींना त्या अर्थाचे पत्रही त्यांच्या स्वाधीन केले. मेलवर जाण्यासाठी निघालेले सुदाम काका भेटून गेले. म्हणाले "तू इकडच बरोबर पहा. तिकडची काळजी करू नकोस. उद्या गवईंशी भेटून काहीतरी करू." हे काहीतरी म्हणजे काय? हे माझ्या त्यावेळी लक्षात आले नाही. आपल्याला उद्या अधिवेशनात सहभागी होता येत नाही, या आठवड्यात हा प्रश्न नक्की सभागृहापुढे येईल, **त्यात आपण भाग घेऊ शकणार नाही याचे मला मनापासून वाईट वाटले. तो प्रश्न पुढच्या आठवड्यात सभागृहासमोर आला हे खरे असले तरी या प्रश्नावरील चर्चेच्या वेळी मी गैरहजर असावे ही गोष्ट नियतीला मान्य नव्हती हे पुढील घटनाक्रमावरून दिसून येईल.**

**१४६.** अधिवेशन सुरू होत आहे म्हणून सहज गप्पा मारत बडनेरा स्टेशनवर सोडण्यासाठी अगोदरच घरी उपस्थित असलेल्या जी. टी. (ते त्यावेळी अमरावती येथे शिक्षणाधिकारी होते) एम.टी, व भरत या माझ्या कनिष्ठ बंधूंनी मला इर्विन हॉस्पिटलमध्ये दाखल केले. इकडे रविवार सुटीचा दिवस असतांना सुद्धा थोड्याच वेळात आपले सहाय्यक व इतर जुळवाजुळव करून डॉ. पाठक यांनी त्याच दिवशी रात्री 'अपेंडीक्स'ची ही शस्त्रक्रिया यथोचितरित्या पार पाडली. तिकडे दुसऱ्या दिवशी अधिवेशन सुरू झाले.

श्री. दादासाहेब गवई, श्री. बाबासाहेब सोमवंशी, भाई सुदाम देशमुख व श्री. दे. मा. कराळे यांनी किंवा यापैकी कोणीतरी बहुधा माझ्या अनुपस्थितीबाबतची चर्चा मा. सभापतींशी अनौपचारीकरित्या करून माझ्या गैरहजेरीत हा प्रश्न सभागृहात चर्चेला येणार नाही याची कडेकोट 'व्यवस्था' केली असे दिसून येते. ही व्यवस्था करण्यासाठी जे अनौपचारिक बोलणे किंवा चर्चा झाली असेल त्याचे तपशील नमूद करण्याची आवश्यकता नाही, तर प्रत्यक्ष सभागृहात काय झाले याबाबतची माहिती दिली म्हणजे ही व्यवस्था कशी झाली हे सहज कळून येईल.

### "प्रश्न आज न घेता पुढच्या वेळी घेऊ" - सभापती

**१४७.** गेल्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आपला तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात आला असल्यामुळे प्रा. बी. टी. देशमुख व पु. ब. सोमवंशी यांनी पुन्हा प्रश्नाची नोटीस दिलेली नव्हती. पण सुदैवाने सर्वश्री अनंतकुमार पाटील, माधवराव धायगुडे व श्रीमती लतिफा काझी यांनी याच विषयावर दिलेला तारांकित प्रश्न क्रमांक ९७३६ स्वीकृत झाला होता, व पहिल्याच आठवड्यात २५ जून १९८७ च्या तारांकित प्रश्नाच्या यादीमध्ये क्रमांक ९ वर दाखविण्यात आला होता.

दिनांक २५ जून १९८७ रोजी सभागृहाची बैठक सुरू होताच विरोधी पक्षनेते श्री. दे. मा. कराळे यांनी "अध्यक्ष महाराज, मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. आज जी प्रश्नोत्तरांची यादी दिली आहे त्यातील अनुक्रमांक ९ वर जो प्रश्न आहे त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये **तारांकित प्रश्न क्रमांक ८०३० ला दिनांक २६ मार्च रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भामध्ये हा प्रश्न विचारलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे तारांकित प्रश्न क्रमांक ८०३० हा त्यावेळी राखून ठेवण्यात आलेला होता आणि असे असतांनासुद्धा आज त्याला पुन्हा लेखी उत्तर दिलेले आहे तर हे नियमाला धरून आहे की नाही** यासंबंधी आपण निर्णय द्यावा." असा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर श्री. रा. सु. गवई यांनी पुढील प्रमाणे हरकतीचा मुद्दा उपस्थित केला "अध्यक्ष महाराज, माझाही हरकतीचा मुद्दा असा आहे की, प्रश्न क्रमांक ८०३० हा २६ मार्च १९८७ रोजी विथहेल्ड झाला होता आणि त्यानंतर मी आपल्याशी चर्चा केली होती आणि त्यामुळे पुन्हा मार्चच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी तो पुन्हा घेण्यात आला होता. आता अशा प्रकारे हा विथहेल्ड झालेला प्रश्न आहे तो नियमाप्रमाणे या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये प्रथम यावयास पाहिजे होता कारण आजचा हा प्रश्न विचारला आहे तो त्या विथहेल्ड झालेल्या प्रश्नावर आधारित आहे." व सरळ सरळ **"त्यामुळे प्रोसिजरप्रमाणे विथहेल्ड झालेला हा प्रश्न प्रश्नांच्या यादीमध्ये पहिल्यांदा ॲपिअर व्हावयास पाहिजे आणि आज ज्या सन्माननीय सदस्यांच्या नावावर हा प्रश्न आहे त्यांची नावे मूळ प्रश्नाला टॅग करावीत."** अशी मागणी केली.

**१४८.** या दोनही जेष्ठ सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा. सभापतींनी "सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे राखून ठेवलेला प्रश्न यादीत प्रथम यावयास पाहिजे आणि आज ज्यांच्या नावावर प्रश्न आहे त्यांची नावे मूळ प्रश्नाला टॅग व्हावयास हवीत." असे उद्‌गार काढले व **"आज हा प्रश्न न घेता पुढच्या वेळी हा राखून ठेवलेला प्रश्न प्रथम घेतला जाईल आणि त्याला आजच्या प्रश्नावरील सन्माननीय सदस्यांची नावे टॅग होतील.** खरे म्हणजे नियमाप्रमाणे हा प्रश्न लॅप्स व्हावयास हवा पण मी स्वतः तो राखून ठेवल्याने तो लॅप्स असला तरी घेतला." असा निर्णय दिला. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २५ जून १९८७ : खंड ८०, क्रमांक ४, पृष्ठ १)*

**१४९.** श्री. दे. मा. कराळे व श्री. रा. सु. गवई या ज्येष्ठ विरोधी पक्ष सदस्यांनी मागणी करावी. सत्तारूढ पक्षाच्या कोणाही सदस्यांनी त्यास हरकत घेऊ नये, ज्यांनी या प्रश्नाची या अधिवेशनासाठी स्वतंत्रपणे नोटीस दिली होती त्या सर्वश्री अनंतकुमार पाटील, माधवराव धायगुडे व श्रीमती लतिफा काझी या सन्माननीय सदस्यांनी यास सम्मती द्यावी व मा. सभापतींनी **"आज हा प्रश्न न घेता पुढच्या वेळी हा राखून ठेवलेला प्रश्न घेतला जाईल" असा जो निर्णय त्यावर दिला त्यामुळे प्रकृती नीट होऊन मी सभागृहात आल्यावरच हा प्रश्न चर्चेला येईल याची कडेकोट व्यवस्था होऊन गेलेली होती.** आपल्यातला एक सदस्य गेले अनेक महिने या प्रश्नाचा कष्टपूर्वक व मेहनतीने पाठपुरावा करीत आहे. त्याची प्रकृती ठिक नाही. तेव्हा तो सभागृहात आल्यानंतरच आपण हा प्रश्न चर्चेला घेऊ. **नियमांच्या साऱ्या तांत्रिकता बाजूला सारून ही जी "व्यवस्था" झाली ती म्हणजे माझ्यावरील त्या सभागृहाची फार मोठी कृपा होय असे मला नेहमीच वाटत आले आहे.**

### प्रश्नाने घडविलेला इतिहास

**१५०.** नियमांचीच गोष्ट म्हणाल तर नियमाप्रमाणे अधिवेशन संपले की त्या अधिवेशनातील उरलेले सर्व प्रश्न व्यपगत होतात. खुद्द मा. सभापतींनी "खरे म्हणजे नियमाप्रमाणे हा प्रश्न लॅप्स व्हावयास हवा पण मी तो राखून ठेवल्याने तो लॅप्स असला तरी घेतला" हा सभागृहात दिलेला निर्णय ज्यावेळी मी वाचला त्यावेळी विधानपरिषदेच्या सुरूवातीपासूनच्या नोंदी मी मुद्दाम वाचून पाहिल्या. माझ्या असे लक्षात आले की "अमरावती शहराची वाढीव पाणी पुरवठा योजना" **हा एका अधिवेशनात राखून ठेऊन प्रश्नकर्ता सदस्य अनुपस्थित असल्यामुळे पुढच्या अधिवेशनात सुरूवातीला घेतला गेला असा महाराष्ट्र विधानपरिषदेच्या इतिहासातील पहिला प्रश्न व एकमेव प्रश्न आहे.**

### जन आंदोलनाच्या रेट्यामुळे शासनाच्या उत्तरात बदल

**१५१.** दिनांक २५ जून १९८७ रोजी सर्वश्री अनंतकुमार पाटील, माधवराव धायगुडे व श्रीमती लतिफा काझी यांच्या ता. प्र. क्र. ९७३६ या प्रश्नावर त्या दिवशी चर्चा होऊ शकली नाही हे खरे असले तरी **"१० टक्के लोकवर्गणीची रक्कम अमरावती महानगरपालिकेकडून घेण्यात येऊ नये ही जिल्हा नियोजन व विकास मंडळाची विनंती मान्य करता येत नाही"** असे दिनांक १० एप्रिल १९८७ रोजी सभागृहामध्ये उत्तर देणाऱ्या शासनाने या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये **"ही मागणी अजूनही शासनाच्या विचाराधीन आहे"** अशी भूमिका घेतल्याचे

अधिकृतपणे सभागृहासमोर आले. विधान परिषदेची पहिल्या आठवड्यातील बैठक शुक्रवार, दिनांक २६ जून १९८७ रोजी संपली.

अधिवेशनाहून परत आलेल्या श्री. बाबासाहेब सोमवंशी, श्री. दादासाहेब गवई, भाई सुदाम देशमुख, डॉ. देविसींह शेखावत या सर्वच विधानमंडळ सदस्यांनी मला इर्विन हॉस्पिटलमध्ये भेटून "तुम्ही आता काही काळजी करू नका. प्रश्न सध्या तहकूब झाला आहे. तुम्ही बरे होऊन आल्यावरच तो सभागृहामध्ये येईल" असे सांगितले. पुढचा आठवडा विधानपरिषदेला सुटी होती व नंतर हे अधिवेशन सोमवार, दिनांक ६ जुलै १९८७ रोजी पुन्हा सुरू झाले. त्यापूर्वीच मला इर्विन हॉस्पिटल मधून सुटी मिळाली होती. माझे पहिलेच ऑपरेशन असल्यामुळे थकवा वाटत असला तरी ते व्यवस्थित झाल्यामुळे प्रकृती सुधारत होती.

**१५२.** भाई सुदाम देशमुख यांनी डॉ. पाठक यांच्याशी चर्चा केली "ऑपरेशन व्यवस्थित झाले आहे त्यांना आता मुंबईला येण्यास काहीच हरकत नाही." असे डॉ. पाठक यांनी त्यांना सांगितले. रविवार, दिनांक ५ जुलै १९८७ रोजी सकाळी सुदाम काकांचा फोन आला. "डॉक्टरांशी माझे बोलणे झाले आहे. आज सायंकाळी मी गाडी घेऊन येतो. आपण बरोबर बडनेरा स्टेशनवर जाऊ" सुदाम काका कोणती गाडी घेऊन येणार आहे? हा विचार मनात चमकला असतांनाच मी त्यांना "होय" म्हणालो. सायंकाळी कृतिसमितीचे सदस्य श्री. चंद्रूभाऊ कलोती यांचेसह त्यांची गाडी घेऊन भाई माझे निवासस्थानी पोचले. सोबत कृतिसमितीचे कार्यवाह श्री. श्याम देशपांडे हेही होते.

"या योजनेच्या भूमिपूजनासाठी मुख्यमंत्री तारीख देत आहेत व त्यासाठी ८ तारखेला मा. मुख्यमंत्र्यांशी आपणाला भेटायचे आहे. तसे पालकमंत्र्यांनी सांगितले आहे. त्यामुळे कृतिसमितीचा अध्यक्ष या नात्याने ८ जुलै पासून सुरू होणाऱ्या जेलभरो आंदोलनाचा कार्यक्रम तात्पुरता स्थगित ठेवण्याच्या सुचना मी दिल्या आहेत" असे सुदाम काकांनी सांगितले.

अनौपचारीक गप्पा व चहापानानंतर त्याच दिवशीच्या सायंकाळच्या गाडीने आम्ही दुसऱ्या दिवशी पासून सुरू होणाऱ्या अधिवेशनासाठी मुंबईला रवाना झालो. २२ जून १९८७ पासून सुरू झालेल्या अधिवेशनात मी ६ जुलै ८७ रोजी दाखल झालो, हे खरे असले तरी शनिवार, रविवार व मधली एक आठवड्याची सुटी जमेस धरता माझी "प्रत्यक्ष पाचच दिवसाची शाळा बुडाली" होती, याचा मला आनंद होता.

************************************************

## १५
## *मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजनासाठी तारीख दिली*

************************************************

**१५३.** विधानपरिषदेचे अधिवेशन सुटीनंतर ६ जुलै १९८७ रोजी सुरू झाले. ८ जुलै १९८७ रोजी पालकमंत्री व विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते व कृतिसमितीचे उपाध्यक्ष श्री. रा. सु. गवई, कृतिसमितीचे अध्यक्ष आमदार सुदाम देशमुख, प्रा. बी. टी. देशमुख, आमदार डॉक्टर देवीसींह शेखावत, आमदार बाबासाहेब सोमवंशी, आमदार डॉ. शेरेकर, आणि आमदार डॉ. अनिल वऱ्हाडे यांनी मा. मुख्यमंत्र्यांची विधानभवनातील त्यांच्या दालनामध्ये भेट घेतली. "या प्रकल्पाच्या भूमीपूजनासाठी आपण लवकरच तारीख निश्चित करीत आहोत" असे मा. मुख्यमंत्र्यांनी आम्हा सर्वांना सांगितले.

### मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजनासाठी तारीख दिली

**१५४.** विधान मंडळाचे जुलै १९८७ चे अधिवेशन चालू असतांना शहरामधील या प्रश्नाबाबतचा तणाव सातत्याने वाढत होता. त्यामुळे निरनिराळ्या व्यक्ती या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आपआपल्यापरीने प्रयत्न करीत होत्या. दिनांक ९ जुलै १९८७ रोजी अमरावतीच्या खासदार सौ. उषाताई चौधरी यांच्या वतीने अमरावती येथे एक पत्रक प्रसिद्धीला देण्यात आले. त्यात असे नमूद करण्यात आले होते की :- " अप्पर वर्धा धरणावर आधारीत अमरावती शहराच्या कायम पाणीपुरवठा योजनेच्या भूमिपूजनासाठी येत्या १ ऑगस्टला अमरावतीला येण्याचे मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांनी मान्य केले आहे. दीर्घ काळापासून चिघळलेल्या या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे दृष्टीने खा. सौ. उषाताई चौधरी यांनी केलेली यशस्वी शिष्टाई हा गुंता सोडविण्याच्या दृष्टीकोनातून फार उपयोगी ठरली आहे. मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवास स्थानी खा. सौ. उषाताई चौधरी यांनी माहिती राज्यमंत्री डॉ. श्रीकांत जिचकार यांचेसह जाऊन अमरावतीच्या पाणी पुरवठ्याच्या समस्येबद्दल मुख्यमंत्र्यांशी विस्ताराने चर्चा केली. योजनेचा वाढता खर्च आणि ती त्वरीत कार्यान्वित होण्याची निकड लक्षात घेऊन **आपण त्वरीत अमरावतीला यावे. भूमीपूजनाच्या या सोहळ्यात 'लोकवर्गणी' बाबत शासन भूमिका स्पष्ट करुन योजनेचा शुभारंभ करावा, अशी विनंती याप्रसंगी खा. सौ. उषाताई चौधरी यांनी मुख्यमंत्र्याना केली. मुख्यमंत्र्यांनी त्यांची विनंती ताबडतोब मान्य करुन, येत्या १ ऑगस्टला योजनेच्या भूमीपूजनासाठी अमरावतीला येण्याचे लेखी आश्वासन दिले आहे."** अशी महत्त्वपूर्ण माहिती या पत्रकात देण्यात आली होती.

**१५५.** खासदार श्रीमती उषाताई चौधरी यांच्यावतीने मुंबई येथे सुद्धा दुसऱ्या दिवशी (१०.७.१९८७) प्रसिद्धीला देण्यात आलेल्या एका पत्रकामध्ये वर नमूद केलेल्या माहितीशिवाय "मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांची काल श्रीमती चौधरी यांनी 'वर्षा' येथे भेट घेतली व त्यावेळी झालेल्या बैठकीत वरील विषयाबाबत चर्चा झाल्याचे सांगितले. यावेळी नगरविकास मंत्री डॉ. व्ही. सुब्रमणियन उपस्थित होते." अशी जादाची माहिती नमूद करण्यात आली होती. "अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी सामाजिक कार्यकर्ते व आम जनता या योजनेसाठी अनेक वर्षापासून प्रयत्नशील व वारंवार मागणी मंजूर करुन घेण्याबाबत जागरुक होती. विधी मंडळातही हा प्रश्न चर्चिला गेला होता." असाही उल्लेख त्या पत्रकात होता.

### नगरविकास मंत्र्यांची खरी भूमिका ?

**१५६.** दिनांक ९ जुलै १९८७ रोजी खासदार सौ. उषाताई चौधरी यांची जी मुख्यमंत्र्यांशी "वर्षा" या त्यांच्या निवासस्थानी चर्चा झाली त्या चर्चेच्या वेळी नगरविकासखात्याचे मंत्री डॉ. सुब्रम्हण्यन उपस्थित होते. असे मुंबईहून प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात नमूद असले तरी १० टक्के लोकवर्गणीच्या बाबतीत मंत्रिमंडळाच्या किंवा मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर निर्णय मिळविण्यात मा. नगरविकासमंत्र्यांना कोणतेही यश मिळालेले नव्हते, असे कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता दिसून येते. कारण २५ जून १९८७ रोजी प्रलंबीत करण्यात आलेला हा तारांकित प्रश्न ९७३६ दि. ९ जुलै १९८७ रोजी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सर्वप्रथम चर्चेसाठी आला असतांना मा. नगरविकासमंत्र्यांनी केलेली विनंती व त्यावर मा. सभापतींचा निर्णय पुढीलप्रमाणे :-

"**डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन** : अध्यक्ष महाराज, मा. सदस्यांचा आक्षेप नसेल तर प्र. क्रमांक ९७३६ पुढे ढकलण्यात यावा अशी मी आपणास विनंती करतो.

**श्री. बी. टी. देशमुख** : माझी हरकत नाही.

**सभापती** : ठीक आहे. हा प्रश्न पुढे ढकलण्यात आला आहे."

अशा रीतीने हा प्रश्न पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आला. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक ९ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक ९, पृष्ठ १)*

**१५७.** मुंबई येथे ही मुख्यमंत्र्यांची तारीख ठरविण्यात खासदार सौ. उषाताई चौधरींना जे यश मिळाले, त्यामुळे या प्रश्नांशी संबंधित असलेल्या सर्वांना आनंद होणे स्वाभाविकच होते. **परंतु १५ जुलै पासून प्रायोपवेशनाला सुरुवात करणारे श्री. बाळासाहेब मराठे यांना शासनाची लेखी भूमिका नेवून पोहोचविण्याची जबाबदारी त्या घटनाक्रमातून पार पडत नव्हती.** त्याबाबतचा तणाव सर्वांच्या मनावर होता. दुसऱ्या दिवशी दिनांक १० जुलै १९८७ रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. राम मेघे, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते श्री. रा. सु. गवई, कृतिसमितीचे अध्यक्ष आमदार सर्वश्री सुदाम देशमुख, डॉ. शेखावत, यशवंत शेरेकर, शरद तसरे, प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, रावसाहेब हाडोळे, पुरूषोत्तम मानकर या विधानमंडळ सदस्यांनी मुख्यमंत्र्यांच्या विधानभवनातील कार्यालयामध्ये त्यांची भेट घेतली. मुख्यमंत्री यांनी आपण १ ऑगस्ट १९८७ ची तारीख दिली असल्याचे सांगितले. पालकमंत्र्यांना ही तारीख ठाऊक न केल्याबद्दल सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले. खुद्द मुख्यमंत्र्यांनी सुद्धा याबाबत आश्चर्य व्यक्त केले. कालच आपण आपल्या स्वीयसहाय्यकांना ही तारीख पालकमंत्र्यांना कळविण्यास सांगितले होते असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. १० टक्क्याच्या लोकवर्गणी विषयी निर्णय केव्हा होणार या विषयी मुख्यमंत्री असे म्हणाले की, "विधीमंडळाच्या या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात किंवा सदरहू समारंभाच्या वेळी हा निर्णय आपण घोषित करू."

### भूमिपूजनाची तारीख बदलली

**१५८.** १ ऑगस्ट १९८७ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे कार्यक्रम असल्यामुळे ही तारीख २ ऑगस्ट १९८७ ठेवावी ही पालक मंत्र्यांची विनंती सुद्धा मुख्यमंत्र्यांनी मान्य केली. "मुख्यमंत्र्यांनी घेतलेला हा निर्णय लक्षात घेता एक जुलै पासून प्रायोपवेशन सुरु करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करू नये" अशी मुख्यमंत्र्यांच्या वतीने प्रा. राम मेघे यांनी बाळासाहेब मराठे यांना विनंती करावी असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्याप्रमाणे १० जुलै १९८७ रोजी प्रा. राम मेघे यांनी बाळासाहेब मराठे यांना पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी असे

म्हटले होते की, :-

"आपले दिनांक १९ जून १९८७ चे मा. मुख्यमंत्री यांना लिहिलेले अमरावती शहराच्या पाणीपुरवठा प्रश्नाबाबतचे पत्र मा. मुख्यमंत्री यांना मिळाले. अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरासाठी पाणी पुरवठा करावयाच्या ५५ कोटी रुपयाच्या योजनेच्या कामाचा शुभारंभ समारोह २ ऑगस्ट १९८७ रोजी आयोजित करण्याचे आदेश आजच मा. मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. लोकवर्गणीची रक्कम अमरावती महानगरपालिकेवर न बसविण्याच्या मागणी बाबतचा शासनाचा निर्णय विधानमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात किंवा सदरहू समारंभाच्या वेळीच घोषित करण्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावित केले आहे. उपरोक्त परिस्थितीत १५ जुलै पासून आपण प्रस्तावित केलेल्या प्रायोपवेशनाच्या निर्णयाचा अंमल सुरू करू नये अशी माझी आपणास मा. मुख्यमंत्र्यांच्या वतीने आग्रहाची विनंती आहे"

## बाळासाहेब मराठे यांना मुख्यमंत्र्यांच्या वतीने विनंती

**१५९.** त्याच दिवशी म्हणजे १० जुलै १९८७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या अमरावती येथील विभागीय प्रसिद्धी कार्यालयातून पत्रक क्रमांक ८६९ प्रसिद्धीला देण्यात आले. या प्रसिद्धीपत्रकात म्हटले होते की,:-

"मुंबई, दि. १० : अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरासाठी पाणी पुरवठा करण्याच्या सुमारे ५५ कोटी रुपये खर्चाच्या योजनेचे भूमिपूजन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते रविवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी होणार आहे. हा निर्णय आज विधान भवनात मुख्यमंत्र्यांना भेटलेल्या शिष्टमंडळाच्या चर्चेच्या वेळी घेण्यात आला. या शिष्टमंडळात जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. राम मेघे तसेच विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते श्री. रा. सु. गवई, आमदार सर्वश्री सुदाम देशमुख, डॉ. शेखावत, यशवंत शेरेकर, शरद तसरे, प्रा. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, रावसाहेब हाडोळे, पुरूषोत्तम मानकर आदी व्यक्ती उपस्थित होत्या."

१० टक्के लोकवर्गणीबाबत या पत्रकात असे म्हटले होते की, "सदर योजनेच्या लोकवर्गणीच्या प्रश्नाकडे शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले असता मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, लोकवर्गणीची रक्कम अमरावती महानगरपालिकेवर न बसविण्याच्या मागणी बाबतचा शासनाचा निर्णय शक्यतो विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात किंवा सदर समारंभाच्या वेळी जाहीर केला जाईल."

श्री. बाळासाहेब मराठे यांच्या प्रायोपवेशनाच्या संदर्भात शासनाच्या या प्रसिद्धी पत्रकामध्ये पुढील उल्लेख होता. "अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्याच्या संदर्भात येथील जेष्ठ स्वातंत्र्य संग्राम सैनिक श्री. बाळासाहेब मराठे यांनी प्रायोपवेशनाचा मनोदय जाहीर केला होता. त्या संदर्भात जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. राम मेघे यांनी श्री मराठे यांना पत्र लिहून शासनाची या बाबतची भूमिका ताबडतोब कळवावी आणि संकल्पित प्रायोपवेशनाचा मनोदय कार्यवाहीत आणू नये अशी मुख्यमंत्र्यांच्या वतीने विनंती करावी. असे मुख्यमंत्र्यांनी सूचविले. त्यानंतर प्रा. मेघे यांनी अशा आशयाचे पत्र श्री. मराठे यांना ताबडतोब पाठविले आहे". शुक्रवार, दिनांक १० जुलै १९८७ हा त्या आठवड्यातील बैठकीचा शेवटचा दिवस. अमरावती येथील मुक्कामात पालकमंत्री प्रा. राम मेघे हे स्वतः बाळासाहेब मराठे यांच्या खापर्डे बगीच्यातील निवासस्थानी गेले. व्यक्तिशः त्यांनी हा सर्व घटनाक्रम बाळासाहेबांना स्वतः सांगितला व उपरोक्त पत्रही दिले. १५ तारखेपासूनचा प्रायोपवेशनाचा निर्णय त्यांनी अमलात आणू नये अशी मा. मुख्यमंत्र्यांच्या वतीने त्यांना विनंती केली. भाई सुदाम देशमुख यांनी पालकमंत्र्यांचे पत्र त्यापूर्वीच बाळासाहेबांच्याकडे पोचविले होते. १३ जुलै १९८७ रोजी एक निवेदन प्रसिद्ध करून बाळासाहेबांनी आपण आपला प्रायोपवेशनाचा निर्णय २ ऑगस्ट १९८७ पर्यंत तहकूब करीत असल्याचे सांगितले.

## भूमिपूजनाला मुख्यमंत्री जाणार हे त्या खात्याच्या मंत्र्याला ठाऊक नाही

**१६०.** दिनांक ९.७.८७ रोजी सुद्धा स्थगित ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक ९७३६ हा सभागृहामध्ये दिनांक १६ जुलै १९८७ रोजी चर्चेसाठी आला. लेखी उत्तरामध्ये नगरविकास मंत्र्यांनी १० टक्के लोकवर्गणी अमरावती महानगरपालिकेकडून घेऊ नये ही "मागणी शासनाच्या अजूनही विचाराधीन आहे." असे उत्तर दिले होते. १० टक्के लोकवर्गणीच्या बाबत मा. मुख्यमंत्री हे स्वतः निर्णय जाहीर करणार असल्यामुळे सभागृहामध्ये त्याबाबत आता नगरविकास मंत्र्यांना प्रश्न विचारणे निरर्थक आहे याची आम्हाला कल्पना येऊन चुकली होती. त्यामुळे ते त्यांना कोणी विचारलेही नाही. प्रा. बी. टी. देशमुख यांनी सुरुवातीलाच पुढील माहिती सभागृहाला दिली :

"अध्यक्ष महाराज, "ही मागणी शासनाच्या विचाराधीन आहे." असे उत्तर दिलेले आहे. मागच्या वेळेस "शासनाने ही मागणी नाकारलेली आहे." असे उत्तर दिले होते. या सदनामध्ये, समितीसमोर गेल्या २ वर्षापासून निरनिराळ्या सात वेळा हे कबूल केलेले आहे की, "लोकवर्गणीची रक्कम पाणीपुरवठा मंडळ भरेल." १४ ऑक्टोबर १९८६ ला तसा जी. आर काढला. परंतु नंतर २७ ऑक्टोबरला तो जी. आर बदलण्यात आला. आता "ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे" असे उत्तर दिलेले आहे." व त्यानंतर "**माझा प्रश्न असा आहे की, २ ऑगस्टला माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या योजनेचे भूमीपूजन करण्याचे शासनाने ठरविले आहे ही गोष्ट खरी आहे काय? तसेच लोकवर्गणीची रक्कम महानगरपालिकेवर लादू नये या मागणीसंबंधीचा निर्णय या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात किंवा त्या समारंभाच्या दिवशी घोषित केला जाईल असे शासनातर्फे सांगण्यात आले आहे ही गोष्ट खरी आहे काय?**" असा उपप्रश्न विचारला.

## चुकीचे उत्तर देणारा मंत्रीच विचारतो मी चुकीचे उत्तर कशासाठी देईन?

**१६१.** प्रा.बी.टी.देशमुख यांच्या उपरोक्त प्रश्नाला नगरविकास मंत्री श्री. सुब्रम्हण्यन यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले :-

"माननीय सदस्यांनी सुरुवातीस या प्रश्नासंबंधीची पार्श्वभूमी सांगितली. तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी २ ऑगस्टला या समारंभाचे उद्घाटन करण्याचे ठरविले आहे काय? असा प्रश्न विचारला. **माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात जे सांगितले आहे त्याबाबतीत मी चेक केलेले नाही.** तसेच माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी किंवा २ ऑगस्टपर्यंत यासंबंधीची घोषणा होईल काय? याबाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की, त्याबाबत निश्चित प्रयत्न करू." दहा टक्के लोकवर्गणी कोणी भरावी या प्रश्नाची चर्चा बाजूला राहिली आणि एका कॅबिनेट मिनिस्टरने मुख्यमंत्र्यांनी करावयाच्या उद्घाटन कार्यक्रमाविषयी लिहिलेले पत्र व प्रसिद्धी खात्याने काढलेले प्रसिद्धीपत्रक याबाबत नगर विकासमंत्र्यांना काहीच माहिती असू नये यावरून सभागृहामध्ये खूपच खडाजंगी चर्चा झाली. प्रा. बी. टी. देशमुख यांनी या दोनही कागदपत्रातील आवश्यक भाग सभागृहामध्ये उधृत केला. व त्याबाबत उपप्रश्न विचारला तो पुढील शब्दात :-

"अध्यक्ष महाराज, ही अतिशय गंभीर बाब आहे. **कॅबिनेट मंत्र्यांनी पत्र लिहून कळविलेले आहे. त्याची प्रत सभापती महाशय मी आपणाकडे पाठवितो. त्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, "२ ऑगस्ट १९८७ रोजी या कामाचा शुभारंभ समारोह आयोजित करण्याचे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहेत."** त्यामध्ये असेही म्हटलेले आहे की, "लोकवर्गणीची रक्कम अमरावती नगरपालिकेकडून वसूल न करण्यासंबधीचा निर्णय या विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात किंवा सदरहू समारंभाच्या दिवशी घोषित करण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावित केले आहे." **तसेच प्रसिद्धीपत्रक क्र. ८६९, विभागीय माहिती कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र शासन यांनी प्रसिद्ध केले. त्यांच्या पत्रकात स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, "माननीय मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या शुभहस्ते या योजनेचे भूमिपूजन २ ऑगस्ट १९८७ रोजी होणार आहे.**" असे असतांना माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी अशा प्रकारे उत्तर देणे बरोबर नाही. गेल्या वेळेसही दसऱ्याला उद्घाटन करण्यात येईल असे सांगितले होते. पण पुढे काही झाले नाही आताही तसेच आहे काय?"

**१६२.** हा प्रश्न विचारत असतांना सुरूवातीलाच मी या दोनही कागदपत्रांच्या प्रति मा. सभापतींच्या सुपूर्त केल्या. माझा उपप्रश्न संपताच खुद्द मा. सभापतींनी पुढील प्रमाणे उद्गार काढले :-

"२ ऑगस्ट रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या योजनेचे भूमिपूजन होईल असे पत्र मिळाल्याचे माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी सांगितलेले आहे की, या योजनेचे भूमिपूजन माननीय मुख्यमंत्री करणार आहेत की नाही ते मी चेक केलेले नाही. **माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे पत्र वाचून दाखविले त्यामध्ये माननीय मुख्यमंत्री भूमिपूजन करणार असा स्पष्ट उल्लेख आहे, तेव्हा याचा खुलासा होणे जरूर आहे.**"

**१६३.** खुद्द मा. सभापतींच्या या हस्तक्षेपानंतर नगरविकास मंत्र्यांनी पुढील प्रमाणे उद्गार काढले :-

"अध्यक्ष महाराज, मी खुलासा करू चाहतो. कॅबीनेट मंत्र्याकडून पत्र आलेले आहे असे जे म्हटले ते पत्र माझ्याकडून आलेले नाही. **माननीय सदस्य कोणत्या मंत्र्यांचा उल्लेख करतात ते मला माहीत नाही. जर मी तसे पत्र दिले असते तर या ठिकाणी चुकीचे उत्तर कशासाठी देईन?**"

*************************************************

# १६

# रुसलेल्या नगरविकासमंत्र्यावर सभागृहात चौफेर हल्ला

*************************************************

## रुसलेल्या नगरविकास मंत्र्यावर सभागृहातून चौफेर हल्ला

**१६४.** दि. १६ जुलै १९८७ च्या सभागृहाच्या कामकाजाच्या नोंदींचे बारकाईने अवलोकन केले असता श्री. सुब्रम्हण्यन यांनी प्रा. राम मेघे यांचा नामोल्लेख सभागृहामध्ये करण्यापूर्वी दुसऱ्या कोणीही "अमरावती जिल्ह्यातील पालकमंत्र्यांनी किंवा प्रा. राम मेघे यांनी हे पत्र दिले." असा उल्लेख केलेला नसतांना डॉ. सुब्रम्हण्यम यांनी प्रा. राम मेघे यांनी पत्र लिहिलेले आहे असा उल्लेख ज्या अर्थी केला त्या अर्थी सभागृहाबाहेर झालेल्या घडामोडीबाबत त्यांना अजिबात माहिती नव्हती असा निष्कर्ष काढता येत नाही. दुसऱ्या कॅबिनेट मंत्र्यांनी आपल्या खात्यामध्ये आपल्या अपरोक्ष काही घडामोडी कराव्या हे त्यांना न आवडल्याचे या चर्चेवरून दिसून येते. यातून त्यांनी जी भूमिका घेतली त्यामुळे त्यांना सुद्धा सभागृहाचा बराच राग सहन करावा लागला. हे कामकाजाच्या नोंदीवरून सहज लक्षात येते. समारंभ होणार की नाही, मुख्यमंत्र्यांनी ठरविले, त्यांना अधिकार आहेच, आपल्याशी सल्ला मसलत झाली नाही अशा वातावरणाच्या मानसिक स्थितीमध्ये मा. नगरविकासमंत्री असतांना झालेली प्रश्नोत्तरे पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख** : महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाचे क्रमांक ८६९ चे प्रसिद्धीपत्रक आहे. १० जुलै १९८७ ला अमरावतीच्या विभागीय माहिती कार्यालयाने हे पत्रक काढलेले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, **"अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरासाठी पाणीपुरवठा करावयाच्या सुमारे ५५ कोटी रुपये खर्चाच्या योजनेचे भूमिपूजन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या शुभहस्ते रविवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी होणार आहे." हे शासनाचे अधिकृत प्रसिद्धीपत्रक आहे, हे खरे ना?**

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन** : हा समारंभ होणार नाही अशा प्रकारे मी सांगितलेले नाही, **परंतु माझी माहिती सुद्धा तीच आहे जी सन्माननीय मंत्री प्रा. राम मेघे यांनी त्या पत्रात दिलेली आहे.** परंतु १० टक्के लोकवर्गणीचा जो प्रश्न आहे.....

**सभापती** : माननीय सदस्यांचे दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, २ ऑगस्टला या पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन होणार आहे काय आणि दुसरा जो प्रश्न आहे तो १० टक्के लोकवर्गणी संबंधीचा आहे. **तेव्हा २ ऑगस्टला या योजनेचे भूमिपूजन होणार आहे काय?**

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन : मी ते चेकअप केलेले नाही.** I can not say any thing about it. १० टक्के लोकवर्गणीचा खुलासा केलेला आहे. त्याबद्दल विचार करीत आहोत आणि लवकरात लवकर निर्णय घेऊ.

**श्री. माधवराव घायगुडे** : शासनाच्या प्रसिद्धी विभागाने तसे पत्रक प्रसिद्ध केले आहे हे खरे आहे काय?

**सभापती** : त्या प्रसिद्धी पत्रकात काय म्हटले आहे त्यापेक्षा माननीय मंत्रीमहोदय या ठिकाणी काय सांगतात ते महत्त्वाचे आहे.

**श्री. बी. टी. देशमुख** : अध्यक्ष महाराज, यापूर्वी १० वेळा हा प्रश्न सभागृहामध्ये येऊन गेला. माननीय मुख्यमंत्री ......

**सभापती** : १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्न १० वेळा सदनामध्ये येऊन गेला हे खरे आहे व आता २ ऑगस्टला माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या योजनेचे भूमिपूजन होणार आहे असे प्रसिद्धी पत्रक परस्पर निघालेले आहे. माननीय मंत्र्यांनी याबाबतीत सांगितलेले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी यासंबंधी चौकशी केलेली नाही.

**श्री. सदानंद वर्दे** : अध्यक्ष महाराज, नगरविकास विभागाच्या क्षेत्रामध्ये येणारा हा उपक्रम आहे. **आता २ ऑगस्टला फार काळ राहिलेला नाही आणि हा जो कार्यक्रम होणार आहे त्यासंबंधी इनचार्ज कॅबिनेट मंत्र्यांना माहिती नाही. म्हणजे हे राज्य कशा पद्धतीने चालले आहे, त्याचे हे द्योतक आहे.**

**Dr. V. Subramanian** : It is the same thing coming to different conclusion. I am not denying that. The point is that I have not checked up. I have not said that I have checked up. I will not say about anything which is not known to me.

**श्री. दे. मा. कराळे** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मुद्दा अतिशय स्पष्ट आहे त्या ठिकाणचे जे इनचार्ज कॅबिनेट मंत्री आहेत त्यांच्यावर जिल्ह्याच्या विकासाची जबाबदारी आहे ते शासनाचे घटक आहेत. असे असतांना त्या ठिकाणी होणारा उद्घाटन समारोह संबंधित खात्याच्या मंत्र्यांना विश्वासात न घेता केला जाईल ही घटना न पटण्याजोगी आहे. तेव्हा यामधून प्रिझम्शन इव्हिडन्स काय निघतो तो सांगण्यास काय हरकत आहे?

**The Chairman** : Why should he say so. The Hon. Minister has said that he does not know about this and that he has not enquired with Chief Minister.

**श्री. मधू देवळेकर** : अध्यक्ष महाराज, नगरविकास खात्याच्या कार्यकक्षेतील ही बाब आहे. त्यासंबंधीचे जे परिपत्रक काढण्यात आले आहे त्यानुसार माननीय मुख्यमंत्री त्या समारंभाला जात असतील, तिकडचे अमरावतीचे कॅबिनेट मंत्री प्रा. राम मेघे जात असतील. कोणाच्या प्रेरणेने प्रसिद्धीपत्रक निघत असेल ही गोष्ट वेगळी आहे, परंतु आपल्या कार्यकक्षेच्या संबंधी परिपत्रक निघत असते. तेव्हा your permission is sought or not. Whether it was sent to you for your information.

**Dr. V. Subramanian** : What I said was that I have not checked Up.

**Shri. Madhu Deolekar** : My question is different.

**Dr. V. Subramanian :** Mr. Chairman Sir I have not said No.

**The Chairman :** The question is pointed. before publishing this announcement whether they tried to take your opinion on it or at least whether they informed you about it.

**Dr. V. Subramanian** : The Hon. Chief Minister is entitled to attend his programmes. He is having this matter under considertion and he will certainly do that.

**The Chairman** : Whether the Hon. Minister know about it?

**Dr.V. Subramanian** : No. As I have mentioned earlier, the Hon. Minister Shri. Ram Meghe may have informed him. I am not knowing about this. In my opinion the second question is even more important than this. It is about 10 percent contribution.

**Shri. Madhu Deolekar** : The Hon Minister is digressing from the point.

**Dr. V. Subramanian :** I do not believe in digression.

**The Chairman** : If the Hon. Minister Shri. Ram Meghe informed the Hon' member then probably Hon. Minister may not be knowing the date. That you have to check. You check it and put before the House.

**Dr. V. Subramanian** : I will do that." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १६ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १४, पृष्ठ २-४)*

## सर्व वृत्तपत्रांना जे ठाऊक आहे ते खात्याच्या मंत्र्याला माहीत नाही

**१६५.** "सर्व वृत्तपत्रातून ह्या गोष्टी ठळकपणे प्रसिद्ध झालेल्या आहेत. आणि तुम्ही नाही म्हणता हे बरोबर नाही. हे अधिवेशन संपायला अजून एक आठवडा आहे. पुढच्या शुक्रवारपर्यंत या बाबतची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे." अशी मागणी प्रा. बी. टी. देशमुख यांनी केली. ती पुढील शब्दात :-

"**या जिल्ह्याच्या स्वातंत्र्य संग्राम सैनिक गौरव समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब मराठे यांनी १५ जुलैपासून उपोषणाची नोटीस दिली होती. एवढ्या वेळा सभागृहामध्ये कबूल करून देखील शासन ही गोष्ट करण्याला तयार नाही हे बरोबर नाही. म्हणून त्यांनी नोटीस दिली होती. त्यांना आपण पत्र दिले. मा. मुख्यमंत्र्यांच्या वतीने कळवा. मा. मंत्रीमहोदय स्वतः त्यांच्याकडे गेले. पत्रकाची कॉपी त्यांच्या घरी नेऊन दिली.** अमरावतीच्या, नागपूरच्या वर्तमानपत्रामध्ये ही गोष्ट प्रसिद्ध झाली. मोठमोठ्या हेडलाईन्स यावर वर्तमानपत्रातून देण्यात आल्या. पत्रक काढून या गोष्टीला प्रसिद्धी देण्यात आली आणि या सभागृहाला मात्र हे जाणून घेण्याचा काहीच अधिकार नाही काय? याबाबतचा विचार केव्हा पूर्ण करणार? असा प्रश्न आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, विधानमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यामध्ये किंवा समारंभाच्या दिवशी या टेन परसेंटच्या रकमेबाबत निर्णय सांगण्यात येईल. प्रसिद्धी पत्रकामध्ये असा उल्लेख आहे. त्या जिल्ह्याच्या खासदारांनी देखील स्वतःच्या सहीने पत्रक काढले आहे. येथे आपण या विषयावर एवढी चर्चा करतो. वादविवाद करतो तिकडे हे सर्व गावभर प्रसिद्ध झालेले

आहे. पण तुम्हाला ठाऊक नाही. अमरावतीच्या, नागपूरच्या वर्तमानपत्रातून याला प्रसिद्धी मिळालेली आहे. ही सर्व चर्चा हास्यास्पद होणार आहे काय? म्हणून २ ऑगस्टच्या तारखेबाबत मा. मंत्रीमहोदयांनी चौकशी करून या सभागृहाला माहिती द्यावी. तसेच पुढच्या आठवड्यामध्ये हा निर्णय सभागृहात सांगितला पाहिजे. विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यामध्ये याबाबत निर्णय घेण्यात येईल असे मा. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले. हे अधिवेशन संपायला अजून एक आठवडा आहे. पुढच्या शुक्रवार पर्यंत या तिन्ही गोष्टींबाबतची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. तारखेबाबत आपण सांगितले पाहिजे आणि दुसरे म्हणजे या निर्णयाबद्दलची माहिती घेऊन पुढच्या आठवड्यापर्यंत मा. मंत्रीमहोदय या प्रश्नाचे उत्तर देतील काय?"

## तपास काढा आणि सभागृहाला सांगा - सभापतींचा आदेश

**१६६.** नगरविकासमंत्री म्हणाले : "२ ऑगस्टच्या तारखेबाबत मी विचारून सभागृहाला माहिती देऊ शकतो. १० टक्क्याबाबत मी अगोदर सांगितल्याप्रमाणे हा प्रश्न विचाराधीन आहे. शासनाचा याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार चालू आहे. याबाबतचा निर्णय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यामध्ये होईल किंवा पुढच्या २ तारखेला होईल हे मी सांगू शकणार नाही एवढेच मी म्हटलेले आहे." त्यांच्या या उत्तराने कुणाचेही समाधान होईना. मा. सभापतींनी त्यावर पुन्हा सदस्यांकडे चौकशी केली व आपला निर्णय सांगितला, तो पुढील प्रमाणे :

**"सभापती : मा. सदस्यांजवळ असलेल्या पत्रकामध्ये टेन पर्सेन्ट बाबतचा काही उल्लेख आहे का?**

**श्री. बी. टी. देशमुख :** होय, अध्यक्ष महाराज, कॅबीनेट मिनीस्टरच्या पत्रामध्ये आणि प्रसिद्धी पत्रकामध्ये देखील त्याचा उल्लेख आहे. प्रसिद्धी पत्रकामध्ये असे म्हटलेले आहे की, **"सदर योजनेच्या लोकवर्गणीच्या प्रश्नाबाबत शिष्टमंडळाने मा. मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले असता मा. मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, लोकवर्गणीची रक्कम अमरावती महानगरपालिकेवर न बसविण्याच्या मागणी बाबतचा शासनाचा निर्णय शक्यतो विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात किंवा सदर समारंभाच्या वेळी जाहीर केला जाईल."**

**The Chairman :** Now there are two points, one is about the date. As far as the date is concerned, you enquire and inform the House. This you have accepted. As regards the 10 Percent contribution, it seems that it has also appeared in that press statement, you enquire about it and inform the House." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १६ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १४, पृष्ठ ५)*

## सुधीर जोशी यांचा मुद्दा

**१६७.** अधिवेशन चालू असतांना बाहेर घोषणा करण्याच्या संदर्भात त्यानंतर सुधीर जोशी यांनी यावेळी एक नवीनच मुद्दा काढला. ते म्हणाले : "अध्यक्ष महाराज, या ठिकाणी प्रश्न असा आहे की लोकवर्गणीची रक्कम १० टक्के ही अमरावती नगरपालिकेवर बसवायची की नाही याचा निर्णय समारंभामध्ये घोषित करण्यात येईल किंवा अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यामध्ये घोषित करण्यात येईल असे म्हटलेले आहे. यामध्ये असा वास येतो की, हा समारंभ होण्यापूर्वी कोणीतरी उपोषणाची नोटीस दिलेली आहे ते उपोषण लांबणीवर पडावे, समारंभामध्ये काही गोंधळ होऊ नये म्हणून हा प्रश्न टांगता ठेवून नंतर निर्णय जाहीर करायचा या पेक्षा सभागृहाच्या बैठका चालू असतांना पुढच्या आठवड्यामध्ये हा निर्णय का जाहीर करीत नाही? ही रक्कम अमरावती नगरपालिकेवर लादायची की नाही हा निर्णय सभागृहामध्ये सांगितला पाहिजे नाहीतर हा कार्यक्रम उरकून घेण्याचा आपला डाव दिसतो. सभागृहामध्ये पुढच्या आठवड्यामध्ये हा निर्णय का आपण सांगण्यास तयार नाही? म्हणजे ज्यांना आंदोलन करायचे आहे ते पुढच्या आठवड्यापासून आंदोलन सुरू करू शकतील. हे आंदोलन टाळण्यासाठी हा निर्णय अधिवेशन संपल्यानंतर जाहीर केला जाईल. म्हणजे समारंभाच्या वेळी आंदोलन नको म्हणून आम्ही हे जाहीर करतो असे घोषित करायचे किंवा समारंभामध्ये क्रेडिट घेण्यासाठी आम्ही सर्वांना खूष करण्यासाठी सांगतो असे सांगायचे." यानंतर पुन्हा या मुद्दाला धरून पुढील प्रश्नोत्तरे झाली :

"**The Chairman :** What the Hon. member Shri. Sudhir Joshi wants is you make the exact position clear here in this House in the next week. It will be helpful for the House.

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** अध्यक्ष महाराज, आपल्या आदेशाप्रमाणे मी या ठिकाणी सांगितलेलेच आहे की, २ ऑगस्ट बाबत सभागृहाला चौकशी करून सांगतो आणि टेन पर्सेंट बाबत शासनाचे सहानुभूतीपूर्वक धोरण आहे तो प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. **याबाबतीत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करीत आहे या पलीकडे मी काही सांगू शकत नाही. या बाबतचा निर्णय लवकरात लवकर देण्याचा माझा प्रयत्न राहील.**

**सभापती :** प्रसिद्धी पत्रक आणि त्याच्याच बरोबर मा. मंत्रीमहोदयांचे जे स्टेटमेंट आहे, त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे या निर्णयाची अनाउसमेंट होईल का एवढेच आपण सांगा.

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** अध्यक्ष महाराज मला एकच खुलासा या ठिकाणी हवा आहे. त्यामध्ये "निर्णय घोषित होईल" असे म्हटलेले आहे. १० टक्के लोकवर्गणीबाबत .... म्हणून मी या बाबत एवढेच सांगतो की, या बाबतीत आम्ही सहानुभूतीपूर्वक विचार करू.

**श्री. सुधीर जोशी :** हा निर्णय सभागृहामध्ये पुढील आठवड्यामध्ये सांगितला जाईल की नाही एवढेच मा. मंत्रीमहोदयांनी सांगावे.

**श्री. मधू देवळेकर :** या संबंधी निर्णय घेण्याबाबत मा. मंत्रीमहोदय श्री. सुब्रमण्यन यांच्यावर दुसऱ्या कोणत्या मा. मंत्रीमहोदयांचे दडपण येत आहे?

**(उत्तर नाही)** *" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १६ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १४, पृष्ठ ६)*

## हे राज्य कशा पद्धतीने चालले आहे - सदानंद वर्दे

**१६८.** श्री. सदानंद वर्दे यांनी प्रसिद्धी अधिकारी तिकडे प्रसिद्धीपत्रक काढतात व इकडे त्यांच्या खात्याचा प्रश्न असून मंत्र्यांना त्याची माहिती नसते यावरून हे राज्य कशा पद्धतीने चालले आहे हे मला समजत नाही असे काढलेले उद्‌गार व त्यानंतर झालेली प्रश्नोत्तरे पुढील प्रमाणे :-

"**श्री. सदानंद वर्दे :** सभागृहापुढे आता सन्माननीय नगरविकास मंत्र्यांनी असे सांगितले की, मी सहानुभूतीने विचार करतो आहे आणि लवकरात लवकर सांगतो. असे म्हणत असताना या प्रसिद्धी पत्रकात ऑफीशिअली डायरेक्टर ऑफ पब्लीसिटीच्या अमरावती जिल्ह्याच्या अधिकाऱ्याने असे जाहीर केलेले आहे की, अमुक दिवशी ते केले जाईल. सभागृहामध्ये हा प्रश्न आहे आणि मंत्रीमहोदय असे सांगत नाहीत की, २४ तारखेच्या आत जाहीर करीन किंवा अमुक तारखेला जाहीर करीन. तरी ही विसंगती नाही काय? How this Government is functioning? हे राज्य कशापध्दतीने चालले आहे ते मला समजत नाही.

**सभापती :** १० टक्के लोक वर्गणी कोणी भरावयाची याचा निर्णय धोरणात्मक असून तो शासनाने घ्यावयाचा आहे. प्रश्न असा की अधिवेशन चालू असतांना याचा निर्णय झाला तर तो प्रथम विधिमंडळात न सांगता शासनाचा प्रसिध्दी अधिकारी तो निर्णय प्रसिद्ध कसा करतो? तेंव्हा याची तुम्ही चौकशी करा आणि सभागृहात सांगा.

**श्री दे. मा. कराळे :** अध्यक्ष महाराज, मला हाच प्रश्न विचारावयाचा होता. अध्यक्ष महाराज, हा प्रोप्रायटीचा प्रश्न आहे. जे पत्रक वाचण्यात आले त्या पत्रकात असा स्पष्ट निर्देश केलेला आहे की, लोकवर्गणी चार्ज करावयाची नाही असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याबाबतचा निर्णय जाहीर करणार आहोत. तेव्हा प्रोप्रायटीचा विचार केला तर सेशन सुरू असतांना आपण जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. जेव्हा हाउस सुरू असते त्याच वेळेला याचे डिक्लेरेशन होणे हे प्रोप्रायटीच्या दृष्टीने योग्य होईल.

**सभापती :** अमुक ठरविले आहे असे या प्रसिद्धी पत्रकातील वाक्यातून स्पष्ट होत नाही. पण अमुक तारखेला भूमिपूजन करणार असे मात्र आहे म्हणून तत्वतः मी सांगितले **की ज्यावेळेस अधिवेशन चालू असते तेव्हा शासनाचा निर्णय सभागृहामध्ये आधी जाहीर झाला पाहिजे त्याशिवाय इतर कोठेही तो प्रसिध्द होऊ नये.**

**श्री. सुधीर जोशी :** अध्यक्ष महाराज, या ठिकाणी माझा हरकतीचा मुद्दा आहे या ठिकाणी लोकवर्गणी घ्यावयाची की नाही याचा निर्णय जरी झालेला नसला तरी याचा निर्णय करण्याची तारीख निश्चित झालेली आहे. शेवटचा आठवडा किंवा २ ऑगस्ट म्हणजे दोन ऑगस्टच्या पुढे हा निर्णय जाणार नाही असा शासनाचा निर्णय असतांनासुध्दा या ठिकाणी तो निर्णय लपविण्यात येत आहे.

**सभापती :** हा हरकतीचा मुद्दा नाही.

**श्री. सुधीर जोशी :** शासनाच्या वतीने प्रसिध्दी देण्यात आलेली आहे त्यामुळे त्यांनी सांगावे हे खरे नाही म्हणून.

**सभापती :** त्याचीच चौकशी करावयाला मी सांगितले आहे.

**श्री. सुधीर जोशी :** लवकरात लवकर खरे की दोन ऑगस्ट खरे ते तरी

सांगावे.

**सभापती :** हा काही हरकतीचा मुद्दा नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १६ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १४, पृष्ठ ७)*

## माहिती सभागृहातच सांगितली पाहिजे - सु.र.वहाडणे

**१६९.** सभागृहातच माहिती सांगितली गेली पाहिजे हा मुद्दा श्री. सु. र. वहाडणे यांनी प्रभावीपणे मांडला. ते म्हणाले : "अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, आपल्या या वरिष्ठ सभागृहामध्ये अमरावती नगरपालिकेचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न अनेक वेळा आलेला आहे. अनेक वेळा हा प्रश्न येऊनही या प्रश्नाच्या संदर्भात ही लोकवर्गणी भरावयाची की भरावयाची नाही ही बाब विचाराधीन आहे, असे अनेक वेळा सांगितलेले आहे. तरी मला या ठिकाणी असे विचारावयाचे आहे की, ज्या प्रश्नाची या वरिष्ठ सभागृहामध्ये अनेक वेळेला चर्चा झालेली आहे आणि आता अंतिम निर्णयाप्रत शासन आलेले आहे किंवा अंतिम निर्णय केलेला आहे असे समजते, तरी या प्रश्नासंबंधी माहिती या सभागृहामध्ये आली पाहिजे. कारण या प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. तरी या सभागृहात निर्णय झाला पाहिजे अशा स्वरूपाचा हक्क या सभागृहाचा आहे की नाही?" यावर मा. सभापती म्हणाले "अधिवेशन चालू असेल तर प्रथम सभागृहातच तो निर्णय घोषित झाला पाहिजे."

## आज नाही उद्या पण सभागृहात सत्य सांगावेच लागेल

**१७०.** बाहेर मुख्यमंत्री भूमिपूजनाची तारीख जाहीर करतात व इकडे त्या खात्याचे मंत्री "आपल्याला काहीच ठाऊक नाही" असे सोंग आणतात. तारीख सभागृहाच्या रेकॉर्डवर आणण्यासाठी सभासदांनी केलेली झटापट व एकदा भूमिका घेतल्यामुळे आपण कोठेही अडकू नये म्हणून मंत्र्यांनी केलेली तडफड व "आज नाही उद्या पण यातून तुम्हाला सुटका नाही" अशा अर्थाचा मा. सभापतींचा निर्णय यांचे उत्तम दर्शन घडविणारी सभागृहातील पुढील प्रश्नोत्तरे वाचण्यासारखी आहेत :

"**श्री. वसंत चव्हाण :** अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आणि आता सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी दाखविलेल्या पत्रकाप्रमाणे शासन याच्यावर गंभीरपणे विचार करीत आहे असे मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. शक्य झाले तर अधिवेशनाच्या आतच निर्णय होऊ शकतो. कारण शासन कधीही निर्णय घेऊ शकते. या सभागृहाची भावना सन्माननीय मंत्रीमहोदय मुख्यमंत्र्यांना सांगतील. माझा प्रश्न असा आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेतला पाहिजे. अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेतला तर तो निर्णय विशेष निवेदन करून सन्माननीय मंत्रीमहोदय सभागृहाला कळवतील काय?

**Dr. V. Subramanian :** It is a good suggestion for action.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महोदय. याच्यामुळे अतिशय वाईट वातावरण निर्माण होणार आहे. दोन ऑगस्टला कार्यक्रम माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला आहे. तरी याबाबतीत पुढच्या आठवड्यात आपण उत्तर द्यावे की अशा प्रकारचा निर्णय जाहीर केला आहे किंवा नाही. त्यानंतर १० टक्के वर्गणी बसवू नये या बद्दलच्या दोन तारखा आहेत. एक तर या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात किंवा दोन ऑगस्टला याचा निर्णय घोषित केला जाईल असे म्हटलेले आहे. तिसरे असे आहे की, औचित्याला धरून असे आहे की, पुढच्या आठवड्यामध्ये ते व्हावे. जर होणारच असेल दोन पैकी कोणत्याही एका तारखेला, तर आपण तसा प्रयत्न करावा तरी माझ्या पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे आली पाहिजेत आणि तिसऱ्या बाबतीत आपण प्रयत्न करावा. पुढच्या गुरुवारपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी विनंती आहे.

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** अध्यक्ष महाराज, आपल्या करीता सजेशन आहे राखून ठेवावा म्हणून. माझ्या मताप्रमाणे प्रश्न राखून ठेवण्याची काहीही आवश्यकता नाही.

**श्री. बी. टी. देशमुख :** मग माझ्या पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे कळणार कशी?

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी जे प्रश्न विचारले त्यांचे उत्तर दिले आहे. त्यामध्ये "विचाराधीन आहे." आणि "सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल" असे मी सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री. वसंत चव्हाण म्हणाले की, त्यासंदर्भात सजेशन फॉर ॲक्शन असे मी सांगितले आहे. २ ऑगस्टच्या संदर्भात अध्यक्ष महोदय आपण व्हेरीफाय करावयाला सांगितले आहे, त्याप्रमाणे मी करतो.

**सभापती :** या स्थगित प्रश्नाच्या उत्तरात किंवा उपप्रश्नाला उत्तरे देतांना या संबंधी घोषणा झाली असती तरी प्रश्न नव्हता. पण जेव्हा सभागृह चालू आहे तेव्हा एखाद्या निर्णयाबाबत जिल्हा प्रसिद्धी अधिकारी पत्रक काढतात त्यानंतर कॅबीनेट मिनिस्टरही काढतात हे बरोबर नाही. या पत्रकात असे म्हटलेले आहे की, निर्णय अधिवेशन संपण्याच्या आत होईल किंवा २ ऑगस्टला होईल. २ ऑगस्टला निर्णय झाला तर याच्याशी सभागृहाला काही कर्तव्य नाही. परंतु सभागृह संपण्याच्या आत म्हणजे २४ तारखेच्या पूर्वी निर्णय होणार असेल तर सभागृहाचा संबंध येतो. अमुक एक गोष्ट होणार आहे असे एखाद्या जिल्हा प्रसिध्दी पत्रकामध्ये किंवा कॅबीनेट मिनीस्टरने परस्पर बाहेर सांगावे हे औचित्याला धरून नाही. **याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, ही सगळी पार्श्वभूमी आणि याबाबतीत फुटलेले फाटे लक्षात घेऊन आपण मुख्यमंत्र्यांशी बोलावे आणि जो काही निर्णय होईल तो शक्य तर हे अधिवेशन संपण्याच्या आत सभागृहाला कळवावा** अशी मी आपल्याला सूचना करतो.

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** अध्यक्ष महाराज, आपल्या सूचनेप्रमाणे मी ॲक्शन घेईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, दोन तारखेची गोष्ट खरी आहे की नाही हे कळायला नको काय?

**सभापती :** दोन तारखेला भूमिपूजन होणार की नाही हे कळण्यापेक्षा १० टक्के लोकवर्गणीच्या बाबतीत काय निर्णय झाला हे कळणे महत्वाचे आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री याचे उद्घाटन करणार आहेत किंवा नाही? डिबेटमध्ये एक वर्षाच्या अगोदर आपण सांगितले आहे......

**सभापती :** मा. मुख्यमंत्री २ ऑगस्टला भूमिपूजन करतील असे परिपत्रक काढले तरी त्यामुळे या सभागृहाचा हक्कभंग होत नाही. औचित्य भंग होत नाही. प्रथेचा सुद्धा भंग होत नाही. सभागृह संपण्याच्या आत अमुक गोष्ट केली जाणार आहे असा निर्णय जर परस्पर बाहेर घोषित केला तर औचित्यभंग होतो. एक वर्षाच्या आत याबद्दल निर्णय होईल असे पूर्वी मंत्रिमहोदय म्हणाले की नाही याची मी चौकशी करतो. पण तो महत्त्वाचा प्रश्न नाही. टेन परसेंटचा प्रश्न मात्र महत्त्वाचा आहे. **मी माननीय मंत्रिमहोदयांना सुचविले आहे की, जितके फाटे फुटलेले आहेत त्या सर्वांच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांशी त्यांनी बोलावे आणि सभागृहाला सांगावे.** मात्र सभागृहाला सांगाच असा मी त्यांना आदेश देऊ शकत नाही. कारण माहीती घेण्याचा प्रश्न आहे. मी जे काही सुचविलेले आहे ते त्यांना कळले आहे. त्यांच्या विचारार्थ आहे, सहानुभूतीपूर्वक विचारार्थ आहे. मुख्यमंत्र्यांनी तारीख दिलेली असावी असे दिसते त्या अर्थी त्यांच्याही विचारार्थ आहे असा त्याचा अर्थ होतो." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १६ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १४, पृष्ठ ८-९)*

## "अज्ञानी" नगरविकास मंत्र्याचा त्रिवार निषेध

**१७१.** ३०-३५ मिनिटे चर्चा सुरू होती. नागपूर, अमरावती व मुंबईच्या सुद्धा वृत्तपत्रामध्ये एक आठवडा अगोदर "**२ तारखेला मुख्यमंत्री स्वतः या योजनेचा भूमिपूजन समारंभ करणार आहेत**" या बातम्या ठळकपणे येऊन गेल्या होत्या. पण मा. नगरविकासमंत्री तेवढे सुद्धा सांगायला तयार नव्हते. अतिशय तापलेल्या वातावरणात सभागृहातील चर्चेचा शेवट पुढील संवादाने झाला :

"**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महोदय, २ ऑगस्ट ही तारीख माहीत नाही असे सांगितले त्याचा मी निषेध करतो.

**सभापती :** निषेध करण्यापूर्वी एक लक्षात घ्या की जो माणूस उपोषणाला बसला त्यालासुद्धा त्यांनी हे पत्र पाठविलेले आहे. तेव्हा त्यामध्ये गांभीर्य आहे. मुख्यमंत्र्यांच्या आणि मंत्र्यांच्या ते लक्षात आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांचे मी दहा वेळा आभार मानेल, त्यांनी या ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकाला पत्र लिहिण्याचे आदेश दिले म्हणून, **परंतु यांना माहीत नाही त्याला काय करणार? याचा निषेधच केला पाहिजे. जे राज्य चालवतात, खाते चालवतात त्यांना माहीत नाही ही निषेधार्ह गोष्ट आहे. एका स्वातंत्र्य सैनिकाला मुख्यमंत्री लिहितात आणि त्या खात्याच्या मंत्र्याला त्याची माहिती राहत नाही ही त्रिवार निषेध करण्यासारखी गोष्ट आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १६ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १४, पृष्ठ ९)*

## नगरविकास मंत्र्यांविरुद्ध हक्कभंगाची सूचना

**१७२.** योजनेच्या उद्घाटनासाठी तारीख ठरलेली आहे किंवा नाही आणि लोकवर्गणीच्या बाबत निर्णय त्या समारंभात घोषित केला जाणार किंवा नाही याची चौकशी करून माहिती शेवटच्या आठवड्यात सभागृहाला दिली जावी असे ठरलेले होते. **परंतु अधिवेशनाला एकच दिवस राहिला तरी मा. नगरविकासमंत्र्यांनी याबाबत कोणतीही माहिती दिली नव्हती.** म्हणून दिनांक २३ जुलै १९८७ रोजी प्रा. बी. टी. देशमुख व पु. ब. सोमवंशी यांनी नगरविकास मंत्र्यांच्या विरुद्ध हक्कभंगाची सूचना दिली. या सूचनेत असे म्हटले होते की, :-

"ज्या अर्थी तारांकित प्रश्न क्रमांक ९७३६ वर दिनांक १६.७.८७ रोजी 'अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा प्रकल्पातून पाणी पुरवठा' या विषयावरील चर्चेमध्ये सदरहू पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री हे दिनांक २ ऑगस्ट १९८७ रोजी करणार आहेत किंवा कसे? याविषयीची माहीती मा. नगरविकास मंत्र्यांनी दिली नाही. वस्तुतः सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्र्यांनी असे पत्र लिहीले आहे असा उल्लेख मी माझ्या पुरक प्रश्नामध्ये केला होता. चर्चेमध्ये मा. प्रा. राम मेघे या कॅबिनेट मंत्र्यांनी ते पत्र लिहिले आहे असा उल्लेख मी किंवा अन्य कोणीही केलेला नसतांना "हा समारंभ होणार नाही अशा प्रकारे मी सांगितले नाही, परंतु माझी माहितीसुद्धा हीच आहे. जी मा. मंत्री प्रा. राम मेघे यांनी त्या पत्रात दिलेली आहे." अशी स्पष्ट माहिती डॉ. व्ही. सुब्रमण्यन यांनी सभागृहाला दिली; त्या अर्थी प्रा. राम मेघे यांनी असे पत्र लिहिले आहे याची स्पष्ट जाणीव त्यांना असतांना सुद्धा त्या पत्रातील माहिती मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही किंवा मिळालेली असल्यास सभागृहाला ती माहिती सांगितली नाही व जाणून बुजून सभागृहाला सत्य माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले व सभागृहाचा हक्कभंग केला आहे.

ज्या अर्थी "२ ऑगस्ट रोजी हा समारंभ होणार आहे किंवा नाही याची माहिती तपासून घ्या व ती सभागृहासमोर ठेवा. इतकेच नव्हे तर लोकवर्गणीची रक्कम महानगरपालिकेवर न बसविण्याच्या मागणी संबंधीचा शासनाचा निर्णय मा. मुख्यमंत्री या समारंभात घोषित करणार आहेत काय हे तपासून घ्या व सभागृहाला कळवा." असे मा. सभापतींनी सांगितल्यानंतर "आय विल डू दॅट" असे मा. नगरविकास मंत्र्यांनी सांगूनसुद्धा आतापावेतो ही माहिती सभागृहाला दिली नाही. एका तासाच्या अवधीमध्ये विधानभवन परिसरात उपलब्ध होवू शकणारी माहिती आज एक आठवडा झाला असतांनाही सभागृहाला सादर न करून मा. नगरविकास मंत्र्यांनी या सभागृहाचा हक्कभंग केला आहे, तरी हे प्रकरण हक्कभंग समितीकडे पाठविण्यात यावे."

**१७३.** प्रा. बी. टी. देशमुख व श्री. पु. ब. सोमवंशी या दोन सदस्यांनी २३ जुलै १९८७ रोजी सभागृह सुरू होण्याच्या १ तास अगोदर दिलेली हक्कभंगाची सूचना त्याच दिवशी प्रश्नोत्तराच्या तासानंतर निर्णयार्थ आली त्यावर मा. सभापतींनी पुढील प्रमाणे निर्णय दिला :

"**सभापती :** सन्माननीय सदस्य सर्वश्री. बी. टी. देशमुख आणि पु. ब. सोमवंशी यांनी माननीय नगरविकास मंत्र्यांविरुद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे. त्या सूचनेमध्ये असे आरोपीत करण्यात आले आहे की, दिनांक १६ जुलै १९८७ रोजी उत्तरीत झालेल्या "अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा प्रकल्पातून पाणी पुरवठा" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ९७३६ वरील उपप्रश्नांच्या वेळी उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक २ ऑगस्ट १९८७ रोजी सदरहू पाणी पुरवठा योजनेचे माननीय मुख्यमंत्री उद्घाटन करणार आहेत या प्रा. राम मेघे यांच्या पत्राचा उल्लेख डॉ. सुब्रमण्यम यांनी सभागृहात केला होता व त्या पत्रातील माहिती असतानासुद्धा त्यांनी सभागृहाला ती दिली नाही व जाणूनबुजून सभागृहाला सत्य माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले आहे व सभागृहाचा हक्कभंग केला आहे, **तसेच लोकवर्गणी महानगरपालिकेवर न बसविण्याच्या मागणीसंबंधाचा शासनाचा निर्णय माननीय मुख्यमंत्री या समारंभात घोषित करणार आहेत काय ते तपासून घ्या व सभागृहाला कळवा असे माननीय सभापतींनी सांगितल्यानंतरही अद्याप पावेतो ती माहिती सभागृहाला सादर केली नाही.**

सदरहू प्रश्नाबाबतची दिनांक १६ जुलै १९८७ ची कार्यवाही पाहिली असता असे दिसून येते की, माननीय नगरविकास मंत्र्यांनी स्पष्ट म्हटले होते की, मी याबाबत विचारून सभागृहाला माहिती देऊ शकतो, परंतु त्यात वेळेबाबत स्पष्ट उल्लेख नाही. दुसरे असे की, जरी आश्वासन दिले असले तरी ते पाळले नाही असे म्हटले तरी आश्वासन भंग हा हक्कभंग होऊ शकत नाही. म्हणून मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २३ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १९, पृष्ठ ४६)*

## "उद्या काय ते सांगा" सभापतींचा निर्णय

**१७४.** मंत्र्यांच्या विरूद्ध देण्यात आलेली हक्कभंगाची सूचना मा. सभापतींनी अमान्य केल्याची अनेक उदाहरणे आहेत. तरीही मंत्र्याला उघडे पाडण्यासाठी हक्कभंगाची सूचना हे अत्यंत प्रभावी असे शस्त्र आहे. "जाणून बूजून" असत्य माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल केली असेल तर हक्कभंग होतो. "माहिती असत्य आहे" हे पुराव्याच्या आधारावर मा. सभापतींच्या लक्षात आणून देणे हे हक्कभंग देणाऱ्या सभासदाचे काम असते. ते त्याने यशस्वीपणे केले की मंत्र्यांची तारांबळ उडते. "जाणून बुजून मी हे असत्य सांगितले नाही" असा बचाव मंत्रिमहोदय घेतात व त्यामध्ये मुळ तक्रारीला काही प्रमाणात न्याय मिळतो. या प्रकरणात सुद्धा असेच झाले. मा. सभापतींनी या हक्कभंगाच्या सुचनेला संमती नाकारली हे खरे पण त्याच बरोबर **"मुख्यमंत्री जाणार आहेत की नाही ते उद्या माननीय मंत्री सांगतील" असा निर्णयही दिला.** हक्कभंगाच्या सुचनेवर निर्णय दिल्यानंतर सभागृहात झालेल्या ज्या अनुपूरक चर्चेमध्ये मा. सभापतींनी हा निर्णय दिला, ती चर्चा पुढील प्रमाणे :-

"**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, यामध्ये एक गोष्ट म्हणजे आपण नंतरच्या आठवड्यामध्ये माहिती द्यावी असे म्हटले आहे आणि दुसरे असे की, **प्रा. राम मेघे यांच्या विषयीचा उल्लेख आम्ही कोणीही केलेला नव्हता तर तो मंत्रीमहोदयांनीच केला** आणि येथे तीन तीन वेळा विचारण्यात आले की, २ ऑगस्टला हा कार्यक्रम आहे की नाही? तर मग आपण निदान तेवढे तरी आता सांगा .......

**सभापती :** यासंबंधी माननीय मंत्रीच सांगू शकतील.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, आणखी एक गोष्ट म्हणजे माननीय मुख्यमंत्री तेथे जाणार आहेत. तेव्हा उद्या तरी या बाबतीत निवेदन येथे झाले पाहिजे.

**सभापती : मुख्यमंत्री जाणार आहेत की नाही ते उद्या माननीय मंत्री सांगतील.**

**श्री. रा. सु. गवई :** अध्यक्ष महाराज, यातील प्रश्न सोपा व्हावा म्हणून मी थोडे बोलतो. प्रथमतः श्री. बी. टी. देशमुखांची माफी मागून हा हक्कभंगाचा विषय नाही. असा जो आपण निर्णय दिला आहे, तो मी मान्य करतो. परंतु ही योजना शासनाच्या विचाराधीन गेल्या कित्येक महिन्यापासून, वर्षापासून आहे याची प्रत्यक्ष माहिती नामदार नगरविकास मंत्री डॉ. सुब्रमण्यन यांनाही आहे. वेळोवेळी या प्रश्नाबाबत त्यांनी आम्हाला सभागृहाबाहेरही मदत केली आहे. एवढेच नव्हे तर हा प्रश्न लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी २ ऑगस्टची तारीख दिली आणि आता ते त्यावेळी १० टक्के लोकवर्गणी संबंधात घोषणा करणार आहेत. प्रा. राम मेघेंच्या संबंधात वर्तमानपत्रामध्ये आले ते वेगळे. परंतु सभापतींनी म्हटले तेव्हा या संदर्भात निवेदन करण्यात काय हरकत आहे? तेव्हा नामदार नगरविकास मंत्री डॉ. सुब्रमण्यन यांना विनंती आहे की, जरी आपल्याला आज या संबंधात काही सांगता आले नाही तरी उद्या आपण याबाबत निवेदन करावे. कारण यावर चर्चा झाली आणि माननीय सभापतींनी आदेश दिला म्हणून तरी निवेदन व्हावे.

**सभापती :** मला वाटते की, मुख्यमंत्री तेथे केव्हा जाणार याबद्दलचा निर्णय झालेला आहे. त्याबद्दल येथे सांगण्यास काहीच हरकत नाही. पण १० टक्के लोकवर्गणीबद्दल मात्र ते बोलले तर ते त्यांना विचारा.

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** अध्यक्ष महाराज, आपण आदेश दिल्यानंतर मी अधिक काही बोलण्याची गरजच नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २३ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक १९, पृष्ठ ४६-४७)*

## शेवटी खरे ते सभागृहात सांगावेच लागले

**१७५.** मा. सभापतींनी अगोदरच्या दिवशी निदेश दिल्याप्रमाणे अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दि. २४ जुलै १९८७ रोजी मा. नगरविकासमंत्र्यांनी पुढील प्रमाणे निवेदन केले :

"**डॉ. व्ही. सुब्रमण्यन (नगरविकास मंत्री)** : महोदय, विधान परिषद तारांकित प्र. क्र. ९७३६ बाबत दिनांक १६.७.१९८६ रोजी झालेल्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या संदर्भात मा. सभापतींच्या आदेशानुसार मी खालील निवेदन करू इच्छितो. :

सन्माननीय सभासदांना कल्पना आहे की, अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा धरण उद्भव धरून रु. ५५ कोटी किंमतीच्या योजनेला शासनाने दिनांक २७.१०.१९८६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजनेचा वित्तीय आकृतीबंध शासनाच्या प्रचलित आदेशाप्रमाणे आहे. **मा. मुख्यमंत्री यांनी या योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या जलकुंभाच्या कामाचे भूमिपूजन दिनांक २.८.१९८७**

**रोजी करण्याचे मान्य केले आहे.** ही योजना मंजूर केलेल्या शासकीय आदेशात नमूद केलेल्या अटीनुसार अमरावती महानगरपालिकेने योजनेच्या किंमतीच्या **१० टक्के लोकवर्गणी** म्हणजेच **रु. ५.५० कोटी द्यावयाचे आहेत. या बाबीवर शासन सहानुभूतीपूर्वक विचार करीत असून या बाबीचा निर्णय दिनांक २ ऑगस्ट १९८७ पर्यंत घेतला जाईल."** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २४ जुलै १९८७ : खंड ८०, क्रमांक २०, पृष्ठ ५०-५१)*

*****************************************************

# १७

# *मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन*

*****************************************************

### सभागृहातील व सभागृहाबाहेरील आश्वासनांचा दर्जा

**१७६. सभागृहाबाहेर शासनाच्या वतीने सार्वजनिक हिताच्या प्रश्नावर झालेल्या घोषणा, जाहीर सभा समारंभातून देण्यात आलेली आश्वासने ही सभागृहाच्या कामकाजात नोंदविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे हा विधानमंडळ सदस्यांच्या कामाचा एक अविभाज्य भाग असतो.** एखाद्या मंत्र्याने किंवा मुख्यमंत्र्याने सभागृहाच्या बाहेर एखाद्या सभेत किंवा समारंभात एका विशिष्ट "मूड"मध्ये एखादी घोषणा केली असेल किंवा एखादे आश्वासन दिले असेल तर ज्यावेळी लोक त्यामुळे आनंदून गेले असतात त्याच वेळी हे आश्वासन आपल्याला सभागृहाच्या कामकाजात सांसदीय आयुधाच्या वापरातून कसे नोंदवून घेता येईल याची चिंता विधिमंडळ सदस्याला लागलेली असते, नव्हे तशी त्याला ती लागली पाहिजे. अशा रीतीने सभागृहाच्या कामकाजात नोंदविल्या न गेलेले व सभागृहाच्या बाहेरच राहिलेले आश्वासन, घोषणा करणारी ती व्यक्ती सत्तेतून गेली तर, किंवा ती व्यक्ती सत्तेत असली तरी तीचा "तो मूड" गेला तर, निर्माल्यवत झाल्याशिवाय रहात नाही. पण **सभागृहाच्या कामकाजात ते आश्वासन नोंदविण्यात यश मिळाले तर ती त्या मंत्र्याची वैयक्तिक घोषणा राहत नाही. किंवा त्याच्या वैयक्तिक मूडवर ते आश्वासन अवलंबून रहात नाही. "शासनाने सभागृहात दिलेले आश्वासन" असे शास्त्रीय स्वरूप त्या आश्वासनाला प्राप्त होते.** त्याला क्रमांक मिळतो. नोंदबद्ध झालेल्या अशा आश्वासनाची अंमलबजावणी आपोआप होते अशातला भाग नाही. त्याचा सभागृहात व प्रसंगी सभागृहाबाहेरसुद्धा पाठपुरावा करावा लागतोच. सभागृहाबाहेर दिलेल्या आश्वासनापेक्षा त्याचा दर्जा कितीतरी वरचा असतो. सभागृहाच्या बाहेरील आश्वासने सभागृहात ओढून आणणे हा सभासदांच्या कामाचा एक भाग म्हटला तर **सतत पाठपुरावा करूनही सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी होत नसेल तर चर्चेच्या अधिकृत प्रतिवेदनाच्या शालू शेल्यात गुंडाळून शासनाच्या नाकर्तेपणासह अंमलात न आलेले ते आश्वासन जनतेच्या दरबारात नेऊन उभे करणे व जनतेचे पाठबळ त्याच्यामागे उभे करणे** व त्याची अंमलबजावणी करवून घेणे हा विधानमंडळ सदस्यांच्या कामाचा विस्तारित पुढचा भाग म्हणून सांगता येईल.

### बाहेरील आश्वासने सभागृहाच्या कामकाजांत नोंदविण्यात शंभर टक्के यश

**१७७.** "२ ऑगस्ट १९८७ रोजी मा. मुख्यमंत्री या योजनेच्या भूमिपूजनासाठी येणार" असे एक आश्वासन सभागृहाच्या बाहेर देण्यात आले होते. उशीरात उशिरा म्हणजे "२ ऑगस्ट १९८७ पर्यंत लोकवर्गणीचा निर्णय घेतला जाईल" असे दुसरे आश्वासन सुद्धा सभागृहाच्या बाहेर देण्यात आले होते. दिनांक २४ जुलै १९८७ रोजी नगर विकास मंत्र्यांनी जे निवेदन सभागृहात केले त्यामुळे ही दोनही आश्वासने सभागृहाच्या कामकाजात नोंदवून घेण्यात आम्ही शंभर टक्के यशस्वी झालो होतो. आमच्या दृष्टीने १९८७ च्या दुसऱ्या अधिवेशनाची ही फार मोठी उपलब्धी होती. दहा टक्क्याबाबत नक्की काय होईल? याबाबत कोणतेच आश्वासन मिळाले नव्हते हे खरे, पण दहा टक्क्याबाबत जे काय व्हायचे ते उशिरातउशिरा २ ऑगस्ट १९८७ पर्यंत होईल त्यापुढे जाणार नाही हे निश्चित ठरले हेही काही थोडे नव्हे?

### मी काय सांगायचे ते तेथेच सांगीन - मुख्यमंत्री

**१७८.** विधान मंडळाचे अधिवेशन दिनांक २४ जुलै १९८७ रोजी संपणार. शेवटच्या आठवड्यामध्ये विधानपरिषदेच्या सुवर्ण महोत्सव समितीची बैठक मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनातील त्यांच्या दालनामध्ये झाली. मा. मुख्यमंत्री श्री. शंकररावजी चव्हाण हेही या बैठकीला हजर होते. औपचारिक बैठक आटोपल्यानंतर चहापानाच्या वेळी चालू असलेल्या अनौपचारिक चर्चेमध्ये सभागृहामध्ये सातत्याने चालू असलेल्या या वादळाच्या पार्श्वभूमीवर मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक यांनी अमरावतीच्या पाणी पुरवठा योजनेचे शेवटी काय होणार आहे? असा गंमतीने प्रश्न काढला असता, मुख्यमंत्री सर्वासमक्ष असे म्हणाले की "या योजनेचा शुभारंभ समारोह २ ऑगस्ट १९८७ रोजी करण्याचे ठरविले असून मी स्वतः त्या कार्यक्रमासाठी जाणार आहे." "लोकवर्गणीबाबत शासनाचा निर्णय मी त्या कार्यक्रमातच जाहीर करणार असून तो निर्णय काय असेल हे फक्त मला एकट्यालाच ठाऊक आहे" असेही यावेळी ते म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांची "बांधिलकी"

**१७९.** माझे असे निरीक्षण आहे की १० टक्के लोकवर्गणी या शहरावर बसविण्यात आपली चूक झालेली आहे ही गोष्ट मा. मुख्यमंत्र्यांना कृतिसमितीशी दिनांक २८ एप्रिल १९८७ रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी पूर्णपणे कळून चुकली होती. ही चूक आपण दुरुस्त केली पाहिजे असा त्यांनी मनोमन निर्णयही घेतला होता. "कृतिसमितीचे अध्यक्ष भाई सुदाम देशमुख व उपाध्यक्ष श्री. रा. सु. गवई हे विरोधी पक्षाचे आहेत. कृतिसमितीचे क्रियाशील सदस्य प्रा. बी. टी. देशमुख व पु. ब. सोमवंशी हे काही आपल्या पक्षाचे नाहीत. आपल्या पक्षाचे देविसिंह शेखावत हे पक्षहिताच्या विरोधी काम करतात. मोर्चात सहभागी होतात. यातून पक्षाचे काय भले होणार आहे? कोणत्याही परिस्थितीत या कृतिसमितीला श्रेय जाता कामा नये, एवढे तुम्ही नक्की पहा" अशा प्रकारचा आग्रह सत्तारूढ पक्षातील एखाद्या ज्येष्ठ नेत्याने मा. मुख्यमंत्र्यांना केला व या आग्रहाच्या पोटीच "मी स्वतः तेथे येतो. भूमिपूजन मी स्वतः करतो. **१० टक्के लोकवर्गणीबाबतचा जो काही निर्णय असेल तो मी तेथेच या समारंभात जाहीर करतो. कृतिसमितीला नक्कीच सांगत नाही" असे वचन मा. मुख्यमंत्र्यांनी सत्तारूढ पक्षातील या ज्येष्ठ नेत्याला दिले व ते त्यांनी शेवटपर्यंत पाळले.** खाजगीत झालेल्या बोलण्याच्या आधारावर नव्हे तर अधिकृत कागदपत्राच्या आधारावर हे नेते कोण होते? याची माहिती करून घेणे कठीण नाही पण मी मुद्दामच हे काम टाळले आहे. याचे एक कारण असे की त्याची आता विशेष आवश्यकता नाही व दुसरे कारण असे की काही संशोधन (अधिकृत कागदपत्रांची उपसाउपस) दुसऱ्या कुणीतरी करावी अशी माझी इच्छा आहे.

**१८०.** एप्रिल १९८७ पासून तर ऑगस्ट १९८७ पर्यंत सतत "मी स्वतः भूमिपूजनासाठी जाणार आहे. दहा टक्क्याबाबतचा जो काही निर्णय असेल तो मी तेथेच जाहीर करीन" **एवढे एकच वाक्य मुख्यमंत्री औपचारिक व अनौपचारिक चर्चेत बोलत होते.** खुद्द सभागृहात सुद्धा त्यापेक्षा एक जास्तीचा शब्द बोलण्यास नगरविकास मंत्र्यांवर मनाई हुकूम बजावण्यात आला होता. मा. मुख्यमंत्र्यांच्या या मनःस्थितीचे मर्म ध्यानात यावे एवढ्याच हेतूने उपरोक्त विवेचन केले आहे. जनहिताच्या एखाद्या प्रश्नावर जनआंदोलन उभे होत असेल, तर तो प्रश्न खरोखरच जनहिताचा आहे किंवा नाही याची खात्री करून घेऊन तसा तो आहे हे पटल्यास समर्थन देणे हेच सर्वांच्या अंतिम हिताचे असते. अनेकदा असे उघड समर्थन देता आले नाही तर निदान सहानुभूतीपूर्वक मदत करण्याची भूमिका सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांनी ठेवल्यास जनआंदोलनाच्या थोड्याशा रेट्याने तो प्रश्न सुटून जातो. पण उघड समर्थन न करणाऱ्या सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांनी प्रश्न महत्त्वाचा असला तरी **विरोधकांना श्रेय जाईल या भयगंडाने प्रश्नाच्या विरोधात भूमिका घेतली तर तो प्रश्न सुटण्यास विलंब होतो. अनेकदा तो प्रश्न चिघळतो व अनेकदा तर फार मोठ्या जनआंदोलनाच्या रेट्याशिवाय तो प्रश्न सुटत नाही,** हा नेहमी येणारा अनुभव या प्रकरणी सुद्धा आला. ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी श्री. बाळासाहेब मराठे यांनी दिलेल्या, १५ जुलै पासून सुरू करावयाच्या प्रायोपवेशनाच्या, नोटीसमुळे जो तणाव निर्माण झाला त्यामुळे आता जास्त ताणण्यात अर्थ नाही अशी भावना मुख्यमंत्र्यांसह तणावाचे जनक असलेल्या सर्वांच्याच मनामध्ये निर्माण झाली व १० जुलै १९८७ रोजी २ ऑगस्ट १९८७ ही भूमिपूजनाची तारीख ठरली. नगरविकास मंत्र्यांनी २४ जुलै १९८७ रोजी ही माहिती सभागृहात सांगितली.

### पाच टक्क्याचे पिल्लू मध्येच आले

**१८१.** ठरल्याप्रमाणे दिनांक २ ऑगस्ट १९८७ रोजी विदर्भ महाविद्यालयाजवळ उभारावयाच्या जलकुंभाच्या जागी या योजनेचा भूमिपूजन समारंभ माननीय मुख्यमंत्री श्री. शंकररावजी चव्हाण यांच्या हस्ते पार पाडला. पालकमंत्री प्रा. राम मेघे हे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. नगरविकासमंत्री डॉ. सुब्रम्हण्यन हे प्रमुख पाहुणे म्हणून या समारंभाला उपस्थित होते. दहा टक्के लोकवर्गणीबाबत अतिशय उत्सुकता ताणली गेली होती. समारंभाला निघण्याच्या एक तास अगोदर विश्राम भवनावर मा. मुख्यमंत्री कृतिसमितीशी काहीतरी बोलणार असा निरोप होता. त्यामुळे आम्ही सर्व लोकप्रतिनिधी तेथे हजर होतो. मुख्यमंत्र्यांनी श्री. रा. सु. गवई यांना त्यांच्या कक्षामध्ये बोलाविले. पालकमंत्री प्रा. राम मेघेही तेथे हजर होते. **मुख्यमंत्री म्हणाले "दहा टक्क्याचा आग्रह आता तुम्ही सोडा. ५ टक्के शासन 'आऊट राईट अनुदान' म्हणून देईल व ५ टक्के कर्ज म्हणून महानगरपालिकेला दिले जातील. विचार करून सांगा"** श्री. रा. सु. गवई मुख्यमंत्र्यांच्या कक्षातून

बाहेर आले व त्यांनी ही माहिती आम्हाला सांगितली. कृतिसमितीचे अध्यक्ष सुदामकाका देशमुख, दादासाहेब गवई, बाबासाहेब सोमवंशी, डॉ. शेखावत व मी असा आमचा या नव्या फॉर्मुल्यावर विचार विनिमय सुरू झाला. "योजना पाणी पुरवठा मंडळाची असेल तर दहा टक्के लोकवर्गणी पाणी पुरवठा मंडळ भरेल." असा मूळ नियम होता. तो शासनाने नंतर बदलविला. "योजना पाणी पुरवठा मंडळाची असली तरी १० टक्के लोकवर्गणी महानगरपालिकेने भरली पाहिजे" असा नियम मागाहून दुरुस्त करण्यात आला. तेव्हा "**मूळ नियमाप्रमाणेच झाले पाहिजे. ५ टक्क्याचा मध्यम मार्ग योग्य नाही**" **असे आमचे सर्वांचे मत पडले.**

**१८२.** समारंभ सुरू होण्याची वेळ जवळ येत होती. विश्राम भवनातील आपल्या कक्षातून मुख्यमंत्री बाहेर निघण्याच्या तयारीत होते. निमंत्रण पत्रिकेत नमूद केल्याप्रमाणे लोकप्रतिनिधी म्हणून समारंभामध्ये आम्हालाही व्यासपीठावर बसावयाचे होते. चला, चला चा कालवा झाला. काय करावयाचे ते ठरविण्यासाठी एकदोन मिनिटापेक्षा जास्त वेळ नव्हता. श्री. रा. सु. गवई, सुदाम काका, डॉ. शेखावत, बाबासाहेब सोमवंशी व मी स्वतः अशी उभ्याउभ्याच आमची मिटिंग सुरू होती. सुदामकाकांनी उभ्या उभ्याच निर्णय सांगितला. "आपण सर्वजण आता समारंभाला जाऊ. **मुख्यमंत्र्यांनी दहा टक्के लोकवर्गणी हटविण्याचा निर्णय घोषित केला तर ठिकच, त्यांनी जर ५ टक्क्याचा निर्णय घोषित केला तर भर समारंभामध्ये आपण मुख्यमंत्र्यांना दोनही हात जोडून नमस्कार करू आणि व्यासपीठावरून बहिर्गमन करू.**" आम्हाला कोणाला काकांच्या या फॉर्मुल्यामध्ये कोणतीही अडचण नव्हती. आम्ही एकमेकाकडे पहायला लागलो. खरे म्हणजे आम्ही सारे शेखावतांच्याकडे पहायला लागलो. शेखावत म्हणाले "शहराच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे मी पूर्णपणे तुमच्या सोबत आहे". "आमचा हा निरोप तुम्ही आता त्यांना सांगून द्या." असे दादासाहेब गवई यांना सांगायला सुदामकाका विसरले नाहीत. भराभर गाड्यात बसून आम्ही सारे विश्रामभवनातून निघालो व समारंभस्थळी पोचलो. वातावरणामध्ये कमालीचा तणाव होता. भर समारंभात मुख्यमंत्र्यांना व्यासपीठावर "नमस्ते" करून बहिर्गमन करण्याची ट्रायल आम्ही मनातल्या मनात पण मोठ्या तणावात घेत होतो. सुदैवाने तशी वेळ आली नाही. भूमिपूजनानंतर प्रत्यक्ष समारंभ सुरू झाला. मुख्यमंत्र्यांसकट सर्व पाहुण्यांना शाही पद्धतीचे फेटे बांधण्यात आले. त्यानंतर सर्वश्री डॉ.शेखावत, प्रा.बी.टी.देशमुख, सुदाम देशमुख, रा.सु.गवई, सौ.उषाताई चौधरी यांची भाषणे झाली.

## डॉ. देविसिंह शेखावत

**१८३.** या शहराचे विधानसभा सदस्य या नात्याने केलेल्या सुरूवातीच्या आपल्या प्रास्ताविक व स्वागतपर भाषणात **डॉ. देविसिंह शेखावत** म्हणाले : "अप्पर वर्धा योजनेतून अमरावती शहराला पाणीपुरवठा हे अनेक वर्षापासूनचे स्वप्न होते. आजचा क्षण हा अपेक्षा पूर्तीचा क्षण आहे. आज या शहराचा चेहरा पाण्याअभावी चिंताग्रस्त मलूल व धुळीने माखल्यागत झालेला आहे. **आजची स्थिती कायम राहिली तर हा परिसर उजाड व वाळवंटी होईल अशी साधार भिती वाटते.** आज या शहराला ज्या उद्भवातून पाणीपुरवठा होतो ते उद्भव कोरडे झाले आहेत. पाणी नाही म्हणून या शहराचा विकास खुंटला. एकही मोठा कारखाना येथे उभारल्या जाऊ शकत नाही. पण अप्पर वर्धेचे पाणी आल्यावर हा प्रदेश सुजलाम होईल. माझ्या आमदार पदाच्या कार्यकालात हे स्वप्न पूर्ण होत आहे याचा मला आनंद आहे. **या योजनेच्या अंमलबजावणीत लोकवर्गणीचा एक अडसर आहे,** तो मुख्यमंत्री दूर करतील असा विश्वास वाटतो. पण कप आणि तोंडाच्या मध्ये फार अंतर असते. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेने हे अंतर पार दूर होईल आणि वर्धेचे पाणी या शहरात वाहते होईल"

## प्रा.बी.टी.देशमुख

**१८४. प्रा.बी.टी.देशमुख** आपल्या भाषणात म्हणाले : "पुराणातल्या कथा पुराणात राहू द्या असे म्हणणारांना आजचा समारंभ हे अतिशय चांगले उदाहरण आहे. महत् प्रयासाने भगीरथाने शंकराला प्रसन्न केले आणि गंगा पृथ्वीवर आणली. ही तसे पाहिले तर पुराणातील कथा आहे. **परंतु लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केलेल्या प्रयत्नाचे प्रतीक म्हणून कृती समितीचे अध्यक्ष भाई सुदाम देशमुख यांना भगीरथाची भूमिका दिली तर भगीरथाने शंकराला प्रसन्न करून वर्धा अमरावतीला आणली ही कथा राहत नाही तर तो वस्तुस्थितीवर आधारित एक जीवन व्यवहार होतो.** पाण्याशिवाय जीवन नाही म्हणून पाण्याला जीवन म्हणण्याचा प्रघात आमच्या पूर्वजांनी पाडला. पाणी असेल तेथे लोकांनी वस्ती केली पाहिजे हा जुना जमाना संपुष्टात येऊन लोकांची वस्ती असेल तेथे पाणी नेले पाहिजे, हे नवे सूत्र सुरू झाल्यामुळे वर्षानुवर्षे पाण्याच्या काठावर वस्तीला असलेल्या वस्त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. छत्री व वडाळी तलाव आटून गेले, पेढी, पूर्णा या दोन्ही नद्या आटायला लागल्यामुळे पेढी पूर्णेच्या पात्रात दोन तीनशे फूट खोल बोअर करून १०० टक्के कूपनलिकांतून निघणारा हा प्रवाह जेव्हा अमरावती कडे यायला लागला तेव्हा बारमाही धावता प्रवाह असलेल्या दोन्ही नद्यांच्या काठावरील ग्रामीण भागाला पिण्याच्या पाण्यासाठी सुद्धा कूपनलिकांचा आश्रय घ्यावा लागला. भूगर्भाच्या तळात खूप खोलवर जाऊन रसातळातून उपसलेल्या या पाण्यामुळे या शहराबरोबरच ग्रामीण भागातील गोरगरीब, तळागाळातील लोकसंख्येला पिण्याचे पाणी कसेबसे पुरविता येत असले, **तरी पिढ्यान पिढ्या जीवनदायी ठरलेल्या दोन्ही नद्यांचे तळ त्यांच्या तळातील गाळासह उघडे पडायला लागले.** आणि या नद्यांचा कोरडे पडण्याचा कालखंड ८२ पासून ८७ पर्यंत सारखा वाढत राहिल्याच्या बातम्यांनी या शहराचाही घसा कोरडा पडण्याची पाळी आली.

महत्वाची गोष्ट १० टक्क्याची. त्याबाबत इतके बोलून झाले आहे की मी येथे आज काहीही बोलणे औचित्याला सोडून होईल असे मला वाटते. विधानपरिषदेला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणून मा. सभापतींकडे चहापानाचा कार्यक्रम होता, त्यावेळी आजच्या या कार्यक्रमाची गोष्ट निघाली. तेव्हा मा. मुख्यमंत्री काय म्हणाले ते मी आपणास सांगतो. ते म्हणाले "मी दोन तारखेच्या कार्यक्रमाला जाणार आहे हे नक्की आहे. ते मी सर्वांना सांगितले आहे. तेथे १० टक्क्याविषयी काय सांगणार आहे हे फक्त मला एकट्यालाच ठावूक आहे" मी म्हणतो "जे जे आपणासी ठावे ते ते इतरा सांगावे । सुखी करूनी सोडावे सकळ जन" ही संत उक्ती आहे. तो क्षण आता जवळ आलेला आहे. **सभाजनांचा हा सुखानंद १०० टक्के असावा, त्या आनंदामध्ये मुख्यमंत्री १ टक्काही कमी पडू देणार नाहीत अशी आशा मी व्यक्त करतो.** तसेच १०० वर्षापूर्वी अण्णासाहेब कीर्लोस्करांनी सौभद्र मध्ये जी नांदी रचिली तींच्या पहिल्याच ओळीमध्ये म्हटल्याप्रमाणे "तुम्हा तो शंकर सुखकर हो" अशी प्रार्थना करून मी आपले भाषण संपवितो."

## भाई सुदाम देशमुख

**१८५. कृतिसमितीचे अध्यक्ष भाई सुदाम देशमुख** यांनी आपल्या भाषणात पाण्याविना या शहराचा औद्योगिक विकास खुंटला असल्याचे सांगून अप्पर वर्धा धरणाचे भूमिपूजन श्री. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते झाले व आज हाच उद्भव मानून अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्याचा भूमिपूजन समारंभही श्री. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते होत आहे हा एक शुभ योगायोग असल्याचे प्रतिपादन केले.

## विधानपरिषदेतील विरोधीपक्षनेते श्री. रा. सु. गवई

**१८६.** कृतिसमितीचे उपाध्यक्ष व **विधानपरिषदेतील विरोधीपक्षनेते श्री. रा. सु. गवई** म्हणाले "प्रत्येकाचा प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न असतो. गरज हीच ती दृष्टी निर्माण करते. एका शास्त्रज्ञाला विचारण्यात आले की पाणी म्हणजे काय? त्याने उत्तर दिले हायड्रोजनचे दोन व प्राणवायुचा एक अंश याचे पाणी तयार होते. "एच टु ओ." पण एका तृषार्त कास्तकाराला विचारले त्यावर तो उत्तरला पाणी म्हणजे जीवन. अमृत. आज मा. मुख्यमंत्र्यांनी अमरावतीकरांना देऊन त्यांची तहान भागवावी. **वास्तविक पाणीपुरवठ्याची ही योजना कार्यान्वित होण्याला फार विलंब होत आहे** पण उशिराचाही एक वेगळा आनंद असतो."

## नगरविकास मंत्री डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन

**१८७. नगरविकास मंत्री डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन म्हणाले :** "अमरावती या ऐतिहासिक नगरातील हा ऐतिहासिक समारंभ आहे. शास्त्रोक्त पद्धतीने आज हे भूमिपूजन झाले आहे. त्याचा परिणामही लवकरच दिसेल. ही योजना अनेक वर्षे रेंगाळली ही दुर्दैवाची गोष्ट आहे पण ही योजना तत्त्वतः मंजूर झाली. नंतर जागतिक बँकेचे सहाय्य मागावे लागले. त्यात केंद्राकडून काही विचारणा झाल्या, यात बराच वेळ गेला पण आता मात्र काम झपाट्याने सुरू होईल. जलकुंभ उभारण्याचे काम तातडीने हाती घेण्यात येईल. **जनकल्याणाच्या योजनांची फलनिष्पत्ती निश्चित चांगली होत आहे. लोककल्याण करणारास दुर्गती कधीच मिळत नाही. ही योजना अनेक वर्षे ताटकळत राहिली या बद्दल मी क्षमा मागतो.** पण योजना राबवावयाच्या म्हणजे पैसा लागतो. केवळ सरकार कडून इतका पैसा उपलब्ध होणे कठीण असते. त्यात लोकांनीही आपला सहभाग दिलाच पाहिजे. सर्व सरकारने करावे ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. **विधानपरिषदेत अमरावती पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावर अनेक वेळा गरमागरमीची चर्चा झाली. काही नको तो वादही झाला पण मला त्याचे काही वाटत नाही. जनप्रतिनिधींनी त्यांचे काम केले पाहिजे. सरकारने त्याची भूमिका रेटली पाहिजे.** ती कर्तव्यपूर्तता आहे. त्यातून कटुता निर्माण होत नाही."

## समारंभाचे अध्यक्ष प्रा. राम मेघे

**१८८.** अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री व **समारंभाचे अध्यक्ष प्रा. राम मेघे म्हणाले** "अमरावती विभाग नेहमीच दुर्लक्षित राहिला आहे. पूर्वी हा विभाग निझाम शाहीत होता नंतर मध्यप्रदेशात ढकलला गेला. या विभागाला नेहमीच आश्रित रहावे लागले इतर विभागीय ठिकाणी भुरकन विमानाने जाता येते. येथे काही व्यवस्था नाही. अर्थात काही झाले नाही असेही नाही. मराठवाडा हा

विदर्भाचा मोठा भाऊ आहे असे आम्ही मानतो. श्री. शंकररावांच्या कारकिर्दीत अनेक धाडसी निर्णय घेण्यात आले. सर्वच विभागाची भूक शमली पाहिजे. हे उद्दीष्ट शंकररावांनी समोर ठेवले आहे. त्यांनी प्रशासनात शिस्त आणली."

### शेवटी मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली

**१८९.** प्रत्येकाने आपल्या भाषणामध्ये "शासनाने दिलेले आश्वासन पाळले पाहिजे" अशा प्रकारचा एकंदर सूर लावलेला होता. मुख्यमंत्र्यांनी आपले उद्घाटनाचे भाषण सुरू केले. या उद्घाटनाच्या भाषणामध्ये १० टक्के लोकवर्गणीबाबतचा शासनाचा निर्णय त्यांनी पुढील शब्दामध्ये घोषित केला :

"माझ्यापुढे प्रश्न नगरपालिका, महानगरपालिका या सर्वांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अवघड स्वरूपाच्या काही गोष्टी जरूर आहेत. पण आपण मंडळीनी ज्या पद्धतीनं या ठिकाणी आपली पार्श्वभूमी तयार केली की, तुम्ही घोषणा करत असतांना आता सगळे आम्ही हे तयार केलेले आहे, त्याला अनुरूप अशी घोषणा झाली पाहिजे **त्यामुळे जास्त वेळ तुमच्या त्या सहनशीलतेला ताण न देता आपल्याला मी सांगतो की, १० टक्केचा भार हा शासनाच्या मार्फत आम्ही उचलायला तयार आहो.**" *(ध्वनीमुद्रित भाषणावरून शब्दशः मुद्रित)* वर सांगितलेले वाक्य त्यांनी वापरल्याबरोबर उपस्थित असलेल्या हजारो लोकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. त्यानंतर ताबडतोब त्यांनी वापरलेले "त्यामुळे आता फेटा उतरवायला मला काही हरकत नाही" हे वाक्य ऐकल्याबरोबर हा सारा जनसमूह हास्यकल्लोळात बुडाला.

### नाहीतर दुसरीच गोष्ट मी तुम्हाला ऐकवणार होतो - मुख्यमंत्री

**१९०.** नगरपालिकेला पाणी पुरवठा योजना पाहिजे असेल तर किमान १० टक्के लोकवर्गणीची रक्कम त्यांनी भरलीच पाहिजे या आग्रही मताचे मा. मुख्यमंत्री होते हे त्यांच्या भाषणामध्ये स्पष्टपणे दिसून आले. **पण केवळ सभागृहामध्ये व सभागृहाच्या समितीपुढे आश्वासन दिल्यामुळे १० टक्के लोकवर्गणीचा हा भार शासन उचलत आहे** असे त्यांनी आपल्या या उद्घाटनाच्या जाहीर भाषणामध्ये स्पष्टपणे नमूद केले ते पुढील *(जसेच्या तसे)* शब्दात :-

"आपण सर्वांनी मिळून शासनाकडून एका मर्यादेपर्यंत अपेक्षा करावी. **डॉ. सुब्रम्हण्यननी आता काही गोष्टी सभागृहामध्ये जाहीर केल्यामुळे माझा नाइलाज झाला. नाहीतर दुसरीच गोष्ट मी या ठिकाणी तुम्हाला ऐकवणार होतो. पण त्यांचा नाइलाज झाला. त्यांच्या कडून कमिटमेंट तुम्ही काही तरी करून घेतल्या** पण आता या संकटातून बाहेर मला पडण्याकरिता म्हणून तुमचं सहकार्य मात्र जरूर लागणार आहे"

**१९१.** केवळ सभागृहामध्ये कबूल केल्यामुळे आपल्याला हे द्यावे लागत आहे हे सांगितल्यावर आपण त्या मताचे का म्हणून नव्हतो? याबाबत आपल्यापुढे काय अडचण होती हे सांगत मुख्यमंत्र्यांनी पुढील शब्दात आपल्या भाषणाचा शेवट केला :-

"जी गोष्ट अमरावतीला मी दिली ती जर इतर ठिकाणच्या लोकांनी मागायला सुरुवात केली तर मी काय उत्तर द्यायचे? हा खरा माझ्या समोर प्रश्न आहे. कारण माझा एका गोष्टीवर विश्वास आहे की माणसाने न्यायप्रिय राहीले पाहिजे. एक गोष्ट मी जर एके ठिकाणी दिली तर तो न्याय सारखा मला सगळीकडे देता आला पाहिजे. येथे आलं तुमच्या सारखं तिकडे गेलं तर त्यांच्या सारखं असं बोलून भागत नाही आणि म्हणून ... **ते जरी असल तरी आता मी इथं जाणीवपूर्वक आज या ठिकाणी जाहीर केले आहे. त्यामुळे त्याच्यासंबंधी शंका ही मनामध्ये बाळगण्याचे कारण नाही,** ज्या ज्या अधिकाऱ्यांनी हे काम हातामध्ये घेतले त्या सर्वांच्या कडून माझी अशी अपेक्षा राहील की आपण हे काम लवकरात लवकर पूर्ण करावं आणि **हे जे अमरावती शहर वाढू पाहतय त्याची अगदी प्राथमिक स्वरूपाची जी पाण्याची गरज आहे ती आपण लवकरात लवकर पूर्ण करून त्यांना सुख आणि समाधान यातून मिळेल अशा प्रकारची परिस्थिती लवकरात लवकर निर्माण करावी** अशा प्रकारची त्यांच्या तर्फे अपेक्षा करतो आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून माझे भाषण मी पुरे करतो. जयहिंद - जय महाराष्ट्र"

### विभागीय प्रसिद्धी खात्याचे पत्रक

**१९२.** मा. मुख्यमंत्र्यांनी जाहीर समारंभामध्ये लोकवर्गणीचा "**१० टक्केचा भार शासनातर्फे उचलायला आम्ही तयार आहोत" अशी घोषणा केली होती. ही धोषणा सभागृहाच्या किंवा समितीच्या कामकाजात ओढून आणणे व त्याप्रमाणे शासननिर्णय निर्गमित होणे ही अतिशय महत्त्वाची कामे पार पाडणे हे आता लोकप्रतिनिधींचे काम होते.** सभागृहाच्या कामकाजामध्ये अशा घोषणा नोंदवून घेतांना या समारंभाची ध्वनिमुद्रित प्रत व शासनाच्या माहिती विभागाने काढलेले अधिकृत प्रसिद्धी पत्रक या दोन साधनांचा खूपच उपयोग होतो. महाराष्ट्र शासनाच्या अमरावती येथील विभागीय माहिती कार्यालयाने दिनांक २ ऑगस्ट १९८७ रोजी प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्धीपत्रक क्रमांक ९२६ मध्ये पुढील वृत्त देण्यात आले होते :

"अमरावती, दिनांक : २ **अमरावती पाणी पुरवठा योजनेतील लोकवर्गणीचा दहा टक्के भाग महाराष्ट्र शासन देईल अशी घोषणा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री शंकरराव चव्हाण यांनी आज येथे केली.** मुख्यमंत्री अमरावती शहराच्या सुमारे ५५ कोटी रुपयाच्या नियोजित पाणी पुरवठा प्रकल्पाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षपदी शिक्षणमंत्री प्रा. राम मेघे होते. तसेच प्रमुख अतिथी नगरविकास मंत्री डॉ. सुब्रम्हण्यम, विरोधी पक्ष नेते श्री रा. सु. गवई व कृषीमंत्री श्री भगवंतराव गायकवाड होते. जिल्ह्यातील आमदार व खासदार यावेळी आवर्जून उपस्थित होते." या प्रसिद्धीपत्रकाचा मथळाच मुळात "**अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेतील लोकवर्गणीचा भाग शासन सहन करील : मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांची घोषणा" असा देण्यात आला होता.**

****************************************************

## १८

## आश्वासन समितीमधील रणकंदनानंतर योग्य तो शासननिर्णय निघाला एकदाचा

****************************************************

### २ ऑगस्टला कार्यक्रम व 3 ऑगस्टला आश्वासन समितीने नोटीसेस काढल्या

**१९३.** नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेल्या प्रदेशातील सर्वात जास्त अनुशेष असलेल्या शहराचा हा प्रश्न असल्याने, सभागृहाबाहेरील आश्वासनाबाबत समिती काहीही करू शकत नाही हे खरे असले तरी या संदर्भात सभागृहात देण्यात आलेली काही ताजी आश्वासने हाताशी असल्यामुळे, विधानपरिषदेच्या आश्वासन समितीने याबाबतची आपली कारवाई समारंभाच्या दुसऱ्याच दिवशी फारच तडफेने सुरू केल्याचे दिसून येते. "विधान परिषद, आश्वासन समितीची बैठक सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, १९८७ रोजी दुपारी १२.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे समिती कक्ष क्रमांक १९०३ (१९ वा मजला) मध्ये घेण्यात आली. बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते :-१. श्री. बी. टी. देशमुख, (कार्यकारी समिती प्रमुख), २. श्री. ब्रम्हदेव कृष्ण माने, ३. श्री. पु. ब. सोमवंशी, ४. श्री. अनंतकुमार पाटील, ५. श्री. सुधीर जोशी, ६. श्री. अरुण मेहता" *(आश्वासन समिती (वि.प.) १९८७ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १४१)*

**१९४.** या बैठकीमध्ये घेण्यात आलेला निर्णय नमूद असलेले समितीचे कार्यवृत्त पुढीलप्रमाणे :

"दि. २४ जुलै १९८७ रोजी डॉ. व्ही. सुब्रमण्यन, नगरविकास मंत्री यांनी "अमरावती शहराची पाणी पुरवठा योजना" या विषयावर केलेल्या निवेदनात अंतर्भूत असलेल्या "(१) मा. मुख्यमंत्री यांनी या योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या जलकुंभाच्या कामाचे भूमिपूजन दि. २.८.८७ रोजी करण्याचे मान्य केले आहे. (२) या बाबीवर शासन सहानुभूतीपूर्वक विचार करीत असून या बाबीचा निर्णय दि. २ ऑगस्ट १९८७ पर्यंत घेतला जाईल." या आश्वासनाच्या संदर्भात लोकवर्गणीबाबत दि. २.८.८७ पावेतो निर्णय शासनाने घेतला काय? घेतला असल्यास या निर्णयाचे स्वरूप काय? निर्णयाची प्रत समितीच्या माहितीसाठी विभागाकडून ९.८.८७ पावेतो मागवावी व दि. १०.८.८७ रोजी होणाऱ्या समितीच्या बैठकीपुढे विचारार्थ ठेवावी असे निदेश कार्यकारी समिती प्रमुख यांनी दिले. समितीची बैठक दुपारी १.०० वाजता स्थगित झाली." *(आश्वासन समिती (वि.प.) १९८७ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १४४)*

### विधान मंडळ सचिवालयाचे पत्र रवाना

**१९५.** समितीचा निर्णय झाल्याबरोबर विधानमंडळ सचिवालयाने त्याच दिवशी सचिव नगर विकास विभाग यांना "अतितात्काळ" उत्तर पाठवा म्हणून जे पत्र रवाना केले त्या पत्रात असे नमूद करण्यात आले होते की :

"निदेशानुसार आपणास कळविण्यात येते आहे की, दिनांक १६ जुलै, १९८७ रोजी अमरावती शहराची पाणी पुरवठा योजना याबाबतच्या तारांकित प्रश्न क्रमांक ९७३६ च्या संदर्भात मा. नगरविकास मंत्र्यांनी दिनांक २४ जुलै, १९८७ रोजी केलेल्या निवेदनात (प्रत सोबत जोडली आहे.) पुढील दोन आश्वासने दिली आहेत. १) "मा.मुख्यमंत्री यांनी या योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या जलकुंभाच्या कामाचे भूमिपूजन दिनांक २ ऑगस्ट, १९८७ रोजी करण्याचे

मान्य केले आहे." २) " या बाबीवर शासन सहानुभूतीपूर्वक विचार करीत असून या बाबीचा निर्णय दिनांक २ ऑगस्ट, १९८७ पर्यंत घेतला जाईल." तरी वरील आश्वासनानुसार याबाबत काय स्थिती आहे. ते दिनांक ९ ऑगस्ट, १९८७ वा तत्पूर्वी पाठविण्याची व्यवस्था करावी. आदेश काढले असल्यास त्याची प्रत दि. १० ऑगस्ट, १९८७ रोजी होणाऱ्या समितीच्या बैठकीपुढे उपरोक्त माहिती ठेवायची असल्याने कृपया ही बाब तातडीची समजण्यात यावी."

## नगरविकास सचिवांना साक्षिसाठी समितीसमोर बोलाविण्याचा आश्वासन समितीचा निर्णय

**१९६.** विधानपरिषद आश्वासन समितीच्या निर्णयानुसार विधानमंडळ सचिवालयाने दिनांक ३ ऑगस्ट १९८७ रोजी पाठविलेल्या विचारणेला नगरविकास विभागाच्या सचिवांनी १० ऑगस्ट १९८७ रोजी पत्र पाठवून उत्तर दिले. **नगरविकास विभागाचे हे उत्तर विधानपरिषद आश्वासन समितीने बुधवार, दिनांक १९ ऑगस्ट १९८७ रोजी सुभेदारी गेस्ट हाऊस, औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत विचारात घेतले.** सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीच्या कार्यवृत्ताचे बारकाईने अवलोकन केल्यास असे दिसून येते की समितीने आपल्या दिनांक १९ ऑगस्ट १९८७ च्या बैठकीमध्ये **नगरविकास विभागाच्या सचिवांना समितीसमोर साक्षीसाठी बोलाविण्याचा निर्णय घेतला. साक्षीला येतांना कोणत्या निश्चित मुद्यावर ही साक्ष होईल ते चार मुद्देसुद्धा समितीने याच बैठकीत निश्चित केले** ते पुढील प्रमाणे :-

"**मुद्दा क्रमांक १** - आश्वासनामध्ये "याबाबीचा निर्णय दिनांक २ ऑगस्ट, १९८७ पर्यंत घेतला जाईल" असे स्पष्ट नमूद केले आहे. तेव्हा याबाबतीत काय शासन निर्णय झालेला आहे. आश्वासन दिल्याप्रमाणे झालेला शासन निर्णय घेऊन समितीसमोर साक्षीस यावे.

**मुद्दा क्रमांक २** - निर्णय झाला नसल्यास २.८.८७ पर्यंत निर्णय व्हावा म्हणून खात्यामार्फत काय कारवाई करण्यात आली व निर्णय न होण्यात काय अडचणी आल्या याबाबतच्या तपशिलासह समितीसमोर साक्षीस यावे.

**मुद्दा क्रमांक ३** - मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजन केले आहे असे आपण आपले पत्र क्र. पापुयो- २०८७/२१३२/ नवि-१६, दिनांक १० ऑगस्ट १९८७ अन्वये कळविले आहे. तेव्हा याबाबत कामाची सुरुवात झाल्यापासून हे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे व या कामाची वर्षवार योजना काय आहे? याबाबतचा तपशील घेऊन समितीसमोर यावे. तसेच योजनेचे स्वरूप, नकाशे व प्रकल्पदर्शक तपशीलवार टिप्पणी समितीस कळवावी.

**मुद्दा क्रमांक ४** - आपले पत्र क्र. पापुयो २०८७/२१३२/नवि-१६, दिनांक १० ऑगस्ट, १९८७ मध्ये नमूद केले आहे की, "दिनांक २.८.८७ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी अमरावती पाणी पुरवठा योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या जलकुंभाच्या कामाचे भूमिपूजन केले आहे. तथापि १० टक्के लोकवर्गणी बाबतच्या आश्वासनाबाबतची माहिती अजून या विभागास प्राप्त झालेली नाही. मा. मुख्यमंत्री यांच्या सचिवालयातून ती प्राप्त झाल्याबरोबर आपणास सादर करण्यात येईल" असे नमूद केले आहे. तरी या संदर्भात २ ऑगस्ट १९८७ पूर्वी निर्णय होण्याच्या दृष्टीने त्या सचिवालयातून माहिती प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न केले तसेच मुख्यमंत्र्यांच्या समारंभ प्रसंगी खात्याचे किंवा पाणीपुरवठा मंडळाचे अधिकारी उपस्थित होते काय व असल्यास त्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे निर्णय होण्याच्या दृष्टीने केलेली कार्यवाही यासह समितीसमोर साक्षीस यावे." *(आश्वासन समिती (वि.प.) १९८७ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १५४-१५५)*

## १० टक्क्याबाबत एक शब्द बोलायला सचिव तयार नव्हते

**१९७.** सभागृहामध्ये मा. नगरविकास मंत्र्यांनी दिलेली दोन निश्चित स्वरूपाची आश्वासने नमूद करून व त्याबाबतीत माहिती मागवावयाचे चार मुद्दे निश्चित करून समितीने केलेल्या निर्णयाप्रमाणे **सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष विधानपरिषद आश्वासन समितीसमोर दिनांक १५ सप्टेबर १९८७ रोजी झाली. ज्येष्ठ सचिव श्री. डी. के. जैन हे नगरविकास विभागाचे सचिव म्हणून समितीसमोर आले होते.** महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. बी. व्ही. रोटकर हे त्यांना मदतीला होते. स्वतः मुख्यमंत्र्यांनी "१० टक्के लोकवर्गणीचा भार शासन उचलावयास तयार आहे" असे हजारो लोकांच्या सभेत जाहीर केल्यामुळे आता आश्वासन समितीसमोर साऱ्या गोष्टी सरळ येतील असे आम्हाला वाटत होते. पण कसचे काय? अन कसचे काय? "**१० टक्के लोकवर्गणी शासन भरणार आहे असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले." हे शब्द तोंडातून काढायला सचिव तयारच होईनात. कितीही विचारा, कसेही विचारा पण ते फक्त तेवढेच सांगत नव्हते. बाकी सारे सांगत होते.**

## दहा टक्क्याचे सोडून सचिव बाकीचे सारे सांगत होते

**१९८.** "१० टक्के लोकवर्गणीचा निर्णय २ ऑगस्ट १९८७ पर्यंत घेतला जाईल असे जे सांगण्यात आले होते त्याबाबतीत काय निर्णय झाला?" असा प्रश्न विचारला तर सचिवांनी "अमरावती येथे या योजनेचे जेव्हा भूमिपूजन झाले त्यावेळेस अशा तऱ्हेची घोषणा केलेली आहे." असे उत्तर दिले. **अशा तऱ्हेची म्हणजे कशा तऱ्हेची? याबाबत एक शब्द आपल्या तोंडातून काढायला ते तयार नव्हते.** समितीसमोर सचिव "The decision has already been announced." असे सांगत होते. **पण तो काय निर्णय आहे? हे शब्दात सांगायला तयार नव्हते.** त्यांना "२ तारखेपर्यंत यासंबंधीचा निर्णय घेऊ असे म्हटले होते. तेंव्हा आजपर्यंत तरी यासंबंधीचा निर्णय झालेला आहे काय ?" असा प्रश्न विचारला तर ते "The file has been cleared by the Finance Department. The Minister has already put his signature on the file." असे सांगत होते, वित्त विभागाने संमती दिली. मंत्र्यांची सहीसुद्धा झाली आहे. असे ते सांगत होते. पण "**काय निर्णय झाला?**" असे विचारले तर नेमका दहा टक्क्याबाबतचा निर्णय न सांगता ते समितीला "मा. मुख्यमंत्र्यांनी **एक घोषणा केली की, माझ्या शासनाचा असा निर्णय आहे.** त्यानंतर त्यासंदर्भात जी. आर. ड्राफ्ट केला, तो करेक्ट केला. वित्त विभागाने तो क्लीअर केला. मंत्र्यांनी सही केली आणि आता मा. मुख्यमंत्र्यांच्या सहीसाठी ती फाईल गेलेली आहे." असे सांगत होते.

## सचिवांनी उत्तर देतांना वापरलेली वेगवेगळ्या प्रकारची चतुराईची शब्दरचना

**१९९.** "**उद्या मंत्री किंवा मुख्यमंत्री काय वाटेल ते समारंभात जाहीर करतील. माझ्या टेबलवरील नोटशिटवर त्यांनी काय जाहीर केले? ते लेखी आले पाहिजे व त्याच्या खाली "मी हे जाहीर केले" असे मान्य करणारी मुख्यमंत्र्यांची सही पाहिजे, मगच मी ते खरे मानीन. बाकी असे कार्यक्रम, अशा घोषणा मी पुष्कळ पाहिल्या**" असाच जणू काही सचिवांचा एकंदर आविर्भाव होता. "**माझे सचिव दर्जाचे दुसरे एक अधिकारी या समारंभाला स्वतः हजर होते. "दहा टक्के लोकवर्गणी शासन भरेल" असे मुख्यमंत्र्यांनी तेथे जाहीर केले आहे. आमच्या कार्यालयीन कार्यरितीप्रमाणे त्या फाईलवर मा. मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी झाली की आम्ही शासन निर्णय निर्गमित करू**" असे प्रांजळपणे सांगण्यात सचिवांना काहीही हरकत नव्हती. मुख्यमंत्री हजारो लोकांच्या सभेत जे बोलले ते प्रामाणिकपणे विधानमंडळाच्या एखाद्या समितीसमोर सांगितल्याबद्दल एखाद्या सचिवाला यापूर्वी "फाशी" झाल्याचे निदान मला तरी माहीत नाही. लोकप्रश्न आणि लोकभावना यांच्याशी आमचे काही देणे घेणे नाही. मी काटेरी नियमांची कडवट अंमलबजावणी कठोरपणे करणारा हृदयशून्य अधिकारी आहे हा अहंकार जोपासण्यात सचिव पदावरील ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा किती वेळ जात असेल हे एक ईश्वरच फक्त सांगू शकेल. **१० टक्क्याबाबतचा मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेला निर्णय सचिवांच्या तोंडून रेकॉर्डवर यावा यासाठी आश्वासन समितीच्या सदस्यांनी केलेला आटापीटा व कोणत्याही परिस्थितीत आपल्या तोंडून दहा टक्क्याबाबतचा शब्द बाहेर पडणार नाही यासाठी सचिवांनी उत्तर देतांना वापरलेली वेगवेगळ्या प्रकारची चतुराईची शब्दरचना यामुळे आम्हा सर्वांना ही साक्ष मोठी मौजेची वाटली.** ही मौज वाचकांना सुद्धा घेता यावी म्हणून या साक्षीमध्ये झालेल्या प्रश्नोत्तरांच्या अधिकृत प्रतिवेदनातील काही मजकूर नमूद करीत आहे, तो पुढील प्रमाणे :

"*श्रीमती निर्मला ठोकळ (समिती प्रमुख) :* अमरावती शहराच्या पाणी पुरवठ्याच्या प्रश्नासंबंधी आज आपल्याला बोलाविलेले आहे त्या संदर्भात आजची स्थिती काय आहे व तुमच्या काय अडचणी आहेत?

*प्रा. श्री. बी. टी. देशमुख :* १० टक्के लोकवर्गणीचा निर्णय २ ऑगस्ट १९८७ पर्यंत घेतला जाईल असे जे सांगण्यात आले होते त्याबाबतीत काय निर्णय झाला?

*श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :* अमरावती येथे या योजनेचे जेव्हा भूमिपूजन झाले त्यावेळेस अशा तऱ्हेची घोषणा केलेली आहे.

*प्रा. श्री. बी. टी. देशमुख :* The Minister made the statement in House and it was a prepared statement. So, it was not out of debate.

*श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :* The decision has already been announced. Now, the file has gone to the Chief Minister. We will issue G.R. also, when he puts his signature on it.

*प्रा. श्री. बी. टी. देशमुख :* त्यादृष्टीने निर्णय व्हावयास पाहिजे. २ तारखेपर्यंत यासंबंधीचा निर्णय घेऊ असे म्हटले होते तेव्हा आजपर्यंत तरी यासंबंधीचा निर्णय

झालेला आहे काय?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** The file has been cleared by the Finance Department. The Minister has already put his signature on the file.

***प्रा. श्री. बी. टी. देशमुख :*** काय निर्णय झाला?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** मा. मुख्यमंत्र्यांनी एक घोषणा केली की, माझ्या शासनाचा असा निर्णय आहे. त्यानंतर त्यासंदर्भात जी. आर. ड्राफ्ट केला, तो करेक्ट केला. वित्त विभागाने तो क्लीअर केला. मंत्र्यांनी सही केली आणि आता मा. मुख्यमंत्र्यांच्या सहीसाठी ती फाईल गेलेली आहे.

***श्री. अरूण मेहता :*** शासकीय निर्णय जाहीर केला गेल्यानंतर जी. आर. झाला नसेल तर तो निर्णय अंमलात येतो काय ?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** The answer to your question is in negative.

***प्रा. श्री. बी. टी. देशमुख :*** खरे म्हणजे ते खात्याने मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून द्यावयास पाहिजे होते. आज या गोष्टीला जवळजवळ दीड महिना झालेला आहे. कारण ते तयार स्टेटमेंट होते.

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** २ तारखेपर्यंत निर्णय घेऊ असे स्टेटमेंट केलेले होते.

***प्रा. श्री. बी. टी. देशमुख :*** कमिटमेंट असे आहे की, २ ऑगस्ट पर्यंत निर्णय घेऊ. स्टेटमेंट खात्यानेच करून दिले असले पाहिजे.

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** The statement was made by the Minister.

***श्री. अरूण मेहता :*** But after all it is a government's statement.

***प्रा. श्री. बी. टी. देशमुख :*** It is a fact that the statement which was made by the Minister was a prepared statement, and जे स्टेटमेंट तयार केले होते त्या मध्ये अमूक एक तारीख दिलेली होती. तेव्हा ती बाब खात्याने मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून द्यावयास पाहिजे होती.

***श्रीमती निर्मला ठोकळ (समिती प्रमुख) :*** मा. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून माहिती प्राप्त झाल्याबरोबर ती समितीला सादर करण्यात येईल असे १० ऑगस्टला समितीला पत्र आलेले आहे. तेव्हा दरम्यानच्या १ महिन्याच्या काळामध्ये त्यासाठी काय काय प्रयत्न केले?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** After the Chief Minister made the statement, we put up a file. Shri Rotkar was present in that function. **He informed that such and such announcement has been made by the Chief Minister........**

***प्रा. श्री. बी. टी. देशमुख :*** श्री. रोटकर साहेब त्या कार्यक्रमाला हजर होते काय?

***श्री. बी. व्ही. रोटकर (सदस्य सचिव, म. पा. पु. व ज. नि. मंडळ) :*** होय.

***प्रा. श्री. बी. टी. देशमुख :*** मग श्री. रोटकर यांनी या संदर्भात काय कळविलेले आहे ते समितीला कळवावे. दुसरे असे की, २ तारखेपर्यंत निर्णय घेण्यात येईल असे म्हटले असेल तर जी. आर. ईश्यू करण्यास किती दिवस लागतील?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** निर्णय झालेलाच आहे. काही थोड्या दिवसांचा प्रश्न आहे." *(आश्वासन समिती (वि.प.) १९८७ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १६७-१६९)*

### समितीसमोरील साक्षीमुळे नगरविकास विभागात जोराची धावपळ

**२००.** सचिवांच्या साक्षीतून एक गोष्ट स्पष्ट झाली ती अशी की समितीने ३ ऑगस्ट १९८७ ला नोटीस काढल्यामुळे नगरविकास विभागात जोरदार धावपळ सुरू झाली होती. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेला निर्णय आम्हाला कळवावा अशी मागणी करणारी नोटशिट **१० ऑगस्टला** नगरविकास विभागात तयार झाली, **१४ ऑगस्टला** ही फाईल नगरविकास मंत्र्याकडे गेली. "दोन तारखेला भूमिपूजन झाले. सर्व संबधितांशी बराच विचारविनिमय करून मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. आता अंमलबजावणी करा" असे नगरविकास मंत्र्यांनी लिहिले, मग **१८ ऑगस्टला** "मिनिस्टरने लिहिले त्याप्रमाणे कामाला लागा" अशा सूचना सचिवांनी उपसचिवांना दिल्या, **३१ ऑगस्टला** फाईल नियोजन विभागाकडे गेली, ती त्यांनी ४ **सप्टेंबरला** परत पाठविली. ८ **सप्टेंबरला** वित्त विभागाकडे फाईल पाठविली. **१४ सप्टेंबरला** फाईल मुख्यमंत्र्यांकडे गेली पण तुम्ही आज साक्षीला बोलाविल्याने ती फाईल आम्ही तेथून काढून आणली असे सचिवांनी समितीला सांगितले या प्रश्नोत्तराचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :

***"श्रीमती निर्मला ठोकळ (समिती प्रमुख) :*** १० तारखेला आपण आम्हाला पत्र दिले आणि आज आपण साक्षीला आलात तेव्हा मधल्या काळामध्ये आपण काय प्रयत्न केले?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** मिनीस्टर साहेबांकडे फाईल गेली होती ती लवकर क्लिअर करा असे सांगितले होते.

***प्रा. श्री. बी. टी. देशमुख :*** या संदर्भात फाईलची मुव्हमेंट कशी झाली याबाबतीत क्रानॉलॉजिकली सांगा.

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** On **10th August,** we put up a note to the Minister, saying C. M. is requested to please inform this department the decision taken in the matter. Further action will be taken on receipt of this information. **On 14th,** the file goes to the Minister. He says Bhoomipujan took place on 2nd. C.M. made announcement after considerable amount of thought and discussion with the concerned people. They should implement the decision and modify G.R. **On 18th,** I am giving instructions to my Deputy Secretary that in the light of our Minister's minutes, a draft of revised G.R. may be prepared and got vetted from Finance Department This should be done immediately. We shall submit the file to the Chief Minister. **On 31st** the file has gone to the Planning Department for revised G. R. on **4th September,** Planning Department returns the file. On **8th Setember,** the Finance Secretary returns the file to UDD with some suggestions, the UD should direct Amravati Municipal Corporation to augment resources immediately and to achieve economy in the expenditure on the basis of the review taken by the Divisional Commissioner. Then the file goes to the Finance Secretary. He clears that file and then the file has gone to the Chief Minister, **on 14th September, 1987.** Now, we have withdrawn the file because we have to appear before you." *(आश्वासन समिती (वि.प.) १९८७ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १६९-१७०)*

### मुख्यमंत्र्यांची सही झाली की २४ तासात शासन निर्णय काढू

**२०१.** आमचा शासननिर्णयाचा तर्जुमा तयार आहे. मा. मुख्यमंत्र्यांची सही झाली की आम्ही २४ तासात याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करू असेही सचिवांनी समितीला सांगितले ते पुढील शब्दात :

***"श्रीमती निर्मला ठोकळ (समिती प्रमुख) :*** When will you issue the G.R.?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** As soon as possible.

***श्री. अरूण मेहता :*** Would you please enlighten us on that point, that after getting the signature of the Hon'ble Chief Minister on the file how much time you will take for issuing the G.R.?

***श्री. डी. के. जैन (सचिव, नगरविकास विभाग) :*** 24 hours; once the file comes we will issue the G.R. within 24 hours. Draft orders are ready. *(आश्वासन समिती (वि.प.) १९८७ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १७१)*

### शेवटी एकदा लोकवर्गणी हटविणारा शासननिर्णय निर्गमित झाला

**२०२.** मुख्यमंत्र्यांची सही झाल्याबरोबर आम्ही २४ तासात आदेश काढू असे नगरविकास सचिवांनी १५ सप्टेंबर १९८७ रोजी विधानपरिषद आश्वासन

समितीला सांगितले खरे; पण याबाबतचा प्रत्यक्ष शासननिर्णय हा २६ ऑक्टोबर १९८७ रोजी म्हणजे तसे सांगितल्यापासून जवळ जवळ ४१ दिवसांनी निर्गमित झाला. मा. मुख्यमंत्र्यांनी सही करावयाला ४० दिवस घेतले की मा. मुख्यमंत्र्यांची सही लवकर झाली पण नगरविकास विभागाने जास्त दिवस घेतले याची चौकशी मी काही नंतर केली नाही. कारण कसे का होइना **दिनांक २६ ऑक्टोबर १९८७ रोजी याबाबतचा सुधारित शासननिर्णय प्रसृत करण्यात आला होता.** अमरावती महानगरपालिकेवर दहा टक्के लोकवर्गणी बसविण्याचा शासन निर्णय हा २७ ऑक्टोबर १९८६ रोजी निर्गमित केला जावा आणि ती अट काढून टाकण्याचा शासननिर्णय (No. WSS/2086/CR-293/86/UD-16) तेथून बरोबर वर्षांनी म्हणजे २६ ऑक्टोबर १९८७ रोजी प्रसृत केला जावा हा एक योगायोगच म्हणावा लागेल. ही अट काढून टाकण्याच्या या शासन निर्णयाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये हा निर्णय पुढील शब्दात नमूद केलेला दिसून येतो :-

"In partial modification of orders issued in para 4 (a) of the Government Resolution, Urban Development Department No. WSS 2086/CR 293/86/UD-16 Dated 27 October, 1986, Government is now pleased to state that 10% popular contribution of Rs. 5.50 crores, which was to be paid by the Amravati Municipal Council, shall now be paid by the Government of Maharashtra as Special case which will not be treated as precedent."

*****************************************************

## १९
## *निधी उपलब्धीसाठी सभागृहात पाठपुरावा*

*****************************************************

### आता प्रकल्पाच्या बांधकामाचा पाठपुरावा

**२०३.** प्रशासकीय मान्यतेच्या शासननिर्णयामध्ये दहा टक्क्याबाबत दुरुस्ती करणारा शासननिर्णय निर्गमित झाला होता. **आता योजनेच्या बांधकामाचा पाठपुरावा करणे हे लोकप्रतिनिधींच्या समोरील महत्त्वाचे काम होते.** दिनांक १६ नोव्हेंबर १९८७ रोजी सर्वश्री बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, अनंतकुमार पाटील, माधवराव घायगुडे, श्रीमती लतिफा काझी यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११२२५ हा प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर उत्तरासाठी होता. "१० टक्के रक्कम नगरपालिकेवर बसविण्याबाबत काढलेला आदेश रद्द करण्याच्या मागणीबाबत शासनाने काय निर्णय घेतला" या प्रश्नाला "१० टक्के लोकवर्गणी अमरावती महानगरपालिकेने भरण्याऐवजी शासनाने भरावी असे आदेश दिनांक २६.१०.८७ रोजी काढण्यात आले आहेत." असे उत्तर देण्यात आले होते. "सदरहू योजनेचे काम केव्हा सुरू झाले व ते केव्हा पूर्ण होणार आहे" या प्रश्नाला "२.१०.८७ रोजी पाण्याच्या २ टाक्यांची कामे सुरू करण्याकरिता वर्क ऑर्डर ठेकेदारांना दिलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेवर कामाची प्रगती अवलंबून राहील." असे उत्तर नगरविकास मंत्र्यांनी दिले होते.

**२०४.** अनुपूरक चर्चेमध्ये प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारलेल्या "आपण असे म्हटले की, ५-१२-१९८६ ला निविदाची जाहिरात देऊन काम सुरू करण्यात आले. पण मी या अधिवेशनाला आलो त्यावेळी तेथे काहीही काम सुरू झालेले नव्हते. तेव्हा **ही योजना किती दिवसात आपण पूर्ण करण्याचे ठरविले आहे? त्याची काही ब्ल्यु प्रिंट वगैरे, प्लॅनिंग वगैरे काही केले आहे काय?**" या उपप्रश्नाला मा. मंत्रिमहोदयांनी "अध्यक्ष महाराज, तेथे काहीच काम झाले नाही असे नाही. **तेथील कामाचे डिझाईन वगैरे झालेले आहे, एस्केव्हेशनचे काम सुरू झालेले आहे. त्यावर देखरेख करण्यासाठी मी सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख, श्री. गवई यांना वारंवार सांगितले आहे.** They can examine it, and let us know, so that we are anxious to see that it is done quickly." असे उत्तर दिले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर १९८७ : खंड ८१, क्रमांक ६, पृष्ठ ७)*

मंत्रिमहोदयांचे हे उत्तर संपत नाही तोच विदर्भात ज्येष्ठ सदस्य श्री. जवाहरलालजी दर्डा उठून उभे राहीले व त्यांनी पुढील प्रश्न विचारला "अध्यक्ष महाराज, या योजनेचे काम सुरू झाले आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले त्याबद्दल आनंद वाटला. कदाचित या योजनेच्या तांत्रिक गोष्टी अगोदर पूर्ण करीत असतील त्यामुळे ती सुरुवात झाली असे ते म्हणताहेत. परंतु हे काम निश्चितपणे केव्हा पूर्ण होणार आहे. कारण हा फार जुना आणि अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासाठी केवळ निधीची उपलब्धता हे मोघम उत्तर दिले आहे. तेव्हा या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी म्हणजे निश्चित केव्हा पूर्ण होणार वा केले जाईल याचा कालखंड आपण सांगणार काय?" त्यावर नगरविकासमंत्री डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. "अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. दर्डा यांना मी सांगू इच्छितो की, ही योजना आपण एल. आय. सी. आणि जागतिक बँक यांच्या मदतीने पूर्ण करणार आहोत आणि तेथील विशिष्ट परिस्थिती जाणून घेऊन आपण हे करीत आहोत. Sir, we will pay the maximum attention to it. **I am not able to give a time-limit here today;** but I may assure this hon'ble House that so far as this scheme is concerned we will give attention and **we will give maximum attention to this** in the light of the discussion we have had here and in view of the concern of the Hon. Members." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर १९८७ : खंड ८१, क्रमांक ६, पृष्ठ ७-८)*

**२०५.** १६ नोव्हेंबर १९८७ रोजी या प्रश्नावर झालेल्या विधानपरिषदेतील कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन काळजीपूर्वक पाहिले तर असे लक्षात येते की योजनेचे बांधकाम पूर्ण करण्याच्या निश्चित कालखंडाबाबतचे आश्वासन जरी मिळाले नाही तरी "या सभागृहात झालेली चर्चा व मा. सभासदांनी यासंबधात व्यक्त केलेली चिंता लक्षात घेऊन आम्ही या योजनेकडे लक्ष देऊ, महत्तम लक्ष देऊ." असे मंत्रिमहोदयांनी सभागृहाला सांगितले. गेल्या वर्षभर सतत चाललेल्या लढाईमुळे आम्ही सुद्धा थकून गेलो होतो. शिवाय १० टक्क्याचा शासन निर्णय नुकताच ऑक्टोबरमध्ये निर्गमित झाला होता. त्यानंतर अंदाज पत्रक सादर झालेले नव्हते. ते २-३ महिन्यांनी मार्च ८८ मध्ये सादर होणार. ही चर्चा नोव्हेंबर ८७ मध्ये नागपूर अधिवेशनांत सुरू होती. **या पार्श्वभूमिवर मंत्र्यांचे उपरोक्त मोघम आश्वासन सुद्धा आम्हाला त्यावेळी समाधानकारक वाटले.**

### १९८८-८९ चा अर्थसंकल्प सादर झाला

**२०६.** यानंतर सन १९८८ चे विधानमंडळाचे अंदाजपत्रकी अधिवेशन सोमवार, दिनांक १४ मार्च १९८८ रोजी सुरू झाले. बुधवार, दिनांक १६ मार्च १९८८ रोजी अर्थमंत्र्यांनी १९८८-८९ वर्षाचा महाराष्ट्राचा अर्थसंकल्प (अंदाजपत्रक) सभागृहाला सादर केला. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प सादर करण्याच्या या सोहळ्याचाही एक मोठा थाट असतो. त्यादिवशी प्रश्नोत्तरे व इतर औपचारिक कामकाज झाल्यावर थोडी सुटी होते व नंतर ठरलेल्या वेळी अंदाजपत्रक सादर करणारे अर्थमंत्र्यांचे भाषण विधानसभेत व अर्थराज्यमंत्र्यांचे भाषण विधानपरिषदेत सुरू होते. ते भाषण संपल्यावर मग दुसरे कोणतेही कामकाज होत नाही. सभागृहाचे त्या दिवशीचे कामकाज तेथेच समाप्त होते. "अर्थसंकल्पीय अंदाज" समाविष्ट असलेली मोठमोठी पुस्तके सभासदांना दिली जातात. या पुस्तकातून होणारे "राज्याच्या विकासाचे धावते दर्शन" म्हणजे राज्यातील राजकीय शक्ती धारकांनी सामाईक साधनसामुग्री आपापल्या प्रभाव क्षेत्रात ओढून नेण्यासाठी केलेल्या यशस्वी धडपडीचा अधिकृतपणे नोंदबद्ध झालेला आलेखच असतो. मुख्यमंत्र्यांनी किंवा इतर मंत्र्यांनी त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यात वा भागात किती धन पळवले आहे? किंवा समन्यायी वाटप केले आहे? कोणता मंत्री किती प्रभावी आहे? कोणत्या खात्याला जास्त अर्थबळ उपलब्ध झाले आहे, कोणत्या जिल्ह्यात किंवा कोणत्या शहरात गंगोदकांने आंघोळ सुरू आहे, तर कोणत्या शहरात पिण्याला सुद्धा पाणी नाही. याचे मोठे सुंदर दर्शन या ग्रंथामधून होत असते. त्या दिवशी अनेक तास खर्च करून हे धावते दर्शन पूर्ण करणे, हा अनेक वर्षे माझ्या संसदीय कारकिर्दीतील मोठाच आवडीचा कार्यक्रम झालेला होता.

### ५५ कोटीच्या योजनेसाठी फक्त ३२ हजार रुपयांची तरतूद

**२०७.** "नगरविकास विभाग भाग-२ : नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण विभाग १९८८-८९ चे कार्यक्रम अंदाजपत्रक" हे जे पुस्तक सादर करण्यात आले, त्याच्या पृष्ठ ५० वर "५५ कोटी रुपयांची अमरावती वाढीव पुरवठा योजना" दाखविण्यात आली होती व काम पूर्ण करण्याचे वर्ष मार्च १९९१ ह्या अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेले होते. **अमरावती शहराच्या ५५ कोटी च्या या योजनेला फक्त ३२ हजार रुपयांची तरतूद त्या पुस्तकामध्ये दाखविण्यात आली होती.** विशेष गंमतीची गोष्ट अशी की त्याच पुस्तकाच्या पृष्ठ ५०-५१ वर "औरंगाबाद पाणी पुरवठा योजना टप्पा २" या २७ कोटी रुपयांच्या योजनेला १९८८-८९ साठी १६ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. त्याच पानावर "औरंगाबाद वितरण व्यवस्थेची पुनर्रचना टप्पा १" या १८ कोटीच्या योजनेसाठी १६ कोटी रुपयांची तरतूद त्यावर्षासाठी करण्यात आली होती. आपले काही तरी चुकत असेल म्हणून मी पुन्हा पुन्हा एकम्, दहम्, शतम्, सहस्त्र करीत प्रत्येक शून्यावर नजर फिरवत होतो. पण ती तरतूद ३२ हजार रुपयांच्या वर जाईना. १९८८-८९ या आर्थिक वर्षामध्ये करावयाच्या

खर्चासाठी नमूद केलेली अर्थसंकल्पीय तरतुदींची रक्कम रुपये ३२ हजार दाखविण्यात आली होती. **१९८८-८९ या आर्थिक वर्षामध्ये ३२ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली असेल, तर ही योजना किती वर्षात पूर्ण होईल असा प्रश्न स्वाभाविकपणे यातून निर्माण झाला.**

**२०८.** अंदाजपत्रकामध्ये या योजनेसाठी करण्यात आलेल्या या व्यवस्थेने मन खिन्न झाले. गुरूवार, दिनांक १७ मार्च १९८८ रोजी त्या आठवड्यातील बैठक आटोपून रेल्वेने आम्ही परत आलो. रेल्वेचा हा प्रवास म्हणजे विदर्भातील सर्व प्रतिनिधींचे एक लहानसे धावते अधिवेशनच असते. आठवड्याभरात सभागृहात झालेल्या बऱ्यावाईट घटनांची मोठी चविष्ट चर्चा या प्रवासामध्ये केली जाते. नुकत्याच झालेल्या जनआंदोलनामुळे चर्चेचा विषय झालेल्या "**अमरावती शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या ३२ हजाराची ही गोष्ट**" मी माझ्या अनेक सहकाऱ्यांना या प्रवासात सांगितली, तेव्हा अनेकांना मोठे आश्चर्य वाटले. मार्च एप्रिल १९८८ चे जवळजवळ सहा-सात आठवड्याचे संपूर्ण अधिवेशन आमच्या समोर होते. मिळेल त्या सांसदीय आयुधांचा वापर करून बत्तीस हजाराच्या या गोष्टीवरून नगरविकास विभागाचे धिंडवडे काढण्याचा निर्धार आम्ही लोकप्रतिनिधींनी केला.

### अमरावती व औरंगाबादची तुलना

**२०९.** अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेतांना सोमवार, दिनांक २८ मार्च १९८८ रोजी विधानपरिषदेत केलेल्या भाषणामध्ये प्रा. बी. टी. देशमुख यांनी पुढील शब्दात याबाबतचे विचार मांडले : "अध्यक्ष महाराज, "**कार्यक्रम अंदाजपत्रक १९८८-८९ नगरविकास विभाग नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण**" या पुस्तकाच्या पृष्ठ ५० व ५१ कडे मी आपले लक्ष वेधणार आहे व अमरावती शहर पाणीपुरवठ्याच्या संदर्भात मुद्दा मी माझ्या भाषणात मांडणार आहे. अध्यक्ष महाराज, पाणीपुरवठ्याच्या योजना मार्गी लागण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठ्याचा जो कार्यक्रम घेतला आहे, त्यामध्ये **औरंगाबाद विभागासाठी "औरंगाबाद पाणीपुरवठा योजना टप्पा २" ही एकूण २७ कोटीची योजना आहे व १९८८-८९ मध्ये ही तरतूद १८ कोटींची केली आहे. औरंगाबादची दुसरी योजना "वितरण व्यवस्थेची पुनर्रचना टप्पा १" ही अठरा कोटींची योजना आहे व या वर्षात तरतूद १६ कोटींची केली असल्याचे पान ५०-५१ वर दिसून येत आहे. ही तरतूद १९८८-८९ सालासाठी आहे. परंतु अध्यक्ष महाराज, त्यातील अमरावतीच्या ५५ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेसाठी पान ५० वर जी माहिती दिली आहे, त्याप्रमाणे फक्त ३२ हजार रुपयांची तरतूद १९८८-८९ वर्षासाठी दाखविली आहे. अध्यक्ष महाराज, ही योजना बजेटमध्ये तरतूद नसतांना पूर्ण होणार आहे काय?** शासनाची तशी अपेक्षा आहे काय? हा भेदभाव निषेधार्ह आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक २८ मार्च १९८८ : खंड ८२, क्रमांक १०, पृष्ठ ६८)*

आपले भाषण संपवितांना प्रा. बी. टी. देशमुख यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की "दुसऱ्या कोणत्याही प्रकाशनामध्ये ही फिगर तपशिलाने दिलेली नाही. या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये ती दिलेली आहे आणि म्हणून यासंबंधीचा खुलासा आला पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. या वर्षी आपण अमरावती पाणीपुरवठ्याच्या योजनेतील काय कामे करीत आहोत? त्याचे फायनान्सियल अलोकेशन काय आहे? याबाबतचा स्पष्ट खुलासा आला तर या दोन्ही प्रश्नांच्या बाबतीत विदर्भामध्ये जे अतिशय तणावाचे वातावरण आहे, ते निवळण्यास मदत होईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक २८ मार्च १९८८ : खंड ८२, क्रमांक १०, पृष्ठ ६८)*

### सत्तारूढ पक्षाच्या बैठकीत ३२ हजाराची गोष्ट

**२१०.** सत्तारूढ पक्षसदस्यांच्या बैठकीमध्ये विधानसभा सदस्य डॉ. देविसींह शेखावत व डॉ. अनिल वऱ्हाडे या दोन सदस्यांनी मुख्यमंत्र्यांच्या ही गोष्ट लक्षात आणून दिली. विचार मांडण्यात पहिला क्रम डॉ. अनिल वऱ्हाडे यांचा लागला, ते म्हणाले "मुख्यमंत्री महोदय, आम्हाला असे समजले आहे की, ५५ कोटी रुपयांच्या अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी फक्त ३२ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे." त्यांच्या वाक्यातील "आम्हाला असे समजले आहे की" या शब्दाचे मर्म शंकरराव चव्हाणांसारख्या मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आले नसते तर नवलच, ते ध्यानात घेऊन मुख्यमंत्री एकदम कडाडले "तुम्ही स्वतः पाहिले आहे काय? सांगोवांगी ऐकीव माहितीवर बोलणे बरोबर नाही." पक्ष सदस्यांच्या अनौपचारिक बैठकीमध्ये कोणीही सदस्य अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकांचे ग्रंथ सोबत घेऊन बसलेला नसतो. त्यामुळे डॉ. देविसींह शेखावत व डॉ. अनिल वऱ्हाडे या दोनही सदस्यांना "उद्या ही माहिती आम्ही तुम्हाला देतो" यापेक्षा जास्त त्या बैठकीत काही सांगता आले नाही. दुसऱ्या दिवशी या दोनही सदस्यांनी एकत्रितरीत्या पुन्हा विधानभवनातील त्यांच्या कार्यालयामध्ये मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेतली व त्यांना "**कार्यक्रम अंदाजपत्रक १९८८-८९ नगरविकास विभाग नागरी पाणीपुरवठा व जलनिस्सारण**" हे पुस्तक व त्यातील पृष्ठ ५० व ५१ दाखविले. मा. मुख्यमंत्र्यांना एकदम अपराधीपणासारखे वाटले. "काही तरी चूक झालेली दिसते. पहावे लागेल" एवढेच शब्द ते पुटपुटले, असे या दोनही सदस्यांनी मला सांगितले. सभागृहात होणाऱ्या औपचारिक चर्चेबरोबरच बाहेर सत्तारूढ पक्ष सदस्यांच्या होणाऱ्या बैठकीमध्ये आपल्याच पक्षाच्या सदस्यांनी अनौपचारिक चर्चेमध्ये आपल्याच नेत्यांच्या डोळ्यात घातलेले हे झणझणीत अंजन सत्ताधारकांची दृष्टी साफ करण्यास बरेच प्रभावी ठरत असते, असे अनेकदा आढळून येते. आपल्या शक्तीनुसार या दोनही सदस्यांनी ती कामगिरी पार पाडली होती.

### सात विकासक्षेत्रातील अनुशेष दूर करण्याचे धोरण गेले कुठे ?

**२११.** "राज्याच्या सातव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी आढावा विचारात घेणे" या विषयावरील चर्चेत भाग घेतांना मंगळवार, दिनांक १२ एप्रिल १९८८ रोजी प्रा. बी. टी. देशमुख यांनी या विषयाचा तपशीलवार ऊहापोह केला. भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी पुढील विचार मांडले :

"अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याच्या सातव्या पंचवार्षिक योजनेतील तीन वर्षे उलटून गेली आहेत, दोन वर्षे आपल्यासमोर आहेत. आपली जी घोषित धोरणे होती, त्यांचा आपण कितपत पाठपुरावा करू शकलो आहोत, याबाबतची चर्चा आपण या ठिकाणी करीत आहोत. अध्यक्ष महाराज, या योजनेची सुरुवात होताना सबंध महाराष्ट्राभर एक मोठा गलबलाट झाला. त्यावेळी दांडेकर कमेटीने आपले काम पूर्ण केले होते म्हणून सरकारला योजना सुरू करतांना त्या अनुशेषाबाबतची घोषणा करावी लागली. पहिल्या वर्षी जी वार्षिक योजना सादर केली त्यामध्ये सरकारने तसे सांगितले. योजनेच्या पहिल्या वर्षी एक पुस्तक छापून प्रसिद्ध केले. "**वार्षिक योजना १९८५-८६ मध्ये अनुशेष दूर करण्यासाठी केलेल्या तरतुदींची विवरणपत्रे**" हे त्या पुस्तकाचे नांव आहे. नियोजन विभागाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आणि पहिल्याच पानावर शासनाचे धोरण त्यांनी जाहीर केले. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "विविध विभागातील विकासात्मक तफावती निश्चित करण्याकरिता १९८३ मध्ये शासनाने नियुक्त केलेल्या सत्यशोधन समितीचा अहवाल शासनाला उपलब्ध झाला आहे आणि सत्यशोधन समितीला विविध जिल्ह्यांमध्ये आणि विविध विभागांमध्ये ९ विकासात्मक क्षेत्रात अनुशेष असल्याचे आढळून आले. **सातव्या पंचवार्षिक योजनेला अंतिम स्वरूप देण्याच्या वेळी या ९ क्षेत्रांपैकी ७ क्षेत्रातील अनुशेष सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पूर्णपणे आणि उरलेल्या 'रस्ते' आणि 'सिंचन' या दोन क्षेत्रामधील अनुशेष सातव्या आणि आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पूर्ण करण्याचे शासनाने ठरविले आहे.** रस्ते आणि सिंचन सोडून बाकीच्या सर्व क्षेत्रांमधील अनुशेष सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पूर्ण करणार आहोत." असे हे धोरण जाहीर केले होते आणि त्याप्रमाणे त्यासाठी रकमा याच पानावर दिलेल्या आहेत. आपल्याला आता जो मध्यावधी आढावा दिला आहे, त्यामध्ये त्यासाठी किती रकमा अलॉट केल्या होत्या ते सांगितले आहे. गेल्या तीन वर्षामध्ये किती रकमांचा वापर केला आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १२ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक १९, पृष्ठ ३९)*

### पिण्याच्या पाण्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेली महापालिका

**२१२.** नागरी पाणीपुरवठ्याच्या क्षेत्रातील अनुशेषाची राज्याची स्थिती व राज्यामध्ये अमरावती शहराची स्थिती कशी आहे याबाबतचे विचार प्रा. बी. टी. देशमुख यांनी त्यानंतर आपल्या भाषणात पुढील शब्दात मांडले :-

"अध्यक्ष महाराज, तीन पंचमांश टारगेट तरी साध्य व्हायला पाहिजे होते. खरं म्हणजे दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी याचा स्पीड जास्त वाढायला पाहिजे होता. मध्यावधी आढावा या पुस्तकाच्या पान २० वरील कॉलम ८ मध्ये टक्केवारीची माहिती दिली. त्यामध्ये सर्वात कमी टक्केवारी नागरी पाणीपुरवठ्याच्या हेडवर दाखविलेली आहे. प्लॅनच्या सुरुवातीला असे सांगितले होते की, आम्ही प्लॅनमध्ये इतकी रक्कम वापरू आणि मग तीन वर्षात जे पैसे प्रत्यक्ष वापरले आहेत त्याचे परसेंटेज दिलेले आहे ते अतिशय कमी आहे. या ठिकाणी ठरवून दिलेल्या रकमेच्या तीन पंचमांश रक्कम आपण खर्च केली असती तर हे समाधानकारक मानता आले असते पण या ठिकाणी दुर्दैवाची गोष्ट अशी की, ॲलोटेड रकमेपैकी टक्केवारीने सर्वात कमी रकमेचा वापर नागरी पाणी पुरवठ्याच्या क्षेत्रात झाला आहे. या ठिकाणी जी रक्कम ठरवून दिलेली होती, त्याच्या १५.८८ टक्केच हे प्रमाण आहे. सर्वात कमी ॲचीव्हमेंट हे नागरी पाणीपुरवठ्याच्या क्षेत्रामध्ये आहे. अध्यक्ष महाराज, या क्षेत्रासाठी १९८५-८६ साली ३० कोटी रुपये आपण वापरले, १९८६-८७ साली २३ कोटी रुपये वापरले त्यानंतर काही नाही व एकूण फक्त १८ टक्क्याचे ॲचीव्हमेंट आपल्याला या तीन वर्षात करता आले. नागरी पाणीपुरवठ्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्यात जो बॅकलॉग

आहे, त्यामध्ये महत्तम बॅकलॉग असलेल्या अमरावती शहराचा प्रश्न सतत या ठिकाणी आम्ही मांडला आहे. **मार्च १९८२ ला दांडेकर समितीने अमरावती या एका शहराचा बॅकलॉग ३२ एम. एल. डी. चा काढला. तो दूर करण्याच्या बाबतीत गेल्या तीन वर्षात सारे प्रयत्न झाल्यानंतरसुद्धा एप्रिल १९८५ ला तो बॅकलॉग ३२ एम. एल. डी. एवढा कायमच होता आणि आज म्हणजे एप्रिल १९८८ मध्ये तो बॅकलॉग ३२ एम. एल. डी. चाच आहे.** एक लिटरचा बॅकलॉग आपण दूर करू शकलो नाही. अध्यक्ष महाराज, बॅकलॉग दूर करण्याची शासनाची जी दिशा आहे ती मोठी दुर्देवी आहे. मला असे वाटते की, नागरी पाणीपुरवठ्याचा बॅकलॉग दूर करण्याचा कोणताही इमानदारीचा प्रयत्न झालेला नाही. **आपल्या राज्यात अमरावती या महानगरपालिकेचा बॅकलॉग सर्वात जास्त आहे आणि सर्वात कमी पर हेड पर डे पाणी उपलब्ध असणारी ही महापालिका आहे.** त्यामध्ये हे शहर ९ महिने १०० टक्के बोअर वॉटरवर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून असलेले शहर आहे. म्हणून या शहराचा बॅकलॉग दूर करण्याचा जो प्रयत्न व्हावयाला पाहिजे, जो प्रयास व्हावयाला पाहिजे तो झाला नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १२ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक १९, पृष्ठ ४०)*

## शहर व जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष

**२१३.** अमरावती शहर व जिल्ह्याच्या स्थितीचे वर्णन मी आपल्या भाषणात पुढील शब्दात केले :

"अध्यक्ष महाराज, हा प्रश्न मी अंदाजपत्रकावरील चर्चेच्या निमित्ताने उपस्थित केला होता. **परंतु त्याचे उत्तर त्यावेळी देण्यात आले नाही. कारण तुम्हाला ते सांगणे गैरसोयीचे आहे. माझी आताही अशी खात्री आहे की, आता सुद्धा तुम्ही या उत्तराच्या भाषणाच्यावेळी त्याचे उत्तर देणार नाही. तरीही मी बोलतो आहे कारण अध्यक्ष महाराज, मला याची खात्री आहे की, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने बोललेला या सभागृहातील एकही शब्द वाया जात नाही. तुम्हाला याचा जबाब द्यावाच लागेल.** अध्यक्ष महाराज, त्या ठिकाणी २०० ते ३०० फूट खाली जाऊन बोअरने पाणी उपसतात त्यामुळे या भागातील खेड्यातील विहिरीमध्ये पाणी राहिलेले नाही. ५-५० किलोमीटरमध्ये हा प्रभाव दिसू लागला आहे. मोर्शीची परिस्थिति भयानक आहे. मोर्शीच्या बाबतीत आपण लक्षवेधी सूचना या ठिकाणी घेतली होती, त्यावेळी असे सांगितले होते की, आठ दिवसात याचे काम सुरू करतो. परंतु आठ दिवस झाले नाही, तेवढ्यातच मध्यप्रदेश सरकारने हत्ती डोहाला सील लावले आहे. आज त्या भागात दम घ्यावयाला फुरसत नाही. **२० ते २५ हजार लोकांवर पाण्यासाठी सैरावैरा धावण्याची पाळी आली आहे. त्या ठिकाणी काय परिस्थिती आहे ते पहा. मोर्शीमध्ये काय परिस्थिती आहे ते आपण पहा. उद्या अमरावतीला तसेच झाले म्हणजे मग लक्ष द्याल काय?** आम्ही जे बोलत आहोत, ते आपण नीट ऐकत नाही. त्याचा विचार करीत नाही. आम्ही सतत यासाठी याठिकाणी प्रश्न मांडतो. अध्यक्ष महाराज, **पालकमंत्र्यांच्या मतदार संघातील गोपाळनगर, रवीकिरण कॉलनी तसेच दसरा मैदानाच्या दोनही बाजूला ज्या सगळ्या वस्त्या आहेत, जेथे पाणीपुरवठा महामंडळाचा पाणी पुरवठा होत नाही असा अमरावती शहराचा सर्व भाग त्या ठिकाणी नगरपालिकेने जे बोअर दिले होते, त्यातील पाणी संपले आहे. अध्यक्ष महाराज, औरंगाबादचे केले, अमरावतीचे केले नाही. ज्या भावनेने आपण हे करीत आहात ते बरोबर नाही.** नागरी पाणीपुरवठ्याच्या बाबतीत योजनेच्या पहिल्या तीन वर्षामधील अॅचीव्हमेंट मी आपल्याला सांगितले आहे ती सर्वात कमी आहे, ज्या महानगरपालिकेचा या बाबतीत सर्वात जास्त अनुशेष आहे. त्याकडे आपण लक्ष दिलेले नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १२ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक १९, पृष्ठ ४०-४१)*

## दरदिवशीचा ३२ दशलक्ष लिटर्सचा अनुशेष दरवर्षी ३२ हजार रुपयांची तरतूद करून दूर करणार काय?

**२१४.** दरदिवशीचा ३२ दशलक्ष लिटर्सचा अनुशेष दरवर्षी ३२ हजार रुपयांची तरतूद करून तुम्ही दूर करणार आहात काय? असा राज्यकर्त्यांना प्रश्न विचारून मी आपले भाषण संपविले ते पुढील शब्दात :-

"अध्यक्ष महाराज, आम्ही या ठिकाणी जे काही प्रश्न मांडतो, चर्चा करतो त्याचा विचार करूनच उत्तरे दिली जावीत अशीच अपेक्षा मी या ठिकाणी करतो. आता या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, बोलाचीच कढी, बोलाचाच भात, जेवोनिया तृप्त कोण झाला? खरं म्हणजे असे बोलणे बरे नाही की कोठे गरज आहे हे न पाहता ज्याला जे सापडेल ते तो घेऊन पळतो. चोराचिया गावी चोरांचा सुकाळ, चोरांचेच बोल, सज्जना काय त्याचे? अशी परिस्थिती झाली आहे. अध्यक्ष महाराज, **नागरी पाणी पुरवठ्याचा हा जो ३२ दशलक्ष लिटर्स दर दिवशीचा बॅकलॉग आहे तो आपण ३२ हजार रुपयात दूर करणार आहात काय? हे बरोबर आहे काय?** मी अशी अपेक्षा करतो की, या वेळेला तरी शासन याचे उत्तर देईल. नाहीतर याचे उत्तर आपल्याला केव्हा तरी द्यावे लागते, या श्रद्धेनेच हा मुद्दा मी या ठिकाणी उपस्थित केला आहे. एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १२ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक १९, पृष्ठ ४१)*

## विदर्भातील "अवर्षणग्रस्त परिस्थिती" वर विधानसभेत चर्चा

**२१५.** इकडे विधानपरिषदेत दिनांक १२ एप्रिल १९८८ रोजी "राज्याच्या सातव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी आढावा" या विषयावरील चर्चेमध्ये मी या प्रश्नावरील तपशीलवार विचार मांडत असतांना त्याच दिवशी तिकडे "विदर्भातील अवर्षणग्रस्त परिस्थिती" वर विधानसभेमध्ये विदर्भातील प्रतिनिधींनी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेमध्ये सुद्धा स्वाभाविकपणे ही **"३२ हजारांची गोष्ट" अनेकांच्या तोंडून निघाली.** या चर्चेची सुरुवात मुर्तीजापूरचे आमदार सुहास तिडके यांनी केली. त्यांनी केलेल्या भाषणात अमरावतीचे हे दुःख अतिशय प्रभावीपणे मांडले ते पुढील शब्दात :

"अध्यक्ष महोदय, सन्माननीय अर्थमंत्र्यांनी आता जे नियोजनावर भाषण केले यासंबंधात मला दुःखाने म्हणावे लागत आहे की, **विदर्भातील पाणी पुरवठा योजनेसाठी यावर्षी ६ कोटीची तरतूद केलेली आहे. या उलट मराठवाड्यामध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी ८३ कोटीची तरतूद केलेली आहे.** अशा प्रकारे असा बॅकलॉग राहिला असून जिथे विदर्भात दुष्काळ आहे त्या ठिकाणी लक्ष दिले जात नाही. अध्यक्ष महोदय, मी उदाहरण म्हणून सांगतो, **अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी जी ५५ कोटीची योजना आहे त्या ठिकाणी ३२ हजार रुपयांची तरतूद केलेली आहे.** अशाप्रकारे विदर्भातील लोकांची थट्टा चालविलेली आहे ती बंद झाली पाहिजे. विदर्भातील जनता सहनशील आहे, या सहनशीलतेचा अंत करणे योग्य होणार नाही. बॅकलॉग आहे, आम्ही पैसे देऊ, असे म्हणून चालणार नाही. औरंगाबादची योजना आहे त्याकरिता किती आर्थिक तरतूद केली आणि अमरावतीच्या योजनेकरिता किती तरतूद केली हे आपणच पहा."

## ५५ कोटी ची योजना असतांना ह्या वर्षी फक्त ३२ हजार रुपये दिलेले आहेत - डॉ. अनिल वऱ्हाडे

**२१६.** याच चर्चेमध्ये भाग घेतांना डॉ. अनिल वऱ्हाडे यांनी अनुशेषाचा मुद्दा, ३२ हजाराची गोष्ट, अमरावती शहरासाठी घ्यावे लागणारे बोअर्स, त्याचा ग्रामीण भागावर होणारा परिणाम याचा अत्यंत प्रभावीपणे ऊहापोह केला, तो पुढील शब्दात :

"विदर्भाला किती मंत्री मिळाले, यावरून विदर्भाच्या अनुशेषाच्या परिस्थितीचा गोषवारा काढला न जाता सद्य परिस्थिती काय आहे? हे आपण पाहिले पाहिजे. विदर्भाच्या लोकप्रतिनिधींनी विदर्भाला किती न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये ते कितपत यशस्वी झाले, याचा आपल्याला विचार करावा लागेल. माननीय सदस्य श्री. सुहास तिडके बोलत असतांना त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा आमच्या जिल्ह्याविषयी दाखवून दिला. अध्यक्ष महाराज, **अमरावतीची पाणी पुरवठ्याची योजना ५५ कोटी रुपयांची असतांना ह्या वर्षी फक्त ३२ हजार रुपये दिलेले आहेत. औरंगाबादची पाणी पुरवठ्याची योजना २७ कोटी रुपयांची असतांना ह्यावर्षी १८ कोटी त्या योजनेवर टाकण्यात आलेले आहेत.** तेव्हा विदर्भाला किती न्याय मिळतो आणि किती न्याय पदरात पाडून घेतो, याचे हे उदाहरण आहे. अध्यक्ष महाराज, आम्ही या ठिकाणी पोटतिडकीने बोलतो. माझ्या मतदारसंघात तीनशे छिद्रे पाडून साऱ्या अमरावती शहराला, पाच लाख लोकवस्तीच्या शहराला पाणीपुरवठा केला जातो. महाराष्ट्रातील या एकमेव शहरात तिनशेच्या वर बोअरवेल्स आहेत. माझ्या मतदारसंघात अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, दर दिवसाला पिण्याच्या पाण्याची पाच-सहा गावे वाढतात. एक बोअरवेल मारली की, ती वर्षानुवर्षे तशीच पडून राहून आटते आणि लोक मग आमदार-खासदार, अधिकारी यांच्या घरावर मोर्चा आणतात."

## "तुम्ही आता तितरबितर झालेले आहात" - भाई सुदाम देशमुख

**२१७.** भाई सुदाम देशमुख हे तर कृतिसमितीचे अध्यक्ष. जे "विचार मांडलेले आहेत त्याचा पुनरुच्चार मी करणार नाही" असे आपल्या भाषणाच्या पहिल्याच वाक्यात सांगून भाईंनी अमरावती जिल्ह्यातील परिस्थितीचे दाहक वर्णन केले, ते पुढील शब्दात :-

"अध्यक्ष महोदय, ४ लाख लोकसंख्येचे एक गाव, ५०० बोअरींगच्या भरोशावर तुम्ही जिवंत ठेवले. गेल्या २५ वर्षात एकही पाणी साठविण्याची योजना केली नाही. सगळे भूगर्भातील पाणी ओक्साबोक्शी करून तुम्ही काढण्यास सुरुवात केली. संत्र्यांच्या बागा भूगर्भातील पाण्यावर, अमरावती शहर भूगर्भाच्या

साठ्यावर, खेड्यातील पाणी पुरवठा भूगर्भातील साठ्यावर, जनावरांना पाणी भूगर्भातील साठ्यावर, काय कोठे आहे तुमचे साठे? आणि आता जेव्हा त्या भूगर्भातील साठ्याने तुम्हाला धोका देण्याचा प्रयत्न केला, तुमची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला, **त्यावेळेस तुम्ही तितरबितर झालेले आहात.** आता तुम्ही व्यवस्था करू शकत नाही. अमरावतीला देखील वहाती नदी पूर्णा आटली आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्याला सांगतो, पुराणामध्ये ऐकले होते, भगिरथाने खालून नदी नेली आणि एकविसाव्या शतकात अमरावती जिल्ह्यामध्ये ५०० बोअरींगने नवीन चमत्कार केला, ही खालून नदी गेली आहे. २० क्युबीक मिलिअन ऑफ वाटर, हे भूगर्भातून चालले आहे. त्यामुळे त्या जिल्ह्यामध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. कोणत्याही खेड्यामध्ये आता पाणी मिळू शकत नाही. ज्या योजना आखल्या होत्या, हे भरवशाचे साठे म्हणून त्या योजना राबविल्या आज त्या फेल झालेल्या आहेत."

**२१८.** विधानसभेमध्ये मंगळवार, दिनांक १२ एप्रिल १९८८ रोजी सुरू झालेली ही चर्चा त्या दिवशी पूर्ण होऊ शकली नाही. ती शनिवार, दिनांक १६ एप्रिल रोजी पूर्ण करावी असा निर्णय सभागृहात घेण्यात आला. शनिवारी महसूल राज्यमंत्री श्री. रोहीदास पाटील यांनी या चर्चेला उत्तर देणारे भाषण केले. आपल्या उत्तराच्या भाषणात "३२ हजाराच्या गोष्टी"ला त्यांनी एका शब्दानेही उत्तर देण्याची गोष्ट काढली नाही. उत्तराच्या भाषणामध्ये एखाद्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे मंत्री जेव्हा टाळतो, तेंव्हा एकतर तो प्रश्न पुरेसा सार्वजनिक महत्त्वाचा नसतो किंवा मंत्र्याजवळ देण्यासारखे उत्तर नसते हेच त्या अनुत्तरातून मिळालेले दुरूत्तर असते. यापेक्षा वेगळा अर्थ त्यातून निघू शकत नाही.

****************************************************

# २०

# *एका लक्षवेधीने ३२ हजार रुपयांची तरतूद १३ कोटी रुपयांवर नेली*

****************************************************

### १९ एप्रिल १९८८ रोजी लक्षवेधी सूचनेवर चर्चा

**२१९.** १९८८ च्या अंदाजपत्रकी अधिवेशनाचा जवळ जवळ १ महिना निघून गेलेला होता. चर्चेतील भाषणांत "३२ हजाराची गोष्ट" तपशीलवार मांडून झाली होती, पण मंत्रिमहोदय त्याबाबत कोणतेही उत्तर देत नव्हते. विधानसभेत नाही, ना विधानपरिषदेत नाही. मंत्रिमहोदयांना प्रश्नोत्तरे टाळता येणार नाही अशा सांसदीय आयुधांचा वापर करणे आवश्यक होते. प्रा. बी. टी. देशमुख व श्री. पु. ब. सोमवंशी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना ही स्वीकृत झालेली होती व ती मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ रोजीच्या विधानपरिषदेच्या कामकाजाच्या क्रमामध्ये दाखविण्यात आली होती. चर्चेतील भाषणाचे स्वरूप वेगळे असते. आम्ही आमचे बोलतो. मंत्री त्यांचे उत्तरादाखल भाषण करतात. उत्तरामध्ये अमुक मुद्याचे उत्तर दिलेच पाहिजे, असे मंत्र्यांवर बंधन नसते. लक्षवेधी सूचना या सांसदीय आयुधाची स्थिती यापेक्षा नेमकी वेगळी असते. निदान तीन दिवस अगोदर निश्चित मुद्यांची नोटीस द्यावी लागते. सूचना मान्य झाल्यास ठरलेल्या दिवशी ती सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर दाखविली जाते. नोटीसमध्ये दिलेल्या निश्चित मुद्यांची माहिती देणारे लेखी निवेदन संबंधित खात्याचे मंत्री करतात व मग त्यानंतर लक्षवेधी सूचनेवरील अनुपूरक चर्चेमध्ये प्रश्न, उपप्रश्न होतात. विचारलेल्या प्रश्नाला व उपप्रश्नाला मंत्र्यांना उत्तरे द्यावी लागतात. मंत्र्यांची बेढब भूमिका उघडी पडल्याने अशा चर्चेमुळे शासनाची नाचक्की जगजाहीर होते. **औरंगाबादच्या तरतुदी, मराठवाड्यातील तरतुदी, या जगजाहीर होणार त्या तुलनेने अमरावती शहराची "३२ हजाराची गोष्ट" जाहीर होणार व आपली फजिती होणार, ही गोष्ट नगरविकास मंत्र्यांना पुरतेपणी कळून चुकली होती व त्यामुळे ते अस्वस्थ होते.**

### ३२ हजाराची गोष्ट 93 कोटीवर गेली

**२२०.** लक्षवेधी सूचना १९ एप्रिल ८८ रोजीच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली होती. त्या दिवशी सकाळी १० वाजताच्या सुमारास पाणी पुरवठा मंडळातील एक ज्येष्ठ अधिकारी श्री. पटवर्धन हे मॅजेस्टिक आमदार निवासातील माझ्या मुक्कामी फोन करून व वेळ घेऊन मला भेटण्यासाठी आले. (अमरावती शहराच्या कठीण परिस्थितीमध्ये अमरावती येथे ते अधिक्षक अभियंता होते व त्यामुळे माझा त्यांचा चांगला परिचय होता.) आल्या आल्याच औपचारिक बोलणे आटोपल्यावर श्री. पटवर्धन यांनी मुख्य विषय काढला. ते म्हणाले "बी. टी. साहेब या योजनेसाठी तुम्ही अनेक दिवसापासून संघर्ष करताहात. आज या विषयावरील लक्षवेधी सभागृहामध्ये चर्चेसाठी आहे. या लक्षवेधीवरील निवेदनाच्या प्रति आम्ही विधानमंडळ सचिवालयात पोचविल्या आहेत. मुळात ३२ हजाराची तरतूद असली तरी गेल्या वर्षीची रक्कम धरून हे काम पुढे सुरू ठेवण्यासाठी १ कोटी ७८ लाख रूपयाचा निधी उपलब्ध आहे. सकाळीच मंत्रिमहोदयांकडील "ब्रिफींग" आटोपले आहे. आज सभागृहामध्ये या विषयावर तंटा होऊ नये, तणाव वाढू नये, नुसती मंत्रिमहोदयांची फजिती केल्याने काय फायदा होईल? यातून काहीतरी मार्ग निघावा असे मला वाटते" त्यावर मी म्हणालो, "पटवर्धन साहेब, तुम्ही अमरावतीला होता. तेथील परिस्थिती तुम्हाला माहीत आहे. कारण नसतांना १० टक्क्याचा घोळ घालून शासनाने एक वर्ष योजना पाडून ठेवली. आता तो घोळ संपला, तर ५५ कोटीच्या योजनेला ३२ हजार रुपयांची तरतूद केली. तुमचे अंदाजपत्रक तर आता सभागृहामध्ये मंजूर होऊन गेले आहे. शासनाने जे करायला नको होते ते करून टाकले आहे. आता आज सभागृहामध्ये आम्हाला जे करायचे ते आम्ही करू, यातून आता काय मार्ग निघणार आहे?"

**२२१.** त्यावर श्री. पटवर्धन म्हणाले "यावर्षामध्ये १३ कोटी रुपये या योजनेवर खर्च करण्याचे नियोजन आपण करू शकतो. कारण अंदाजपत्रकाशिवाय आयुर्विमा महामंडळाकडून येणारे कर्ज राज्यासाठी एकत्रितरीत्या पाणीपुरवठा मंडळाकडे येते व त्याचे वाटप मंडळच करते, त्यातून १३ कोटी रुपये अमरावतीसाठी देता येतील." १३ कोटीची ही गोष्ट ऐकल्याबरोबर मला मोठा अचंबा वाटला. मी म्हणालो "तुमचे मंत्रिमहोदय हे सभागृहामध्ये कबूल करतील काय?" त्यावर पटवर्धन म्हणाले "सरळ 'ब्रिफींग' वरून मी येथे आलो आहे. तुमचे समाधान होणार असेल तर १३ कोटी रुपये या वर्षी खर्ची पडावे असे आश्वासन मंत्रिमहोदयांनी द्यावे. म्हणून आम्ही प्रयत्न करू. सभागृहात आमची फजिती होणार नाही एवढे तुम्ही पहा" त्यावर मी म्हणालो "केवळ सभागृहामध्ये कोणाची फजिती करणे यात आम्हाला काय आनंद आहे? १३ कोटी रुपये यावर्षात योजनेवर खर्च होणार असतील तर ती समाधानाची गोष्ट आहे."

### लक्षवेधी सूचनेचा मसुदा

**२२२.** त्यादिवशी मला फक्त तशी शंका आली होती पण आता मी निश्चितपणे असे म्हणू शकतो की श्री. पटवर्धन हे आपल्या खात्याच्या मंत्र्यांशी व सचिवांशी चर्चा करून व त्यांची पूर्ण परवानगी घेऊनच माझ्याकडे आले होते. हे विधान लक्षात येण्यासाठी प्रत्यक्ष सभागृहात काय झाले ते समजून घेणे आवश्यक आहे. मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये क्रम येताच मी लक्षवेधी सूचना मांडणारे निवेदन केले ते पुढील शब्दात :

"**श्री. बी. टी. देशमुख** (अमरावती विभाग पदवीधर) : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो :

"चार लाख लोकसंख्येच्या अमरावती शहराच्या पाणीपुरवठा योजनेचे पाण्याचे उद्‌भव (सोर्स) या वर्षी नेहमीपेक्षा जास्त वेगाने संपुष्टात येणे, पेढी व पूर्णा नदीचा प्रवाह संपूर्णपणे आटून जाणे, तलावात क्षमतेच्या १५ टक्क्यांपेक्षा सुद्धा कमी पाणी पावसाळ्यात जमा होणे, परिणामी नोव्हेंबर १९८७ पासून पाणी पुरवठ्यासाठी बोअरच्या पाण्याचा उपसा सुरू होणे, त्यापूर्वी कधीही नव्हे इतक्या दीर्घकाळ बोअरवर पाणी पुरवठ्यासाठी संपूर्णपणे विसंबून राहण्याची आलेली पाळी, ४-६ महिन्याच्या सततच्या उपशामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या बोअरची स्थिर पातळी व उपशानंतरची पातळी १५ ते ३० मीटरने खाली जात असल्याने मार्च महिन्यात काही बोअर निकामी होणे व अनेक बोअरचे पाणी कमी कमी होत जाणे, सबब तातडीच्या पाणीपुरवठा योजनेची तत्परतेने बांधणी करण्याची आवश्यकता व त्याबरोबर अप्पर वर्धा धरणातून अमरावती शहराकरिता पाणी पुरवठ्याच्या कामाला वेग देण्याची आवश्यकता व त्याच अनुषंगाने १९८८-८९ या वर्षात ५५ कोटींच्या या योजनेची कोणती कामे हाती घेतली जाणार हे जाणून घेण्यासाठी जनमानसातील आतुरता व शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ २९-३०)*

### शासनाच्या वतीने मंत्रिमहोदयांचे निवेदन

**२२३.** माझ्या या लक्षवेधी सूचनेवर मा. नगरविकास मंत्र्यांनी पुढील प्रमाणे लेखी निवेदन सभागृहाला सादर केले होते.

"**शासनाचे निवेदन** :- अमरावती शहराची सध्याची लोकसंख्या अंदाजे ४ लाख आहे. ह्या लोकसंख्येला पेढी व पूर्णा या नद्या व त्याच भागातील पर्यायी क्रूपनलिका व विंधण विहिरी यावरून पाणीपुरवठा केला जातो. या लोकांना अंदाजे ७५ लिटर दरडोई दरदिनी पाणीपुरवठा होतो.

पेढी, पूर्णा नद्या व छत्री व वडाळी तलाव या उद्‌भवातून उपलब्ध होणारे पाणी हळुहळू कमी होत चालले आहे. म्हणून ८२-८३ ते ८७-८८ काळात ५६

कूपनलिका, १२२ विंधण विहिरी वीज पंपासह व १२० विंधण विहिरी हातपंपासह घेण्यात आल्यात. यातून सध्याचा पूरक पाणीपुरवठा केला जातो. या विंधण विहिरी व कुपनलिकेतील पाणी हळूहळू कमी होत आहे. तसेच काही विंधण विहिरी निकामीही झाल्या आहेत. त्यामुळे अमरावती शहराला १९८८ च्या उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासेल असे वाटते. उन्हाळ्यातही पुरेसा पाणीपुरवठा व्हावा म्हणून रू.८३.३० लाखाची तातडीची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.

या तातडीच्या पाणीपुरवठा योजना व्यतिरिक्त दिनांक २६-१०-८६ रोजी ५५ कोटी रुपये किंमतीची अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा धरण उद्भव धरून योजना मंजूर केली आहे. **अमरावती महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन या योजनेची १० टक्के लोकवर्गणीची रक्कम शासनाने खास बाब म्हणून देण्याचे ठरविले आहे.** या योजनेतील दोन जलकुंभाचे काम प्रगती पथावर आहे. **हे काम पुढे चालू ठेवण्यासाठी १ कोटी ७८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३०)*

## शहराच्या आर्थिक परिस्थितीचा अवमान कारक उल्लेख

**२२४.** मा. मंत्रिमहोदयांच्या या लेखी निवेदनानंतर पहिला प्रश्न विचारण्याची मला संधी होती व "३२ हजाराची गोष्ट" सांगून "१३ कोटीची गोष्ट" काढून घेण्याच्या मनःस्थितीत मी असतांना शासनाच्या लेखी निवेदनातील एका वाक्यामुळे मला कसेसेच वाटले. ते वाक्य पुढील प्रमाणे :- "**अमरावती महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन या योजनेची १० टक्के लोकवर्गणीची रक्कम शासनाने खास बाब म्हणून देण्याचे ठरविले आहे.**" शासनाच्या लेखी निवेदनातील हे वाक्य बिनचुक तर नव्हतेच पण या शहरावर अन्याय करणारे, अपमानजनक व संतापजनक होते. शासनाच्या या वाक्यावर मी प्रखर टिका केली आणि हे वाक्य दुरुस्त करणार काय? असा प्रश्न विचारला तो पुढील शब्दातः-

"**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, मा. मंत्रिमहोदयांना निवेदनाच्या दुसऱ्या पानावर काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** काही दुरुस्ती असेल तर आपण ते सांगा.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, निवेदनाच्या दुसऱ्या पानावर शासनाकडून काहीतरी असत्य विधान आलेले आहे. येथे असे म्हटलेले आहे की, "अमरावती **महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन** या योजनेची १० टक्के लोकवर्गणीची रक्कम शासनाने खास बाब म्हणून देण्याचे ठरविले आहे." यामधील पहिले वाक्य हे धादांत खोटे आहे. सभागृहामध्ये झालेल्या चर्चेकडे दुर्लक्ष करून जे काहीही रेकॉर्डवर नाही असे उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. मला तांत्रिकदृष्ट्या हा वाद करावयाचा नाही. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, ६ मे १९८३ चा शासनाचा जो स्थायी आदेश होता त्यामध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, "१० टक्के लोकवर्गणीची रक्कम योजना महानगरपालीकेची असेल तर महानगरपालिकेने आणि पाणीपुरवठामंडळाची योजना असेल तर पाणीपुरवठा मंडळाने भरावयाची आहे." या सभागृहामध्ये आताच्याच मा. नगरविकास मंत्र्यांनी त्यावेळी असे सांगितले की, "१० टक्के लोकवर्गणी ही पाणीपुरवठा मंडळ भरेल." **त्यांनी सभागृहामध्ये व सभागृहाच्या समितीसमोर अधिकाऱ्यांनी निरनिराळ्या सात वेळा तसे अभिवचन दिलेले होते.** मा. मुख्यमंत्र्यांनी देखील या चर्चेचा सन्मान केला आणि आपल्या जाहीर भाषणांमध्ये त्यांनी सांगितले की, "१० टक्के लोकवर्गणी भरली पाहिजे या मताचा मी आहे. परंतु शब्द सभागृहामध्ये दिला गेलेला आहे म्हणून आम्ही आमचे वचन पाळू." त्या सभेला मा. नगरविकास मंत्री, त्या जिल्ह्याचे पालकमंत्री, विरोधी पक्ष नेते व तेथील सर्व आमदार मंडळीदेखील उपस्थित होती. असे असताना या ठिकाणी मात्र असत्य माहिती दिली जात आहे. मी मघाशीच सांगितले की, मला हा तांत्रिक वाद करावयाचा नाही. परंतु सभागृहामध्ये जी गोष्ट रेकॉर्ड झालेली आहे त्याबाबतीत असत्य कसे काय निवेदनामध्ये येते? मा. मुख्य मंत्रिमहोदयांच्या घोषणेनंतर जी.आर. काढण्यात आला. त्यामध्ये देखील 'खास बाब' एवढाच याचा उल्लेख आहे. या ठिकाणी मात्र घाणेरड्या मनोवृत्तीचे जे प्रदर्शन होत आहे हे बरोबर नाही. सभागृहामध्ये जे बोलले गेले त्याचा, या सभागृहाच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न आहे. हे चुकीचे विधान मा. मंत्रिमहोदय दुरुस्त करणार आहेत का?" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३०-३१)*

## आर्थिक परिस्थितीबाबत उल्लेख दुरूस्त करण्याची मंत्र्यांची तयारी

**२२५.** शासनाने केलेली चूक मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देण्यामध्ये मोठे लक्षणीय यश मिळाले होते. कारण नगरविकास मंत्री श्री. व्ही. सुब्रम्हण्यन यांनी एकदम बचावात्मक पवित्रा घेतला. उक्त प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले :-

"**डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन :** शासनाच्या मनात असे काही नाही. चुकीचे कोणतेही विधान देण्याची माझी इच्छा नाही. या ठिकाणी फक्त स्पेशल केस असेच म्हटलेले आहे. मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख हे केवढे रागावलेले आहेत. या ठिकाणी स्पेशल केस असे म्हटलेले आहे. त्यामुळे यामध्ये काही डिफिकल्टी नाही. **या निवेदनामध्ये जर दुसरा अर्थ निघण्यासारखे काही वाक्य असेल तर ते मी दुरुस्त करू शकतो.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३१)*

एखाद्या शहराला अपमानित करण्याचा शासनाचा हेतू नाही हे स्पष्ट झाल्यामुळे वाक्यरचना दुरुस्त करण्याच्या बाबतीत पुढील औपचारिक संवाद व त्यानंतर ३२ हजाराच्या गोष्टीवरून विचारलेला प्रश्न नमूद असलेले चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :-

"**श्री. बी. टी. देशमुख :** मा. मंत्रिमहोदय हे दुरुस्त करतो असे जर म्हणत असतील तर मग आमचे काही म्हणणे नाही. .....

**डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन :** मा. सदस्यांनीच वाक्य सजेस्ट करावे.

**श्री. बी. टी. देशमुख :** "सभागृहामध्ये देण्यात आलेल्या अभिवचनांचा सन्मान म्हणून ही खास बाब करण्यात आलेली आहे" असे ते दुरुस्त वाक्य असावयास पाहिजे.

**डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन :** आम्ही जे आश्वासन दिलेले आहे त्याच्या मागे आम्ही जाणार नाही. निवेदनातील वाक्य मी दुरुस्त करू शकतो.

**श्री. बी. टी. देशमुख :** मा. मंत्रिमहोदय हे विधान दुरुस्त करतो म्हणतात तर मग माझी काही हरकत नाही. माझे काही म्हणणे नाही. अमरावती शहरासाठी ५५ कोटी रुपयांची योजना मंजूर केलेली आहे. महत्तम बॅकलाग असलेली व सर्वात कमी पाणीपुरवठा पर डे पर हेड असलेली अशी ही महानगरपालिका आहे. **५५ कोटीच्या या योजनेसाठी ३२ हजार रुपये आता या वर्षासाठी मंजूर करण्यात आल्याचे दाखविले आहे. या हिशोबाने विचार केला तर येत्या ५५ वर्षामध्ये तरी ही योजना पूर्ण होईल किंवा नाही याची शंकाच आहे.** हे काम पुढे चालू ठेवण्यासाठी "१ कोटी ७८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध आहे" असे म्हटलेले आहे हे सत्य नाही. १ कोटीचा जी. आर. १९८६ चा आहे. हेच १ कोटी रुपये गेल्या वर्षी दाखविण्यात आलेले आहेत. **ह्यावर्षी किती कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत आणि कोणकोणती कामे पूर्ण करण्यात येणार आहेत? असा माझा प्रश्न आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३१)*

## '३२ हजाराची गोष्ट' सांगून विचारलेल्या प्रश्नाला '१३ कोटीची गोष्ट' नमूद असलेले उत्तर

**२२६.** "३२ हजाराची गोष्ट" सांगून विचारलेल्या माझ्या या पहिल्याच प्रश्नाला नगरविकास मंत्र्यांनी "१३ कोटीची गोष्ट" नमूद असलेले उत्तर दिले ते पुढील शब्दात

"**डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन :** अध्यक्ष महाराज, आता असे म्हणावे लागेल की, मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख हे काहीतरी गफलत करीत आहेत. १ कोटी रुपये आपण ८६ मध्ये सँक्शन केलेले आहेत. काम सुरू आहे, या वर्षी १ कोटी ७८ लाख रुपयांची प्रोव्हीजन केलेली आहे. २०-२२ लाखाचे काम आतापर्यंत झालेले आहे. एलेव्हेटेड रिझर्वायरचे काम आपण पूर्ण करीत आहोत. **५५ कोटी रुपयांच्या या योजनेमधील १३ कोटींची प्रोव्हीजन आपण केलेली आहे.** ५ कोटी रुपयापेक्षा जास्त रक्कम असेल तर गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचे सँक्शन लागते. ते घेण्याचा प्रयत्न आपण करू. मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी प्रोव्हिजनबाबत चिंतीत होऊ नये." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३१)*

२२७. "५५ कोटी रुपयाच्या या योजनेमधील १३ कोटीची प्रोव्हीजन आपण केलेली आहे" असे वाक्य मा. मंत्रिमहोदयांनी वापरले होते ते आणखी पक्के करून घेण्याच्या हेतूने मी स्वतःच आणखी पुढील उपप्रश्न विचारला :-

"**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, माझे म्हणणे असे आहे की, कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये ३२ हजार रुपयांची तरतूद आपण ८८-८९ करिता कशी काय दाखविली आहे? या ठिकाणी दाखविलेली आहे ही रक्कम चुकीने दाखविली असेल तर त्याबाबत मला काहीच म्हणावयाचे नाही. मग तसे स्पष्ट सांगा. मुख्य योजनेवर मला प्रश्न विचारावयाचा आहे. मी जो प्रश्न विचारला होता त्यातील अर्ध्या भागाचे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले. **१३ कोटी रुपये या वर्षी खर्च करू असे आता आपण या ठिकाणी सांगितले. तर मग या १३ कोटी रुपयांमध्ये**

**कोणकोणती कामे हाती घेण्यात येणार आहेत ?"** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३१)*

**"कोणकोणती कामे हाती घेण्यात येणार आहेत?"**
**"जे काही करता येईल ते करू"**

**२२८.** ३२ हजाराची तरतूद कां केली होती? या प्रश्नाचे उत्तर मंत्रिमहोदयांना देता येणे शक्यच नव्हते व त्या प्रश्नाचे उत्तर मिळविण्याची आम्हालाही आता गरज वाटत नव्हती. मुळात १३ कोटीचे नियोजन नव्हतेच, आज सकाळी वेळेवर १३ कोटीची योजना करण्यात आली होती. म्हणूनच "कोणकोणती कामे हाती घेण्यात येणार आहेत?" या प्रश्नाचे नाजूक उत्तर मंत्रिमहोदयांना देता येणे शक्य नव्हते. त्यातूनच "**जे काही करता येईल ते करू**" असे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले ते पुढील शब्दात :-

"**Dr. V. Subramanian :** Sir, formalities for fixing agencies for big pipe-line works will be taken up, pipes to be purchased.....**जे काही करता येईल ते करू. या १३ कोटी रुपयामध्ये अनेक प्रकारची कामे आहेत.** For example, intake works, Raw Water Pumps, Transformer Yards etc. etc. पण माझी सूचना अशी आहे की, हे मॉनीटरिंग करण्याकरिता आपले लोक, या जिल्ह्याचे पालकमंत्री आणि सन्माननीय आमदारांनी काही सूचना दिल्या तर त्या सूचनांचा आम्ही विचार करू." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३२)*

**आणखी दोनवेळा १३ कोटीचा उल्लेख**
**जास्त ठोस शब्दात**

**२२९.** १३ कोटीचा उल्लेख मंत्रिमहोयांच्या उत्तरामध्ये दुसऱ्यांदा आला होता. यानंतर झालेल्या चर्चेत आणखी दोनवेळा १३ कोटीचा उल्लेख आणखी ठोस शब्दात आला ती चर्चा पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख :** माझी अशी भावना आहे की, या वर्षामध्ये आपण कोणती कामे करणार याचे प्लॅनिंग आम्हाला समजायला हवे.

**सभापती :** सूत्रचालन आमदार आणि पालकमंत्री यांनी करावे असे सन्माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगितले आहे. त्यामुळे कामे कोणती करावयाची हे ते ठरवू शकतील.

**श्री. बी. टी. देशमुख :** मग मी कामे कोणती घेणार हा प्रश्न विचारीत नाही. पण या योजनेसाठी या वर्षीच्या अंदाजपत्रकात बजेट प्रोव्हीजन का करण्यात आली नाही?

**डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन :** एकंदर वॉटर सप्लायसाठी आम्ही तरतूद करतो. **या एकंदर तरतुदीमधून १३ कोटी रुपये अंदाजे आम्ही खर्च करू.**

**श्री. दे. मा. कराळे :** हा प्रश्न अनेक वेळा या सभागृहामध्ये चर्चिला गेला आहे. परंतु याबाबतीत शासनाची जी वृत्ती आहे त्यामध्ये मात्र फरक पडलेला नाही.

**Dr. V. Subramanian :** Mr Chairman, Sir, the Hon, member is uncharitable.

**Shri. D.M.Karale :** Sir, I am not uncharitable, I am practical, I am factual. Sir I will also quote the facts, if necessary. अध्यक्ष महाराज, अमरावती शहराला ज्या ठिकाणाहून पाणीपुरवठा केला जातो ते सगळे सोर्स आज ड्राय झालेले आहेत. पुर्णा आणि पेढी या नद्यांमध्येही आता पाणी नाही. त्या ठिकाणी पाण्याची पातळी फारच खाली गेली असल्यामुळे कूपनलिका व विंधण विहिरी यांनाही पाणी नाही. त्यामुळे हीच परिस्थिती यापुढेही राहिली तर येत्या दोन वर्षात अमरावती शहराला पाणीपुरवठा होऊ शकेल असे एकही ठिकाण त्या ठिकाणी रहाणार नाही. म्हणून मला असे सांगावयाचे की, पाण्याचा सोर्स शासनाने निश्चित केलेला आहे. And that is the only source from which the water can be taken. **परंतु अनफार्च्युनेटली काय घडत आहे? वर्धा प्रकल्पामुळे अमरावती शहराला पाणी मिळणार आहे. परंतु या वर्धा प्रकल्पाकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे.** मागच्या वर्षी या वर्धा प्रकल्पामधून अमरावती शहराला पाणीपुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर सुद्धा १९८७-८८ मध्ये तरतूद केलेली सर्व रक्कम शासनाने खर्च केलेली आहे काय किंवा त्यामध्ये काही कपात केली आहे काय? कपात केली असल्यास त्याचा परिणाम काय झाला?

**डॉ. व्ही. सुब्रम्हण्यन :** अध्यक्ष महाराज, वर्धा प्रकल्प हाच एकमेव सोर्स आहे. या प्रकल्पामधून अमरावती शहराला पाणीपुरवठा होणार आहे. **यासाठी ५५ कोटी रुपयांची योजना केली आहे आणि या वर्षी १३ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.** या अप्पर वर्धा प्रकल्पासाठी किती पैसे ठेवण्यात आले आहेत. That is the matter pertaining to the Irrigation Deptt. या वर्षी पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे दोन तातडीच्या पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्या ताबडतोब हाती घेण्यात येतील." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३२)*

**३२ हजाराची गोष्ट ठामपणे १३ कोटीवर गेली**

**२३०.** मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ रोजीच्या या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन काळजीपूर्वक पाहिले तर असे दिसून येते की मूळ १९८८-८९ च्या अंदाजपत्रकात या योजनेसाठी फक्त ३२ हजार रूपयांची तरतूद होती. खुद्द या दिवशीच्या लक्षवेधी सूचनेवरील लेखी निवेदनामध्ये "हे काम पुढे चालू ठेवण्यासाठी १ कोटी ७८ लाख रुपयाचा निधी उपलब्ध आहे" असे मा. मंत्रिमहोदयांनी नमूद केले होते. अशा स्थितीत ८८-८९ या आर्थिक वर्षात १३ कोटी रुपयाची तरतूद केली जाईल असे आश्वासन स्पष्ट शब्दात मा. नगरविकासमंत्र्याकडून एकदा नव्हे तर चारदा या अनुपुरक चर्चेमध्ये नोंदविण्यात आम्हाला यश मिळाले होते. ती चार आश्वासने पुढील प्रमाणे :

*(१) "५५ कोटी रुपयांच्या या योजनेमधील १३ कोटींची प्रोव्हीजन आपण केलेली आहे." (२) "Sir, formalities for fixing agencies for big pipe-line works will be taken up, pipes to be purchased.....जे काही करता येईल ते करू. या १३ कोटी रुपयामध्ये अनेक प्रकारची कामे आहेत." (३) "या एकंदर तरतुदीमधून १३ कोटी रुपये अंदाजे आम्ही खर्च करू." (४) "५५ कोटी रुपयांची योजना केली आहे आणि या वर्षी १३ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे."*

**मुळात अंदाजपत्रकांत ३२ हजाराची तरतूद असलेल्या प्रकल्पावर १३ कोटी रुपये खर्च करण्याची मिळालेली ही आश्वासने हे आमच्या सांसदीय आयुधांच्या वापराला आलेले फार मोठे यश होते.** आता हा प्रकल्प किती दिवसात पूर्ण करणार यासंबंधी काही आश्वासने मिळविता येतात काय? यासाठी प्रा. बी. टी. देशमुख यांनी केलेला प्रयत्न व त्या प्रयत्नाला आलेले यश नमूद असलेली अधिकृत प्रतिवेदनातील चर्चा पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख :** ५५ कोटी रुपयांचे काम आपण किती दिवसांत पूर्ण करणार? "कार्यक्रम अंदाजपत्रक" या पुस्तकात मार्च १९९१ मध्ये पूर्ण करणार असे आपण म्हटले आहे. केवळ अमरावती या एका शहरासाठी गती नाही म्हणून बोअर करून संपूर्ण जिल्ह्याचे पाणी आटविण्याचे काम चालू आहे. पेढी आणि पूर्णा या नद्यांचे पाणी ऑगस्टमध्येच आटते. "५६ कूपनलिका आणि १२२ विंधण विहिरींच्यामार्फत आज त्या ठिकाणी पाणीपुरवठा केला जात आहे. कूपनलिका आणि विंधण विहिरीमधील पाणी हे दिवसेंदिवस कमी कमी होत आहे." हे निवेदनात तुम्ही कबूल केले आहे. त्या भागातील बोअरमुळे गावातील लोकांच्या ३०० च्या जवळपास खाजगी विहिरी आटल्या आहेत. तेव्हा या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की ५५ कोटींची ही योजना किती दिवसामध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.?

**डॉ. व्ही. सुब्रमण्यन :** अध्यक्ष महाराज, जी काही वस्तुस्थिती आहे ती वस्तुस्थिती सांगितलेली आहे आणि त्या वस्तुस्थितीच्या आधारे तातडीची योजना मंजूर केली आहे. ५५ कोटी रुपयांची योजना असून निधीच्या उपलब्धतेनुसार ती योजना पूर्ण होईल. **साधारणपणे १९९३ सालपर्यंत ही योजना पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १९ एप्रिल १९८८ : खंड ८२, क्रमांक २३, पृष्ठ ३३)*

*********************************************

## २१

## प्रकल्पपूर्तीच्या कालखंडाबाबतच्या आश्वासनांचा पाठपुरावा

*********************************************

**प्रकल्पपूर्तीचा कालखंड नमूद असलेले आश्वासन**

**२३१.** उपरोक्त प्रश्नोत्तराने लक्षवेधी सूचनेवरील अनुपुरक चर्चा संपली. "साधारणपणे १९९३ सालपर्यंत ही योजना पूर्ण होईल" **असे जे आश्वासन मा. मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये दिले त्यांचा खूपच प्रभावी व यशस्वी पाठपुरावा आम्ही लोकप्रतिनिधींनी पुढच्या ३-४ वर्षे सभागृहात, आश्वासन समितीसमोर व जिल्हा नियोजन व विकास परिषदेत केला.** परिणामी ठरलेल्या वेळेत योजना पूर्ण व्हावी यासाठी शासनावर वाढता दबाव सतत कसा कायम राहिला व त्याचे खूपच उत्तम परिणाम पुढे कसे दिसून आले याची माहिती पुढील परिच्छेदातून दिलेली आहे.

## जिल्हा नियोजन व विकास परिषदेत पाठपुरावा

**२३२.** अधिवेशन संपवून आम्ही मुंबईहून परत आलो तर जिल्हा नियोजन व विकास परिषदेची बैठक ३० एप्रिल १९८८ रोजी असल्याची सूचना मिळाली. या सभेत उपरोक्त योजनेचा पाठपुरावा करण्याच्या हिशोबाने प्रा. बी. टी. देशमुख व श्री. पु. ब. सोमवंशी यांनी एक ठराव जिल्हाधिकारी यांना सादर केला. ३० एप्रिल १९८८ रोजीच्या च्या बैठकीत जिल्हा नियोजन व विकास परिषदेने हा प्रस्ताव मान्य केला. प्रस्तावाचा मसुदा व सभेचा निर्णय नमूद असलेला जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या कार्यवृत्तातील आवश्यक भाग पुढील प्रमाणे :

"इ.स. १९८८-८९ कार्यक्रम अंदाजपत्रकात स्पष्टपणे नमूद केल्याप्रमाणे अप्पर वर्धा उद्‌भव धरून अमरावती शहरासाठी केलेल्या पाणी पुरवठा योजनेचे काम कोणत्याही परिस्थितीत मार्च ९१ पर्यंत पूर्ण केले जावे. दरदिवशी दरडोई सर्वात कमी पाणी पुरवठा असलेली व पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेली ही महानगरपालिका आहे, शिवाय असलेला पाणी पुरवठा सुद्धा शंभर टक्के कूपनलिकेवर विसंबून असल्यामुळे शक्य झाल्यास मार्च ९१ च्या अगोदर हे काम पूर्ण करण्याचे प्रयत्न केले जावे अशी विनंती महाराष्ट्र शासनास करण्याचे दृष्टीने श्री. बी. टी. देशमुख व श्री. पु. ब. सोमवंशी यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शासनास विनंती करण्याचे सभेने मान्य केले."

## जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या ठरावाचा विधानपरिषदेत पाठपुरावा

**२३३.** प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळालेली होतीच. ८८-८९ या आर्थिक वर्षात १३ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी आश्वासनेही मिळालेली होती. आता यापुढे एका बाजूला सभागृहात, दुसऱ्या बाजूला सभागृहाच्या आश्वासन समितीमध्ये व तिसऱ्या बाजूला जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये सारखेच तरंग उमटतात किंवा नाही हे पहाणे हा मोठ्या उत्सुकतेचा विषय आमच्यासाठी झालेला होता. उपरोक्त ठराव जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये मंजूर झाल्यानंतर ताबडतोबच विधान परिषदेच्या पुढील अधिवेशनामध्ये सर्वश्री. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, राजाभाऊ उदगीरकर यांनी पाठविलेला तारांकित प्रश्न क्रमांक १६४७२ हा सादर करण्यात आला तो पुढील प्रमाणे :

"सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय? :-
१. सन १९८८-८९ च्या कार्यक्रम अंदाजपत्रकातच नमूद केल्याप्रमाणे अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरासाठीच्या पाणी पुरवठा योजनेचे काम कोणत्याही स्थितीत मार्च १९९१ पर्यंत पूर्ण केले जावे व शक्य झाल्यास ते त्यापूर्वी सुद्धा पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा अशी विनंती अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेने दिनांक ३० एप्रिल, १९८८ रोजीच्या बैठकीत एक प्रस्ताव मंजूर करून शासनास केली हे खरे आहे काय? असल्यास ही विनंती करण्याची कोणती कारणे प्रस्तावामध्ये दिली आहेत?

२. सदरहू मागणीबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे व १९८८-८९ या वर्षामध्ये या योजनेचा भाग असलेली रुपये १३ कोटीची कोणकोणती कामे पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे?

३. पाच कोटीपेक्षा जास्त किमतीची ही योजना असल्यामुळे केंद्र शासनाची संमती मिळण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे?

४. केंद्र शासनाची संमती मिळाली असल्यास केव्हा व मिळालेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?"

## प्रश्न अस्वीकृत पण अधिकृत माहिती पदरी पडली

**२३४.** अधिकृत कागदपत्रांचे अवलोकन केले असता या प्रश्नाबाबत विधान मंडळ सचिवालयाने नगरविकास विभागाचा खुलासा मागितला व एका अधिकृत पत्राव्दारे (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे पत्र क्रमांक २७८३२/ई-१ दिनांकीत ६ जुलै १९८८) तो खुलासा विधान मंडळ सचिवालयाने सर्वश्री. बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी व राजाभाऊ उदगिरकर वि. प. स. यांना कळविला. सहाय्यक सचिव महाराष्ट्र विधान मंडळ यांनी आम्हाला पत्र पाठवून असे कळविले की :-

"उपरोक्त प्रश्नाच्या संदर्भात नगरविकास विभागाने खालील खुलासा केला आहे. :-

'तारांकित प्रश्न क्रमांक १६४७२ चा भाग (१) मध्ये म्हटल्याप्रमाणे अमरावती जिल्हा नियोजन व विकास मंडळाने दि. ३०.४.८८ रोजी ठराव पास केला असून तो जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. ३०.५.८८ रोजी शासनास पाठविला आहे असे कळते. परंतु तो शासनास अजून प्राप्त झालेला नाही. अनौपचारिकरीत्या घेतलेल्या प्रतीवरून दिसून येते की, ही विनंती करण्याचे कारण उन्हाळ्यांत अमरावती शहराचा पाणी पुरवठा सर्वस्वी कूपनलिकेवर अवलंबून असल्यामुळे अशी विनंती करण्यात आली आहे.

अमरावती शहराची रु. ५५ कोटी खर्चाची योजना शासनाने दि. २७.१०.१९८६ रोजी मंजूर केली आहे. रुपये १३ कोटी मध्ये खालील कामे करण्याचे प्रस्तावित केले आहे.

१. संप आणि पंप हाऊस

२. पंपींग मेन व ग्रॅव्हीटी मेन

३. सध्या योजनेमधील प्रगतीपथावर असलेल्या पाण्याच्या दोन उंच टाक्या.

अद्याप या योजनेला केंद्र शासनाची मंजुरी मिळावयाची असून मंजुरी मिळविण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. ही योजना मंजूर झालेली असून योजनेतील कांही कामास सुरुवातही झालेली आहे.'

विभागाने केलेला वरील खुलासा पाहाता आपला प्रश्न माननीय सभापतींनी अस्वीकृत केला आहे असे कळविण्याचा मला निदेश आहे."

आमचा प्रश्न जरी अस्वीकृत करण्यात आला होता तरी विधानमंडळ सचिवालयामार्फत अधिकृतपणे आलेल्या नगरविकास विभागाच्या खुलाशामुळे आम्हाला दोन गोष्टी स्पष्टपणे माहीत झाल्या होत्या. **१३ कोटी रुपयात कोणकोणती कामे या वर्षात केली जाणार हे एक व दुसरे म्हणजे अद्याप केंद्र शासनाची मंजूरी मिळावयाची आहे व ती प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.** इकडे १३ ऑगस्ट १९८८ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीमध्ये याबाबत माहितीची मागणी केली असता पाणी पुरवठा मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पुढील प्रमाणे लेखी माहिती सादर केलीः

"ह्या योजनेची किंमत रु. ५ कोटीपेक्षा जास्त असल्याकारणाने त्याला केंद्र शासनाची तांत्रिक मंजूरी आवश्यक आहे. करिता योजनेचा प्री-फिजिबिलीटी रिपोर्ट दि. १.१२.८७ ला केंद्र शासनाकडे सादर करण्यांत आला होता. त्यावर आलेल्या कांही त्रूटी व शेरे यांचे अनुपालन करुन या योजनेचा डिटेल्ड फिजिबिलिटी रिपोर्ट दि. ९.६.८८ रोजी परत केंद्र शासनाकडे सादर करण्यांत आला आहे."

## केंद्र शासनाची मान्यता आली, 13 कोटीच्या खर्चाचे नियोजन मिळाले

**२३५.** जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या १३ ऑगस्ट १९८८ च्या बैठकीत पुढील प्रमाणे अनुपालनाचा ठराव करण्यात आला

"अमरावती शहराकरिता पाणी पुरवठा योजनेतील १३ कोटी रु. ची कोणकोणती कामे ८८-८९ या आर्थिक वर्षात केली जाणार आहेत. याबाबतचे वेळापत्रक नमूद करणारी तपशीलवार टिप्पणी सदस्यांना द्यावी. केंद्र शासनाने ऑगस्ट महिन्यांत दिलेल्या मान्यतेचे तपशील सुद्धा या टिप्पणीत असावे."

जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या या ठरावाप्रमाणे १६ सप्टेबर १९८८ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीत झालेल्या ठरावावरील अनुपालन अहवाल म्हणून एक लेखी टिप्पणी दाखल करून पाणी पुरवठा मंडळाने पुढील प्रमाणे माहीती सादर केली. :-

"अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेची किंमत रु. ५ कोटी पेक्षा जास्त असल्याकारणाने त्याला केंद्र शासनाची तांत्रिक मंजुरी आवश्यक होती. त्यानुसार केंद्र शासनाने वरील योजनेस आदेश क्र. क्यू १२०२०/४/८७-सी. पी. एम. ई. ई. ओ. दि. १०.८.८८ नुसार रुपये ५४.७५ कोटीस तांत्रिक मंजूरी दिली आहे.

**सन १९८८-८९ ह्या वर्षामध्ये ह्या योजनेचा भाग असलेली १३ कोटीची कामे करण्याचे अंदाजिले आहे.** ह्या १३ कोटीच्या रकमेत साधारण खालील प्रमाणे कामांचा अंतर्भाव आहे.

सन १९८८-८९ वर्षात शीर्षकानुसार होणारा अंदाजित अपेक्षित खर्च

| | |
|---|---|
| १. इनटेक वर्क्स | रु. ५० लाख |
| २. रॉ वॉटर कनेक्टींग एम.एस.पाईप | रू. २८ लाख |
| ३. संप आणि पंप हाऊस | रु. ३० लक्ष |
| ४. रॉ वॉटर पंपींग मशिनरी (म.रा.वि.मं.ह्यांचे चार्जेस सह) | रु. ३० लक्ष |
| ५. रॉ वॉटर रायझिंग मेन | रु. ९०२ लक्ष |
| ६. रॉ वॉटर ग्रॅव्हीटी मेन | रु. १५ लक्ष |
| ७. शहरातील वितरण पाण्याच्या टाक्या | रु. ६५ लक्ष |

| | |
|---|---|
| ८. शहरातील टाकी पर्यंतची लिडींग मेन | रु. ८६ लक्ष |
| ९. वितरण व्यवस्था | रु. ८६ लक्ष |
| १०. कॉमन सर्व्हिसेस व क्वार्टर्स | रु. ५२ लक्ष |
| ११, जमीन संपादन व रस्ते | रु. २७ लक्ष |
| एकूण | रुपये १३०० लक्ष" |

केंद्र शासनाची मान्यता १० ऑगस्टला मिळालेली आहे ही आनंदाची गोष्ट जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या सभेत लेखी सादर करण्यात आली होती व सोबतच त्यावर्षात करावयाच्या रुपये १३ कोटी किंमतीच्या कामाचा बारिक-सारिक तपशील देण्यात आला होता.

### ८८ मध्ये ३२ हजाराची तर ८९ मध्ये १६ कोटीची तरतूद

**२३६.** मार्च, एप्रिल १९८९ चे विधानमंडळाचे अंदाजपत्रकीय अधिवेशन मुंबई येथे सुरू झाल्यानंतर या योजनेसाठी १९८९-९० च्या अर्थसंकल्पात किती तरतूद करण्यात येते? हे पहाण्याची आम्हा सर्वांनाच उत्सुकता होती. "नगरविकास विभाग कार्यक्रम अंदाजपत्रक १९८९-९०" या पुस्तकाच्या पृष्ठ १४० वर या योजनेसाठीची आर्थिक तरतूद १६०६.९८ लक्ष रुपये दाखविण्यात आली होती. १९८८-८९ या वर्षीच्या अशा पुस्तकात ३२ हजार रुपये दाखविण्यात आलेले होते हा धसका घेतलेल्या आम्हा विधानमंडळ सदस्यांना रुपये १६ कोटी च्या वर असलेली ही तरतूद समाधानकारक वाटली. या अधिवेशनामध्ये फार काही उठाठेव करण्याची गरज त्यामुळे आम्हाला वाटली नाही.

### जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये चर्चेची नोटीस

**२३७.** विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर दिनांक ९ मे १९८९ रोजी होणाऱ्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीमध्ये पुढील विषय चर्चेसाठी घ्यावा म्हणून मी सूचना दिली. विषयाचा मसुदा पुढील प्रमाणे :-

"अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरासाठी पाणी पुरवठा करण्याच्या योजनेच्या संदर्भात खालील मुद्यावर विभागाने दिलेल्या तपशीलवार टिप्पणीच्या आधारे करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

१. १९८८-८९ या आर्थिक वर्षामध्ये या योजनेचा भाग असलेली कोणकोणती कामे पूर्ण करण्यात आली व या कामावर त्या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष किती खर्च झाला?

२. १९८९-९० या आर्थिक वर्षामध्ये या योजनेचा भाग असलेली कोणकोणती कामे पूर्ण करण्याचे प्रस्तावित केलेले आहे व त्या कामावर येणारा अंदाजित खर्च किती आहे? तसेच या वर्षामध्ये करण्यात आलेली आर्थिक तरतूद किती आहे?"

### १३ कोटीच्या प्रत्यक्ष खर्चाचा हिशेब मिळाला

**२३८.** मी विषयाची पूर्वसूचना दिलेली असल्यामुळे कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी यांनी याबाबतची एक टिप्पणी सदस्यांना सभेपूर्वी वितरित केली होती. १९८८-८९ या वर्षामध्ये करण्यात आलेल्या खर्चाबाबत या टिप्पणीमध्ये पुढील प्रमाणे उल्लेख होता. :-

"ह्या कार्यालयाने जिल्हा नियोजन व विकास परिषदेस ह्या कार्यालयाचे पत्र क्र. ५७५९ दिनांक १४.९.८८ व्दारा १९८८-८९ वर्षात एकूण १३ कोटी रुपये ह्या योजनेवर खर्च केल्या जाईल. असे सादर केले होते. प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचे विवरण खालील प्रमाणे देण्यांत येत आहे. :-

| | खर्च (लक्ष रुपयात) |
|---|---|
| १) इंटेकवेल्स | ४७.०० |
| २) रॉ वॉटर कनेक्टींग मेन | ३०.०० |
| ३) संप ॲंड पंप हाऊस | ६.०० |
| ४) रॉ वॉटर रायझींगमेन | १०८४.०० |
| ५) शहरातील पाण्याच्या उंच टाक्या | ६७.०० |
| ६) वितरण व्यवस्था | ६४.०० |
| एकूण | १२९८.०० |

### अंदाजपत्रकात तरतूद १६ कोटी रुपयाची तयारी मात्र १० कोटीची

**२३९.** गेल्या वर्षी आपण मिळविलेल्या १३ कोटी रुपयाच्या आश्वासनाचा हिशेब घेत असतांना प्रत्यक्ष खर्च १२ कोटी ९८ लाख रुपये झाला ही आम्हाला समाधानाची बाब वाटली. या योजनेच्या विविध उपकामांच्या सद्यःस्थितीची माहिती सुद्धा या टिप्पणीमध्ये दिलेली होती. १९८९-९० च्या कामाविषयी या टिप्पणीमध्ये पुढील प्रमाणे उल्लेख होता :-

"१९८९-९० वर्षामध्ये ह्या योजनेची खाली दर्शविलेली कामे प्रगती पथावर राहतील. व त्यावरील प्रस्तावित खर्च १०.७५ कोटी होईल" व नंतर या टिप्पणीमध्ये निरनिराळ्या ९ उपकामावर १० कोटी ७५ लक्ष कसे खर्च होतील याचे तपशील दिले होते.

### जिल्हा नियोजन व विकास परिषदेचा ठराव

**२४०.** एका बाजूला शासनाने १९८९-९० च्या अंदाजपत्रकामध्ये या योजनेसाठी १६ कोटी ६ लाख रुपयाची तरतूद केली असतांना जिल्हा पातळीवरील अधिकारी मात्र त्या वर्षासाठी फक्त १० कोटी ७५ लाख रुपये खर्चाच्या तयारीत आहेत हे पाहून आम्हा सर्वांना मोठे आश्चर्य वाटले. पाणी पुरवठा विभागाने प्रसृत केलेली टिप्पणी विचारात घेतल्यानंतर मी स्वतः याबाबतचा पुढील ठराव सभेसमोर मांडला :-

"अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहराला वाढीव पाणी पुरवठा करण्याच्या योजनेअंतर्गत १३ कोटी रुपये किंमतीची कामे १९८८-८९ मध्ये करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. विभागाने सादर केलेल्या टिप्पणीवरून असे दिसून येते की, जवळ जवळ १२९८.०० लक्ष रुपये प्रत्यक्ष खर्च झाला आहे. याबाबत ही सभा समाधान व्यक्त करीत आहे. सादर केलेल्या टिप्पणीमध्ये १९८९-९० या आर्थिक वर्षामध्ये १०७५.०० लक्ष रुपयाची कामे प्रस्तावित केल्याचे नमूद आहे. नगर विकास विभागाच्या १९८९-९० च्या कार्यक्रम अंदाजपत्राकाचे अवलोकन केले असता (पृष्ठ १४०-१४१) १९८९-९० या वर्षामध्ये १६०६.९८ लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आल्याचे दिसून येते, हे लक्षात घेता किमान १७ कोटी रुपये किंमतीच्या कामाचे उद्दिष्ट विभागाने समोर ठेवावे व त्याबाबतची तपशीलवार टिप्पणी पुढच्या सभेमध्ये सादर करावी असे ही सभा ठरवित आहे."

### १० कोटीवरुन १६ कोटीची तयारी

**२४१.** मी मांडलेल्या उपरोक्त प्रस्तावाला विधानसभा सदस्य डॉ. देविसिंह शेखावत यांनी अनुमोदन दिले. सविस्तर चर्चेनंतर जिल्हा नियोजन व विकास परिषदेने उक्त ठराव एकमताने मंजूर केला. हा ठराव मंजूर झाल्यामुळे जिल्हा स्तरावरील पाणी पुरवठा मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्याप्रमाणे कारवाई पूर्ण केली. ९ जून १९८९ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीसमोर या अधिकाऱ्यांची एक टिप्पणी ठेवली त्यामध्ये अगदी सुरुवातीलाच असे नमूद करण्यात आले होते की :- "अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेस २७.१०.८६ रोजी महाराष्ट्र शासनाची मंजुरी मिळाली होती. व योजनेस केंद्र सरकारची तांत्रिक मान्यता ऑगस्ट १९८८ मध्ये मिळाली. ती मान्यता मिळाल्यानंतरच ह्या योजनेच्या कामास गती मिळाली. (योजनेची किंमत ५४.७५ कोटी) सन १९८९-९० वर्षामध्ये ह्या योजनेची खाली दर्शविलेली कामे प्रगतीपथावर राहतील व त्यावरील प्रस्तावित खर्च १६.०७ कोटी रुपये एवढा होईल." पुढे याच टिप्पणीमध्ये ज्या निरनिराळ्या १० उपकामावर १६ कोटी ७ लक्ष रुपयाचा हा निधी खर्च होणार होता त्याचे तपशील देण्यात आलेले होते.

**************************************************

## २२

## *प्रकल्पपूर्तीसाठी आश्वासन समितीत पाठपुरावा*

**************************************************

### विधान परिषद आश्वासन समितीने मुद्दे निश्चित केले

**२४२.** ८८-८९ च्या अंदाज पत्रकामध्ये १६.०० कोटी रुपयाची आर्थिक तरतूद या योजनेसाठी उपलब्ध असतांना जिल्हा पातळीवरील अधिकारी मुळात कामाचे नियोजन १०.०० कोटी रुपयाचे करतात व जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव मंजूर झाल्यावर मात्र नंतर १६ कोटीच्या कामाचे नियोजन सादर करतात, ही गोष्ट मनाला समाधान देणारी नव्हती. त्यामुळेच एकदा राज्यपातळीवर याबाबत निश्चित काय स्थिती आहे? हे जाणून घेणे आवश्यक होते व त्याबाबतीत विधानपरिषद आश्वासन समितीच्या माध्यमातून अतिशय प्रभावी कामगिरी झालेली दिसून येते. सन १९८७ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनावरील शासकीय कारवाईची विवरणपत्रे या समितीने आपल्या २० जून १९८९ रोजीच्या बैठकीमध्ये विचारात घेतली. त्यामध्ये या विषयावरील आश्वासन क्रमांक १९, ११४, २२०, २२१, २२२, २२३ वरील कारवाईची विवरणपत्रे विचारात घेतांना समितीने पुढील ५ मुद्यांबाबत नगरविकास विभागाकडून माहिती मागवावी असा निर्णय घेतला :- (१) सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या "कार्यक्रम अंदाजपत्रक १९८८-८९ नगरविकास विभाग भाग (२) नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण" या पुस्तकामध्ये पृष्ठ ५० वर

या योजनेच्या कार्य समाप्तीचे वर्ष (टार्जेट डेट ऑफ कंप्लीशन) मार्च १९९१ दाखविण्यात आलेले आहे.

(२) मार्च १९९१ पावेतो या योजनेचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाने काय नियोजन केलेले आहे याबाबतची तपशीलवार टिप्पणी व पूर्ण करावयाच्या कामाच्या करण्यात आलेल्या वर्षवार आखणीचे तपशील.

(३) या योजनेचा भाग असलेली कोणकोणती कामे १९८८-८९ या वर्षामध्ये पूर्ण करण्यात आली व त्यावर झालेला एकूण खर्च किती याचा तपशील देणारे विवरणपत्र.

(४) १९८९-९० या आर्थिक वर्षामध्ये या योजनेचा भाग असलेली कोणकोणती कामे पूर्ण केली जाणार आहेत व त्यावर अंदाजे किती खर्च होणार आहे याबाबतचा तपशील देणारे विवरणपत्र

(५) उक्त पाणी पुरवठा योजनेचा "फ्लोडायग्राम" नमूद असलेला नकाशा व इंडेक्समॅप व संबंधित योजनेची माहिती देणारे इतर नकाशे यांच्या प्रती १५ दिवसामध्ये समितीच्या माहितीसाठी पाठविण्यात याव्या. *(आश्वासन समिती (वि.प.) १९८९ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ७७-७८)*

## नगरविकास विभागाने मुद्देनिहाय माहिती पाठविली

**२४३.** जून २०, १९८९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये निरनिराळ्या ५ मुद्यांबाबत आश्वासन समितीने नगरविकास विभागाकडून माहिती मागविली होती. नगरविकास विभागाने ४ जुलै १९८९ च्या एका पत्रान्वये मुद्देवार माहिती समितीकडे पाठविली. (म.वि.प. आ. स. विभागांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची सहपत्रपुस्तिका १९८९ पृष्ठ १५३ ते १५६) आश्वासन समितीने उपस्थित केलेला मुद्दा व त्यावर नगरविकास विभागाचे मुद्देनिहाय स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :-

**मुद्दा क्रमांक १** - सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या "कार्यक्रम अंदाज पत्रक १९८८-८९ नगरविकास विभाग (२) नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण" या पुस्तकामध्ये पृष्ठ ५० वर या योजनेच्या कार्यसमाप्तीचे वर्ष (टार्जेट डेट ऑफ कंम्लीशन) मार्च १९९१ दाखविण्यात आलेली आहे.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** १९८८-८९ सालासाठीचे कार्यक्रम अंदाजपत्रक हे मंडळाने १९८७ च्या मध्याच्या सुमारास पाठविलेल्या माहितीनुसार तयार करण्यात आले असून त्या वेळी सदर योजनेचे कार्य त्वरित चालू होईल अशी अपेक्षा होती. **मात्र सदर योजनेची १० टक्के लोकवर्गणी भरण्याबद्दल निर्णय घेण्यास तसेच केंद्र शासनाकडून तांत्रिक मंजुरी मिळण्यास बराच कालावधी लागल्यामुळे कार्यसमाप्तीचे अंदाजलेले वर्षामध्ये (१९९१) आता बदल होणार असून योजनेचे काम १९९२-९३ मध्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.** नंतर १९८९-९० सालासाठी करण्यात आलेल्या कार्यक्रम अंदाजपत्रकात पृष्ठ १४० वर कार्यसमाप्तीचे सुधारित नियोजन वर्ष १९९२-९३ दाखविण्यात आले आहे. योजना पूर्ण होण्यास पूर्वी ठरविल्यापेक्षा होणारा विलंब टाळता येणे शक्य होईल असे वाटत नाही.

**मुद्दा क्र. २** - मार्च १९९१ पावेतो या योजनेचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाने काय नियोजन केले आहे. याबाबतची तपशीलवार टिप्पणी, पूर्ण करावयाच्या कामाच्या करण्यात आलेल्या वर्षवार आखणीचे तपशील.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :-** अमरावती वाढीव पाणी पुरवठा रु. ५५ कोटी किंमतीच्या योजनेस महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र. डब्ल्युएसएस-२०८६/सीआर-२९३/८६/युडी-१६, दि. २७.१०.८६ व्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली. ह्या शासन निर्णयाचे वित्तीय बंधाप्रमाणे १० टक्के लोकवर्गणीची रक्कम अमरावती महानगरपालिकेने भरावयाची होती. **परंतु ती भरण्यास महानगरपालिकेने असमर्थता दर्शवून शासनास लोकवर्गणीची रक्कम खास बाब म्हणून अनुदान स्वरूपात भरण्याची विनंती केली.** एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन शासनाने नगर विकास विभागाच्या निर्णय क्रमांक डब्ल्युएसएस २०८६/सीआर-२९३/८६/युडी-१६, दि. २६.१०.८७ व्दारे लोकवर्गणीची रक्कम खास बाब म्हणून अनुदान स्वरूपात देण्याचे मंजूर केले. **आयुर्विमा महामंडळाचे प्रचलित नियमानुसार ५ कोटी रुपयांवरील योजनांना केंद्र शासनाकडून तांत्रिक मंजुरी मिळाल्याशिवाय कर्ज देण्यात येत नाही.** ही बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून ऑगस्ट १९८८ मध्ये केंद्र शासनाकडून ह्या योजनेस तांत्रिक मंजुरी देण्यात आली. **उपरोक्त निर्देशित केलेल्या बाबींमुळे झालेला उशीर लक्षात घेऊन, ही योजना मार्च १९९१ मध्ये कार्यान्वित करण्याचे जे उद्दिष्ट १९८६ मध्ये नजरेसमोर ठेवले होते व १९८७-८८ मध्ये तयार करण्यात आलेल्या १९८८-८९ सालाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात प्रस्तावित केले होते, ते साधणे आता शक्य होणार नाही.** केंद्र शासनाकडून तांत्रिक मंजुरी देताना योजनेत काही फेरफार सुचविले जातात त्यामुळे उप कामाच्या स्वरूपात फरक पडू शकतो म्हणून या योजनेला तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतर त्या अनुषंगाने ह्या योजनेच्या मुख्य उपांगाची सविस्तर अंदाजपत्रके, आराखडे व निविदा प्रपत्रे तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले. तत्पूर्वी भूसंपादन, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जलवाहिनी टाकण्यास लागणारी परवानगी, शहरातील जलकुंभाच्या निविदा वगैरे कामे हाती घेण्यात आली होती. **या बाबी विचारात घेता ही योजना १९९२-९३ मध्ये कार्यान्वित करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.** सदर कामासाठी आवश्यक निधी व सामुग्री योग्य वेळी मिळेल अशा अपेक्षेने नव्याने नियोजित करून योजना ठरावीक मुदतीने जलद गतीने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सुधारित कार्यक्रम आखला आहे. **त्यानुसार महत्त्वाच्या कामाची कार्यपूर्तीची मर्यादा आता खालीलप्रमाणे ठरविण्यात आली आहे.**

| उपकाम | कार्यपूर्तीचा अपेक्षित महिना |
|---|---|
| १. इन्टेक वर्क : | मार्च १९९१ |
| २. संप व पंप हाऊस : | सप्टेंबर ९० |
| ३. अशुद्ध पाणी उपसा पंप : | डिसेंबर ९१ |
| ४. अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्व वाहिनी : | डिसेंबर ९१ |
| ५. अशुद्ध पाण्याची प्रीस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन : | डिसेंबर ९२ |
| ६. जलशुद्धीकरण केंद्र : | डिसेंबर ९२ |
| ७. शुद्ध पाण्याची (प्रीस्ट्रेस पाईप) वाहिनी : | डिसेंबर ९२ |
| ८. वितरण व्यवस्था व जलकुंभ : | फेब्रुवारी ९३ |

पूर्ण करावयाच्या कामासाठीच्या खर्चाचा वर्षवार नियोजित आखणीचा तपशील खालीलप्रमाणे

| वर्ष | सुरुवातीस झालेला /होणारा अपेक्षित खर्च (कोटी) | वर्षात होणारा खर्च (कोटी) | एकूण खर्च (कोटी) |
|---|---|---|---|
| १९८७-८८ | १.०० | - | १.०० |
| १९८८-८९ | १३.०० | - | १३.०० |
| १९८९-९० | १३.०० | ८.०० | २१.०० |
| १९९०-९१ | २१.०० | १४.०० | ३५.०० |
| १९९१-९२ | ३५.०० | १४.०० | ४९.०० |
| १९९२-९३ | ४९.०० | ६.०० | ५५.०० |

**मुद्दा क्र. ३ :-** या योजनेचा भाग असलेली कोणकोणती कामे १९८८-८९ या वर्षामध्ये पूर्ण करण्यात आली व त्यावर आलेला एकूण खर्च किती याचा तपशील देणारे विवरणपत्र

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :-** या योजनेचा भाग असलेली कोणकोणती कामे १९८८-८९ या वर्षामध्ये करण्यात आली त्याचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**उपकामाचे नाव मार्च १९८९ पर्यंतचा खर्च (लक्ष रुपयात)**

१. इन्टेक वर्क्स : १५ टक्के काम पाटबंधारे विभागातर्फे

करण्यात आले .... .... .... **३८.०० लक्ष रुपये**

२. संप व पंप हाऊस : या कामाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करून त्या अनुषंगाने निविदा बोलावण्यात येऊन कंत्राट देण्यात आले व ५ टक्के बांधकाम पूर्ण करण्यात आले.

३. अशुद्ध पाणी उपसण्यासाठी लागणारे विद्युत पंप या कामासाठी लागणाऱ्या विद्युत पंपाची अंदाजपत्रके तयार करण्यात आलीत व निविदा ऑगस्ट ८९ मध्ये बोलाविण्यात आलेल्या आहेत.

४. अशुद्ध पाण्याची २३ कि. मी. लांबीची १४२२ मी. मी. व्यासाची पोलादी उर्ध्व नलिका (राईझिंग मेन)

अ) ह्या कामासाठी लागणारे संपूर्ण पोलादी पाईप्स स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया या केंद्र शासनाच्या उपक्रमाकडून

घेण्यात आले आहेत .... .... **१२२३.०० लक्ष रुपये**

ब) या कामाचे सर्वेक्षण करण्यात येऊन बांधकामाची सविस्तर अंदाजपत्रके व निविदा पत्रक तयार करण्यात आले व त्या अनुषंगाने निविदा बोलावण्यात येऊन कंत्राटदाराची निश्चिती करण्यात आलेली आहे.

५. अशुद्ध पाण्याची ३३ कि. मी. लांबीची १५०० मी. मी. व्यासाची प्रीस्ट्रेसग्रॅव्हीटी मेन : ह्या कामाचे सर्वेक्षण करण्यात येऊन बांधकामाची सविस्तर अंदाजपत्रके व निविदा प्रपत्र तयार करण्यात आले व त्या अनुषंगाने निविदा बोलावण्यात येऊन उघडण्यात आलेल्या आहे. तसेच कंत्राटदाराची निश्चिती लवकर करण्यात येईल.

६) जलशुद्धीकरण केंद्र क्षमता ९५ दशलक्ष लिटर्स : या कामाचे सर्वेक्षण करण्यात येऊन बांधकामाची सविस्तर अंदाजपत्रके व निविदा पपत्र तयार करण्यात आले आहेत व त्या अनुषंगाने निविदा बोलावण्यात आल्या आहेत. व त्या ऑक्टोबर ८९ मध्ये प्राप्त होतील.

७) शुद्ध पाण्याची जलवाहिनी (फ्रीस्ट्रेस पाईप्स अंदाजे २६ कि.मी. लांबी)

***सर्वेक्षण व अंदाजपत्रके करण्यात आले.***

८) वितरण व्यवस्था व जलकुंभ :- वितरण व्यवस्थेचे सर्वेक्षण व अंदाजपत्रके करण्यात आले. तसेच त्यासाठी लागणारे साधारण ५० टक्के पाईप्स प्राप्त झालेत. .... .... .... २७.०० **लक्ष रुपये**

तसेच वितरण व्यवस्थेअंतर्गत येणाऱ्या दोन जलकुंभाचे काम ८० टक्के पूर्ण करण्यात आले

**एकूण १२९८.०० लक्ष रुपये**

**समजा : १३००.०० लक्ष रुपये**

१९८८-८९ या आर्थिक वर्षात उपरोक्त योजनेसाठी अंदाजे १३ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

**मुद्दा क्रमांक** ४ :- १९८९-९० या आर्थिक वर्षामध्ये या योजनेचा भाग असलेली कोणकोणती कामे पूर्ण केली जाणार आहेत व त्यावर अंदाजे किती खर्च होणार आहे. याबाबतचा तपशील देणारे विवरणपत्र

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण** :- ह्या योजनेच्या कामाची व्याप्ती (स्कोप) मोठी असल्याने या योजनेअंतर्गत सन १९८९-९० वर्षामध्ये या योजनेची खालील दर्शविलेली कामे प्रगतीपथावर रहातील व खाली दर्शविल्याप्रमाणे प्रगती होईल अशी अपेक्षा आहे. १९८९-९० साली या योजनेवर एकूण रु. ८ कोटी खर्च होईल अशी अपेक्षा आहे.

**उपकामाचे नांव (मार्च १९९० पर्यंत अपेक्षित कामाची प्रगती) १९८९-९० वर्षी अपेक्षित खर्च लक्ष रुपये**

१. इन्टेक वर्क्स (६० टक्के) **३० लक्ष रुपये**

२. धरणापासून संप व पंप हाऊस पर्यंत १२५० मि. मि. व्यासाची ६५० मी. लांब पाईप लाईन टाकणे (६० टक्के) **३० लक्ष रुपये**

३. संप व पंप हाऊस व विद्युत बाबींची कामे (९० टक्के) **८० लक्ष रुपये**

४. अशुद्ध पाण्याची २३ कि.मी. लांबीची १४२२ मि.मि. व्यासाची पोलादी उर्ध्व नलिका टाकणे (३० टक्के) **९० लक्ष रुपये**

५. सिंभोरा ते निंभी ॲप्रोच रस्त्याचे काम (९० टक्के) **१२ लक्ष रुपये**

६. अशुद्ध पाण्याची ३३ मि.मि. लांबीची १५०० मि.मि.व्यासाची प्रीस्ट्रेस गुरूत्ववाहीनी (२० टक्के) **२३० लक्ष रुपये**

७. तपोवन येथील जलशुद्धीकरण केंद्र ९५ दशलक्ष लिटर्स (२० टक्के) **५० लक्ष रुपये**

८. तपोवन पासून शहराच्या टाक्यापर्यंत शुद्ध पाण्याची जलवाहिनी टाकणे (१० टक्के) **५० लक्ष रुपये**

९. वितरण व्यवस्था व जलकुंभ (५० टक्के) **२०३ लक्ष रुपये**

१०. भांडारगृह कार्यालय व निवासस्थान (१०० टक्के) **२५ लक्ष रुपये**

**एकूण रु. ८०० लक्ष रुपये**

**मुद्दा क्र. ५** उक्त पाणी पुरवठा फ्लो डायग्राम नमूद असलेला नकाशा व इंडेक्स मॅप व संबंधित योजनेची माहिती देणारे इतर नकाशे.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण** :- संबंधित योजनेच्या फ्लो डायग्राम व इंडेक्स प्लॅन च्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

**२४४.** मागणीदर्शक, इच्छादर्शक, हेतूदर्शक, तक्रारदर्शक ठराव जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये मांडायचा, त्यावर चर्चा घडवून आणावयाची, त्या चर्चेच्या माध्यमातून व त्या चर्चेच्या निमित्ताने जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती मेहनतीने संकलित करावयाची, या ठरावांचा व माहितीचा वापर करून बिनचूक संसदीय आयुधांच्या वापरातून सभागृहात नवीनवी आश्वासने मिळवावयाची, नव्या किंवा पूर्वीच मिळालेल्या आश्वासनाच्या परिपूर्तीसाठी विधानपरिषद आश्वासन समितीमध्ये शासनातर्फे दाखल झालेल्या किंवा शासनाकडून दाखल करवून घेतलेल्या, "आश्वासनावरील शासकीय कारवाईच्या विवरणपत्रा"ची छाननी करतांना प्रकल्प पुढे पुढे जाईल अशी नवी आश्वासने नगरविकास खात्याच्या लक्षात आणून द्यावयाची किंवा नवे मुद्दे तयार करून आणखीची लेखी माहिती मागवावयाची, या माहितीच्या आधारे तसेच आपल्या जवळ असलेल्या माहितीची जोड देऊन आपले माहिती दालन समृद्ध करून घ्यावयाचे, या समृद्धीच्या जोरावर एकएका संसदीय आयुधाला धारदार बनवून प्रकल्प पुढे नेण्याचा जोरदार प्रयत्न करावयाचा, संपूर्णपणे नियमावर आधारित असलेल्या या प्रयत्नांची बैठक सभागृहात मेहनतीने व कष्टाने मिळविलेल्या आश्वासनावर आधारित असल्यामुळे अनेकदा जेरीस आलेल्या खात्याच्या सचिवांच्या व त्यांच्या मंत्रालयातील सहाय्यक अधिकाऱ्यांच्या मनामध्ये "मंत्री तर आश्वासने देऊन बसले व आपल्यामागे लागलेली ही "चलबुलाती" टाळायची असेल तर जे काही करता येईल ते सर्व एकदा करून टाकणे हेच योग्य आहे. उगाच आढवेढे घेण्यात किंवा वेडेवाकडे करण्यात आपले काही खरे नाही" यापेक्षा वेगळी भावना येऊ नये इतका हा प्रयत्न अनेकदा धारदार असायचा. आम्ही लोकप्रतिनिधींनी सर्व अघाडयावर उघडलेल्या या लढाईचा पुढचा भाग म्हणून "सचिवांची साक्ष" व "आश्वासन समितीचा अहवाल" या दोन प्रभावी आयुधांचा वापर यानंतर करण्यात आल्याचे दिसून येईल.

## पाठपुराव्याची उद्दिष्ट्ये

**२४५.** त्या वर्षामध्ये मी स्वतः आश्वासन समितीचा समितीप्रमुख या नात्याने काम करीत असल्यामुळे या एकंदर कामाला मला वेग देता आला. स्पष्ट उद्दिष्ट्ये समोर असल्याशिवाय कोणत्याही कामाला वेग येत नाही. **जी निश्चित उद्दिष्टे समोर ठेवून आम्ही कामाला खूपच वेगाने सुरुवात केली होती. ती उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे होती. :-**

१) ८८-८९ या वर्षामध्ये १३ कोटी रुपये खर्च करण्याचे प्रस्तावित होते तो खर्च तसा प्रत्यक्ष झालेला आहे किंवा नाही याची माहिती नोंदवून घेणे.

२) १९८९-९० या वर्षासाठी अंदाजपत्रकात १६ कोटी ६ लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आलेली होती तेव्हा तेवढा खर्च प्रत्यक्षात होणार आहे काय? त्याबाबत विभागाची काय तयारी आहे? याची नोंद करणे.

३) योजनेच्या कार्यपूर्तीचा निश्चित महिना/वर्ष नगरविकास विभागाने काय ठरविलेले आहे? ते नोंदवून घेणे.

४) या कार्यपूर्तीचे व वर्षवार निधी उपलब्धतेचे काय नियोजन विभागाने केलेले आहे? हे जाणून घेणे.

५) प्रकल्पाचा भाग असलेल्या प्रत्येक उपांगाच्या बांधकामाचे भौतिक नियोजन नगरविकास विभागाने काय केलेले आहे. याची माहिती घेणे.

## विभागाने माहिती सादर केली

**२४६.** उपरोक्त पाचही मुद्याबाबतची तपशीलवार माहिती कागदोपत्री समिती समोर सादर करण्यात आली होती. याबाबत सचिवांना प्रत्यक्ष साक्षीसाठी बोलावून चर्चा करणे, समाधान व खात्री करवून घेणे, याबाबतचे विशेष अभिप्राय तयार करणे, हे अभिप्राय व ही माहिती विधान परिषद आश्वासन समितीच्या अहवालामध्ये समाविष्ट करून तो अहवाल सभागृहाला सादर करणे हे समितीपुढील व समिती सदस्यांपुढील प्रमुख काम होते. एकदा असा मुद्रीत अहवाल सभागृहाला सादर झाला की त्याच्या प्रती लोकप्रतिनिधींना व लोकांना उपलब्ध होतात. एखाद्या योजनेचा पाठपुरावा करण्यासाठीचे अधिकृत मापदंड या स्वरूपात असे अहवाल लोकप्रतिनिधींच्या हातात अलगदपणे येऊन पडतात व त्याचा पुढे हत्यारासारखा उपयोग करता येतो. समितीने मुद्दे पाठविले होते. त्या मुद्दावर नगरविकास विभागाने तपशीलवार माहिती पाठविली होती. **दिनांक २२ ऑगस्ट १९८९ च्या बैठकीत समितीने या विषयावर दिनांक ११ सप्टेबर १९८९ रोजी सचिवांना साक्षीसाठी बोलवावे असा निर्णय घेतला.** *(आश्वासन समिती (वि.प.) १९८९ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १५४)*

## सदस्य सचिवांशी अनौपचारिक चर्चा

**२४७.** प्रत्यक्ष साक्ष सुरू होण्याच्या १ तास अगोदर महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. सुरेश पटवर्धन यांनी माझी विधानभवनातील माझ्या (समिती प्रमुखांच्या) कार्यालयामध्ये फोनने वेळ ठरवून भेट घेतली व अनौपचारिकरित्या नगरविकास विभागाची बाजू त्यांनी माझेसमोर मांडली. या अनौपचारिक चर्चेमध्ये मुख्य मुद्दे दोन होते. पहिला मुद्दा योजनेच्या कार्यपूर्तीचे वर्ष. मुळात १९९१ हे कार्यपूर्तीचे वर्ष ठरविण्यात आले होते ते १९८६ मध्ये

योजनेचे कार्य सुरू होईल असे गृहीत धरून. पण १ वर्षाचा काळ लोकवर्गणीच्या भांडणामध्ये निघून गेला व त्यामुळे आता १९९२-९३ हे प्रकल्पपुर्तीचे वर्ष आम्ही ठरविलेले आहे. या पटवर्धनांच्या म्हणण्यामध्ये मला गैर काहीही वाटत नव्हते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे १९८९-९० या वर्षामध्ये १६ कोटीची अंदाजपत्रकीय तरतूद असतांना प्रत्यक्ष खर्च किती केला जाणार आहे. याबाबतचा होता. या अनौपचारिक बोलण्यामध्ये पटवर्धनांचे म्हणणे असे की "कितीही धावपळ केली तरी यावर्षी ८ कोटी पेक्षा जास्त खर्च आम्हाला करताच येणार नाही." त्यावर मी त्यांना म्हणालो "पटवर्धनसाहेब, तुमच्या जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांनी मुळात १० कोटीचे नियोजन दिले होते पण आता त्यांनी १६ कोटीचे नियोजन तयार केलेले आहे." त्यावर पटवर्धनांचे म्हणणे असे की, "तुम्ही लोकांनी जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये ठराव करुन १६ कोटीचे नियोजन मागितले म्हणून त्याप्रमाणे त्यांनी दिले. पण कुठे तरी खरे सांगितलेच पाहिजे. आम्ही आश्वासन समितीसमोर योग्य तीच माहिती देऊ. खरोखरच आम्ही आठ कोटीच्यावर खर्च करू शकत नाही." पुढे श्री. पटवर्धन यांनी अनौपचारिक बोलण्यात मला असेही सांगितले की, "गेल्या वर्षी आम्ही ३२ हजाराची नाममात्र तरतूद केली होती ती काही चुकीची नव्हती. पण तुमच्या आग्रहामुळे १३ कोटी रुपये खर्च करण्याचे आम्ही कबूल केले व त्याप्रमाणे आम्ही खर्च केला. पण केलेला प्रत्यक्ष खर्च आपण पाहिला तर जवळ जवळ १२ कोटी पेक्षा जास्त रकमेचे आम्ही स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया कडून लोखंडी पाईप घेऊन ठेवले. या पाईपच्या किंमती सतत वाढत जातात, त्यामुळे हे चांगलेच झाले. बांधकामावर खर्च करणे शक्य नव्हते, म्हणून आम्ही साहित्य खरेदीवर खर्च केला. यावर्षी आम्हाला बांधकामावर ८ कोटी पेक्षा जास्त खर्च करणे शक्य होणार नाही." गेल्या वर्षी बडनेरा रेल्वे स्टेशनवर, मालटेकडीजवळ, तपोवन जवळ, मोर्शी रोडने, धरणाजवळ मोठ्या प्रमाणावर पाईप खरेदी करून ठेवण्यात आले होते, हे दृश्य मला डोळ्यासमोर दिसायला लागले. या अनौपचारिक चर्चेत श्री. पटवर्धनांचे म्हणणे खोडून काढता येईल असा कोणताही युक्तिवाद माझ्याजवळ नव्हता.

### आठ कोटीपेक्षा जास्त खर्च होणे नाही

**२४८.** शिवाय गेल्यावर्षी ३२ हजाराची तरतूद १३ कोटी करवून देण्यात याच पटवर्धनांनी महत्त्वाची कामगिरी बजावली होती. इतकेच नव्हेतर १३ कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च करण्यात आले होते. पुढचे कार्यपूर्तीचे आर्थिक व भौतिक नियोजन त्यांनी आमच्यासमोर दाखल केले होते. शिवाय या अनौपचारिक भेटीत त्यांनी मला स्पष्टपणे असेही सांगितले की, "आपण आमच्यावर विश्वास ठेवा. एवढ्या मोठ्या कामात काही अडचण आली तर ४-६ महिने मागे पुढे होऊ शकतात पण शक्यतोवर ठरल्याप्रमाणे ९२- ९३ मध्ये हे काम पूर्ण करण्याचा आम्ही ठाम निर्धार केला आहे. मी स्वतः त्या भागात अधिक्षक अभियंता म्हणून काम केले आहे व अमरावती शहराची याबाबतची हलाखीची स्थिती मला चांगली माहिती आहे." खाजगी चर्चेतील पटवर्धनांचे हे बोलणे मनापासूनचे आहे अशी माझी भावना झाली हे एक व दुसरे असे की, त्यांचा मुद्दा खोडून काढण्यासारखा कोणताही मुद्दा किंवा माहिती माझ्याजवळ नव्हती. त्यामुळे समितीसमोर होणाऱ्या साक्षीतील दमच निघून गेला होता. त्यांचे म्हणणे नोंदवून घेणे एवढेच काम शिल्लक राहीले होते. समितीच्या बैठकीची वेळ झाली समितीप्रमुखांच्या दालनातून आम्ही समितीच्या बैठकीसाठी समिती कक्षात आलो. पुढे झालेल्या औपचारिक साक्षीमध्ये नगरविकास विभागाचे सचिव कमी बोलले. सदस्य सचिव श्री. पटवर्धन यांनीच बहुतेक बोलणे केले असे दिसून येईल.

### आश्वासन समितीसमोरील साक्ष

**२४९.** ठरल्याप्रमाणे ११ सप्टेंबर १९८९ रोजी ही साक्ष विधानभवनमधील समिती कक्षामध्ये झाली. समितीची उपस्थिती पुढील प्रमाणे होती.

१. श्री. बी. टी. देशमुख, वि. प. स. समिती प्रमुख

२. श्री. पंजाबराव देशमुख, वि. प. स.

३. श्री. विजय सावंत, वि. प. स.

४. श्री. ज. य. टेकावडे, वि. प. स. *(आश्वासन समिती (वि.प.) १९८९ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १९८)*

नगरविकास विभागाच्या वतीने विभागाचे सचिव श्री. डी. के. जैन व पाणीपुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. एस. एस. पटवर्धन हे उपस्थित होते. या साक्षीच्या वेळी मुख्यतः दोन मुद्यावर चर्चा झाली. मुळात १९९१ मध्ये योजना पूर्ण करण्याचे ठरले असतांना आता ९२-९३ का म्हणून? व दुसरा मुद्दा म्हणजे १९८९-९० या आर्थिक वर्षात योजनेवर किती खर्च होणार? अंदाज पत्रकात तरतूद जवळजवळ १६ कोटीची, जिल्हा स्तरावर अधिकाऱ्यांनी नियोजन सुरुवातीला १० कोटीचे केलेले, नंतर जिल्हा नियोजन व विकास परिषदेने निदेश दिले म्हणून १६ कोटीची तयारी केलेली पण आता साक्षीच्या वेळी ८ कोटी रुपयाच्यावर आम्हाला खर्च करताच येणार नाही, अशी भूमिका सचिव व सदस्य सचिव यांनी घेतली होती. या साक्षीचे अधिकृत प्रतिवेदन मुळातून वाचले म्हणजे नगरविकास विभागाची भूमिका समजून येईल ते प्रतिवेदन पुढील प्रमाणेः-

"**समिती प्रमुख, श्री. बी. टी. देशमुख :** अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेमध्ये १० टक्के रक्कम महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाने भरण्याबाबत १९८७ च्या दुसऱ्या अधिवेशनामध्ये आश्वासन देण्यात आले होते. त्या संदर्भात समितीने नगर विकास विभागाकडे काही माहिती मागविली होती व त्या माहितीमधील मुद्दा क्रमांक दोन कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "ह्या शासन निर्णयाचे वित्तीय बंधाप्रमाणे १० टक्के लोक वर्गणीची रक्कम अमरावती नगरपालिकेने भरावयाची होती परंतु ती भरण्यास महानगरपालिकेने असमर्थता दर्शवून शासनास लोक वर्गणीची रक्कम खास बाब म्हणून अनुदान स्वरुपात भरण्याची विनंती केली." हे वाक्य बरोबर आहे काय? पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ हे पैसे भरेल अशा प्रकारे शासनाचा जी.आर. १९८३ चा होता.

**श्री. एस. एस. पटवर्धन, सदस्य सचिव (म.रा.पा.पु.मंडळ) :** "परंतु ती भरण्यास महानगरपालिकेने असमर्थता दर्शवून शासनास लोकवर्गणीची रक्कम खास बाब म्हणून अनुदान स्वरूपात भरण्याची विनंती केली" हे वाक्य काढून टाकण्यात यावे.

**समिती प्रमुख, श्री. बी. टी. देशमुख :** या बाबतीत आपण जी टारगेट डेट दिली आहे ती १९९१ वरून १९९२ दिली आहे. या बाबतीत हा जो विलंब झाला आहे तो लक्षात घेता, ही टारगेट डेट फार पुढे गेली असे आपल्याला वाटत नाही काय?

**श्री. एस. एस. पटवर्धन , सदस्य सचिव (म.रा.पा.पु.मंडळ) :** १९८६ चे पहिले अॅप्रुव्हल होते. दुसरी गोष्ट अशी की हा प्रकल्प फार मोठा आहे आणि या संदर्भात अनेक अडचणी आमच्यापुढे होत्या. एक तर एवढी मोठी योजना पहिल्यानेच आम्ही हाती घेत आहोत. यासाठी मोठ्या डायमिटरचे पाईप्स वापरावे लागतात. **या बाबतीत केंद्र सरकारकडून जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत एल. आय. सी. काहीही कमिटमेंट देत नाही. तर एल. आय. सी. ची अशी कंडिशन आहे की पाच कोटी रुपयांच्या वरच्या ज्या योजना आहेत त्यासाठी केंद्र सरकारकडून क्लिअरन्स यावयाला पाहिजे.** केंद्र सरकारकडून टेक्निकल क्लिअरन्स १० ऑगस्ट १९८८ ला आला त्यामुळे सर्वच प्रोग्रॅम पुढे गेला. आता आपण इन्टेक वेलचे काम चालू ठेवले आहे, पाईप्सचेही काम चालू ठेवले आहे. पावसाळा संपत आल्यामुळे इतर कामेही आता हाती घेता येतील.

**समिती प्रमुख, श्री. बी. टी. देशमुख :** १९८९-९० मध्ये आपण यासाठी किती बजेट प्रोव्हीजन केली आहे?यासाठी या वर्षी आपण १६ कोटी रुपयांचा बजेट प्रोव्हीजन केली आहे हे खरे आहे काय?

**श्री. एस. एस. पटवर्धन, सदस्य सचिव (म. रा. पा. पु. मंडळ) :** परफॉर्मन्स बजेटमध्ये ही फिगर आली आहे. ही गोष्ट खरी आहे. पण मी मघाशी आपल्याला सांगितले त्याप्रमाणे या योजनेसाठी आपल्याला मोठ्या पाईपलाईनची गरज भासणार आहे. तसेच यासाठी स्टील पाईप्स न वापरता प्री स्ट्रेस्ड पाईप्स वापरावेत अशा केंद्र सरकारच्या सूचना आहेत. स्टील पाईप्स टाकण्यासाठी सुरुवातीला खर्च जरी जास्त येत असला तरी पुढे मेन्टनन्सचा खर्च जास्त येत नाही. पण यासाठी प्री स्ट्रेस्ड पाईप्स वापरण्यात यावेत असे सांगण्यात आले आहे. त्यासाठी आम्ही तीन कॉन्ट्रॅक्टस दिली आहेत. त्यातील एक १८ टक्के अबाव्ह असून बाकीची आपल्या मर्यादेमध्ये आहेत. **प्री स्ट्रेस्ड पाईपलाईनच्या बाबतीत अडचण अशी आहे की आपल्याला विशिष्ट स्वरुपात पाईप्स, मोठ्या डायमिटरचे पाईप्स लागणार असल्यामुळे ऑर्डर दिली आणि ते लगेच तयार करून मिळाले अशी परिस्थिती नाही. त्यासाठी फॅक्टरी शॉप तयार करून त्याचे उत्पादन करावे लागेल, त्यासाठी मिनीमम वेळ लागेल.** हे सर्व लक्षात घेता आज आपण ८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे.

**समिती प्रमुख, श्री. बी. टी. देशमुख :** सन १९८८-८९ मध्ये १३ कोटी रुपयांचा खर्च झाला. या वर्षी १६ कोटी रुपयांची प्रोव्हीजन आहे आणि खर्च ८ कोटी रुपयांचा धरला आहे. हे आपल्याला रिझनेबल वाटते काय? ही प्रगती म्हणावयाची की पुच्छगती म्हणावयाची?

**श्री. एस. एस. पटवर्धन, सदस्य सचिव (म. रा. पा. पु. मंडळ) :** मी आपल्याला सांगितल्याप्रमाणे हे काम एकदम होणारे नाही, याला काही वेळ लागेल, त्यामुळे या वर्षात थोडा खर्च कमी होईल. तसेच यामध्ये विविध कॉम्पोनंटस् आहेत, ग्रॅन्ट इन एड, म्युनिसिपालिटीज्, एल.आय.सी. असे विविध काम्पोनंटस् यात आहेत, पण इतर काम्पोनंटस् बजेटमध्ये येत नाहीत.

**समिती प्रमुख, श्री. बी. टी. देशमुख :** तरी मुळ प्रश्नाचे निराकरण होत

नाही. आपण १६ कोटीची प्रोव्हीजन कशाच्या आधारे केली? आपल्या दृष्टीने आठ कोटी खर्च योग्य असेल तर मग ही बाब रि-एक्झॅमिन करण्याची गरज आहे काय?

**श्री. डी. के. जैन, सचिव नगर विकास विभाग :** मी आपल्या निदर्शनास ही बाब आणून देऊ इच्छितो की, या वर्षी आठ कोटी रुपये खर्च होणार आहेत की १० कोटी खर्च होणार आहेत हा यातला महत्त्वाचा भाग नाही, आपण ज्यावेळी संपूर्ण योजनेचा विचार करतो त्यावेळी दिलेल्या मुदतीत आपण ही योजना पूर्ण करू शकतो की नाही? हे पाहणे महत्त्वाचे आहे. मी तर अशीही विचारणा केली होती की आपण १९९२ चे टारगेट दिले आहे, पण हा कालावधी आपण सहा महिने अगोदर आणू शकतो काय ? पण मघाशी श्री. पटवर्धन साहेबांनी ज्या डिफिकल्टीज् सांगितल्या त्या लक्षात घेता ते शक्य नाही. तरी एकूण योजना आणि आपले टारगेट याचा विचार करता तेवढ्या वेळात ती योजना, खर्च होणे आणि त्या संपूर्ण काळासाठी तरतूद करण्यात आलेला पैसा खर्च होणे हे महत्त्वाचे आहे असे मला वाटते.

**समिति प्रमुख, श्री. बी. टी. देशमुख :** या दोहोमध्ये दुप्पटीचा फरक आहे तो कमी करता येतो काय या दृष्टीने आम्ही हा मुद्दा उपस्थित केला.

**श्री. डी. के. जैन, सचिव नगर विकास विभाग :** टोटल स्कीम पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यात काहीच फरक पडत नाही."

### आश्वासन समितीचे विशेष अभिप्राय

**२५०.** पुढे २० डिसेंबर १९९० रोजी सभागृहाला सादर झालेल्या विधानपरिषद आश्वासन समितीच्या अहवाल क्रमांक १०२ च्या परिशिष्ट ९ मध्ये उपरोक्त ५ मुद्याबाबत नगरविकास विभागाने सादर केलेली माहिती समाविष्ट असून या अहवालाच्या परिच्छेद १९ ते २३ मध्ये समितीचे विशेष अभिप्राय समाविष्ट आहेत. विधानपरिषद आश्वासन समितीने या विषयावर जे विशेष अभिप्राय व्यक्त केले होते त्यातील परिच्छेद २१ ते २३ मध्ये समितीने असे नमूद केले होते की :

"२१. दिनांक ११ सप्टेंबर १९८९ रोजी विधान परिषद आश्वासन समितीसमोर विभागीय सचिव व सदस्य सचिव, पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ यांनी साक्षीच्या वेळी या मुद्यांना विभागातर्फे दिलेल्या माहितीची कागदपत्रे या अहवालाच्या परिशिष्ट नऊमध्ये समाविष्ट केलेली आहे.

२२. कार्यक्रम अंदाजपत्रक १९८८-८९ नगरविकास विभाग -२ नागरी पाणीपुरवठा व जलनिःसारण" या प्रकाशनामध्ये पृष्ठ ५० वर या योजनेच्या कार्य समाप्तीचे वर्ष मार्च १९९१ हे दाखविले आहे. तसे ते याप्रमाणे पूर्ण होणार आहे काय? अशा प्रकारची जी विचारणा समितीने केली होती त्याला विभागाने दिलेले उत्तर असे की, "सदर योजनेची १० टक्के लोकवर्गणीची रक्कम भरण्याबद्दल निर्णय घेण्यास तसेच केंद्र सरकारकडून तांत्रिक मंजूरी मिळण्यास बराच कालावधी लागल्यामुळे कार्य समाप्तीच्या अंदाजिलेल्या वर्षामध्ये (१९९१) आता बदल होणार असून कार्य समाप्तीचे काम १९९२-९३ मध्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

२३. सन १९८८-८९ या वर्षामध्ये या योजनेच्या कामावर प्रत्यक्ष करण्यात आलेल्या १३ कोटी रूपये खर्चाचा तपशील तसेच या संपूर्ण योजनेचे काम १९९२ च्या डिसेंबर महिन्यापर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन समितीसमोर विभागाने दाखल केले आहे. वितरण व्यवस्था व जलकुंभाचे काम १९९३ च्या फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित केले आहे. **पूर्ण करावयाच्या कामासाठी खर्चाच्या वर्षवार नियोजित आखणीचा तपशील सुद्धा विभागाने समितीसमोर सादर केलेला आहे. विभागाने कागदोपत्री दाखल केलेले व परिशिष्ट नऊ मध्ये समाविष्ट असलेले कार्यपूर्तीचे हे नियोजन समाधानकारक असून त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे वेळापत्रक काटेकोरपणे पालन करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे."**

### योजनेच्या उद्‌भवावर संकट

**२५१.** कोणत्याही शहराची पाणीपुरवठा योजना म्हटली की त्या "योजनेचा उद्‌भव" हे त्या प्रकल्पाचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग असते. अमरावती शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी अप्पर वर्धा धरणाची उद्‌भव म्हणून योजना करण्यात आली होती. अनुशेषात असलेल्या अविकसित भागातील प्रकल्पांना फार कमी निधी उपलब्ध करून देणे, वर्षाच्या शेवटी तो सुद्धा कपात करून विकसित भागात पळविणे, लहानमोठे निमित्त काढून काम बंद पाडणे, काम बंद पाडल्यावर कंत्राटदार, त्याचे मनुष्यबळ, साधनसामुग्री विकसित भागात पळविणे, लवादांकडे प्रकरण नेण्यासाठी नाना निमित्तांची तजवीज करणे या सारख्या कारवायांना सतत या प्रकल्पाला बळी पडावे लागले. सन १९८३ ते १९९३ या दहा वर्षाच्या कालखंडात किमान २२ वेळा हा प्रश्न विधान परिषदेत चर्चेला आला. अप्पर वर्धा प्रकल्पाचा हा पाठपुरावा एका स्वतंत्र लेखमालेचा विषय आहे. मात्र एका बाजूला अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामाचा १९९० या वर्षामध्ये वर प्रमाणे समाधानकारक पाठपुरावा चालू असतांना या योजनेचा उद्‌भव असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या बांधकामावर एकाएकी फार मोठे असे "सुलतानी संकट" आले त्याची माहिती या ठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते.

*************************************************

## २३
## वनविभागाच्या अधिकाऱ्यांचा कमालीचा खोडसाळपणा

*************************************************

### वन अधिकाऱ्यांनी काम बंद पाडले

**२५२.** मार्च १९९० च्या १५ तारखेला वन विभागाच्या एका बड्या अधिकाऱ्याने अप्पर वर्धा धरणाच्या प्रकल्प स्थळाला आपल्या ताफ्यासह भेट दिली आणि "वनकायद्यांचा आपण भंग करीत आहात. त्याबद्दल १५ दिवसाच्या साध्या कैदेची सजा होऊ शकते. हे काम ताबडतोब बंद करा" अशा नोटीसा पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यावर बजावल्या. ४००-५०० मजूर कामावरून बंद करून कंत्राटदाराला आपला मुक्काम हलवावा लागला व ते काम बंद पडले. १५ मार्च ते २० मार्च १९९० च्या दरम्यान हे काम बंद पडले आहे अशा बातम्या त्यावेळच्या वृत्तपत्रातून येऊन गेल्या. यापूर्वी सुद्धा वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना या कायद्याचा भंग झाल्यास १५ दिवसाच्या साध्या कैदेची शिक्षा होऊ शकते असे धमकीवजा पत्र पाठविले होते.

### लाभ क्षेत्रातील ५ टक्के जमीन ओलीताच्या फुकट सोईसह वन उभारण्यासाठी द्या

**२५३.** "**लाभक्षेत्रातील ५ टक्के जमीन ओलीताच्या फुकट सोयीसह वन उभारणीसाठी देण्यात यावी**" अशा प्रकारची अट केंद्र सरकारने टाकलेली आहे व तिचे पालन केल्याशिवाय केंद्र सरकारची मान्यता मिळणार नाही असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविले. स्वाभाविकपणे १५ ते २० मार्चच्या दरम्यान वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ५ टक्के जमिनीचे हे आदेश दिल्याची जी बातमी बाहेर आली त्यामुळे एक प्रकारचे चिंतेचे वातावरण निर्माण झाले. **लाभक्षेत्रातील ओलीताखाली येणाऱ्या जमिनीतून ५ टक्के जमीन विकत घ्यावयाची म्हणजे यासाठी लक्षावधी रुपयाची तरतूद उपलब्ध करावी लागणार. ही तरतूद कोण उपलब्ध करून देणार व ती केव्हा उपलब्ध होणार?** शिवाय ही तरतूद उपलब्ध झाल्यानंतर पाटाच्या पाण्याने आपली जमीन भिजेल या आशेने मोहरलेली मने त्यातून ५ टक्के जमीन द्यायला कशी तयार होतील? सक्तीने भूसंपादन करावयाचे म्हटले तर १० ते १५ वर्षे एवढा काळ लागेल. शिवाय या अटीची पूर्तता झाली नाही तर केंद्र सरकारची मान्यता मिळणार नाही व तोवर धरणाचे काम बंद ठेवण्याचे वन अधिकाऱ्यांनी दिलेले हुकूम हा मोठा चिंतेचाच विषय झाला.

### धरणाचे काम बंद पडण्याचे दुष्परिणाम

**२५४.** १५ ते २० मार्चच्या दरम्यान ज्यावेळेला ह्या बातम्या कानावर आल्यात त्यावेळेला मन अतिशय सुन्न झाले. पेढी आणि पूर्णेचे प्रवाह ८-८ महिने आटलेले असतात. वर्धेच्या पात्रातील प्रवाह त्यावेळी वर्षातून चारसहा महिने संपुष्टात आल्यासारखा असायचा. वर्धेचा डोह उद्‌भव धरून बांधण्यात आलेल्या धामणगांव पाणी पुरवठा योजनेसाठी वर्धेच्या प्रवाहातून पाणी मिळू शकत नाही अशी त्यावेळी स्थिती होती. **धरणाचे काम पूर्ण झाले तर मोर्शीच्या पाणी पुरवठ्याची विहीर काही फूट पाण्याखाली रहाणार, पण त्या विहिरीमध्ये त्यावेळी सालबर्डी परिसरात बोअर करून व माडू नदीमध्ये नाली करून पाणी आणावे लागत होते व त्यावर दरवर्षी लक्षावधी रुपये खर्च होत होते.** अप्पर वर्धा धरणाचे काम यावर्षी पुरे होईल, पुढच्या वर्षी पुरे होईल या आशेमुळे तातडीच्या मोर्शी पाणी पुरवठा योजनेवर दरवर्षी हजारो रुपये खर्च होत होते. हे धरणाचे काम एवढे लांबणार आहे याची जाणीव असती तर ठाणाठुणीवरून पाईपलाईनव्दारे पाणी आणणे स्वस्त पडले असते हे मत तज्ञांनी त्या पूर्वीच व्यक्त केले होते. तत्पूर्वीच्या ५-६ वर्षामध्ये अमरावती पाणी पुरवठ्याचा तातडीच्या योजनेवर जवळ जवळ ८ ते ९ कोटी रुपये खर्च झाले होते. अप्पर वर्धा धरणाचे काम आता बंद पडले तर त्यातून केवढा मोठा हाहाक्कार निर्माण होईल याची नुसती कल्पना केल्याने सुद्धा अंगावर शहारे येत होते.

### अगोदरच विलंब झालेले काम पुन्हा बंद पडण्याची आपती

२५५. एकही मोठा प्रकल्प नसलेल्या अमरावती जिल्ह्यामध्ये हा मोठा प्रकल्प तयार होईल म्हणून पिण्याच्या पाण्यासाठी तहानलेल्या शहरांची व खेड्यांची जी स्थिती होती त्यापेक्षा वाईट स्थिती या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष ओलीताची सोय होईल व पाण्याची पातळी वाढेल अशी आशा लावून बसलेल्या कास्तकाराची होती. पाण्याची पातळी वाढेल अशी आशा लावून बसलेले अनेक बगिचे सुकून गेले होते. विहिरी खोल करण्याची किंवा खोल बोअर करून पाण्याचा उपसा करण्याची आर्थिक शक्ती नसल्यामुळे पाटाच्या पाण्याची अमर्याद वाट पाहण्याचे दुर्भाग्य या शेकडो कास्तकारांच्या नशिबी आले होते. **अमरावती व वर्धा जिल्ह्याच्या काही भागाला पाटाच्या पाण्याअभावी अस्वस्थ करून सोडणारे अगोदरच विलंब झालेले या प्रकल्पाचे काम आता बंद करण्याचे आदेश झालेले आहेत हे ऐकून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला.**

### वनखात्याचा गलथानपणा

२५६. दिनांक २१ मार्च, १९९० पासून महाराष्ट्र विधानपरिषदेचे दुसरे अधिवेशन सुरू झाले. १२ दिवसाच्या या अधिवेशनात निरनिराळ्या चार वेळेला हा प्रश्न सभागृहात चर्चेसाठी आला. प्रा. बी. टी. देशमुख व पु. ब. सोमवंशी याचा तारांकित प्रश्न क्रमांक ५७४ हा दि. २८ मार्च, १९९० रोजी सभागृहामध्ये उत्तरासाठी होता. "केंद्र शासनाकडून निर्वनिकरणाच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली नसल्यामुळे अप्पर वर्धा प्रकल्पाच्या मध्यवर्ती उत्प्लव मार्गाचे काम अर्धवट अवस्थेत पडून असल्यामुळे केंद्र शासनाच्या आक्षेपाची पूर्तता करुन पाठविलेल्या सुधारीत प्रस्तावास केंद्राची मंजुरी मिळविण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्न भाग १ ला पाटबंधारे मंत्र्यांच्या वतीने पुढील उत्तर देण्यात आले होते. "उर्ध्व वर्धा प्रकल्पाचा परिपूर्ण प्रस्ताव फेब्रुवारी १९८९ मध्ये महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनास सादर केला होता. त्यावरील आक्षेपाची पूर्तता करुन आवश्यक ती माहिती उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे अधिकाऱ्यांनी ऑक्टोबर १९८९ मध्ये केंद्र शासनास सादर केलेली आहे. तथापि, वनखात्यात अजून त्याची छाननी चालू असून त्यांचेकडून ही माहिती केंद्र शासनास पाठवावयाची आहे. केंद्र शासनाची मंजूरी लवकर प्राप्त करण्याच्या दृष्टीने सतत पाठपुरावा करण्यात येत आहे." "सुधारीत प्रस्तावास अजूनही केंद्र शासनाची मान्यता मिळाली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग २ ला "महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवितांना त्याची वन विभागाच्या निम्न स्तरावरील अधिकाऱ्यांपासून उच्च स्तरापर्यंत टप्प्याटप्प्याने बारकाईने तपासणी होते व तपासणीअंती प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र शासनाला सादर केला जातो. या दीर्घ प्रक्रियेमुळे मंजुरी मिळण्यास विलंब होतो." असे उत्तर शासनातर्फे देण्यात आले होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक २८ मार्च १९९० : खंड ८९, क्रमांक ४, पृष्ठ ९)*

### ५ टक्के जमिनीची अट केंद्र शासनाची आहे - राज्यमंत्री

२५७. या प्रश्नावरील अनुपुरक चर्चा सभागृहामध्ये सुरु झाली तेव्हा याबाबतची तपशीलवार माहिती देऊन प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारलेल्या पहिलाच उपप्रश्न व पाटबंधारे राज्यमंत्री श्री.रणजित देशमुख यांनी दिलेले तपशीलवार उत्तर नमूद असलेले सभागृहाच्या कामकाजाचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे. :

"**श्री. बी. टी. देशमुख :-** अध्यक्ष महाराज, या संदर्भात मला एकूण तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "उर्ध्व वर्धा प्रकल्पाचा परिपूर्ण प्रस्ताव फेब्रुवारी १९८९ मध्ये महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनास सादर केला होता. त्यावरील आक्षेपांची पूर्तता करुन आवश्यक ती माहिती उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे अधिकाऱ्यांनी ऑक्टोबर १९८९ मध्ये केंद्र शासनास सादर केलेली आहे. तथापि, वन खात्यात अजून त्याची छाननी चालू असून त्यांचेकडून ही माहिती केंद्र शासनास पाठवावयाची आहे." त्यांनतर दुसऱ्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्याची वन विभागाच्या निम्न स्तरावरील अधिकाऱ्यांपासून उच्च स्तरापर्यंत टप्प्याटप्प्याने बारकाईने तपासणी होते व तपासणीअंती प्रस्ताव मान्यतेसाठी केद्र शासनाला सादर केला जातो. या दीर्घ प्रक्रियेमुळे मंजूरी मिळण्यास विलंब होतो." या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, वन खात्याचे अधिकारी परदेशाच्या परराष्ट्र विभागासारखे किंवा परदेशातील अधिकाऱ्यांसारखे वागतात. यामध्ये ते सहकार्य करीत नाहीत. दोन वर्ष बंद पडलेले हे काम माननीय मंत्रिमहोदयांनी मागच्या वेळी सभागृहात सांगितल्याप्रमाणे सुरू झाले आणि त्या कामाला चांगली प्रगती आली असताना या मार्चच्या १६ तारखेला वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी हे काम बंद करण्यात यावे अशी नोटीस दिली आहे. टप्प्याटप्प्याने बारकाईने तपासणी जेव्हा करावयाची असेल तेव्हा करा परंतु वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी जे आता लेखी कळविलेले आहे त्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. त्या पत्रात त्यांनी असेही म्हटलेले आहे की वन संरक्षण कायद्याचा भंग होत आहे. अर्थात त्या विषयाच्या खोलामध्ये मी जाऊ इच्छित नाही. माझा प्रश्न असा आहे की, १६ तारखेला जे पत्र पाठिण्यात आलेले आहे. ते पत्र विथड्रॉ करण्यास त्यांना सागंण्यात येणार आहे किंवा नाही?

**श्री. रणजित देशमुख :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे त्या बाबतात मी सांगू इच्छितो की, वन जमिनीच्या संबंधाचे जे काही प्रकल्प असतात त्याची छाननी करण्याचे काम व त्याला मंजुरी देण्याचे काम केंद्र सरकारकडे असते. यापूर्वी त्यांचे एकूण २५ पॉईन्ट होते आणि त्यासबंधाचा अहवाल राज्य शासनाला पाटबंधारे खात्याकडून, वन खात्याकडून प्रस्तावित करावा लागतो. दोन वेळा हा प्रस्ताव त्यांच्याकडे गेला होता. पहिल्या वेळी त्यांनी जे काही मुद्दे काढले होते त्यामध्ये असा एक मुद्दा होता की, ज्या लाभक्षेत्रामध्ये पाणी वाहून जाते त्यामुळे त्या पाणलोट क्षेत्रातील जमिनिची धूप होऊ नये यासाठी कॅचमेन्ट एरिया ट्रीटमेन्ट प्लॅन तयार करण्यात यावा आणि तो केंद्र सरकारकडे पाठवा. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने असा प्लॅन तयार करून तो प्लॅन केंद्रसरकारकडे पाठवला. दुसऱ्या वेळी तो परत आला तेव्हा **केंद्र सरकारने आणखी काही नवीन मुद्दे काढले होते. त्यामध्ये त्यांनी असे सांगितले की, लाभक्षेत्रातील पाच टक्के जमीन ही राज्य शासनाने ॲक्वायर केली पाहिजे आणि ती जमीन केंद्र सरकारच्या वन खात्याकडे विनामूल्य दिली पाहिजे. त्याचबरोबर त्या ठिकाणी वनीकरण करण्यासाठी विनामूल्य पाणी देण्याची हमी राज्य सरकारने द्यावयाची आहे.** हा धोरणात्मक निर्णय घेऊन कॅबिनेटसमोर जाऊन हा प्रस्ताव पुन्हा राज्य सरकारला केंद्र सरकारकडे पाठवावा लागणार आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी आताच असे सांगितले की, मागच्या आठवडयात वन खात्याचे अधिकारी त्या ठिकाणी गेले होते. कॉन्झरवेटर ऑफ फॉरेस्ट त्या ठिकाणी गेले होते. त्या ठिकाणी जे काम सुरू आहे त्याबाबतीत सांगावयाचे म्हणजे ३३०.५० मिटर उंचिपर्यंत धरणाचे काम आल्यानंतर त्या ठिकाणी पाणी साठविले तर ४५० हेक्टरपर्यंत वनजमीन बुडते आणि १८ हजार ३७५ झाडे बुडतात. केंद्र सरकारचा जो फॉरेस्ट ॲक्ट आहे त्याप्रमाणे वन जमिनीच्या संदर्भात जोपर्यंत केंद्र सरकारचा क्लिअरन्स मिळत नाही तोपर्यंत हे काम थांबवा अशा प्रकारचे आदेश त्यांनी दिले आहेत. आणि म्हणून त्या दृष्टीने ह्या प्रकल्पाचे काम थांबलेले आहे. या प्रकल्पाच्या वन जमिनीचे क्लिअरन्स लौकरात लौकर करुन घेण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. अध्यक्ष महाराज, **जो एक शेवटचा मुद्दा मी सांगितला तो असा की, ५ टक्के जमीन ही ॲक्वायर करायची आणि तिची किंमत शासनाने द्यायची यासंबंधीसुद्धा महाराष्ट्र शासन ताबडतोबीने धोरणात्मक निर्णय घेईल** आणि या प्रश्नाचा निकाल लावील." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक २८ मार्च १९९० : खंड ८९, क्रमांक ४, पृष्ठ ९-१०)*

२५८. त्यानंतर प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "आपल्या वन अधिकाऱ्यांनी यात अगदी बेजबाबदारपणे काम केलेले आहे, या कामात त्यांनीच अडथळा आणलेला आहे. माझे या बाबतीतील म्हणणे असे आहे की, लाभक्षेत्रामध्ये ५ टक्के जमीन आपल्याला १० वर्षे तरी मिळणार आहे काय ? १० टक्के जमीन घ्यायची ती घेण्यासाठी १४ वर्षे लागली, ते प्रकरण आता मिटले. मग माझा प्रश्न असा आहे की, बुडीत जाणाऱ्या वन जमिनीला पर्यायी म्हणून त्यांना जी १३०० हेक्टर जमीन दिली आहे तिचे जॉईन्ट इन्स्पेक्शन आपल्या अधिकाऱ्यांनी आणि त्यांच्या वनाधिकाऱ्यांनी डिसेंबर, १९८८ मध्ये घेतले होते की नाही ? आणि आता त्यानंतर वन विभागाने हरकत काय घेतली तर फॉरेस्टच्या ५० हेक्टर जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. तेव्हा आपल्या वन विभागाने जी दिरंगाई केली त्याची आपण चौकशी करुन योग्य त्याला शासन करणार काय? तसेच परवाच्या १६ तारखेला त्यांनी हे काम थांबवण्याचे जे आदेश दिलेले आहेत ते आदेश ताबडतोब मागे घेण्याविषयी त्यांना सांगाल काय?" या उपप्रश्नाला मा. राज्यमंत्री रणजित देशमुख यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. "अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, या संबंधात जी अडचण आणली आहे त्याबाबत वन खात्याने पाटबंधारे खात्याकडून माहिती घेऊन त्यांना द्यावी लागते. म्हणजे केंद्र सरकारकडे पाठवावी लागते. अध्यक्ष महाराज, दुसरे असे की, केंद्र सरकारने याच्या नॉर्म्समध्ये वेगवेगळे बदल केले आहेत. सुरवातीस २५ मुद्दयांबावत आपल्याला माहिती द्यावी लागत होती. नंतर त्यात आणखी २-३ मुद्दे वाढविले गेले. आता २८ मुद्यांबाबत माहिती द्यावी लागते. दरम्यानच्या काळात ही माहिती क्लिअरन्स होईपर्यंत केंद्र सरकारच्या पर्यावरण खात्याने आणखी दोन मुद्दे काढले आणि त्याच्यामुळे हा विलंब होत गेला आहे. घोसीखुर्द आणि बावनथडीचा जो उल्लेख आपण केलात त्यासंबंधीची कारवाई पूर्वी होऊन गेली आहे. अध्यक्ष महाराज, आपल्यामार्फत मी सन्माननीय सदस्यांच्या निर्दशनास आणून देऊ इच्छितो की, कॅचमेंट एरिया ट्रीटमेंट प्लॅन हा जरी द्यायचा म्हटले तरी जेवढया क्षेत्रातातील पाणी वाहून त्या तलावामध्ये जाणार आहे त्यात मध्य प्रदेशाचासुद्धा काही भाग या प्रकल्पामध्ये येतो. तेव्हा

मध्यप्रदेशच्या शासनाच्या अधिकाऱ्यांचीसुद्धा यामध्ये आपल्याला मदत घ्यावी लागेल. तरीही याचा प्लॅन तयार करण्यासच मुळी ४/५/ महिने लागतील. तेव्हा पहिला मुद्दा असा की, त्यांनी सुरवातीस जी ऑब्जेक्शन्स काढली होती त्याचे क्लिअरन्स करण्यास वेळ लागला. आता जो दुसरा मुद्दा आला आहे. त्यासंबंधाने शासनाला धोरणात्मक निर्णय आता घ्यावा लागेल. अध्यक्ष महाराज, **यामध्ये वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी हे काम बंद करा म्हणून जे आदेश दिलेले आहेत त्यात त्यांचे काही चुकले आहे असे मला वाटत नाही.** कारण या मुद्यांचे क्लॅरिफिकेशन आपणास ताबडतोबीने करावे लागेल. केंद्र सरकारकडून ते क्लिअरन्स घ्यावे लागेल आणि मगच हे काम पुढे सुरु करता येईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक २८ मार्च १९९० : खंड ८९, क्रमांक ४, पृष्ठ ११)*

**२५९.** त्यानंतर या प्रकल्पाबाबत राज्यशासनाने वारंवार दिलेली आश्वासने इतर कोणत्याही प्रकल्पाला हात न लावता एकट्या अप्पर वर्धा प्रकल्पाच्या मानगुटीवर बसण्याचे वनविभागाचे वर्तन यांचा तपशीलवार उल्लेख करून प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारलेला प्रश्न व त्याला पाटबंधारे मंत्री डॉ. पदमसिंह पाटील यांनी दिलेले उत्तर नमूद असलेले अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख** :- अध्यक्ष महाराज, ही गंभीर बाब आहे. या ठिकाणी तारीख **२८ जून १९८५** ला ता.प्र.क्र. ५६५ ला उत्तर देतांना आपण स्पष्टपणे सांगितले होते की, "१९८८ पर्यंत हे काम आम्ही पूर्ण करतो." त्यांनतर आपण असे सांगितले की, १४ एप्रिल, १९८९ रोजीचे शासन प्रसिद्धी पत्रक क्र. ३०६, केंद्रीय मंत्री आणि जिल्ह्याचे पालक मंत्री यांचे अधिकृत प्रसिद्धी पत्रक आहे की, आम्ही "जून, १९९० पर्यंत ३ हजार हेक्टर जमिनीला पाणी देऊ" अध्यक्ष महाराज, राज्याच्या विद्यमान मुख्य मंत्र्यांनी १९ सप्टेंबर, १९८९ ला त्या शहरामध्ये जाहीरपणे सांगितले की, "जून १९९१ पर्यंत आम्ही हे धरण पूर्ण करतो." तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, आपल्या वन खात्याने १९८९ मध्ये वरुन आलेल्या या संबंधीच्या गाईड लाईन्स आपल्याच पाटबंधारे विभागाला १९९० च्या जानेवारी महिन्यात दिल्या म्हणजे ६ महिने त्या त्यांच्याकडेच पडून होत्या. त्याच्या अगोदर दीड वर्षापर्यंत त्यांची ती तथाकथित बारकाईने छाननी चालू होती. हा बेजबाबदारपणा आहे असे आपणास वाटत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अध्यक्ष महाराज, म्हणून मग माझे स्पष्ट आणि मूळ म्हणणे असे आहे की, बावनथडी आणि घोसीखुर्दच्या कितीतरी अगोदरपासून ह्या धरणाचे काम सुरु आहे तेव्हा आपण जाहीर केल्याप्रमाणे या वर्षीच्या जूनपर्यंत-३२५ मीटरपर्यंत आपण हे काम नेणार आहात की नाही? आणि माननीय मुख्य मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे जून, १९९१ पर्यंत हे काम पूर्ण होणार आहे की नाही?

**डॉ.पदमसिंह पाटील** : अध्यक्ष महाराज, **या संबंधात केंद्र सरकारच्या ज्या अटी आहेत त्यांची पूर्तता सध्या तरी आपण करु शकत नाही कारण या अटी दररोज बदलत आहेत.** सुरवातीस त्यांनी ज्या अटी घातल्या होत्या त्यात त्यांनी १५ जानेवारी, १९९० रोजी आताच माननीय राज्य मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे **लाभक्षेत्रातील जी काही जमीन आहे त्यापैकी ५ टक्के जमीन वन खात्याला राज्य सरकारने विनामूल्य दिली पाहिजे आणि त्या जमिनीला पाणीपूरवठाही मोफत करायला पाहिजे.** अध्यक्ष महाराज, या शासनाचा हे धरण निश्चितपणे ठरलेल्या तारखेस पूर्ण करण्याचाच प्रयत्न होता आणि आहे **परंतु केंद्र सरकारच्या अटी या दररोज बदलत असतील तर मोठी अडचणीची गोष्ट आहे. तेव्हा आम्ही कितीही प्रयत्न केले तरी त्यांनी या कामाला बंदी घातली असल्याने हे काम शक्य होत नाही.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक २८ मार्च १९९० : खंड ८९, क्रमांक ४, पृष्ठ ११)*

### भाषेत फरक पण दोघाचेहि उत्तर सारखेच

**२६०.** राज्यमंत्री विदर्भातील होते म्हणून त्यांनी वापरलेली भाषा "अध्यक्ष महाराज, **यामध्ये वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी हे काम बंद करा म्हणून जे आदेश दिलेले आहेत त्यात त्यांचे काही चुकले आहे असे मला वाटत नाही.** कारण या मुद्यांचे क्लॅरिफिकेशन आपणास ताबडतोबीने करावे लागेल. केंद्र सरकारकडून ते क्लिअरन्स घ्यावे लागेल आणि मगच हे काम पुढे सुरु करता येईल." अशी होती, तर पाटबंधारे मंत्र्यांना विदर्भातील प्रकल्प बंद पडल्यामुळे कोणतीही झळ लागण्याची शक्यता नव्हती त्यामुळे त्यांची भाषा "अध्यक्ष महाराज, **या संबंधात केंद्र सरकारच्या ज्या अटी आहेत त्यांची पूर्तता सध्या तरी आपण करु शकत नाही कारण या अटी दररोज बदलत आहेत......** सुरवातीस त्यांनी ज्या अटी घातल्या होत्या त्यात त्यांनी १५ जानेवारी, १९९० रोजी आताच माननीय राज्य मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे लाभक्षेत्रातील जी काही जमीन आहे त्यापैकी ५ टक्के जमीन वन खात्याला राज्य सरकारने विनामूल्य दिली पाहिजे आणि त्या जमिनीला पाणीपूरवठाही मोफत करायला पाहिजे. अध्यक्ष महाराज, या शासनाचा हे धरण निश्चितपणे ठरलेल्या तारखेस पूर्ण करण्याचाच प्रयत्न होता आणि आहे **परंतु केंद्र सरकारच्या अटी या दररोज बदलत असतील तर मोठी अडचणीची गोष्ट आहे. तेव्हा आम्ही कितीही प्रयत्न केले तरी त्यांनी या कामाला बंदी घातली असल्याने हे काम शक्य होत नाही.**" अशी कठोरपणाची होती. मात्र दोघांच्याही बोलण्याचा अर्थ एकच होता, ही केंद्र सरकारची अट आहे. त्यांनी काम बंद पाडले आहे. आम्ही काही करू शकत नाही.

### मा. सभापतीसकट सर्वाचा समज असा की पाच टक्केची अट केंद्र शासनाचीच आहे

**२६१.** पाटबंधारे मंत्री व राज्यमंत्री यांनी दि. २८ **मार्च** १९९० रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ५७४ वरील अनुपुरक चर्चेमध्ये विधानपरिषदेत दिलेली उत्तरे काळजीपूर्वक वाचली तर असे लक्षात येईल की, ही अट केंद्र सरकारनेच घातलेली आहे अशी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांची बालंबाल खात्री करून दिली होती. मंत्र्यांनी वारंवार हे सभागृहात सांगितल्यामुळे सभागृहाचा तसाच समज झाला व मा. सभापतींना सुद्धा तसेच वाटले, कारण पुन्हा "१६ तारखेला पत्र देऊन हे काम बंद करण्यात आले आहे. आज ४०० मजूर त्या ठिकाणी काम करीत आहेत.... (ते काम सुरू राहण्याबाबत काय)?" असा प्रश्न विचारण्याचा प्रा. बी. टी. देशमुख यांनी प्रयत्न केला तर तो प्रश्न पूर्ण होण्याच्या आतच मा. सभापतींनी असे उद्‌गार काढले की, "पण यामध्ये केंद्र सरकारनेच जर परवानगी दिली नसेल तर त्याला राज्य सरकार तरी काय करणार?" मा. सभापतींच्या या उद्‌गारानंतर पुन्हा प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपला प्रश्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करून पाहिला पण तो प्रश्न पूर्ण होण्याच्या आतच मा. सभापतींनी पुन्हा असे उद्‌गार काढले की, "सन्माननीय सदस्यांनी हे समजून घ्यावे की, मा. मंत्रिमहोदयांनी हेच सांगितले आहे की, पूर्वी ज्या अटी केंद्रातर्फे घालण्यात आल्या नव्हत्या त्या अटी नव्याने नंतर घालण्यात आल्या." या वातावरणामध्ये सभागृहात झालेल्या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :

"**सभापती** : मा. मंत्र्यांना मला असे विचारावयाचे आहे की त्यांनी या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये इतक्या मोघम आणि अडचणीच्या स्वरुपात उत्तर का लिहिले ? या लेखी उत्तरात म्हटले आहे की, "वन विभागाच्या निम्न स्तरावरील अधिकाऱ्यांपासून उच्च स्तरापर्यंत टप्प्याटप्प्याने बारकाईने तपासणी होते...." खरे तर आपण येथे अगदी साधी गोष्ट लिहावयास पाहिजे होते की, केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवितांना त्यांच्या ज्या अटी आहेत त्याप्रमाणे पाहणी करुन त्याचे उत्तर द्यावे लागते आणि त्यासाठी वेळ लागतो इतके हे साधे वाक्य लिहिण्याऐवजी आपण अगदी अवघड भाषेत उत्तर देण्याचा प्रयत्न करायला नको होता.

**डॉ. पद्‌मसिंह पाटील** : अध्यक्ष महाराज, आपले म्हणणे मी मान्य करतो.

**श्री. बी. टी. देशमुख** : अध्यक्ष महाराज, मग मूळ प्रश्न बाजूलाच राहतो. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी १६ तारखेला पत्र देऊन ते काम बंद केले आहे. आज ४०० मजूर तेथे आहेत...

**सभापती** : पण केंद्र सरकारनेच जर त्यासाठी परवानगी दिली नसेल तर त्याला राज्य सरकार तरी काय करणार ?......

**श्री. बी. टी. देशमुख** : अध्यक्ष महाराज, पण जेव्हा मंत्र्यांनी, मुख्य मंत्र्यांनी आश्वासन दिले होते त्यावेळीसुद्धा केंद्र सरकारने परवानगी दिलेली नव्हती. हे काम फॉरेस्ट ॲक्ट येण्यापूर्वीचे आहे म्हणूनच हे घडले. हा नवा फॉरेस्ट ॲक्ट १९८० साली आला.......

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी हे समजून घ्यावे की, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगताना हेच सांगितले आहे की, पूर्वी ज्या अटी केंद्रातर्फे घालण्यात आलेल्या नव्हत्या त्या अटी नव्याने नंतर घालण्यात आल्या आणि पुढे पर्यावरणामुळे आणखी नवीन अटी घातल्या गेल्या आणि त्या सगळयांची पूर्तता करण्यास वेळ लागतो आहे.

**डॉ. पद्‌मसिंह पाटील** : अध्यक्ष महाराज, हा वन खात्याचा कायदा १९८० साली आला पण तोपर्यंत जे काम झाले होते त्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध राज्य सरकारने कारवाई करावी अशा प्रकारचा आग्रह केंद्र सरकारचा आहे. म्हणजे जो कायदा लागूच नव्हता त्यावेळी करण्यात आलेल्या कामाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि त्याचा कम्लायन्स पाठविल्यानंतरच आम्ही तुम्हाला परवानगी देऊ असे म्हणणे बरोबर होणार नाही.

**श्री. बी. टी. देशमुख** : अध्यक्ष महाराज, त्या अटी पूर्ण होणे शक्यच नाही. केंद्र सरकार असे म्हणते की, तुम्ही फॉरेस्टमधील खदानीची माती काढली, गोटे काढले पण त्यावेळी हा कायदा लागू झालेलाच नव्हता असे असतानाही त्या अधिकाऱ्यांना त्या कामाबद्दल नोटीस द्या हे म्हणणे काही बरोबर नाही, साऱ्या वर्तमानपत्रामध्ये याबद्दल माहिती आलेली आहे आणि या प्रश्नाबद्दल लोक

प्रक्षुब्ध झालेले आहेत. पण आता या प्रकरणात अर्जन्सी ही आहे की, सध्या ते काम तेथे चालू राहणे आवश्यक आहे. तेंव्हा तुमच्या अधिकाऱ्यांनी काम बंद करण्याचे जे आदेश १६ तारखेला काढले आहेत ते परत घेतले जातील काय ?

**डॉ. पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याशी मी पूर्णतः सहमत आहे. अशा प्रकारची कारवाई त्या अधिकाऱ्यांवर करण्याबद्दल केंद्र सरकारचा जो आग्रह आहे तो अजिबात बरोबर नाही. त्यासंबंधात आम्ही आमची बाजू केंद्रापुढे मांडत आहोत की कंझर्व्हेशन ऑफ फॉरेस्ट ॲक्ट येण्यापूर्वी हे काम झालेले आहे त्यामुळे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करु नये परंतु अद्याप केंद्र सरकार ते मानत नाही, मानायला तयार नाही त्यामुळेच सर्व अडचण आहे.” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक २८ मार्च १९९० : खंड ८९, क्रमांक ४, पृष्ठ १२)*

## अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण

**२६२.** एका बाजूला ५ टक्के जमिनीची अट ही संशयास्पद आहे असे आम्हाला वाटत होते व त्यामुळेच लक्षवेधी सूचना या आयुधाचा वापर करण्याचे आम्ही ठरविले होते. ही लक्षवेधी सूचना स्वीकृत झाली होती. प्रश्नोत्तरे किंवा लक्षवेधी सूचना या आयुधांच्या वापरामध्ये प्रश्न विचारता येतात, उपप्रश्न विचारता येतात, त्याला मंत्रीमहोदयाकडून उत्तर मिळते. या आयुधांच्या वापरामध्ये सदस्याला भाषण करता येत नाही. “अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण” या आयुधांचा वापर केल्यास भरपूर विचार मांडणारे भाषण करता येते. प्रश्नोत्तराच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे **गुरूवार, दिनांक २९ मार्च १९९०** रोजी सन १९९०-९१ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण करतांना प्रा. बी. टी. देशमुख यांनी याबाबतचे विचार तपशीलवार पणे मांडले.

## प्रकल्पपूर्तीच्या आश्वासनांचा तपशील

**२६३.** या प्रकल्पाला उद्‌भव धरुन पाणी पुरवठ्याच्या कोणकोणत्या योजना बांधल्या आहेत, आतापर्यंत प्रकल्पपूर्तीची कशी कशी आश्वासने देण्यात आली होती हे त्यांनी आपल्या भाषणात पुढील शब्दात सांगितले:

“अध्यक्ष महाराज, इरिगेशनचा बॅकलॉग असलेल्या विभागामधील हा मोठा प्रकल्प आहे. यामुळे आपण १ लाख हेक्टर जमिनीला पाणी पुरवू शकू. अमरावती आणि वर्धा या दोन जिल्ह्यातील आर्वी, कारंजा, तिवसा, मोर्शी, चांदूर रेल्वे या तालुक्यातील १ लाख हेक्टर जमिनीला या प्रोजेक्टमधून पाणी पुरविले जाईल. वर्ल्ड बँकेची या प्रकल्पाला मान्यता आहे, त्यातील अटीनुसार ७ ते १० टक्के पाणी पिण्यासाठी रिझर्व्ह करून ठेवलेले आहे. अमरावती, बडनेरा, नांदगावपेठ, नेरपिंगळाई, वरूड, मोर्शी या गावांना पाणी पुरविण्यासंबंधीच्या योजना याच जलाशयातील पाण्यावर आधारित आहे. **या सभागृहामध्ये शासनाने असे कबूल केले होते की, “८५ पर्यंत या धरणाचे काम पूर्ण केले जाईल” परंतु दुर्देवाने ८५ पर्यंत हे काम पूर्ण झाले नाही. म्हणून या सभागृहामध्ये २८ जून १९८५ ला तारांकित प्रश्न क्रमांक ५६५ खाली या प्रश्नावर चर्चा झाली, त्यावेळी हे काम “८८ पर्यंत पूर्ण करू” असे उत्तर त्या वेळच्या मा. मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये दिले.** याबाबत असेही सांगण्यात आले होते की, “८७ पासून या ठिकाणी पाणी भरायला सुरूवात होईल आणि ८८ मध्ये ते काम पूर्ण होईल” परंतु ते काम ८८ पर्यंत देखील पूर्ण झाले नाही. ८७ पर्यंत मूळात पाणी भरण्याचे कामच सुरू झाले नाही. मग सातत्याने या तारखा लांबत गेल्या आणि शासनाच्या बोलण्यावरचा लोकांचा विश्वास ऊडून जावा अशी परिस्थिती या प्रश्नासंबंधी निर्माण झालेली आहे. ८८ साल निघून गेले. त्यानंतर **महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती यांनी १४ एप्रिल ८९ ला एक प्रसिद्धी पत्रक काढले. प्रसिद्धी पत्रक क्रमांक ३०६ हा त्या प्रसिद्धी पत्रकाचा क्रमांक आहे. त्यामध्ये असे लिहिलेले आहे की, “अप्पर वर्धा धरणाच्या डावा आणि उजव्या कालव्यावरील काम प्रगती पथावर असून जून ९० पर्यंत ३ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी पुरविण्यात येईल अशी माहिती महाराष्ट्राचे कृषी मंत्री आणि जिल्ह्याचे पालक मंत्री श्री. प्रमोद शेंडे यांनी विश्राम भवनामध्ये दिली. केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री. वसंतराव साठे हे देखील त्यावेळी प्रामुख्याने हजर होते.” मी त्या पत्रकातील पुढची माहिती वाचतो. “त्यावेळी जिल्हाधिकारी थॉमस बेंजामिन आणि पोलीस अधिक्षक प्र. तू. लोहार हे देखील उपस्थित होते.”** अध्यक्ष महाराज, आपण किती दिवस लोकांशी फसवाफसवी करणार? या प्रोजेक्टमुळे जून १९९० पर्यंत ३ हज़ार हेक्टरला आपण पाणी पुरवू शकतो का? या बाबतची स्थिती अतिशय खेदजनक आहे.” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २९ मार्च १९९० : खंड ८९, क्रमांक ५, पृष्ठ १-२)*

## अटी पूर्ण करण्यात शासनाला आलेले अपयश

**२६४.** केंद्र शासनाच्या अटी पूर्ण करण्यात महाराष्ट्र शासनाला कसे अपयश येत आहे याचा तपशील देऊन प्रा. बी. टी. देशमुख यांनी पुढील शब्दात आपले भाषण संपविले :-

“वास्तविक पहाता केंद्राच्या जुन्या अटींचेच पालन करता करता त्यांच्या नाकात दम आलेला होता. ८७ सालापर्यंत त्यांनी त्या जुन्या अटींचे देखील पालन केले नाही. या सभागृहामध्ये सातत्याने चर्चा सुरू झाल्यानंतर या संदर्भात थोडीशी वाटचाल सुरू झाली. ही वाटचाल सुरू केल्यानंतरसुद्धा शेरे पालन झाले नाही. गोसीखुर्द व बावनथडी या प्रकल्पांना गेल्या वर्षी मान्यता मिळाली आणि या प्रकल्पाला मात्र केंद्राची मान्यता मिळाली नाही. अध्यक्ष महाराज, ज्या नव्याने अटी घालण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये जेवढ्या विभागातून पाणी येते त्याच्या विषयीची म्हणजे जलग्रहण क्षेत्र उपचार योजना आपण द्या आणि लाभक्षेत्र विकासाची योजना तयार करा, अशा अटी केंद्र सरकारच्या वन विभागाने टाकल्या आहेत. या नव्या अटी जून १९८९ मध्ये पाठविल्या व वन अधिकाऱ्यांमार्फत त्या जानेवारी १९९० मध्ये मिळाल्या. अध्यक्ष महाराज, त्यानंतर **तिसरी अट घालण्यात आलेली आहे ती सुद्धा अतिशय वाईट अशी आहे. ती अट पूर्ण करता येणे अतिशय कठीण आहे. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून ५ टक्के जमीन वन खात्याला वने लावण्यासाठी उपलब्ध करून द्या आणि त्या वनासाठी फुकट पाणी द्या अशा प्रकारची ही तिसरी अट घालण्यात आली आहे.** या राज्याच्या माननीय मुख्य मंत्र्यांनी त्या गावात जाहीरपणे आणि प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून १९ सप्टेंबर १९८९ रोजी असे सांगितले होते की, जून १९९१ पर्यंत हे धरण पूर्ण केले जाईल. अध्यक्ष महाराज, गेल्या १०-१५ वर्षापासून लोकांच्या जमिनीचे व्यवहार अडकून पडले आहेत. ओलीताच्या सोयी अभावी केलेल्या योजना कोसळताहेत. त्या ठिकाणची १० टक्के जागा आपण अगोदरच ताब्यात घेतली आहे. ५ टक्के जमिनीचे लॅन्ड ॲक्विझीशन पुढील १० वर्षामध्ये आपल्याकडून होणे शक्य नाही. म्हणून राज्याच्या पातळीवर या बाबतीत तत्परतेने निर्णय घ्यावा. या प्रोजेक्टला १९९० च्या जूनपर्यंत ३२५ मीटर लेव्हल आपण आणू अशा प्रकारची कबुली या ठिकाणी आणि बाहेरही देण्यात आली होती. पण तसे झाले नाही तर अतिशय तीव्र अशा प्रकारचा असंतोष या दोन्ही जिल्ह्यांमध्ये निर्माण होईल. याचे कारण या दोन्ही जिल्ह्यांच्या पाणीपुरवठा योजना या प्रकल्पाकडे वाट पाहून आहेत. १ लाख हेक्टर जमीन भिजण्याची वाट पहात आहे. त्यास प्रदीर्घ विलंब झाला आहे. अध्यक्ष महाराज, या अर्थसंकल्पावरील भाषणाच्या निमित्ताने मी ही गोष्ट शासनाच्या लक्षात आणून दिली आहे.” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २९ मार्च १९९० : खंड ८९, क्रमांक ५, पृष्ठ २)*

## लबाडी उघड करणारी लक्षवेधी सूचना

**२६५.** वन विभागाच्या अधिकाऱ्यांची लबाडी उघड्यावर पाडणारी सर्वश्री बी. टी. देशमुख, पु. ब. सोमवंशी, नितीन गडकरी, दिवाकर जोशी, नारायण वैद्य, रा.सू.गवई, वि.ग.हांडे व विरेंद्र देशमुख यांची लक्षवेधी सूचना याच अधिवेशनामध्ये **बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९९०** रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये दाखविण्यात आली होती. लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेसाठी घेण्याच्या कार्यरितीप्रमाणे अशी सूचना मांडणारा सदस्य प्रथम आपली लक्षवेधी सूचना मांडतो. त्यावर खात्याच्या मंत्र्यातर्फे लेखी निवेदन (जे अर्धा एक तास अगोदरच आमच्या खणात ठेवलेले असते) सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते व त्यानंतर या निवेदनावर अनुपुरक चर्चा सभागृहामध्ये सुरू होते.

## सूचनेचा मसुदा व लेखी निवेदन

**२६६.** सदस्यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेचे स्वरूप काय होते? त्यावर मा. मंत्रिमहोदयांनी काय निवेदन केले हे लक्षात यावे म्हणून **बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९९०** रोजीच्या सभागृहाच्या कार्यवाहीतील अधिकृत प्रतिवेदनाचा लागुपुरता भाग पुढे जसाच्या तसा उद्‌धृत केला आहे. :-

**“श्री. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) :** अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने पाटबंधारे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी त्याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो.

“दिनांक १५ मार्च १९८९ रोजी कमिशनर तथा चीफ कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट यांनी अप्पर वर्धा धरणाच्या स्थळाला भेट देणे, केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता मिळालेली नसल्यामुळे धरणाच्या मुख्य भिंतीचे काम तात्काळ थांबविण्याचे त्यांनी जागच्या जागी आदेश दिल्यामुळे दिनांक १७ मार्च १९९० पासून धरणाच्या सांडव्याचे कॉंक्रीटचे बांधकाम (मोनोलिथ नं.६) बंद पडणे, केंद्र शासनाच्या अटीची पूर्तता करण्याबाबतची कारवाई दोन दिवसांत पूर्ण करतो असे मा. पाटबंधारे मंत्री यांनी स्पष्टपणे सभागृहात सांगूनसुद्धा विलंब झाल्यामुळे केंद्र सरकारकडून पुढील १० वर्षात ज्यांची पूर्तता करता येणार

नाही अशा नव्याने सुधारित अटी लावण्याचा घडत असलेला प्रकार, **विशेषतः कमांड एरियामध्ये ५ टक्के जमीन ही वन उभारण्यासाठी ओलीताच्या मोफत सोयीसह देण्यात यावी अशा प्रकारची केंद्र शासनाने एक महिन्यापूर्वी नव्याने टाकलेली अट, परिणामी जवळ जवळ १२५ कोटीच्यावर रुपये खर्च झालेला हा प्रकल्प पुढच्या १० वर्षात पूर्ण न होण्याची निर्माण झालेली शक्यता** व त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व त्याबाबत शासनाची भूमिका."

**डॉ. पद्मसिंह पाटील (पाटबंधारे मंत्री) :** अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

**प्रकल्पाची सद्यःस्थिती :** कंत्राटदार व शासन यांच्या उभयमान्य करारानुसार प्रकल्पाच्या दगडी धरणाचे बांधकाम जून १९९२ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित असून धरणाचे मातीकाम ९६ टक्के पूर्ण झाले आहे व दगडी बांधकाम ७६ टक्के पूर्ण झाले आहे. उजव्या व डाव्या कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. या प्रकल्पावर आजपर्यंत (फेब्रुवारी १९९०) एकूण रुपये १३००० लक्ष खर्च झालेला आहे.

**वन जमीन :** उर्ध्व वर्धा प्रकल्पाखाली जाणाऱ्या बुडीत क्षेत्रात व कालवा क्षेत्रात एकूण १३०४.८२ हे. वन जमीन आहे. याबाबतचा प्रस्ताव १९८७ मध्ये केंद्र शासनाला मंजुरीसाठी पाठविला असून त्यास अद्याप मंजुरी मिळालेली नाही. **प्रकल्पाखाली बुडणाऱ्या वन जमिनीला केंद्र शासनाची परवानगी मिळाल्याशिवाय वन जमिनीत प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करू नये असे केंद्र शासनाचे आदेश असल्याने या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील वन जमिनीत काम आवश्यक त्या मंजुरीअभावी थांबविण्यात आले आहे.** या प्रकल्पाला सन १९६५ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली असून धरणाचे मातीकाम ११/७८ मध्ये व दगडी धरणाचे काम २/८० मध्ये सुरू करण्यात आले. **म्हणजे १९८० चा वनसंवर्धन कायदा अंमलात येण्याआधी प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली.** प्रत्यक्षात वनसंवर्धन कायदा २५ ऑक्टोबर १९८० पासून अंमलात आला आहे व त्यानंतर या प्रकल्पासाठी लागणाऱ्या वन जमिनीच्या हस्तांतरणासाठी केंद्र शासनाची मंजुरी अनिवार्य असल्याने या विभागाकडून जून १९८४ मध्ये निर्वनिकरणाचा एकत्रित प्रस्ताव तयार केला तो महाराष्ट्र शासन वन विभागाकडून मे १९८७ ला केंद्र शासनाला सादर करण्यात आला. या प्रस्तावावर केंद्राने दि.२५ ऑगस्ट १९८७ व ७ मार्च १९८८ च्या पत्रान्वये घेतलेल्या आक्षेपाचे अनुपालन करून पुनः संपूर्ण प्रस्ताव केंद्र शासनास दि.६ फेब्रुवारी १९८९ ला सादर करण्यात आला.

दिनांक १८ ऑक्टोबर १९८९ रोजी विधानसभेत झालेल्या चर्चेप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांना दि.३ नोव्हेंबर १९८९ रोजी मु. अ. अमरावती यांचेमार्फत ताकीद देण्यात आली आहे. परंतु केंद्र सरकारला नुसती ताकीद देण्याची कारवाई पुरेशी वाटत नसून त्या अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घ्यावी असा आग्रह त्यांनी धरला आहे. अशी कारवाई करण्याच्या इष्टानिष्टतेबद्दल शासनात विचार चालू आहे.

दिनांक ६ फेब्रुवारी १९८९ रोजी सादर केलेल्या प्रस्तावावर केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक २६ डिसेंबर १९८९ च्या पत्रान्वये आक्षेप घेतले त्या आक्षेपांचे अनुपालन करून प्रस्ताव या विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी (का.अ.,उ.व.का.वि.क्र. २-अमरावती) दिनांक २४ जानेवारी १९९० ला वन विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना (उप वन संरक्षक,अमरावती) सादर केला आहे. **परंतु त्यानंतर म्हणजे दि.३१ जानेवारी १९९० पत्रान्वये वन संरक्षक, अमरावती वृत्त यांनी केंद्रस्थ अधिकारी यांनी त्यांना पाठवलेली सुधारित तपासणी सूची. त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यासाठी अ.अ.,उ.व.प्र.मं.,अमरावती यांना पाठविली.** या चेकलिस्टनुसार आता पूर्वीपेक्षा बरीच अधिक माहिती देणे आवश्यक असून ती खालीलप्रमाणे आहे-

१) जलग्रहण क्षेत्र (पाणलोट क्षेत्र) उपचार योजना.

२) लाभक्षेत्र विकास योजना.

**३) प्रकल्प खर्चातून ५% जमीन लाभक्षेत्रात वन खात्याला उपलब्ध करून वन संवर्धनासाठी विनामूल्य पाणी पुरविण्याची हमी.**

वरील मुद्दयांपैकी क्र.(१) व (२) ची माहिती वन विभागास दि.२२ मार्च १९९० रोजी सादर केली आहे. **क्र.(३) ची अट ही राज्य शासनाच्या वन विभागाने घातली असून ती मागे घेण्याचे सचिव (वने) यांनी सचिव (पा.) यांचेबरोबर झालेल्या चर्चेत मान्य केलेले आहे.**

**पर्यायी वनीकरण :** उर्ध्व वर्धा प्रकल्पासाठी एकूण १३०४.८२ हेक्टर वन जमीन लागणार असून त्या जमिनीच्या बदल्यात १३०६.३५ हे. बिगर वन जमीन पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध करण्यात आली. यापैकी सुमारे ५० हेक्टर जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे दिसून आले होते. तथापि पर्यायी वनीकरण काम सुरू होण्यापूर्वी ते काढून टाकण्याचे आश्वासन आयुक्त, अमरावती यांनी दिलेले आहे. त्यापैकी ७५६.३५ हे.जमीन वर्धा जिल्ह्यातील असून ५५०.०० हे जमीन अमरावती जिल्ह्यातील आहे. सदर जमिनी संदर्भातील कागदपत्रे उप वनसंरक्षक, वर्धा व अमरावती यांच्या प्रमाणपत्रांसह महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक ६ फेब्रुवारी १९९० ला केंद्र शासनाला सादर करण्यात आले.

उपरोक्त ३ मुद्दयांची माहिती/अनुपालन ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय वन खात्याकडून वन जमिनीच्या हस्तांतरणास मंजुरी मिळू शकेल. परंतु त्यासाठी काही जादा कालावधी निश्चित लागणार आहे. **परंतु मंजुरी मिळालेल्या प्रकल्पाचे काम बंद करणे जनतेच्या या प्रकल्पाविषयीच्या तीव्र भावना लक्षात घेता योग्य होणार नाही.**

दिनांक १५ मार्च १९९० रोजी मुख्य वनसंरक्षक, मुख्य अभियंता, पा.वि.,अमरावती वन विभागाचे संबंधित अधिकारी व आयुक्त, अमरावती विभाग यांची संयुक्त बैठक झाली. त्या बैठकीत वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी वरील तीन मुद्दयांचे अनुपालन झाल्यानंतरच, व अधिनियम भंगास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याविरुध्दची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच प्रस्ताव केंद्र शासनापुढे मंजुरीसाठी पाठविला जाईल असे सांगितले. **तसेच १६ मार्च १९९० नंतर काम पुढे चालू राहिल्यास पाणी वन जमिनीत जाण्याची शक्यता लक्षात घेऊन चालू असलेली कामे बंद करण्याचे निर्देश त्यांनी दिले व काम चालू ठेवल्यास तो वनसंवर्धन कायद्याचा भंग धरून तदनुषंगिक शिक्षा संबंधितांना होईल याची कल्पना दिली.**

एकंदरीत केंद्रीय शासनाच्या वन संवर्धन कायद्याची मार्गदर्शक तत्त्वे व त्यांच्या अनुपालनाबाबत केंद्र शासनाची सक्त भूमिका यामुळे मान्यता मिळण्यास विलंब होत आहे. असे असले तरी **केंद्र शासनाच्या मुद्यांचे अनुपालन त्वरेने करून मान्यता मिळविण्याचे शासनाचे प्रयत्न चालू आहेत व ती मिळताच प्रकल्पाचे काम त्वरित चालू करणे शक्य होईल.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९९० : खंड ८९, क्रमांक ९, पृष्ठ ४३-४५)*

## बाधक अट रद्द : कारण ती लबाडी होती

**२६७.** मी यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे लक्षवेधी सूचनेवरील मंत्रिमहोदयांचे उपरोक्त निवेदन सभागृह सुरू होण्यापूर्वी अर्धा एक तास अगोदर आम्हाला मिळाले होते. आणि पाटबंधारे मंत्र्याच्या त्या लेखी निवेदनामध्येच वनविभागाच्या अधिकाऱ्यांची लबाडी उघडी पाडणारे ही अट "राज्य शासनाच्या वन विभागाने घातली असून ती मागे घेण्याचे सचिव (वने) यांनी सचिव (पाटबंधारे) यांचेबरोबर झालेल्या चर्चेत मान्य केलेले आहे." हे विधान समाविष्ट होते.

पाटबंधारे मत्र्यांच्या लेखी निवेदनानंतर झालेल्या अनुपूरक चर्चेमध्ये ५ टक्के जमिनी विषयीचा पहिलाच उपप्रश्न प्रा. बी. टी. देशमुख यांनी असा विचारला की "निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, ३१ जानेवारी १९९० च्या पत्रान्वये वन संरक्षक, अमरावती वृत्त यांनी केंद्रस्थ अधिकारी यांनी त्यांना पाठविलेली सुधारित तपासणी सूची, त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यासाठी अ.अ.,उ.व प्र.मं.,अमरावती यांना पाठविली. या चेकलिस्टनुसार आता पूर्वीपेक्षा बरीच अधिक माहिती देणे आवश्यक असून ती खालीलप्रमाणे आहे. १) जलग्रहण क्षेत्र (पाणलोट क्षेत्र) उपचार योजना, २) लाभक्षेत्र विकास योजना, ३) प्रकल्प खर्चातून ५ टक्के जमीन लाभक्षेत्रात वनखात्याला उपलब्ध करून वन संवर्धनासाठी विनामूल्य पाणी पुरविण्याची हमी. अध्यक्ष महाराज, ही तिसरी बाब अधिक महत्त्वाची आहे. यानंतर पुढे निवेदनात असे म्हटलेले आहे की, "वरील मुद्दयांपैकी क्र.(१) व (२) ची माहिती वन विभागास दि. २२ मार्च १९९० रोजी सादर केली आहे. **क्र. (३) ची अट ही राज्य शासनाच्या वन विभागाने घातली असून ती मागे घेण्याचे सचिव (वने) यांनी सचिव पाटबंधारे यांचेबरोबर झालेल्या चर्चेत मान्य केलेले आहे.**" ही जी तिसरी अट आहे तिने या प्रकल्पाला ग्रस्त केलेले आहे. त्यामुळे जनमानसात अशी भावना निर्माण झालेली आहे की, आता १० वर्षे हे काम होणे शक्य नाही. आता या अटीपासून या प्रकल्पाला बाधा राहणार नाही ही गोष्ट खरी आहे ना ?" **त्यावर पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिले.**

## काम सुरु ठेवण्याचे आदेश देणार

**२६८.** केंद्र सरकारची नव्हतीच ती अट केंद्र सरकारच्या नावावर खपवून बंद पाडलेले काम सुरू होणार की नाही? हा खरा कळीचा प्रश्न होता. लगेचच त्याबाबत प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारलेला उपप्रश्न व त्यावर पाटबंधारे राज्यमंत्री श्री. रणजीत देशमुख यांनी दिलेले उत्तर पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, या अटीमुळेच विदर्भभर असंतोष निर्माण झाला होता. आता ही अट वनखात्याने मागे घेतलेली आहे. आपल्या वन विभागानेच ही अट घातलेली होती. मी त्या दिवशीच सांगितले होते की, या आमच्या वन विभागाला परराष्ट्रासारखे वागू नका असे कोणीतरी सांगितले पाहिजे. अध्यक्ष महाराज १६ तारखेला हे काम बंद झालेले आहे. निवेदनामध्ये पहिलेच वाक्य असे आहे की, "कंत्राटदार व शासन यांच्या उभयमान्य करारानुसार प्रकल्पाच्या दगडी धरणाचे बांधकाम जून १९९२ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित असून...." पहिल्यांदा सांगण्यात आले की, हे काम ८५ साली पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर, ८७-८८ साली पूर्ण होईल असे सांगण्यात आले, तेव्हाही ते झाले नाही. आता कंत्राटदाराशी अ‍ॅग्रीमेंट झाले आहे त्याप्रमाणे ९२ पर्यंत हे काम पूर्ण करावयाचे आहे. वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी मार्चच्या १६ तारखेला हे काम बंद करण्यास सांगितले आहे. **वास्तविक पहाता हा प्रकल्प आपला कायदा होण्याअगोदरच सुरू झालेला आहे. कायदाच नव्हता त्यावेळी, तर मग त्याचे पालन कसे करणार?** म्हणून मा. मंत्रिमहोदयांनी संबंधित अधिकाऱ्याला १६ तारखेचा आदेश मागे घेण्यास सांगितले पाहिजे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी १६ तारखेला काम बंद ठेवण्याचा जो आदेश दिला आहे तो मागे घ्यावा अशी सूचना त्यांना शासन करील काय?

**श्री. रणजित देशमुख :** अध्यक्ष महाराज, निवेदनामध्ये सांगितल्याप्रमाणे तीन अटी होत्या. त्यापैकी **तिसरी अट राज्य शासनाच्या सचिवांना केंद्र सरकारने तपासून पहाण्यासाठी दिली होती. ती अट आता परत घेण्यात आली आहे.** आता जलग्रहण क्षेत्र (पाणलोट क्षेत्र) उपचार योजना आणि लाभक्षेत्र विकास योजना या दोनच अटी आहेत. या संदर्भात केंद्र सरकारचा क्लिअरन्स आल्यावर या कामाला सुरुवात करता येईल. अध्यक्ष महाराज, **संपूर्ण विदर्भामध्ये यासंबंधी अत्यंत तीव्र भावना आहेत याची मला कल्पना आहे.** म्हणूनच याची आम्ही माहिती घेतली. या ठिकाणी दगडी धरणाचे काम जवळपास ३३३ मीटरचे आहे. त्यामध्ये वन जमिनीमधील भाग ६३ मीटरचा आहे. स्पील वेची लांबी २३८ मीटर आहे. या प्रश्नाच्या संदर्भात या सभागृहाप्रमाणेच खालच्या सभागृहामध्येही तीव्र भावना व्यक्त केल्या. मी आपणास सांगू इच्छितो की, **मी स्वतः आणि वन राज्यमंत्री अशा दोघांनी मिळून सचिवालयामध्ये एक बैठक घेतली होती. दिनांक ८ रोजी अमरावती येथे जाऊन आम्ही निर्णय घेणार आहोत. तरी वन जमिनीचा भाग सोडून जो भाग शिल्लक राहतो ते काम सुरू करावयाला हरकत नाही.** तरी ते सुरू करण्यास महाराष्ट्र शासन आदेश देईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९९० : खंड ८९, क्रमांक ९, पृष्ठ ४६)*

## वन अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**२६९.** हजारो लोकांच्या जीवनाशी खेळ करणारे वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे हे चाळे हा अत्यंत संतापाचा विषय होता. केंद्राची अट नव्हती ती केंद्राची म्हणून सांगितली. काम बंद पाडले. आता ही लबाडी उघड पडली. काम पुन्हा सुरू होणार. पण या बिनडोकपणाबद्दल किंवा कुरापतखोरपणाबद्दल वनविभागाच्या या अधिकाऱ्यांविरुद्ध काही कारवाई होणार आहे की नाही? या प्रत्येकाच्या मनामध्ये घोळत असलेल्या प्रश्नाला वाचा फोडली ती ज्येष्ठ सदस्य श्री. रा. सु. गवई यांनी. या अधिकाऱ्यांवर सरळ सरळ कारवाईची मागणी करणारे श्री. रा. सु. गवई यांचे उपप्रश्न व त्याला राज्यमंत्र्यांनी दिलेली उत्तरे नमूद असलेला अधिकृत प्रतिवेदनातील भाग पुढील प्रमाणे :

"**श्री. रा. सु. गवई :** अध्यक्ष महाराज, निवेदनामध्ये तीन अटींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामधील तिसरी अट-प्रकल्प खर्चातून ५% जमीन लाभक्षेत्रात वन खात्याला उपलब्ध करून वन संवर्धनासाठी विनामूल्य पाणी पुरविण्याची हमी ही आहे. ही अट काही केंद्र सरकारची नाही. ही अट राज्य सरकारच्या वन विभागाने घातली असून ती मागे घेण्याचे सचिव, वन विभाग यांनी चर्चेमध्ये मान्य केले आहे. **अध्यक्ष महाराज, एखाद्या अटीच्या संदर्भात केंद्र सरकारने अडविले असते तर ते मी समजू शकतो. पण राज्य सरकारचे वन खाते राज्य सरकारचा सल्ला न घेता अशा प्रकारची अट टाकते आणि नंतर परत घेते. तरी विकासाच्या कामामध्ये जे अधिकारी आड आले त्यांच्याविरुद्ध काय कारवाई आपण करणार आहात?**

**श्री. रणजित देशमुख :** अध्यक्ष महाराज, काम बंद झाल्यावर परवाच मी आणि वन राज्यमंत्र्यांनी सभा घेतली आणि सचिव (वने) यांचे यावरील मत जाणून घेतले. त्यावेळी असे कळले की, त्यांना दिल्लीला या संदर्भात बोलाविले असताना "**प्रकल्प खर्चातून ५ टक्के जमीन लाभक्षेत्रात वन खात्याला उपलब्ध करून वन संवर्धनासाठी विनामूल्य पाणी पुरविण्याची हमी" याबाबत पडताळून पहा आणि कळवा असे सांगितले होते.** म्हणून राज्य सरकारच्या वन खात्याने ही अट लावली होती. आम्ही चर्चा केली आणि हे शक्य नाही असे सांगितले. मघाशी एका प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितल्याप्रमाणे लाभक्षेत्रातील जमीन बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे. परंतु .... ते सुद्धा होऊ शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारची अट घालणे शक्य नाही अशा प्रकारे केंद्र सरकारला कळविलेले आहे. **अशा प्रकारची अट त्यांनी कागदोपत्री घातलेली नाही तर ती अट चर्चेतून आली आहे. तेव्हा वन विभागाशी चर्चा करून ती अट आता काढलेली आहे** त्यामुळे तेथील अधिकाऱ्यांचा यामध्ये काही दोष होता असे नाही. सन्माननीय सदस्य श्री गवई यांनी सांगितले आहे की, राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाचे काम बंद करा असे सांगितलेले आहे त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, त्या संदर्भात पडताळणी करून पहा असे त्यांना सांगण्यात आले होते. अर्थात यामुळे जो काही विलंब झालेला आहे त्यामुळे त्या प्रकल्पासाठी करावयाची तरतूद आणि त्या प्रकल्पाचे काम याबाबतीत कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. **या संदर्भात मी स्वतः लक्ष घालतो आणि या प्रकल्पाच्या कामास जोमाने सुरूवात केली जाईल असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.**

**श्री. रा. सु. गवई :** अध्यक्ष महाराज, केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांनी या बाबतीत पडताळून पहा असे आपल्याकडील अधिकाऱ्यांना सांगितले आहे. त्याप्रमाणे त्यांनी पहाणी केलेली आहे काय? अशा प्रकारे येथील अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची पहाणी न करता अतिउत्साहाने आगाऊपणा दाखविलेला आहे आणि तशा प्रकारे अट टाकलेली आहे. त्याप्रमाणे त्यांनी काम बंद केले आणि आता पुन्हा ते सरेंडर झाले आहे. **या प्रकरणामध्ये अधिकाऱ्यांनी अतिउत्साह दाखविलेला आहे त्याचबरोबर आगाऊपणा दाखविलेला आहे. त्यामुळे तेथील काम बंद पडले. त्यामुळे तेथील लोकांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाला तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध काय कारवाई करण्यात येणार आहे?**

**श्री. रणजित देशमुख :** अध्यक्ष महाराज, हे काम ज्या संबंधित अधिकाऱ्याने केले आहे त्याच्या बाबतीत वन खात्याकडून स्पष्टीकरण मागवून कारवाई करण्यात येईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९९० : खंड ८९, क्रमांक ९, पृष्ठ ४७)*

## पण इतर अटींचे काय?

**२७०.** एप्रिल १९९० च्या ४ तारखेला ही चर्चा सभागृहामध्ये सुरू होती. ८ एप्रिल रोजी "अमरावती येथे जाऊन आम्ही (वने व पाटबंधारे राज्यमंत्री) निर्णय घेणार आहोत" असे पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी या चर्चेत अगोदरच सांगितले होते. इतर अटींची पूर्तता करण्याच्या उपप्रश्नावरील उत्तरात हा उल्लेख पुन्हा आला तो पुढील शब्दात :

"**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, ही जलग्रहण क्षेत्र उपचार योजना व लाभक्षेत्र विकास योजना या ज्या दोन अटी घालण्यात आलेल्या आहेत.... २२ मार्च १९९० ला त्याची माहिती वन विभागाला सादर केलेली आहे असे यात म्हटले आहे. परंतु या दोन अटीसुद्धा आताच टाकण्यात आलेल्या आहेत. त्याचा काही कम्प्लायन्स आपणास द्यायचा आहे. गेल्या वेळेस केंद्रीय मंत्री श्री. साठे यांनी सांगितले पण त्याबाबतची कार्यवाही होऊ शकली नाही. माझा प्रश्न असा आहे की, या दोन अटी आणि बाकीच्या अटीमुळे होणाऱ्या विलंबामुळे विदर्भात पसरलेला असंतोष लक्षात घेता आपण पूर्वी जशी चर्चा करून प्रश्न निकालात काढला त्याप्रमाणे आपल्या अधिकाऱ्यांसोबत तेथे जाऊन मंत्र्यांच्या व अधिकाऱ्यांच्या पातळीवर काही काळात या गोष्टीचा निकाल लावणारा निपटारा केला जाईल काय?

**श्री. रणजित देशमुख :** अध्यक्ष महाराज, ८ तारखेला मी स्वतः जाणार आहे म्हणून सांगितले आहेच.....

**श्री. बी. टी. देशमुख :** आपण ८ तारखेला अमरावतीला जाणार आहात...?

**श्री. रणजित देशमुख :** अध्यक्ष महाराज, गरज पडल्यास सर्व पॉईन्टवरसुद्धा जाऊ. हे झाल्यानंतर यासंबंधात दोन जास्तीच्या अटी आहेत त्याचे कम्प्लायन्स आम्ही करतो आहोत. परंतु या ज्या अटी आहेत त्या आम्हालाही मान्य नाहीत आणि म्हणूनच माननीय मुख्य मंत्र्यांच्या मार्फतसुद्धा अटी काढून टाकण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करू.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, या ज्या दोन अटी आहेत त्या त्यांनी आता उशीराने टाकलेल्या आहेत. बावनथडी आणि गोसीखुर्द या प्रकल्पांनासुद्धा या अटी लावण्यात आलेल्या नाहीत त्या या प्रकल्पाच्या बाबतीत लावण्यात आलेल्या आहेत. तेव्हा हे बरोबर नाही. तरी मंत्री पातळीवर पुढील एक-दीड

महिन्यांमध्ये केंद्रीय शासनाबरोबर चर्चा करून हा प्रश्न आपण निकालात काढाल काय?

**श्री. रणजित देशमुख :** होय.

**श्री. नितीन गडकरी :** अध्यक्ष महाराज, हा प्रकल्प तसा मोठा आहे. यासाठी एकंदर किती रुपये लागणार आहेत आणि या वर्षी इरिगेशनच्या बॅकलॉगमधून या प्रकल्पासाठी किती तरतूद केलेली आहे आणि या वर्षाची तरतूद कितीची आहे ?

**श्री. रणजित देशमुख :** अध्यक्ष महाराज, याची सुधारित किंमत ३४८ कोटी इतकी आहे आणि आतापर्यंत यावर १३० कोटी रुपये खर्च झालेले आहेत. याशिवाय बाकीची आकडेवारी आता माझ्याकडे नाही, वाटल्यास ती पटलावर ठेवीन." व येथेच या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपली. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९९० : खंड ८९, क्रमांक ९, पृष्ठ ४८-४९)*

### शासनाच्या दोन उत्तरात जमीन अस्मानचे अंतर

**२७१.** बुधवार, दिनांक २८ मार्च १९९० या दिवशी (**अगोदरचा बुधवार असे म्हणू**) विधान परिषदेत तारांकित प्रश्न क्रमांक ५७४ वर झालेल्या चर्चेची व बरोबर एक आठवड्याने बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९९० रोजी (**पुढचा बुधवार म्हणू**) त्याच विषयावरच्या लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने आज काळजीपूर्वक वाचली म्हणजे वन अधिकाऱ्यांची ही लबाडी उघडी पडल्यामुळे अप्पर वर्धा प्रकल्प व पाणीपुरवठा योजनेवरील केवढे मोठे संकट टळले याची कल्पना आल्याशिवाय रहात नाही. या एका आठवड्यात शासनाच्या भूमिकेमध्ये पडलेले हे जमीन अस्मानचे अंतर लक्षात घेण्यासारखे आहे. *(*ही पुढे दिलेली सर्व अधिकृत प्रतिवेदनातील मंत्र्यांची उत्तरे/अवतरणे आहेत)*

### अटीच्या खरे खोटे पणाबाबत

***(अ) लाभक्षेत्रातील ५ टक्के जमिन प्रकल्प खर्चाने ओलीतीच्या सोईसह फुकट वन उभारणीसाठी देण्याच्या अटीबाबत :-***

* "अध्यक्ष महाराज, केंद्र सरकारची अटच आहे की, जेवढी काही कमांड एरिया आहे त्यातील ५ टक्के क्षेत्र हे त्यांना विनामूल्य द्यायचे आणि त्यासाठी पाणीपुरवठाही मोफत राज्य सरकारने द्यायचा आहे."

* "अध्यक्ष महाराज, या संबंधात केंद्र सरकारच्या ज्या अटी आहेत त्यांची पूर्तता सध्या तरी आपण करु शकत नाही कारण या अटी दररोज बदलत आहेत."

* "लाभक्षेत्रातील पाच टक्के जमीन ही राज्य शासनाने ॲक्वायर केली पाहिजे आणि ती जमीन केंद्र सरकारच्या वन खात्याकडे विनामूल्य दिली पाहिजे. त्याचबरोबर त्या ठिकाणी वनीकरण करण्यासाठी विनामूल्य पाणी देण्याची हमी राज्य सरकारने द्यावयाची आहे."

***उपरोक्त माहिती अगोदरच्या बुधवारी शासनातर्फे पाटबंधारे मंत्री किंवा राज्यमंत्री यांनी सभागृहाला दिली. पुढच्याच बुधवारी, त्याच मंत्र्यांनी, त्याच सभागृहात, त्याच प्रश्नावर पुढील प्रमाणे माहिती दिली. :***

* "ही अट राज्य शासनाच्या वन विभागाने घातली असून ती मागे घेण्याचे सचिव (वने) यांनी सचिव (पा.) यांचेबरोबर झालेल्या चर्चेत मान्य केलेले आहे."

* "तिसरी अट राज्य शासनाच्या सचिवांना केंद्र सरकारने तपासून पहाण्यासाठी दिली होती. ती अट आता परत घेण्यात आली आहे."

* "अशा प्रकारची अट त्यांनी कागदोपत्री घातलेली नाही तर ती अट चर्चेतून आली आहे. तेव्हा वन विभागाशी चर्चा करून ती अट आता काढलेली आहे"

* "अध्यक्ष महाराज, काम बंद झाल्यावर परवाच मी आणि वन राज्यमंत्र्यांनी सभा घेतली आणि सचिव (वने) यांचे यावरील मत जाणून घेतले. त्यावेळी असे कळले की, त्यांना दिल्लीला या संदर्भात बोलाविले असताना "प्रकल्प खर्चातून ५ टक्के जमीन लाभक्षेत्रात वन खात्याला उपलब्ध करून वन संवर्धनासाठी विनामूल्य पाणी पुरविण्याची हमी" याबाबत पडताळून पहा आणि कळवा असे सांगितले होते. म्हणून राज्य सरकारच्या वन खात्याने ही अट लावली होती."

### बंद पडलेले काम सुरू करण्याबाबत

***(ब) अप्पर वर्धा धरणाचे बंद पडलेले काम सुरू करण्याबाबत :***

* "वन जमिनीच्या संदर्भात जोपर्यंत केंद्र सरकारचा क्लिअरन्स मिळत नाही तोपर्यंत हे काम थांबवा अशा प्रकारचे आदेश त्यांनी दिले आहेत. आणि म्हणून त्या दृष्टीने ह्या प्रकल्पाचे काम थांबलेले आहे."

* "परंतु केंद्र सरकारच्या अटी या दररोज बदलत असतील तर मोठी अडचणीची गोष्ट आहे. तेव्हा आम्ही कितीही प्रयत्न केले तरी त्यांनी या कामाला बंदी घातली असल्याने हे काम शक्य होत नाही."

***अशी माहिती अगोदरच्या बुधवारी शासनातर्फे पाटबंधारे मंत्री किंवा राज्यमंत्री यांनी सभागृहाला दिली. पुढच्याच बुधवारी, त्याच मंत्र्यांनी, त्याच सभागृहात, त्याच प्रश्नावर पुढील प्रमाणे माहिती दिली. :***

* "या अटीपासून या प्रकल्पाला बाधा राहणार नाही ही गोष्ट खरी आहे"

* "परंतु मंजुरी मिळालेल्या प्रकल्पाचे काम बंद करणे जनतेच्या या प्रकल्पाविषयीच्या तीव्र भावना लक्षात घेता योग्य होणार नाही."

* "तरी वन जमिनीचा भाग सोडून जो भाग शिल्लक राहतो ते काम सुरू करावयाला हरकत नाही. तरी ते सुरू करण्यास महाराष्ट्र शासन आदेश देईल."

* "या संदर्भात मी स्वतः लक्ष घालतो आणि या प्रकल्पाच्या कामास जोमाने सुरूवात केली जाईल असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे."

### अधिकाऱ्यांवरील कारवाईबाबत

***(क) प्रकल्पाचे काम बंद पाडण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत :-***

* "अध्यक्ष महाराज, यामध्ये वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी हे काम बंद करा म्हणून जे आदेश दिलेले आहेत त्यात त्यांचे काही चुकले आहे असे मला वाटत नाही."

***अशी माहिती अगोदरच्या बुधवारी शासनातर्फे पाटबंधारे मंत्री किंवा राज्यमंत्री यांनी सभागृहाला दिली. पुढच्याच बुधवारी, त्याच मंत्र्यांनी, त्याच सभागृहात, त्याच प्रश्नावर पुढील प्रमाणे माहिती दिली. :***

* "अध्यक्ष महाराज, हे काम ज्या संबंधित अधिकाऱ्याने केले आहे त्याच्या बाबतीत वन खात्याकडून स्पष्टीकरण मागवून कारवाई करण्यात येईल."

*************************************************

# २४
# बंद पडलेले काम सुरू ठेवण्याचे आदेश

*************************************************

### वृतपत्रातून संकटाची व्यापक चर्चा

**२७२.** लाभक्षेत्रामध्ये ५ टक्के जमिनीची ही संपूर्णपणे नकली व बनावट अट टाकून वनअधिकाऱ्यांनी अप्पर वर्धा प्रकल्पाचे काम २-४ महिने बंद पाडण्यात यश मिळविले होते. प्रभावशाली सांसदीय आयुधांच्या वापरातून वनअधिकाऱ्यांची ही लबाडी सभागृहामध्ये उघडी पाडण्यात आम्हा लोकप्रतिनिधींना यश मिळाले नसते तर या प्रकल्पाचे काम २-४ वर्षे सहज बंद पडले असते, या नुसत्या कल्पनेने सुद्धा आज अंगावर शहारे येतात. **काम बंद पाडण्यात आल्याच्या वृत्तामुळे विदर्भातील लोकमानसाला तीव्र धक्का बसला होता. ही लबाडी सभागृहातच उघडी पाडण्यात आपले प्रतिनिधी यशस्वी झाले आहेत व काम आता सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, या वार्तेने लोकांना मनापासून आनंदही झाला होता.** या आनंदाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या बातम्या, वार्तापत्रे, लेख व अग्रलेख यांनी १९९० च्या एप्रिल व मे महिन्यात विदर्भातील वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरून माहिती प्रकाशित करण्यात येत होती. या सर्व मजकुराचा आढावा या ठिकाणी घेणे शक्य नसले तरी "त्या" स्थितीची कल्पना यावी म्हणून काही प्रतिनिधीक नमुने सादर करणे मला आवश्यक वाटते.

### "प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे"

**२७३.** विधानपरिषदेत घडलेल्या चर्चेचे उपलब्ध झालेले सर्व तपशील दिनांक १५ एप्रिल १९९० च्या दैनिक "**हिंदुस्थान**"मध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते. या तपशीलवार मजकुराच्या प्रकाशनासोबत दैनिक "हिंदुस्थान"चे संस्थापक संपादक श्री. बाळासाहेब मराठे यांनी स्वतःच्या सहीनिशी मुखपृष्ठावर एक लहानसे संपादकीय चौकटीत देऊन याबाबतची जनभावना अतिशय मोजक्या पण प्रभावी शब्दात प्रकट केली होती. वनअधिकाऱ्यांच्या दुष्ट ग्रहापासून शहर वाचले याचा आनंद व या ग्रहदशेतून सुटका व्हावी म्हणून लोकप्रतिनिधींनी केलेल्या प्रयत्नाबद्दलचे अपार कौतुक ओसंडून वाहत असलेल्या "**प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे**" या आपल्या मुखपृष्ठावरील संपादकीयात बाळासाहेब लिहितात :-

"**प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे :** आमच्या लहानपणी प्रयत्नांची पराकाष्टा करून कर्तबगार किती तरी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात आणू शकतो हे दर्शविण्यासाठी ह्या काव्यपंक्ती नमूद केल्या आहेत. प्रयत्नांची महती दर्शविणाऱ्या या काव्यपंक्ती प्रत्यक्षात व तेही एका आत्मीयाने उतरविल्या तर मिळणारा स्वाभिमान व आनंद आज अमरावतीतील नागरिकांना सहज प्राप्त होत आहे.

अमरावती शहराला जीवनदान देणारी अप्पर वर्धा योजना कार्यान्वित करण्यासाठी येथील पदवीधर आमदार श्री. बी. टी. देशमुख यांनी प्रथम पासून जीवांचे रान केले व ती योजना फळान्वित होण्याच्या मार्गावर आणली. पण ती कार्यान्वित होण्याच्या मार्गावर असतांनाच केंद्र सरकारने टाकलेल्या अटींमुळे ती आता कार्यान्वित होऊ शकत नाही असे स्पष्ट झाले. या नकारघंटेमुळे आम्हीच काय, मोठमोठे या विषयातील तज्ञ हताश झाले. पण त्याही स्थितीत सरकारी कागद पत्रात दर्शविलेला नकार खोटा आहे हे सिद्ध करून सदरहू योजना दुप्पट जोमाने कार्यान्वित करण्याचा मार्ग श्री. बी. टी. देशमुख यांनी मोकळा केला याबद्दल त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. **सरकारी नकाराचे वाळूचे कण प्रयत्नांची पराकाष्टा करून, त्यातून होकाराचे तेल गाळणे हे केवळ अशक्यप्राय काम यशस्वी करून दाखवून श्री. भाऊराव यांनी आपल्या कर्तृत्वाची परम सीमा गाठली व जनतेने त्यांना निवडून देण्याचे त्यांनी यथार्थ चीज केले.** याबद्दल आम्ही श्री. बी. टी. देशमुख यांचे अभिनंदन करतो व आमचा अनुपम आनंद व्यक्त करतो! - **बा.वि.मराठे**"

### "अप्पर वर्धाचा खेळखंडोबा"

**२७४.** नागपूरहून दैनिक "**तरुण भारत**" ने या विषयावरील सभागृहातील चर्चेचे सर्व तपशील प्रसिद्ध केले होते व शिवाय "**अप्पर वर्धाचा खेळखंडोबा**" या मथळ्याचा एक अग्रलेख लिहून याबाबतच्या जनभावनेला तोंड फोडले होते. **५ टक्के जमीन वनासाठी उपलब्ध करून देण्याचा आग्रह धरणारी ही अट अकारण संघर्ष निर्माण करणारी आहे** हे प्रतिपादन करतांना २० एप्रिल १९९० च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या दैनिक "तरुण भारत" च्या उपरोक्त अग्रलेखात असे नमूद करण्यात आले होते की :

"प्रकल्पाखाली बुडालेल्या वन संपत्तीची भरपाई करण्याच्या दृष्टीने त्याच्या लाभक्षेत्रात सामाजिक वनीकरणाचा कार्यक्रम हाती घेणे यात काहीही आक्षेपार्ह नाही. किंबहुना अलीकडे राज्यसरकारे स्वतःच असा कार्यक्रम हाती घेत असतात. धरणाच्या परिसरात, कालव्यांच्या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात झाडे लावली जातात. ती पुरेशी नसली तर पूर्ण करण्याचा आग्रह समजला जाऊ शकतो. **पण लाभक्षेत्रातील ५ टक्के जमीन जोपर्यंत सामाजिक वनीकरणासाठी उपलब्ध होत नाही, तोपर्यंत आम्ही प्रकल्पाचे काम होऊच देणार नाही असे जर कुणी म्हणत असेल तर तो केवळ दुराग्रह ठरतो.** त्याहीपुढे जाऊन जेव्हा राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे नोंदविण्याची भाषा वापरली जाते तेव्हा अकारण केंद्र राज्य संघर्ष निर्माण करण्याचा तो प्रयत्न ठरतो. केंद्र सरकारचा नवा आग्रह त्याच स्वरूपाचा आहे."

### "पाणी कोठून आणणार ?"

**२७५.** अमरावती पाणीपुरवठा योजनेचा भाग असलेल्या तपोवन टेकडीवरील जलशुद्धीकरण केंद्राचा भूमिपूजन समारंभ तत्कालीन पालकमंत्र्यांच्या हस्ते १९९० च्या मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पार पडला. या समारंभामध्ये पालकमंत्र्यांनी "ही पाणीपुरवठा योजना १९९३ अखेरीस पूर्ण होईल" असे घोषित केले. वस्तुतः पालकमंत्र्यांच्या या घोषणेत नवीन काहीही नव्हते. सभागृहात नगर विकासमंत्र्यांनी हे प्रकल्पपूर्तीचे आश्वासन त्यापूर्वी अनेकदा दिले होते. पाणी पुरवठा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर पालकमंत्र्यांनी या आश्वासनाचा या समारंभात पुनरुच्चार केला होता एवढेच. पण समारंभ भूमिपुजनाचा असल्यामुळे पालकमंत्र्यांच्या या घोषणेला चांगलीच प्रसिद्धी मिळाली होती. अप्पर वर्धा प्रकल्पाचे काम बंद पडल्याचा धसका घेतलेल्या जनमानसाला (अजून ते काम सुरू झाले नव्हते) ही आश्वासने ऐकून सुद्धा आनंद वाटेनासा झाला होता. वाढीव पाणीपुरवठ्याच्या योजनेच्या सर्व उपांगाची बांधकामे वेळेवर पूर्ण झाली तरी त्याचा आम्हाला काही उपयोग होणार आहे काय? "विहिरीतच नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार?" या धर्तीवर "**धरणातच (उद्‌भवातच) नसेल तर योजनेत कुठून येणार?**" असा प्रश्न लोकांच्या मनाला सतावत होता. लोक व लोकप्रतिनिधींच्या मनातील या भावनेचे उत्तम प्रतिबिंब दै. "**जनमाध्यम**"च्या दिनांक १५ मे १९९० च्या अंकातील अग्रलेखामध्ये पडलेले दिसून येते. "**पाणी कोठून आणणार?**" या मथळ्याखाली लिहिलेल्या अग्रलेखामध्ये अप्पर वर्धा प्रकल्पाच्या बांधकामाचे जे धिंडवडे निघाले त्याचे तपशील देऊन घोषणेप्रमाणे पाणी पुरवठ्याची योजना १९९३ अखेरीस बांधून झाली तरी योजनेसाठी पाणी घेणार कोठून? याबाबतची तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली होती. अशा समारंभातून टाळ्या घेण्यासाठी मंत्र्यांनी केलेल्या घोषणा व त्यांनी दिलेली आश्वासने यांचा पुढे कसा उपयोग करून घेता येऊ शकतो याबाबत या अग्रलेखात संपादकांनी पुढील विचार मांडले होते. :-

"लोकशाही व्यवस्थेत व लोककल्याणकारी राज्यात सामान्य जनतेच्या हितासाठीच आपली धडपड असल्याचे वेळोवेळी दाखविणे मंत्र्यांना व लोकप्रतिनिधींना भाग असते. त्यासाठी सरकारी खर्चाने नको त्या वेळी भूमिपूजन, शिलान्यास, कामाचा प्रारंभ होणे, असल्या फालतू कारणाने फालतू समारंभ आयोजिणे, त्यानिमित्ताने शे-पाचशे लोकांची गर्दी गोळा करणे, विधिवत् पूजन वगैरे सोपस्कार करून फोटो काढणे आणि उपस्थितांना खूष करण्यासाठी मग मंत्र्यांनी टाळ्या घेऊ विधाने किंवा घोषणा करणे हे प्रकार आताशा रूढ झाले आहेत. लोकांनाही त्याचा सराव झाल्याने तेही असल्या समारंभाना फारसे महत्त्व देत नाहीत. पण अशा समारंभात मंत्र्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करून घ्यायचीच असतील तर विधिमंडळाच्या व्यासपीठाचा फारच चांगला उपयोग होऊ शकतो. प्रा. बी. टी. देशमुख यांच्या सारखा अभ्यासू प्रतिनिधी विधिमंडळात किंवा आश्वासन समितीत असला की, मंत्र्यांच्या या घोषणांची दखल घेणे सरकारला भागच पडते. **समारंभ संपला की मंत्र्यांना घोषणेचा विसर पडत असला तरी जागरूक आमदारांना मात्र तसे विसरता येत नाही.** पालकमंत्र्यांचे कालचे आश्वासन निदान त्यादृष्टीने तरी बहुपयोगी म्हणता येईल."

### तिवसा येथे अधिवेशन

**२७६.** अप्पर वर्धा धरणाचा हा जो खेळखंडोबा सुरू होता त्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी दिनांक १९ मे १९९० रोजी "डॉ. पंजाबराव देशमुख विचार मंच" तर्फे तिवसा येथे एक अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. मी स्वतः या अधिवेशनाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होतो. सर्वश्री. एन. जे देशमुख, प्रमोद वानखडे, पंकृविचे माजी कुलगुरू श्री. उलेमाले यांची या अधिवेशनात भाषणे झाली. या धरणाच्या कामामध्ये सतत अडथळे आणण्याच्या धोरणाविरुद्ध लोकक्षोभ व्यक्त करण्याची अत्यंत प्रभावी कामगिरी या अधिवेशनाने पार पाडली.

### मग जनआंदोलनाशिवाय पर्यायच नाही

**२७७.** तिवसा येथे झालेल्या एक दिवसीय अधिवेशनाचा आढावा घेऊन एवढ्या मोठ्या प्रकल्पासाठी लोकप्रतिनिधींचे प्रयत्न तर पाहिजेतच पण त्यामागे जनआंदोलनाची ताकद असल्याशिवाय हे प्रयत्न फलदायी होत नाहीत हा विचार २२ मे १९९० च्या दै. "जनमाध्यम" च्या अग्रलेखात पुढील शब्दात मांडण्यात आला होता. :

"अप्पर वर्धा धरण समस्येचा आ.बी.टी.देशमुख यांचा दांडगा अभ्यास असून त्यांना या समस्येची सर्व स्तरावरील खडा न खडा माहिती आहे. वेळोवेळी विधान परिषदेत हा प्रश्न लावून धरण्यात आ.बी.टी आणि तत्कालीन आमदार व सध्याचे खासदार सुदाम देशमुख यांनीच हिरिरीने पुढाकार घेतला. बी.टी.देशमुख आश्वासन समितीत असतांना तर त्यांनी सरकारची व मंत्र्यांची नेमकी आश्वासने शोधून त्यानुसार कालबद्ध कार्यक्रम आखण्यासही सरकारला भाग पाडले. अप्पर वर्धा धरणासोबतच अमरावती शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम, त्यासाठी निधी उपलब्ध करून घेणे यातही बी.टी. देशमुख यांनीच पुढाकार घेतला, हे सर्वश्रुत आहे पण लोकशाही व्यवस्थेत सर्व सांसदीय आयुधें वापरूनही एखादा प्रश्न शंभर टक्के सोडवून घेणे, शिवाय या पद्धतीने प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रदीर्घ काळ लागणे ही अपरिहार्य बाब असल्याने, **अशा प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी मग जनआंदोलनाशिवाय अन्य पर्यायच उरत नाही.**"

### "VIDARBHA DAM PROJECT FLOUNDERING"

**२७८.** अप्पर वर्धा प्रकल्पाबाबत घडलेल्या उपरोक्त दुर्दैवी घटनाक्रमाचा समाचार विदर्भातील वृत्तपत्रांनी घेतला होता, हे तर स्वाभाविकच होते. पण या प्रकल्पाबाबत वनअधिकाऱ्यांनी केलेली चकवा-चकवी व शासनाने केलेली बनवा-बनवी, याचा सभागृहात झालेल्या चर्चेमुळे एवढा बभ्रा झाला होता की राष्ट्रीय वृत्तपत्रांनी सुद्धा या घटनेची नोंद घेतली. "टाईम्स ऑफ इंडिया" ने मुद्दामहून आपले प्रतिनिधी, ज्येष्ठ पत्रकार श्री. चिनु पांचाळ यांना या कामगिरीवर अमरावती येथे पाठविले. त्यांनी येथे अनेक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या भेटी घेतल्या. माझ्याशी प्रत्यक्ष चर्चा करून आमची बाजू समजावून घेतली. प्रत्यक्ष प्रकल्प स्थळाला भेट दिली. श्री. पांचाळ यांनी नावानिशी ३० मे १९९० च्या "टाईम्स ऑफ इंडिया" मध्ये याबाबतचे एक लांबलचक वार्तापत्र "**Vidarbha dam project floundering** " या मथळ्याखाली प्रसिद्ध केले. त्यात ते म्हणतात :- "Engineers at the dam site said that it was extraordinary that the forest department should raise an objection 14 years after the start of construction on the ground that the masonry dam site was in the midst of a forest. The

forest department had demanded that the irrigation department should make available five percent (about 4,000 hectares) of land under the command area of the dam to it so that it could take up a social forestry scheme."

माझ्याशी झालेल्या चर्चेची माहिती देतांना श्री. पांचाळ यांनी या वार्तापत्रामध्ये असे नमूद केले होते की :-

"This condition was missing when the forest minister replied to the debate in the state legislative council. Prof. B.T.Deshmukh, MLC from Amravati, specifically asked whether the Union government has laid down such a condition. The minister said there was no such condition and he would order an inquiry to find out who did it. "It is very well for the forest department to lay down such a condition, but where is the land?" Prof. Deshmukh asked "it is forest land all right. But forest? Certainly not. Where is the forest around the dam?" Prof. Deshmukh's anger is understandable. There are only bushes and shrubs in the "forest". There is a patch of green at a distance, but that is private land."

### अस्वस्थ लोकप्रतिनिधी

१९९० च्या एप्रिल व मे महिन्यामध्ये वृत्तपत्रातून या प्रश्नाची व्यापक अशी चर्चा चालू असतांना लोकप्रतिनिधींमध्ये सुद्धा या प्रश्नाने अस्वस्थता निर्माण केलेली होती. काहीतरी उठाव केल्याशिवाय यातून मार्ग निघणार नाही. नाहीतर हे रडगाणे असेच सुरू रहाणार, अशी ही भावना होती. लोकसभा सदस्य भाई सुदाम देशमुख यांनी १९ एप्रिल १९९० रोजी "९, सुरूची सरकारी विश्राम धाम, मंत्रालयाजवळ, मुंबई-२१" येथून मला पाठविलेल्या एका पत्रातील मजकुरावरून लोकप्रतिनिधींच्या भावना त्यावेळी काय होत्या याची कल्पना येऊ शकते. भाई सुदाम देशमुख आपल्या या पत्रात म्हणतात "**प्रिय बी. टी. देशमुख,** सप्रेम नमस्कार तुम्ही अमरावतीला भेटून गेल्यानंतर खूप उशिरा रात्री अरुण अडसड, आमदार, व पत्रकार ओहळे आले होते. त्यांना मी सांगितले की बी. टी. सर्व आमदार, पत्रकार व जिल्ह्यातील प्रमुख व्यक्तींची बैठक बोलाविल त्यात कृतिसमिती स्थापन करू. **अप्पर वर्धा कृतिसमिती** निश्चित काळात अमरावती शहराला पाणीपुरवठा व ओलीत सिंचन - **या दोन मागण्या : कार्यक्रम** - नोटीस देणे, दिल्लीत भेटी - आणि या पावसाळ्यानंतर सर्वपक्षीय जनतेचा सत्याग्रह. बाकी ठीक आहे. तरी आता तुम्ही कामास लागावे - **सुदाम**"

### प्रकल्प स्थळाला उभय राज्यमंत्र्यांची भेट

**२७९.** सभागृहात कबूल केल्याप्रमाणे स्वतः पाटबंधारे राज्यमंत्री श्री. रणजीत देशमुख व वन राज्यमंत्री श्री. श्याम वानखडे यांनी अधिवेशन संपल्याबरोबर दुसऱ्याच दिवशी म्हणजे दिनांक **८ एप्रिल १९९०** रोजी प्रकल्प स्थळाला भेट दिली. त्याच दिवशी विभागीय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये दुपारी झालेल्या बैठकीत हे काम सुरू करण्याची मागणी आम्ही प्रतिनिधींनी केली व तसा निर्णयही झाला. पण असा निर्णय होऊन सुद्धा व सभागृहात आश्वासन देऊन सुद्धा दुसऱ्या दिवशी या प्रकल्पाचे बंद पडलेले काम सुरू झाले नाही. हे काम सुरू करण्याची जोखीम पाटबंधारे व वन राज्यमंत्र्यांनी आपल्यावर घेऊ नये असा पोक्त सल्ला काही वन अधिकाऱ्यांनी त्यांना दिल्याचे मला मागाहून समजले. परिणामी काम सुरू करण्याबाबतचे आदेश ताबडतोब निघू शकले नाहीत, तथापि श्री. रणजित देशमुख व शाम वानखडे या उभय राज्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर या प्रश्नाचा बराच यशस्वी पाठपुरावा केला असे स्पष्टपणे दिसून येते.

### बंद पडलेले काम सुरु

**२८०.** शेवटी एकदा बंद पडलेले काम सुरु करण्याचे आदेश निघाले. **११ मे १९९०** रोजी मंत्रालयातील पाटबंधारे विभागाने याबाबत निर्गमित केलेल्या आदेशामध्ये सचिवांनी असे म्हटले होते की, "**मला आपणास असे कळविण्याचे आदेश आहेत की, उर्ध्व वर्धा धरणाचे काम ३२५ मी. तलांकापर्यंत चालू ठेवण्यास शासनातर्फे खास बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.**" याच आदेशात पुढे असेही म्हटले होते की, "सदरहू आदेश मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार रवाना करण्यांत येत आहेत." **वर नमूद केलेले ११ मे १९९० चे आदेश अमरावतीला १८ मे १९९० च्या दरम्यान येऊन पोचले.** कंत्राटदाराला बोलावणे, त्याला मजूर पुरेशा संख्येत उपलब्ध होणे, ही ८-१० दिवसात होणारी गोष्ट नव्हती. दुर्दैवाने त्यावर्षी पावसाळा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू झाला आणि ऑक्टोबर नंतर सुद्धा पाऊस सुरूच राहीला, त्यामुळे विशेष बाब म्हणून काम सुरू ठेवण्यास परवानगी मिळून सुद्धा मे १९९० पासून तर ऑक्टोबर १९९० पर्यंत मध्यवर्ती उत्प्लव मार्गाचे काम बंदच राहिले. त्यानंतर मात्र पाटबंधारे विभागाने सर्व शक्तीनिशी या कामाला वर आणण्याचा प्रयत्न केला. डिसेंबर **१९९० चे नागपूर अधिवेशन सुरू झाले तेव्हा हे काम जोरात सुरू होते** व त्यामुळे विधान मंडळाच्या या नागपूर अधिवेशनात "अप्पर वर्धा धरणाचे बांधकाम" या प्रश्नावर फारशी चर्चा झाल्याचे दिसून येत नाही.

*****************************************************

## २५
## *निधी उपलब्ध होण्यात अडचणी*

*****************************************************

### निधीचा अभाव व जिल्हा नियोजन व विकास परिषदेचा ठराव

**२८१.** इकडे अप्पर वर्धा धरणाचे बांधकाम व्यवस्थित सुरू झाले, तर तिकडे वाढीव **पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याच्या बातम्या कानावर यायला लागल्या होत्या. अशा बातम्या वृत्तपत्रातूनही येऊन गेल्या होत्या.** त्यामध्ये काही तथ्य आहे किंवा नाही हे जाणून घेण्याचे जिल्हा पातळीवरील अतिशय उत्तम व अधिकृत ठिकाण म्हणजे जिल्हा नियोजन व विकास परिषदेची बैठक हे होय. दिनांक ९ **ऑक्टोबर १९९०** रोजी अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेची बैठक विभागीय आयुक्त श्री. एस. प्रभाकरन यांचे अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत स्वाभाविकपणे हा प्रश्न चर्चेला आला. ह्या बातम्या खऱ्या असल्याचे या चर्चेतून निष्पन्न झाले. या सभेच्या कार्यवृत्ताच्या पृष्ठ ९ वर परिच्छेद ५.१९ मध्ये या विषयाबाबतचा ठराव पुढील शब्दात झाल्याचे नमूद आहे. :-

"५.१९ अप्पर वर्धा प्रकल्पातुन अमरावती शहराला वाढीव पाणीपुरवठा करण्याच्या योजनेअंतर्गत १४ कोटी रूपये किमतीची कामे १९९०-९१ मध्ये करण्याची तरतुद आहे. **सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. परंतु अडचण नियमित निधी उपलब्धतेची आहे,** असे या सभेला सांगण्यात आले. ही अडचण अमरावती पाणीपुरवठा योजनेबद्दल येथील जनभावना बघता तत्परतेने लक्ष घालून महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाने सोडविणे अती आवश्यक आहे. यास्तव मंडळाने पुरेसा निधी नियोजनाप्रमाणे नियमित उपलब्ध करावा असेही सभेत ठरले."

इकडे जिल्हा नियोजन व विकास परिषदेने ठराव केला की, तिकडे त्या ठरावाचा तातडीने विधानपरिषदेत पाठपुरावा करणे या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेता अत्यंत आवश्यक होते, हे कोणाच्याही सहज लक्षात येईल.

### निधीचा प्रश्न विधानपरिषदेत

**२८२.** "अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधण्यात येत असलेल्या अमरावती शहराच्या पाणीपुरवठा योजनेस लागणाऱ्या विलंबाबाबत" या विषयावरील सर्वश्री बी. टी. देशमुख राजाभाऊ उदगीरकर, टी. एफ. पवार यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४९७४ हा **सोमवार, दिनांक १७ डिसेंबर १९९०** रोजी सभागृहामध्ये उत्तरासाठी होता व त्यावर त्यादिवशी अनुपुरक चर्चा सुद्धा झाली.

"अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधण्यात येत असलेल्या अमरावती शहरासाठीच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामामध्ये अंदाजपत्रकात तरतूद असूनही निधी उपलब्ध होत नसल्यामुळे लागत असलेला विलंब टाळण्यात यावा अशी विनंती अमरावती जिल्हा नियोजन व विकास मंडळाने दिनांक ९ ऑक्टोंबर १९९० रोजी झालेल्या बैठकीत शासनाला केली आहे, ही गोष्ट खरी आहे काय"? या प्रश्न भाग १ ला नगरविकास मंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिले. होते. "असल्यास, उपरोक्त विनंती संदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे;" व "अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?" या प्रश्न भाग २ व ३ ला एकत्रित उत्तर पुढीलप्रमाणे देण्यात आले होते :- "या योजनेची सर्व कामे प्रगतीपथावर आहेत, उर्वरित कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक १७ डिसेंबर १९९० : खंड ९१, क्रमांक ११, पृष्ठ १४)*

अनुपुरक चर्चेमध्ये मी सुरूवातीलाच विचारलेला पहिला प्रश्न असा की, "त्या वेळेला वर्तमानपत्रामध्ये या बातम्या आल्या होत्या की पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे कॉन्ट्रॅक्टरचे पेमेंट करता आले नाही. डी. पी. डी. सी. ने त्याबाबत ठराव केला होता. तसेच या वर्षी १४ कोटी रुपयाची प्रोव्हिजन आहे, ती १४ कोटी रुपयांची कामे करावयाची आहेत. त्यापैकी ३-४ कोटी रुपयांच्यावर निधी

त्या ठिकाणी या वर्षात दिला नव्हता, ही गोष्ट खरी आहे काय?" या उपप्रश्नाला मा. नगरविकास राज्यमंत्र्यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले. "या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद आहे त्यानुसार अनुदान म्हणून साडेतीनशे लाख व कर्ज म्हणून ५०० लाख असे मिळून ८ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद आहे, बोर्डाला जो पैसा दिला जातो तो विशिष्ट अशा योजनांतर्गत पैसा दिला जात नाही. एकदम ४०-५० कोटी रुपये दिले जातात. **पैशाअभावी अमरावती पाणीपुरवठा योजनेचे काम कोणत्याही पद्धतीने मंदगतीने सुरू झालेले नाही. कोणते काम किती झाले आहे यांची माहिती माझ्याजवळ आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक १७ डिसेंबर १९९० : खंड ९१, क्रमांक ११, पृष्ठ १५)*

## योजनापूर्तीचा काळ १९९६ कसा?

**२८३.** सदरहू प्रश्नावर अनुपुरक चर्चा सुरू असतांना मा. राज्यमंत्र्यांनी एकाएकी योजनापूर्तीचा काळ १९९६ असा सांगितला, ते चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :-

"**श्री. बी. टी. देशमुख :** तुम्ही याच सभागृहामध्ये सांगितले होते की, या आर्थिक वर्षामध्ये १४ कोटी रुपयांची कामे करणार आहोत. तेंव्हा ती कामे या वर्षामध्ये होणार आहेत काय ?

**श्री.अरुण गुजराथी :** ती कामे होतील.

**श्री. बी.टी.देशमुख :** १४ कोटी रुपयांची कामे या वर्षी पूर्ण करणार असाल, परंतु त्याठिकाणी पेमेंटला विलंब झाला होता, त्याचे कारण पुरेसा निधी तेथे गेलेला नव्हता. तेंव्हा त्या निधीची व्यवस्था केली आहे काय?

**श्री. अरुण गुजराथी :** बोर्डामार्फत जे पेमेंट होते ते शासनाकडून ठोक रक्कमेने दिले जाते. त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी असू शकतील. **परंतु तेथे ठेकेदारांचे बील देण्याचे राहिलेले असेल तर ते देण्याच्या संदर्भात निश्चित कारवाई करण्यात येईल.**

**श्री. रा. सु. गवई :** अप्पर वर्धा धरणाची आज लेव्हल अशी आहे की, यावर्षी पाणी सोडता आले असते तर अमरावती शहराला पाणी मिळाले असते. पुढल्या वर्षी देखील पाण्याचा संचय झाला तर अमरावती शहराला पाणी मिळू शकेल. आपण यासाठी ब्रेकअपने पैसा देता ही प्रथा मंजूर आहे. परंतु माझे म्हणणे असे आहे की, हे धरण, अमरावती शहराला पाणी देण्याच्या क्षमतेचे भरल्यानंतर किमान या योजनेकरिता पैसा नाही म्हणून पाणीपुरवठा होणार नाही अशी अवस्था होणार नाही ना?

**श्री.अरुण गुजराथी :** जून १९९२ पर्यंत अप्पर वर्धा धरण तयार होईल असे इरिगेशन खात्याने आम्हाला कळविले आहे. **तेंव्हा या योजनेअंतर्गत मार्च ते जून १९९६ पर्यंत ही योजना कार्यान्वित होईल.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक १७ डिसेंबर १९९० : खंड ९१, क्रमांक ११, पृष्ठ १५)*

**२८४.** वस्तुतः मार्च १९९३ पर्यंत योजना पूर्ण करण्याचे स्पष्ट आश्वासन सभागृहात यापूर्वी दिलेले असतांना एकाएकी मार्च १९९६ चा जो उल्लेख राज्यमंत्र्यांच्या तोंडी आला त्यामुळे मला स्वतःला आश्चर्य वाटले. त्यातून पुढील प्रश्नोत्तरे झाली :-

"**श्री. बी.टी. देशमुख :** मा.मंत्रिमहोदयांनी गेल्या वेळच्या तारखा आता मागे-पुढे सरकविलेल्या आहेत. वास्तविक पाहता मार्च १९९३ चा हा प्रोग्राम ठरविलेला आहे. तो आपल्या रेकॉर्डवर आहे, आता ते बोलताना तारीख बदलवू पहातात, परंतु ही गंभीर बाब आहे. But just to keep the record straight .... माझा प्रश्न असा की, मार्च ९३ पर्यंत हे काम पूर्ण करू असे विभागाने सांगितले आहे. त्या दृष्टीने विभाग कार्यवाही करीत आहे व तसे ते पूर्ण होईल, ही गोष्ट खरी आहे ना ?

**श्री.अरुण गुजराथी :** जी प्रगती बोर्डाने या संदर्भात आतापर्यंत केली आहे, त्यावरून अनुमान काढता येते की, मार्च १९९३ पर्यंत ही योजना पूर्ण होऊ शकते." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक १७ डिसेंबर १९९० : खंड ९१, क्रमांक ११, पृष्ठ १६)*

## अरुण गुजराथी यांची गफलत कां झाली ?

**२८५.** "मार्च ते जून १९९६ पर्यंत ही योजना कार्यान्वित होईल" अशा प्रकारचे धक्कादायक शब्द श्री.अरूण गुजराथी यांच्या तोंडून कसे बाहेर पडले? व मी चर्चेत हस्तक्षेप करून हे चुकीचे आहे हे लक्षात आणून देताच कोणत्याही प्रकारचा खळखळाट न करता त्यांच्या तोंडून "जी प्रगती बोर्डाने या संदर्भात आतापर्यंत केली आहे, त्यावरून अनुमान काढता येते की, मार्च १९९३ पर्यंत ही योजना पूर्ण होऊ शकते." हे उद्‌गार सहजपणे कसे बाहेर पडले? याचा ताळमेळ जमविण्यासाठी सभागृहातील चर्चेच्या अधिकृत प्रतिवेदनाचे आज जेंव्हा मी काळजीपूर्वक अवलोकन करतो तेव्हा **"मार्च ते जून १९९६ पर्यंत ही योजना कार्यान्वित होईल" हे उद्‌गार श्री. अरुण गुजराथी यांच्या तोंडून अनवधानाने निघाले असावे या पेक्षा दुसरा कोणताही वेगळा तर्क काढता येत नाही.**

## आखाती युद्धाचा योजनेच्या बांधकामाला फटका

**२८६. १९९० या वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये तसेच १९९१ च्या सुरुवातीला अप्पर वर्धा प्रकल्पाचे काम चांगल्या वेगाने सुरू झाले होते.** पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाने सुद्धा चांगला वेग घेतला होता. पण आखाती युद्धामुळे या योजनेच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक जवळ जवळ ९ महिन्यांनी पुढे सरकण्याचा प्रसंग आला. "अमरावती शहरास अप्पर वर्धा पाटबंधारे प्रकल्पापासून पाईप लाईन टाकून पाणीपुरवठा करण्याची योजना." या विषयावरील सर्वश्री वसंत मालधुरे, नितीन गडकरी, दिवाकर जोशी, अण्णा डांगे, प्रकाश जावडेकर, वसंत बापट यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०४६७ **हा गुरुवार, दिनांक १८ जुलै १९९१** रोजी उत्तरासाठी होता. "उक्त योजना पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे;" या प्रश्न भाग २ च्या लेखी उत्तरामध्ये मा. नगरविकासमंत्र्यांनी असे नमूद केले होते की "सदर योजना १९९३ च्या अखेरपर्यंत कार्यान्वित करण्याचा मानस आहे."

अनुपुरक चर्चा सुरू झाली त्यावेळी पहिलाच उपप्रश्न प्रा. बी. टी. देशमुख यांनी विचारला तो असा की "आता दिलेल्या उत्तरामध्ये "सदर योजना १९९३ च्या अखेरपर्यंत कार्यान्वित करण्याचा मानस आहे." असे सांगितले आहे. आता मार्च १९९३ ऐवजी डिसेंबर १९९३ मध्ये हे काम पूर्ण करण्यात येईल असा कार्यपूर्तीच्या तारखेमध्ये बदल का करण्यात आला?" त्यावर नगरविकास मंत्री श्री. अरुण गुजराथी यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. "परिस्थितीजन्य अशाप्रकारे हा बदल करावा लागला. **मधल्या दोन-तीन महिन्यांच्या काळामध्ये ट्रान्स्पोर्टमुळे या कामामध्ये विलंब झाला. आखाती युद्ध सुरू झाल्यामुळे मधल्या काळात पाईप उपलब्ध झाले नाहीत.** त्यामुळे ३-४ महिन्यांचा जास्त कालावधी लागला म्हणून मार्च ९३ ऐवजी डिसेंबर ९३ पर्यंत हे काम पूर्ण होईल असे उत्तर दिलेले आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १८ जुलै १९९१ : खंड ९३, क्रमांक ४, पृष्ठ २)*

## विलंबाची निश्चित कारणे काय ?

**२८७.** विलंब का झाला? तो टाळता येणार नाही काय? वाया गेलेले महिने भरून काढता येणार नाहीत काय? पाईप तर पूर्वीच आणले होते, मग विलंबाचे कारण काय? प्रकल्पासाठी या वर्षात तरतूद किती? इत्यादीबाबतीत बरीच प्रश्नोत्तरे झालीत ती पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख :** ट्रान्स्पोर्टमुळे निश्चित कोणत्या कामाला विलंब झाला?

**श्री. अरुण गुजराथी :** पाईप मिळण्याच्या कामामध्ये विलंब झाला.

**श्री. बी. टी. देशमुख :** पाईप्सची महत्तम खरेदी पहिल्याच वर्षी झाली आणि काही पाईप्सची निर्मिती स्पॉटवर होत आहे, ही गोष्ट खरी आहे काय?

**श्री. अरुण गुजराथी :** काही पाईप्सची निर्मिती अमरावती येथे झाली. परंतु बाकीचे पाईप बाहेरून आणावयाचे होते. ते वेळेवर येऊ शकले नाहीत. त्यामुळे हा विलंब झालेला आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** शासनाने जी लेखी माहिती सादर केलेली आहे त्यानुसार पहिल्या वर्षी जवळजवळ १२ कोटी रुपयांचे पाईप्स घेतले. तीन महिन्यांत ट्रान्स्पोर्टने जे पाईप्स आणले व ज्यामुळे उशीर झाला असे तुम्ही म्हणता ते किती रक्कमेचे होते?

**श्री. अरुण गुजराथी :** रक्कम सांगता येणार नाही. परंतु ट्रान्सपोर्टच्या संदर्भात सर्वच ठिकाणी हा प्रश्न निर्माण झालेला आहे. केवळ याच प्रकल्पाच्या संदर्भात हा प्रश्न निर्माण झाला होता अशातला भाग नाही. तरीसुद्धा शक्य तितक्या लवकर म्हणजे शक्य झाल्यास डिसेंबर १९९३ पूर्वी सुद्धा हे काम करण्याचा शासन प्रयत्न करील.

**श्री. बी. टी. देशमुख :** माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पाईप न आल्यामुळे हा विलंब झालेला आहे तो भरून काढण्यासाठी पुढचा तीन-चार महिन्यांचा कालावधी पुरेसा नाही काय?

**श्री. अरुण गुजराथी :** शक्य तितक्या लवकर हे काम पूर्ण करण्यात येईल असे मी सांगितलेले आहे.

**श्री. वसंत मालधुरे :** आताच मंत्रिमहोदयांनी पाईप न आल्यामुळे विलंब

झाला असे सांगितले. तेंव्हा जे पाईप आणून टाकले त्याच्या तारखा कोणत्या?

**श्री. अरुण गुजराथी :** कोणत्या तारखेला किती पाईप्स आणले हे सांगणे थोडे कठीणच आहे. सभापती महोदय, आपण सांगत असाल तर ही माहिती गोळा करता येईल.

**श्री. वसंत मालधुरे :** आखाती युद्धामुळे पाईप्स येण्यास विलंब झाला, असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. परंतु माझी अशी माहिती आहे की, आखाती युध्दाअगोदरच हे पाईप्स येऊन पडले होते, हे खरे आहे काय?

**श्री. अरुण गुजराथी :** पाईप्स केंव्हा केंव्हा आले इतकी बारीक माहिती आता सांगता येणार नाही.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, मी चुकीच्या उत्तराबाबत उपाययोजना करण्याचा माझा हक्क राखून ठेवतो. या कामावर किती खर्च करणार हे सदनामध्ये सांगितले होते. त्यामध्ये असे सांगितले होते की, १९९१-९२ मध्ये १४ कोटी रुपये खर्च करणार व १९९०-९१ मध्ये १४ कोटी रुपये खर्च करणार आहोत. मात्र आता उत्तरामध्ये ७-८ कोटी रुपये तरतूद केल्याचे दाखविले आहे. तेव्हा कमी तरतूद का करण्यात आली व ती तरतूद कमी केल्यामुळे हा विलंब होत आहे हे खरे आहे, काय?

**श्री. अरुण गुजराथी :** ही अर्थसंकल्पातील रक्कम आहे. कर्जाची रक्कम वेगळी आहे आणि अर्थसंकल्पातील तरतूद या माध्यमातून या प्रकल्पाची निर्मिती होत आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** ही फक्त अर्थसंकल्पाची तरतूद असेल तर मूळ नियोजनाप्रमाणे खर्च केला जाणार आहे ही गोष्ट खरी आहे का?

**श्री. अरुण गुजराथी :** एकूण ५५ कोटी रुपयाची ही योजना आहे. आतापर्यंत ३४ कोटी रुपयाचा खर्च झालेला आहे. निधीच्याअभावी या योजनेला विलंब होऊ नये असेच शासनाचे धोरण आहे.

**श्री. नितीन गडकरी :** मा. सदस्यांनी आता माहिती दिलेली आहे त्या ठिकाणी आखाती युध्दापूर्वीच पाईप येऊन पोहोचले होते. याचाच अर्थ असा आहे की, शासकीय अधिकाऱ्यांनी ज्या गतीने काम करावयास पाहिजे होते त्या गतीने न केल्यामुळे पाईप्स उपलब्ध असतानाही काम झाले नाही. म्हणून मा. मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी आखाती युद्धाचे कारण सांगण्यापेक्षा त्या ठिकाणी पाईप्स उपलब्ध असतानाही काम का पूर्ण झाले नाही याची चौकशी केली पाहिजे. तसे आपण करणार आहात काय?

**श्री अरुण गुजराथी :** याचा तपास केला जाईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १८ जुलै १९९१ : खंड ९३, क्रमांक ४, पृष्ठ २-३)*

## विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली "देखरेख समिती"

**२८८.** विधानमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर **दिनांक १० ऑगस्ट १९९१** रोजी झालेल्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीमध्ये मी स्वतः हा विषय सभागृहासमोर मांडला. जुलैच्या अधिवेशनामध्ये झालेल्या घटनाक्रमाची माहिती देऊन नियोजनाप्रमाणे प्रकल्पपूर्तीसाठी सन्नियंत्रणाची काहीतरी व्यवस्था असावी अशी मागणी केली. विभागीय आयुक्त या सभेच्या अध्यक्षस्थानी होते. या सभेमध्ये "अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याचे निर्धारित लक्ष मुळात नगर विकास विभागाने ठरविलेल्या कार्यक्रमाप्रमाणे पार पाडता यावे व आता नुकतेच जाहीर केल्याप्रमाणे डिसेंबर, १९९३ पेक्षा लवकर करता येण्याच्या शक्यतेबाबत एक वरिष्ठ पातळीवर बैठक स्थानिक आमदार/खासदार यांचे समवेत घेण्याबाबत निदेश देण्यांत आलेत." पूर्वी ठरलेल्या वेळापत्रकानुसार ही योजना पूर्ण करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल हे ठरविण्यासाठी लवकरच बैठक आयोजित केली जाईल असे मा. आयुक्त तथा उपाध्यक्ष यांनी सांगितले. **खुद्द विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालीच ही बैठक होणार असल्याने जिल्हा स्तरावर प्रकल्पाच्या विविध उपांगाच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेण्याची एक चांगली संधी आम्हाला आयतीच चालून आली होती.** आखाती युद्धामुळे पुढे सरकलेले प्रकल्पपूर्तीचे वेळापत्रक मूळ जागेवर आणून ठेवण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा असे आम्ही ठरवून टाकले होते.

## समितीची बैठक

**२८९.** जिल्हा नियोजन व विकास परिषदेने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या समितीची पहिली बैठक **२३ ऑगस्ट १९९१** रोजी विभागीय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये विभागीय आयुक्त श्री. एस. प्रभाकरन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेला पाणी पुरवठा मंडळाचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. लोकप्रतिनिधीपैकी प्रा. बी. टी. देशमुख व श्री. वसंतराव मालधुरे हे विधानपरिषद सदस्य उपस्थित होते. या सभेच्या कार्यवृत्ताच्या परिच्छेद तीन मध्ये असे नमूद आहे की "आमदार श्री. बी. टी. देशमुख यांनी आश्वासन समिती, महाराष्ट्र विधान परिषदेच्या अहवाल क्र.१०२ नुसार ह्या योजनेची कार्य समाप्ती मार्च, १९९३ अखेर नियोजित आहे ह्याकडे सर्वांचे लक्ष वेधले."

## योजना ५५ कोटीवरून ७८ कोटीवर गेली

**२९०.** "जुलै १९९१ पर्यंत योजनेवर एकूण ३४ कोटी रुपये खर्च झाला आहे" असे त्या सभेमध्ये मुख्यअभियंत्यांनी सांगितले त्यांनी पुढे असेही सांगितले की "१९९१-९२ मध्ये रुपये १६ कोटी, १९९२-९३ मध्ये रुपये २० कोटी, १९९३-९४ मध्ये रुपये ११ कोटी एवढा निधी प्रकल्पपूर्तीसाठी आवश्यक असेल."

"शासनाकडून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळास वेळीच आवश्यक निधी उपलब्ध केल्यास तसेच कायदा व सुव्यवस्था समाधानकारक असल्यास, कार्यसमाप्ती जुलै, ९३ अखेर शक्य होईल. व त्यानंतर योजनेच्या उपांगाच्या चाचणीकरिता ४ महिन्यांचा अवधी लागेल, म्हणजेच योजनेचा लाभ ऑक्टोबर, १९९३ अखेर लोकांना देता येईल" असे मुख्य अभियंता यांनी या बैठकीमध्ये सांगितले. त्यांनी असेही सांगितले की, "७७ कोटी रुपये एवढ्या वाढीव किंमतीची योजना शासनास सप्टेंबर, १९९१ पर्यंत मंडळा तर्फे सादर केली जाईल व त्यास शासनाने अविलंब मंजूरी द्यावी." या समितीच्या सभेमुळे **ही योजना ५५ कोटी मध्ये पूर्ण होऊ शकत नाही तर ती पूर्ण होण्यास जवळ जवळ ७७-७८ कोटी रुपये एकूण खर्च येणार आहे ही गोष्ट सर्व प्रथम आम्हाला अधिकृतपणे कळली** व ती सुद्धा मुंबईहून मुद्दाम या बैठकीसाठी आलेल्या मुख्य अभियंत्याच्या तोंडून.

## आयुक्त समितीचा ठराव

**२९१.** या सभेमध्ये योजना नियोजनाप्रमाणेच पूर्ण व्हावी याबाबत बरीच चर्चा झाल्यानंतर समितीने घेतलेला निर्णय या सभेच्या कार्यवृत्ताच्या परिच्छेद ८ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे. तो पुढील शब्दात :

"विधान परिषद, आश्वासन समितीच्या अहवाल क्रमांक १०२ मध्ये नगरविकास विभागाने मार्च, १९९३ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे निर्धारित केलेले आहे. एकूण ८ उपकामापैकी क्रमांक ५ वरील काम सोडले तर इतर उपकामे वेळापत्रकाप्रमाणे कमीजास्त प्रमाणात बरोबर चालू आहेत. असे दिसून येते. **क्रमांक ५ वर नमूद असलेल्या "अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस्ड ग्रॅव्हीटी मेन" या एका कामामुळे हे वेळापत्रक कोसळणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे** असे समितीला वाटते. ठरल्याप्रमाणे डिसेंबर, १९९२ पावेतो हे काम निश्चितपणे पूर्ण करता येऊ शकते. यासाठीचे सुधारित वेळापत्रक व नियोजन म.पा.पु. मंडळाने तयार करावे असे समितीला वाटते." उपरोक्त लक्षपूर्ती करिता अशुद्ध पाण्याच्या गुरूत्ववाहीनीसाठी लागणारे १५०० मी.मि. व्यासाचे प्रिस्ट्रेस्ड पाईप दर महिन्यास कमीत कमी २४० नगाचा पुरवठा आवश्यक असून ते सप्टेंबर, ९१ ह्या महिन्यापासून शक्य होईल असे मुख्य अभियंता यांनी सांगितले.

## "रोकड रकमांचे कुंठीत प्रवाह"

**२९२.** दिनांक २३ ऑगस्ट १९९१ रोजी विभागीय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये "देखरेख समिती"ची उपरोक्त बैठक झाली होती. त्यापूर्वी **महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. सुरेश पटवर्धन यांनी विभागीय आयुक्तांना १९ ऑगस्ट १९९१ रोजी एक पत्र पाठविले.** "आमच्या मुख्य अभियंत्यांनी मला असे सांगितले की आपण २३ ऑगस्ट रोजी आपल्या कार्यालयमध्ये याबाबत एक बैठक घेत आहात" अशी या पत्राची सुरुवात करून श्री. पटवर्धन यांनी असे स्पष्टपणे नमूद केले होते की "**आम्हाला या वर्षासाठी निधी अपुरा आहे अशातला भाग नाही. प्रस्तावित निधी पुरेसा असून सुद्धा शासनाकडून तो वेळेवर उपलब्ध करून दिला जात नाही. "रोकड रकमांचे कुंठीत प्रवाह" ही आमची खरी समस्या आहे.**" एवढे नमूद करूनच पटवर्धन थांबले नव्हते, तर त्या वर्षामध्ये राज्य पाणी पुरवठा मंडळासाठी एकूण प्रस्तावित असलेल्या १४० कोटीच्या निधीपैकी कोणत्या तारखेला किती रकमा देण्यात आल्या याचा तारीखवार तपशील त्या पत्रात त्यांनी नमूद केला होता. "गेल्या ५ महिन्यात ४० टक्केतरी पैसा आम्हाला मिळणे आवश्यक होते पण तो जेमतेम २० टक्केच मिळालेला आहे" असेही या पत्रात त्यांनी आकडेवारी निशी नमूद केले होते. "डिसेंबर ९३ पर्यंत योजना पूर्ण करण्याचे आश्वासन मंत्रिमहोदयांनी विधानमंडळात नुकतेच दिले आहे. आपल्या बैठकीत आपण काही ठरविण्यापूर्वी आमच्या अडचणींचा विचार करावा. **या अडचणीतून आमची सोडवणूक झाल्याशिवाय प्रकल्पपूर्तीचे वेळापत्रक मंडळाला पाळता येणार नाही.** या अडचणी मी वेळोवेळी शासनाला कळविल्या, आज आपल्याला कळवित आहे. शासनापुढे त्या आपण ठेवाव्या"

अशी विनंती विभागीय आयुक्तांना महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळाच्या सदस्य सचिवांनी केली होती.

**२९३.** हे पत्र आम्हाला विभागीय आयुक्त कार्यालयात बैठकीच्या वेळी पहायला मिळाले. अनायसे अमरावती येथील लोकप्रतिनिधींनी जबरदस्त आघाडी उघडलेली आहे, अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना प्रतिष्ठेची आहे, तीचा बराच गाजावाजा झाला आहे. तेव्हा "शासनाकडून येणाऱ्या रोख रक्कमांचा कुंठीत प्रवाह" हा जो महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळाला राज्य पातळीवर जडलेला दुर्धर विकार आहे त्यांचे काही औषध "अमरावतीच्या दवाखान्यात" सापडते काय? हे पहाण्याचा मंडळ प्रयत्न करीत आहे किंवा काय? अशी आमची सुरुवातीला भावना झाली. थोडासा तपशीलाने विचार करता आमच्या असे लक्षात आले की राज्यपातळीवर मंडळाला झालेल्या या व्याधीची बाधा अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्पपूर्तीला सुद्धा होऊ शकते अर्थात राज्य पातळीवरील हा विकार तावडतोबीने दूर करण्याची विधिमय शक्ती, ना विभागीय आयुक्तांना होती ना आम्हाला. अमरावती पुरते "काही मिक्श्चर, किंवा काही गोळ्या किंवा गरज पडल्यास एखादे इंजेक्शन" देऊन ही विकृती दूर करण्यासाठी विधिमंडळ सदस्य या नात्याने विधिमय शक्तीचा वापर करून प्रयत्न करणे एवढे आमच्या हाती अवश्य होते.

### हे हाल आणखी काही वर्षांसाठी वाढतील

**२९४.** विभागीय आयुक्त कार्यालयातील बैठक आटोपल्यानंतर समितीने घेतलेले निर्णय विभागीय आयुक्तांनी अंमलबजावणीसाठी श्री. सुरेश पटवर्धन, सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळ यांना दिनांक ५ सप्टेंबर १९९१ रोजी एक पत्र लिहून कळविले. त्या निर्णयाची/ठरावाची अंमलबजावणी तर बाजूला राहिली उलट श्री. पटवर्धन यांनी उलटटपाली विभागीय आयुक्तांना एक अर्धशासकीय पत्र (क्र.मपापुवजनिमं/सस/तांशा-१/२५८/२९५ दिनांकित १८.९.९१) लिहून मंडळाची हलाखीची स्थिती कळविली. या पत्राच्या शेवटी सदस्य सचिवांनी विभागीय आयुक्तांना स्पष्टपणे असा इषारा दिला होता की "आपण ह्या बाबतीत लक्ष घालून मदत केल्यास हा प्रश्न सुटू शकेल. **अन्यथा अमरावतीच्या नागरिकांचे पाण्यावाचून चाललेले हाल आणखी काही वर्षासाठी वाढतील एवढे मात्र नक्की.**" या पत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास मंडळाला अतिशय वाईट वागणूक राज्य शासनाकडून दिली जात होती हे स्पष्टपणे दिसत होते. या सर्व स्थितीची यथार्थ कल्पना यावी म्हणून महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळाचे सदस्य सचिव श्री. सुरेश पटवर्धन यानी विभागीय आयुक्त श्री.प्रभाकरन यांना "अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना प्रगतीचा आढावा."या विषयावर लिहिलेले दिनांक १८.९.९१ ते अर्धशासकीय पत्र मी पुढे जसेच्या तसे उधृत करीत आहे. :-

"प्रिय श्री.प्रभाकरन,

आपले दि. ५ सप्टेबर १९९१ चे अ.शा.प.क्र.प्रा.संनप्र/अम/पाणी पुरवठा का वि/१६११ मला प्राप्त झाले आहे व त्यात अमरावती पाणी पुरवठा योजना डिसेंबर १९९३ ऐवजी ऑक्टोबर १९९३ पर्यंत कार्यान्वित होऊ शकेल अशी आशा आपण व्यक्त केली आहे.

या आधीच आपणांस माझ्या १९ ऑगस्ट १९९१ च्या अ.शा.पत्रानुसार मंडळाला सध्या भेडसावणारा, **शासनाकडून होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेबाबतचा प्रश्न निदर्शनास आणला होता.** गेल्या एक महिन्याच्या काळात निधी उपलब्धतेबाबत फारशी प्रगती झालेली नसून नगरविकास विभागाने नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी उपलब्ध करून द्यावयाच्या ५७.७५ कोटी रुपयापैकी फक्त १७.३५ कोटी रुपये इतकाच निधी या आर्थिक वर्षात उपलब्ध करून दिलेला आहे. **म्हणजेच जरी या आर्थिक वर्षाचा अर्धा कालावधी संपलेला असला तरी फक्त ३० टक्के इतकाच निधी उपलब्ध करून दिलेला आहे.** सहाजिकच त्याचा परिणाम मंडळातर्फे राबविण्यांत येत असलेल्या विविध नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कामावर होत आहे. **अशा परिस्थितीत मंडळाने नियोजिल्याप्रमाणे योजनेचे काम पूर्ण होणे ही अशक्य बाब दिसते.**

आजच प्रादेशिक बातम्यामधून जाहीर झाल्यानुसार या वर्षी सर्व योजनांतर्गत कामांवरील खर्चात शासनातर्फे २० टक्के कपात करण्यात येणार आहे असे दिसते. असे झाल्यास व अशी कपात पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीतही शासनातर्फे लावण्यात आल्यास त्याचा आणखी विपरीत परिणाम निधी उपलब्धतेवर होण्याची शक्यता आहे **व परिणामी अमरावती योजनेचे कामही निधी उपलब्धतेअभावी लांबण्याची शक्यता आहे.**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार केल्यास ऑक्टोबर १९९३ पर्यंत या योजनेचे काम सदर अडचण न सोडविली गेल्यास होऊ शकणार नाही असे मला वाटते. **कृपया आपण ह्या बाबतीत शासनाशी पत्र व्यवहार करून मंडळास भेडसावणारा पैशाचा प्रश्न सोडवावा. अंदाज पत्रकात तरतूद करून हा प्रश्न सुटत नाही. कंत्राटदारांना त्यांनी केलेल्या कामाचे पैसे जर मंडळ वेळेवर देऊ शकत नसेल तर योजना पूर्ण करण्याचे आराखडे कागदावरच राहतील.** तेव्हा आपल्या विभागातील नगर पालिकांकडून मंडळास येणे असलेली रक्कम वसूल करून देण्यास व शासनाकडून अंदाज पत्रकात मंजूर केलेली रक्कम मंडळास वेळेवर देण्यास आपल्या मदतीची फार गरज आहे. आपण ह्या बाबतीत लक्ष घालून मदत केल्यास हा प्रश्न सुटू शकेल. **अन्यथा अमरावतीच्या नागरिकांचे पाण्यावाचून चाललेले हाल आणखी काही वर्षासाठी वाढतील एवढे मात्र नक्की.**

सस्नेह

आपला स्नेहांकीत
(सुरेश पटवर्धन)"

विभागीय आयुक्तांना एवढे "उघडे नागडे" पत्र एकदा नव्हे तर दोनदा सदस्य सचिवांनी लिहावे ही गोष्ट नगरविकास विभागाच्या सचिवांना आवडली नाही हे पुढे साक्षीच्या वेळी स्पष्टपणे दिसून आले. "भिकही मागू नका व जेवायलाही वाढणार नाही व शेजाऱ्याला सांगता कामा नये" अशी मंडळाकडून सचिवांची 'रास्त' अपेक्षा होती.

### पुन्हा आश्वासन समिती

**२९५.** योजनेच्या बांधकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नाही ही गोष्ट स्पष्टपणे आम्हाला डोळ्यासमोर दिसायला लागली होती. राज्य पातळीवरील या विकाराची बाधा अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेला निश्चितपणे होणार हे आम्हाला समोर दिसत होते, त्याशिवाय आखाती युद्धामुळे खरोखरच किती परिणाम झालेला आहे? हा परिणाम निष्प्रभावित करता येणार नाही काय? प्रकल्पपूर्तीचे मूळ वेळापत्रक कायम ठेवणे शक्य आहे किंवा नाही? यासारखे अनेक प्रश्न आता निर्माण झाले होते. १८ जुलै १९९१ रोजी सभागृहात झालेल्या चर्चेमध्ये व २३ ऑगस्ट १९९१ रोजी विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात त्यांच्याच अध्यक्षतेखाली झालेल्या समितीच्या बैठकीमध्ये यातील काही प्रश्नांची काहीशी उत्तरे मिळाली होती पण ती पुरेशी समाधान कारक तर नव्हतीच पण असंतोषजनक होती. अशा स्थितीत या विविध आश्वासनांच्या पूर्तीच्या बाबतीत 'विधानपरिषद आश्वासन समिती' या माध्यमाचा प्रभावी वापर करता येणे शक्य होते. याबाबतची कार्यरिती अशी असते की या समितीच्या कोणातरी सदस्यांने **प्रथम** विषय, आश्वासनांचा निश्चित तपशील व माहिती मागवावयाचे मुद्दे यांची बिनचूक माहिती समितीच्या बैठकीत सादर करावयाची असते. **समिती त्या माहितीवर विचार करुन "माहिती मागवावयाचे मुद्दे" निश्चित करते.** याबाबतच्या कार्यवाहीचा **दुसरा टप्पा** असा की मुद्दे निहाय माहिती विभागाकडून समितीकडे सादर केली जाते. **तिसरा टप्पा** हा गरज पडल्यास विभागीय सचिवांच्या साक्षीचा टप्पा असतो. पूर्वीच पाठविलेल्या माहितीने समाधान झालेले नसल्यास सचिवांना समिती समोरील साक्षीच्या वेळी त्याबाबत प्रश्न विचारुन जादा माहिती काढून घेता येते.

**************************************************

## २६
## *पुन्हा आश्वासन समितीमध्ये भरभक्कम खटपट*

**************************************************

### आश्वासन समितीने मुद्दे निश्चित केले

**२९६.** विधानपरिषद आश्वासन समितीने आपल्या सोमवार, दिनांक १४ ऑक्टोबर १९९१ रोजी झालेल्या बैठकीत माहिती मागवावयाचे मुद्दे संमत केले. या संबंधीचा समितीच्या कार्यवृत्तातील आवश्यक तो मजकूर पुढील प्रमाणे :

"यानंतर समिती सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी "अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधण्यात येत असलेल्या अमरावती शहराच्या पाणीपुरवठा योजनेस लागणाऱ्या विलंबाबाबत." या विषयाच्या संदर्भात विभागाकडून काही मुद्यांवर माहिती मागवावी असे सुचविले. त्यावर विचार करून समितीने विभागाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे संमत केले. .......

**माहिती मागवावयाचे मुद्दे :**

१) मार्च १९९० ला संपलेल्या व मार्च १९९१ ला संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये या योजनेच्या प्रत्येक उपकामावर करण्यात आलेला खर्च, त्या त्या उपकामाची त्या आर्थिक वर्षातील प्रगती व त्या त्या आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेला एकूण खर्च.

२) विधान परिषद आश्वासन समितीच्या अहवाल क्रमांक १०२ च्या

परिशिष्ट ९ मध्ये समाविष्ट असलेल्या उपकामांच्या कार्यपूर्तीची जी कालमर्यादा विभागाने सादर केलेली होती त्या संदर्भात प्रत्येक उपकामाची सप्टेंबर १९९० मधील सद्यःस्थिती दर्शविणारे विवरण.

३) मुळात नियोजित केल्याप्रमाणे ८ उपकामापैकी क्रमांक ५ चे उपकाम सोडून इतर उपकामे मुळ नियोजनाप्रमाणे कमीजास्त प्रमाणात वेळाप्रत्रकाप्रमाणे बरोबर चालू आहेत हे खरे आहे काय?

४) क्रमांक ५ चे उपकाम "अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस ग्रॅव्हिटी मेन" या कामाच्या कंत्राटाची प्रत. हे काम मूळ नियोजनाप्रमाणे ठरवून दिलेल्या वेळेच्या आत कंत्राटदाराने पूर्ण करावे याबाबत विभागाने केलेल्या प्रयत्नांचे तपशील देणारी टिप्पणी.

५) आश्वासनांत नमूद केल्याप्रमाणे ९०-९१ या वर्षात १४ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला हे खरे आहे काय?

६) "निधीच्या अभावी या योजनेला विलंब होऊ नये असेच शासनाचे धोरण आहे" असे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्ष निधीच्या अभावामुळेच विलंब होत आहे हे खरे आहे काय?

७) जानेवारी १९९१ ते सप्टेंबर १९९१ या कालखंडात क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी महिनावार किती निधीची मागणी केली होती व प्रत्यक्ष किती निधी उपलब्ध करून देण्यात आला याची माहिती देणारे विवरण.

८) सप्टेंबर १९९१ मध्ये संपलेल्या वर्षात महिनावार कंत्राटदारांची बिले मंजूर कोणत्या तारखेला करण्यात आली व प्रत्यक्ष पेमेंट कोणत्या तारखेला करण्यात आले, याची माहिती देणारे विवरण.

९) पेमेंट उशिरा करण्यात येत असल्याबाबत कंत्राटदारांनी तसे होऊ नये म्हणून गेल्या वर्षभरात लेखी तक्रारी किंवा विनंती करणारी निवेदने दिली असल्यास अशा प्रत्येक निवेदनाची प्रत.

१०) दिनांक १८.९.९१ रोजी सचिव पाणी पुरवठा मंडळ यांनी अमरावती विभागीय आयुक्तांना या विषयावर लिहिलेल्या पत्राची प्रत.

११) नियोजन विभागाने प्रसिद्ध केलेल्या "अनुशेष दूर करण्यासाठी (१) १९९१-९२ या वार्षिक योजनेत केलेल्या विशेष तरतुदी व (२) ३१ मार्च १९९१ झालेली आर्थिक प्रगती दर्शविणारी पुस्तिका" या पुस्तिकेच्या पृष्ठ ११८ वरील तक्त्यामध्ये दाखविण्यात आलेल्या जिल्हानिहाय आकडेवारीची शहरनिहाय फोड नमूद असलेले जिल्हा निहाय विवरण." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २३७-२३८)*

## सचिवांची साक्ष

**२९७.** दिनांक १४ ऑक्टोबर १९९१ रोजीच्याच बैठकीमध्ये उपरोक्त विषयावर उक्त मुद्दांना धरून नगरविकास विभागाच्या सचिवांची दिनांक २५ ऑक्टोबर १९९१ रोजी साक्ष घेण्यात यावी असाही निर्णय विधानपरिषद आश्वासन समितीने घेतला. **ठरल्याप्रमाणे २५ ऑक्टोबर १९९१ रोजी ही साक्ष झाली.** या साक्षीच्या वेळी उपस्थिती काय होती? विधानमंडळाचे तसेच नगरविकास विभागाचे कोण अधिकारी उपस्थित होते? याची माहिती देणारे या बैठकीच्या कार्यवृत्तातील सुरुवातीचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :

"दिनांक २५.१०.१९९१ रोजी विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता, भरली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

डॉ. पंजाबराव गुणवंतराव देशमुख, वि.प.स. समिती प्रमुख

श्री. मुरलीधर गंगाराम पवार, वि.प.स.

श्री. वसंत पुरुषोत्तम मालधुरे, वि.प.स.

प्रा. बी. टी. देशमुख, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अधिकारी :**

श्री. श. पां. नेरुरकर, अवर सचिव

श्री. उत्तमसिंह चव्हाण, कक्ष अधिकारी

**नगरविकास विभाग :**

१) श्री. सतीश त्रिपाठी, सचिव

२) श्री. ए. एस. नरसापूर, मुख्य अभियंता

३) श्री. सं. व्यं. दहासहस्त्र, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ, अमरावती.

विधान परिषद आश्वासन समिती समोर "अप्पर वर्धा धरण उद्भव धरून बांधण्यात येत असलेल्या अमरावती शहराच्या पाणीपुरवठा योजनेस लागणाऱ्या विलंबाबाबत" या विषयावरील सन १९९० च्या चौथ्या अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनाच्या संदर्भात व पांढरकवडा पाणी पुरवठा योजना या विषयावरील सन १९९० च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासनाच्या संदर्भात सचिव, **नगरविकास विभाग यांनी दाखल केलेली कागदपत्रे आश्वासन समितीने "विभागांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सन १९९१ च्या पुस्तका"मध्ये पृष्ठ क्रमांक ५५ ते ११३ वर समाविष्ट केलेली आहेत."** *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २४१-२४२)*

## मुद्देनिहाय स्पष्टीकरण
## मुद्दा क्रमांक - १

**२९८.** नगरविकास विभागाच्या सचिवांची २५ ऑक्टोबर १९९१ रोजीची ही साक्ष बराच वेळ चालली. त्यावेळी काय प्रश्न विचारण्यात आले? व काय उत्तरे देण्यात आली? याची माहिती करून घेण्यापूर्वी आश्वासन समितीने निश्चित केलेल्या ११ मुद्यांच्या बाबतीत नगरविकास विभागाने काय लेखी स्पष्टीकरण पाठविले होते याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. **समितीने निश्चित केलेला मुद्दा क्रमांक १ व त्यावर नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :**

"**मुद्दा क्रमांक १ :** मार्च १९९० ला संपलेल्या व मार्च १९९१ ला संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये या योजनेच्या प्रत्येक उपकामावर करण्यात आलेला खर्च, त्या त्या उपकामाची त्या आर्थिक वर्षातील प्रगती व त्या त्या आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेला एकूण खर्च

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** मार्च १९९० ला व मार्च १९९१ ला संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रत्येक उपकामावर करण्यांत आलेला खर्च व एकूण खर्च दर्शविणारा तक्ता **जोडपत्र क्र. १** जोडलेला आहे. तसेच या योजनेच्या प्रत्येक उपकामाची सन १९९० व सन १९९१ च्या आर्थिक वर्षात झालेली प्रगती दर्शविणारा तक्ता **जोडपत्र क्र. २** सोबत जोडलेला आहे.

**जोडपत्र क्र. १**

*अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना*

**योजनेच्या उपकामांवर झालेला खर्च (रुपये लाखामध्ये)**

| उपकाम | मार्च १९९० अखेर | मार्च १९९१ अखेर |
|---|---|---|
| १. इन्टेक वर्क | ८४.९८ | ८४.९८ |
| २. संप व पंप हाऊस | ३५.३३ | ४८.६२ |
| ३. अशुद्ध पाणी उपसा पंप | - | ४७.१६ |
| ४. अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्व वाहिनी | १३७६.१७ | १५००.८८ |
| ५. अशुद्ध पाण्याची पोलादी प्रीस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन | - | ३८३.३४ |
| ६. जलशुद्धी केंद्र | ४३.४६ | १०७.७४ |
| ७. शुद्ध पाण्याची (प्रीस्ट्रेस पाईप) वाहीनी | ०.६३ | ७५.९० |
| ८. वितरण व्यवस्था व जलकुंभ | २९७.०० | ३३७.०० |
| ९. साहित्य व इतर कामे | ६७.०० | ४९०.२४ |
| **एकूण खर्च** | **१९०५.१३** | **३०७५.७६** |

टिप : एकूण किंमत रु. ७८ कोटी होणार आहे. पुढील खर्चासाठी रू. ४७.२५ कोटी लागतील.

**जोडपत्र क्र. २**

*अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना*

**योजनेच्या उपकामांची प्रगती**

| उपकाम | मार्च १९९० मधिल | मार्च १९९१ सद्यस्थिती |
|---|---|---|
| १. इन्टेक वर्क : | ७० टक्के | १०० टक्के |
| २. संप व पंप हाऊस : | | |
| संप | ९० टक्के | १०० टक्के |
| पंप हाउस | ७० टक्के | ९० टक्के |
| ३. अशुद्ध पाणी उपसा पंप : | २ टक्के | २५ टक्के |

| | | |
|---|---|---|
| ४. अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्व वाहिनी : | ३० टक्के | ८० टक्के |
| ५. अशुद्ध पाण्याची पोलादी प्रीस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन : | ३ टक्के | २५ टक्के |
| ६. जलशुद्धी केंद्र : | ६ टक्के | २५ टक्के |
| ७. शुद्ध पाण्याची (प्रीस्ट्रेस पाईप) वाहीनी : | ६ टक्के | ४० टक्के |
| ८. वितरण व्यवस्था व जलकुंभ : वितरण व्यवस्था | १ टक्का | २ टक्के" |

## मुद्दा क्रमांक २ व ३ वरील स्पष्टीकरणे

**२९९.** आश्वासन समितीने निश्चित केलेला दुसरा आणि तिसरा मुद्दा व **त्यावरील नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :-**

**मुद्दा क्रमांक २ :** विधानपरिषद आश्वासन समितीच्या अहवाल क्र. १०२ च्या परिशिष्ट ९ मध्ये समाविष्ट असलेल्या उपकामांच्या कार्यपूर्तीची जी कालमर्यादा विभागाने सादर केलेली होती, त्या संदर्भात प्रत्येक उपकामांची सप्टेंबर १९९० मधील सद्यःस्थिती दर्शविणारे विवरण.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** विधानपरिषद आश्वासन समितीचे अहवाल क्र. १०२ परिशिष्ट ९ मध्ये समाविष्ट असलेल्या उपकामांच्या सप्टेंबर १९९० पर्यंतचा स्थिती दर्शविणारा तसेच सप्टेंबर १९९१ पर्यंतची स्थिती दर्शविणारा तक्ता जोडपत्र क्र. ३ जोडलेला आहे.

**जोडपत्र क्र. ३**

*अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना*

**योजनेच्या उपकामाची प्रगती**

| उपकाम | सप्टेंबर १९९० मधिल | सप्टेंबर १९९१ सद्यस्थिती |
|---|---|---|
| १. इन्टेक वर्क : | ८० टक्के | १०० टक्के |
| २. संप व पंप हाऊस : संप | ९५ टक्के | १०० टक्के |
| पंप हाउस | ८० टक्के | ९५ टक्के |
| ३. अशुद्ध पाणी उपसा पंप : | २ टक्के | ३० टक्के |
| ४. अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्व वाहिनी : | ३८ टक्के | ९० टक्के |
| ५. अशुद्ध पाण्याची पोलादी प्रीस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन : | ४ टक्के | ३० टक्के |
| ६. जलशुद्धी केंद्र : | ८ टक्के | ३० टक्के |
| ७. शुद्ध पाण्याची (प्रीस्ट्रेस पाईप) वाहीनी : | ८ टक्के | ५० टक्के |
| ८. वितरण व्यवस्था व जलकुंभ : वितरण व्यवस्था | १ टक्का | २ टक्के |
| जलकुंभ | ८० टक्के | १०० टक्के |

**मुद्दा क्रमांक ३ :** मुळात नियोजन केल्याप्रमाणे ८ उपकामापैकी क्र. ५ चे उपकामास सोडून इतर उपकामे मुळ नियोजनाप्रमाणे कमी जास्त प्रमाणात वेळापत्रकाप्रमाणे बरोबर चालू आहेत हे खरे आहे काय?

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** आश्वासन समितीचे अहवाल क्र. १०२, परिशिष्ट ९ मध्ये उपांगानुसार दर्शविलेल्या कार्यक्रमाबाबत स्पष्टीकरण करण्यात येते की, **उपकाम क्र. ५ वगळता उरलेल्या उपकामांची प्रगती सर्वसाधारण या कार्यक्रमाप्रमाणे आहे.**

## चौथ्या मुद्याबाबतचे स्पष्टीकरण

**३००.** समितीने निश्चित केलेला मुद्दा क्रमांक ४ **व त्यावर नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :**

**मुद्दा क्रमांक ४ :** क्रमांक ५ चे उपकाम "अशुद्ध पाण्याची ग्रॅव्हीटी मेन" या कामाच्या कंत्राटाची प्रत. हे काम मुळ नियोजनाप्रमाणे ठरवून दिलेल्या वेळेच्या आत कंत्राटदाराने पूर्ण करावे या बाबत विभागाने केलेल्या प्रयत्नांचे तपशील देणारी टिप्पणी.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** अशुद्ध पाण्याची "प्रिस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन" या कामाची तीनही कंत्राटांची प्रत साक्षीच्या वेळी सादर करण्यात येईल. तसेच हे काम नियोजनाप्रमाणे ठरवून दिलेल्या वेळेच्या आत कंत्राटदाराने पूर्ण करावे, याबाबत मंडळाने केलेल्या प्रयत्नासंबंधी आवश्यक ती टिप्पणी सोबत जोडलेली आहे. (जोडपत्र क्र. ४)

**जोडपत्र क्र. ४**

***आश्वासन समितीपुढे साक्ष दि. २५.१०.९१ मुद्दा क्र. ४ उपअंग क्र. ५ वरील टिप्पणी : अशुद्ध पाण्याचे १५०० मी.मी. व्यासाची प्रिस्ट्रेड कॉंक्रीट गुरुत्व वाहिनी :***

वरील काम १५०० मी. मी. व्यासाचे ३२ कि. मी. लांबीचे निरनिराळे दाबाचे पाईपचे संकल्प चित्र तयार करून बनविणे व पाईपची जोडणी करून त्याची चाचणी घेणे इत्यादी अंतर्भूत आहे. वरील कामासाठी निविदा निश्चित करुन जानेवारी १९९० मध्ये चालू करण्यात आले व कामाची मुदत डिसेंबर १९९२ पर्यंत आहे.

कंत्राटदार वरील पाईप हैद्राबाद येथे फॅक्टरीत तयार करीत असून नंतर अमरावतीला वाहतूक करतात. परंतु मागील वर्षी उद्‌भवलेल्या डिझेल टंचाईमुळे पाईपच्या वाहतुकीवर विपरित परिणाम झाला, त्यामुळे फॅक्टरीतील पाईपचा उठाव न झाल्यामुळे व पाईपकरिता जागा गुंतल्यामुळे पाईप तयार करण्याची प्रक्रिया मंदावली व पर्यायाने १५०० मि.मि. व्यासाच्या गुरूत्ववाहिनीच्या कामाच्या वेगावर परिणाम झाला.

सद्य परिस्थितीत (सप्टेंबर १९९१ अखेर) १५०० मि. मि. व्यासाच्या **गुरूत्ववाहिनीचे काम जवळपास ३० टक्के झालेले आहे. कामाची प्रगती वाढविण्यासाठी कंत्राटदारांना दररोज ८ पाईप ऐवजी १० पाईप तयार करण्यासाठी कारखान्यात यंत्रसामुग्री विस्तार करण्याचे दृष्टीने मंडळाने २०.५.९१ रोजी सूचना दिलेल्या आहेत.** वाढलेली गती लक्षात घेऊन वरील काम डिसेंबर १९९३ पर्यंत पूर्ण करता येईल.

ह्याबाबत असे निदर्शनास आणावेसे वाटते की योजनेचे मूळ आराखडे व अंदाजपत्रके यांना प्रशासकीय मंजूरी ऑक्टोबर १९८६ मध्ये मिळाली आहे. परंतु ऑगस्ट १९८८ मध्ये केंद्र शासनाकडून तांत्रिक मंजूरी प्राप्त झाल्यामुळे योजनेच्या कामाची सुरुवात करण्यास उशीर झाला.

## मुद्दा क्रमांक ५ ते ११ व त्यावरील स्पष्टीकरणे

**३०१.** आश्वासन समितीने निश्चित केलेले माहिती मागवावयाचे मुद्दे क्रमांक ५ ते ११ व त्यावर नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :-

**मुद्दा क्रमांक ५ :** आश्वासनात नमूद केल्याप्रमाणे ९०-९१ या वर्षात १४ कोटी रुपयाचा खर्च करण्यात आला हे खरे आहे काय?

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** सन १९९०-९१ च्या आर्थिक वर्षात रुपये १४ कोटी ऐवजी रुपये ११.७० कोटी एवढा खर्च झालेला आहे.

**मुद्दा क्रमांक ६ :** निधीच्या अभावी या योजनेला विलंब होऊ नये, असेच शासनाचे धोरण आहे असे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्ष निधीच्या अभावामुळेच विलंब होत आहे, हे खरे आहे काय?

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** योजनेची कामे जानेवारी १९८९ मध्ये सुरू झाली आहे व योजना डिसेंबर १९९३ मध्ये पूर्ण होणार आहे सप्टेंबर १९९१ पर्यंतची प्रगती ४० टक्के आहे. राहिलेल्या कामांसाठी निधी कमी पडू द्यावयाचा नाही. असे शासनाचे धोरण आहे.

**मुद्दा क्रमांक ७ :** जानेवारी १९९१ ते सप्टेंबर १९९१ या कालखंडात क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी महिनावार किती निधीची मागणी केली होती व प्रत्यक्ष किती निधी उपलब्ध करून देण्यात आला याची माहिती देणारे विवरणपत्र.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** जानेवारी सन १९९१ ते सप्टेंबर १९९१ या कालावधीत कार्यकारी अभियंता, प. अ. बा. वि. क्र. २ अमरावती यांनी केलेल्या निधीची मागणी व प्रत्यक्ष उपलब्ध करून देण्यात आलेला निधी याचा तक्ता जोडपत्र क्र. ५ जोडलेला आहे.

**मुद्दा क्रमांक ८ :** सप्टेंबर १९९१ मध्ये संपलेल्या वर्षात महिनावर कंत्राटदारांची बिले मंजूर कोणत्या तारखेला करण्यात आली व प्रत्यक्ष पेमेंट कोणत्या तारखेला करण्यात आले, याची माहिती देणारे विवरण.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** याबाबतचा तक्ता तयार करून जोडपत्र क्र. ६ दर्शविलेला आहे.

**मुद्दा क्रमांक ९ :** पेमेंट उशिरा करण्यात येत असल्याबद्दल कंत्राटदारांनी तसे होऊ नये म्हणून गेल्या वर्षभरात लेखी तक्रार किंवा विनंती करणारी निवेदने दिली असल्यास अशा प्रत्येक निवेदनाची प्रत.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** अशा प्रकारच्या एकूण ३ कंत्राटदारांच्या लेखी निवेदनाच्या प्रती जोडलेल्या आहेत. (जोडपत्र क्र. ७ अ ते ७ फ)

**मुद्दा क्रमांक १० :** दिनांक १८.९.९१ रोजी सचिव, पाणी पुरवठा मंडळ यांनी अमरावती विभागीय आयुक्तांना या विषयावर लिहिलेल्या पत्राची प्रत.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** या पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. (जोडपत्र क्र. ८)

**मुद्दा क्रमांक ११ :** नियोजन विभागाने प्रसिद्ध केलेल्या "अनुशेष दूर करण्यासाठी (१) १९९१-९२ या वार्षिक योजनेत केलेल्या विशेष तरतुदी व (२) (३) मार्च १९९१ अखेर झालेली आर्थिक प्रगती दर्शविणारी पुस्तिका" या पुस्तिकेच्या पृष्ठ ११८ वरील तक्त्यामध्ये दाखविण्यात आलेल्या जिल्हा निहाय आकडेवारीची शहर निहाय कोड नमूद असलेले जिल्हा निहाय विवरण".

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** याबाबतचा तक्ता जोडलेला आहे. (जोडपत्र क्र. ९) पुस्तिकेच्या पृष्ट ११८ मध्ये जिल्हावार पाणी पुरवठा अनुशेष एम.एल.डी.मध्ये दिलेला आहे. अमरावती जिल्ह्यातील शहर निहाय विवरण वरील तक्त्यात दिलेले आहे.

## या आठ उपांगाच्या बांधकामाची सद्यःस्थिती

**३०२.** विभागाने सादर केलेली लेखी माहिती समितीने सन १९९० च्या सहपत्र पुस्तिकेमध्ये पृष्ठ ५५ ते ११३ वर दाखल करून घेतली. त्यानंतर साक्षीला सुरुवात झाली. प्रकल्पाच्या बांधकामाची विभागणी सुरुवातीपासूनच निरनिराळ्या ८ उपांगामध्ये (उपकामे) करण्यात आलेली होती व त्या प्रत्येक उपकामाचे नगरविकास विभागाने सादर केलेले नियोजन समितीच्या अहवाल क्रमांक १०२ मध्ये काही महिन्यापूर्वी छापील अहवालाच्या स्वरूपात सभागृहाला सादर करण्यात आलेले होते. या आठ उपांगाच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे? याबाबत २५.१०.१९९१ रोजीच्या या साक्षीच्या सरूवातीलाच झालेली प्रश्नोत्तरे पुढील प्रमाणे :-

"**समिती प्रमुख :** आपण आता बैठकीच्या कामकाजास सुरुवात करू.

**श्री. बी. टी. देशमुख :** मार्च १९९३ पर्यंत ही योजना पूर्ण होऊ शकते अशा प्रकारचे आश्वासन १७ डिसेंबर १९९० ला दिलेले आहे याची आपणास जाणीव आहे काय?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** होय

**श्री. बी. टी. देशमुख :** आपल्या विभागाने या समितीसमोर यापूर्वी हे काम पूर्ण करण्याविषयीचे जे नियोजन दाखल केले होते आणि जे आश्वासन समितीच्या अहवाल १०२ मध्ये प्रसिद्ध झालेले आहे, त्यामध्ये हे काम फेब्रुवारी ९३ पर्यंत पूर्ण होईल असे नमूद केले आहे याची आपल्याला जाणीव आहे काय?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** होय

**श्री. बी. टी. देशमुख :** मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये असे सांगितलेले आहे की, "मार्च ९३ पर्यंत ही योजना पूर्ण होऊ शकते." समितीला आपण जी माहिती सादर केलेली आहे त्यामध्ये जोडपत्र क्र. २ वर आठ उपकामे दिलेली आहेत. त्यामधील क्रमांक १ वरील "इन्टेक वर्क" च्या कामाची आजची स्थिती काय आहे?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** हे काम १०० टक्के पूर्ण झालेले आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** संप व पंप हाऊस च्या क्रमांक दोनच्या कामाची आजची स्थिती काय आहे

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** संप चे काम १०० टक्के पूर्ण झालेले आहे. पंपहाऊसचे ९५ टक्के काम पूर्ण झालेले आहे. उरलेले काम डिसेंबर ९१ पर्यंत पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** क्रमांक ३ वरील अशुद्ध पाणी उपसा पंप हे काम मंद गतीने चालू दिसते. हे काम केव्हा पूर्ण होईल?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** मार्च ९२ पर्यंत पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** क्रमांक ४ वरील "अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्व वाहिनी" हे काम मार्च १९९१ पर्यंत ८० टक्के झालेले आहे. हे केंव्हा पूर्ण होईल?

**श्री. सं. व्यं. दहासहस्त्र, कार्यकारी अभियंता, म.रा.पा.पु.मंडळ अमरावती :** जानेवारी ९२ ला पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** क्रमांक ६ वरील "जलशुद्धी केंद्र" हे काम केव्हा पूर्ण होईल?

**श्री. सं. व्यं. दहासहस्त्र, कार्यकारी अभियंता, म.रा.पा.पु.मंडळ अमरावती :** ३० टक्के काम झालेले आहे. डिसेंबर ९२ पर्यंत काम पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** क्रमांक ७ मध्ये "शुद्ध पाण्याची (प्रिस्ट्रेस पाईप) वाहिनी" या कामाची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. सं. व्यं. दहासहस्त्र, कार्यकारी अभियंता, म.रा.पा.पु.मंडळ अमरावती :** ५० टक्के काम झालेले आहे. उरलेले काम डिसेंबर ९२ पर्यंत पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** क्रमांक ८ मध्ये "वितरण व्यवस्था व जलकुंभ" हे काम केव्हा पूर्ण होईल?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** इ.एस.आर. बांधून झालेले आहेत. फेब्रुवारी ९३ पर्यंत हे काम पूर्ण होईल." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २४२-२४३)*

## क्रमांक पाचचे उपकाम बरेच मागे रेंगाळले

**३०३.** सभागृहातील चर्चेमुळे, विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समितीच्या बैठकीमुळे आठ उपकामापैकी, सात उपकामांची प्रगती समाधानकारक आहे, मात्र त्यापैकी "अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन" हे क्रमांक पाचचे उपकाम बरेच मागे रेंगाळलेले आहे, ही गोष्ट आम्हाला माहीत झालेली होती. नगरविकास विभागाने दाखल केलेल्या माहितीमध्ये सुद्धा क्रमांक ५ च्या या कामाचा माघारलेपणा स्पष्टपणे दिसून येत होता. या कामाबावत २५.१०.१९९१ रोजीच्या या साक्षीच्या वेळी झालेल्या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख :** त्यानंतर क्रमांक ५ वरील "अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन" या कामास आखाती युद्धामुळे विलंब झाला अशी सभागृहामध्ये चर्चा झाली होती. हे काम नियोजनाप्रमाणे पूर्ण झाले तर सर्व कमिटमेंट पूर्ण होऊ शकते हे बरोबर आहे काय?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** होय.

**श्री. बी. टी. देशमुख :** जोडपत्र ४ मध्ये दिलेल्या माहितीनुसार जी व्यवस्था केलेली आहे त्यानुसार हे काम पूर्ण होईल काय?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** एक वर्षाच्या कालावधीमध्ये ३० टक्के काम पूर्ण झालेले आहे व डिसेंबर १९९२ पर्यंत हे काम पूर्ण करावयाचे आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** आपण दिलेल्या माहितीमध्ये असे म्हटले आहे की, "कामाची प्रगती वाढविण्यासाठी कंत्राटदारांना दररोज ८ पाईप ऐवजी १० पाईप तयार करण्यासाठी कारखान्यात यंत्रसामुग्री विस्तार करण्याचे दृष्टीने मंडळाने २०.५.९१ रोजी सूचना दिलेल्या आहेत" या सूचनांच्या अंमलबजावणी संदर्भात सद्यःस्थिती काय आहे?

**श्री.सं.व्यं. दहासहस्त्र, कार्यकारी अभियंता, म.रा.पा.पु.मंडळ अमरावती :** फॅक्टरीचे प्रॉडक्शन सुरू झालेले आहे. यासंदर्भात एक महिन्यानंतर पूर्ण माहिती मिळेल.

**श्री. बी. टी. देशमुख :** दररोज ८ पाईप ऐवजी १० पाईप तयार करण्याचे काम चालू आहे. मग ओरिजनल शेड्युल मेन्टेन करण्यामध्ये अडचण काय आहे?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** मला वाटते यामध्ये अडचण नाही. कामाची झालेली प्रगती पाहता शेड्युल्डमध्ये हे काम पूर्ण होईल. डिसेंबर ९२ पर्यंत काम पूर्ण व्हायचे आहे. यामध्ये क्रिटीकल काही नाही. ५ डिसेंबर १९९२ पर्यंत हे काम पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत.

**श्री. बी. टी. देशमुख :** सचिव महोदयांना हे माहीत आहे काय की, संबंध शहराला आपण सध्या बोअरने पाणी देतो. त्यामुळे ही बाब सभागृहामध्ये मंत्रिमहोदयांनी गंभीरपणे घेतली. आपल्या विभागाने त्यानुसार प्लॅनिंग गंभीरपणे केले. समितीने सुद्धा ही बाब गंभीरपणे घेतली आहे. आपण जी माहिती सादर केली त्यावरून तसा आमचा समज झालेला आहे. या आठ उपकामापैकी क्रमांक ५ च्या कामाबाबत अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आता ८ ऐवजी १० पाईप दररोज तयार करण्याचे काम चालू आहे. व ३० टक्के काम पूर्ण झालेले आहे. तेव्हा आपणांस बाकी शेड्युल मेन्टेन करण्यामध्ये काय अडचण आहे?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** एक दोन महिने मागेपुढे

झाले तर होईल. बाकी यामध्ये क्रिटीकल असे काही नाही.

**श्री. बी. टी. देशमुख :** आखाती युद्धामुळे एखादा महिना मागेपुढे झाले तर ते आम्ही समजू शकतो. तेव्हा डिसेंबर ९२ पर्यंत हे काम पूर्ण होईल याची खात्री आपण देता का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** कामाची प्रगती पाहता तशी खात्री देता येईल." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २४३-२४४)*

## विलंब भरून काढता येणार नाही काय?

**३०४.** "अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस ग्रॅव्हीटी मेन" हे आखाती युद्धामुळे मागे रेंगाळलेले ५ व्या क्रमांकाचे उपकाम आपल्याला वेग वाढवून ठरलेल्या वेळेच्या आत पूर्ण करता येणार नाही काय? कंत्राटदाराला मुदत किती दिली होती? आखाती युद्धामुळे झालेला विलंब भरून काढता येणार नाही काय? याबाबत २५.१०.१९९१ रोजीच्या या साक्षीच्या वेळी झालेली प्रश्नोत्तरे पुढील प्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख :** कंत्राटामध्ये हे काम पूर्ण करण्याची वेळ काय दिलेली आहे?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** डिसेंबर १९९२

**श्री.बी.टी.देशमुख :** कंत्राटाच्या कॉपीज समितीपुढे आपण अजून दिलेल्या नाहीत त्या देण्यात याव्यात. कंत्राटामध्ये डिसेंबर ९२ पर्यंत हे काम पूर्ण करावयाचे आहे. तसे आपण केले पाहिजे त्यासाठी आपण काय उपाययोजना करीत आहात? आखाती युद्धामध्ये जो काही विलंब झाला तो मेक-अप करण्यासाठी आपण काय केले?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** कामाची प्रगती वाढविण्यासाठी कंत्राटदारांना दररोज ८ पाईप ऐवजी १० पाईप तयार करण्यासाठी मंडळाने सूचना दिलेल्या आहेत. एकूण ५२०० पाईप पाहिजेत त्यापैकी १६०० पाईप आलेले आहेत. अजून २६०० पाईप आवश्यक आहेत. यासाठी एक वर्षापेक्षा जास्त दिवस लागतील. डिसेंबर ९२ पर्यंत हे काम पूर्ण होईल आणि नंतरचे सहा महिने टेस्टींगसाठी लागतील.

**श्री. बी. टी. देशमुख :** कॉन्ट्रॅक्टरने दिलेल्या मुदतीमध्ये काम पूर्ण केले पाहिजे. यादृष्टीने विभागाला काही करता येणार नाही का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** डिसेंबर पर्यंत पाईपचा सप्लाय होईल आणि नंतरचे सहा महिने टेस्टींगच्या कामासकट हे काम पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** डिसेंबर पर्यंत कन्स्ट्रक्शन पूर्ण होणार आहे का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** मला खात्री आहे की, हे काम डिसेंबर १९९२ पर्यंत किंवा जानेवारी १९९३ पर्यंत कन्स्ट्रक्शनचे काम पूर्ण होईल. आणि जून-जुलै पर्यंत टेस्टींगच्या कामासकट हे काम पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** डिसेंबर १९९२ किंवा जानेवारी १९९३ पर्यंत कन्स्ट्रक्शनचे काम पूर्ण होईल यादृष्टीने विभागातर्फे काळजी घेतली जाईल का? तसेच या कालावधीमध्ये हे काम पूर्ण होईल याची आपल्याला खात्री आहे का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** होय, जानेवारी १९९३ मध्ये कन्स्ट्रक्शनचे काम पूर्ण होईल आणि त्यानंतर टेस्टींगसाठी वेळ लागेल. जून-जुलैपर्यंत टेस्टींगच्या कामासकट हे काम पूर्ण होईल.

**समिती प्रमुख :** काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कॉन्ट्रॅक्टरवर बंधन घालत नाही का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** काम पूर्ण होण्यासाठी अनफोर्सिन आणि आखाती युद्धामुळे वेळ झालेला आहे. डिझेलच्या टंचाईमुळे ट्रान्स्पोर्टचाही प्रश्न निर्माण झाला होता." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २४५-२४६)*

## कॅशफ्लो बरोबर नसण्याची कारणे काय ?

**३०५.** ज्याची कल्पना करता येणार नाही (अनफोर्सिन) अशा, आखाती युद्धासारख्या, कारणामुळे विलंब झाला असेल तर त्याबद्दल कंत्राटदाराला जबाबदार धरता येणार नाही ही गोष्ट साक्षीवरून स्पष्ट झाली होती. त्यानंतर प्रश्न निघाला निधीचा. तरतूद किती आहे? खर्च किती केला? किती करणार? कंत्राटदाराची देणी का थकली आहेत? त्यांनी तक्रारी का केल्या आहेत? कॅशफ्लो बरोबर नसण्याची कारणे काय? याबाबत २५.१०.१९९१ रोजीच्या या साक्षीच्या वेळी झालेली प्रश्नोत्तरे पुढील प्रमाणे :-

"**समिती प्रमुख :** १९९०-९१ मध्ये या योजनेसाठी १४ कोटी रुपये मंजूर झाले. त्यापैकी ११ कोटी ४० लाख रुपये खर्च झाले आहेत. तेव्हा राहिलेली रक्कम लॅप्स झाली का? ही रक्कम परत मिळते का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** आम्ही शेड्युलींग तयार केलेले आहे. तसेच दरवर्षी आम्ही ॲक्शन प्लॅन तयार करतो. यावर्षी कोणत्या योजनेवर किती खर्च करावयाचा आहे? हे ठरविले जाते. जर त्यावर्षी काही रक्कम शिल्लक राहिली तर ती परत मिळते. तशी कमिटमेंट आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** जोडपत्र क्र. ५ मध्ये फंडच्या संबंधात माहिती दिली आहे. तेथील डी.पी.डी.सी. मध्ये प्रश्न उपस्थित झाला होता की, पुरेसा पैसा उपलब्ध न झाल्यामुळे या कामाचे पेमेंट होत नाही. कॉन्ट्रॅक्टर कडून पेमेंटच्या बाबतीत वारंवार तक्रारी होतात. याबाबतीत काही स्थायी स्वरूपाची व्यवस्था केली आहे का किंवा करणार आहात का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** या कामाच्या प्रगतीमध्ये फिजिकल डिले झाले आहे पण सिपेज झालेला नाही. या योजनेमधील आठ कामापैकी चार-पाच कामे वेळेच्या आत पूर्ण केलेली आहेत. परंतु काही कंम्पोनंटवर तेवढा खर्च झालेला नाही हे खरे आहे. आता हिशोब केला आहे. तेव्हा पैशाच्या कमतरतेमुळे या कामाची प्रगती कमी होणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** डी.पी.डी.सी. च्या बैठकीमध्ये आणि विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये पेमेंटच्या बाबतीत डिले होतो आणि याबाबतीत कॉन्ट्रॅक्टर वारंवार तक्रारी करतात हा मुद्दा उपस्थित झाला होता हे खरे आहे का? कॅश फ्लो बरोबर होत नाही. तसेच येथील काही कामाच्या बाबतीत सिमेंट आणि लोखंड काही कॉन्ट्रॅक्टरनी विकत आणावयाचे आहे अशी व्यवस्था आहे का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** होय.

**श्री.बी.टी.देशमुख :** असे असेल आणि पेमेंट वेळेवर होत नसेल तर कामाला विलंब होणार हे उघड आहे.

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** पैसा कमी पडल्यामुळे काम पूर्ण झाले नाही किंवा कामाची गती कमी झाली, असे आम्ही होऊ देणार नाही, याबाबतीत अशी खात्री देऊ शकतो. **मेंबर सेक्रेटरींनी जे पत्र लिहिले आहे. त्यामध्ये जे प्रश्न उपस्थित झाले आहेत ते जनरल स्वरूपाचे आहेत.** दरवर्षी बजेटपूर्वी प्लॅनिंग केले जाते. पूर्वीची राहिलेली रक्कम धरून त्याप्रमाणे त्यावर्षी विभागामार्फत बोर्डाला वेळोवेळी पैसा उपलब्ध करून दिला जातो. पण बोर्डावर सुद्धा काही बाबतीत ताण पडतो. बोर्ड ज्या योजना करते त्यामध्ये एल. आय. सी. कडून ग्रॅन्ट इन एड लोन मिळते आणि पब्लीक कॉन्ट्रीब्युशन जे एजन्सीकडून मिळते. मी हे जनरल स्वरूपामध्ये बोलत आहे. लोनचे रिपेमेंट लोकल बोर्डाकडून व्हावयास पाहिजे. जर त्यांनी केले नाही तर त्याची बांधिलकी बोर्डाची आहे. आज असे चित्र आहे की, जवळ जवळ सर्व ठिकाणी डिफॉल्टस आहेत. म्युनिसिपालटीकडून बोर्डाला १३० कोटी रुपयांचे येणे आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** या योजनेसाठी पैसा अप टू डेट मिळतो का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** अमरावती योजनेमध्ये सिपेज नाही. या योजनेचे काम पैशाच्या कमतरतेमुळे मंद होणार नाही. मेंबर सेक्रेटरींनी पॉईंट आउट केलेले आहे की, म्युनिसिपालटीकडून जे येणे आहे ते वेळेवर उपलब्ध होत नाही त्यामुळे पैशाच्या ओघ खंडित होतो. *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २४६-२४८)*

## "सदस्य सचिवांचे "ते" वैयक्तिक मत आहे"

**३०६.** महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळाच्या सदस्य सचिवांनी विभागीय आयुक्तांना लिहिलेल्या पत्राचा प्रश्न सुद्धा या साक्षीच्या वेळी निघाला. मंडळाच्या स्थितीमध्ये सुधारणा व्हावी म्हणून सदस्य सचिव या नात्याने श्री. पटवर्धन करीत असलेल्या धडपडीविषयी दोन शब्द बरे बोलण्याऐवजी "ते त्यांचे वैयक्तिक मत आहे त्याला शासनाचा पाठिंबा नाही" असे मत २५.१०.१९९१ रोजीच्या या साक्षीच्या वेळी नगरविकास सचिवांनी व्यक्त केले. तो साक्षीच्या अधिकृत प्रतिवेदनातील भाग पुढील प्रमाणे :

"**श्री.बी.टी.देशमुख :** मेंबर सेक्रेटरींनी जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये या योजनेचा उल्लेख आहे. गेल्या वर्षी या योजनेवर आपण जेवढा खर्च करणार होतो तेवढा तो खर्च करता आलेला नाही. तेव्हा यावर्षी प्लॅनिंगप्रमाणे जी रक्कम उपलब्ध होणार आहे त्यामुळे कॅश फ्लोच्याबाबतीत अडचण येणार नाही यादृष्टीने

व्यवस्था केलेली आहे का किंवा करणार आहात का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** याची व्यवस्था केलेली आहे. या योजनेसाठी यावर्षी १४ कोटी रुपये ठेवण्यात आले आहेत.

**श्री. बी. टी. देशमुख :** एवढ्या रक्कमेची मागणी केलेली आहे का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** बोर्डाने तेवढ्याच रक्कमेची मागणी केलेली आहे. पैसे खर्च झाले नाहीत म्हणून योजना सोडून देणार असे नाही. दरवर्षी ॲक्शन प्लॅन तयार केला जातो. यावर्षी बोर्डाकडून १४ कोटी रुपयांची मागणी आली होती. ही मागणी आम्ही ग्राह्य धरली आणि त्याप्रमाणे रक्कम प्रोव्हाईड केलेली आहे.

**श्री. वसंतराव मालधुरे :** निधीच्या बाबतीत टाईम प्रोग्राम आखून दिलेला आहे का? त्याप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जातो का?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** बोर्डाकडून एकत्रित स्वरुपाची मागणी येते आणि त्याप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जातो.

**श्री. बी. टी. देशमुख :** या योजनेच्या संदर्भात कॅश फ्लोच्या बाबतीत अडचण झाली हे सभागृहामध्ये मान्य केलेले आहे. डी.पी.डी.सी.च्या बैठकीमध्ये आणि विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये देखील ही बाब निदर्शनास आली आहे. तसेच मेंबर सेक्रेटरी श्री.पटवर्धन यांच्या पत्रामध्ये देखील स्पष्टपणे म्हटले आहे.

**Shri. Satish Tripathi :** Sir, Shri. Patwardhan has done so in his capacity as a member Secretary. It has no sanction of the Government. Generally, I agree that there is a delay in payment because of disturbed cash flow. We have some constraint and realease of funds are a bit slow. I do admit, it is unfortunate, but true, It has not affected the work. In the month of December to March more work is done, and in rainy season the work is slow." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २४८-२४९)*

### निधी उपलब्धतेची चर्चा

**३०७.** सन १९९१-९२ मध्ये निधी उपलब्ध आहे किती? या योजनेसाठी प्रत्यक्ष दिला किती? उरलेल्या रकमा केंव्हा देणार? २० टक्क्याची सर्वसाधारण कपात या योजनेला सुद्धा लागू पडणार किंवा कसे? याबाबत २५.१०.१९९१ रोजीच्या या साक्षीच्या वेळी तपशीलवार ऊहापोह झाला. त्याच्या नोंदी पुढील प्रमाणे :-

"**समिती प्रमुख :** १४ कोटी रुपयापैकी ५.७४ कोटी रुपये खर्च झाला आहे. राहिलेली ८.२५ कोटी रुपयाची रक्कम देण्याच्या बाबतीत काय प्लॅनिंग केलेले आहे?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** आम्ही बोर्डाला लमसम पेमेंट देतो.

**श्री. बी. टी. देशमुख :** या योजनेच्या बाबतीत शासनाच्यावतीने सचिवांनी काळजी घेतली पाहिजे. तसेच मघाशी माननीय समिती प्रमुखांनी विचारल्याप्रमाणे जी रक्कम शिल्लक राहिलेली आहे त्याबाबतीत प्लॅनिंग केलेले आहे का? गेल्या सहा महिन्यामध्ये तीन वेळा हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. कॅश फ्लोचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे कामाची प्रगती मंद होते. त्याबाबतीत काय व्यवस्था केली आहे हे जाणून घ्यावयाचे आहे.

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** १९९१-९२ या वर्षासाठी शासनाने १४ कोटी रुपये या योजनेकरता देण्याचे मान्य केले आहे. आताच बोर्डाकडून २५ कोटी रुपयांची मागणी आलेली आहे आणि ती आम्ही फायनान्स डिपार्टमेंडकडे पाठविली आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** सध्या या योजनेच्या पेमेंटच्या बाबतीत काय परिस्थिती आहे? किती पेमेंटच्या बाबतीत डिले झालेला आहे?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** ५० लाख रुपयांच्या पेमेंटच्या बाबतीत डिले झाला आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** १९९१-९२ साठी १४ कोटी रुपये या योजनेकरता शासनाने मान्य केले असून त्यापैकी ५.७५ कोटी रुपये खर्च झाला आहे. उरलेल्या ८.२२ कोटी रुपयांच्या बाबतीत काय प्लॅनिंग करणार आहात?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** या योजनेसाठी पैशाची कमी नाही. आता गव्हर्नमेंट एक्सपेंडीचरवर २० टक्क्याचा कट लावलेला आहे. पण शासनाचे असे धोरण आहे की, ज्या योजनांची कामे चालू आहेत त्यांना प्रथम प्रॉयारिटी द्यावयाची. त्यानुसार अमरावतीच्या योजनेसाठी प्रथम प्रॉयारिटी देणार आहोत. ५० परसेंट काम झालेले आहे तेव्हा या योजनेसाठी आम्ही त्यांना पैसे रिलीज करू.

**श्री. बी. टी. देशमुख :** या वर्षी ६ कोटी रुपये आपण मार्च पर्यंत देणार आहात. पुढच्या वर्षात किती खर्च होणार आहे?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** त्याचेही एस्टिमेट तयार केलेले आहे. ऍक्शन प्लॅन तयार केलेला नाही. प्रत्येक वर्षी वेगवेगळे प्लॅन तयार करण्यात येतात. पुढच्या वर्षासाठी २० कोटीचे फोरकास्ट केलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** कॅश फ्लो हा तुमच्या किंवा आयुक्तांच्या पातळीवर मॉनिटर होऊ शकेल काय?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** ॲन्युअल ॲक्शन प्लॅन प्रमाणे आम्ही मॉनिटरिंग करू शकतो." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २४९-२५१)*

**३०८.** पुन्हा 'कॅश फ्लो' चा प्रश्न चर्चेसाठी आला, बोर्डाने निधी मागितला किती होता? व दिला किती? याची चर्चा आली. या वर्षात उरलेले ९ कोटी कशाप्रकारे या योजनेसाठी उपलब्ध करून देणार? याची चर्चा झाली. "१५ दिवसात दीड कोटीची रक्कम आम्ही रिलिज करू" असेही सचिवांनी समितीला २५.१०.१९९१ रोजीच्या या साक्षीच्या वेळी सांगितले (तेथेच ही साक्ष संपली) ते पुढील प्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख :** कॅश फ्लोमुळे कामे अडून राहिलेली आहेत असे रेकॉर्डवर आलेले आहे.

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, पैशामुळे कामे अडून राहिलेली नाहीत. काही वेळेला आम्हाला पैसे सरेंडर करावे लागतात. तसेच पैसे नाहीत म्हणून स्कीम लॅप्स होते असेही होत नाही.

**श्री. बी. टी. देशमुख :** ९ कोटीचे आपण महिना निहाय प्लॅन देऊ शकाल काय?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** आम्ही लमसम रक्कम रिलीज करतो. आता २५ कोटीची मागणी आलेली आहे. २५ कोटी रिलीज करू.

**श्री. बी. टी. देशमुख :** किती कालावधीत ते रिलीज करणार?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** ते फायनान्स डिपार्टमेंटवर अवलंबून आहे?

**श्री.बी.टी.देशमुख :** कॅश फ्लोचा प्रोब्लेम नाही असे आपण सांगितलेले आहे. आता मार्च पर्यंत जे ९ कोटी रुपये द्यावयाचे आहेत त्याचे आपण आम्हाला शेड्युल द्या.

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** मागचा पुढचा बॅकलॉग कॅचअप करावयाचा आहे. आम्ही अप-टू-डेट पिक्चर तुम्हाला देऊ.

**श्री. बी. टी. देशमुख :** बोर्डाची पूर्वीची रक्कम आपण पूर्ण केलेली नाही. त्या संदर्भात आपण कोणती ॲक्शन घेणार आहात.

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** त्यांचे प्रोजेक्शन ओव्हर ॲम्बीशस आहे त्यांची इमिजिएट रिक्वायरमेंट ५० लाखाची आहे. एप्रिलमध्ये त्यांनी १४७ लाखाची मागणी केली होती त्यावेळी १३० लाख दिले. मे मध्ये १४० लाखाची मागणी केली होती त्यावेळी ६० लाख दिले. त्यानंतर त्यांनी १९० लाखाची मागणी केली, त्यावेळी १२५ लाख दिले. या सर्व रिॲलिस्टीक डिमांडस आहेत. एकूण रक्कम ही ४ कोटी पर्यंत जाते.

**श्री. बी. टी. देशमुख :** आपण मागणी प्रमाणे रक्कम दिली असती तर त्यांना तेवढी कामे पूर्ण करता आली असती की नाही?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** मी असे सांगू शकत नाही.

**श्री. वसंतराव मालधुरे :** आयुक्तांच्या पातळीवर झालेल्या बैठकीमध्ये मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी आम्हाला सांगितले की, कॅश फ्लो कमी असल्यामुळे कामे होऊ शकत नाहीत. जोडपत्र ५ मध्ये १६.६८ लाखाची मागणी केलेली आहे. आपण फक्त ९.२५ लाख दिलेले आहेत. पुढच्या महिन्यामध्ये या योजनेची एक कोटीची कामे होऊ शकतील काय?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** इमिजिस्ट रिक्वायरमेंट कितीची आहे? अशी बोर्डाला विचारणा केली असता त्यांनी ५० लाखाची रिक्वायरमेंट असल्याचे सांगितले. आता पर्यंत पेंडीग ५० लाख अधिक या महिन्यातील रिक्वायरमेंट अशी रक्कम द्यावयाची आहे. दुसरे असे की, आम्ही जेवढी मागणी करतो त्यापेक्षा फायनान्स डिपार्टमेंट कडून आम्हाला कमी रक्कम मंजूर करण्यात येते. यावेळी ४० कोटीची मागणी केली होती परंतु फक्त १५ कोटी मंजूर करण्यात आले. बोर्डाला १.५० कोटीची जी रक्कम रिलीज करावयाची आहे ती आम्ही १५ दिवसात रिलीज करू बोर्ड महानगरपालिकेला रिलीज करेल.

**श्री. बी. टी. देशमुख :** ९ कोटी रुपये आपण कशा रीतीने व कोणत्या वेळाप्रमाणे रिलीज करणार आहात त्याचीही माहिती आपण समितीला १५ दिवसात द्यावी.

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** १५ दिवसात आम्ही माहिती देऊ.

**श्री.मालधुरे :** पाणी पुरवठ्याच्या योजनेकरिता पैसे कमी पडणार नाहीत असे आपण सांगितलेले आहे.

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** होय, या योजनेकरिता पैसे कमी पडणार नाहीत.

**श्री. बी. टी. देशमुख :** बॅकलॉगच्या संदर्भात जिल्हा निहाय माहिती मागितलेली होती. आपण एकाच जिल्ह्याची माहिती दिलेली आहे. ही माहिती आपण शहरनिहाय द्यावी. शहरनिहाय माहिती आपण समितीला किती दिवसात देऊ शकाल?

**श्री. सतीश त्रिपाठी, सचिव, नगरविकास विभाग :** एक महिन्यात ही माहिती देऊ." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९१ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २५१-२५२)*

### योजनेची कामे विविध कारणांमुळे होऊ शकणार नाहीत

**३०९.** अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीत या प्रश्नाचा ऊहापोह होऊन विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली "देखरेख समिती" अस्तित्वात आली होती. त्या समितीची बैठक झाली होती. कोणत्या उपांगाच्या कार्यपूर्तीस विलंब लागत आहे हे त्या समितीने निश्चित केले होते. सचिवांच्या साक्षीमध्ये सुद्धा पाचव्या क्रमांकाच्या उपकामामुळे विलंब लागत आहे ही गोष्ट पुन्हा एकदा कळून चुकली होती. अशा या पार्श्वभूमीवर विधानपरिषद सभागृहामध्ये याचा जोरदार पाठपुरावा करणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटले. **शुक्रवार, दिनांक ९ डिसेंबर १९९१** रोजी सर्वश्री. बी. टी. देशमुख, राजाभाऊ उदगिरकर, सुरेश पाटील, टी.एफ. पवार यांचा "अमरावती शहरास अप्पर वर्धा पाटबंधारे प्रकल्पापासून पाईप टाकून पाणीपुरवठा करण्याची योजना " या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १३५४४ हा प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये सातव्या क्रमांकावर उत्तरासाठी होता "अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस्ड ग्रॅव्हीटीमेन हे काम वेग वाढवून ठरलेल्या मुदतीत कंत्राटदाराने पूर्ण केल्यास अप्पर वर्धा धरणातून अमरावती शहरासाठी बांधण्यात येत असलेली पाणी पुरवठा योजना नियोजित कालखंडामध्ये (मार्च १९९३ पर्यंत) पूर्ण करता येऊ शकते अशी शिफारस जिल्हा नियोजन व विकास परिषदेने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने दिनांक २३ ऑगस्ट १९९१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये केली आहे हे खरे आहे काय?" या प्रश्न भाग १ ला नगरविकास मंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे यांनी "होय, हे खरे आहे." असे उत्तर दिले होते. "असल्यास, ही योजना नियोजित वेळी पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे?" या प्रश्न भाग २ च्या उत्तरामध्ये शासनातर्फे "समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे मार्च १९९३ पर्यंत योजनेची कामे विविध कारणांमुळे होऊ शकणार नाहीत, असे नुकत्याच घेतलेल्या आढाव्यानुसार आढळून आलेले आहे. तरीही १९९१ च्या पावसाळी अधिवेशनात दिलेल्या आश्वासनानुसार ह्या योजनेची सर्व कामे डिसेंबर १९९३ पूर्वी करण्याचे दृष्टीने मंडळातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी गुरूत्ववाहिनीचे पाईप्स तयार करण्याचे कामास गती देण्यात आली आहे." असे नमूद करण्यात आले होते. "नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग ३ ला नगरविकास मंत्र्यांनी "(१) योजनेच्या कार्यपूर्तीस मोठे पाईप्स पुरवठ्यास लागणारा जादा कालावधी. (२) आखाती युद्धामुळे झालेल्या डिझेल टंचाईमुळे पाईपच्या वाहतुकीवर विपरित परिणाम होऊन पर्यायाने कामाच्या वेगावर परिणाम झाला." असे उत्तर दिले होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : सोमवार, दिनांक ९ डिसेंबर १९९१ : खंड ९४, क्रमांक ५, पृष्ठ ४८)*

### सन १९९० व ९१ या दोन वर्षातील भरगच्च व भरभक्कम पाठपुरावा

**३१०.** प्रश्न तयार करणे, प्रश्न अस्वीकृत होणार नाही याची काळजी घेणे, अस्वीकृत झाल्याचे कळताच तो कोणत्या कारणासाठी अस्वीकृत झालेला आहे याची माहिती करून घेऊन त्या कारणांची पूर्तता करणे, व तो स्वीकृत होईल याची काळजी घेणे, ठरलेल्या वेळापत्रकानुसारच प्रकल्पपूर्ती व्हावी, आखाती युद्धासारख्या अनपेक्षित संकटामुळे कार्यपूर्ती पुढे सरकणार असेल तर ती फार पुढे सरकू नये, सरकलेले वेळापत्रक मूळ पदावर आणता आले तर आणावे, यासाठी सभागृहातील चर्चेमध्ये ठाम आश्वासने मिळावी म्हणून ठोस प्रयत्न करणे, कष्टपूर्वक व मेहनतीने मिळविलेल्या आश्वासनांना सूचीबद्ध करणे, ती विधान परिषद आश्वासन समितीच्या लक्षात आणून देणे, त्या आश्वासनाच्या पूर्तीसाठी शासनाने सादर केलेल्या कारवाई विवरणपत्रांची छाननी करणे, शासनाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे समितीसमोर मांडून मंजूर करवून घेणे, विभागाकडून आलेली माहिती समितीकडे नोंदबद्ध करवून घेणे, त्या माहितीची छाननी करणे, गरजेनुसार विभागीय सचिवांना साक्षीसाठी बोलाविणे, आश्वासन पूर्तीची सद्यःस्थिती त्या माध्यमातून जाणून घेणे, जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये विषय उपस्थित करून जिल्हा पातळीवर "आवश्यक तो उजेड" पडलेला आहे किंवा नाही याची शहानिशा व खात्री स्थानिक अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे करून घेणे, जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या माध्यमातून विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीकडून प्रकल्पाच्या बांधकामाची "देखरेख" करणे, **इत्यादी बहुविध सांसदीय आयुधांच्या वापरातून भरगच्च असा प्रकल्पपूर्तीचा पाठपुरावा आम्ही लोकप्रतिनिधींनी भरभक्कमपणे १९९० व १९९१ वर्षात चालविलेला होता. मनाला संतोष व समाधान वाटावे असे जबरदस्त यश आमच्या या पाठपुराव्याला आलेले होते/येत होते.**

***************************************************

## २७
## *मुख्यसचिवांच्या हीन कारवाईमुळे प्रकल्प अडचणीत*

***************************************************

### पुन्हा नवे सुलतानी संकट

**३११.** एका बाजूला वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाचा मनाला संतोष देणारा असा हा पाठपुरावा सन १९९१ या वर्षामध्ये आम्हा लोकप्रतिनिधींच्या मार्फत सर्व आघाड्यांवर समाधानकारकपणे सुरू असतांना १९९१ च्या शेवटास या योजनेचा उद्‌भव असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या बांधकामावर आणखी एक नवे व यापूर्वी वर्णन केलेल्या संकटापेक्षा जबरदस्त आघात करणारे सुलतानी संकट येऊन कोसळले. या संकटाचे स्वरूप काय होते? त्याची सुरुवात कशी झाली? आणि त्या संकटाचा यशस्वी मुकाबला कसा करण्यात आला याची माहिती करून घेणाऱ्याला ही एखाद्या नाट्यातील थरारक अशी कल्पित घटना वाटेल व त्याबरोबरच इतके हृदयशून्य अधिकारी इतक्या वरिष्ठ पदावरून "लोकांचा कारभार" इतक्या हृदयविदारक पद्धतीने पहातात याचे नवल वाटल्याशिवाय रहाणार नाही.

### काम बंद पडता कामा नये

**३१२.** मार्च १९९१ चे अंदाजपत्रकी अधिवेशन मुंबई येथे सुरु झाले. पाटबंधारे विभागाने अप्पर वर्धा धरणाच्या कामाचा वेग चांगलाच वाढविला होता अणि "मोनोलिथ सहा" चे काम जवळ जवळ ३२५ तलांकापर्यंत येऊन पोचले होते.८ मार्च १९९१ रोजी श्री. विठ्ठलराव हांडे यांनी "मध्यम व मोठ्या प्रकल्पांच्या कामासाठी स्वतंत्र जलसिंचन महामंडळाची त्वरीत स्थापना करणे" या विषयावर सर्वसाधारण चर्चा उपस्थित केली. खरे म्हणजे या चर्चेत भाग घेऊन अप्पर वर्धा धरणाचे काम तलांक ३२५ च्या पुढे चालू ठेवण्याची खास परवानगी देण्याची मागणी करण्याचे मी ठरविले होते. पण तसे मला करता आले नाही याचे कारण नेमके याच चर्चेच्या वेळी तालिका सभापती या नात्याने सभापती म्हणून काम करण्यास्तव माझी "ड्युटी" लागलेली होती. चर्चेला पाटबंधारे विभागाचे राज्यमंत्री श्री. रणजित देशमुख हे उत्तर देत होते. त्यांनी स्वतः अप्पर वर्धा प्रकल्पाबाबत ८-१० महिन्यापूर्वी लक्ष घातलेले होते व त्यामुळे त्यांच्या उत्तराच्या भाषणात याचा उल्लेख अपरिहार्यपणे आला. ते म्हणाले "अध्यक्ष महोदय, विदर्भातील अनेक प्रकल्पाचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला आहे. त्याकडे मी लक्ष देईन. आणि या प्रकल्पाच्या कामांना वेग देण्याचा प्रयत्न केला जाईल. अप्पर वर्धा प्रकल्पासाठी केंद्र सरकारची अडचण असताना सुद्धा आणि वन जमीन देण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला नसतानासुद्धा महाराष्ट्र शासनाने काम सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे व काम सुरू ठेवले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून यामध्ये आपण स्वतः लक्ष घालून आणि ..." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक ८ मार्च १९९१ : खंड ९२, क्रमांक ३, पृष्ठ ६७)*

## काम बंद पडणार नाही असे आश्वासन

**३१३.** चर्चेला मा. मंत्रिमहोदय उत्तर देत असतांना त्यात हस्तक्षेप करणे बरोबर नाही याची मनात पूर्ण जाणीव असतांना न रहावून मी "चेअर" मधूनच त्यांना असे विचारले की, "या प्रकल्पाला विशेष बाब म्हणून ३२५ मीटरपर्यंत काम करण्यास परवानगी दिली आहे. ते काम ३२५ पर्यंत झाल्यानंतर बंद पडेल, त्यानंतर ते काम चालू ठेवण्याची परवानगी आपण देणार आहात काय?" त्यावर मा. राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले की, "तसा निर्णय घेतला जाईल, पूर्ण करण्याच्या दृष्टीने जी कमिटमेंट आहे त्यामध्ये मागे राहणार नाही." "हे काम ३२५ तलांकानंतरही चालू राहील का?" असे मी "चेअर" मधून पुन्हा विचारले तर राज्यमंत्रीमहोदय यांनी "काम चालू राहील" असे उत्तर दिले. दोनही वेळा दिलेल्या उत्तरामध्ये असा आदेश काढण्यासाठी कोणतीही मुदत मंत्रिमहोदयांनी दिलेली नव्हती हे लक्षात आल्यामुळे मी थोडासा अस्वस्थ होतो पण नेमकी हीच गोष्ट या प्रश्नाची तपशीलवार माहिती असलेले या विभागातील ज्येष्ठ सदस्य श्री रा. सु. गवई यांच्या नजरेतून सुटलेली नव्हती. मा. राज्यमंत्र्यांचे उत्तर आटोपल्यानंतर झालेल्या अनुपुरक प्रश्नोत्तरामध्ये श्री. रा. सु. गवई यांनी असा प्रश्न विचारला की, "अध्यक्ष महाराज मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. मा. मंत्रिमहोदयांनी अप्पर वर्धाचा उल्लेख केला आहे आणि याबाबत मुख्यमंत्र्यांनी खास लक्ष घातले आहे. हे सुध्दा निर्विवाद सत्य आहे. समुद्र सपाटीपासून ३२५ मिटरपर्यंत काम सुरु करावे असे सांगितले होते. माझ्या माहिती प्रमाणे ३२५ मिटर पर्यंत काम झालेले आहे, तेव्हा मार्चनंतर हे काम बंद होणार नाही यादृष्टीने मंत्रिमहोदय आश्वासन देतील काय?" त्याला मा. राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले की, "केंद्र सरकारकडे हा वनजमिनीचा प्रश्न आपण घेतला आहे आणि तो अंतिम स्टेजला आहे. केंद्र सरकारचे अधिकारी आणि वन अधिकारी यांना मी बैठकीसाठी बोलाविले आहे. १० ते १५ दिवसामध्ये ही गोष्ट क्लिअर होईल असे आहे. **परंतू झाली नाही तरी जसे आतापर्यंत काम चालू होते तसेच पुढे चालू ठेवावे असे सांगण्यात येईल.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक ८ मार्च १९९१ : खंड ९२, क्रमांक ३, पृष्ठ ६९)*

## शासनाचा धोरणात्मक निर्णय

**३१४.** एका बाजूला केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता मिळालेली नाही व खास परवानगीने सुरू असलेले तलांक ३२५ पर्यंतचे काम पूर्ण झालेले, अशा स्थितीत पुन्हा उन्हाळ्यामध्ये तलांक ३२५ वर हे काम बंद पडले. जुलै १९९१ च्या अधिवेशनात "अप्पर वर्धा धरणाचे काम तलांक ३२५ वर बंद पडण्याची निर्माण झालेली स्थिती" या विषयावरील प्रश्न पुन्हा **३० जुलै १९९१** रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १०१८९ च्या निमित्ताने चर्चेसाठी आला. अगोदरच्याच दिवशी २९ जुलै रोजी "राज्य सरकारने आवश्यक ती माहिती न पुरविल्याने केंद्राने अप्पर वर्धा प्रकल्प फेटाळला आहे." असे उत्तर पर्यावरण मंत्री श्री. कमलनाथ यांनी लोकसभेत दिले होते, ते ३० तारखेच्या वृत्तपत्रात छापून आले होते. त्या चर्चेचा उहापोह न करता केंद्राची परवानगी मिळाली नाही तरी खास परवानगीने काम सुरु ठेवले जाईल यावर चर्चेत भर देणे आवश्यक होते. "**अप्पर वर्धा धरणाच्या मध्यवर्ती उत्प्लव मार्गाचे काम तलांक ३२५ वर बंद पडलेले आहे ही गोष्ट खरी आहे काय?**" या प्रश्नाला "**होय**" असे उत्तर पाटबंधारे मंत्र्यांनी दिले होते. "खरे असल्यास तलांक ३२५ च्या पुढेही काम चालू ठेवण्याचे आदेश निर्गमित न होण्याची कारणे काय आहेत?" या प्रश्नाला त्यांनी "वन जमीन हस्तांतरणास केंद्र शासनाची अद्याप मंजूरी मिळाली नसल्याने उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे धरणाचे बांधकाम ३२५ मी. तलांकाचे पुढे चालू ठेवण्याबाबत आदेश निर्गमित झालेले नाही." असे लेखी उत्तर दिले होते. "**तलांक ३२५ पर्यंतचे काम करण्यास तुम्हाला केंद्र शासनाची परवानगी मिळाली होती काय?**" असा पहिलाच उपप्रश्न मी विचारला असता राज्य मंत्र्यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले."मागच्या वर्षाच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न चर्चेसाठी आला होता त्यावेळी ३२५ तलांकापर्यंत वन जमीन बुडत नाही अशी आपली माहिती होती म्हणून ते काम करण्याची खास परवानगी मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशान्वये देण्यात आलेली होती. दरम्यानच्या काळामध्ये केंद्र शासनामार्फत या प्रकल्पाला मंजूरी मिळावी या दृष्टीने त्यांच्याकडे दोनवेळा प्रस्ताव पाठविण्यात आला परंतु त्यांची मंजूरी मिळाली नाही. **मध्यंतरीच्या काळामध्ये महाराष्ट्र शासनाने असा निर्णय घेतला की, ८० पूर्वी ज्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे त्यांचे काम न थांबता सुरू ठेवावे. त्या नुसार हे काम सुरू करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ३० जुलै १९९१ : खंड ९३, क्रमांक ११, पृष्ठ १४)*

## काम सुरू ठेवण्याचे आदेश काढण्याचे आश्वासन

**३१५.** त्यावर मंत्रिमहोदयांना मी पुन्हा असे विचारले की, "दिनांक ८ मार्च १९९१ रोजी मा. सदस्य श्री. हांडे यांनी जलसिंचनाची जी चर्चा या सभागृहामध्ये उपस्थित केली होती त्यावेळी "हे काम बंद पडू दिले जाणार नाही तसे आदेश दिले जातील" असेच उत्तर शासनाकडून मा. राज्यमंत्र्यांनी दिलेले होते, आणि आता देखील मा. मंत्री महोदय तसेच उत्तर देत आहेत. आपण म्हणता ते आदेश निर्गमित करुन अधिवेशन संपेपर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील काय?" यावर त्यांनी असे उत्तर दिले की,"आता पावसाळ्यामुळे येथील काम बंद असेल. तलांक ३२५ पर्यंत काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिलेले होते. तसेच दोन महिन्यापूर्वी राज्य शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्यानुसार हे काम सुरु करण्याचे आदेश दिले जातील."

एका बाजूला "दोन महिन्यापूर्वी निर्णय घेतला" म्हणावयाचे व दुसऱ्या बाजूला "आदेश निर्गमित करण्यांत येतील" असे म्हणावयाचे त्यामुळे मा. मंत्रिमहोदय नक्की काय म्हणताहेत हे लक्षात न आल्याने खुद्द मा. सभापतींनी असे विचारले की, "**शासन हे आदेश देणार आहे की, दिलेले आहेत?**" त्यावर मा. राज्यमंत्र्यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले" "देणार आहोत. कॅबिनेटचा निर्णय झाल्यानंतर हे अधिवेशन संपण्यापूर्वी असे आदेश दिले जातील." "**हे अधिवेशन संपण्यापूर्वी तसे आदेश सभागृहाच्या पटलावर ठेवले जातील का**" असे मी त्यांना विचारले असता त्यांनी "**ते आदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची गरज नाही. मा. सदस्यांच्या हातामध्ये त्याची कॉपी मी देईन**" असे उत्तर दिले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ३० जुलै १९९१ : खंड ९३, क्रमांक ११, पृष्ठ १४-१५)*

मा. राज्य मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये अत्यंत ठोस अशाप्रकारचे मुदतबंद आश्वासन दिले होते. असेच आश्वासन त्यांनी याच शब्दात शुक्रवार, दिनांक ८ मार्च १९९१ रोजी झालेल्या चर्चेच्यावेळी दिले होते पण त्यावेळीचे आश्वासन मुदतबंद नव्हते. आज **मंगळवार, दिनांक ३० जुलै १९९१** रोजी सभागृहामध्ये त्यांच्या जुन्या आश्वासनाची त्यांना आठवण करून दिल्यामुळे त्यांनी आश्वासन जरी त्याच शब्दात दिले होते तरी ते मुदतबंद होते, हा यावेळीचा मोठा फरक होता. "**तलांक ३२५ मीटरच्या पुढे काम चालू करण्याचे आदेश निर्गमित केले जातील**" असे आश्वासन होते. हे अधिवेशन ७ ऑगस्ट १९९१ ला संपणार "**अधिवेशन संपण्यापूर्वी असे आदेश दिले जातील**" अशा मुदत घालून घेणाऱ्या आश्वासनाची जोड मूळ आश्वासनाला होती व त्याशिवाय "**ते आदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची गरज नाही. माननीय सदस्यांच्या हातामध्ये त्याची कॉपी मी देईन.**" असेही राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात स्पष्टपणे सांगितले होते.

## लोकप्रतिनिधी विरुद्ध नोकरशाही

**३१६.** दिलेल्या आश्वासनाप्रमाणे तलांक ३२५ मीटरच्या पुढे काम सुरू ठेवण्याचे आदेश काढण्याची शासन स्तरावरील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी एक आठवड्याचा काळ राज्यमंत्र्यांना उपलब्ध होता. आश्वासनाची पूर्तता करावयाची तर उशिरात उशिरा म्हणजे ७ ऑगस्टला आदेश काढणे आवश्यक होते. **या सात आठ दिवसामध्ये पाटबंधारे विभागाचे राज्यमंत्री श्री. रणजीत देशमुख यांना या आश्वासनाच्या पूर्तीसाठी मंत्रालयातील नोकरशाहीशी जबरदस्त संघर्ष करावा लागला, असे कागदपत्रावरून दिसून येते.** लोकप्रतिनिधी विरुद्ध नोकरशाही अशा या संघर्षात नोकरशाहीचे नेतृत्त्व खुद्द राज्याचे मुख्य सचिव करीत होते.

## मुख्य सचिवांचे विषारी ताशेरे

**३१७.** निरनिराळ्या स्तरावर व विभागात फिरत या विषयाची नस्ती (फाईल) मुख्य सचिवांकडे गेली. जायकवाडी प्रकल्प व अप्परवर्धा प्रकल्पाचे काम १९७६ मध्ये एकाच दिवशी सुरू झाले होते. १९८० पूर्वीच्या प्रकल्पांना वन कायदा लागू होणार नाही अशी त्या कायद्यातच तरतूद आहे. जायकवाडी प्रकल्प मान्यतेशिवायच चालू आहे याची संपूर्णपणे माहिती असतांना **मुख्य सचिवांनी या नस्तीवर अत्यंत विषारी असे शेरे ताशेरे लिहून ठेवले. मुख्य सचिवांचा अभिप्राय नमूद असलेले ५ ही परिच्छेद मी पुढे जसेच्या तसे नमूद करीत आहे.** :-

"उर्ध्व वर्धा पाटबंधारे प्रकल्पाच्या मंजूर आराखड्यानुसार ३३०.५ मीटर्स उंचीपर्यंतच्या दगडी बांधकामास व त्यावर १२ मीटर्स उंचीपर्यंतच्या वक्रव्दारास (radial gates) मंजुरी देण्यात आली आहे. ह्या मंजुरीनुसार ३४२.५ पूर्ण संचय पातळी राहील. ३२५.० मीटर्स उंचीपर्यंतचे दगडी बांधकामास मंजुरी दिली असल्याने त्या उंचीपर्यंतचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. आतापर्यंत या बांधकामावर वक्रद्वारे बसविण्यात आलेली नाहीत. कारण की, आवश्यक त्या ३३०.५ मीटर्स उंचीपर्यंतचे दगडी बांधकाम अद्यापि संपूर्णतया पूर्ण झालेले नाही.

२. मा. मुख्यमंत्री यांच्या स्तरावर मंजुरी मिळाल्यानंतर ३२५ मीटर्स उंचीपर्यंतचे काम मुख्य वन संरक्षक (संधारण) यांनी घेतलेल्या आक्षेपामुळे अद्यापि पूर्ण झालेले नाही, असा एक गैरसमज निर्माण झालेला आहे. **शासनाने घेतलेल्या निर्णयाची पूर्व कल्पना नसल्याने मुख्य वन संरक्षकांनी काम थांबविण्याच्या सूचना दिल्या होत्या.** तथापि, शासनाने दिलेल्या आदेशानंतर वस्तुतः काम थांबविलेले नव्हते. सबब, उक्त गैरसमजाला कोणताही आधार नाही. मुख्य वन संरक्षक (संधारण) यांचा याबाबतीत झालेला समज व त्यासंबंधीची समस्या कशा प्रकारे हाताळावी याचा विचार, वेगळ्या नस्तीवर करण्यात येत आहे.

३. या नस्तीवर अत्यंत मर्यादित मुद्दा विचाराधीन आहे तो म्हणजे **३२५ मीटरपेक्षा जास्त म्हणजे ३३०.५ मि. उंचीपर्यंत दगडी बांधकाम चालू ठेवून त्यावर १२ मीटर वक्रद्वार बसविण्यासंबंधीचे काम चालू ठेवण्यास हिरवा कंदील दाखविण्यात अडचण आहे का?** असे करण्यामुळे वनसंपत्ती जी पाण्याखाली बुडीत होईल त्याचा अंदाज खालीलप्रमाणे :-

३.१ ३२५ मीटर्स उंचीपर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टर्स वनजमिनाचे क्षेत्र बुडाले आहे. सदर उंची ३३०.५ मीटर्सपर्यंत वाढविल्यास व वक्र दरवाजे बसविल्यानंतर ६७२ हेक्टर जादा वनजमीन बुडीत होईल. धरणासाठी आणि कालव्याखाली २६० हेक्टर्स वनजमीन येणार आहे. केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्र्याकडे वनजमीन देण्याबाबतचे आवश्यक ते प्रस्ताव पाठविण्यात आले असून ते विचाराधीन आहे.

३.२ वरील पार्श्वभूमी विचारात घेऊन पाटबंधारे विभागाला ३३०.५ मीटर्स पर्यंत बांधकाम चालू ठेवून त्यावर १२ मि. वक्रद्वार बसविण्यास प्राधिकृत करावयाचे किंवा कसे हे ठरवावे लागेल.

३.३. असे स्पष्टपणे म्हणावे लागेल की, केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय पाटबंधारे विभागाला उक्त अनुमती देण्याबाबत या नस्तीवर आपले मत नोंदविणाऱ्या मुख्य सचिवांना वन (संवर्धन) अधिनियमाखाली व्हावयाच्या वैधानिक कारवाईला तोंड द्यावे लागेल. **माझ्या माहितीप्रमाणे शासनाने विधिमंडळात वरील प्रकारचे काम सुरू ठेवण्यास परवानगी देणेसंबंधी आश्वासन दिले आहे.**

४.० सबब वरील आश्वासनाचा मान राखण्याच्या हेतूने मी खालीलप्रमाणे प्रस्तावित करतो :

४.१ **यापुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये.**

४.२ प्रस्तुत प्रकरणी उक्त स्वरुपाचे आदेश निर्गमित करताना, त्या त्या आदेशामध्ये अशी शब्दरचना असावी की, केंद्र शासनाची मंजुरी मिळाल्यावर उक्त आदेशानुसार कामास सुरुवात करण्यात येईल.

४.३ वरील मंजुरीविषयक बाबीवर शासनाच्या वरिष्ठ पातळीवर म्हणजे **मुख्य मंत्री, मंत्री (पाटबंधारे) आणि मंत्री (वने) यांच्या गट समितीने केंद्रीय वन व पर्यावरण राज्यमंत्री यांच्याबरोबर शक्यतो लवकर किंवा उशिरात उशिरा ऑगस्ट १९९१ अखेरपर्यंत चर्चा करून केंद्र शासनाची मंजुरी मिळेल असे पहावे.**

४.४ या प्रकरणात वरील मुद्दा ४.३ मध्ये नमूद केलेली कारवाई पूर्ण झाल्यावर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात यावे.

५. शासनाने वर नमूद केलेल्या परिस्थितीत, मी केलेली शिफारस मान्य केल्यास, तिची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध केंद्र सरकारने वैधानिक कारवाई करावयाचे ठरवल्यास, राज्य शासनाला अशा अधिकाऱ्याला (मग तो त्यावेळी सेवानिवृत्त झालेला असला तरी) अशा कारवाईपासून अभय द्यावे लागेल. **कारण राज्य शासनाने विधिमंडळाला आश्वासन देऊन बांधिलकी पत्करलेल्या आश्वासनाच्या पूर्तीसाठी, शासकीय सेवेतील कर्तव्य बजावत असताना, निर्माण झालेल्या विकट परिस्थितीतून मार्ग निघावा या दृष्टिकोनातून ही कार्यवाही** (वन संवर्धन कायद्याखाली तरतुदीनसार पूर्व परवानगीशिवाय, पाटबंधारे विभागास काम करण्यास अनुमती देणे) अधिकाऱ्याकडून केली गेली असल्यामुळे अशा अधिकाऱ्यांमागे राज्य शासनाने उभे राहून अशा कार्यवाहीपासून त्यांना उन्मुक्त (Immune) करावे लागेल."

ज्येष्ठ सनदी अधिकारी आपल्या लोकशाही व्यवस्थेमध्ये विधानमंडळाविषयी, मुख्यमंत्र्यांविषयी, मंत्र्यांविषयी किती उद्धटपणे व तुच्छतेने शेरे लिहू शकतो याचे एवढे नमुनेदार उदाहरण शोधून सापडणार नाही. **"सबब वरील आश्वासनाचा मान राखण्याच्या हेतूने मी खालीलप्रमाणे प्रस्तावित करतो की.... यापुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये."** असे वाक्य लिहिणारा मुख्यसचिव विधिमंडळ व मंत्री यांच्याविषयी मनात किती तुच्छताभाव ठेवीत असेल? "वरील मंजुरीविषयक बाबीवर शासनाच्या वरिष्ठ पातळीवर म्हणजे मुख्य मंत्री, मंत्री (पाटबंधारे) आणि मंत्री (वने) यांच्या गट समितीने केंद्रीय वन व पर्यावरण राज्यमंत्री यांच्याबरोबर शक्यतो लवकर किंवा उशिरात उशिरा ऑगस्ट १९९१ अखेरपर्यंत चर्चा करून केंद्र शासनाची मंजुरी मिळेल असे पहावे." असे आपल्या टिप्पणीमध्ये मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांना उपदेश करणाऱ्या या मुख्यसचिवाला "कारे बाबा? पूर्णवेळ काम करणारा सर्वोच्च अधिकारी तू. तू का नाही केंद्र शासनात जाऊन कडमडत? मुख्यसचिव, सचिव पाटबंधारे, सचिव वने यांच्या गटसमितीने केंद्र शासनाची मंजुरी मिळेल असे पहावे" अशी टिप्पणी लिहिली तर तुझे हात झडतील का? असे विचारल्यावाचून रहावत नाही. "प्रस्तुत प्रकरणी उक्त स्वरुपाचे आदेश निर्गमित करताना, त्या त्या आदेशामध्ये अशी शब्दरचना असावी की, केंद्र शासनाची मंजुरी मिळाल्यावर उक्त आदेशानुसार कामास सुरुवात करण्यात येईल.... मंजूरीची कारवाई पूर्ण झाल्यावर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात यावे." अशा प्रकारचा भोळवट सल्ला देणारा मुख्यसचिव लोकांना किती मूर्ख समजत असेल याचा नुसता विचार केला तरी मन थक्क होते.

## मुख्य सचिवांचा निगेटीव्ह ॲडीट्युड

**३१८.** दिनांक ६ ऑगस्ट १९९१ रोजी विधानपरिषदेची बैठक सुरू असतांना प्रश्नोत्तराच्या तासानंतर पाटबंधारे राज्यमंत्री श्री. रणजीत देशमुख सभागृहात आलेत. आल्या आल्याच त्यांच्या आसनावर जाण्यापूर्वी माझ्या बाजूच्या आसनावर बसून मला म्हणाले "काय गुरुजी! हे दारोदार फिरायच काम तुम्ही आमच्या मागे लाऊन दिल. उद्यापर्यंत अप्परवर्धाचे आदेश काढायचे आहेत. पाटबंधारे, वने, सामान्य प्रशासन विभागातून ही फाईल फिरत आहे व मी स्वतः त्याच्यामागे आहे. मुख्य सचिवांनी खूपच निगेटीव्ह ॲडीट्युड घेतलेली आहे?" त्यावर मी त्यांना विचारले "रणजित बाबू! उद्या मग आदेश निघणार नाहीत काय?" त्यावर रणजित देशमुख मला ठामपणे म्हणाले "मी आताच मुख्यमंत्र्यांना भेटून आलो. त्यांना सांगितले, हा ८० पूर्वीचा प्रकल्प आहे मी सभागृहात आश्वासन दिले आहे. उद्या मला याबाबतचे आदेश काढायचे आहेत." श्री. रणजित देशमुख यांच्याशी माझे जे उपरोक्त बोलणे झाले ते सभागृहात बसल्या बसल्या झालेले खाजगी बोलणे आहे पण श्री. रणजित देशमुख यांनी मुख्यसचिवांशी केवढा जबर संघर्ष केला याची कल्पना मुख्य सचिवांच्या नाकाला किती मिरच्या झोंबल्या याची मोजदाद केली तर सहज येऊ शकते. **मुख्य सचिवांनी पुढे ३० डिसेंबर १९९१ ला अप्पर वर्धा धरणाचे काम बंद पाडणारा कुप्रसिद्ध आदेश काढला, त्या आदेशाच्या पहिल्याच पानावर त्यांना झोंबलेल्या मिरच्या ठसठशीतपणे दिसून येतात.** ते वाक्य पुढील प्रमाणे :-

"उर्ध्व वर्धा पाटबंधारे प्रकल्पाचे संबंधात खालीलप्रमाणे टिप्पणी, राज्य शासनाने विधिमंडळाला दिलेल्या आश्वासनपूर्तीचे संबंधात मार्ग काढण्याचे दृष्टिकोनातून, पाटबंधारे विभागाच्या धारिकेवर मी दिनांक ६.८.९१ रोजी नोंदविली होती. **परंतु राज्यमंत्री (पाटबंधारे) यांनी मी दिलेला सल्ला न मानता, वन संवर्धन अधिनियम १९८० च्या तरतुदीचा भंग करून ३३०.५ मि.पर्यंत धरणाचे कॉन्क्रीटचे बांधकाम करण्यास व त्यावर १२ मीटरचे वक्र दरवाजे बसवण्याचे काम करण्यास परवानगी देण्याचे आदेश पाटबंधारे व वन मंत्री यांचे सहमतीने मुख्यमंत्री महोदयाकडून दिनांक ६.८.९१ रोजी प्राप्त करून घेतले.**"

## या संघर्षामध्ये मुख्य सचिवांचा पाडाव

**३१९.** पाटबंधारे विभागाच्या धारिकेवर मी ६.८.९१ ला टिप्पणी दिली होती, **पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी माझा सल्ला मानला नाही, पाटबंधारे मंत्र्यांची** व वन मंत्र्यांची सहमती घेतली, मुख्यमंत्र्यांचीही मान्यता घेतली, ती सुद्धा ६.८.१९९१ लाच घेतली, वनकायद्याचा भंग केला आणि राज्यमंत्र्यांनी आदेशही काढले. एकाहून एक झोंबलेल्या कितीतरी मिरच्या मुख्यसचिवांच्या या कुप्रसिद्ध आदेशाच्या पहिल्या वाक्यात आपल्याला दिसून येतील. **या जबरदस्त संघर्षामध्ये मुख्य सचिवांचा उघडउघड पाडाव झाला** व शेवटी आश्वासनाप्रमाणे अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दि.७ ऑगस्ट १९९१ रोजी शासनाचे हे आदेश (क्र.उ.अ.प्र./ १०९०/१३३/९० म.प्र.-२)निर्गमित झाले. त्यात असे म्हटले होते की, **"उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या जलोत्सारीणीचे बांधकाम ३२५ मिटर तलांकावरुन ३३०.५ मिटर तलांकापर्यंत नेण्याचे व त्यावर १२ मिटर उंचीचे दरवाजे बसविण्याचे काम हाती घेण्यास शासन खास बाब म्हणून अनुमती देत आहे."** शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या सचिवांनी काढलेल्या या आदेशात पुढे असेही म्हटले आहे की,"उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या वनमुक्तीकरणाच्या प्रस्तावास केंद्र शासनाची अनुमती मिळेपर्यंत धरणात कायम पाणी साठा होणार नाही याबावत दक्षता घेण्यात यावी." "वरील काम या पावसाळी हंगामानंतर सुरु करण्याचे आधी केंद्र शासनाची वनसंवर्धन कायद्यानुसार अनुमती मिळविणे बाबत शासन सर्वतोपरीने प्रयत्नशील राहील." असेही आदेशात नमूद होते.

## काम बंद पाडणारा कुप्रसिद्ध आदेश

**३२०.** ७ ऑगस्ट १९९१ ला काम पुढे सुरू ठेवण्याचे आदेश निघाले. त्याप्रमाणे जलोत्सारणीचे काम पुढे सुरू राहिले. त्या कामाने चांगला वेग घेतला. **पण शेपटावर पाय पडलेल्या एखाद्या विषारी सापाने जसा दंश धरावा तसे राज्यमंत्र्यांनी पाडाव केलेल्या या मुख्य सचिवांनी अप्पर वर्धा प्रकल्पाला दंश करण्याचा मनाशी पक्का निर्धार केला होता.** सेवानिवृत्त होण्याच्या एक तास अगोदर दिनांक ३० डिसेंबर १९९१ रोजी या मुख्यसचिवांनी अप्पर वर्धा धरणाचे काम बंद पाडणारा तो कुप्रसिद्ध आदेश स्वदस्तुराने निर्गमित केला. मुद्दाम मी तो आदेश जसाच्या तसा पुढे देत आहे. :-

"**मुख्य सचिवांचे कार्यालय, : सामान्य प्रशासन विभाग, : मंत्रालय, मुंबई-** ४०० ०३२. : दिनांक - ३० डिसेंबर,१९९१. क्र. मुस/ १०९१/उर्ध्व वर्धा प्रकल्प/का-१/१६५

**मुख्य सचिव : आदेश**

उर्ध्व वर्धा पाटबंधारे प्रकल्पाचे संबंधात **खालीलप्रमाणे टिप्पणी,** राज्य शासनाने विधिमंडळाला दिलेल्या आश्वासनपूर्तीचे संबंधात मार्ग काढण्याचे दृष्टिकोनातून, पाटबंधारे विभागाच्या धारिकेवर **मी दिनांक ६.८.९१ रोजी नोंदविली होती. परंतु राज्यमंत्री (पाटबंधारे) यांनी मी दिलेला सल्ला न मानता,** वन संवर्धन अधिनियम १९८० च्या तरतुदीचा भंग करून ३३०.५ मि. पर्यंत धरणाचे कॉन्क्रीटचे बांधकाम करण्यास व त्यावर १२ मीटरचे वक्र दरवाजे बसवण्याचे काम करण्यास **परवानगी देण्याचे आदेश पाटबंधारे व वन मंत्री यांचे सहमतीने मुख्य मंत्री महोदयाकडून दिनांक ६.८.९१ रोजी प्राप्त करून घेतले.**

"उर्ध्व वर्धा पाटबंधारे प्रकल्पाच्या मंजूर आराखड्यानुसार ३३०.५ मीटर्स उंचीपर्यंतच्या दगडी बांधकामास व त्यावर १२ मीटर्स उंचीपर्यंतच्या वक्रव्दारास (radial gates) मंजुरी देण्यात आली आहे. ह्या मंजुरीनुसार ३४२.५ पूर्ण संचय पातळी राहील. ३२५.० मीटर्स उंचीपर्यंतचे दगडी बांधकामास मंजूरी दिली असल्याने त्या उंचीपर्यंतचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. आतापर्यंत या बांधकामावर वक्रद्वारे बसविण्यात आलेली नाहीत. कारण की, आवश्यक त्या ३३०.५ मीटर्स उंचीपर्यंतचे दगडी बांधकाम अद्यापि संपूर्णतया पूर्ण झालेले नाही.

२. मा. मुख्य मंत्री यांच्या स्तरावर मंजुरी मिळाल्यानंतर ३२५ मीटर्स उंचीपर्यंतचे काम मुख्य वन संरक्षक (संधारण) यांनी घेतलेल्या आक्षेपामुळे अद्यापि पूर्ण झालेले नाही, असा एक गैरसमज निर्माण झालेला आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयाची पूर्व कल्पना नसल्याने मुख्य वन संरक्षकांनी काम थांबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. तथापि, शासनाने दिलेल्या आदेशानंतर वस्तुतः काम थांबविलेले नव्हते. सबब, उक्त गैरसमजाला कोणताही आधार नाही. मुख्य वन संरक्षक (संधारण) यांचा याबाबतीत झालेला समज व त्यासंबंधीची समस्या कशा प्रकारे हाताळावी याचा विचार, वेगळ्या नस्तीवर करण्यात येत आहे.

३. या नस्तीवर अत्यंत मर्यादित मुद्दा विचाराधीन आहे तो म्हणजे ३२५ मीटरपेक्षा जास्त म्हणजे ३३०.५ मि. उंचीपर्यंत दगडी बांधकाम चालू ठेवून त्यावर १२ मीटर वक्रद्वार बसविण्यासंबंधीचे काम चालू ठेवण्यास हिरवा कंदील दाखविण्यात अडचण आहे का? असे करण्यामुळे वनसंपत्ती जी पाण्याखाली बुडीत होईल त्याचा अंदाज खालीलप्रमाणे :-

३.१ ३२५ मीटर्स उंचीपर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टर्स वनजमिनाचे क्षेत्र बुडाले आहे. सदर उंची ३३०.५ मीटर्सपर्यंत वाढविल्यास व वक्र दरवाजे बसविल्यानंतर ६७२ हेक्टर जादा वनजमीन बुडीत होईल. धरणासाठी आणि कालव्याखाली २६० हेक्टर्स वनजमीन येणार आहे. केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्र्याकडे वनजमीन देण्याबाबतचे आवश्यक ते प्रस्ताव पाठविण्यात आले असून ते विचाराधीन आहे.

३.२ वरील पार्श्वभूमी विचारात घेऊन पाटबंधारे विभागाला ३३०.५ मीटर्स पर्यंत बांधकाम चालू ठेवून त्यावर १२ मि. वक्रद्वार बसविण्यास प्राधिकृत करावयाचे किंवा कसे हे ठरवावे लागेल.

३.३. असे स्पष्टपणे म्हणावे लागेल की, केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय पाटबंधारे विभागाला उक्त अनुमती देण्याबाबत या नस्तीवर आपले मत नोंदविणाऱ्या मुख्य सचिवांना वन (संवर्धन) अधिनियमाखाली व्हावयाच्या वैधानिक कारवाईला तोंड द्यावे लागेल. माझ्या माहितीप्रमाणे शासनाने विधिमंडळात वरील प्रकारचे काम सुरू ठेवण्यास परवानगी देणेसंबंधी आश्वासन दिले आहे.

४.० सबब वरील आश्वासनाचा मान राखण्याच्या हेतूने मी खालीलप्रमाणे प्रस्तावित करतो :

४.१ यापुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये.

४.२ प्रस्तुत प्रकरणी उक्त स्वरुपाचे आदेश निर्गमित करताना, त्या त्या आदेशामध्ये अशी शब्दरचना असावी की, केंद्र शासनाची मंजुरी मिळाल्यावर उक्त आदेशानुसार कामास सुरुवात करण्यात येईल.

४.३ वरील मंजुरीविषयक बाबीवर शासनाच्या वरिष्ठ पातळीवर म्हणजे मुख्य मंत्री, मंत्री (पाटबंधारे) आणि मंत्री (वने) यांच्या गट समितीने केंद्रीय वन व पर्यावरण राज्यमंत्री यांच्याबरोबर शक्यतो लवकर किंवा उशीरात उशिरा ऑगस्ट १९९१ अखेरपर्यंत चर्चा करून केंद्र शासनाची मंजुरी मिळेल असे पहावे.

४.४ या प्रकरणात वरील मुद्दा ४.३ मध्ये नमूद केलेली कारवाई पूर्ण झाल्यावर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात यावे.

५. शासनाने वर नमूद केलेल्या परिस्थितीत, मी केलेली शिफारस मान्य केल्यास, तिची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध केंद्र सरकारने वैधानिक कारवाई करावयाचे ठरवल्यास, राज्य शासनाला अशा अधिकाऱ्याला (मग तो त्यावेळी सेवानिवृत्त झालेला असला तरी) अशा कारवाईपासून अभय द्यावे लागेल. कारण राज्य शासनाने विधिमंडळाला आश्वासन देऊन बांधिलकी पत्करलेल्या आश्वासनाच्या पूर्तीसाठी, शासकीय सेवेतील कर्तव्य बजावत असताना, निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीतून मार्ग निघावा या दृष्टिकोनातून ही कार्यवाही (वन संवर्धन कायद्याखाली तरतुदीनसार पूर्व परवानगीशिवाय,पाटबंधारे विभागास काम करण्यास अनुमती देणे) अधिकाऱ्याकडून केली गेली असल्यामुळे अशा अधिकाऱ्यांमागे राज्य शासनाने उभे राहून अशा कार्यवाहीपासून त्यांना उन्मुक्त (Immune) करावे लागेल."

वरील टिप्पणीत नमुद केलेला, केंद्र सरकारच्या मान्यतेसाठी प्रलंबित असलेला प्रस्ताव केंद्र शासनाने अमान्य केल्याचे मला हिवाळी अधिवेशन (२.१२.९१) सुरू होण्याचे जरा आधी समजले. यासंबंधी केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाकडून राज्य शासनाला पाठविलेल्या पत्राची छाया-प्रत सोबत जोडली आहे. केंद्र सरकारने प्रस्ताव अमान्य केल्यामुळे, पाटबंधारे विभागाने उंची वाढविण्याचे बांधकाम चालू ठेवल्यास, तसे करण्याची कृती ही नुसती बेकायदेशीर ठरणार नसून, असे करणारे पाटबंधारे विभागाचे अधिकारी तसेच वन विभागाचे अधिकारी (त्यांनी दुर्लक्ष केल्यास) हे वन संवर्धन अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल खटला भरण्याच्या कार्यवाहीस पात्र ठरतात. **त्यामुळे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाचे बांधकाम तात्काळ थांबवून, परावृत्त होण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.** दुसरा एकच पर्याय शिल्लक राहतो तो म्हणजे राज्याचे मंत्री व मुख्य मंत्री यांनी केंद्र शासनाकडे मंत्री स्तरावर गांभीर्यपूर्वक प्रयत्न करून केंद्र शासनाची मान्यता मिळवणे.

**मुख्य सचिव या पदाचा पदभार सेवानिवृत्तीअंती सोडत असतांना अशा प्रकारे टिप्पणी नोंदवितांना मला दुःख होत आहे.** शासकीय अधिकारी/सेवकाने शेवटी विधिमंडळ/ संसदने केलेल्या कायद्याचे पालन करणे हे त्याचे आद्य कर्तव्य ठरते. हे ध्यानात घेऊन, कर्तव्यकठोरपणे असे आदेश देणे भाग पडते आहे. सचिव, पाटबंधारे विभाग यांनी त्यांच्या आधिपत्याखालील सर्व अधिकाऱ्यांना या प्रकल्पाचे बांधकाम ज्यामुळे वन संवर्धन कायदा १९८० च्या तरतुदींचा भंग होत असेल तर ते तात्काळ बंद करावे अशा सूचना द्याव्यात. तसेच सचिव (वने) यांना मी असे आदेश देत आहे की, केंद्र शासनाने या प्रकल्पाच्या बाबतीत केलेला प्रस्ताव अमान्य केल्यामुळे, त्यांनी त्यांच्या आधिपत्याखालील सर्व अधिकाऱ्यांना उपरोल्लेखित कायद्याचा भंग झाला आहे असे आढळल्यास संबंधितांवर त्वरित कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना द्याव्यात. यात हयगय झाल्यास ते कर्तव्यच्युती (Dereliction in Duty) या दोषारोपास पात्र ठरतील. **माझ्या या आदेशाच्या प्रती सचिव (पाटबंधारे) व सचिव (वने) यांनी त्यांच्या विभागातील या विषयाच्या संबंधित धारिकेवर ठेवून, सर्व संबंधितांना वरीलप्रमाणे सूचना निर्गमित करून त्यानंतर धारिका प्रभारी मंत्री महोदयांमार्फत, मा. मुख्य मंत्री यांना माहितीसाठी सादर करावी.**

**(कृ.भा.श्रीनिवासन) मुख्य सचिव.** ३०.१२.९१"

## प्रथम काम बंद पाडा मग मुख्यमंत्र्यांना माहिती द्या

**३२१.** सेवानिवृत्त होण्याच्या तास दोन तास अगोदर मुख्य सचिवांनी ३०.१२.१९९१ रोजी निर्गमित केलेल्या उपरोक्त आदेशाच्या शेवटचे वाक्य अभ्यास करण्यासारखे आहे ते म्हणतात :-

"माझ्या या आदेशाच्या प्रती सचिव (पाटबंधारे) व सचिव (वने) यांनी त्यांच्या विभागातील या विषयाच्या संबंधित धारिकेवर ठेवून, सर्व संबंधितांना वरीलप्रमाणे सूचना निर्गमित करून, त्यानंतर धारिका प्रभारी मंत्री महोदयांमार्फत,

मा. मुख्य मंत्री यांना माहितीसाठी सादर करावी."

**"प्रथम मंत्री वा मुख्यमंत्री यांची संमती घ्या व नंतर आदेश निर्गमित करा"** असे ते म्हणत नाहीत, तर ते म्हणतात : "सर्व संबंधितांना वरील प्रमाणे सूचना निर्गमित करून त्यानंतर धारिका प्रभारी मंत्री महोदयामार्फत, मा. मुख्यमंत्री यांना माहितीसाठी सादर करावी." लोकशाही व्यवस्थेमध्ये **ज्या मुख्यमंत्र्यांच्या परवानगीने प्रकल्पाचे काम सुरू आहे, त्या मुख्यमंत्र्याला बाजूला सारून सेवानिवृत्त होऊन घरी पळणाऱ्या "भगोड्या" मुख्यसचिवाच्या आदेशाने प्रथम काम बंद पाडा व नंतर मुख्यमंत्र्यांना फक्त माहितीकरिता कळवा. असा आदेश काढून हे मुख्यसचिव निवृत्त झाले.** "हा ८० पूर्वीचा प्रकल्प आहे. याला वन कायदा लागू होत नाही, असा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे" एवढे एक सत्य वाक्य न लिहिता आपण काम बंद पाडण्याचा आदेश काढल्यामुळे या सेवानिवृत्त मुख्य सचिवाला केवढी सुखाची झोप लागली असेल?

### सचिव (वने) यांनी कारवाई पुढे सरकवली

**३२२.** मंत्रालयातल्या मंत्रालयात त्या च्या त्या दिवशी मुख्यसचिवांनी आपल्या आदेशाच्या प्रति सचिव, पाटबंधारे व सचिव, वने यांना पाठविल्या. हा ८० पूर्वी सुरू झालेला प्रकल्प आहे. या प्रकल्पाला हा कायदा लागू पडत नाही. त्यावेळी कायदा अस्तित्वातच नव्हता. मंत्रिमंडळाचा तसा निर्णय आहे. याची जाणीव असल्यामुळे **पाटबंधारे सचिवांनी मुख्य सचिवांच्या आदेशावर कोणतीही कारवाई केली नाही.** सचिव, वने यांनी एवढ्या महत्त्वाच्या आदेशावर २०-२२ दिवस काहीही कारवाई केली नाही. **एका विभागातून दुसऱ्या विभागामध्ये बदलून जाण्याच्या दोन दिवस अगोदर वनविभागाच्या सचिवांनी मुख्य सचिवांचा** आदेश खाली सरकविला. २२ जानेवारी १९९२ रोजी त्यांनी प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर यांना एक पत्र लिहून पुढील आदेश दिला :

**"अर्धशासकीय पत्र क्र.एफएलडी.३१८७/प्र.क्र.१०/(भाग-३)/फ-१०.**

महसूल व वन विभाग, : मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक २२ जानेवारी १९९२.

**अ.वि.गोकाक, सचिव (वने)**

प्रिय श्री. प्रभू,

मी या अर्धशासकीय पत्रासह तत्कालीन मुख्य सचिवांच्या दिनांक ३०.१२.१९९१ च्या आदेशाची प्रत पाठवीत आहे. **तत्कालीन मुख्य सचिवांनी दिलेल्या आदेशातील शेवटच्या परिच्छेदात सुचविलेली कार्यवाही आपण करावी अशी मी आपणांस विनंती करतो.**

२. केंद्र शासनाने दिनांक ६.१.१९९२ च्या आदेशाद्वारे अप्पर वर्धा प्रकल्पास जरी तत्त्वतः मान्यता दिली असली, तरी **केंद्र शासनाने लादलेल्या अटींची पूर्तता, विशेषतः अट क्र.६,७ व ९ ची पूर्तता झाल्याशिवाय राज्य शासन प्रश्नाधिन वनक्षेत्र वनेतर कारणांसाठी हस्तांतरित झाल्याचे आदेश काढू शकत नाही.** शिवाय, या प्रकल्पाचे काम जर चालू राहीले तर वन (संवर्धन) अधिनियमाचे उल्लंघनच होईल. म्हणून केंद्र शासनाच्या दिनांक ६.१.९२ च्या आदेशातील अट क्र.६,७ व ९ ची पूर्तता होईपर्यंत प्रकल्पाचे कोणतेही काम सुरु राहणार नाही, याची दक्षता वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी. ही कल्पना पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांना स्पष्टपणे समजावून सांगावी. मात्र, केंद्र शासनाने सुचविलेल्या अटींची पूर्तता करण्यासाठी तात्काळ कार्यवाही सुरू करावी, हेही मी या पत्राद्वारे आपणांस कळवू इच्छितो.

३. मी या अर्धशासकीय पत्राची एक प्रत सचिव (पाटबंधारे विभाग) यांना माहितीसाठी पाठवित आहे. तसेच, या पत्राची एक प्रत केंद्रस्थ अधिकारी श्री केळकर यांनाही माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवित आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

आपला स्नेहांकित,

स्वाक्षरी/- (अ.वि.गोकाक)

श्री.व.के.प्रभू, प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर"

************************************************

## २८

## *मा. उच्च न्यायालयातील संघर्ष*

************************************************

### आदेश अमरावती पर्यंत पोचले

**३२३.** दिनांक २२ जानेवारीला वनसचिवांनी काढलेला आदेश २३ जानेवारी १९९१ रोजी प्रधान, मुख्य वन संरक्षक नागपूर यांच्या कार्यालयाने पुढे अमरावतीकडे सरकविला होता. नागपूर येथील केंद्रस्थ अधिकाऱ्यांनी अमरावती सर्कलच्या वनसंरक्षकांना २३ जानेवारीला एक पत्र पाठवून काम बंद पाडण्याची कारवाई करा असे आदेश दिले होते. **हे सारे, त्वरित - अतित्वरीत चालू होते.** २३ तारखेच्या या पत्रात २२ तारखेचे आदेश आपल्याला मुंबईहून टेलिफोनने मिळाल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. २४-२५ जानेवारी पर्यंत हे सारे आदेश अमरावती येथे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांपर्यंत येऊन पोचलेले होते. **पाटबंधारे विभागाच्या अमरावतीस्थित सर्वच अधिकाऱ्यांमध्ये त्यामुळे मोठेच तणावाचे वातावरण निर्माण झालेले होते.** वनविभागाचे अधिकारी सर्वच व्यवहार गोपनीय ठेवून, काम गुप्तपणे बंद पाडू चाहत होते. याचा कोठे फारसा बभ्रा होऊ नये, एकदा काम बंद पाडल्यावर, कंत्राटदार निघून गेल्यावर, मशिनरी जागेवरून हलल्यावर, मजूर दुसरीकडे निघून गेल्यावर, **स्मशानवत शांतता प्रकल्पस्थळावर निर्माण झाली की मग लोकांना काय बोंबा मारायच्या असतील त्या मारू देत. ही वन विभागाच्या अधिकाऱ्यांची भावना होती.**

### पाटबंधारे अधिकाऱ्यांमध्ये तणाव

**३२४.** याच्या उलट परिस्थिती पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची होती. वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे ८-१० महिने बंद पडलेले काम आता कुठे सुरू झाले आहे. अतिशय क्रिटीकल अशा कामाला सुरुवात झालेली आहे. मध्यवर्ती उत्प्लव मार्गाचे म्हणजेच जलोत्सारिणीचे काँक्रीटचे काम सुरू झालेले आहे. कंत्राटदार, यंत्रसामुग्री मनुष्यबळ यांची उत्तम जुळवाजुळव झालेली आहे, त्या कामाने वेग घेतलेला आहे, ३३०.५ मीटर तलांकापर्यंत काँक्रीटचे काम पूर्ण झाल्याबरोबर १२ मीटर उंचीचे वक्राकार दरवाजे बसवावयाचे आहेत, **अशा या स्थितीत काम बंद पाडण्याच्या या धमक्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये मोठेच अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले होते.** शिवाय "वनकायद्याचा भंग केल्यास सहा महिन्याचा तुरुंगवास" ही धमकी लेखी व तोंडी वारंवार दिली जात होती. "ऐवीतेवी मरण येणारच असेल तर चार दोन नातेवाइकांना निरोप तरी देऊ या" या धर्तीवर जेवढा होईल तेवढा बभ्रा व गाजावाजा करावा. "प्रकल्प बंद पडणारच असेल तर निदान चारचौघांच्या कानावर तरी घालू" असा निर्धार पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला होता. उद्या "तुम्ही आम्हाला तर सांगितलेच नाही" असे कोणी म्हणायला नको. २५ जानेवारी ते २७ जानेवारी १९९१ च्या दरम्यान मला ह्या सर्व घटना कळल्या. **हा प्रकल्प लोळविल्या जाणार, एकदा आता या प्रकल्पाचे काम बंद पडले तर ते पुन्हा सुरू होण्याला किती वर्षे लागतील याचा अंदाज सुद्धा डोळ्यापुढे येईना?**

### लोकप्रतिनिधी काय "उजेड" पाडू शकतात ?

**३२५.** या कामामध्ये लोकप्रतिनिधींनी संकटकाळी जी काही शक्य असेल ती मदत करावी ही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची रास्त अपेक्षा होती. आपण किती "उजेड" पाडू शकतो, हे त्यांना उघडपणे सांगणेही आम्हाला सोईचे नव्हते पण सर्व शक्तीनिशी हा प्रयत्न हाणून पाडण्याचा आपल्या परीने पूर्ण प्रयत्न करावयाचा असा मी मनाशी निर्धार केला होता. प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रति मी मिळविल्या. माझ्या स्तरावर या विषयाची "धारिका" उघडून ती कागदपत्रे नीट लावून सुसंगतपणे वाचली असता, या मागचे मुख्य सचिवांचे कारस्थान सहजपणे लक्षात येत होते. हे कारस्थान मोडून काढण्याच्या उपायांचा विचार करू लागलो असता असे लक्षात आले की **जनआंदोलन ही गोष्ट अजिबात शक्य नाही** कारण जिल्हा परिषदांच्या व महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर झालेल्या होत्या. माझे असे निरीक्षण आहे की एकदा कोणत्याही निवडणुका जाहीर झाल्या की जनआंदोलन ही गोष्ट जवळजवळ, तो प्रश्न कितीही महत्त्वाचा व न्याय्य असला तरी, अशक्य होऊन बसते, तिकडे मंत्री **किंवा नेत्यांशी मुंबईमध्ये फोन वरून संपर्क** साधण्याचा प्रयत्न केला तर तिकीट वाटपाच्या गदारोळात "कोणी पुसेना कोणाला?" अशी स्थिती होती. माझ्याशी बोलतांना तसे शब्द कोणी वापरले नाही पण एकंदर प्रतिक्रिया अशी होती की "आता आमची कोणती गडबड चालू आहे आणि तुम्ही आता हे मधातच काय काढलं?" **विधानपरिषद आश्वासन समिती पासून काही आधार मिळू शकेल काय?** याचा विचार केला, तर आचार संहितेमुळे साऱ्याच समित्यांच्या कामाला कुलूप लागले असल्याची वार्ता कळली. **सभागृहामध्ये एखाद्या सांसदीय आयुधाच्या वापराचा विचार केला** तर जानेवारी १९९१ च्या शेवटच्या आठवड्यात घडणाऱ्या या दुर्घटनांना, मार्च १९९१ मध्ये भरणाऱ्या सभागृहातून काही मदत मिळण्याची शक्यता समोर दिसत नव्हती. **प्राण निघून गेल्यावर परदेशातून येऊन पोचलेल्या अत्यंत गुणकारी औषधांचा झालेले नुकसान भरून काढण्यास जसा काहीही उपयोग होत नाही, तसेच पुढच्या ८-१० दिवसात एकदा प्रकल्पाचे काम बंद पडले की मार्च ९१ मध्ये होणाऱ्या अधिवेशनात कितीही गुणकारी सांसदीय आयुधाचा वापर केला तरी झालेले नुकसान भरून काढण्यास त्याचा काहीही**

**उपयोग होणार नाही**, ही गोष्ट आम्हाला डोळ्यासमोर स्पष्टपणे दिसत होती.

### रामबाण औषध उपलब्ध करून देणारा देवदूत

**३२६.** लोकप्रतिनिधी म्हणून मोठा जिरेटोप घालून मिरविणारे आपण, आपल्या भागातला एवढा मोठा प्रकल्प आपल्या समोर बंद पडत आहे, पाणीपुरवठ्याची एवढी मोठी योजना पूर्णपणे संकटात आलेली आहे, पण आपण काही म्हणजे काहीच करू शकत नाही, ही भावना सुद्धा डोक्याला सुन्न करणारी व मनाला खिन्न करणारी होती. जानेवारी १९९१ च्या शेवटच्या आठवड्यात अशा या पराभूत मनःस्थितीमध्ये काहीच उपाय सापडणार नाही काय? **अशी मानसिक तडफड चालू असतांना समोर एकाएकी देवदूत उभा रहावा व त्याने बोट धरून यशाचा मार्ग दाखवावा, प्रकल्पावरील संकट टाळण्याचे रामबाण औषध अगदी सहजपणे उपलब्ध करून द्यावे, अशी स्थिती समोर आली. या स्थितीतील त्या देवदूताचे नाव ॲड. बाळासाहेब उर्फ एस.झेड.पाटील असे आहे.**

### बाळासाहेब ऊर्फ एस.झेड.पाटील

**३२७.** ॲड. बाळासाहेब पाटील व मी स्वतः, आम्ही दोघेही विदर्भ महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिवाय अमरावती जिल्ह्याच्या एकाच ग्रामीण परिसरातून अमरावतीला आलेले. विदर्भ महाविद्यालयाच्या विद्यार्थी जीवनामध्ये वयाने व वर्गाने काही वर्षे ते मागे असतील, ते सायन्सचे व मी कलाशाखेचा विद्यार्थी असलो तरी विद्यार्थी चळवळीतील सहकारी म्हणून मैत्री व परिचय हा विद्यार्थी जीवनापासूनच होता. पुढे पदव्युत्तर शिक्षण संपल्यावर बाळासाहेबांनी शासकीय महाविद्यालयामध्ये अधिव्याख्याता म्हणून सुरुवातीला काही वर्षे काम केले. त्याच काळात ते एल.एल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. तीच तीच "केमेस्ट्री" वर्षानुवर्षे शिकविणे, शिवाय, शासकीय सेवेमध्ये "निरस बुद्धीच्या व्यवस्थापकांनी" निर्हेतुकपणे किंवा प्रसंगी हेतुपूर्वक केलेल्या किंवा करावयाच्या बदल्या, यामुळे कुशाग्र बुद्धीच्या बाळासाहेबांचे मन शासकीय अधिव्याख्याता या पदामध्ये रमेनासे झाले. राज्य लोकसेवा आयोगामार्फत निवड झाल्यावरचे शासकीय अधिव्याख्याता हे त्या काळामध्ये मोठे आकर्षक समजल्या जाणारे पद सोडून देण्याचा निर्णय त्यांनी घेतला व अमरावती येथे स्वतंत्रपणे विधिज्ञ म्हणून काम सुरू केले. त्यावेळी योगायोगाने आम्ही दोघेही एकाच हाऊसिंग कॉलनीमध्ये शेजारी म्हणून निवासाला होतो. शिवाय त्यावेळी आमची ती विदर्भ हाऊसिंग कॉलनी गावापासून खूपच दूर होती. त्यामुळे आमच्या जुन्या सबंधांना अधिक उजाळा मिळाला.

### ॲडव्होकेट बाळासाहेब पाटील

**३२८.** कुशाग्र बुद्धिमत्ता, अजोड विश्लेषण शक्ती, एकाग्र अध्ययन, चिकाटीचे प्रयत्न, ग्रामीण जीवना विषयी उपजत जिव्हाळा, कष्ट व मेहनत या गुणांची जन्मजात जोड व शिवाय स्वच्छ आचारविचार व चारित्र्य या आपल्या गुणांच्या आधारावर बाळासाहेबांनी हां हां म्हणता उत्तम विधिज्ञ म्हणून लौकिक मिळविला. त्याचवेळी अमरावती येथे श्री. शिवाजी विधी महाविद्यालयामध्ये सुरुवातीला अधिव्याख्याता व नंतर प्राचार्य म्हणून ते कार्यरत होते. अमरावतीचे क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाला लहान वाटायला लागले व त्यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर ॲडव्होकेट म्हणून प्रभावीपणे काम सुरू केले होते. आठवड्यातून त्यांचा निम्मा वेळ उच्च न्यायालयापुढे जायला लागला. काही वर्षातच आघाडीचा निष्णात कायदेपंडित म्हणून जी समाजमान्यता बाळासाहेबांनी मिळविली तिचा लाभ त्यांनी आपल्या "ज्युनिअर्स"ना मिळवून दिला. अमरावती सारख्या ठिकाणी इतक्या मोठ्या संख्येने ज्युनिअर्स तयार करणारा व त्यांचे जुनिअर्स म्हणवून घेण्यात अभिमान बाळगणाऱ्या सहकाऱ्यांची एवढी मोठी संख्या असणारा 'सिनिअर' हा मान फार कमी सिनिअर्सना मिळतो असे म्हटल्यावाचून रहावत नाही. वर्णनासाठी वेगळे शब्द नसल्यामुळे 'सिनिअर' 'ज्युनिअर' हीच पारंपरिक शब्दरचना आपण वापरावयाची, पण बाळासाहेबांनी आपल्या ज्युनिअर्सना सातत्याने बरोबरीचे समव्यवसायी अशीच वागणूक दिली. **अप्पर वर्धा धरणाच्या उपरोक्त घटना क्रमाच्या वेळी ते अमरावती विद्यापीठाच्या विधी शाखेचे अधिष्ठाता होते व मी समाजविज्ञान विद्याशाखेचा अधिष्ठाता होतो.**

### उच्च न्यायालयात जाण्याची चर्चा

**३२९.** जानेवारी १९९१ च्या शेवटच्या आठवड्यात एके दिवशी विद्यापीठामध्ये काही कामानिमित्त अधिष्ठात्यांच्या अनौपचारिक/औपचारिक बैठकीनंतर मी बाळासाहेबांना बाजूला घेतले. विद्यापीठाच्या सिनेट हॉलमध्ये आम्ही दोघेच बसलो. अप्पर वर्धा धरणावर कोसळलेल्या संकटाची व त्यामुळे पाणी पुरवठा योजनेवर होणाऱ्या संभाव्य आघाताची माझ्या शक्तीनुसार मी त्यांना कल्पना दिली. निवडणुका लागल्याने जनआंदोलन शक्य नाही, निवडणुकीमुळे मंत्री व नेते लक्ष देण्याच्या स्थितीत नाहीत, आचारसंहितेमुळे आश्वासन समितीचे काम थांबले आहे, सभागृहाची बैठक मार्च महिन्यात होणार, **तेंव्हा "न्यायालयातून आपल्याला काही उपाययोजना करता येणार नाही काय?"** असा मी प्रश्न काढला. माझे म्हणणे ऐकून घेतल्यावर बाळासाहेब पाटील यांनी अतिशय मोजक्या व ठाम शब्दात आपले मत सांगितले ते पुढील प्रमाणे **"भाऊ, तुम्ही स्वतः पिटीशनर व्हायला तयार असाल तर आपल्याला "लोक हितार्थ याचिका" दाखल करता येईल. न्यायालयांत हमखास यश मिळेल असे काही कोणी सांगू शकत नाही, पण तुम्ही जे सांगता त्या कागदपत्रांच्या आधारावर सर्वशक्तीनिशी प्रयत्न करण्यात मला मोठा आनंद वाटेल."**

### पीटीशन तयार झाले

**३३०.** मी सारी कागदपत्रे घेऊन बाळासाहेबांच्या कडे गेलो. हातातील सर्व कामे बाजूला सारून काही तासात बाळासाहेबांनी पीटीशन तयार केले. टंकलिखित २७ पृष्ठांच्या या पीटीशन मध्ये लहान मोठे १५ परिच्छेद असून त्याला निरनिराळी ९ सहपत्रे जोडण्यात आली होती. ३० जानेवारी १९९२ रोजी आमची ही सारी तयारी पूर्ण झाली होती.**आपल्या या दुःखात आपल्याशिवाय आणखी कोणीतरी मनापासून सहभागी आहेत हे पाहून पाटबंधारे विभागाचे अधिकारी आनंदीत झाले होते. ३१ जानेवारी १९९२** रोजी सकाळी बाळासाहेबांनी आपली मोटार काढली, सोबत मी स्वतः पीटीशनर म्हणून व माझे संघटनेतील ज्येष्ठ सहकारी प्रा. एस. बी. चिंचमलातपूरे असे आम्ही नागपूरला रवाना झालो. आमच्या सोबत मागोमागच पाटबंधारे विभागाचे दोन-तीन ज्येष्ठ अधिकारी त्यांच्या वाहनातून या प्रसंगी काय होते? हे पहाण्यासाठी मोठ्या उत्सुकतेने आले होते. बरोबर साडेदहा वाजता 'ॲडमिशन' च्या खंडपीठासमोर ॲड. बाळासाहेब पाटील उभे झाले. त्यांनी स्थितीचे गांभीर्य मा. न्यायमूर्तींना सांगायला सुरुवात केली. नागपुरातच असलेल्या वनविभागाच्या केंद्रस्थ अधिकाऱ्यांचा उल्लेख आला. मा. न्यायमूर्तींनी शासकीय अधिवक्त्यांना सांगितले "त्यांना फोन करा. हजर रहायला सांगा. दुपारी मधल्या सुटीनंतर सुनावणी ठेऊ."

### नागपूर खंडपीठासमोरील १९९२ ची याचिका क्रमांक ३२३

**३३१.** घटनेच्या कलम २२६ व २२७ खाली मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल झालेल्या "रिट पीटीशन नं. 323 of 1992" या याचिकेचा अशारीतीने जन्म झाला. या याचिकेमध्ये "भाऊराव तुळशिरामजी देशमुख, विधानपरिषद सदस्य, तालुका अमरावती, जिल्हा अमरावती, वय वर्षे ५२" हे वादी व "१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई. २. सचिव, वने मंत्रालय मुंबई ३. सचिव, पाटबंधारे मंत्रालय, मुंबई" हे तिघे प्रतिवादी होते. मा. उच्च न्यायालयाला या याचिकेमध्ये करण्यात आलेली **विनंती पुढील प्रमाणे होती. (१) मुख्य सचिवांचे ३०-१२-१९९१ चे आदेश, वनसचिवांचे २२ जानेवारी १९९२ चे आदेश व केंद्रस्थ अधिकारी नागपूर यांचे २३ जानेवारी १९९२ चे आदेश निष्प्रभावित करण्यात यावेत व कोणत्याही कारणासाठी अप्पर वर्धा धरणाचे काम बंद पाडण्यास उक्त अधिकाऱ्यांना मनाई करावी.** (२) उक्त आदेशांना वा त्याअंतर्गत होणाऱ्या कारवाईला स्थगनादेश देण्यात यावा (३) ही याचिका येथे चालू असतांना वनविभागाच्या किंवा पाटबंधारे विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास अप्पर वर्धा धरणाच्या चालू कामात अडथळा आणण्यास किंवा ते बंद पाडण्यास मनाई करावी.

### काम बंद पडता कामा नये - खंडपीठाचा आदेश

**३३२.** दुपारच्या (३१.१.९२) मधल्या सुटीनंतर पुन्हा त्याच खंडपीठासमोर ही बाब आली. सकाळी मा. न्यायमूर्तींनी दिलेल्या आदेशाप्रमाणे फोनने निरोप मिळाल्यावरून मुख्य वनसंरक्षकाच्या नागपूरस्थित कार्यालयातील केंद्रस्थ अधिकारी श्री. एस. पी. केळकर हे न्यायालयात हजर झाले होते. शासनाच्या वतीने शासनाचे अधिवक्ता श्री. बी. टी. पाटील हे उपस्थित होते. सुनावणी सुरू झाली. एकएक मुद्दा ॲड.बाळासाहेब पाटील न्यायमूर्तीसमोर मांडत होते. सुनावणीच्या दरम्यान "केंद्र शासनाची परवानगी मिळण्यासाठीच्या अटींची पूर्तता तुम्ही कां करीत नाही?" असे श्री. केळकर व शासकीय अधिवक्त्यांकडे पाहून मा. न्यायमूर्तींनी विचारले. अपूर्तीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली व शेवटी **"केंद्राची परवानगी मिळेपर्यंत गैरवनजमिनीवर चालू असलेले प्रकल्पाचे काम सुरू राहीले पाहिजे, बंद पडता कामा नये. असे शासनाने पहावे"** असे मत मा. न्यायमूर्तींनी व्यक्त केले व सुनावणी संपली. मा. न्यायमूर्तींच्या या अभिव्यक्तीमुळे आम्हा सर्वच उपस्थितांना मनापासून आनंद झाला होता. कारण बंद पाडले जाणारे काम हे गैरवनजमिनीवर होते अशी माझी माहिती होती व ती बिनचूक आहे हे तेथेच उपस्थित असलेल्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले त्यामुळे आमचा हा आनंद द्विगुणित झाला.

**३३३.** कोर्टाच्या दालनातून आम्ही बाहेर आलो. प्रमाणित प्रत मिळायला वेळ लागतो पण मा. खंडपीठाचे हे मत शासकीय अधिवक्त्यामार्फत संबंधित अधिकाऱ्यांना कळविले जाऊ शकते, असे बाळासाहेबांनी सांगितले. आम्ही सारेच जण उच्च न्यायालयाच्या इमारतीमधील शासनाचे अधिवक्ता श्री. बी. टी. पाटील यांच्या दालनात गेलो. मा. उच्च न्यायालयाचे मत सचिव वनविभाग यांना

कळविणारे पत्र ते तयारच करीत होते. त्या पत्राची प्रत मुख्य सचिव, पाटबंधारे सचिव, मंत्रालय मुंबई यांना व मुख्य अभियंता अप्पर वर्धा प्रकल्प अमरावती यांना त्यांनी अग्रेषित केली होती. त्याची एक प्रत त्यांनी आम्हालाही दिली. ते पत्र पुढील प्रमाणे :-

**"Office, of the Government Pleader**
***High Court of Bombay Bench at Nagpur.***
**No.(86) : Date: 31.1.1992**

To,
The Secretary to Government,
Forest Department, Mantralaya, Bombay-32.

Sub:- Writ Petition No.323 of 1992 filed by **Shri B.T.Deshmukh against State of Maharashtra and 2 others.**

With reference to the above subject and the petition referred above, I would like to inform you that the above mentioned petition came to be filed as a Public Interest Litigation in the High Court and after hearing the parties Hon'ble Court was pleased to issue notice before admission returnable on 12.2.1992. Union of India is also allowed to be made a party. **Shri S.P.Kelkar, Nodel Officer from the office of the Chief Conservator of Forests, Nagpur was also present at the time of hearing.** The petitioner has challenged the action of the Secretary, Forests Department vide letter dt.22nd Jan.92 by which it has been directed that unless the condition No.6,7 and 9 has been complete till then no work of any project will be allowed to continue and the Forests Officers should take care that no such work should be allowed to continue and also they should bring all these facts/ things to the notice of the officers of the Irrigation Department.

The petitioner has further alleged in the petition that because of this action on the part of yours, the work of Upper Wardha Project will be stopped. Moreover, once the work is held up it will take lot of time to commence it again and thereby the Project of the Govt. will come to a stand-still. That at the time of hearing and during the course of discussion, **the Hon'ble Court has expressed a displeasure in respect of non-compliance of the conditions mentioned in the letter dt.6th Jan.92** which is addressed to you by the Asstt.Inspector General of Forests, New Delhi. The Hon'ble Court has further asked the Govt. as to why the Govt. is not taking any steps for fulfilment of the conditions mentioned in the above letter. **It has also been expressed by the Hon'ble Court that Government should see that the work should go on till the approval is granted on the non-forest land.**

The matter is now kept on 12.2.92. You are requested to give a detailed parawise replies to the petition and also find out the way where the assurance given by the Govt. should also be maintained.

Sd/- (**B.T.Patil**) Government Pleader.High Court,Nagpur.

**Copy to:** (1) The Chief Secretary, Govt.of Maharashtra, Mantralaya, Bombay-32. (2) The Secretary, Irrigation Deptt., Govt.of Maharashtra, Mantralaya, Bombay-32. (3) Chief Engineer, Upper Wardha Project, Amravati for explaining the present position."

### बाळासाहेब पाटील यांचे दुःखद निधन

**३३४.** दिनांक ३१ जानेवारी १९९२ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर मी स्वतः अर्जदार असलेल्या या प्रकरणामध्ये (१९९२ ची याचिका क्रमांक ३२३) झालेला **मा. उच्च न्यायालयाचा निर्णय शासनाला कळविणारे हे जे ३१ जानेवारी १९९२ चे पत्र शासकीय अधिवक्त्यांनी रवाना केले त्यामुळे अप्पर वर्धा धरणावरील संकट निदान तात्पुरते टळले होते. नजिकच्या महिन्या दोन महिन्यात मुख्य सचिवांच्या त्या कुप्रसिद्ध आदेशामुळे काम बंद पडण्याची शक्यता संपुष्टात आली होती.** मार्च एप्रिल १९९२ मध्ये होणाऱ्या विधिमंडळाच्या अधिवेशनांत मुख्यसचिवांच्या या आदेशाला आपण "चीतपट" करू, अशी आम्हाला पूर्ण खात्री होती व तसे झालेही. मार्च-एप्रिल च्या अधिवेशनांत मुख्य सचिवांचे हे आदेश सभागृहात निष्प्रभ झाल्यानंतर मी बाळासाहेबांची भेट घेऊन आता आपली उच्च न्यायालयातील याचिका पुढे चालविण्याची आवश्यकता नाही, तेंव्हा ती पुढे रेटू नये अशी विनंती केली. बाळासाहेबांनी सभागृहात मिळविलेल्या यशाबद्दल माझे अभिनंदन केले. एवितेवी ती याचिका आता "निष्फळ" होणार, तेव्हा पुढे न रेटलेली बरी असेच त्यांचे मत पडले. याचिका पुढे न चालविण्याची/मागे घेण्याची औपचारिकता पुढच्याच आठवड्यात आपण पूर्ण करू असे त्यांनी मला सांगितले. आठवणीने याचिका मागे घेतल्याची कागदपत्रे भाऊंच्याकडे पोचवायची अशा सूचना त्यानी "बबन" ला दिल्या. वर्ष सहा महिन्याचा काळ निघून गेला. पुढे दुर्धर अशा आजाराने बाळासाहेबांचा पिच्छा पुरविला. याचिकेचे पुढे काय झाले? हे विचारण्याचे सुद्धा धैर्य त्या काळात मला झाले नाही. अप्पर वर्धा धरणाचे पाणी योजनेसाठी शहरात येऊन पोचण्याच्या तयारीत असतांनाच्या काळात शनिवार, दिनांक २६ मार्च १९९४ रोजी श्री.बाळासाहेब उर्फ एस. झेड. पाटील यांचे अकाली दुःखद निधन झाले. **सार्वजनिक हितबुद्धीची जाणीव ठेवून आपला व्यवसाय सांभाळणारा एक निष्णात कायदेपंडित या शहराने गमावला होता. दिनांक ७ एप्रिल १९९४** च्या दैनिक "हिंदुस्थान"मध्ये लिहिलेल्या श्रध्दांजलीपर लेखामध्ये बाळासाहेबांचा या प्रकरणातील सहभाग ऐकीव माहितीवर पण बराचसा बिनचुकपणे प्रा. व्ही. के. वसु यांनी नमूद केला होता तो त्यांच्याच शब्दात :-

"येत्या गुढीपाडव्याच्या सुमूहर्तावर अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन होऊ घातलेले आहे. ह्या योजनेसाठी व अप्पर वर्धा धरणाच्या बांधकामासाठी एक ऐतिहासिक सांसदीय लढाई जिंकलेली आहे. ह्या संबंधात आ. प्रा. बी. टी. देशमुख, स्व. सुदामकाका, रा. सु. गवई, माजी आमदार डॉ. शेखावत कृती समितीचे भूतपूर्व सचिव शाम देशपांडे ह्यांचे भगीरथ प्रयत्न जनतेला ज्ञात आहे. "एस्. झेड." ह्या लढाईतील एक "भगीरथ" होते हे किती जणांना माहीत आहे? महाराष्ट्र शासनाने एक आदेश निर्गमीत करून हे बांधकाम थांबविले. सांसदीय लढाई किंवा जन आंदोलन उभारण्यास *वेळ नव्हता,* तेव्हा बी. टी. नी बाळासाहेबांचा आश्रय घेतला. सतत तीन तास डिक्टेशन करून दुसऱ्या दिवशी हायकोर्टात "ब्रीफ" दाखल केली. *शासकीय आदेश निष्प्रभ झाला.* अप्पर वर्धा प्रकल्पाचे बांधकाम सुरू राहिले. हे झाले नसते तर अजून "वर्धामाय" चे अवतरण अमरावतीत किती लांबले असते हे सांगता येत नाही. बाळासाहेबांचे हे ऋण अमरावतीकर जनता कधीच विसरू शकणार नाही."

**************************************************

## २९
## *मुख्यसचिवांचा सभागृहात पराभव*

**************************************************

### लक्षवेधी सूचनेवर पाटबंधारे मंत्र्यांचे निवेदन

**३३५. मार्च एप्रिल १९९२ च्या अंदाजपत्रकीय अधिवेशनांत मुख्य सचिवांचा हा खोडसाळपणा चर्चेला आला नसता तर ती एक नवलाची गोष्ट झाली असती.** "मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १९८० पूर्वी सुरू झालेली जलसिंचन प्रकल्पाची कामे सुरू ठेवणे" या विषयावरील सर्वश्री. बी. टी. देशमुख, रा. सु. गवई यांची लक्षवेधी सूचना गुरुवार, दिनांक २ एप्रिल १९९२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये दाखविण्यात आलेली होती. आम्ही आमच्या सूचनेमध्ये कोणते मुद्दे उपस्थित केले होते व त्यावर मा. पाटबंधारे मंत्र्यांनी काय निवेदन केले ते नमूद असलेला सभागृहाच्या कामकाजाच्या अधिकृत प्रतिवेदनातील भाग पुढील प्रमाणेः-

"**श्री.बी.टी.देशमुख : (अमरावती विभाग पदवीधर)** : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाटबंधारे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १९८० पूर्वी सुरू झालेली जलसिंचन प्रकल्पाची कामे (केंद्र सरकारची मान्यता मिळालेली असली किंवा नसली तरी) सुरू ठेवण्याचा तसेच तत्पूर्वी सभागृहात आश्वासन दिल्याप्रमाणे अप्पर वर्धा धरणाचे काम ३३०.५ मीटर तलांकापर्यंत नेण्याचे व त्यावर १२ मीटर उंचीचे वक्र दरवाजे बसविण्याचे काम खास बाब म्हणून सुरू ठेवण्याचे स्पष्ट आदेश असताना

**डिसेंबर १९९१ मध्ये तत्कालीन मुख्य सचिवांनी सदरहू काम बंद करण्याचे काढलेले आदेश, त्यांच्या या आदेशात "यापुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये" अशा अर्थाचे विधान नमूद असणे,** तसेच ३२५ मीटर उंचीपर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टर वनजमिनीचे क्षेत्र बुडाले आहे, अशा प्रकारचे संपूर्णपणे असत्य विधान या आदेशात समाविष्ट असणे, वस्तुतः ६ जानेवारी १९९२ रोजी केंद्र शासनाची तत्त्वतः मान्यता मिळालेली असताना दिनांक २२ जानेवारी १९९२ रोजी तत्कालीन सचिव, वन विभाग यांनी दुसऱ्या विभागात बदलीवर जाण्यापूर्वी मुख्य सचिवांनी नमूद केल्याप्रमाणे अप्पर वर्धा धरणाचे काम बंद पाडण्याचा आदेश प्रसृत करणे, उक्त आदेश क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्राप्त झाल्यामुळे आता सदरहू काम बंद होण्याची निर्माण झालेली स्थिती, १६० कोटी रुपये खर्च सदरहू प्रकल्पावर झाला असताना व अप्पर वर्धा प्रकल्पाचा उद्‌भव धरून बांधण्यात आलेल्या अमरावती शहरासाठीच्या पाणीपुरवठा योजनेवर आतापावेतो ४० ते ५० कोटी रुपये खर्च झालेला असताना उभय प्रकल्प निष्फळ होण्याची निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबतची शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री.पद्‌मसिंह पाटील (पाटबंधारे मंत्री) : अध्यक्ष महाराज,** लक्षवेधी सूचनेच्या संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या आहेत, परंतु मला त्या निवेदनात आपल्या परवानगीने एक छोटीशी दुरुस्ती करावयाची आहे. दुसरा जो परिच्छेद आहे त्यात "परंतु अप्पर वर्धा धरणाचे काम ३३०.५ तलांकापर्यंत नेण्याचे वा त्यानंतर १२ मीटर उंचीचे...." असे म्हटले आहे तर त्याच्या ऐवजी "परंतु अप्पर वर्धा धरणाचे काम ३३०.५ तलांकापर्यंत नेण्याचे व त्यानंतर १२मीटर उंचीचे.." असे वाचावे. म्हणजे "वा" च्या ऐवजी "व" वाचावे एवढीच दुरुस्ती आहे. तेव्हा अशा दुरुस्तीसह **मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.**

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

"१९८० पूर्वी सुरू झालेली जलसिंचन प्रकल्पांची कामे केंद्र सरकारची मान्यता मिळालेली असली किंवा नसली तरी सुरू ठेवण्याचा महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला नाही.

**परंतु अप्पर वर्धा धरणाचे काम ३३०.५ तलांकापर्यंत नेण्याचे व त्यानंतर १२ मीटर उंचीचे.... वक्र दरवाजे बसविण्याचे काम खास बाब म्हणून सुरू ठेवण्याचे शासनाने आदेश दिले होते.** असे आदेश देते वेळी अप्पर वर्धा प्रकल्पाचा वन मुक्तीकरण प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित होता. दिनांक १८ नोव्हेंबर १९९१ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने मान्यता देण्यास असमर्थता दर्शविली.

अशा परिस्थितीत तत्कालीन मुख्य सचिवांनी काढलेला आदेश चुकीचा आहे किंवा अयोग्य आहे, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. ३२५ मीटर उंचीपर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टर वन जमिनीचे क्षेत्र तात्पुरत्या स्वरूपात पावसाळ्यात बुडाले होते. म्हणून तत्कालीन मुख्य सचिवांनी त्यांच्या आदेशात संपूर्णपणे असत्य विधान केले, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

केंद्र शासनाने ६ जानेवारी १९९२ रोजीच्या पत्राने काही अटींच्या, आधीन राहून वन जमीन मुक्तीकरण प्रस्तावास तत्त्वतः मान्यता दिली आहे. सचिव (वने) यांनी २२ जानेवारी १९९२ रोजी सदर अटींची पूर्तता होईपर्यंत या प्रकल्पाचे काम सुरू राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत वन खात्याच्या अधिकाऱ्यांना कळविले आहे.

दिनांक ६ जानेवारी १९९२ रोजी केंद्र शासनाने काही अटीस आधीन राहून वन जमीन मुक्तीकरण प्रस्तावास तत्त्वतः मान्यता दिली आहे. परंतु त्याच पत्रात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, अट क्रमांक ६,७ व ९ यांचे अनुपालन झाल्यानंतरच वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ खाली विधिवत मान्यता देण्यात येईल. अशा परिस्थितीत, तत्कालीन सचिव (वने) यांनी क्षेत्रीय अधिकारी यांना उद्देशून काढलेले आदेश अयोग्य आहेत, असेही म्हणणे सयुक्तिक होणार नाही. अट क्रमांक ६ ही पर्यावरणविषयक मंजुरीबाबत असून त्याचा मूळ प्रस्ताव जुलै १९८६ मध्ये केंद्र शासनास सादर करण्यात आला. सदर प्रकरण महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या पत्रव्यवहाराखाली होते. **केंद्र शासनाचे काही शेरे नुकतेच फेब्रुवारी १९९२ च्या शेवटच्या आठवड्यात प्राप्त झाले असून, त्याचा अनुपालन अहवाल मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.** पर्यावरणविषयक मंजुरीबाबत महाराष्ट्र शासनातर्फे केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. अट क्रमांक ७ ही वन जमीन कायदा, १९८० चा भंग झाल्यामुळे दुप्पट क्षेत्राचे वनीकरण प्रकल्प खर्चाने करून देण्याबाबत आहे. सदर दुप्पट क्षेत्र महसूल विभागातर्फे उपलब्ध करून देण्यात येत आहे व त्यावर प्रकल्पाच्या खर्चाने वनीकरण करण्यास शासनाची मान्यता आहे. अट क्रमांक ९ ही पर्यायी वनीकरणासाठी पाटबंधारे विभागाने वन खात्यास निधी उपलब्ध करून देण्याबाबत आहे. पर्यायी वनीकरणासाठी लागणारा निधी प्रकल्प निधीमधून पुरविण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. पर्यावरणविषयक अहवालास मान्यता मिळवून वनसंवर्धन जमीन कायद्यान्वये अप्पर वर्धा प्रकल्पाच्या प्रस्तावास अंतिम मान्यता मिळणेबाबत शासन प्रयत्नशील आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २ एप्रिल १९९२ : खंड ९५, क्रमांक १३, पृष्ठ ३१-३२)*

## काम सुरू रहाणार की बंद होणार ?

**३३६.** पाटबंधारे मंत्र्याचे संपूर्ण निवेदन हे मुख्य सचिवांना संरक्षण देणारे होते. मुख्य सचिवांच्या अपकृत्यांचा जाब विचारण्यापूर्वी प्रकल्पाचे काम शासन आपणहून सुरू ठेवणार की नाही? यांची खात्री करण्याच्या हेतूने मी विचारलेला पहिलाच उपप्रश्न व त्यावर पाटबंधारे मंत्र्यांचे उत्तर व त्यानंतर झालेली अनुपुरक चर्चा पुढील प्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, हे संबंध जे उत्तर आहे ते मुख्य सचिवांना पाठीशी घालणारे आणि सभागृहाचा अवमान करणारे अशा प्रकारचे आहे. पूर्वीची उत्तरे न पाहता उत्तरे दिली आहेत. ३० जुलै १९९१ ला या ठिकाणी असे उत्तर दिले होते की, "महाराष्ट्र शासनाने असा निर्णय घेतलेला आहे की, ८० च्या पूर्वीचे जे प्रकल्प आहेत त्यांची कामे सुरू ठेवावयाची आहेत." अध्यक्ष महाराज, पुन्हा प्रश्न विचारल्यानंतर असे सांगितले की, "दोन महिन्यांपूर्वी राज्य शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्याच्यानुसार ही कामे सुरू करण्याचे आदेश दिले जातील." सभापती महोदय, आपण असे विचारले होते की, "शासनाने हे आदेश दिलेले आहेत की देणार आहेत?" त्यावर मा. राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिलेले आहे की, "कॅबिनेटने निर्णय घेतला आहे त्याप्रमाणे अधिवेशन संपण्याच्या आत आदेश दिले जातील." अधिवेशन संपण्याच्या आत त्याप्रमाणे आदेश दिलेले आहेत व त्याप्रमाणे हे काम सुरू आहे. आणि हे मुख्य सचिव असे लिहितात की, "यापुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशाप्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये." अध्यक्ष महाराज, ही काय गंमत आहे? निवेदनामध्ये एका वाक्याचा याबाबत खुलासा नाही. संबंध हे जे निवेदन आहे ते मुख्य सचिवांना पाठीशी घालणारे आहे आणि म्हणून माझे म्हणणे असे आहे की, एकतर पूर्ण माहिती घेऊन या ठिकाणी उत्तर दिले पाहिजे. आपण पहिल्या ओळीमध्ये असे म्हटले आहे की, "असा निर्णय घेतलेला नाही" ९ डिसेंबर १९९१ ला पुन्हा म्हणजे ६ महिन्यानंतर मी सभागृहामध्ये तारांकित प्रश्न क्रमांक १३३४७ च्या चर्चेमध्ये असे विचारले होते की, "हा ८० पूर्वीचा प्रकल्प आहे. अशा प्रकल्पाच्या बाबतीत केंद्राची परवानगी आलेली नसली तरी काम सुरू ठेवायचे असा धोरणात्मक निर्णय शासनाने काही महिन्यापूर्वी घेतलेला आहे ही गोष्ट खरी आहे काय?" त्याला त्यावेळी उत्तर "होय" असे दिलेले आहे. पुढे असे विचारले आहे की, **या सभागृहमध्ये पूर्वी सांगितल्याप्रमाणे ९२ पूर्वी अप्पर वर्धा प्रकल्पाच्या लोखंडी वक्रद्वाराचे काम पूर्ण करण्यात येईल हे खरे आहे काय ? याला उत्तर "होय" असे दिलेले आहे. मग ते त्याप्रमाणे पूर्ण होईल काय?**

**डॉ.पद्‌मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतला तो वन नियमाचा भंग झाल्यानंतर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा तो निर्णय होता. त्यामध्ये असे म्हटले होते की, ८० च्या अगोदर ज्यांना प्रशासकीय मान्यता दिली आणि ८० साली जी कामे सुरू झाली ती कामे चालू ठेवावी. तेथे ज्या अधिकाऱ्यांनी कामे चालू ठेवली त्यांच्या विरुद्ध कारवाई करू नये अशा प्रकारचा तो निर्णय होता. **मला सभागृहाला हे सांगावयाचे आहे की, हे धरणाचे काम बंद नव्हते आणि बंद नाही. हे दगडी काम आहे ते सगळे जवळ जवळ पूर्ण झालेले आहे आणि वक्र दरवाजे बसविण्याचे कामही पूर्ण करण्यात येईल.**

**श्री.बी.टी.देशमुख :** सभागृहामध्ये आपण सांगितल्याप्रमाणे जून १९९२ पर्यंत वक्र दरवाजे बसविण्याचे काम पूर्ण केले जाईल असे स्पष्टपणे आपण सांगणार आहात काय?

**डॉ.पद्‌मसिंह पाटील :** ते काम जून ९३ पर्यंत पूर्ण होईल. ते काम होण्यास अवधी लागेल कारण मंजुरीसाठी ते काम थांबलेले नाही. वक्राकार दरवाजे तयार व्हायचे आहेत आणि तयार होवून बसवून जून ९३ पर्यंतचा काळ लागेल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २ एप्रिल १९९२ : खंड ९५, क्रमांक १३, पृष्ठ ३३)*

## आक्षेपार्ह आदेशाबाबत सभापतींचे आदेश

**३३७.** मंत्र्याविषयी, विधानमंडळाविषयी आपल्या टिप्पणीमध्ये व आदेशामध्ये

अत्यंत बेजबाबदार विधाने करणाऱ्या मुख्य सचिवांचे पितळ सभागृहात मी त्यांच्या आदेशातील ती वाक्ये वाचून दाखविल्यामुळे उघडे पडले. त्यावर सभागृहामध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली. "हा सभागृहाचा अवमान आहे असे उद्‌गार" ज्येष्ठ सदस्य श्री. टी. जी. देशमुख यांनी काढले. "मुख्य सचिव असा आदेश देऊ शकतात काय?" असा प्रश्न खुद्द माननीय सभापतींनी विचारला. "ते आम्ही स्वस्थचित्ताने सहन करणार नाही" असे उद्‌गार श्री. प्रमोद नवलकर यांनी काढले. शेवटी "मी आता असे आदेश देतो की, सचिवांच्या पातळीवर अशा तऱ्हेने विधिमंडळाबाबत निवेदने करणे योग्य नाही. याची कल्पना संबंधितांना व अन्य अधिकाऱ्यांना मंत्रिमहोदयांनी द्यावी." असा मा. सभापतींनी आदेशच दिला. ही चर्चा मुळातून वाचण्यासारखी आहे ती पुढील प्रमाणे:-

"**श्री.बी.टी.देशमुख :** दोन महिन्यामध्ये उत्तरामध्ये इतका फरक कसा काय? हे उत्तर ९ डिसेंबर १९९१ चे आहे. ही काही गोष्ट बरोबर नाही. ४०-५० कोटी रुपये पाणीपुरवठ्याच्या योजनेवर खर्च झाला. १६० कोटी रुपये या प्रकल्पावर खर्च झाला आणि अत्यंत बेजबाबदारपणाने या मुख्य सचिवांच्या संबंध कारवाईला आपण संरक्षण देता ही गोष्ट काही बरोबर नाही. माझे असे म्हणणे आहे की, त्यांनी यामध्ये असत्य विधान केले. शासनाने आदेश दिला की, सध्या पाणी थांबवू नका आणि त्याप्रमाणे सारी पाण्याची चणचण असतांना एक थेंब पाणी थांबविले नाही. सारे पाणी सोडून दिले आणि मुख्य सचिव त्यांच्या आदेशामध्ये लिहितात की, "३२५ मीटर उंची पर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टरचे वनक्षेत्र बुडालेले आहे." आम्ही त्या ठिकाणी जागेवर जाऊन पाहून आलो. त्या ठिकाणी प्यायला पाणी नाही. पाण्याचा थेंब नाही असे असतांना त्यांनी हे सबंध असत्य लिहिलेले असतांना आपण त्यांना संरक्षण देता ही गोष्ट बरोबर नाही. माझे असे म्हणणे आहे की, **विधानमंडळाविषयी त्यांनी जो उल्लेख त्यांच्या पत्रामध्ये केलेला आहे तो अत्यंत आक्षेपार्ह आहे. त्या विषयी आपण काय कारवाई करणार आहात?**

**डॉ.पद्‌मसिंह पाटील :** हा जो प्रस्ताव केंद्र शासनाकडे आपण मंजुरीसाठी पाठविला होता त्या प्रस्तावाला केंद्र शासनाने मंजुरी देण्यास १८ नोव्हेंबर १९९१ साली असमर्थता प्रगट केली होती. मुख्य सचिवांनी त्यांच्या पत्रामध्ये म्हटले आहे की, "३२५ मीटर उंची पर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टर वन जमिनीचे क्षेत्र तात्पुरते स्वरूपात पावसाळ्यात पाण्याखाली बुडाले होते" हे खरे आहे. आता धरणामध्ये तेथे पाणी नसेल. पाणी कमी असेल परंतु पावसाळ्यामध्ये हे पाणी साठलेले होते आणि साठलेल्या पाण्यामुळे ४२५ हेक्टर वन जमीन खरीच पाण्याखाली आलेली होती. म्हणून मुख्य सचिवांना कसल्याही प्रकारचे संरक्षण देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. ती वस्तुस्थिती होती.

**श्री. बी. टी. देशमुख :** ज्या दिवशी मोवाड बुडाले त्या दिवशी तुमचे ४२५ हेक्टर क्षेत्र बुडाले असेल हो! त्याच नदीच्या काठावर मोवाड आहे. त्यासंबंधी काय कौतुक करता तुम्ही? मी या ठिकाणी जबाबदारीने तुम्हाला सांगतो.

**सभापती :** माननीय मंत्र्यांनी हे सांगावे की, ४२५ हेक्टर वनक्षेत्र पावसाळ्यात त्या ठिकाणी बुडाले होते काय?

**डॉ.पद्‌मसिंह पाटील :** होय

**श्री. बी. टी. देशमुख :** मोवाडला पूर आला त्या दिवशी कदाचित त्यापेक्षा जास्त क्षेत्र बुडाले असेल.

**सभापती :** ठीक आहे. त्या दिवसाचे सोडून द्या.

**श्री. बी. टी. देशमुख :** यांनी असे म्हटले आहे की, ३२५ मीटर उंचीपर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टर वन जमिनीचे क्षेत्र त्यामध्ये बुडाले.

**सभापती :** 'तात्पुरत्या स्वरूपात' असा शब्दप्रयोग केलेला आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** त्यांनी त्यांच्या मूळ आदेशात तसे म्हटले नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी मलमपट्टी केलेली आहे. मी ओरिजनल पत्र वाचून दाखवितो.

**सभापती :** त्यामध्ये काय उल्लेख आहे?

**श्री. बी. टी. देशमुख :** त्यामध्ये असे म्हटले आहे की, "३२५ मीटर उंचीपर्यंत दगडी बांधकाम करण्यात आल्यामुळे ४२५ हेक्टर वन जमिनीचे क्षेत्र बुडालेले आहे. सदरची उंची ३३० मीटरपर्यंत वाढविल्यास वक्राकार दरवाजे बसविल्यानंतर ६७२ हेक्टर त्यात वन जमीन बुडीत होईल." हा पुढचा अंदाज सांगतात. परंतु पहिले विधान त्यांनी पॉझिटीव्ह केलेले आहे ते संपूर्णपणे असत्य आहे.

**डॉ.पद्‌मसिंह पाटील :** पहिले विधान केलेले आहे ते बरोबर आहे. फक्त त्यांनी तात्पुरता शब्द वापरला आहे. त्या धरणाची उंची ३२५ मीटर पर्यंत केलेली होती. बांधकाम केलेले होते त्याच्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात हे झालेले होते.

**सभापती :** तात्पुरता शब्दामुळे हा सगळा बदल होतो.

**डॉ.पद्‌मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, तात्पुरत्या स्वरूपात काय आणि कायम स्वरूपात काय शेवटी त्यामध्ये वन जमीन ही बुडालेली आहे.

**सभापती :** 'तात्पुरता' हा शब्द विशेष नाही असेही नाही. तात्पुरत्या शब्दामुळे सगळा बदल होतो.

**डॉ. पद्‌मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, तात्पुरत्या सोडलेल्या पाण्यामुळे सुद्धा वनक्षेत्र बुडाल्यामुळे वन खात्याच्या नियमांचा निश्चितपणे भंग झालेला आहे. म्हणून ही बाब फक्त त्यांनी निदर्शनास आणून दिलेली आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** त्यांचा शब्द 'तात्पुरत्या' नव्हता. तो तुम्ही जोडून त्यांना संरक्षण दिलेले आहे. त्यानंतर त्यांनी पुढे जे विधान केलेले आहे त्याला तुम्ही संरक्षण कसे देणार ? त्यांनी असे म्हटलले आहे की,"पुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देऊ नये."

**श्री. टी. जी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, हा सभागृहाचा अवमान आहे व ही बाब अतिशय गंभीर आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. तेव्हा या बाबतीत तरी त्यांच्यावर अॅक्शन घेणार की नाही?

**डॉ. पद्‌मसिंह पाटील :** त्यांनी त्यांच्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, "मला स्पष्टपणे म्हणावे लागेल की, केंद्र शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय पाटबंधारे विभागाला उक्त अनुमती देण्याबाबत या नस्तीवर आपले मत नोंदविणाऱ्या मुख्य सचिवांना वन अधिनियमाखाली पाळावयाच्या वैधानिक कार्यवाहीस तोंड द्यावे लागेल. माझ्या माहितीप्रमाणे शासनाने विधीमंडळात वरील प्रमाणे काम सुरू ठेवण्यास परवानगी देण्यासंबंधीचे आश्वासन दिले होते." अशा प्रकारे हे सर्व निदर्शनास आणून देण्याचा त्यांचा हेतू होता. त्यांनी पत्रामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "निर्माण झालेल्या विकट परिस्थितीतून मार्ग निघावा या दृष्टिकोनातून ही कार्यवाही वनसंवर्धन कायद्याखालील तरतुदीनुसार पूर्व परवानगीशिवाय पाटबंधारे विभागास काम करण्याची अनुमती देणे अशी कारवाई अधिकाऱ्यांकडून केली असल्यामुळे अशा अधिकाऱ्यांच्या मागे शासनाने उभे राहून अशा कारवाईपासून त्यांना उन्मुक्त करावे लागेल." म्हणजे त्यांना इम्युनिटी द्यावी ही बाब त्यांनी निदर्शनास आणलेली आहे.

**सभापती :** पुढचे काय वाक्य आहे ते वाचा.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, त्यांनी जे वाक्य लिहिलेले आहे ते असे आहे की, "यापुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये." तेव्हा त्यांनी असे म्हटले आहे की नाही ते सांगा.

**श्री.नितीन गडकरी :** असे जे त्यांनी म्हटले आहे ते योग्य आहे काय?

**सभापती :** मुख्य सचिव असा आदेश देऊ शकतात काय?

**डॉ.पद्‌मसिंह पाटील :** नाही. त्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचा आदेश दिलेला आहे परंतु तो आश्वासनाचा मान राखण्याच्या हेतूने दिलेला आहे. त्यांनी अवमान केलेला नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

**डॉ. पद्‌मसिंह पाटील :** या ठिकाणी वन खात्याच्या आदेशाचा भंग होतो हे त्यांना निदर्शनास आणावयाचे होते. **त्यातून हे थोडेसे ओव्हर केलेले आहे. थोडेसे जास्त लिहिलेले आहे.**

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात.)

**सभापती :** सर्वांनी खाली बसावे. वन खात्याच्या नियमांचा भंग होतो हे त्यांचे म्हणणे बरोबर आहे. याबद्दल तक्रारीचा भाग नाही. परंतु विधिमंडळात अशा प्रकारे आश्वासन देऊ नये असे जे मुख्य सचिवांनी सांगितलेले आहे ते बरोबर आहे काय ?

**डॉ. पद्‌मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, त्यांनी असे म्हटलेले आहे की,"वरील आश्वासनाचा मान राखण्याच्या हेतूने मी खालीलप्रमाणे प्रस्तावित करतो" म्हणजे He is putting humbly, sir, प्रस्तावित करतो असे म्हटलेले आहे म्हणजे आदेश देतो असे त्यांनी म्हटले नाही. एखादा नियम असेल, एखादा कायदा

असेल....

**सभापती :** तुम्हाला ते चालत असेल तर ठीक आहे.

**डॉ. पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, यामध्ये असे म्हटले आहे की.....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात)

**सभापती :** वाक्य काय आहे ते वाचून दाखवा.

**श्री. प्रमोद नवलकर :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण आता मंत्रिमहोदयांना असे म्हटले की, "तुम्हाला जर चालत असेल तर ठीक आहे." परंतु, अध्यक्ष महाराज, इथे कुणाच्या वैयक्तिक मानाचा प्रश्न नाही. शेवटी ते मंत्री आहेत आणि ज्यावेळेस त्यांना अशा प्रकारचा आदेश देऊन अवमानित केले जाते त्यावेळेस तो संपूर्ण सभागृहाचा अवमान होतो. ते आम्ही स्वस्थचित्ताने सहन करणार नाही. त्यांना ते सहन होत असेल परंतु सभागृहामध्ये ते कोणत्याही परिस्थितीत सहन होणे शक्य नाही. त्यामुळे त्या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई व्हावयास पाहिजे. ती कारवाई आपण करणार आहात काय?

**डॉ.पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, एखाद्या कायद्याचा किंवा नियमाचा जर भंग होत असेल तर ती बाब आमच्या निदर्शनास आणण्याचे काम सचिवांचे आहे, मुख्य सचिवांचे आहे. त्यांनी यामध्ये मान राखण्याचा वगैरे शब्द वापरले आहेत. प्रस्तावित करतो असे म्हटले आहे. यामध्ये मी आदेश देतो अशी उन्मत्त भाषा अजिबात नाही.

**सभापती :** जे वाक्य त्यामध्ये लिहिले आहे ते वाचावे.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, मी ते वाक्य वाचतो. "सबब वरील आश्वासनाचा मान राखण्याच्या हेतून मी खालीलप्रमाणे प्रस्तावित करतो : यापुढे विधिमंडळात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पाच्या संदर्भात अशा प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये."

**डॉ. पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, हे त्यांनी प्रस्तावित केले आहे. त्यांनी अतिशय अदबीने मुद्दा विचारार्थ ठेवला.

**सभापती :** मी आता असे आदेश देतो की, **सचिवांच्या पातळीवर अशा तऱ्हेने विधी मंडळाबाबत निवेदन करणे योग्य नाही.** याची कल्पना संबंधितांना व अन्य अधिकाऱ्यांना मंत्री महोदयांनी द्यावी.

**डॉ. पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, ठीक आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, या आदेशामध्ये त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "प्रस्तुत प्रकरणी उक्त स्वरूपाचे आदेश निर्गमित करताना, त्या त्या आदेशामध्ये अशी शब्दरचना असावी की, केंद्र शासनाची मंजुरी मिळाल्यावर उक्त आदेशानुसार कामास सुरुवात करण्यात येईल."

**सभापती :** मी आता मा. मंत्री महोदयांना आदेश दिला आहे.

**डॉ.पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, आपला आदेश सर्वांना लागू होतो." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २ एप्रिल १९९२ : खंड ९५, क्रमांक १३, पृष्ठ ३६-३७)*

### काम सुरू करण्याचे आदेश देण्याचे आश्वासन

**३३८.** सभागृहातील या सबंध चर्चेमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर दाखल केलेली याचिका व त्याबाबतचे न्यायालयाचे अंतरिम आदेश यांचा उल्लेख मी माझ्याकडून सतत टाळला व कटाक्षाने टाळत होतो. याचे मुख्य कारण असे की चुकून आपल्या तोंडातून हा उल्लेख बाहेर पडला आणि **मंत्रिमहोदयांनी "तुम्ही आता न्यायालयात गेलेच आहात तेंव्हा आता न्यायालयात जो काही अंतिम निर्णय होईल तो आम्ही मान्य करू" असे उद्‌गार काढले तर आपली फारच फजिती होईल अशी मला मनातल्या मनात मोठीच भिती वाटत होती.** मी स्वतः त्यामुळे न्यायालयातील प्रकरणाचा उल्लेख कटाक्षाने टाळत होतो. **योगायोगाने तसा तो टाळणे मंत्रिमहोदयांना सुद्धा सोईचे होते असे दिसून येते.** असे असले तरी काम सुरू ठेवण्याचा आदेश शासन स्वतः देणार आहे की नाही? हा महत्त्वाचा प्रश्न होता. तसे आदेश दिले जातील असे मंत्रिमहोदयांना सभागृहात कबूल करावे लागले ती चर्चा पुढील प्रमाणे :-

"**श्री. बी. टी. देशमुख :** आता माझा प्रश्न असा आहे की, हे काम सध्या चालू आहे की बंद आहे?

**डॉ. पद्मसिंह पाटील :** हे काम सध्या प्रगतिपथावर आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** हे काम जर चालू असेल तर मग मी आता मूळ प्रश्न असा विचारतो की, हे पत्र मागे घेण्यात आलेले आहे आणि ते काम चालू ठेवा असे आपण संबंधितांना कळविले आहे काय? कळविले नसल्यास केव्हा कळविणार?

**डॉ. पद्मसिंह पाटील :** यांचे पत्र मागे घेतले वगैरे काही कळविले नाही. कळविण्याची काही गरज नाही. कारण हे काम कधी बंद नव्हते आणि यापुढेही बंद होणार नाही.

**श्री. बी. टी. देशमुख :** या आदेशात मुख्य सचिव पुढे असे लिहितात की...

**सभापती :** काम बंद नव्हते असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

**डॉ. पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात माननीय मुख्य मंत्र्यांकडे एक बैठक झाली. त्या बैठकीला वन मंत्री, मुख्य सचिव, सचिव (वने), सचिव (पाटबंधारे) हे उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये या धरणाचे काम चालूच ठेवावयाचे असे ठरले आहे आणि तसे आदेश देण्यात आलेले आहेत.

**श्री. बी. टी. देशमुख :** मग माझे म्हणणे असे आहे की, ही गोष्ट क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आपण कळविली आहे काय?

**सभापती :** काम चालूच आहे असे मंत्री महोदय म्हणतात.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महोदय, तशी स्थिती नाही.

**डॉ. पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, हे काम चालू आहे, प्रगती पथावर आहे.

**सभापती :** पण सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख हे असे म्हणतात की, तशी परिस्थिती नाही. तरी या संबंधात पुन्हा चौकशी करावी.

**डॉ. पद्मसिंह पाटील :** अध्यक्ष महाराज, काम सुरू आहे, बंद नाही पण सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांच्या समाधानासाठी तसे पुन्हा कळविण्यात येईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २ एप्रिल १९९२ : खंड ९५, क्रमांक १३, पृष्ठ ३७)*

*************************************************

## ३०
## आश्वासन समिती प्रकल्पस्थळी

*************************************************

### देखरेख समितीची बैठक

**३३९.** अप्पर वर्धा धरणावर १९९१ च्या शेवटच्या महिन्यांमध्ये मुख्य सचिवांनी आणलेल्या संकटाचा १९९२ च्या सुरुवातीच्या महिन्यामध्ये कसा मुकाबला करण्यात आला याची तपशीलवार माहिती वर देण्यात आली आहे. आता पुन्हा आपण १९९२ मधील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामाच्या पाठपुराव्याकडे वळू. **२८ फेब्रुवारी १९९२** रोजी जिल्हा नियोजन व विकास परिषदेने नेमलेल्या "देखरेख समिती"ची बैठक विभागीय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये झाली. निरनिराळ्या आठ उपकामांच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. १) इनटेक वर्क २) संप व पंप हाऊस, ३) अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्व वाहिनी व ४) जलकुंभाची कामे पूर्ण झाल्याची माहिती या सभेत देण्यात आली. इतर चार उपकामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला व ती कामे समाधानकारकपणे सुरू आहेत अशी माहिती देण्यात आली. योजनेच्या एकूण ५५ कोटी रुपयापैकी जानेवारी १९९२ अखेरीस ४१.८५ कोटी रुपये खर्च झाला असल्याचे या सभेत सांगण्यात आले. या सभेला असेही सांगण्यात आले की :-

"सर्व कामे ठरलेल्या वेळेप्रमाणे होत असून ही योजना ठरलेल्या वेळेवर पूर्ण केली जाईल. योजनेची सर्व प्रकारची भौतिक कामे जून, १९९३ पर्यंत पूर्ण होतील आणि धरणात पाणी साठविल्यानंतर या योजनेचे परीक्षणाचे (टेस्टींग) काम केले जाईल आणि **डिसेंबर, १९९३ पर्यंत सुरळीत पाणी पुरवठा सुरू होईल. काही कारणांनी धरणात जर पाणी साठवता आले नाही तर मात्र सुरळीत पाणी पुरवठ्याच्या तारखेत बदल होऊ शकेल.** या कामाच्या अंमलबजावणीमध्ये योजना वेळेवर पूर्ण करण्याचे दृष्टीने काहीही अडचणी नाहीत." मुख्य सचिवांच्या आदेशाने (३०.१२.९१) काम बंद पाडलेले आहे, उच्च न्यायालयाच्या आदेशाची (३१.१.९२) अधिकृतपणे कल्पना नाही, मार्च १९९२ मधील विधानमंडळाचे अधिवेशन अजून सुरूच व्हायचे आहे, अशावेळी २८.२.९२ रोजीची ही बैठक झाली अप्पर वर्धा धरणाचे काम बंद पडलेले/पडणार आहे या भावनेच्या पोटीच या बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये "**काही कारणांनी धरणात जर पाणी साठवता आले नाही तर मात्र सुरळीत पाणी पुरवठ्याच्या तारखेत बदल होऊ शकेल.**" असा भयदायक उल्लेख नोंदविलेला आपणास दिसून येतो.

## सुधारित प्रस्ताव सादर

**३४०.** योजनेला ५५ कोटीची प्रशासकीय मान्यता होती व खर्च जवळजवळ ४२ कोटी रुपये झाला होता. उरलेल्या १३ कोटीत म्हणजे एकूण ५५ कोटी रुपयामध्ये हे बांधकाम पूर्ण होईल हे शक्य दिसत नव्हते. हा खर्च एकूण बराच वर जाईल ही गोष्ट उघड दिसत होती. अशा स्थितीत महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळाचे मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी सचिव नगरविकास विभाग यांना "सुधारित आराखडे व अंदाजपत्रके" याबाबतचा एक प्रस्ताव **२४ मार्च १९९२** च्या पत्रान्वये सादर केला. ५५ कोटीवरून ही किंमत ७८ कोटीवर कां म्हणून गेली? याची त्यांनी पाच प्रमुख कारणे या पत्रात सांगितली होती. **पहिले कारण** असे की मुळात ही योजना १९८६-८७ च्या दरसुचीनुसार ५५ कोटीची बांधली आहे. **दुसरे** असे की सर्वच साहित्याच्या किंमती मध्ये अपक्षेपेक्षा जास्त वाढ झाली आहे. **तिसरे** असे की, १९८६ मध्ये असलेली स्टील, सिमेंट, पाईप्स या साहित्याची किंमत १९९१ मध्ये जवळ जवळ दुप्पट झाली आहे. **चौथे** असे की पाटबंधारे विभागाने इनटेक वर्कच्या कामात आमूलाग्र बदल केलेला आहे. पाटबंधारे विभागाने कळविल्याप्रमाणे त्या कामाची किंमत मंजूर योजनेत ११७.१० लाख होती ती आता पाटबंधारे विभागाने ७०६.६९ लाख रुपये कळविलेली आहे. **पाचवे** असे की आस्थापना अवजारे व साहित्य यावरील खर्च मंजूर योजनेत ७.५० टक्के धरलेला होता तो १७.५० टक्के धरणे आवश्यक आहे. आपल्या पत्राच्या सुरुवातीलाच मुख्य अभियत्यांनी असे नमूद केले होते की, "मंजूर झालेल्या योजनेत प्रावधान केलेल्या घटक कामांना तात्काळच सुरवात करण्यात आली. **सध्या ही घटक कामे प्रगतीपथावर असून योजना डिसेंबर १९९३ च्या अखेरपर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.** ह्या योजनेवर आतापर्यंत (जानेवारी १९९२ पर्यंत) रुपये ४१८६.०० लक्ष खर्च झालेला आहे. हा खर्च लक्षात घेऊन व शिल्लक कामांचा अंदाजित खर्च लक्षात घेता ही योजना कार्यान्वित करण्याच्या टप्प्यापर्यंत एकूण अपेक्षित खर्च योजनेच्या मंजूर किंमतीपेक्षा जवळ जवळ ४१.८२ टक्के वाढण्याची शक्यता आहे." उपरोक्त सर्व कारणामुळे सुधारित प्रस्ताव ७८ कोटीचा तयार करण्यात आला होता.

मुख्य अभियंत्यांनी आपल्या पत्राच्या शेवटी असे नमूद केले होते की, :- "अमरावती शहरातील सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठा व्यवस्था अत्यंत कमी पाणी पुरवठा करण्याच्या स्तरावर आलेली असून **दरवर्षीच्या उन्हाळ्यात शहरात भीषण पाणी टंचाई निर्माण होत असते. ही परिस्थिती या परिसरात वास्तव्य करणारे लोकप्रतिनिधी नेहमीच शासनाच्या नजरेस आणत असतात व ही वाढीव योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत एकसारखा तगादा लावत असतात.** त्यानुसार ही योजना डिसेंबर १९९३ च्या अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे दृष्टीने या सुधारित अंदाजपत्रकांना शासनाची सुधारित प्रशासकीय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. तरी या सुधारित अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर मिळण्याची व्यवस्था करावी ही विनंती." या सुधारित प्रस्तावाला मान्यता मिळावी यासाठी सभागृहामध्ये बराच पाठपुरावा करावा लागला याचा तपशील पुढे येईल.

## आश्वासन समितीची प्रकल्प स्थळाला भेट

**३४१.** अमरावती शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वी या प्रश्नावर एक तपशीलवार अहवाल (९१ वा : भाग २) विधान परिषद आश्वासन समितीने ८ ऑगस्ट १९८६ रोजी सभागृहाला सादर केला होता. तसे करण्यापूर्वी १२ व १३ जून १९८६ रोजी प्रत्यक्ष अमरावती शहराला भेट देऊन अस्तित्वातील कार्यरत पाणीपुरवठा योजनेची व पाणीपुरवठ्याच्या शोचनीय सद्यःस्थितीची या समितीने पहाणी केली होती. आता ५५/७८ कोटीच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचे बांधकाम जवळजवळ अंतिम टप्प्यात आलेले होते. **सदस्यांनी या प्रश्नावर सभागृहात मिळविलेल्या आश्वासनाचा खूपच प्रभावी पाठपुरावा समितीने केलेला होता व म्हणून प्रत्यक्ष प्रकल्प स्थळाला भेट देऊन पहाणी करण्याचा निर्णय आश्वासन समितीने घेतला.** २९ व ३० मे १९९२ या दोन दिवस विधानपरिषद आश्वासन समितीचा मुक्काम अमरावती जिल्ह्यामध्ये होता.

## क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या साक्षी

**३४२.** २९ मे १९९२ रोजी अमरावती येथे झालेल्या बैठकीत समितीने या कामाशी सबंधीत क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या साक्षी नोंदविल्या. डॉ. पंजाबराव देशमुख हे समितीप्रमुख व त्याशिवाय प्रा. बी. टी. देशमुख, श्रीमती यशोधरा बजाज व श्री. विजय मोरे हे विधानपरिषद सदस्य या बैठकीला उपस्थित होते. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या वतीने अधिक्षक अभियंता श्री. के. बी. वारे व कार्यकारी अभियंता श्री. तु. शि. लिचडे हे उपस्थित होते. या साक्षीचे कार्यवृत्त आश्वासन समितीच्या १९९२ च्या कार्यवृत्त पुस्तिकेमध्ये पृष्ठ १२६ ते १३१ वर नोंदविलेले आहे. त्यातील महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणे :-

"**बी. टी. देशमुख :** योजना पूर्ण करण्याचे आपले जे वेळापत्रक आहे त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आपल्याला कोठली अडचण आहे काय?

**श्री. के. बी. वारे, अधिक्षक अभियंता :** नाही

**श्री. बी. टी. देशमुख :** या योजनेतील इनटेक वर्क्सची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. के. बी. वारे, अधिक्षक अभियंता :** हे काम पाटबंधारे खात्यातर्फे पूर्ण करण्यात आले आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** रॉ वॉटर कनेक्टींग मेन च्या कामाची काय प्रगती आहे?

**श्री. के.बी. वारे, अधिक्षक अभियंता :** पाईपलाईन टाकण्याचे काम १०० टक्के पूर्ण झालेले आहे.

**श्री. बी. टी. देशमुख** रॉ वॉटर संप आणि पंप हाउसचे काम किती झालेले आहे?

**श्री. के. बी. वारे, अधिक्षक अभियंता :** ही दोन्ही कामे १०० टक्के पूर्ण झालेली आहेत. तसेच रॉ वॉटर पंपीग मशिनरी व एअर व्हेसलेचे कामासाठी लागणारी ९० टक्के साधने आली असून सबस्टेशन सिव्हील वर्क सुद्धा ८० टक्के पूर्ण झाले आहे. पंप बसविण्याचे काम सुद्धा ५५ टक्के पूर्ण झालेले आहे. पंपिंग मशिनरीसाठी लागणारे सर्व साहित्य साईटवर पोहोचलेले असल्याने डिसेंबर १९९२ पर्यंत सर्व फिजिकल काम पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** रॉ वॉटर मेनच्या कामाची स्थिती काय आहे?

**श्री. के. बी. वारे, अधिक्षक अभियंता :** १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यानंतर ब्रेक प्रेशर टँकसाठी खोदकाम सुरू झाले असून कंत्राटदारांची निश्चिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे जवळपास ३ महिन्यात हे काम संपले.

**श्री. बी. टी. देशमुख :** रॉ वॉटर ग्रव्हीटीमेन च्या कामाची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. के. बी. वारे, अधिक्षक अभियंता :** हे काम सुद्धा अर्ध्याच्यावर पूर्ण झालेले आहे म्हणजे ५७ टक्के काम पूर्ण झालेले असून एप्रिल, १९९३ पर्यंत ते पूर्ण होईल. ५ ते ६ पाईप्स रोज तेथे येत आहेत.

**श्री. बी. टी. देशमुख :** वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्टच्या कामाची स्थिती काय?

**श्री. के. बी. वारे, अधिक्षक अभियंता :** ५० टक्के काम पूर्ण झालेले असून हेही काम एप्रिल, ९३ पर्यंत पूर्ण होईल." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९२ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १२७)*

**३४३.** साक्षीचे कामकाज आटोपून त्याच दिवशी समितीने प्रत्यक्ष धरण स्थळाजवळ असलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या संप व पंप हाऊसला भेट दिली. या भेटीचा अधिकृत वृत्तांत पुढील प्रमाणे :

"पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणाला समितीने प्रत्यक्ष भेट देऊन कामाची पाहणी केली. तसेच पंप हाऊसची पाहणीही समितीने केली. पंप हाऊसमध्ये सध्या ५ पंप बसविण्यात आले असून २ पंप बसविण्यात येणार आहेत. कामाच्या प्रगती बाबत सांगताना श्री. वारे यांनी समितीला अशी माहिती दिली की, इनटेक वर्क्स हे काम पाटबंधारे विभागातर्फे पूर्ण करण्यात आले आहे. रॉ वॉटर पंप व रॉ वॉटर पंप हाउसचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. पंपिंग मशिनरीसाठी लागणारे ९० टक्के साहित्य आले आहे. व सबस्टेशन सिव्हील वर्क ८० टक्के झाले आहे. ब्रेक प्रेशर टँकचे खोदकाम सुरू झाले आहे. वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्टचे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. ॲप्रोच रोडचे कामही जवळपास पूर्ण झाले आहे." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९२ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १३०)*

## सुधारित प्रस्तावाला प्रशासकीय अजून मान्यता नाही

**३४४.** विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील देखरेख समितीची बैठक **१ ऑगस्ट १९९२** रोजी पुन्हा झाली. योजनेच्या सर्व उपांगांच्या बांधकामाचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. काही कामे पूर्ण झाली आहेत व १९९३ मध्ये उर्वरित सर्व कामे पूर्ण होतील असे या आढाव्यात दिसून आले. **मात्र आतापावेतो ५२ कोटी रुपये खर्च झाला असून आणखी ३ कोटी रुपये खर्च झाल्यावर सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्यास काम बंद पडण्याची स्थिती निर्माण होऊ शकेल किंवा कसे?** याबाबत या बैठकीत चर्चा झाली या बैठकीच्या कार्यवृत्तातील या संबधीचा भाग पुढील प्रमाणे :-

"चालू असलेल्या योजनेची प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजित किंमत सुमारे ५५ कोटी रुपये असून आतापर्यंत सुमारे ५२ कोटी रुपये खर्च झाले आहे आणखी ३ कोटी रुपये खर्च होईपर्यंत काम सुरू राहील. सदर योजना सुधारित करण्यांत आली असून तिची सुधारित किंमत सुमारे ७८ कोटी रुपये आहे. या सुधारित योजनेला शासनाची मंजुरी मिळावी म्हणून प्रस्ताव २४.३.९२ रोजी सादर करण्यांत आला आहे. **सुधारित योजनेला सुमारे एक महिन्यांत प्रशासकीय मान्यता मिळाली नाही तर ५५ कोटी रुपयाच्या पुढे खर्च करता येणार नाही त्यामुळे योजनेला सुधारित मान्यता मिळविण्याचे दृष्टीने प्रयत्न करावे लागतील,** असे मुख्य अभियंता यांनी सांगितले. जर एक महिन्यात सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली नाही तर काम बंद होईल असे सदस्यांचे मत पडले. म्हणून याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यांत यावा. प्रशासकीय मान्यतेसंबंधीची बाब जिल्ह्याचे मा. पालक मंत्री तसेच जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या सदस्यांच्या नजरेस जिल्हाधिकारी, अमरावती व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांनी आणून द्यावी. जेणे करून सुधारित मान्यता मिळविण्याचे दृष्टीने ते प्रयत्न करू शकतील असे सदस्यांनी सुचविले आणि त्याप्रमाणे कार्यवाहीचे निदेश दिले."

सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली नाही तर काम बंद पडेल किंवा काय? याबाबत शंका असतांना ती मिळण्यासाठी पाठपुरावा करणे ही एक आवश्यक बाब झालेली होती.

### सुधारित प्रस्तावाचा सभागृहात पाठपुरावा

**३४५.** "अमरावती शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता" या विषयावरील सर्वश्री व्ही. यु. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, पी. जी. दस्तुरकर, सुरेश पाटील, टी. एफ. पवार यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २५७७६ हा गुरुवार, दिनांक १ एप्रिल १९९३ रोजी सभागृहामध्ये उत्तरासाठी होता. "अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून योजिलेल्या अमरावती शहरासाठीच्या पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्न भाग १ ला मा. नगरविकास मंत्र्यांनी "**इनटेक, प्रक्रिया न केलेल्या पाण्याची गुरुत्वनलिका, धरणाजवळील जमिनीतील पाण्याची टाकी व त्यावरील पंपघर, उर्ध्वनलिका, दाबखंडटाकी व गावातील सर्व जलकुंभ याचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे.** प्रक्रिया न केलेल्या पाण्याची नेरपिंगळाईपासून तपोवनपर्यंतची गुरुत्ववाहीनी व जलशुद्धीकरण केंद्राचे ७५ टक्के काम पूर्ण झालेले आहे. वितरण व्यवस्था व इतर कामे ६० ते ७० टक्के पूर्ण झाली आहेत." असे उत्तर दिले होते. "मुळात ५५ कोटीच्या या योजनेच्या किमतीमध्ये वाढ झाल्यामुळे ७८ कोटी रुपयांच्या योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय?" या प्रश्न भाग २ ला शासनाने "नाही" असे उत्तर दिले होते. "नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग ३ ला "**सुधारित योजनेस मंजुरी देण्याची बाब अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक १ एप्रिल १९९३ : खंड ९८, क्रमांक १२, पृष्ठ १०)* असे उत्तर देण्यात आले होते. मा. मुख्यमंत्र्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या एका निवाड्यावरून त्या दिवशी सभागृहामध्ये एवढा गदारोळ झाला की कोणताही उपप्रश्न विचारणे कोणालाही कोणत्याच प्रश्नावर त्या दिवशी शक्य झाले नाही.

**३४६.** विधानपरिषद आश्वासन समितीने गुरुवार, दिनांक २४ जून १९९३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नगरविकास विभागाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे निश्चित केले. हे मुद्दे पुढील प्रमाणे :-

"**अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधण्यात येत असलेल्या अमरावती शहराच्या पाणीपुरवठा योजनेस लागणाऱ्या विलंबाबाबत** : माहिती मागवावयाचे मुद्दे :- १) मार्च १९९२ व मार्च १९९३ ला संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये या योजनेच्या प्रत्येक उपकामावर करण्यात आलेला एकूण खर्च, त्या त्या उपकामाची त्या आर्थिक वर्षातील प्रगती व त्या त्या आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेला एकूण खर्च.

२) विधानपरिषद आश्वासन समितीच्या अहवाल क्रमांक १०२ च्या परिशिष्ट ९ मध्ये समाविष्ट असलेल्या उपकामांच्या कार्यपूर्तीची जी कालमर्यादा विभागाने सादर केलेली होती त्या संदर्भात प्रत्येक उपकामांची मे १९९३ मधील सद्यःस्थिती दर्शविणारे विवरण.

३) मुळात नियोजित केल्याप्रमाणे ८ उपकामापैकी क्रमांक ५ चे उपकाम सोडून इतर उपकामे मुळ नियोजनाप्रमाणे कमीजास्त प्रमाणात वेळापत्रकाप्रमाणे बरोबर झालेली आहेत हे खरे आहे काय?

४) या योजनेचे प्रत्यक्ष काम पूर्ण झाले काय? प्रत्यक्ष पाणीपुरवठा केव्हा सुरू होणार?" *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ ८३)*

### मार्च ९३ अखेर ६५.६१ कोटी रूपये खर्च

**३४७.** सचिव, नगरविकास विभाग यांची उक्त मुद्यांना धरून दिनांक ६ जुलै १९९७ रोजी साक्ष ठेवण्यात यावी असे समितीने ठरविले. ठरल्याप्रमाणे त्यादिवशी ती साक्ष झाली. या साक्षीच्या वेळी काय झाले? याची माहिती करून घेण्यापूर्वी नगरविकास विभागाने आपल्या ५ जुलै १९९३ च्या एका पत्राने मुद्देवार लेखी माहिती समितीला सादर केली होती. सचिव, नगरविकास विभाग यांनी दाखल केलेली कागदपत्रे आश्वासन समितीने "विभागांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सन १९९३ च्या पुस्तका"मध्ये पृष्ठ क्रमांक ९९ ते १०९ वर समाविष्ट करून घेतली होती.

योजनेच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेणाऱ्याला ही माहिती फारच उपयुक्त वाटेल. आश्वासन समितीने निश्चित केलेला मुद्दा क्रमांक १ व त्यावर नगरविकास विभागाने सादर केलेले स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :-

"**मुद्दा क्रमांक १** : मार्च १९९२ व मार्च १९९३ ला संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये या योजनेच्या प्रत्येक उपकामावर करण्यात आलेला पूर्ण खर्च, त्या त्या उपकामाची त्या आर्थिक वर्षातील प्रगती व त्या त्या आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेला एकूण खर्च

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण** : मार्च १९९२ व मार्च १९९३ ला संपलेल्या वर्षामध्ये अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रत्येक उपकामावर करण्यांत आलेला एकूण खर्च त्या त्या उपकामांची मार्च ९२ अखेर व मार्च ९३ अखेरपर्यंतची भौतिक प्रगती व ९१-९२ व ९२-९३ या आर्थिक वर्षामध्ये करण्यांत आलेला एकूण खर्च दर्शविणारा तक्ता जोडपत्र १ सोबत जोडला आहे.

**जोडपत्र क्र. १**

**अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना**

**योजनेच्या प्रत्येक उपकामावर झालेल्या खर्चाची तपशीलवार माहिती**

| उपकाम | मार्च १९९२ अखेर झालेला एकूण खर्च | मार्च १९९३ अखेर झालेला एकूण खर्च | मार्च १९९२ अखेर कामाची भौतिक प्रगती | मार्च १९९३ अखेर कामाची भौतिक प्रगती |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| इनटेक वर्क्स | ९९.८५ | ९९.८५ | १०० टक्के | १०० टक्के |
| संप व पंप हाऊस | ६०.५१ | ७८.७५ | १०० टक्के | १०० टक्के |
| अशुद्ध पाणी उपसापंप | २१५.०८ | २५२.३८ | ५५ टक्के | ९८ टक्के |
| अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्ववाहिनी | १६३७.२४ | १८०५.८८ | १०० टक्के | १०० टक्के |
| अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस्ट ग्रॅव्हीटी मेन | ५६८.५४ | १३९४.३१ | १७ टक्के | ८५ टक्के |
| जलशुद्धीकरण केंद्र | २२८.२५ | ५४३.२४ | ५० टक्के | ८० टक्के |
| शुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस्ड पाईप वाहिनी | ३९२.४३ | ५६८.८७ | ७० टक्के | १०० टक्के |
| वितरण व्यवस्था व जलकुंभ | ११६७.११ | ७०२.४१ | ४४ टक्के | ८५ टक्के |
| जलकुंभ | | | १०० टक्के | १०० टक्के |
| साहित्य व इतर कामे | ९४१.१२ | १११५.९० | - | - |
| | ५३४०.१३ | ६५६१.५९ | - | - |

### जून ९३ अखेर उपांगाच्या कार्यपूर्तीची भौतिक स्थिती

**३४८.** आश्वासन समितीने निश्चित केलेला दुसरा मुद्दा व त्यावर नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :

**मुद्दा क्रमांक २** : विधानपरिषद आश्वासन समितीच्या अहवाल क्र. १०२ च्या परिशिष्ट ९ मध्ये समाविष्ट असलेल्या उपकामांच्या कार्यपूर्तीची कालमर्यादा विभागाने सादर केली होती त्या संदर्भात प्रत्येक उपकामाची मे १९९३ मधील सद्यःस्थिती दर्शविणारे विवरण.

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण** : विधानपरिषद आश्वासन समितीच्या अहवाल क्र. १०२ परिशिष्ट ९ मध्ये समाविष्ट असलेल्या उपकामांची मे १९९३ अखेरची सद्यःस्थिती दर्शविणारे विवरण **जोडपत्र २** सोबत जोडले आहे. (प्रत्येक उपकामाची जून १९९३ अखेरपर्यंतची सद्यःस्थिती, जोडपत्र ३ सोबत जोडले आहे.)

**जोडपत्र ३**

**अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना**

**योजनेचा जून १९९३ अखेर एकूण खर्च व सद्यःस्थिती दर्शविणारा तक्ता**

अ.न. उपकाम जून १९९३ अखेरपर्यंत शेरा

**योजनेची अद्यावत स्थिती (भौतिक प्रगती)**

१. इनटेक वर्क्स : १०० टक्के

२. संप व पंप हाऊस : १०० टक्के

३. अशुद्ध पाणी उपसापंप : ९९ टक्के, फक्त इमारतीचे रंगकाम बाकी

आहे.

४. अशुद्ध पाण्याची पोलादी उर्ध्ववाहीनी : १०० टक्के

५. अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस्ड ग्रॅव्हीटी मेन : ९५ टक्के, जुलै ९३ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

६. जलशुद्धीकरण केंद्र : ८० टक्के, सप्टेंबर ९३ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. आरसीसी चे काम पूर्ण झाले आहे. १२ फिल्टरबेड पैकी ४ फिल्टरबेडचे काम पूर्ण आहे.

७. शुद्ध पाण्याची (प्रिस्ट्रेस्ड पाईप) वाहिनी : १०० टक्के

८. वितरण व्यवस्था व जलकुंभ : ८७ टक्के, जलकुंभाचे काम पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेत १३ टक्के गॅप्स मुद्दाम ठेवल्या आहेत. आताच भरल्या तर पाईप्सचे हायड्रालीक बदलते. एकूण उरलेले काम छोटे आहे.

### जुलै-ऑगस्ट १९९३ मध्ये कार्यपूर्तीची शक्यता

**३४९.** आश्वासन समितीने निश्चित केलेला तिसरा व चौथा मुद्दा व त्यावर नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :-

**मुद्दा क्रमांक ३ :** मुळात नियोजित केल्याप्रमाणे ८ उपकामापैकी क्र. ५ चे उपकाम सोडून इतर उपकामे मूळ नियोजनाप्रमाणे कमीजास्त प्रमाणात वेळापत्रकाप्रमाणे बरोबर झालेली आहेत हे खरे आहे काय?

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** होय सर्वसाधारणपणे बरोबर आहे. उपकाम ५ खेरीज उपकामे ६ व ८ अपूर्ण आहेत. त्याचा खुलासा जोडपत्र ३ मध्ये दिला आहे. उपकाम ५ बद्दलची माहिती जोडपत्र ४ मध्ये दिली आहे.

**मुद्दा क्रमांक ४ :** या योजनेचे प्रत्यक्ष काम पूर्ण झाले आहे काय? प्रत्यक्ष पाणी पुरवठा केव्हा सुरू होणार?

**नगरविकास विभागाचे स्पष्टीकरण :** नाही. (परंतु जुलै ते ऑगस्ट ९३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे) प्रत्यक्ष पाणी पुरवठा डिसेंबर १९९३ ते मार्च १९९४ च्या दरम्यान सुरू होणे अपेक्षित आहे. सविस्तर माहिती पूरक टिप्पणी जोडपत्र ४ मध्ये विशद केली आहे.

**जोडपत्र -४**
**अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना**
**पूरक टिप्पणी**

अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या विविध उपकामापैकी क्र. ५ म्हणजेच "अशुद्ध पाण्याची प्रिस्ट्रेस्ड ग्रॅव्हीटी मेन" हे काम वगळता इतर उपकामे नियोजित वेळापत्रकाप्रमाणे कमी जास्त प्रमाणात बरोबर झालेली आहेत.

सदर उपकामाअंतर्गत एकूण ३१.५ कि.मी. लांबीची प्रिस्ट्रेस्ड काँक्रीटची ग्रॅव्हीटी मेन असून त्या करिता लागणाऱ्या प्रिस्ट्रेस्ड पाईपचा पुरवठा १०० टक्के पूर्ण झालेला आहे. आतापर्यंत एकूण लांबीपैकी ३०.०० कि.मी. लांबीची पाईपलाईन टाकून जोडणी पूर्ण झालेली आहे. म्हणजेच पाईप जोडणीचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरित १.५ कि.मी. पाईप लाईन टाकणे व जोडण्याचे काम प्रगतीपथावर असून जुलै, १९९२ अखेरीस पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच टाकलेल्या व जोडलेल्या पाईपलाईन्सची चाचणी घेण्याचे काम ३० टक्के पूर्ण झाले आहे. **उर्वरित चाचणीचे काम पूर्ण करण्यासाठी, उर्ध्व वर्धा धरणामध्ये पाणी साठवणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी साठवल्या नंतर विविध उपकामांची चाचणी घेणेकरिता साधारणतः सहा ते आठ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे.** चाचणी घेणेसाठी लागणारा कालावधी लक्षात घेता प्रत्यक्ष पाणी पुरवठा डिसेंबर १९९३ ते मार्च १९९४ चे दरम्यान सुरू होणे अपेक्षित आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

**३५०.** ठरल्याप्रमाणे ६ जुलै १९९३ रोजी सचिव, नगरविकास विभाग यांची आश्वासन समितीसमोर साक्ष झाली. नगरविकास विभागाच्या वतीने पुढील अधिकारी या साक्षीच्या वेळी उपस्थित होते.

**नगरविकास विभाग** : श्री. डी. टी. जोसेफ, सचिव, श्री. जी. एस. पंतवाळेकुंद्री, उपसचिव, श्री. ग. द. साठे, नगर रचनाकार, नगर रचना संचालनालय, श्री. अ. ना. अळवणी, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र पाणी पुरवठा आणि जलनिःसारण मंडळ, श्री. सं. व्य. दहासहस्त्र, कार्यकारी अभियंता म. पा. आणि जलनिःसारण मंडळ

कागदपत्रे दाखल करून घेतल्याबाबतचा या समितीच्या १९९३ च्या कार्यवृत्त पुस्तिकेतील पृष्ठ १०१ वरील उल्लेख पुढील प्रमाणे :-

"विधानपरिषद आश्वासन समिती समोर "अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधण्यात येत असलेल्या अमरावती शहराच्या पाणीपुरवठा योजनेस लागणारा विलंब" तसेच "अकोला शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना" या विषयावर देण्यात आलेल्या आश्वासनाच्या संदर्भात सचिव, नगरविकास विभाग यांनी दाखल केलेली कागदपत्रे आश्वासन समितीने "विभागांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सन १९९३ च्या पुस्तका"मध्ये पृष्ठ क्रमांक ९९ ते १०९ वर समाविष्ट केलेली आहेत." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १०१)*

****************************************************

## ३१
## सुधारित प्रशासकीय मान्यता

****************************************************

### जून ९३ अखेर ६८ कोटी रुपये खर्च

**३५१.** मार्च १९९३ अखेरीस योजनेवर खर्च ६५.६१ कोटी रुपये झाला होता हे नगरविकास विभागाने सादर केलेल्या कागदपत्रावरुन आम्हाला समजले होते. ६ जुलै ९३ च्या या नगरविकास विभागाच्या सचिवांच्या साक्षीमुळे आम्हाला एक महत्त्वाची गोष्ट कळली ती अशी की योजनेवर आतापावेतो ६८ कोटी रुपये खर्च झाला आहे. **७८ कोटीची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली नाही तर ५५ कोटीनंतर योजनेचे काम बंद पडेल किंवा काय? ही भीती त्यामुळे आपोआपच संपुष्टात आली होती.** योजनेच्या सर्व उपांगाची कामे योग्य दिशेने प्रगतीपथावर आहेत व जलाशयातून पाणी उपलब्ध झाल्यावर सहा महिने टेस्टिंग साठी आम्हाला लागतील ही दुसरी महत्त्वाची माहिती आम्हाला या साक्षीमुळे कळली या साक्षीतील महत्त्वाच्या भागाचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :

"**श्री. बी. टी. देशमुख :** अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या उपकामाच्या प्रगती बाबतची माहिती जोडपत्र २ मध्ये देण्यात आलेली आहे. याठिकाणी निरनिराळी ८ उपकामे आहेत. त्यातील क्रमांक १,२,४ व ७ ची कामे पूर्ण झालेली आहेत. तिसरे कामही जवळजवळ पूर्ण झालेले आहे. जोडपत्र ३ मध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, पाचवे उपकाम जुलै ९३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. सहाव्या उपकामाबाबत असे सांगण्यात आलेले आहे की, सप्टेंबर ९३ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. तरी हे काम आउट ऑफ शेड्युल जाण्याचे कारण काय?

**श्री. डी. टी. जोसेफ, सचिव नगरविकास विभाग :** १२ फिल्टरबेडपैकी ४ फिल्टरबेडचे काम पूर्ण झालेले आहे. अजून ८ फिल्टर बेडचे काम पूर्ण व्हावयाचे आहे. या कामाला उशीर झालेला आहे. पण सप्टेंबर १९९३ पर्यंत हे काम पूर्ण होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** वितरण व्यवस्था व जलकुंभ हे काम आठवे आहे. हे काम ८७ टक्के पूर्ण झालेले आहे. त्यासंदर्भात जे कारण दिलेले आहे त्याबाबत मला काहीही म्हणावयाचे नाही. पण टेस्टींगसाठी आपल्याला जो वेळ लागतो तो लक्षात घेता हे काम डिसेंबर १९९३ पर्यंत पूर्ण होईल अशी स्थिती आहे काय?

**श्री. डी. टी. जोसेफ, सचिव नगरविकास विभाग :** त्या ठिकाणी लीकेज असेल तर निश्चितपणे सांगता येणार नाही.

**श्री. बी. टी. देशमुख :** सभागृहामध्ये वारंवार या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. तरी टेस्टींगसाठी जुलै अखेरपर्यंत पाणी उपलब्ध झाले तर डिसेंबर १९९३ पर्यंत हे काम पूर्ण होईल काय?

**श्री. डी. टी. जोसेफ, सचिव नगरविकास विभाग :** टेस्टींगसाठी जलाशयात आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध झाले तर पाणी उपलब्ध झाल्यापासून ६ महिन्यांमध्ये होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** मग ज्या दिवशी जलाशयामध्ये आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध होईल तो दिवस आपण आम्हाला कळवा. या आर्थिक वर्षामध्ये या कामासाठी किती खर्च होणार आहे आणि आतापर्यंत या कामासाठी किती खर्च झालेला आहे?

**श्री. डी. टी. जोसेफ, सचिव नगरविकास विभाग :** आतापर्यंत या कामावर ६८ कोटी रुपयांचा खर्च झालेला असून अजून ४ कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे.

**समिती प्रमुख :** आतापर्यंत जो काही खर्च झालेला आहे त्याचे लेटेस्ट शेड्युल समितीला द्या.

**श्री. डी. टी. जोसेफ, सचिव नगरविकास विभाग :** ठीक आहे." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १०७-१०८)*

### सुधारित प्रशासकीय मान्यतेचा शासननिर्णय

**३५२.** जुलै १९९३ च्या अधिवेशनात **गुरुवार, दिनांक २२ जुलै १९९३** रोजी सर्वश्री टी. एफ. पवार, श्री. बी. टी. देशमुख, व्ही. यु. डायगव्हाणे, पी. जी. दस्तुरकर, सुरेश पाटील यांचा "**अमरावती शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २८६१६ उत्तरासाठी होता. "अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून योजिलेल्या अमरावती शहरासाठीच्या पाणी पुरवठा योजनेच्या मुळात ५५ कोटींच्या या किमतीमध्ये वाढ झाल्यामुळे ७८ कोटी रुपयांच्या योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे, हे खरे आहे काय?" या प्रश्न भाग १ ला नगरविकास मंत्री श्री. अरुण गुजराथी यांच्या वतीने नगरविकास राज्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी "होय" असे उत्तर दिले होते. "असल्यास, सुधारित मान्यता केव्हा प्रदान करण्यात आली आहे?" या प्रश्न भाग २ ला शासनातर्फे "**दिनांक २१ जुलै १९९३ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.**" असे उत्तर देण्यात आले होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २२ जुलै १९९३ : खंड ९९, क्रमांक ९, पृष्ठ ८-९)*

### योजनेचे काम ९० टक्के पूर्ण : लोकवर्गणीबाबत घोटाळा नाही

**३५३.** लेखी उत्तरानंतर या प्रश्नावर अनुपूरक चर्चा सुद्धा झाली. आमच्या दृष्टीने चर्चेमध्ये दोन मुद्यांची माहिती शासनाकडून काढून घेणे महत्त्वाचे होते. **एक मुद्दा असा की** वाढीव रकमेला सुधारित प्रशासकीय मान्यता देतांना शासनाने १० टक्के लोकवर्गणीबाबत काही घोटाळा करून ठेवला आहे किंवा काय? **दहा टक्के लोकवर्गणी शासनाने भरण्याचा निर्णय फक्त ५५ कोटी या रकमेला लागू आहे, तो ७८ कोटीला लागू करता येणार नाही, अशा "गावगप्पा" मी ऐकल्या होत्या.** त्याबाबत खात्री करून घेण्याची ही उत्तम संधी होती. योजनेच्या **बांधकामाच्या प्रगतीबाबतची नोंद** सभागृहाच्या कामकाजात करून घेणे **ही दुसरी महत्त्वाची बाब होती.** या दोनही बाबीवर झालेली प्रश्नोत्तरे नमूद असलेले सभागृहाच्या कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :

"**श्री. टी. एफ. पवार :** अध्यक्ष महाराज, प्रश्नाचे उत्तर २२ जुलै १९९३ रोजी म्हणजे आजच दिले जात आहे आणि सुधारित प्रशासकीय मान्यता ही २१ जुलै १९९३ रोजी म्हणजे काल दिलेली आहे, याबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. अध्यक्ष महाराज, मूळची जी ५५ कोटी रुपयांची योजना होती ती आता सुधारित अंदाजाप्रमाणे ७८ कोटी रुपयांची झाली आहे आणि तिला मान्यता दिली आहे. तर ही योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण काही टाईम लिमिट ठरवून दिले आहे काय ?

**श्री. अशोक चव्हाण :** अध्यक्ष महाराज, या योजनेतील एकूण ९० टक्के काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित जे १० टक्क्याचे काम आहे ते डिसेंबर महिन्यापर्यंत पूर्ण करण्यात येईल अशी अपेक्षा आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, माननीय मंत्रिमहोदयांनी ७८ कोटी रुपयाच्या योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे असे म्हटले आहे, माझा प्रश्न असा आहे की, सुधारित प्रशासकीय मान्यता देताना ५५ कोटी रुपयांच्या मूळ योजनेचा जो आर्थिक आकृतीबंध होता त्यानुसार मान्यता दिली आहे की, ७८ कोटींची मान्यता देतांना आर्थिक आकृतीबंधात काही बदल केला आहे?

**श्री. अशोक चव्हाण :** यामध्ये वाढीव कॉस्ट आहे तिला मान्यता दिली आहे. लोकवर्गणीची रक्कम ७ कोटी ८० लाख आपण माफ केली आहे. यामध्ये ग्रँट इन एड प्लस ७.८० कोटी आणि लोन ५२ कोटी असे आपण घेतले आहे?

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, माझे उत्तराने समाधान झालेले आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २२ जुलै १९९३ : खंड ९९, क्रमांक ९, पृष्ठ ९)*

### योजनेच्या बांधकामाची समाधानकारक प्रगती

**३५४.** केवळ एकदोन अनुपुरक प्रश्न विचारल्यानंतर "अध्यक्ष महाराज, माझे उत्तराने समाधान झालेले आहे." या माझ्या उद्‌गारांनी दिनांक २२ जुलै १९९३ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक २८६१६ वरील चर्चा संपली. माझे हे उद्‌गार ऐकून सभागृहातील अनेक सदस्यांना आश्चर्य वाटले व गेल्या अनेक अधिवेशनातून सतत गाजत आलेली या प्रश्नावरील चर्चा सदस्यांच्या मनामध्ये ताजी असल्यामुळे ज्याअर्थी मी उपरोक्त उद्‌गार काढलेले आहेत, त्याअर्थी या योजनेचे बांधकाम खरोखरच समाधानकारकपणे पूर्ण झाले आहे किंवा लवकरच होत आहे याची अनेकांना खात्री पटली. वस्तुस्थिती तशीच होती. मुळात ५५ कोटीच्या या योजनेला ७८ कोटी या सुधारित किमतीला प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय सभागृहामध्ये प्रश्न असल्याच्या (२२.७.९३) अगोदरच्याच दिवशी (२१.७.९३) निर्गमित झालेला होता. त्यामध्ये शासनाने वाढीव किमतीच्या १० टक्के लोकवर्गणीबाबत कोणताही नवा तंटा निर्माण केलेला नव्हता. मूळ आकृतीबंध कायम ठेवला होता. "**या योजनेतील एकूण ९० टक्के काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित जे १० टक्क्याचे काम आहे ते डिसेंबर महिन्यापर्यंत पूर्ण करण्यात येईल अशी अपेक्षा आहे.**" असे शासनातर्फे स्पष्टपणे सभागृहात सांगण्यात आले होते. ६ जुलै १९९३ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी योजनेच्या बांधकामावर ६८ कोटी रुपये आतापर्यंत खर्च झालेले आहेत असे सचिव, नगरविकास विभाग यांनी आश्वासन समितीला सांगितले होते. त्यादृष्टीने विचार करू जाता **प्रकल्पाच्या बांधकामाची ही प्रगती निश्चितपणे समाधानकारक होती असेच कोणीही म्हणेल.**

**************************************************

# ३२
# पाटबंधारे अधिकाऱ्यांच्या अंगात येणे

**************************************************

### पाणी तोडल्यामुळे चाचण्या बंद पडल्या

**३५५.** १९९३ च्या जुलै-ऑगस्ट महिन्यामध्ये धरणातून पाणी उपलब्ध करून देण्यात आले होते व योजनेच्या विविध उपांगांच्या चाचण्या (टेस्टींग) सुरू झाल्या होत्या. जुलै १९९३ चे विधानमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर पुढचे ३-४ महिने आता आपल्या मागे कोणतीही कटकट रहाणार नाही. डिसेंबर ९३ च्या नागपूर अधिवेशनांत कोणत्याही सांसदीय आयुधांचा वापर करण्याची पाळीसुद्धा आपल्यावर येणार नाही, या आनंदात आम्ही होतो. असे असतांना एकाएकी नोव्हेंबर १९९३ च्या पहिल्या आठवड्यात अत्यंत कटू अशी बातमी कानावर आली. **पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी धरणातून सोडलेले पाणी तोडले असून त्यामुळे चाचण्यांचे काम बंद पडले आहे.** मे. किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनी बंगलोर, मे.जी.ई.सी कंपनी बंगलोर, मे. एच.एम.पी. असोसिएटस दिल्ली इत्यादी कंपन्यांचे तंत्रज्ञ जे अमरावती व सिंभोरा येथे चाचण्यांसाठी ठाण मांडून बसले होते त्यांना, पाटबंधारे विभागानी पाणीच तोडल्यामुळे, परत जावे लागले. पाणीपुरवठा मंडळाच्या अधिकाऱ्यांनी जेंव्हा ही माहिती मला सांगितली तेंव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला.

### पाणी तोडण्याच्या आदेशाचा उद्‌भव कोठे होता ?

**३५६. वादाचे कारण काय?** याची चौकशी केली असता धरणाच्या भिंतीमध्ये पाणी पुरवठ्यासाठी करण्यात आलेल्या काँक्रिटच्या विहिरीच्या कामाचे किती पैसे पाणी पुरवठा मंडळाने भरावे? यावरून वाद निर्माण झाला असून ३ ते ४ कोटी रुपये पाणी पुरवठा मंडळाने ताबडतोब न भरल्यामुळे पाटबंधारे विभागाने पाणी तोडले असे समजले. **पाणी तोडण्याच्या आदेशाचे मूळ कुठे आहे?** याची चौकशी केली असता त्याचे उत्तर धड कोणालाही देता येत नव्हते. पाटबंधारे विभागाचे स्थानिक अधिकारी असा विक्षिप्त निर्णय घेतील ही गोष्ट मला खरी वाटेना व त्यामुळे मंत्रालयातूनच याबाबतीत काहीतरी कारस्थान शिजले असावे अशी मला शंका वाटायला लागली. विकाराचा उद्‌भव कोठून आहे याची नक्की माहिती नसल्यामुळे उपाययोजनेला सुरुवात कोठून करावी याचा बिनचूक निर्णय करता येत नव्हता. परिणामी सर्व आघाड्यांवर ही लढाई सुरू करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

### प्रा. बी. टी. देशमुख यांचे विभागीय आयुक्तांना पत्र

**३५७.** विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीच्या बैठकीमध्ये याचा ऊहापोह करता येईल असा अंदाज धरून मी स्वतः विभागीय आयुक्तांना दिनांक ९ नोव्हेंबर १९९३ रोजी एक पत्र (क्रमांक एलसी/१९३) लिहून या समितीची बैठक बोलाविण्याची विनंती केली. हे पत्र जसेच्या तसे पुढील प्रमाणे :-

"प्रति,
मा. विभागीय आयुक्त,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :** अमरावती शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेबाबत आपल्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक तातडीने घेण्याबाबत.

१. दिनांक १० ऑगस्ट १९९१ रोजी झालेल्या अमरावती जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीमध्ये विषयोक्त योजनेच्या कामाचा आढावा घेण्यासाठी

आपल्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे २३ ऑगस्ट १९९१ रोजी अशी बैठक आयोजित करण्यात आली होती. मी स्वतः या बैठकीला उपस्थित होतो. त्यानंतर अमरावती जिल्हा नियोजन व विकास मंडळाने २ जून १९९२ रोजी झालेल्या सभेमध्ये सुद्धा आपल्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन विषयोक्त बाबींचा आढावा घेण्यासाठी प्रस्ताव संमत केला होता. याबाबतची बैठक तातडीने आयोजित करावी यासाठी मी मुद्दाम आपणास हे पत्र लिहित आहे.

२. दिनांक १८.७.१९९१ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १०४६७ ला उत्तर देतांना "डिसेंबर १९९३ पर्यंत हे काम पूर्ण करण्यात येईल" असे स्पष्ट आश्वासन मा. नगरविकास मंत्र्यांनी विधानपरिषदेत दिले होते. अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधलेल्या ७८ कोटी रुपयाच्या या योजनेचे बांधकाम आता पूर्ण झाले असून "धरणात पाणी उपलब्ध झाल्यापासून चाचण्याकरिता ४ महिन्याचा काळ लागेल" असे अधिकृत पणे सांगण्यात आले होते. दिनांक २६ जुलै १९९३ रोजी पाणी उपलब्ध होऊन चाचण्या सुरूही झाल्या आहेत.

३. या योजनेच्या विविध उपांगाची द्रविक चांचणी घेण्याचे, "सी" व्हॅल्यू चांचणी घेण्याचे व पंपाच्या चांचण्या घेण्याचे काम ३-४ महिने सुरळीतपणे चालले असते तर डिसेंबर ९३ ते उशीरात उशिरा मार्च १९९४ या काळात अमरावती शहराला पाणी पुरवठा उपलब्ध होऊ शकला असता.

४. गेल्या २-४ दिवसात पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणतेही वाजवी कारण नसतांना योजनेसाठी पाणी सोडणारे व्हॉल्व्ह एकाएकी बंद केले असून त्यामुळे चांचण्यांचे काम पूर्णपणे बंद पडले आहे. **धरणाच्या भिंतीमध्ये पाणी पुरवठ्यासाठी करण्यात आलेल्या कामाचे किती पैसे पाणी पुरवठा मंडळाने भरावे या प्रश्नावरून उभय विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या किरकोळ वादातून** चांचण्यांच्या कामास व परिणामी पाणी पुरवठा सुरू होण्यास बराच विलंब लागण्याची शक्यता त्यातून निर्माण झाली आहे. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची ही कृती निषेधार्ह आहे.

५. उक्त परिस्थितीत आपल्या अध्यक्षतेखालील बैठक तातडीने पुढील २-३ दिवसात (विषयाचे महत्त्व लक्षात घेता सुटीचा दिवस आला तरी) बोलवावी अशी मी आपणास विनंती करीत आहे.

आपला विनीत
**(बी. टी. देशमुख)**
विधानपरिषद सदस्य"

## जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या विचारार्थ ठराव

**३५८.** त्याच दिवशी (९.११.९३) जिल्हा नियोजन व विकास परिषदेचे सचिव असलेले जिल्हाधिकारी यांनाही मी एक पत्र लिहून जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीमध्ये विचारार्थ एक ठराव पाठविला. त्यावेळी जि.नि.वि.प. च्या दर महिना दोन महिन्यांनी नियमित बैठकी होत असत. बैठकीची तारीख ठरलेली नसली तरी एखाद्या ठरावाची आपण पूर्वसूचना दिली की त्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना ठरावोक्त विषयाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे टिप्पणी किंवा माहिती सादर करावी लागत असे. या माध्यमातून वादविषयाचे मूळ कुठे आहे? याचा पत्ता लागला तर पहावा या हेतूने मी ही ठरावाची नोटीस दिली होती. माझा हा ठराव पुढील प्रमाणे होता. :-

"अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचे ७८ कोटी रुपये किमतीचे बांधकाम पूर्ण झाले असून २-४ महिन्यात चांचण्या पूर्ण होऊन शहराला पाणी पुरवठा होण्याची शक्यता निर्माण झाली असतांना धरणातून पाणी सोडणारे व्हॉल्व्ह पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकाएकी बेजबाबदारपणे बंद करण्याचा घेतलेला निर्णय, पाणीपुरवठा योजनेच्या विविध उपांगाची द्रविक चाचणी घेण्याचे, "सी" व्हॅल्यू चांचणी घेण्याचे व पंपांच्या चांचण्या घेण्याचे काम एकाएकी बंद पडणे, पाणीच नसल्यामुळे सर्व संबधीत कंत्राटदार चाचणीचे काम सोडून निघून जाणे, परिणामी या कामास प्रदीर्घ विलंब होण्याची निर्माण झालेली शक्यता, **या बेजबाबदार कृत्यामुळे होणारा विलंब टाळण्यासाठी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.**"

## तीन स्तरावरुन उपाययोजनेचा प्रयत्न

**३५९.** विकाराचा उद्‌भव हा जर राज्यपातळीवर असेल तर उपरोक्त स्थानिक उपाययोजनांचा काहीही उपयोग होणार नाही ही गोष्ट मला स्पष्ट दिसत होती. विधानपरिषद आश्वासन समितीच्या समिती प्रमुखांशी फोनवरून चर्चा करून समितीची तावडतोब बैठक घेऊन या प्रश्नाचे मुद्दे निश्चित व्हावे अशी मी विनंती केली. विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन १७.११.९३ या तारखेला आश्वासन समितीच्या बैठकीत आपण याबाबतचे निर्णय घेऊ असे समिती प्रमुखांनी मला सांगितले. "१७ तारीख ही मला गैरसोईची आहे पण मी गैरहजर असलो तरीही त्या दिवशी हे कामकाज आपण पूर्ण करा" असेही मला समितीप्रमुखांनी फोनवर सांगितले.

जिल्हा नियोजन व विकास परिषदेची बैठक होईल तेंव्हा होईल पण दिलेल्या ठरावाच्या अनुषंगाने दोनही विभागाकडून लेखी माहिती मागवावी अशी विनंती मी जिल्हाधिकारी यांना केली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन ती त्यांनी मान्य केली. दोनही विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या ठरावाबाबत ताबडतोब माहिती पाठवावी असे आदेश जिल्हाधिकारी यांनी काढले. विभागीय आयुक्तांशी मी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण ते परगावी गेल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही. तथापि माझा कोणताही संपर्क न होता **केवळ माझ्या पत्रावरून विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन विभागीय आयुक्तांनी ११ नोव्हेंबर १९९३ रोजी बैठकीची नोटीस काढली.** या नोटीसमध्ये असे नमूद करण्यात आले होते की :-

*"**विषय :** अमरावती शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रगतीचा आढावा.* : सदर योजनेचा आढावा घेण्याच्या दृष्टीने मा. आयुक्तांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७.११.१९९३ रोजी ठीक ११.०० वाजता त्यांचे कक्षात बैठक आयोजित करण्यात येत आहे. सदर बैठकीला आपण उपस्थित राहण्याचे करावे ही विनंती.

- **आयुक्त,** अमरावती विभाग, अमरावती"

## एकाच तारखेला दोन बैठका

**३६०.** एका बाजूला विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक १७ नोव्हेंबर रोजी होणार. त्या बैठकीत याबाबतचे माहिती मागवावयाचे मुद्दे निश्चित होणार व दुसऱ्या बाजूला त्याच दिवशी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील बैठक बोलाविण्यात आली होती. बैठकीची तारीख बदलविण्याची विनंती करावी तर काही तातडीच्या कामानिमित्त विभागीय आयुक्त पुन्हा बाहेरगांवी गेले असून ते बैठकीच्या दिवशीच परत येतील असे कळले. त्यामुळे ती तारीख बदलण्याची शक्यता राहिली नाही. १६ नोव्हेंबर १९९३ रोजी आपण मुंबई येथे उद्या होणाऱ्या आश्वासन समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे की विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील बैठकीस उपस्थिती लावावी असा प्रश्न माझेसमोर निर्माण झाला. विकाराचा उद्‌भव हा राज्यपातळीवर असेल तर विभागीय आयुक्त कार्यालयातील बैठकीतून काहीही निष्पन्न होणार नाही, त्यामुळे आश्वासन समितीच्या बैठकीत मुद्दे निश्चित करणे जास्त गुणकारक होईल असे मला वाटले. **शिवाय स्थानिक पातळीवरचा प्रश्न असेल तर इतर लोकप्रतिनिधी व स्वतः विभागीय आयुक्त याबाबत काळजी घेतील असे मला वाटल्यावरून मी १७ नोव्हेंबर १९९४ रोजी होणाऱ्या आश्वासन समितीच्या बैठकीला उपस्थित रहाण्याचा निर्णय घेतला.**

## आश्वासन समितीची बैठक

**३६१.** विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक बुधवार, दिनांक १७ नोव्हेंबर १९९३ रोजी भरली. त्यादिवशी समितीप्रमुख काही कारणाने उपस्थित राहू शकले नाहीत व ते काम मलाच करावे लागले, याबाबचा कार्यवृत्तातील उल्लेख पुढील प्रमाणे :

"मा. समिती प्रमुख आजच्या बैठकीस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत तरी आजच्या बैठकीचे कामकाज प्रा. बी. टी. देशमुख, वि. प. स. यांनी कार्यकारी समिती प्रमुख म्हणून पहावे असा प्रस्ताव श्री. विश्वनाथ डायगव्हाणे, वि. प. स. यांनी मांडला व त्यास मुस्ताक अंतुले, वि. प. स. यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार प्रा. बी. टी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या कामकाजास सुरुवात झाली" *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ १९०)*

## आश्वासन समितीने मुद्दे निश्चित केले

**३६२.** याच दिवशीच्या बैठकीत अमरावती पाणी पुरवठ्याविषयीचे मुद्दे समितीने निश्चित केले. १७ नोव्हेंबर १९९३ रोजीच्या समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तातील याबाबतची नोंद पुढील प्रमाणे आहे. :

"यानंतर समिती सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, वि. प. स. यांनी बैठकीत खाली नमूद केलेल्या विषयाच्या संदर्भात विभागाकडून माहिती मागवावी असे सुचविले. त्यावर विचार करून समितीने विभागाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे निश्चित केले ......

**विषय :** अमरावती शहराची वाढीव पाणीपुरवठा योजना

**संदर्भ :** १) नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक १९ ऑक्टोबर

१९९३ रोजी पत्र क्रमांक पापुयो-१०९३/१०२१/प्र.क्र.१२७/नवि-३० अन्वये पाठविलेली माहिती.

२) विधानपरिषद आश्वासन समितीचा एक्क्याण्णववा (९१) अहवाल भाग-२ त्यामध्ये समाविष्ट असलेली आश्वासने व समितीचे अभिप्राय.

**माहिती मागवावयाचे मुद्दे**

१) अप्पर वर्धा धरणातून अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी पाणी पुरवठा सुरू ठेवणारे इनटेक गेट पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी गेल्या २ नोव्हेंबर १९९३ पासून बंद करून ठेवले आहे ही गोष्ट खरी आहे काय? त्याची कारणे काय?

२) पाणीच उपलब्ध नसल्यामुळे अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या विविध उपांगाची द्रविक चाचणी घेण्याचे, "सी" व्हॅल्यू चांचणी घेण्याचे व पंपाच्या चाचण्यांचे काम पूर्णपणे बंद पडले असून या चांचण्याचे वेळापत्रक विस्कळित झाले ही गोष्ट खरी आहे काय?

३) पाटबंधारे व नगरविकास विभागाने या संदर्भात यापूर्वी दिलेल्या आश्वासनांच्या संदर्भात उभय विभागांनी करावयाची कारवाई याबाबतची तपशीलवार टिप्पणी.

४) पाणी बंद करण्याच्या संदर्भात उभय विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये कालानुक्रमे झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती समितीच्या माहितीसाठी पाठविण्यात याव्यात.

५) दिनांक १७ नोव्हेंबर १९९३ रोजी विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी त्यांच्या कार्यालयात या संदर्भात बैठक घेतली व या बैठकीला उभय विभागाचे अधिकारी उपस्थित होते हे खरे आहे काय? असल्यास, या बैठकीचे कार्यवृत्त व उभय विभागाच्या अधिकाऱ्यांनी या बैठकीमध्ये ठेवलेल्या टिप्पणीची प्रत." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २०५)*

त्याच दिवशीच्या बैठकीत समितीने सचिव, नगरविकास विभाग व पाटबंधारे विभाग यांची संयुक्त साक्ष दिनांक ३० नोव्हेंबर १९९३ रोजी घ्यावी असा निर्णयही घेतल्याची कार्यवृत्तामध्ये नोंद आहे. *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २०६)* ३०.११.१९९३ रोजी समितीच्या बैठकीला मी स्वतः उपस्थित होतो. काही कारणाने साक्ष त्यादिवशी होऊ न शकल्यामुळे ती ७.१२.१९९३ रोजी घेण्यात आली.

## विभागीय आयुक्त कार्यालयातील बैठकीत काय घडले ?

**३६३.** इकडे विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यालयामध्ये ठरल्याप्रमाणे १७.११.१९९३ रोजी बैठक झाली. स्वतः विभागीय आयुक्त अध्यक्षस्थानी होते. मुंबई येथील बैठकीमुळे मी या सभेला अनुपस्थित होतो. पाणी एकदम कां तोडण्यात आले? व ते कोणी तोडले? चांचण्या एकाएकी बंद पडल्या त्या सुरू करता येणार नाहीत काय? शासनाच्या एका विभागाने दुसऱ्या विभागाला खरोखरीच किती देणे द्यायचे आहे? याचा निर्णय नंतर ४ दिवसांनी आपल्याला करता येईल. पण तोडलेले पाणी ताबडतोब सुरू न केल्यास होणारे नुकसान मोठे आहे. या दिशेने या बैठकीत चर्चा न होता दोनही बाजूचे म्हणणे या बैठकीत ऐकून घेण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी **"पाण्याचा वाटा म्हणून पाणीपुरवठा मंडळाने आम्हाला १७ कोटी रुपये दिले पाहिजेत" अशी या बैठकीत मागणी केल्याचे या बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद आहे. "निदान चार कोटी अग्रिम म्हणून द्यावे असे ठरले होते ते सुद्धा मंडळाने अजून भरलेले नाही. फक्त ८५ लक्ष रुपये भरले, तेव्हा निदान ३.१५ कोटी रुपये मंडळाने ताबडतोब भरावे" अशी भूमिका पाटबंधारे विभागाने घेतली.** पाणी पुरवठा मंडळाच्या अधिकाऱ्यांनी या बैठकीत असे सांगितले की, "मंडळाची आर्थिक स्थिती खराब आहे. कर्मचाऱ्यांचे पगार देण्याकरिता आम्हाला ओव्हर ड्राफ्ट घ्यावा लागला. **योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकात पाटबंधारे विभागाला द्यावयाच्या रकमेचा समावेश करण्यात आला आहे. निधी उपलब्ध झाल्याबरोबर आम्ही हे पैसे भरू परंतु आजच एवढी रक्कम भरणे शक्य नाही.**" या सभेच्या कार्यवृत्ताचे काळजी पूर्वक अवलोकन केले असता विभागीय आयुक्तांनी "एकदमच न्यायाची भूमिका" घेतल्याचे दिसून येते. दोनही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यावर "मा. आयुक्तांनी यावर असे प्रस्तावित केले की मंडळाने कमीतकमी १ कोटी रुपये त्वरित देण्याची व्यवस्था करावी" असे या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या शेवटच्या परिच्छेदात नमूद आहे. ताबडतोबीने १ कोटी रुपये भरणे मंडळाला शक्य नव्हते व त्यामुळे तात्काळ पाणी पुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने या बैठकीचा काहीही उपयोग झाला नाही.

## रेल्वे प्रवासात पालकमंत्र्यांशी चर्चा

**३६४.** दिनांक ३० नोव्हेंबर १९९३ रोजी विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक आटोपून मी सायंकाळच्या गाडीने अमरावतीला परत येण्यासाठी निघालो. त्याच गाडीवर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. हर्षवर्धन देशमुख हेही प्रवासामध्ये होते. दादर स्टेशन गेल्यावर 'गाडीतल्या गप्पां' मध्ये पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी तोडले व चांचण्या बंद पाडल्याचा विषय निघाला. घडलेल्या प्रकारांची व विविध पातळीवर मी करीत असलेल्या खटाटोपाची तपशीलवार माहिती मी पालकमंत्र्यांना दिली. माझे सर्व म्हणणे ऐकून घेतल्यावर "भाऊ! तुम्ही यातले मला काहीच कसे सांगितले नाही?" असे उद्‌गार पालक मंत्र्यांनी काढले. त्यावर "विभागीय आयुक्तांना पाठविलेल्या पत्राची प्रतिलिपी मी पालकमंत्री या नात्याने आपणाला माहितीसाठी व आवश्यक कारवाईसाठी पाठविली आहे." असे मी त्यांना म्हणालो. त्यावर पालकमंत्र्यांनी "अहो! पत्रे रोज कितीतरी येत असतात. प्रत्यक्ष भेटून सांगितले असते तर काही बिघडले असते काय? कमिशनर, कलेक्टर यांना लिहिलेली पत्रे आणि आश्वासन समितीच्या सोबतच पालकमंत्री म्हणून मी सुद्धा त्यात काही उपाययोजना करू शकलो असतो." मी दिलेल्या माहितीमुळे पालकमंत्र्यांना आश्चर्य वाटले व एवढ्या मोठ्या कामाच्या चांचण्या बंद पडल्याची बातमी त्यांना धक्का देणारी वाटली, असे मला त्यावेळी वाटले. शिवाय रेल्वेगाडीतले बोलणे असले तरी ते मनापासून बोलत आहेत अशी माझी भावना झाली म्हणून मी त्यांना म्हणालो "भैय्यासाहेब! प्रत्यक्ष भेटून तुम्हाला न कळविण्यात माझी चूक झाली असे आपण समजा. पण पाटबंधारे विभागाची पाणी तोडण्याची कृती ही अत्यंत अनुचित आहे, त्यामुळे चांचण्यांचे वेळापत्रक पूर्णपणे विस्कळित झालेले आहे. या उन्हाळ्यात सुद्धा शहराला पाणी मिळणार नाही ही दाहक शक्यता समोर आहे. शिवाय या दुर्घटनेचे कर्ते मुंबईत आहेत का अमरावतीत आहेत हे सुद्धा कळत नाही. ते कोठेही असले तरी त्यांचे कर्तृत्व हाणून पाडले पाहिजे." माझे सर्व म्हणणे ऐकून घेतल्यावर पालकमंत्री ताबडतोब म्हणाले "काय करायला पाहिजे ते सांगा ना?" त्यावर मी असे सुचविले की, "उद्या आपण अमरावतीला पोचतो. उद्याच दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये पाटबंधारे विभागाच्या व पाणी पुरवठा मंडळाच्या अधिकाऱ्यांची व सर्व संबंधितांची एक बैठक आपल्या अध्यक्षतेखाली घेतली तर सर्व गोष्टींची आमनेसामने शहानिशा होऊन जाईल." "उद्या (१.१२.९३) मी शेगावला उतरत आहे. तेथे माझा पुर्वनिर्धारित कार्यक्रम आहे. परवा २.१२.९३ रोजी दुपारी ही बैठक आपण ठेवू" असे श्री. हर्षवर्धन देशमुख म्हणाले व ताबडतोबच रेल्वे प्रवासात सोबत असलेल्या आपल्या स्वीय सहाय्यकांना बोलावून "उद्या सकाळी आपण शेगावला उतरल्याबरोबर जिल्हाधिकारी अमरावती यांना फोनवरून २ तारखेला दुपारी बैठकीची नोटीस काढायला सांगा" अशा सूचना दिल्या.

## जिल्हाधिकारी यांनी बैठक बोलाविली

**३६५.** दुसऱ्या दिवशी (१.१२.९३) सकाळी पालकमंत्री शेगावला उतरले व मी अकोल्याला उतरलो. अकोला येथील काही कामे आटोपून १२-१ वाजता अमरावतीला पोचलो, तर घरी जिल्हाधिकारी कार्यालयातून दुसऱ्या दिवशीच्या मिटिंगची निमंत्रण नोटीस येऊन पडलेली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी या निमंत्रणात असे नमूद केले होते की :-

*"**विषय :** अप्पर वर्धा पाणीपुरवठा बाबत चर्चा दिनांक २.१२.१९९३, दुपारी ३.०० वाजता.:* वरील विषयाबाबत मा. ना. श्री. हर्षवर्धनजी देशमुख, मंत्री, कृषी व जलसंवर्धन महाराष्ट्र राज्य तसेच पालकमंत्री अमरावती हे दिनांक २.१२.१९९३ रोजी दुपारी ३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधितांशी चर्चा करणार आहेत. तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे ही विनंती"

## तोडलेले पाणी सुरू केले

**३६६.** ठरल्याप्रमाणे पालकमंत्री श्री. हर्षवर्धन देशमुख यांच्या सूचनेनुसार बोलाविलेली ही बैठक २ डिसेंबर १९९३ रोजी दुपारी ३ वाजता पार पडली. दोनही विभागांनी आपापले म्हणणे स्पष्ट करणारी टिप्पणी वेगवेगळी या बैठकीसमोर सादर केलेली होती. विभागीय आयुक्तांनी बोलाविलेली बैठक, जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या बैठकीसाठी गेलेला ठराव व त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी लेखी माहिती मागविणे, विधानपरिषद आश्वासन समितीने मुद्दे निश्चित करून तशा नोटीसा काढणे, आता खुद्द पालकमंत्र्यांनी बोलाविलेली बैठक, याचा एकत्रित परिणाम असा झाला होता की पाटबंधारे विभागामध्ये खूपच घबराट निर्माण झालेली होती व वरून कोणत्याही आदेशाशिवाय ही कृती अमरावतीस्थित स्थानिक अधिकाऱ्यांनीच केलेली असल्यामुळे संभाव्य असंतोषाच्या पोटी आपल्यावरच काही कारवाई तर होणार नाही ना? अशी भितीही त्या अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झाली होती. या भितीच्या पोटी तोडलेले पाणी पुन्हा आम्ही २-३ दिवसापूर्वीच सुरू केले आहे अशी भूमिका त्यांनी घेतली, निदान त्यांनी कागदोपत्री तसे दाखविले होते. पाटबंधारे विभागाच्या लेखी टिप्पणीमध्ये तसे नमूद होते.

"**पाणी सुरू केले आहे.**" असे लेखी कळवून सारे बडे अधिकारी पालकमंत्र्यांनी बोलाविलेल्या या बैठकीला वेगवेगळी कारणे दाखवून गैरहजर राहीले व सर्व "किल्ला" लढविण्याची जबाबदारी सभेला उपस्थित असलेल्या एका उपअभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली.

### २ डिसेंबर १९९३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

**३६७.** जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झालेल्या या सभेच्या कार्यवृत्तामध्ये अगदी सुरुवातीलाच असे नमूद आहे की :

"*दिनांक २.१२.१९९३ रोजी मा. पालकमंत्री श्री.हर्षवर्धन देशमुख यांनी उर्ध्व वर्धा धरणातून पाणीपुरवठा या विषयावर आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त :-* मा.पालकमंत्री श्री.हर्षवर्धन देशमुख यांनी उर्ध्व वर्धा धरणातून पाणीपुरवठा या विषयावर चर्चा करण्याकरिता दिनांक २.१२.१९९३ रोजी दुपारी ३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे अधिकारी व पाणीपुरवठा मंडळाचे अधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित केली होती. बैठकीत मा. श्री. बी. टी. देशमुख आमदार, श्री. शिवाजीराव पाटील, जिल्हाधिकारी, अमरावती, श्री. श्रीकांत सिंह, आयुक्त, महानगर पालिका, अमरावती व दोन्ही खात्याचे अधिकारी उपस्थित होते."

### पाणी कोणी तोडले होते याचा तपास लागला

**३६८.** याच बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये पुढे झालेले कामकाज प्रश्नोत्तराच्या रुपामध्ये नोंदविण्यात आलेले आढळून येते. ते पुढील शब्दात :

"**श्री. बी. टी. देशमुख :** उर्ध्व वर्धा धरणातून पाणी सोडणे बंद करण्याचे आदेश कुणी दिलेत व किती तारखेस दिलेत?

**श्री. जी. एस. पनपालीया, उपविभागीय अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ :** पाणी बंद करण्याचे आदेश अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ यांनी दिनांक २.११.९३ रोजी तोंडी दिलेत.

**श्री. बी. टी. देशमुख :** पाणी पुन्हा सोडण्याचे प्रत्यक्ष आदेश कुणी दिलेत व किती तारखेला दिलेत.

**श्री. जी. एस. पनपालीया, उपविभागीय अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ :** पाणी सुरू करण्याचे आदेश अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ यांनी २६.११.९३ रोजी दिलेत.

**श्री. बी. टी. देशमुख :** यानंतर पाणी पुरवठा विभागास पुरवठा अखंडपणे सुरू ठेवावा व त्याची संमती घेतल्या शिवाय इनटेक मधून पाणी सोडणे पाटबंधारे विभागाने बंद करू नये याबाबत काही अडचण आहे काय?

**श्री. जी. एस. पनपालीया, उपविभागीय अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ :** काही अडचण नाही."

"पाणी एकाएकी व पूर्व सूचना न देता बंद करण्याच्या आदेशाचा मूळ उद्‌भव कोठे आहे, एकाएकी बंद करण्याची जबाबदारी कोणाची व त्यामुळे झालेले नुकसान, कामाला लागलेला विलंब, वाया गेलेला वेळ, याची चौकशी आयुक्त महानगर पालिका अमरावती यांनी करावी. वरील सर्व मुद्याबाबतचा अहवाल आयुक्त, महानगर पालिका, अमरावती यांनी जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या नियोजित बैठकीत सादर करावा अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या" असेही या सभेच्या कार्यवृत्तामध्ये नमूद आहे.

### पाणी बंद करण्याची कोणतीही स्थिती पुढे आल्यास पालकमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटावे

**३६९.** आज आता निश्चितपणे असे म्हणता येते की अप्पर वर्धा प्रकल्पाच्या अधीक्षक अभियंत्यांनी त्यांच्या स्वतःच्या अधिकारांत २ नोव्हेंबर १९९३ रोजी तोंडी आदेशाने पाणी तोडले होते. ही त्यांची कृती केवळ निषेधार्हच नव्हती तर लोकहिताच्या संपूर्णपणे विरोधात होती. आठ पंधरा दिवस आम्ही केलेल्या साऱ्या दुनियेच्या खटाटोपानंतर आपल्या कृतीच्या दुष्परिणामाची जाणीव झाल्यामुळे त्यांनी २६ नोव्हेंबर ९३ रोजी पाणीपुरवठा पूर्ववत सुरू केला होता व ही गोष्ट पालकमंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीमुळे उघडकीस आली होती. विकासाच्या एखाद्या कामातील अडथळा बाजूला सारण्यासाठी आमदाराला तिप्पट खटाटोप करावा लागतो. मंत्र्यांनी स्वतः लक्ष घालतो म्हटले तर त्यांनी दिलेल्या एका झटक्यात सुद्धा असा अडथळा दूर होऊ शकतो, याचा प्रत्यय आला. बैठकीच्या शेवटी श्री. हर्षवर्धन देशमुख यांचे मी आभार मानले, तर त्यांनी पुन्हा एकदा "नुसत्या पत्रावर सोडत जाऊ नका. भेटत जा! सांगत जा! माझे कडून अशा कामात होईल ते करून घेत चला". असे मला सुनावले. ज्या तत्परतेने त्यांनी कारवाई केली होती ती लक्षात घेता त्यांच्या या उत्तराला मी कोणतेही प्रत्युत्तर देऊ शकत नव्हतो. पाणी बंद करण्याची कोणतीही स्थिती पुढे आल्यास "पाटबंधारे खात्याकडून लेखी स्वरूपात पालकमंत्र्यांना कळविण्यात यावे पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनी पालकमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटावे." असे आदेशही पालकमंत्र्यांनी दिल्याचे या बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये नमूद आहे.

### अडथळा दूर झाल्यामुळे संयुक्त साक्ष पुढे ढकलली/झाली नाही

**३७०.** नोव्हेंबर १९९३ मध्ये पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी विनाकारण वाढीव पुरवठा योजनेच्या विविध उपांगांच्या चाचण्यांच्या कामामध्ये आणलेला अडथळा दूर झाला होता. पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी डिसेंबर १९९३ व १९९४ च्या पहिल्या दोन महिन्यामध्ये वेगाने चाचण्यांच्या कामाला सुरुवात केली होती. पुर्वनियोजनाप्रमाणे ७ डिसेंबर १९९३ रोजी सचिव, नगरविकास व सचिव, पाटबंधारे विभाग यांची संयुक्त साक्ष विधानपरिषद आश्वासन समितीसमोर होती. दोनही विभागांनी बरीच कागदपत्रे समितीसमोर दाखल केलेली होती. त्याबाबतचा समितीच्या कार्यवृत्तातील उल्लेख पुढील प्रमाणे:-

"विधानपरिषद आश्वासन समितीसमोर "अमरावती शहर वाढीव पाणी पुरवठा योजना" या विषयावरील सन १९९० च्या चौथ्या अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासन क्रमांक ४२६, ५१५ व ५१६ च्या संदर्भात सचिव, नगरविकास व सचिव पाटबंधारे विभाग यांनी दाखल केलेली कागदपत्रे आश्वासन समितीने "विभागांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सन १९९३ च्या पुस्तकामध्ये" अनुक्रमे पृष्ठ क्रमांक ३२५ ते ३६९ व पृष्ठ क्रमांक ३७५ ते ३९५ वर समाविष्ट केलेली आहेत." *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २३७)*

पाटबंधारे विभागाने प्रत्यक्ष तोडलेला पाणीपुरवठा सुरू केल्याचे लेखी कळविले होते. **परिणामी ही संयुक्त साक्ष घेण्यात विधान परिषद आश्वासन समितीला फारसा रस नव्हता असे कार्यवृत्तावरून दिसून येते.** या बैठकीचे वृत्त आज काळजीपूर्वक नजरेखालून घातल्यास **"ही साक्ष आपण हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर घेऊ" असा एका वाक्याचा उल्लेख कार्यवृत्तात आढळून येतो.** *(आश्वासन समिती (वि.प.) १९९३ ची कार्यवृत्त पुस्तिका, पृष्ठ २३६)* त्यामुळे साक्ष पुढे ढकलल्या गेली व काम सुरळीत सुरू राहिल्यामुळे पुढे ती झालीच नाही असे दिसून येते.

**************************************************

## ३३
## प्रकल्प राष्ट्राला अर्पण करा

**************************************************

### पाटबंधारे विभागाने पुन्हा धमकावणे सुरू केले

**३७१.** कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता पालकमंत्र्यांनी २.१२.९३ रोजी बोलाविलेल्या बैठकीमुळे पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंत्यानी केलेला कावेबाजपणा पूर्णपणे निष्प्रभ झाला होता. आपला या प्रकरणांत संपूर्णपणे पराभव झाला ही गोष्ट त्यांना बरीच लागलेली होती असे दिसून येते. महिन्या दोन महिन्याच्या विश्रांतीनंतर बहुधा आपल्या मुंबईस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुन्हा आपला जुना पवित्रा नवा करण्याच्या कार्याला सुरुवात केली असे दिसून येते. कार्यकारी अभियंता उर्ध्व वर्धा धरण विभाग अमरावती यांनी ५ फेब्रुवारी १९९४ रोजी कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी विभाग क्रमांक २ अमरावती यांना एक पत्र (क्रमांक ८३५ उ वर्धा व/ताशा.३/अ.पा.पु./९) लिहून अनेक कागदपत्रांची मागणी केली व त्याचबरोबर घेणे असलेली ३१५ लक्ष रुपयाची रक्कम ताबडतोब भरावी अशीही मागणी केली. या पत्राच्या शेवटच्या दोन परिच्छेदामध्ये सरळ सरळ पुढील प्रमाणे धमकी देण्यात आली होती :

"पाणी पुरवठा योजनेसाठी करारनामा करण्याबाबत सूचित करण्यांत आले आहे. तथापि आपणाकडून कसलाही प्रतिसाद नसल्यामुळे करारनामा करणे अशक्य होत आहे. वर नमूद केल्याप्रमाणे ह्या विभागास देय रकमेचे भूगतान तात्काळ करून करारनामा करण्याची कार्यवाही करण्यात यावी, **अन्यथा एप्रिल १९९४ पासून आपणांस पाणीपुरवठा करणे शक्य होणार नाही, असे कळविण्याचे मला वरिष्ठांचे आदेश आहेत.**"

**३७२.** ५ फेब्रुवारीचे पत्र पोचत नाही व त्याला पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून उत्तर येत नाही तर कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा विभाग अमरावती यांनी चारच दिवसांनी दिनांक ९ फेब्रुवारी १९९४ रोजी पाठोपाठच

कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी विभाग क्रमांक २ पाणीपुरवठा मंडळ अमरावती यांना दुसरे पत्र (क्रमांक ९४६ उ वर्धा व/ताशा.३/अ.पा.पु./९) पाठविले व काही जादा माहिती पाठविण्याची मागणी केली. या पत्राच्या शेवटी सुद्धा पूर्वीच्या धमकीचा पुनरुच्चार करण्यात आला होता. तो पुढील शब्दात :-

"पाटबंधारे विभागास देय असलेल्या उर्वरित रकमेचा त्वरित भरणा करून करारनाम्याची कार्यवाही त्वरित करण्यात यावी अशी आपणांस पुन्हा विनंती करण्यांत येत आहे. **अन्यथा यापूर्वी कळविल्याप्रमाणे एप्रिल १९९४ पासून आपणास पाणी पुरवठा करणे शक्य होणार नाही असे कळविण्याचे वरिष्ठांचे आदेश आहेत.**"

"एप्रिल १९९४ पासून आपणास पाणीपुरवठा करणे शक्य होणार नाही" हे एक व "असे कळविण्याचे मला वरिष्ठांचे आदेश आहेत" हे दुसरे वाक्य, या दोनही पत्रात सारखेपणाने नमूद करण्यात आले होते. एकामागून एक अग्निबाण आपल्यावर येऊन पडावे या थाटात चार दिवसाच्या फरकाने ही जी दोन पत्रे पाटबंधारे विभागाने पाणीपुरवठा विभागावर सोडली त्यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची खूपच तारांबळ उडाली.

### डॉ. संजय दहासहस्त्र एक नामवंत पाणीपुरवठा तज्ज्ञ

**३७३.** फेब्रुवारी १९९४ च्या दुसऱ्या आठवड्यात एके दिवशी सकाळी फोनने वेळ ठरवून पाणीपुरवठा विभागाचे संबंधित कार्यकारी अभियंता श्री. संजय दहासहस्त्र हे मला भेटण्यासाठी आले. श्री. दहासहस्त्र हे त्यांच्या विभागामध्ये अत्यंत गुणी व कार्यतत्पर अधिकारी म्हणून ख्यात होते. नागपूरच्या विश्वेश्वरैया रिजनल इंजिनिअरिंग कॉलेज मधून प्रथम श्रेणीमध्ये बी.ई. परीक्षा उत्तीर्ण केलेल्या दहासहस्त्र यांनी **परिसर अभियांत्रिकी या विषयात १९८० मध्ये प्रथम श्रेणीत प्रथम स्थान मिळवून एम.टेकची परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्याशिवाय नागपूर विद्यापीठाने त्यांना त्यांच्या शोध प्रबंधाबद्दल १९८७ मध्ये पी.एचडी ही पदवी दिली होती, त्यांच्या शोधकार्यामुळे ब्रिटनमधील ब्रेडफोर्ड विद्यापीठाची १९९२ मध्ये फेलोशिपही त्यांना मिळाली होती.** अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या ऐन बांधकामाच्या वेळी दहासहस्त्र यांच्या सारखा निष्णात अधिकारी या प्रकल्पाला लाभला हे त्या प्रकल्पाचे भाग्य होय असे मला नेहमीच वाटत आले. नगाला नग, माणसाला माणूस, अधिकाऱ्याला अधिकारी, शासकीय यंत्रणेमध्ये कोणीना ना कोणी त्या जागेवर मिळतच असतो, तथापि या प्रकल्पाच्या बांधकामाधिन अवस्थेमध्ये झालेल्या या निर्दोष बांधणीमध्ये या अधिकाऱ्याचा फार मोठा वाटा आहे ही गोष्ट कोणालाही नाकारता येणार नाही.

### पाटबंधारे विभागाच्या पत्रांनी सुरू झालेला छळ

**३७४.** पाटबंधारे विभागाने ५ फेब्रुवारी १९९४ व ९ फेब्रुवारी १९९४ या दोन तारखांना पाठविलेली दोनही पत्रे श्री. दहासहस्त्र यांच्या हाती होती व ते अतिशय खिन्न मनाने बोलत होते. "सर! या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी आमचा का छळ मांडला काही कळत नाही. प्रकल्पाच्या बांधकामातील अत्यंत क्रिटीकल असे टेस्टिंगचे आमचे काम सुरू आहे. सध्या **मोठ्या व्यासाचे प्रीस्ट्रेस्ड काँक्रीट पाईप शहरी पाणी पुरवठा योजनांसाठी वापरण्यावर भर दिला जातो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ह्या पाईपांची किंमत लोखंडी पाईपांपेक्षा जवळपास अर्धीच असते. परंतु ह्या पाईपबद्दल अतिशय काळजी घ्यावी लागते. ह्याचे डिझाईन्स, टाकण्याची पद्धत, जोडण्याची पद्धत, टेस्टींगची पद्धत इत्यादी बाबींपैकी एकाजरी मुद्यावर व्यवस्थित लक्ष दिले नाही तर ही पाईपलाईन अत्यंत त्रास देते.** त्यामुळे ह्या पाईपलाईन्स अयशस्वी झाल्याची अनेक उदाहरणे फ्रान्स, बेल्जीयम, स्पेन, ब्राझील, हॉलंड, जपान, पाकिस्तान, कॅनडा इत्यादी देशांमध्ये आहेत. हे पाईप अयशस्वी झाले तर त्यांना पर्याय म्हणून लोखंडी पाईप देखभालीमध्ये टाकावे लागतात. समजा पाईप फुटले तर शहरामध्ये काळजीचे सावट पसरते. म्हणूनच एकंदरीत हे पाईप्स महाराष्ट्रात वापरले गेले नाहीत. परंतु अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेमध्ये १५०० मी.मी. व्यासाची, महत्तम प्रेशर १६ कि. ग्रॅ. प्रति वर्ग सेंटीमीटर असलेली एकूण ३० कि. मी. लांबीची प्रिस्ट्रेस्ड पाईपलाईन (नेरपिंगळाई ते तपोवन) टाकल्या गेली. तसेच पुढेसुद्धा १९ कि.मी. लांबीची ट्रॉन्समिशन पाईपलाईन (गावात, तपोवनवरून पाणी आणण्यासाठी) वापरात आली."

### पाणी पुरवठा अधिकाऱ्यांची झोप उडविणारे पाटबंधारे विभागाचे अधिकारी

**३७५.** श्री. दहासहस्त्र ज्या प्रकल्पात गेले अनेक महिने मन लावून काम करीत होते त्या कामाची तांत्रिक बाजू ते मला सांगत होते. ती मला फारशी कळत होती असे नाही पण ज्या तळमळीने ते बोलत होते त्यामुळे ते ऐकावे असे वाटत होते. ते पुन्हा पुढे सांगायला लागले :

"पाईपलाईनव्दारे मुख्यतः पाणी गुरुत्वाकर्षणाने आणण्यात आले आहे. त्यामुळे कोट्यावधी रुपयांचा विजेवर होणारा खर्च वाचला. परंतु त्यासाठी विविध महत्त्वाच्या ठिकाणच्या पातळ्या (Reduced Levels) तपासून बघणे क्रमप्राप्त होते. त्याचा "सर्व्हे" अतिशय प्रगत अशा Electron Theodolite च्या सहाय्याने केला गेला. पाईप टाकल्यावर त्याचे टेस्टींग घेणे अत्यंत जरूरी होते. प्रत्येक १ कि.मी. लांबीच्या सेक्शन मध्ये संपूर्ण पाईपलाईनचे टेस्टींग अतिशय काटेकोरपणे आम्ही घेत आहोत, त्यामुळेच अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजनेचे बांधकाम आज यशस्वी होत आहे. व ह्या अभुतपूर्व प्रयोगाकडे संपूर्ण वैज्ञानिक व अभियांत्रिकी क्षेत्राचे डोळे लागले आहेत. सर! लोखंडी पाईपपेक्षा निम्मे किमतीत झालेले प्रिस्ट्रेस्ड कॉंक्रिट पाईपाचे हे काम लोखंडी पाईप इतकेच उत्तम काम करील अशी आम्हाला खात्री आहे. हा प्रयोग पहिल्यांदा अमरावतीला होत आहे. हे क्रिटीकल असे काम आहे. **पाटबंधारे विभागाच्या एकामागून एक येणाऱ्या या पत्रांनी कारण नसतांना आमची झोप उडवली आहे. शासनाच्या एका विभागाने दुसऱ्या विभागाला पैसे द्यायचे आहेत. आम्ही लहान अधिकारी आहोत. आमचा छळ हे कां करताहेत?**"

**********************************************

## ३४
## संपूर्ण संघर्षाचा आनंददायक शेवट

**************************************************

### झोप उडविण्यावरील रामबाण औषध : प्रकल्प राष्ट्राला अर्पण करणे

**३७६.** दरम्यान बसल्या बसल्या मी पाटबंधारे विभागाची ती दोनही पत्रे वाचून काढली होती. दहासहस्त्र यांचे निवेदन धृपदावर आलेले पाहून मी त्यांना म्हणालो "अहो दहासहस्त्र! मला आता या कामाचा कंटाळा आला आहे. ही सारी कागदपत्रे नीट लावून ठेवून प्रत्येक दुखापतीला मलमपट्टी करण्याच्या या कामाने मलासुद्धा खूपच मानसिक थकवा आलेला आहे. तुमच्या क्षेत्रातील तुमचे मी बरेच ऐकून घेतले. **आता तुम्ही माझी एक गोष्ट ऐका. पुढच्या आठपंधरा दिवसात हा प्रकल्प तुम्ही 'राष्ट्राला अर्पण करा.' ते एप्रिलमध्ये पाणी बंद करतो म्हणतात ना? मग अजून दिड दोन महिने वेळ आहे. एप्रिलच्या अगोदर पाच लाख लोकांच्या दारी हे पाणी तुम्ही पोचवा. मग कोण "माईचा लाल" हे पाणी तोडतो, त्याची काळजी ते ५ लाख लोक घेतील. आज तुम्हाला एकट्याला ही काळजी करावी लागते, हे तुमचे एकटेपण तुम्ही संपवा. हाच त्यावरचा एकमेव व उत्तम उपाय आहे"** माझा हा सल्ला ऐकून श्री. दहासहस्त्र यांचा चेहरा प्रफुल्लित झाला. "प्रकल्प राष्ट्राला अर्पण करणे" या वाक्याचा खरा अर्थ मला आज पहिल्यांदा त्यांच्याशी बोलतांना कळत होता किंवा कळला होता. दहासहस्त्र या तीक्ष्ण बुद्धीच्या अधिकाऱ्याला मी काय म्हणतो हे लक्षात यायला वेळ लागला नाही.

त्यानंतर कार्यपूर्तीबाबतची चर्चा झाली. "बांधकामातले आता काय शिल्लक राहिले आहे?" अशी चौकशी मी केली तर "बांधकाम पूर्ण आटोपले आहे. जलशुद्धीकरण केंद्राची रंगरंगोटी तेवढी राहिली आहे. एक दोन फिल्टर बेडचे किरकोळ काम राहीले आहे." असे दहासहस्त्र यांनी सांगितले. टेस्टींग सर्व आटोपत आले आहे. सर्व कामाचा वेग वाढवून पुढच्या ३-४ आठवड्यात कार्यपूर्ती होऊ शकेल अशी खात्री श्री. दहासहस्त्र यांना वाटत होती व तसे झाले सुद्धा.

### "अप्परवर्धाचे पाणी मिळण्यास आता अवघे काही दिवस" -'जनमाध्यम'

**३७७. मार्च १९९४ च्या शेवटच्या आठवड्यात हे पाणी आता काही दिवसातच अमरावतीला पोचणार या विषयीचा आनंद शहरात व्यक्त व्हायला लागला होता.** वृत्तपत्रातून रकानेच्या रकाने भरून हा आनंददायक मजकूर ओसंडून वाहत होता. दिनांक २४ मार्च १९९४ च्या दैनिक 'जनमाध्यम'मध्ये **"अप्पर वर्धाचे पाणी मिळण्यास आता अवघे काही दिवस"** असा सहास्तंभी मथळा देऊन जवळजवळ अर्धा पानभर मजकूर असलेले श्री. सुरेश टाले यांचे एक वार्तापत्र प्रसिद्ध करण्यात आले होते व त्यामध्ये योजनेचे अनेक तपशील देण्यात आलेले होते. **"थक्क करणारी तांत्रिक बाजू"** या पोटमथळ्याखाली या वार्तापत्रामध्ये असे नमूद करण्यात आले होते की "या योजनेची तांत्रिक बाजू थक्क करणारी आहे. भारतात प्रथमच प्रिस्ट्रेस्ड कॉंक्रीटच्या जलनलिकेतून पाणी वाहून नेण्याचा प्रयोग या योजनेव्दारा करण्यात आल्याने या योजनेच्या यशापयशाकडे

देशातील पाणी वितरण क्षेत्रातील तज्ञ डोळे लाऊन बसले आहेत." या अर्धा पान मजकुरामध्ये "**खरे श्रेय बी. टी. यांनाच**" या मथळ्याखाली एक चौकट टाकून त्यात माझ्या व श्री दहासहस्त्र यांच्या कामाचा आदरपूर्वक उल्लेख केला होता, तो पुढील शब्दात :

***"खरे श्रेय बी.टी.यांनाच :*** या योजनेच्या प्रशासकीय मान्यतेपासून तर ती पूर्ण करण्यासाठी विधानपरिषद सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी केलेल्या प्रयत्नामुळेच ही योजना साकार होऊ शकली, हे स्पष्ट आहे. लोकवर्गणी, निधी, प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आदी अनेक पातळ्यावर ही योजना मागे रखडत होती. मात्र आ. प्रा. देशमुख यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून व प्रसंगी विधानपरिषदेत भांडून योजना पूर्णत्वाला नेण्यासाठी त्यांच्या स्तरावर त्यांनी केलेले प्रयत्न अभिनंदनीय आहेत. याशिवाय, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग क्र. दोनचे कार्यकारी अभियंता डॉ. सं. व्य. दहासहस्त्र यांचे योजनेतील प्रामाणिक प्रयत्नही दुर्लक्षिता येणार नाही."

## "No More 'Water hunting' for Amravati" - 'Hitwada'

**३७८.** दिनांक २७ मार्च १९९४ च्या दैनिक हितवादमध्ये "**No more 'water hunting' for Amravati**" या मथळ्याखाली प्रसिद्ध पत्रकार श्री अनिल जाधव यांचे एक तपशीलवार वार्तापत्र प्रकाशित करण्यात आले होते. "This unique Rs. 78 crore scheme has history of its own. It is a saga of relentless battle Prof.B.T.Deshmukh, MLC, fought on the floor of the Council with the co-operation and support of every soul in the city and public representatives in its vicinity." असा अगदी सुरुवातीलाच उल्लेख करून पुढे या वार्तापत्रात श्री अनिल जाधव यांनी असेही नमूद केले होते की, "With the passage of time, the proposed estimate of the scheme soared up to Rs. 78 Crore. The State Government this time refused to share the ten percent popular contribution thus inviting a popular agitation from the people here, Prof. B.T.Deshmukh, who was instrumental in bringing the scheme for the city, fought a long battle in the Council and compelled the government to bow before the people's wishes by accepting to share the popular contribution as per revised estimate." आपल्या वार्तापत्रामध्ये योजनेचे अनेक तपशील त्यांच्या बारकाव्यासह नमूद करून शेवटच्या परिच्छेदात श्री. अनिल जाधव यांनी श्री. दहासहस्त्र यांच्या कामाबद्दल पुढील प्रमाणे गौरवोद्धार काढले होते. :

"If Prof. B.T.Deshmukh's contribution is invaluable for this scheme, the efforts of Dr. S.V.Dahasahastra, Executive Engineer, Environmental Engineering and Construction Division No. 2 is equally laudable for the quality of the entire construction work which has been certified as the "best" by the quality Control wing."

## "अमरावतीला 'वर्धावतरण' : एक स्वप्न साकारले" -'हिंदुस्थान'

**३७९.** "**अमरावतीला 'वर्धावतरण' एक स्वप्न साकारले**" या मथळ्याखाली मंगळवार, दिनांक २९ मार्च १९९४ च्या दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये ज्येष्ठ पत्रकार श्री शाम देशपांडे यांचे एक वार्तापत्र प्रसिद्ध झाले होते. त्यांनी आपल्या या वार्तापत्रामध्ये अगदी सुरुवातीच्या परिच्छेदात असे नमूद केले होते की, :-

"अमरावती शहराच्या पूर्व क्षितीजाकडे जलशुद्धीकरण केंद्रात वर्धा नदीचे आगमन झाले. एक स्वप्न साकारले. ..... अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी आणि अप्पर वर्धा धरणाच्या बांधकामासाठी एक ऐतिहासिक सांसदीय लढाई जिंकण्याऱ्या आमदार प्रा. बी. टी. देशमुखांनी रंग वंदनाच्या रंगीत दिवशी दुपारी अडीचच्या सुमारास या जलौघाचे हर्षोल्लासात दर्शन घेतले, त्यावेळी त्यांना नकळत सुदाम काकांची आठवण झाली आणि मन हेलावले. **अमरावती शहराची तहान भागविण्यासाठी अमरावती शहरात दाखल झालेल्या वर्धामायने काल सायंकाळपासून शहरातील जलवाहिन्या स्वच्छ धुवून काढल्या.**"

मला हे मान्य केलेच पाहिजे की, ५२ किलोमीटर अंतरावरून येणारे वर्धेचे पाणी तपोवन टेकडीवरील जलशुद्धीकरण केंद्रात ज्या दिवशी येऊन पोचले, **त्या प्रथम दिवशी त्या जलौघाचे दर्शन हा माझ्यासाठी माझ्या जीवनातील मोठाच भावनोत्कट क्षण होता.** श्री. दहासहस्त्र यांच्यासह त्यांचे अनेक अधिकारी व कर्मचारी यांचा मोठा ताफा माझ्या अवतीभोवती असल्यामुळेच भावनांच्या या कल्लोळामध्ये डोळ्यांच्या पापण्या ओल्या झाल्या तरी हा ओलावा पापण्यांचे काठ सोडून बाहेर पडणार नाही, याची व्यावहारिक काळजी घेण्यामध्ये मी मोठे बळ आणून यश मिळवित होतो. डोळ्यात दाटणारी ओल ही प्रकल्पपूर्तीच्या आनंदापोटी आहे? की सर्वश्री. भाई सुदाम देशमुख, बाळासाहेब मराठे व बाळासाहेब उर्फ एस. झेड. पाटील हे या लढ्यातील सेनानी आज आपल्यासोबत नाहीत या भावनेपोटी आहे? की दोन्हीच्या मिश्रणापोटी आहे? हे ठरविण्याइतका सुद्धा मनुष्याचा अशावेळी विचारावर ताबा रहात नाही हेच खरे!

## "आम्ही आपले आभारी आहोत" -'हिंदुस्थान'

**३८०.** "**आम्ही आपले आभारी आहोत**" या मथळ्याखाली बुधवार, दिनांक ३० मार्च १९९७ च्या दैनिक 'हिंदुस्थान'मधील अग्रलेखामध्ये संपादकांनी या आनंददायी घटनेचे मनापासून स्वागत केले होते. या अग्रलेखातील कांही महत्त्वपूर्ण भाग पुढील प्रमाणे :-

"येणार येणार म्हणून गाजावाजा होत असलेले वर्धा नदीचे पाणी आता अमरावती शहरात पोहोचले आहे...... अप्पर वर्धा धरणातून पाणी अमरावतीला येण्याचा हा क्षण एक ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. वर्धा धरणाच्या पाण्यातून काही भाग अमरावती बडनेरा शहराला पुरविण्याची मूळ योजना असली तरी पुढे सरकारने घेतलेल्या काही निर्णयामुळे अमरावती महापालिकेवर अगोदर ५ कोटी रुपये भरा तरच वर्धाचे पाणी मिळेल असा निर्बंध लावण्यात आला. अमरावती महापालिकेची नाजूक आर्थिक स्थिती पाहता इतका पैसा जमा करणे केवळ असंभव होते. त्यातून ही पाणी पुरवठ्याची योजनाच बारगळते किंवा काय? अशी स्थिती निर्माण झाली होती पण आमदार बी. टी. देशमुख आमदार सुदाम काका व त्याच्या साथीला आमदार शेखावत, रा. सु. गवई यांनी सर्व सांसदीय आयुधांचा वापर केला. अमरावतीला बाळासाहेब मराठे यांनी प्रायोपवेषणाचा इशारा दिला, तेव्हाच पालकमंत्री श्री. राम मेघे समोर आले आणि तेव्हाचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना शेवटी अमरावतीवर लादलेला ५ कोटी रुपयाचा भुर्दंड रद्द करावा लागला. पाणी पुरवठा योजनेचा शुभारंभ विदर्भ महाविद्यालयाजवळील पाण्याच्या टाकीच्या बांधकामाच्या भूमिपूजनाने झाला. त्यावेळी आमदार बी. टीं. नी शंकररावांना "तुम्हा तो शंकर सुखकर हो" म्हणून दिलेल्या शुभेच्छा आणि लोकांनी व्यक्त केलेला आनंद आजही जसाच्या तसा समोर येतो..... **वर्धेचे पाणी अमरावतीला आणण्याच्या संघर्षात ज्यांनी ज्यांनी अंतःकरणपूर्वक साथ दिली त्या सर्वांना आज खास धन्यवाद द्यायला हवेत. त्याचे आभार मानायला हवेत.**"

## सेवानिवृत्त सदस्य सचिवांना झालेला आनंद

**३८१.** सेवानिवृत्त झालेले महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळाचे सदस्य सचिव, श्री. सुरेश पटवर्धन यांना एप्रिल १९९४ च्या सुरुवातीला या योजनेचे काम पूर्ण झाल्याची वार्ता कळली व त्यांनी मला एक पत्र पाठवून याबाबतचा आनंद व्यक्त केला. श्री. सुरेश पटवर्धन या प्रकल्पाच्या सर्वेक्षण व अंदाजपत्रकाच्या टप्प्यात या भागामध्ये अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत होते. त्यानंतर मुख्यअभियंता व नंतर अनेक वर्षे सदस्य सचिव या नात्याने या योजनेच्या चढउतारपूर्ण प्रवासाची खूपच जवळून उत्तम जाणीव त्यांना होती. ते आता सेवानिवृत्त झालेले असले तरी प्रकल्पपूर्तीच्या वृत्ताने त्यांना आनंद होणे स्वाभाविक होते व असा आनंद व्यक्त करण्यासाठी त्यांनी माझी निवड करावी ही माझ्यासाठी मोठ्याच आनंदाची बाब होती. दिनांक ३ एप्रिल १९९४ रोजी मला लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात "महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असलेली अनेक शहरे मला ठाऊक आहेत. राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी तेथे प्रश्न सुटू शकले नाहीत. **दहा टक्के लोकवर्गणीची अट तुम्हा लोकांच्या प्रयत्नानेच दूर झाली. सुदैवाने राजकीय पक्षांची बंधने बाजूला ठेवून तुम्ही सर्व लोकप्रतिनिधी एक झाल्याने याबाबत यश मिळाले.**" श्री. पटवर्धन यांनी पुण्याहून मला लिहिलेले मूळ पत्र इंग्रजीतून आहे. त्यांच्या भावना जशाच्या तशा जाणून घेता याव्यात म्हणून मी मुद्दाम हे पत्र पुढे जसेच्या तसे देत आहे. :-

**"Water and power Consultancy Services (India) Ltd. (A Government of India undertaking)**
**S.S.Patwardhan,** (Chief Consultant),
**Madhumalati, 9 Swastishri Soc. Ganesh Nagar, Pune - 411 052.**
**Date : April 3, 1994**

Dear Shri. Deshmukh Saheb,

I came to know that Amravati Water Supply Scheme is

being commissioned and the inauguration function is to be held on 11.4.94.

Because of your keen interest in the project, right from the preparation of the Amravati water supply scheme, and getting the scheme administratively approved, the people are able to get the benefit of the same. **I know number of cities in Maharashtra where the problem of drinking water supply scheme could not be solved because of the lack of political will.**

It is equally true that M.W.S.S.B. officers also took keen interest in this major project, and that is why the project could be completed in the shortest time. **The popular contribution of Amravati water supply scheme could also be waived because of your efforts. Fortunately all elected representatives could also join with you in this task without raising any party issues.**

Just I felt that I should congratulate to you, I am writing this letter. I am doing well after my retirement and at present I am working in Govt. of India undertaking as Chief Consultant. Please do come to us when you come to Pune.

Thanking you, with regards,

Yours sincerely
S.S.Patwardhan"

*********************************************

## ३५
## अनुशेष निर्मूलन कार्याबाबत अमरावतीने मार्गदर्शन केले

*********************************************

### सर्वात जास्त अनुशेष असलेले शहर

**३८२.** सत्यशोधन (दांडेकर) समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेला प्रदेश म्हणजे विदर्भ. २७३ दशलक्ष लिटर्स दरदिवशी म्हणजे सर्वात जास्त अनुशेष असलेल्या या प्रदेशातील **सर्वात जास्त (६१ दशलक्ष लिटर्स दरदिवशीचा) अनुशेष असलेला क्रमांक एकचा जिल्हा म्हणजे अमरावती, त्यातील महत्तम अनुशेष असलेले क्रमांक एकचे शहर (३२ दशलक्ष लिटर्स दरदिवशी) म्हणजे अमरावती.** नागरी पाणी पुरवठ्याचा दरदिवशीचा ५६ दशलक्ष लिटर्स अनुशेष निश्चित झालेला विदर्भातील क्रमांक दोनचा जिल्हा म्हणजे अकोला व क्रमांक दोनचे शहर सुद्धा अकोलाच, (दरदिवशी ३० दशलक्ष लिटर्स). अमरावती महसूल विभागाच्या अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील सर्वच शहरे व यवतमाळ जिल्ह्यातील सात शहरे नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषात आहेत. **ही योजना पूर्णत्वाला गेल्यामुळे नागरी पाणीपुरवठा या विकास क्षेत्रातील या शहराचा अनुशेष भरून निघण्यास फार मोठी मदत होणार हे उघड होते.**

### तेव्हा मंत्र्याला ते फाडून खायला उभे असल्यासारखे वाटतात

**३८३.** या योजनेच्या कार्यपूर्तीसाठीच्या आमच्या सहभागाने या योजनेला काय मदत झाली ते समीक्षकांनी ठरवावयाचे आहे पण या सहभागाने आमच्या **"प्रतिनिधित्वाचे सोने केले" हे मी मात्र ठामपणे म्हणू शकतो.** १९८० मध्ये मी सभागृहात गेलो तोच मुळात "शिक्षक - कर्मचारी - पदवीधर" यांचे व्यावसायिक प्रश्न हे आपले मुख्य कार्यक्षेत्र आहे असे समजून. आम्ही ते मुख्य कार्यक्षेत्र धरुन सभागृहामध्ये कसदारपणे व प्रामाणिकपणे कामाला सुरुवात केली. मी असे का म्हणत आहे हे कळण्यासाठी तत्कालीन मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक यांनी १९८६ मध्ये काढलेले पुढील उद्‌गार पहा :-

**"सन्माननीय सभासद श्री.बी.टी.देशमुख एका बाजूला असतात व दुसऱ्या बाजूला शिक्षण मंत्री असतात तेव्हा त्यांना ते फाडून खायला उभे असल्यासारखे वाटतात.** परंतु श्री. देशमुख यांच्याबाबतीत हे सुद्धा सांगितले पाहिजे की, ते फार तयारी करून येतात. प्रत्येक प्रश्नाची फाईल त्यांच्याजवळ असते. प्रश्न केंव्हा विचारला होता. त्या प्रश्नाला मागे काय उत्तर देण्यात आले होते. त्याचे पुढे काय झाले? **याबाबत मंत्र्यांच्या फाईलमध्ये माहिती नसते परंतु श्री देशमुख यांच्या फाईलमध्ये ती माहिती असते** आणि त्यामुळे श्री. बी. टी. देशमुख यांचे प्रश्न ज्यावेळी असतात त्यावेळी मी माझ्या सेक्रेटरीएटला सांगत असतो की, त्या प्रश्नाच्या संदर्भात मागे जी काही प्रश्नोत्तरे झालेली आहेत त्याची फाईल माझ्या टेबलावर ठेवा कारण सन्माननीय सभासद नेहमी असे विचारत असतात की, मागे तुम्ही अशा प्रकारे सांगितले होते आणि आता वेगळ्या पद्धतीने सांगत आहात. मागे दिलेली उत्तरे व आता दिलेली उत्तरे यामध्ये फरक आहे. तेव्हा याचा अर्थ काय आहे? या संदर्भात ते नक्की विचारत असतात. **अशा रीतीने जेव्हा विचारले जाते तेव्हा यातून सुटावे म्हणून मंत्री आश्वासने देऊन टाकतात. तुम्ही म्हणता आहात म्हणून करून टाकू असे सांगतात.**" *(राष्ट्कुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा - महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन मुंबई यांनी प्रसिद्ध केलेल्या "औरंगाबाद येथे दिनांक १७ व १८ ऑक्टोबर १९८६ रोजी "प्रश्नोत्तराव्यतिरीक्त इतर सांसदीय आयुधे" या विषयावर आयोजित केलेला परिसंवाद" या पुस्तकाचे पृष्ठ ८ पहा)*

### "पदवीधरा"सोबतच अनुशेष निर्मूलनाचे कार्य

**३८४.** "शिक्षक-कर्मचारी-पदवीधर" या आमच्या कार्यक्षेत्राला विकासाच्या विविध प्रश्नांचे, अनुशेष निर्मूलनाचे फार मोठे कार्यक्षेत्र जोडून देण्याला सुरुवात केली ती अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या सभागृहातील पाठपुराव्याने. विधान परिषदेला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सभापती व माजी सभापतींच्या मुलाखतीच्या दूरदर्शनवरील कार्यक्रमात दिनांक **१६ जानेवारी १९८८** रोजी मुलाखतकाराने जयंतराव, तुम्ही एखादे संस्मरण सांगू शकाल काय असा प्रश्न विचारला तेव्हा मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक यांनी पुढील उद्‌गार काढले. :

"आमच्या सभागृहात जवळजवळ १५-१६ सभासद तरी शिक्षक आहेत आणि त्याचा परिणाम स्वाभाविक पणे अनेक दृष्टीने होतो. त्यांच्यापैकी बी. टी. देशमुख हे अमरावतीचे एक सभासद आहेत. ते अतिशय बारकाईने प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करतात. म्हणजे शिक्षकांचे वेतन असेल, त्यांना इतर सवलती असतील वगैरे ज्या सर्व गोष्टी आहेत, त्याच्यावर ते इतक्या तयारीने येतात. मागे उत्तरे काय दिली, त्याच्या पूर्वी उत्तरे काय दिली, आता काय झालेले आहे. त्यावेळी त्याचा उपयोग असा होतो की, तो प्रश्न तेथे पकडला जातो आणि त्याचं उत्तर हे द्यावंच लागतं." **याच मुलाखतीत ते पुढे म्हणतात** :- "याच बी. टी. देशमुखांनी अमरावतीचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न लावला. आपणा सर्वांना माहीत आहे की, अमरावती, अकोला याठिकाणी सगळीकडे पाण्याची फार टंचाई आहे. तेव्हा ते पाणी द्यायचं हे ठरलं. त्याचं टेन परसेंट हे मात्र अमरावतीने दिलं पाहिजे आणि तो तेवढा भाग द्यायचा हे अमरावती म्युनिसिपालटीला शक्य नव्हतं. बी. टी. देशमुख आणि आर. एस. गवई विरोधी पक्षाचे नेते या नात्याने त्यांनी सगळ्यांनी तो प्रश्न इतका धसास लावला की, **शेवटी अमरावतीचं टेन परसेंट नगरपालिकेनी भरण्याचं रद्द झालं आणि पाण्याची स्कीम सुरू केली.**" जयंतराव टिळक यांच्या सारख्या कसलेल्या पीठासिन अधिकाऱ्यांनी १९८६ मध्ये व १९८८ मध्ये आमच्या कामामुळे दिलेली ही "प्रमाणपत्रे" काळजीपूर्वक पाहिली तर **या दोन प्रमाणपत्रातील फरक हा अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या कामामुळे पडलेला फरक आहे हे कोणाच्याही सहज लक्षात येईल.**

### तडाखेबंद पाठपुराव्याबद्दलची प्रशंसा

**३८५.** विधानपरिषदेतील आमच्या पहिल्याच कार्यकाळात "शिक्षक-कर्मचारी- पदवीधर" या कार्यक्षेत्रासोबतच विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनाची जी जोरदार आघाडी आम्ही सभागृहात उघडली त्यासाठीचा प्रवास "अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजना" व "अप्पर वर्धा धरणाच्या" कामाने सुरू झाला हे नमूद करतांना मला अभिमानच वाटतो. महाराष्ट्र विधानपरिषदेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यावेळचे विधानमंडळ सचिव श्री. व्ही. एम. सुब्रम्हण्यम यांनी लिहिलेल्या "फिफ्टी ईअर्स ऑफ लेजिस्लेटिव्ह कौन्सिल इन् महाराष्ट्र १९३७ - ८७" **या ग्रंथामध्ये सभागृहामध्ये प्रश्न मांडताना त्याची मजबूत तयारी करून जाण्याविषयी श्री. सुब्रम्हण्यम यांनी प्रतिपादन केलेले मत पुढील प्रमाणे :-**

"Those who might have watched the entire proceedings might have understood how persevering Shri B. T. Deshmukh, M.L.C., was among other members who pursued the question, whenever he used to wave a sheaf of papers in the Council to impress on the Chairman that he had all the documents readily with him to successfully challenge the accuracy and correctness of the information given by the Government. Similar preparedness was obviously absent on the Government side who had to ask for more time to collect information, the matter thus remaining pending for a considerable time. Anyway, all was well that ended well."

श्री. व्ही. एम. सुब्रम्हण्यम यांनी लिहिलेल्या "Fifty years of Legislative

Council in Maharashtra" **याच पुस्तकात पृष्ठ ११४ वर अमरावती पाणी पुरवठ्याबाबत पुढील उल्लेख आहे.** "It was the members of the Council who untiringly and repeatedly put questions, session after session, on the Amravati Water Supply Scheme. **Here also the matter ran a prolonged and zigzag course for quite some time. It was, again, the perseverence of the members and the zeal with which the case was canvassed that convinced the Government,** who had to sanction the scheme to the satisfaction of the people affected in Amravati." **या ग्रंथातील 'प्रश्न' या आयुधा ने विधानपरिषदेत प्रश्न कसे सुटतात यासाठी लिहिलेल्या सातव्या प्रकरणात नावानिशी एकट्या बी. टीं. देशमुखांचाच उल्लेख आहे** हे लक्षात घेतले म्हणजे अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या निमित्ताने आमच्या विधानपरिषदेतील पहिल्याच कालखंडात आम्ही सुरू केलेल्या **अनुशेष निर्मूलनाच्या आक्रमक लढाईचे केवढे उत्तम प्रतिबिंब सभागृहाच्या पिठासिन अधिकाऱ्यांबरोबरच सभागृहाच्या सचिवांच्या मनावर पडले होते याचा अंदाज यायला वेळ लागत नाही.**

## आकृतीबंधाचा इतिहास बदलला

**३८६.** पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक आकृतीबंधामध्ये १० टक्के लोकवर्गणीची अट असल्यामुळे बलवान भागांच्या योजना तडीला जातात व अप्रगत विभाग मागे राहतात हे लक्षात घेऊन अमरावती पाणी पुरवठा योजनेतून दहा टक्क्याची अट काढून टाकण्यासाठी झालेल्या लोक चळवळीने व सभागृहातील पाठपुराव्याने प्रथम क वर्ग नगरपालिकांसाठी व नंतर सर्व नगरपालीकांसाठी ही अट काढून टाकण्यात आली. **दहा टक्के लोकवर्गणीची अट महाराष्ट्रामध्ये आता इतिहासजमा झालेली होती. हा इतिहास घडविण्यातील अमरावती शहराचा वाटा लक्षणीय आहे.** सभागृहातील या लढ्यामध्ये विधानपरिषदेत अमरावतीकरांना सोबत करणारे त्यावेळचे एक विधानपरिषद सदस्य श्री. मनोहर जोशी यांनी पुढे मुख्यमंत्री झाल्यावर अमरावती शहराच्या वेळी आलेला अनुभव लक्षात घेऊन "**१० टक्के लोकवर्गणी न भरल्यामुळे अनेक योजना पूर्ण होत नाहीत. म्हणून माझ्या शासनाने अशा प्रकारचा विचार केलेला आहे की १० टक्के लोकवर्गणीची अट ही पूर्णपणे काढून टाकण्यात यावी.**" असे विधानसभेत जाहीर केले व त्याप्रमाणे शासननिर्णयही निर्गमित झाला. मा. मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी २० जुलै १९९५ रोजी नगरविकास विभागाच्या मागण्यावरील चर्चेला उत्तर देतांना विधानसभेत वरील निर्णय घोषित करतांना अमरावती शहराचा पुढील शब्दात उल्लेख केला "अनेक ठिकाणी ही लोकवर्गणी भरली जात नसल्यामुळे ही लोकवर्गणी भरण्याची नगरपालिकांची क्षमता, ताकद नसल्यामुळे या योजना सुरु झाल्या नाहीत. या योजना फक्त कागदावर दिसून येत आहेत...... **अमरावती महापालिकेचा त्याला अपवाद आहे. विधानपरिषद सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी याबाबत अतिशय तर्कशुद्ध माहिती दिली आणि त्यांचे आरग्युमेंट शासनाला मान्य झाले. मी त्यावेळी सभागृहामध्ये उपस्थित होतो. तेव्हा फक्त अमरावती नगरपालिकेला अपवाद करण्यात आला आहे. गेल्या ४/५ महिन्यामध्ये अनेक नगरपालिकांनी मला विनंती केली.**"

## अमरावती, अकोला, यवतमाळ
## एका पाठोपाठ एक

**३८७.** सर्वच विकास क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात अनुशेष वाढलेला आहे हे खरे असले तरी जलसिंचन, उद्योग, रस्तेविकास व पाणीपुरवठा ही चार महत्तम अनुशेष असलेली प्रमुख विकासक्षेत्रे आहेत. **अनुशेष निर्मूलनासाठी प्रयत्न झाला तर तो अनुशेष प्रयत्नांच्या प्रमाणात दूर होऊ शकतो.** विदर्भातील बहुतेक शहरे, अमरावती महसूल विभागाच्या अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील सर्वच शहरे व यवतमाळ जिल्ह्यातील सात शहरे नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषात आहेत. या अनुशेषाच्या निर्मूलनार्थ सभागृहात पुढे सातत्याने उभारण्यात आलेली लढाई प्रशंसनीयच नव्हे तर यशस्वीही ठरली. नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेल्या प्रदेशातील सर्वात जास्त अनुशेष असलेले क्रमांक एकचे शहर म्हणजे अमरावती, **पण १९९४ मध्येच या शहराच्या नागरी पाणीपुरवठा या विकास क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनाच्या लढाईला मोठे यश प्राप्त झाले.** अकोला हे क्रमांक दोनचे शहर. अमरावतीच्या पाठोपाठ सभागृहामध्ये अकोला पाणीपुरवठा योजनेसाठी सुद्धा जबरदस्त संघर्ष झाला. आता **अकोला शहराची वाढीव पाणी पुरवठा योजना** पूर्णत्वाला गेलेली आहे. ११.५० दशलक्ष लिटर्स दरदिवशीचा अनुशेष असलेले तिसरे शहर म्हणजे यवतमाळ. सभागृहातील या योजनेच्या भक्कम पाठपुराव्याला लक्षणीय यश आलेले आहे.

## अनुशेषात असलेल्या सर्वच
## शहरांसाठी लढाई

**३८८.** दांडेकर समितीच्या अहवालानुसार दरदिवशीचा ३० लक्ष लिटर्सचा पिण्याच्या पाण्याचा अनुशेष निश्चित झालेल्या चिखली शहरासाठी १५०४ लक्ष रूपयाची वाढीव पाणी पुरवठ्याची योजना, वाशिम (४२.५) शहरासाठी ८२ लक्ष रूपयाची योजना, *(शहराच्या नावासमोर कंसात नमूद असलेला अंक दांडेकर (सत्यशोधन) समितीने निश्चित केलेला त्या शहराचा पिण्याच्या पाण्याचा दरदिवशीचा अनुशेष लक्ष लिटर्समध्ये दर्शविणारा आहे.)*

अकोट (६७.००) शहरासाठी १५९ लक्ष रूपयाची योजना, कारंजा (४२.५) शहरासाठी ११४ लक्ष रूपयाची योजना, मुर्तिजापूर (३२.५) शहरासाठी १५३ लक्ष रूपयाची योजना, बाळापूर (३०.००) शहरासाठी ७० लक्ष रूपयाची योजना, तेल्हारा (१५.००) शहरासाठी २१ लक्ष रूपयाची योजना, पातूर (१२.५) शहरासाठी ६३ लक्ष रूपयाची योजना, मंगरूळपीर (२१.५) शहरासाठी ३७५ लक्ष रूपयाची योजना, रिसोड (००.००) शहरासाठी २०६७ लक्ष रूपयाची योजना, अचलपूर (९०.००) शहरासाठी ४९१ लक्ष रूपयाची योजना, मोर्शी (२२.५) शहरासाठी ३०३ लक्ष रूपयाची योजना, वरूड (३०.००) शहरासाठी १५६१ लक्ष रूपयाची योजना, अंजनगाव (३५.००) शहरासाठी १८४१ लक्ष रूपयाची योजना, दर्यापूर (२७.५) शहरासाठी ४१७ लक्ष रूपयाची योजना, चांदूर बाजार (२५.००) शहरासाठी ७४ लक्ष रूपयाची योजना, धामणगांव (२२.००) शहरासाठी ९६५ लक्ष रूपयाची योजना, शेंदूरजना घाट (२०.००) शहरासाठी ५३४ लक्ष रूपयाची योजना, चांदूर रेल्वे (१७.५) शहरासाठी २०७ लक्ष रूपयाची योजना, चिखलदऱ्यासाठी १५७ लक्ष रूपयाची योजना, बुलढाणा वितरण व्यवस्था टप्पा २ (३७.००) ४९० लक्ष रूपयाची योजना, मलकापूर (४७.५) शहरासाठी २९८ लक्ष रूपयाची योजना, मेहकर (२७.५) शहरासाठी २४५ लक्ष रूपयाची योजना, देऊळगांव राजा (१७.५) व सिंदखेड राजा या शहरांसाठी १६४६ लक्ष रूपयाची संयुक्त योजना, यवतमाळ (११५.००) शहरासाठी ६७७७ लक्ष रूपयाची योजना, वणी (३२.५) शहरासाठी ६३ लक्ष रूपयाची योजना, दिग्रस (३०.००) शहरासाठी ४३९ लक्ष रूपयाची योजना, दारव्हा (२२.५) शहरासाठी १०२ लक्ष रूपयाची योजना, पांढरकवडा (२०.००) शहरासाठी १४६ लक्ष रूपयाची योजना, उमरखेड (२५.००) शहरासाठी ८०७ लक्ष रूपयाची योजना, घाटंजी (१५.००) शहरासाठी १९ लक्ष रूपयाची योजना, **या सर्व वाढीव पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून त्यातील कांही पूर्ण झालेल्या आहेत. काही पूर्ण होत आहेत. काही बांधकामाधीन आहेत तर काहींच्या कामाला सुरूवात झालेली आहे/होत आहे.** पिण्याच्या पाण्याच्या अनुशेषाने ग्रस्त असलेल्या या शहरांच्या वाढीव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होऊन हा अनुशेष संपुष्टात यावा यासाठी या भागातील लोक प्रतिनिधींनी सभागृहात केलेले सांसदीय युद्ध हे अभिमान वाटावा असेच आहे. **या सांसदीय युद्धाची सुरुवात सभागृहात अमरावती शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या लढाईने झालेली आहे हे कोणालाही विसरता येणार नाही.**

## जलसिंचन अनुशेष

**३८९.** पाणी पुरवठ्याच्या योजनांचा संबंध आला म्हणून उद्भवांचा प्रश्न आला. **उद्भवांचा प्रश्न आला म्हणून धरणांचा पाठपुरावा आला. धरणांच्या पाठपुराव्यातून जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेषाची चिकित्सा आली.** विधानमंडळ सदस्य या नात्याने उपलब्ध झालेल्या **सांसदीय आयुधांचा वापर करून कष्टपूर्वक व मेहनतीने मिळविलेल्या अधिकृत माहितीच्या आधारावर मी पुढील ठाम निष्कर्ष १९९२ मध्ये सभागृहात व सभागृहाबाहेर सुद्धा मांडले :**

"रुपयातील किमतीच्या अधिकृत मापदंडाच्या परिभाषेत बोलावयाचे झाल्यास ३० जून १९८२ रोजी **अमरावती जिल्ह्याचा अनुशेष १३४ कोटी रुपयाचा होता तो ३० जून १९९० रोजी ४२३ कोटी रुपयाचा झालेला आहे. अकोला जिल्ह्याचा अनुशेष ९२ कोटी रुपयावरून ३६० कोटी रुपयावर व बुलढाणा जिल्ह्याचा अनुशेष ८४ कोटी रुपयावरून २९४ कोटी रुपयावर गेला आहे.** यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर या जिल्ह्यांचा अनुशेष अनुक्रमे २१७, १३१ व १२३ कोटी रुपये झाला आहे." त्यातुनच पुढे "**महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष : क्ष किरण परीक्षा**" या मी लिहिलेल्या पुस्तकाचा जन्म झाला. मे १९९८ मध्ये प्रकाशित केलेल्या या पुस्तकामध्ये **अधिकृतपणे मिळालेल्या/मिळविलेल्या माहितीच्या आधारावर पुढील ठाम निष्कर्ष समोर आले. :-**

"सत्यशोधन समितीने ३० जून १९८२ च्या स्थितीवर काढलेला विदर्भाचा जलसिंचन अनुशेष कमी झाला नसून त्यानंतरच्या बारा वर्षात तो मोठ्या प्रमाणात वाढला. रुपयातील किमतीच्या अधिकृत मापदंडाच्या परिभाषेत बोलावयाचे झाल्यास जून १९९४ ची शासकीय आकडेवारी असे दाखविते की **३० जून १९८२ रोजी अमरावती जिल्ह्याचा या विकासक्षेत्राचा रूपयातील अनुशेष १३४ कोटी रुपयाचा होता, तो ३० जून १९९४ रोजी १०९५ कोटी रुपयाचा झालेला आहे. अकोला जिल्ह्याचा अनुशेष ९२ कोटी रुपयावरून ९०५ कोटी रुपयावर व बुलढाणा जिल्ह्याचा अनुशेष ८४ कोटी रुपयावरून ८४० कोटी रुपयावर गेला आहे.** यवतमाळ जिल्ह्याचा अनुशेष १०५ कोटी रुपयावरून ७९० कोटी

रुपयावर गेला आहे. वर्धा जिल्ह्यांचा अनुशेष ४३.५१ कोटी रुपये होता तो २२५ कोटी रुपये व चंद्रपूर जिल्ह्याचा अनुशेष ५४.९० कोटी रुपये होता तो ४०५ कोटी रुपये झाला आहे."

अनेक वर्षाच्या मेहनतीने मिळविलेली माहिती व काढलेले हे निष्कर्ष व हे अभ्यास यांची सुरुवात "अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजना व अप्पर वर्धा धरणाचे बांधकाम" या प्रश्नाच्या पाठपुराव्याने झाली ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे.

### "उत्कृष्ट संसदपटू" पुरस्कार

**३९०.** राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने सन - १९९५-९६ चा '**उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार** मला प्रदान करण्यात आला. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेचे सहअध्यक्ष श्री. जयंतराव टिळक, सभापती महाराष्ट्र विधानपरिषद व श्री. दत्ताजी नलावडे, अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा **या उभय पिठासिन अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने मला प्रदान करण्यात आलेल्या सन्मान पत्राची वाक्संहिता पुढील प्रमाणे आहे :-**

"श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख, विधानपरिषद सदस्य हे गेली **१५** वर्षाहून अधिक काळ संसदीय प्रणालीचा पाया मजबूत करण्यामध्ये एक अग्रेसर म्हणून ओळखले जातात. सन १९८० मध्ये त्यांनी जेव्हा विधानमंडळामध्ये प्रवेश केला तेव्हापासून त्यांनी आपली संसदीय प्रणाली अधिक भक्कम होण्यासाठी भरीव योगदान दिले आहे. सामाजिक जाणिवेची निसर्गदत्त देणगी आणि उत्कृष्ट धैर्य त्यांना लाभल्याने त्यांनी नेहमीच राज्यातील जनतेच्या भल्यासाठी निक्षून आणि अत्यंत निर्धाराने आपली बाजू मांडली. त्यांनी अभ्यास व तपश्चर्येव्दारा वाटचाल केली आणि अशा तऱ्हेने त्यांनी लोकांच्या समस्यांचा आवाका आणि व्याप्ती पूर्णपणे समजून घेतली. त्यांची उपजत बुद्धिमत्ता आणि कार्यकुशलता यामुळे त्यांचे विशेष व्यक्तिमत्व बनले आहे. विविध विषयांचे अर्थपूर्ण व सुलभ विशदीकरण करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे महाराष्ट्र विधानमंडळाच्या माध्यमातून संसदीय प्रणाली सजीव आणि समृद्ध होण्यास मदत झाली आहे. विधिमंडळाचे नियम आणि कार्यपद्धती यावर असलेली त्यांची उत्तम पकड आणि संसदीय सभ्याचार व प्रतिष्ठा तसेच समित्यांच्या कामांची उत्तम जाण याकरिता '**उत्कृष्ट संसदपटू**' हा पुरस्कार त्यांना देण्यात राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेला अतिशय आनंद होत आहे."

अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी सभागृहामध्ये सुरू झालेल्या लढाईने पुढे विदर्भाच्या विविध विकास क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनाची लढाई असे रूप धारण केले. **त्या लढाईतील आमच्या सहभागाने आमच्या प्रतिनिधित्वाचे सोने केले या माझ्या विधानातील यथार्थता उपरोक्त वाक्संहितेच्या काळजीपूर्वक वाचनानंतर वाचकांच्या निश्चितपणे लक्षात येईल** अशी मला खात्री आहे.

### ११ एप्रिल १९९४ पासून पाणी पुरवठा सुरू

**३९१.** अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधण्यात आलेल्या अमरावती शहरासाठीच्या ५५ कोटी रुपयाच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेला २७ ऑक्टोबर १९८६ च्या शासन निर्णयाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली होती. योजनेसाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमतीमध्ये झालेली वाढ व इतर अनुषंगिक कारणामुळे योजनेच्या किमतीमध्ये वाढ झाली. ७८ कोटी रुपये किमतीच्या वाढीव अंदाजपत्रकाला २१ जुलै १९९३ च्या शासननिर्णयाने सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. या योजनेकरिता अप्पर वर्धा धरणामध्ये प्रतिवर्षी ५८.५० घनमिटर्स एवढ्या साठ्याचे आरक्षण करण्यात आलेले आहे. दरदिवशी दर माणशी १२० लिटर्स हे प्रमाण धरून योजनेची बांधणी करण्यात आलेली असून इ.स. २०१६ सालच्या ८.६० लक्ष लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्याचे नियोजन योजनेमध्ये आहे. "**या योजनेमधून ११ एप्रिल १९९४ पासून शहराला पाणी पुरवठा सुरू करण्यात आला.** अशा रीतीने अप्पर वर्धा धरण उद्‌भव धरून बांधण्यात आलेली शहराची वाढीव पाणीपुरवठा योजना एप्रिल १९९४ पासून कार्यान्वित झाल्यामुळे **रेवसा, आसेगाव परिसरातील कुपनलिकाव्दारे होणारा पाणीपुरवठा पूर्णतः बंद करण्यात आला आहे.** तसेच शहरामधील विंधन विहिरीतून होणारा पाणी पुरवठा देखील बंद करण्यात आला आहे" असे अधिकृत कागदपत्रात नमूद आहे. येथेच हे निवेदन मी थांबवित आहे. हे निवेदन माझ्या संसदीय कार्यकाळात सदस्य या नात्याने मला मिळालेल्या अधिकृत माहितीवर आधारित आहे.

**१ डिसेंबर २०२५** **- बी.टी.देशमुख**

*****

***एका चार ते पाच लाख लोकसंख्येच्या शहराला वर्षातून अनेक महिने पिण्याच्या पाण्यासाठी भुपृष्ठावरील जलाशयातून पुरवठा उपलब्ध नसेल व संपूर्णपणे कुपनलिकांच्यामार्फत होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून रहावे लागत असेल तर ते त्या शहरावरील एक मोठे संकटच असते. अशा संकटाकडे व्यावसायिक संघटनांनी तो आपल्या व्यवसायाशी संबंधित प्रश्न नाही अशी भूमिका घेऊन त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी सहभाग देण्यापासून दूर राहणे हे उचित ठरत नाही अशी भूमिका आमच्या संघटनेने सुरुवातीपासून घेतली.***

*( लेखकाचे प्रास्ताविक परिच्छेद ६ पहा )*

# 'नुटा बुलेटीन'ची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 02.12.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.12.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................